
म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. ५.३



# अशी ही दिल्ली

ज. श्री. टिळक

REFBK-0018375

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

# अशी ही दिल्ली

ज. श्री. टिळक

संग्रहालय ठाणे
१८३७५

REFBK-0018375

REFBK-0018375

- प्रकाशक : ज. श्री. टिळक, ५६८ नारायण पेठ, पुणें ३०
- मुद्रक : ज. श्री. टिळक, केसरी मुद्रणालय, ५६८ नारायण पेठ, पुणें ३०


- सर्वाधिकार लेखकाधीन


- प्रथमावृत्ति : ऑगस्ट १९७१
- मुखपृष्ठ : सत्यवान टण्णू

**मूल्य १० रुपये**

# प्रस्तावना

१९६७ च्या आसपास भारताच्या राजनैतिक आकाशांत विस्फोटकारी काळे ढग झपाट्याने गोळा होऊं लागले. वादळाचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. वीस वर्षें एकाच पक्षाचें एकछत्री राज्य तोंपर्यंत चालू होतें त्याबद्दल आता शाश्वति उरली नव्हती. सतत वाढणाऱ्या महागाईमुळे जनतेंतील असंतोष एकसारखा वाढत होता. नव्या पिढीला शिक्षणाचा लाभ झाल्यामुळे जीवनासंबंधीच्या तिच्या अपेक्षा अधिकच उंचावल्या होत्या. परंतु त्या पूर्ण होण्याची शक्यता दिसत नव्हती. अशा परिस्थितींत जनतेचा असंतोष शिगेला पोचून त्याचा आविष्कार निरनिराळ्या प्रकारांनी झाल्यास त्यांत आश्चर्य कसलें ? राज्यकर्त्या पक्षामध्ये सत्तास्पर्धा सुरू होऊन केंद्रीय सत्ता दुबळी होऊं लागल्याचीं लक्षणें स्पष्ट दिसत होतीं. परिणामतः राज्य-सरकारें आपलें वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करूं लागलीं. असंतोषाच्या या पार्श्वभूमीवरच १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि जनतेने उघडपणें परिवर्तनाच्या बाजूने कौल दिला. कित्येक राज्यांमध्ये कॉंग्रेसपक्ष अल्पमतांत गेला. लोकसभेंतील त्या पक्षाची शक्ति देखील पुष्कळच कमी झाली. राज्यामध्ये आयाराम-गयारामचें पेव फुटलें आणि कित्येक राज्यांत कॉंग्रेस-मंत्रिमंडळें पदच्युत होऊन त्यांच्या जागीं संविदचीं खिचडी-मंत्रिमंडळें अस्तित्वांत आलीं. केंद्रामध्ये देखील त्या पक्षांत फूट पडून गंगाजमनी मंत्रिमंडळ अधिकारावर येणार की काय असा प्रश्न निर्माण झाला. त्या दृष्टीने प्रयत्नहि झाले. परंतु तें जमलें नाही, तरी पण कॉंग्रेस पक्षामध्ये बखेडा निर्माण झालाच. इंडिकेट आणि सिंडिकेट असे गट पडले. या दोन्ही गटांपैकी खरी कॉंग्रेस कोणती आणि जनतेचा पाठिंबा कोणाला आहे या मुद्द्यावरच वाद निर्माण झाला. अखेरीस इंदिरा गांधींनी मध्यावधि निवडणुका घेऊन जनमत आपल्या बाजूलाच आहे हें सिद्ध करून दाखविलें.

या भांडणामध्ये सत्तास्पर्धेलाच प्राधान्य होतें असें म्हणावें लागतें. इंदिरा गांधी मात्र समाजवादी घोषणा करून आणि बॅंकांचें राष्ट्रीयीकरण करून या भांडणाला

तात्त्विक स्वरूप देण्यांत यशस्वी झाल्या. पुरोगामी आणि स्थितिवादी प्रवृत्तींमधील हा वाद आहे असें त्यांनी सांगितलें. आणि कांही पुरोगामी पावलें टाकून ती समजूत बळकट करून दिली. लोकांचीं मनें हललीं होतीं. काँग्रेस पक्षाबावतची निष्ठा ढासळली होती. कोणाच्या आधारें उभें राहवें याचा लोक विचार करीत होते. विरोधी पक्षाला हीच खरी संधि होती. राज्यकर्त्या पक्षाला लोकशाहीवर आणि समाजपरिवर्तनावर श्रद्धा असलेला पर्यायी पक्ष निर्माण करण्याचा प्रयास ज्यांनी सतत कित्येक वर्षे केला होता, त्यांना या घडामोडीच्या काळांत जनमत आपल्या बाजूला वळवून घेण्याच्या दृष्टीने अनुकूलता होती. लोकांना आहे तीच व्यवस्था नको होती. त्यांना बदल हवा होता. समाजवादी आणि परिवर्तनवादी विचारांच्या लोकांना जनमताची नाडी ओळखून योग्य दिशेने पावलें टाकतां आलीं असतीं. डॉ. लोहियांनी अचूक मार्गदर्शनहि केलें होतें. जनतेचा काँग्रेसबद्दलचा राग ध्यानांत घेऊन त्यांच्या जागीं संविद मंत्रिमंडळें बनविण्यांत आलीं. मिळालेली ताकत वापरून जनतेला दिलासा देणाऱ्या चार गोष्टी करायच्या आणि पुढचें पाऊल टाकण्याची कुवत मंत्रिमंडळामध्ये नाही असें दिसतांच मंत्रिमंडळांतून बाहेर पडायचें आणि जनतेमध्ये जाऊन लोकसंग्रहाच्या कार्याला वाहून घ्यायचें असा तो कार्यक्रम होता. परंतु दुर्दैवाने डॉक्टर लोहियांचें अकालीं निधन झालें आणि त्यांच्या पश्चात् त्यांच्या पक्षाचें धोरण घसरलें. मुख्य उद्दिष्ट बाजूला राहून इंदिरा-काँग्रेसला पदच्युत करणें हेंच एकमेव उद्दिष्ट होऊन बसलें. परिणामत: कोणाबरोबरहि सहकार्य करायचें परंतु इंदिरा गांधींना खाली ओढायचें असाच हटवाद बळावला. त्यामुळे इंदिरा गांधींच्या पक्षाला अप्रत्यक्षपणें मदतच झाली.

इंदिरा गांधींनी मात्र आपलीं धोरणें हुषारीने आखून तीं चतुराईने अमलांत आणलीं. काँग्रेसमधील सिंडिकेट गटाने कांही तरी थातुर-मातुर करून पक्षाचें ऐक्य टिकविण्याचा प्रयास केला. येनकेनप्रकारेण सत्ता आपल्या हातांत टिकविण्याचाच तो अट्टाहास होता. इंदिरा गांधींनी कोणतीच तडजोड कबूल न करतां जुन्या नेतृत्वाला उघडपणें आव्हान देण्याचें धाडस केलें आणि त्या यशस्वी झाल्या. गोंधळलेल्या मन:स्थितींत असलेल्या जनतेने त्यांच्या आधारें उभें राहण्याचें ठरवलें. मध्यावधि निवडणुकींतील मतदानाचा अर्थ यापेक्षा निराळा होऊं शकत नाही. आता ही गोष्ट खरी की, असंतुष्ट जनतेला भरघोस आश्वासनें देऊन आणि गरिबी हटविण्याची घोषणा करून त्यांनी निवडणुका जिंकल्या. परंतु त्याचबरोबर हेंहि कबूल करणें भाग आहे की, लोकांना अस्थिरता नको होती आणि अन्य पक्ष स्थिरता प्रस्थापित करूं शकतील असा विश्वास त्यांना वाटला नाही. अर्थात् केवळ स्थिरतेने उपाशी पोटें भरत नाहीत. म्हणूनच उपाशी माणसांना अन्न आणि बेकार लोकांना काम देण्याचें आश्वासन इंदिरा गांधींनी दिलें होतें. तें त्या कसें पूर्ण करतात याकडे लोकांचें लक्ष लागलें होतें. नेमका त्याच वेळीं बंगला देशाचा प्रश्न निर्माण झाला. आणि ८० लाख निर्वासित भारतांत येऊन दाखल झाले. त्यामुळे गरिबीची आणि बेकारीची समस्या अधिकच जटिल

होऊन बसली आहे. भारताची नौका तुफान दर्यांत आहे. ती सहीसलामत पैलतीराला कशी लागणार याची चिंता आज सर्वांनाच लागून राहिलेली आहे.

या साऱ्या घटना घडत असतांनाच जयंतराव टिळक राज्यसभेवर निवडून आले आणि साऱ्या परिस्थितीचें बारकाईने निरीक्षण करण्याची त्यांना संधि मिळाली. केसरीच्या द्वारा लोकशिक्षणाचें आणि जनजागृतीचें कार्य त्यांनी अंगीकारलेलें आहे. दिल्लीस जाऊन संसदेच्या कामकाजाचें प्रत्यक्ष निरीक्षण केल्याशिवाय आपल्या देशापुढील विशाल समस्यांची स्पष्ट कल्पना येऊं शकत नाही. परिस्थितीचें सम्यक आकलनहि होऊं शकत नाही. या दृष्टीने पाहतां आजच्या आणीबाणीच्या प्रसंगीं जयंतराव टिळकांची निवड राज्यसभेवर व्हावी हा एक सुयोगच म्हटला पाहिजे. मिळालेल्या संधीचा त्यांनी उपयोग केला आणि परिस्थितीचें प्रयत्नपूर्वक अध्ययन करून, केसरीच्या वाचकांना त्याचा लाभ मिळवून दिला. त्यांनी आपल्या भावना आणि विचारतरंग 'अशी ही दिल्ली' या सदरामध्ये नियमितपणें प्रसिद्ध केलीं; त्यामुळे केसरीच्या लक्षावधि वाचकांना देशांत काय चाललें आहे याची माहिती मिळत राहिली. त्यांचे ते लेख या पुस्तकाच्या रूपाने प्रसिद्ध होत आहेत. ज्यांचें वर्णन श्री. टिळक यांनी आपल्या लेखांतून केलें आहे त्या साऱ्या नाटयपूर्ण घडामोडी होत असतांना लोकसभा-सदस्य या नात्याने त्यांत सहभागी होण्याची संधि मलाहि मिळाली होती. त्यामुळे त्यांचे लेख वाचतांना विशेष आनंद झाला. चार वर्षांचा तो चित्रपट आजच्या घडीला जणू डोळ्यांपुढून सरकत आहे असें वाटलें.

गेल्या तीन-चार वर्षांत ज्या घडामोडी झाल्या त्या भारतीय लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने निःसंशय महत्त्वाच्या आहेत. आजूबाजूच्या देशांत लोकशाहीची एकसारखी पीछेहाट होत असतांना आपल्या देशांत ती दृढमूल होत आहे ही गोष्ट दिलासा देणारी नाही असें कोण म्हणेल ? केसरीचा आणि त्याच्या संपादकांचा जुन्या कॉंग्रेसला विरोध होता. आणि निदान प्रारंभीच्या काळांत तरी संविद-सरकारां-बाबत त्याचा दृष्टिकोन सहानुभूतीचा होता. कॉंग्रेस दुभंगल्यावर केसरीला आपलें धोरण ठरविणें क्रमप्राप्तच होतें. प्रथम दोन्ही गटांबाबत चिकित्सक धोरण त्यांनी ठेवलें. परंतु पुढे जातां सिंडिकेटला त्यांचा विरोध तीव्र होत गेला आणि त्यामुळे इंडिकेटला अप्रत्यक्षरीत्या पाठिंबा मिळूं लागला. हळूहळू संविद-बाबतच्या धोरणांतहि फरक पडत गेला. संविद मंत्रिमंडळांची कारकीर्द असमाधानकारक होती यांत शंकाच नाही. दुसऱ्या वेळेला संविद मंत्रिमंडळें बनलीं, तेव्हा तर तीं ससोपा, जनसंघ, स्वतंत्र आणि सिंडिकेट यांचीं बनलीं. त्यामुळे त्याच्यावर समाजवाद्यांचा प्रभाव राहिला नाही. मध्यावधि निवडणुकीच्या वेळीं तर त्याची अखिल भारतीय पात-ळीवर बडी आघाडी बनली. अशा आघाडीचें सरकार केंद्रामध्ये आलें तर तें देशाला स्थिर सरकार देऊं शकेल असें मानण्याला कांही आधार नव्हता. आणि जनतेला दिलासा मिळेल अशा कार्यक्रमाची अपेक्षाहि त्यांच्याकडून करतां येण्या-

सारखी नव्हती. म्हणून केसरीने त्या निवडणुकीमध्ये इंडिकेटला सर्वसाधारण पाठिंबा देण्याचें ठरविलें. या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणांत त्यांनी आपली ही भूमिका विशद करून सांगितली आहे. परंतु त्याचा कल हळूहळू सिंडिकेट व इतरांपेक्षा इंदिरा-काँग्रेसकडे झुकत गेला, याची जाणीव बारकाईने वाचणाराला, निम्में पुस्तक वाचून होतांक्षणींच होते. काँग्रेसमधील दुफळीसंबंधी लिहितांना दिनांक २४ ऑगस्ट १९६९ च्या आपल्या लेखामध्ये ते म्हणतात –

"आपलें सामर्थ्य विशाल जनक्षेत्रांत अधिक असलें तरी संसदीय पक्षाच्या लहान क्षेत्रांत तें कमी आहे हें इंदिराजींनी जाणलें आहे. परंतु या आक्रमक पवित्र्यांचा परिणाम शेवटीं काँग्रेस दुभंगण्यांत होईल, इंदिराजींना संयुक्त समाजवादी, प्रजासमाजवादी व साम्यवादीयांच्या साहाय्याची याचना करावी लागेल व अखेरीस तें आजच्या काँग्रेसच्या नाशाला कारणीभूत होईल, असा संभव दिसत आहे. साम्यवादी पक्षाच्या आधारे उभी राहिलेली 'इंदिरा-काँग्रेस' इंडियन नॅशनल काँग्रेस नव्हे! पण जर या झगडयांत केवळ सत्ताभिलाषा नसेल तर काँग्रेसला 'फिनिक्स' पक्ष्याप्रमाणे नवें सतेज स्वरूप देण्याचें धाडसहि केलें जाऊं शकेल. हे धाडस इंदिराजींनी केवळ सत्ताभिलाषेने पवित्रे घेतले असले, तर त्यांना होणार नाही (पृष्ठ ११३).

म्हणजे इंदिरा गांधींनी तसें धाडस केलें, तर केसरीकार त्यांना प्रशस्तिपत्र देऊन त्यांची पाठ थोपटायला तयार होते! त्यामुळे इंदिराजींनी मध्यावधि निवडणुका घेण्याचें ठरविलें तेव्हा साहजिकच त्यांचा पाठिंबा त्यांना मिळाला. त्या धाडसाचा परिणाम म्हणजे इंदिरा गांधींच्या काँग्रेसचें एकछत्री राज्य भारतांत निर्माण झालें आहे. त्यांना संसदीय लोकशाहीमध्ये अध्यक्षीय लोकशाहीचे देखील फायदे घेतां येत आहेत. कारण त्यांच्यामागे दोनतृतीयांश बहुमत लोकसभेंत आहे. लोकशाहीची कायदेशीर चौकट कायम राखून त्या जवळपास एकपक्षीय राज्याचे अधिकारहि भोगीत आहेत. म्हणजे इंदिरा गांधींचें सरकार नुसतें स्थिर नाही, तें एकपक्षीय बनण्याच्या वाटेवर आहे. विरोधक अगदी दुबळे पडले आहेत. प्रश्न पडतो तो असा की, देशाला स्थिर सरकार लाभलें तरी तेवढ्याने स्थिरता लाभेल काय? गरिबी हटविण्याचा कार्यक्रम झपाट्याने अमलांत येत आहे अशी खात्री पटल्याशिवाय देशांत स्थिरता नांदणार नाही. इंदिरा गांधींचें सरकार त्या कामीं यशस्वी ठरण्याचा संभव कमी दिसतो. कारण सत्ता त्यांच्या हातीं आली असली, तरी त्यांच्या पक्षाचें स्वरूप बदललेलें नाही. गरिबी हटविण्याच्या कामीं त्यांना यश आलें नाही तर काय होईल याचा विचार आता केसरीच्या संपादकांनी करावयास हवा. जनतेला दिलासा मिळेल असा कार्यक्रम पार पाडण्यासाठी लोकसंग्रह आणि शक्तिसंचय करणाऱ्या पर्यायी विरोधी पक्षाची वाढ होणें लोकशाहीच्या वाढीच्या दृष्टीने आवश्यक नाही काय? सारांश, निवडणुकीमध्ये इंदिरा काँग्रेसला केसरीने पाठिंबा दिला असला तरी नव्या परिस्थितीमध्ये तो तसाच चालूच ठेवावयाचा किंवा कसें तें ठरविलें पाहिजे.

सीमा-प्रश्नाबाबत जयंतराव म्हणतात त्याप्रमाणे "इंदिराजींना महाजन-अहवालाने सीमा-भागांतील मराठी भागावर अन्याय होत असल्याचें जाणवलें आहे." असें मानलें तर अजून तरी त्यांनी न्याय करावयास नको काय ? इतकें मोठें बहुमत पाठीशीं असल्यावर म्हैसूरला काय वाटेल याची चिंता त्यांनी कां करावी ? सीमा-भागांतील बहुसंख्य जनता आणि मराठी लोक इंदिराजींबाबत आपलें मत बनवितांना हा प्रश्न विचारांत घेतल्याशिवाय राहणार नाहीत असें वाटतें. असो.

जयंतराव टिळकांची शैली सुडौल आणि चटकदार आहे. तात्यासाहेब केळ-करांच्या लिखाणाची झलक त्यामध्ये दिसून येते. निरनिराळ्या ऋतूंमध्ये बहरणाऱ्या निसर्गसौंदर्याचें चित्रण करतांना ते अगदी रंगून जातात. रंगी-बेरंगी फुलांचें आणि लता-कुंजांचें वर्णन करतांना राजकारण आणि व्यवहार बाजूला पडून त्यांचें कवि-हृदय प्रभावी होतें. दिल्लींत येणारे पशुपक्षी आणि देशविदेशचे नागरिकहि त्यांच्या नजरेतून सुटलेले नाहीत. त्यांची, राहणी, बोलणीं, पोषाख याचीं रोचक वर्णनें करण्यास ते विसरलेले नाहीत. आपल्या लेखांतून अधूनमधून खुमासदार किस्से आणि कहाण्या यांची पेरणी ते मोठ्या खुबीने करतात. त्यामुळे त्यांचें लिखाण विशेषच आकर्षक बनतें. दिल्ली शहराला स्वतःची अशी अस्मिता आहे असें मला वाटत नाही; परंतु जयंतरावांचे लेख वाचले म्हणजे ती अस्मिता मधूनच डोकावत असल्या-सारखी दिसते हें कबूल केलें पाहिजे. मराठी वाचकांसाठी त्यांनी आपलीं वार्तापत्रें पुस्तकरूपाने प्रसिद्ध केल्याबद्दल धन्यवाद !

—एस्. एम्. जोशी

# प्रास्ताविक

एप्रिल १९६८ मध्ये महाराष्ट्र विधानसभेतर्फे माझी राज्यसभेवर निवड झाली. तेव्हापासून दिल्लींतील राजकारण व राजकारणी मला जवळून पाहतां आलें. यापूर्वी संयुक्त महाराष्ट्राच्या व गोवे-मुक्ति आंदोलनाच्या निमित्ताने मीं दिल्लीस दोन-चार खेपा घातल्या होत्या. पं. नेहरू, पं. पंत आदि नेत्यांना भेटलों होतों, पण त्या होत्या धांवत्या भेटी. सध्या वर्षांतील सहा-सात महिने तरी माझें दिल्लींत वास्तव्य होत आहे. लोकजीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ठरणारी माहिती मला वाचायला, ऐकायला मिळत आहे.

यांतूनच 'अशी ही दिल्ली' या सदराचा जन्म झाला. 'रविवार केसरी'साठी मी हें सदर नांवाने लिहूं लागलों. राज्यसभेच्या अधिवेशनाच्या काळांत माझें दिल्लींत वास्तव्य असलें की, त्या आठवड्यांत संसदेमध्ये चर्चिल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या विषयांचा आढावा मी या वार्तापत्रामध्ये घेत असतों.

मात्र माझ्या सदराबद्दल मला येथे हें सांगितलें पाहिजे की, मीं लिहिलेल्या लेखांना रूढ अर्थाने वार्तापत्रें म्हणतां येणार नाहीत. दिल्लींतील ऋतुमान, तेथील सण-समारंभ, संसदेंत संमत झालेलीं महत्त्वाचीं विधेयकें, राजकीय घटना अधिक बोलक्या करण्यासाठी मी रंगतदार किस्से किंवा काव्यपंक्ति यांचाहि या लेखनांत अंतर्भाव करीत असल्यामुळे ठरीव ठशाच्या वार्तापत्रांपेक्षा राजकीय ललित लेखांशीं या लेखनाचा तोंडवळा अधिक जुळेल असें मला वाटतें.

हीं वार्तापत्रें प्रसिद्ध करण्यामागे आणखीहि एक हेतु आहे. या वर्षीच्या प्रारंभीं झालेल्या लोकसभेच्या मध्यावधि निवडणुकींत 'केसरी'ने इंदिराजींच्या नेतृत्वाखालील नवकाँग्रेस-पक्षाला पाठिंबा दिला. राज्यपातळीवर संपूर्णपणें फसलेला संमिश्र मंत्रि-मंडळाचा प्रयोग केंद्रपातळीवर सुरू झाला, तर त्याचे परिणाम भयावह होतील हें ओळखून, केंद्रांत स्थिर सरकार स्थापन करूं शकणाऱ्या नवकाँग्रेसला देशहितासाठी पाठिंबा देण्याची आवश्यकता 'केसरी'ने प्रतिपादन केली.

त्याचबरोबर वाचकांच्या हेंहि लक्षांत येईल की, स्थिर सरकार व नियोजनबद्ध अर्थव्यवस्था यांना पाठिंबा देणाऱ्या 'केसरी'ने शासनयंत्रणेंतील भ्रष्टाचार, राज-कारणांतील स्वार्थसाधूपणा, मुस्लिम अनुनयाचें राष्ट्रघातकी धोरण, अतिरेकी परधार्जिणी वृत्ति इत्यादि विकृतींवर निर्भीडपणें टीकाहि केली आहे व तशी टीका करण्यांत कधीहि संकोच किंवा भीड बाळगली नाही.

माझ्या या वार्तापत्रांत वाचकांना 'केसरी'ची ही राष्ट्रवादी, लोकशाहीनिष्ठ व नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेची भूमिका जागोजाग आढळेल असा विश्वास वाटतो.

**– ज. श्री. टिळक**

# विष्णूकडे लक्ष्मी जाणारच !

१८३०५

## - १ -

अजून म्हणावी तशी थंडी भासूं लागलेली नाही. पावसाचा एक शिडकावा झाला म्हणजे ती एकदम कडाडेल ! बाहेर पडलें म्हणजे गार वारे अंगाला झोंबूं लागेल. चावरी थंडी उघडया नाका-डोळयांतून पाणी काढील. सध्या गुलाबी थंडीचा आस्वाद दिल्लीकर घेत आहेत. यंदा सर्वच ऋतु जरा रेंगाळतच येत आहेत.

थंडीला तोंड देण्याची तयारी मात्र सर्वांनी जारीने चालू केली आहे. कॅनॉट प्लेसमधील श्रीमंत दुकानांतून रंगदार, उबदार कपडयांची मांडणी आकर्षक रीतीने केली गेली आहे. ऑरलॉन, व्होग वगैरे कंपन्यांचे नव्या डिझाइन्सचे स्वेटर्स, कार्डिगन्स तरुण-तरुणींच्या नजरा दहा-वीस मिनिटें तरी प्रत्येक दुकानाच्या शो-केसपाशीं अडकवून ठेवीत आहेत. चांदणी चौकांतील कापड बाजार तर उनी कपडयांनी अक्षरशः फुलला आहे. दुकानांत पाऊल टाकतांच रेमंड, मॉडेला, धारिवाल, लाल-इमली इत्यादि प्रसिद्ध गिरण्यांचीं विविध किमतींचीं व विविध डिझाइन्सचीं मऊ उबदार ब्लँकेटें तुमच्यासमोर येऊन पडतात. त्यांच्या जोडीला नाजूक नक्षीकाम केलेल्या हलक्याफुलक्या काश्मिरी शाली ! रखरखीत कांबळें पांघरणाऱ्या मराठी माणसाचें मन या पांढऱ्याशुभ्र पिसासारख्या पश्मिना शालीवरून हात फिरवितांना मोहरून न गेलें तरच आश्चर्य !

थंडीत आणखी कशाला बहर येत असेल तर गप्पांना ! दिल्ली ही राज्य-कर्त्यांची व राजकारण्यांची राजधानी ! कोणा ना कोणाकडे रात्रीच्या जेवणाचें आमंत्रण नसलें तर चुकल्यासारखें वाटतें ! कारण 'वादेवादे'च तत्त्वबोध होतो व राजकारणाचा परिपोष घडतो ना ! अंधार पडतां पडतां शाली मावरीत हळूहळू

माणसें गोळा होतात आणि आकंठ भोजनानंतर लखनवी किमामाने, सुगंधित केलेल्या पानांचा आस्वाद घेत, विजेच्या शेगडीने उबदार बनविलेल्या दिवाणखान्यांत ऐसपैस बैठक मारून एकेकजण आपले किस्से सुनावूं लागतो. पहिल्याचा धागा धरून दुसरा आपली चलाखी ऐकवितो आणि हळूहळू हा गप्पांचा फड रंगूं लागतो.

*

यंदाचें वर्ष गांधी-जन्मशताब्दीचें आहे ना ! मग साहजिकच गांधींच्या कर्तृत्वाच्या, त्यांच्या संघशक्तीच्या, लोकानुरंजनाच्या, स्वाभाविक गुणदोषांच्या संकीर्तनाने राजकारणी धुरंधरांची बैठक सुरू होणें प्राप्तच आहे. महात्माजींच्या अनेक आठवणी स्वानुभवाने सांगितल्या जातात. उत्तर प्रदेशांतील एक आदरणीय वृद्ध नेते म्हणाले, "गांधीजींनी प्रेमाने अनेकांना जिंकलें. जयप्रकाश यांची व गांधीजींची विचारसरणी कधीहि जमली नाही; पण जयप्रकाश यांचा पाठपुरावा करण्यास गांधीजी प्रथम पुढे सरसावत. पंडितजींचें हृदय मात्र कोरडें होतें. एखाद्याबद्दल त्यांना आकर्षण वाटलें की, त्याच्यासाठी ते एखादी मानाची, अधिकाराची जागा शोधीत व तें घडतांच जणू आपण आपलें कर्तव्य बजावलें अशा समाधानांत त्याच्यापासून दूर जात. बाह्यतः पंडितजी व जयप्रकाश यांचे संबंध अखेरपर्यंत अत्यंत निकटचे व जिव्हाळ्याचे आहेत असें भासत होतें. तसे ते एके काळीं होतेहि. पण पुढे ते दोघे एकमेकांपासून, पंडितजीच्या स्वभावामुळे सर्वस्वी दुरावले, हें फार थोड्यांना माहीत आहे."

बोलण्यावरून बोलणें वल्लभभाई व आचार्य कृपलानी यांच्यावर घसरलें. आचार्य कृपलानी काँग्रेसचे अध्यक्ष होतांच त्यांनी "काँग्रेसच्या अध्यक्षाच्या विचाराशिवाय धोरणात्मक प्रश्नाचे निर्णय काँग्रेस मंत्रिमंडळाने करूं नयेत" असा विचार वारंवार बोलून दाखविला. वल्लभभाईंच्या कानावर एकाने तो घातला. वल्लभभाई मोठ्या मिष्किलपणें, म्हणाले, "काँग्रेसचे अध्यक्ष हे आम्हांला परमेश्वरासारखे ! ठाकोरजीच ते आमचे ! त्यांना भोग चढविला जातो, नैवेद्य दाखविला जातो. पण म्हणून देव थोडेच खातो ? तो नैवेद्य आम्ही पुजारीच खाणार !"

विषयाचें विवेचन करतांना एखादी चपखल गोष्ट सांगून समस्येचा उलगडा करून दाखविण्यांत विनोबाजींचा मोठा हातखंडा आहे. त्यांना एकाने विचारलें, "विनोबाजी, भूदानाची चळवळ अयशस्वी झाली तर पुढे काय ? एक मार्ग धरून चालण्यापेक्षा दोन-चार मार्ग सांगितलेले जास्त बरे नाहीत काय ?"

विनोबाजी म्हणाले, "अहो, रोगी आजारी असला की, आपण डॉक्टरकडे जातों, त्याला घेऊन येतों, पण येतांना बरोबर बांबू-मडकें थोडेंच आणतों – रोगी दगावला तर आपला पोचवायला ? एकाच मार्गावर श्रद्धा ठेवून विहित कार्य केलें म्हणजे तें यशाप्रत जातें."

विचारणारा यावर काय बोलणार !

छे ! पण तो काळहि गेला. त्यांतील आघाडीचे नेतेहि एकामागून एक चालले आहेत. आता जें पाणी पसरतें आहे तें सर्वत्र दलदल बनवीत आहे. राजकारणाला तात्त्विक बैठक राहिली नाही, निष्ठा नाही. राजकारणाचा धंदा बनला आहे. सरकार आपल्याच नोकरांना झोडपून काढतें. कां ? तर त्यांनी जीवनावश्यक गरजेइतका पगार मिळावा यासाठी संप केला म्हणून ! सारा चोरांचा बाजार आहे.

एक समाजवादी पुढारी तर रागारागाने म्हणाले, " भांडवलदारांनी राज्य-कर्त्यांना आपले बटिक बनविलें आहे. सारे चोर आहेत झाले. "

दिवाणखान्यांतील हवा फारच तापली. विजेची शेगडी यजमानांनी बंद केली. साऱ्यांच्या अंगावरील शाली खाली घसरल्या. क्षणभरच निर्माण झालेल्या या शांतते-चा भंग एका मिष्किल तरुण पुढाऱ्याने हळूच हसत हसत केला – " साथी, त्यांत एवढे रागावण्याजोगे काय आहे ? आपल्याला राजकारणी व चोर यांच्यांतील फरक माहिती नाही का ? जो चोरी केल्यावर जेलमध्ये जातो तो चोर व जो जेल-मधून बाहेर आल्यावर लुबाडण्याचा धंदा करतो तो राजकारणी ! "

प्रेशरकुकरमध्ये कोंडलेली वाफ जशी झाकण किलकिलें करतांच फसकन् बाहेर यावी तसे सर्वजण खो खो करून हसले !

त्यावर एक वृद्ध नेते म्हणाले, " मी तुम्हाला आमच्या मथुरेची एक कहाणी सुनावतों, ऐका. एकदा काय झालें, दुपारीं देव झोपले होते. मंदिराला कडी घालून पुजारी घरी गेले होते. एवढ्यांत एक व्यापारी आपल्या बोटांतील हिऱ्याच्या अंगठ्या नाचवीत देवळांत आला व म्हणूं लागला की, ' मला देवाला पोशाख चढवावयाचा आहे; मी सोन्याचा मुकुट आणला आहे. रत्नजडित हार आणला आहे. उंची पीतांबर आणला आहे. ' जमलेले सर्व एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागले. त्यांतील एक जण जरा धीटपणें म्हणाला, ' शेठजी, देव आता झोपले आहेत. आता दर्शन होणार नाही. चारनंतर देव उठले म्हणजे पोषाख चढवा. " शेठजी संतापले. ते म्हणूं लागले, ' मला वेळ नाही, चारपूर्वी मला दुसऱ्या गावीं जावयाचें आहे. आताच पोषाख चढविला पाहिजे. गाभारा उघडा ! ' लोक म्हणू लागले, ' तें शक्य नाही. देवाची झोपमोड करणें धर्माचा अधिक्षेप करणारें ठरेल. ' शेवटी एकाने सुचविलें, ' आपण कशाला वाईटपणा घ्या ? मुख्य पुजाऱ्यालाच बोलावून आणा, तो काय तें सांगेल. ' पुजारीबाबा आले. शेठजींनी आणलेला पोषाख त्यांनी शांतपणें पाहिला व क्षणभरहि वेळ न दवडतां ते म्हणाले, ' चला, गाभारा आत्ता उघडतों. आंत जा ? देवावर पोषाख चढवा ! ' शेठजींनी पोषाख चढविला व ते निघून गेले. गावांत सर्वत्र खळबळ उडाली. देव झोपले असतांना पुजाऱ्याने गाभारा उघडला. देवाची झोप मोडली. धर्म बुडाला. जो तो पुजाऱ्याला दोष देऊं लागला. एक तर रागाने म्हणाला, ' बरं का साथी, सोन्याच्या व पैशाच्या लोभाने पुजाऱ्याने देवाची झोप मोडून शेठजीला गाभाऱ्यांत प्रवेश दिला. '

पुजारी स्वस्थच होता. तो कांही बोलत नव्हता. शांतपणें सर्व ऐकत होता. शेवटीं धर्मसभा बोलावली गेली व पुजाऱ्याला सभेपुढे उभें करण्यांत आलें, 'बोला आता! द्या आपल्या धर्मलंड कृत्याचा जाब!'

पुजारीबाबांनी शांतपणें स्थिर दृष्टीने सर्वांकडे पाहिलें व ते म्हणाले, 'बाबांनो, मी कोण दार अडवणार? साक्षात् लक्ष्मी जेथे विष्णूला भेटावयास आली तेथे मी तिला कसें अडवूं?'

सर्व सभा अवाक् झाली. असें आहे राजपद म्हणजे कलियुगांतील विष्णुपद. राजाला विष्णूचा अंश मानतातच. मग लक्ष्मी तेथे जाणारच!

भाई, भांडवलदारांनी राज्यकर्त्यांना मुठींत ठेवलें आहे असें म्हणण्यांत काय अर्थ आहे बरें! विष्णूकडे लक्ष्मी जाणारच!

त्या वृद्ध नेत्याने सांगितलें यात काय बरें खोटें आहे!

**– केसरी, दि. १ डिसेंबर १९६८**

# अंधेरनगरी – चौपट राजा

**- २ -**

दिल्लीचे सारे रस्ते संसद-भवनाकडे जातात व जे फुटतात ते सचिवालयाच्या विविध भवनांमध्ये गडप होतात. या मार्गावरील रहदारीवर कांही काळ जर दृष्टि स्थिरावली तर ती कोणत्या मार्गावरील वारकरी आहे हें वेशभूषेवरून सहज लक्षांत येतें. टेरेलिन, टेरिवुलमधील अपटुडेट साहेब सचिवालयाकडे जाणारा असतो, तर चुणीदार पैजमा, अचकन् किंवा धोतर, नेहरू शर्ट व वर ऊबदार शाल पांघरणारा खादीधारी संसदेकडे जाणारा खासदार आहे असें खास समजावें. या वेळचें संसदेचें हिवाळी अधिवेशन बाहेरील वातावरणाप्रमाणे एकूण थंडच आहे. दिल्लीच्या आजूबाजूच्या राज्यांत मुदतपूर्व निवडणुका जवळ आल्या असल्याने प्रचार-संघटनेसाठी सर्वच पक्षांचें नेतृत्व तिकडे गेलें आहे व बाकीचे कॅनॉट प्लेसमधील कॉफीगृहांत बसून गरम कॉफीचा आस्वाद घेण्यापासून ज्याच्या त्याच्या रसिल्या मनाला जें जें प्रिय वाटेल त्याची लज्जत चाखत हिंडतांना दिसत आहेत.

कॅनॉट प्लेसमध्ये हिंडतांना माझें मन कशाकडे आकृष्ट झालें तर चांदण्यांसारख्या 'नारसिस' पुष्पांकडे. सहा पाकळयांच्या शुक्रचांदणीत मादक गंधाने दरवळणारा सुवर्णकांति पेला धारण करणारीं ही पुष्पें सिमल्याहून दिल्लींत आता विकावयास आली आहेत. हीं पुष्पें विकणाऱ्या अडाणी मुलाला या पुष्पाचें नांव विचारलें तर तो सांगतो – 'नर्गिस'. कारण तेंच त्याच्या परिचयाचें आहे. राष्ट्रीय पारितोषिकांपैकी अक्षरवाङमयांत अमर झालेल्या उर्वशीच्या नांवाने सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीला दिल्या जाणाऱ्या पारितोषिकाचा मान नुकताच मिळविला आहे नर्गिसनं ! नाही तरी 'नारसीसिझम' म्हणजे स्वतःच्या सौंदर्याच्या व्यक्तिगत पूर्णतेंत रममाण

होणें. नर्गिसने अभिनयकलेंत ही पूर्णता नाही का मिळविली ? मग त्या अडाणी फुलविक्याने नकळत 'नारसिस' पुष्पांत 'नर्गिस'ची प्रतिकृति पाहिली तर ती त्याच्या कविमनाचीच साक्ष नाही काय ?

ब्रह्मदेवाने या सृष्टीची उत्पत्ति करतांना स्वर्गांतील सारें सौंदर्य पृथ्वीवर उतरविण्यांत आपली योजकता खर्ची घातली. 'नारसिस' पुष्पाच्या रूपांनी स्वर्गातील चांदण्यांना त्याने पृथ्वीवर उतरविलें आहे हें जाणवेल – जो डोळे उघडे ठेवून पाहील त्याला ! पण माणूस ब्रह्मदेवाच्या या देणगीचा जीवन समृद्ध करण्यासाठी उपयोग करण्याऐवजीं ब्रह्मदेवाचाच वारसा स्वतःकडे घेऊं पाहतो. मग 'विनायकं प्रकुर्णाव रचयामास वानरं' असें कांही तरी हातून घडतें. शेवटीं योजकस्तत्र दुर्लभः हेंच खरें ! त्यामुळे ब्रह्मदेवाचा वारसा सांगण्याबाबत आता वाद सुरू झाला आहे शास्त्रज्ञांत व राजकारणी मंडळींत.

शास्त्रज्ञ म्हणाले, "ब्रह्मदेवाने पृथ्वी निर्माण केली म्हणजे केलें काय ? योजनाबद्ध रचना केली. आम्हीहि रचनाकार आहोंत व म्हणून ब्रह्मदेवाचे वारस आहोत."

पण शास्त्रज्ञांना राजकारणी थोडाच हार जाणार ! तो म्हणाला, "पृथ्वीचें काय सांगतां ? पृथ्वी निर्माण होण्यापूर्वी काय होतं ? बोला ! सर्व 'नेव्यूलस' – निहारिक, निराकार ! 'केऑटिक', गोंधळाचं ! तो गोंधळ कोण निर्माण करतो ? अर्थात् आम्ही ! म्हणून आम्ही खरे ब्रह्मदेवाचे वारस !"

आणि हें म्हणणें अक्षरशः खरें आहे हें दिल्लीच्या राजकारणांत नुसतें डोकावलें तरी कळेल.

गोंधळ हा तर इंदिरा सरकारचा 'परवली'चा शब्द झाला आहे. आज आर्थिक प्रश्नांबाबतच्या अनिश्चित धोरणाने कोटयवधि रुपयांचें देशाचें नुकसान होत आहे व त्याबाबत सतत घणाणत असलेली घंटा दिल्लींत कुठेहि ऐकावयास मिळते. पण मंत्र्यांनी मात्र बहिऱ्याचें सोंग धारण केलेलें असतें. पोलाद-उत्पादनाच्या क्षेत्राची वाढ करण्यास सरकारचें धोरण आडवें आलें नसतें, तर एव्हाना देशाची पोलादाची गरज भागून कांही हजार कोटि रुपयांचें परदेशी चलन वांचलें असतें असे विचार जे. आर. डी. टाटांनी नुकतेच व्यक्त केले. तसेच खतांच्या कारखान्यांच्या उभारणीबाबत चाललेल्या चालढकलीने एका वर्षांत देशाचें शंभर कोटींचें परदेशी चलन खर्ची पडलें. मुंबईच्या किनाऱ्यालगत समुद्रांत तेल-विहिरी खोदण्याची परवानगी अजूनहि अमेरिकन तेल कंपनीला दिली जात नाही. कारण रशियनांना काय वाटेल ? कच्छच्या आखातांत रशियन तज्ज्ञ तेल शोधण्यास मदत करीत आहेत, म्हणून अमेरिकन तेल कंपनीला मुंबईच्या किनाऱ्यावर तेलाचा शोध करण्याची परवानगी देण्यांत चालढकल करण्याचें खरोखरीच कांही कारण नाही. मध्यपूर्वेतील तेल-खाणींइतक्या समृद्ध खाणी मुंबईपासून सत्तर मैलांवरील समुद्रांत लागण्याचा दाट संभव आहे. पण तो तेलपट्टा समुद्रसपाटीखाली हजार फूट असून, त्यासाठी

लागणारीं यंत्रें ज्यांच्याजवळ असतील त्यांनाच हें काम दिलें पाहिजे. या कामीं तोटा आला तरी तो अमेरिकन तेल कंपनी सोसण्यास तयार आहे. मग घोडें अडलें कोठे ? पण नेहमीप्रमाणे येथेहि राजकारण गुंतलेलें आहे.

संसदेंत नुकतेंच चर्चिलें गेलेलें इंडियन एअर लाईन्सचें ' डी. सी. ९ प्रकरण ' असेंच वड्यांच्या राजकीय ओढाताणींत अडकलें आहे. यापुढे किमान तीन वर्षें तरी 'कॅराव्हेल' विमानेंच देशांतील मार्गावर उडणार. बोइंग ७३७, का डी. सी. ९, असा हा वाद आहे. डी. सी. ९ चा व्यवहार हातातोंडाशीं आला असतांना तीं उपयुक्त नाहीत असें तांत्रिक समितीने ठरविल्याने स्थगित झाला. दिनेशसिंगांनी याबावत मॉस्कोला आपल्या भेटींत शब्द दिला होता म्हणे ! तोहि खाली पडूं नये व डी. सी. ९ तर निरुपयोगी. मग करावें काय ? पेच हा असा आहे. रशियाने टी. यू. १५४ किंवा टी. यू. १३४ यांत आवश्यक सुधारणा करून तीं विमानें इंडियन एअरलाईनला द्यावींत असेंहि सुचविलें गेलें. दुसऱ्या महायुद्धांतील हीं 'बॉंबर्स' प्रवासी वाहतुकीसाठी कितीहि सुधारली, तरी कितपत फायद्याचीं ठरतील ? परंतु रशियाने आपला पवित्रा बदलून या प्रकरणीं सरळ दमच दिला आहे, " विमानें घेत नाही तर तुमच्या 'वाघिणी'हि नकोत." भारताकडून येत्या तीन वर्षांनंतर पांच हजार रेल्वेच्या वाघिणी घेण्याचें आश्वासन रशियाने दिलें होतें. आता त्या आश्वासनाचा तराफा लावून जुनाट व आतबट्ट्याचीं विमानें भारताच्या घशाखाली ढकलण्याचा डाव चालू आहे.

*

सार्वजनिक हिशेब समितीच्या सरकारी प्रकाशनांवरील वारेमाप खर्चावर प्रकाश टाकणारा अहवाल नुकताच हातीं आला. पहिलें पान उलटलें तर असें एक खास प्रकरणच डोळ्यासमोर आलें. राष्ट्रीय पंचांगाच्या छपाईचें ! हें प्रकरण मोठें मासलेवाईक आहे. दिल्लींत गेल्याच आठवड्यांत 'पंचांग-परिसंवाद' ( गोष्टी ) झाला. अर्थात् तो गोंधळांतच संपला. परिसंवादांत गोंधळ; मग राष्ट्रीय पंचांगाच्या व्यवहारांत गोंधळ असला तर आश्चर्य काय ? सार्वजनिक हिशेब समिति आपल्या ४१ व्या अहवालांत (तिसरी लोकसभा) म्हणते, ' राष्ट्रीय पंचांगाच्या १,५०,८५० प्रती छापल्या गेल्या. त्यासाठी खर्च आला दीड लाख रुपये. सात वर्षांच्या काळांत त्यांतील अवघ्या २७,०३३ प्रती खपल्या. बाकीच्या रद्दी म्हणून विकल्या. या व्यवहारामध्ये तोटा झाला ६५,४४५ रुपये. असा व्यवहार कोणी खासगी पंचांगकर्त्याने केला असता, तर त्याचें दिवाळें वाजून कर्जापोटीं त्याला भीक मागण्याची पाळी आली असती. पण हें पंचांग राष्ट्रीय व व्यवहारहि सरकारी म्हणजे राष्ट्रीय ! मग सर्व सार्वजनिक व्यवहाराची जी अवस्था तीच याची ! असे किती तरी अजब मासले सरकारी प्रकाशनावर होणाऱ्या उधळपट्टींत आढळतील.

न्यूयॉर्क येथल्या जागतिक प्रदर्शनांत वांटण्यासाठी फोल्डर्स छापण्याचें काम एका कंपनीला फेब्रुवारी १९६४ मध्ये दिलें. हीं फोल्डर्स छापून मिळालीं मार्च १९६५ ते जानेवारी १९६७ च्या दरम्यान. हें जागतिक प्रदर्शन दोन वर्षे चालू होतें व तेथे वांटण्यासाठी तयार केलेल्या या फोल्डर्सच्या लाखाहून अधिक प्रती प्रदर्शन संपल्यावर हातीं आल्या. आहे का नाही संबंधित अधिकाऱ्यांची खाशी कार्यक्षमता! हीं कामें देण्यांत किती जणांचे किती ठिकाणीं हात ओले होतात, एक कागद दाखवून दुसरा कसा वापरला जातो व दिलेल्या प्रतींत व बिलांतील प्रतींत किती तफावत ठेवली जाते वगैरे उघड मामल्याच्या किरकोळ गोष्टी सर्वांना माहितीच आहेत. पण निदान येथे कांही तरी घडतें. मध्य रेल्वेच्या नव्या वेळापत्रकांत एका भुसावळ-इटारसी गाडीच्या वेळा दिल्या आहेत. पण ती गाडी म्हणे चालतच नाही! एकूण काय, अंधेर-नगरी चौपट राजा, टका शेर भाजी टका शेर खाजा!

*

संसदेच्या लॉबींत या अंधेरनगरींतील नोकरशहांच्या अकलेची मोठी गमती-दार कहाणी ऐकावयास मिळाली. 'दिनमान' या हिंदी साप्ताहिकाचे संपादक एस्. एच्. वात्सायन हे नुकतेच परदेश दौऱ्यावर गेले होते. त्यांनी बेल्जमलाहि भेट दिली. त्यांच्यासारख्या वयोवृद्ध, ज्ञानी संपादकाबरोबर बातचीत करण्याकरिता बेल्जम-मधील आपल्या राजदूताने ब्रुसेल्समधील प्रतिष्ठित नागरिकांना कॉकटेल पार्टी-साठी पाचारण केलें. पेयपानास सुरुवात करतांना राजदूतमहाशयांनी मुख्य पाहुण्यां-ची ओळख करुन दिली, 'कामसूत्र' ग्रंथ कोणास माहीत नाही! त्याचे हे कर्ते-'वात्सायन!' या ओळखीनें दिङ्मूढ झालेले वात्सायन अक्षरशः दिवाणखान्यांतील एक कोपरा शोधून कपाळाला हात लावून बसले. पण लोक त्यांना थोडेच सोडतात! त्यांनी त्यांना घेरलेंच.! "आपण 'कामसूत्र' ग्रंथ कसा लिहिलांत? तो अनुभव-सिद्ध आहे काय?" वगैरे प्रश्नांच्या भडिमारामुळे लज्जेने 'मेल्याहून मेले' झालेल्या वात्सायनांनी कसें तरी सांगून टाकलें की, "मी 'तो' वात्सायन नव्हे! ते माझ्या नामसादृश्याचे दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेले ऋषि होत."

हें ऐकल्यावर राजदूतमहाशयांना 'न घेतांच' बेहोषी आली.

परराष्ट्रीय खात्याचे चिटणीस टी. एन्. कौल लवकरच भरणाऱ्या एका परि-षदेंत परदेशांतील प्रचाराबाबत मार्गदर्शन करणार आहेत म्हणे! त्याबाबत बोल-तांना ते एकाजवळ ठासून म्हणाले की, "अर्थातच आम्ही तेथे हेंहि सांगणार आहोंत की, 'दिनमान'च्या संपादकांचा 'कामसूत्रा'च्या जनकाशीं कांहीहि संबंध नाही!"

**– केसरी, ८ डिसेंबर १९६८**

# विचित्र पाहुण्यांची वाढती आवक

- ३ -

थंडींत मांजरासारखें शरीर फुलवून, ऊन अंगावर घेण्यांत विलक्षण सुख वाटतें. सचिवालयांतील बाबूलोक मधल्या सुट्टींत हिरवळीवर ऊन खात बसलेले सध्या येथे दिसतात. साहजिकच मधली सुट्टीहि लांबते. कोणा एखाद्याची चौकशी केली तर हटकून " जनाब धूप सेकते होंगे " असें उत्तर मिळतें. घरांतील पुरुष मंडळी कचेरींत गेली की, घरधनीणीहि आपआपली पिलावळ घेऊन उन्हांत खाटा टाकून 'पडोसिनी'शीं गप्पा छाटत बसतात. या दिवसांत हिरव्यागार भाज्यांचा व रसरशीत फळांचा नजराणाच निसर्गाने दिलेला असतो. एका बाजूस गप्पा छाटतांना मसाला भरलेले मुळे, ओला वाटाणा, अलाहाबादी 'अमरूद'च्या फाका तोंडांत जात असतात व हाताने चालू असते, 'चार सुलटे, दोन उलटे !'

या दिवसांत पांच-साडेपांचलाच सांजवते. थंडी अंगांत भरूं लागते. अजून बाहेर धुकें दाटूं लागलेलें नाही. पण तेंहि लवकरच सर्व प्रकाशझोत थिजवेल व दहा हातांवरील व्यक्ति दिसेनाशी करील. अंगावर जाडजूड उनी कपडे घालून बंदोबस्ताने सायंकाळीं फिरण्यास बाहेर पडलांत की, राजपथावर आपणांस विविध रंगांचे राष्ट्रध्वज हारीने उभारलेले दिसतील. कोणी तरी राष्ट्रप्रमुख राजधानींत आलेला असतो किंवा यावयाचा असतो. आज काय, माल्टाचे महामंत्री आले ! उद्या काय, सिलोनचे येणार ! परवा काय, युगोस्लाव्हियाचे नेते भेट देणार ! हिवाळ्याचे दिवस हे भारताच्या दौऱ्यासाठी सुखकर मानले गेले आहेत.

पाश्चात्त्य देशांतून आणखी कांही विचित्र पाहुण्यांची आवकहि भारतांत चालू आहे. हे वेडेवांकडे, घाणेरडे पोषाख केलेले 'हिप्पी' तुम्हांला कॅनॉट प्लेस, चांदणी

चौक वगैरे ठिकाणच्या बाजारांत येड्या गबाळ्यासारखे हिंडतांना दिसतील. त्यांत तरुण मुलेंहि आहेत, मुलीहि आहेत. त्यांना कशाचाच विधिनिषेध असलेला दिसत नाही. ते सर्वतंत्र स्वतंत्र असल्याने 'मुक्तोऽथवा पशु:' या श्रेणींत दाखल झालेले असतात. ही भुतावळ दिल्लींत येते पाकिस्तानांतून – हुसैनवाला सीमेवरून. किंवा नेपाळांतून यांच्या झडत्यांत चरस, सोनें, हत्यारें आदि अनंत तऱ्हेचा अमली व घातक माल सापडत आहे. अशा एक का दोन, महिन्याभरांत वीस-पंचवीस हिप्पींना पोलिसांनी अडकविलें आहे. मग सुक्याबरोबर कधी ओलेंहि जळतें.सभ्य पाश्चात्त्य प्रवाश्यांनाहि लोकांचा व पोलिसांचा त्रास होतो. पाश्चात्त्य प्रवासी दिल्लींतील ऐतिहासिक वास्तु पाहण्यास व बाजारपेठेंतील भारतीय बनावटीच्या कलाकुसरीच्या वस्तु घेण्यास गेले की, त्यांच्या- मागे कोणी तरी सावलीसारखा चालू लागतो. त्यांच्या हातांतील कॅमेऱ्याकडे पाहून 'तो विकावयाचा आहे का' विचारतो. त्यांच्या मोटारीभोवतीं एखादा पोलिस घिरट्या घालून संशयित म्हणून त्यांना पोलिस-स्टेशनवर दमबाजी करून नेतो. एका जर्मन प्रवाश्याजवळ खेळण्यांतील एक पिस्तूल होतें. त्याच्याकडून दमबाजीने कांही तरी चिरीमिरी उकळावी हा पोलिसाचा हेतु. तें जमलें नाही तर निदान एखादी वस्तु थोडक्यांत मिळावी म्हणून मागणी ! त्या पिस्तुलाचीच मागणी पोलिसाने केली. जर्मन प्रवाश्याने नकार दिला. त्यावर खटला भरला गेला. जर्मन गृहस्थाचें इंग्रजी बेताचें. त्यामुळे 'समरी ट्रायल' होऊन 'आर्म्स ॲक्ट'खाली त्याला तुरुंगाची हवा दाखविण्यांत आली. पिस्तुल जप्त झालें. पुढे लक्षांत आलें की, हें पिस्तूल खेळण्यांतलें होतें. शेवटीं एका संसद-सदस्याच्या खटपटीने तो जर्मन गृहस्थ सुटला.

मॅजिस्ट्रेट म्हणाले, "तें पिस्तूल खेळण्यांतलें आहे एवढें तो सांगतां तरी सोडलें असतें."

सारा गफलतीचा मामला व पोलिसांची बेअक्कल ! मग दिल्लींतील 'आदब' जिभेवर आली. त्याला विचारलें, "आपणांस अकारण त्रास झाला. आपणांसाठी आम्ही काय करूं ?"

तेव्हा त्याने उत्तर दिलें की, "जेवढ्या लवकर भारताच्या बाहेर पडण्याची माझी व्यवस्था कराल तेवढे उपकार होतील."

'जेम्स बॉंड'चे भारतीय अवतार ठरूं पाहणाऱ्या दिल्ली पोलिसांची साऱ्या पाश्चात्त्यांना 'स्मगलर', 'स्पाईज' ठरवून त्यांच्यावर नजर ठेवण्याची रांगडी हास्यास्पद तऱ्हा अनुभवास येत असतांना बंगाल, आसाम, नेफा या पूर्व सीमेवरील राज्यांत चीनने छापलेल्या बनावट भारतीय नोटांचा प्रसार सर्रास चालू आहे. जनकपूरला (नेपाळ) नुकतेंच एका भारतीयाला दहा रुपयांच्या बनावट भारतीय नोटा बाळगल्याबद्दल पकडण्यांत आलें. त्या कलकत्त्याला मिळाल्याचें त्याने सांगितलें. चीनमध्ये हुबेहूब छपाई केलेल्या !

पण चिनी बनावटीच्या नोटा किंवा मालच का, पण विविध पाश्चात्त्य देशांतील सिंथेटिक यार्न, स्टेनलेस स्टीलचे पत्रे, व्हिस्की इत्यादि वस्तूहि नेपाळांत येऊन त्यावर नेपाळांतील बिराटनगरचा शिक्का चढवून आज भारतांत त्या पाठविल्या जातच आहेत की नाही ? नेपाळ तेरा हजार टन ताग पिकवितें; मात्र परदेशांत पन्नास हजार टन विकतें. हा एवढा ताग आला कोठून ? आज भारतांत तागाची टंचाई असतां तो नेपाळांत जातो व तेथून परदेशांत रवाना होतो. पण याला आळा कोण घालणार? उलट नेपाळशीं करार करून त्या व्यापारास कायदेशीर मार्ग मोकळा करून दिला गेला आहे. कारण राज्याराज्यांतील मध्यावधी निवडणुकांना पैसा हवा ना !

उत्तर प्रदेश, पंजाब, बिहार, पश्चिम बंगाल येथील निवडणुकींत सुवर्णमुद्रांची चलती राहणार यांत आता कांहीच शंका राहिलेली नाही. पंजाबचे एक माजी मंत्री व माजी खासदार एकाजवळ बोलत असतांना कानीं शब्द आले की, ‘ होशियारपूरचा संसद मतदारसंघ श्रीमती पटनाईक यांना कांही लाख रुपयांना विकण्यांत येत आहे. ’ असे मतदारसंघ विकले जात असतील, तर मग बोलणेंच खुंटले ! खरड (पंजाब) येथे बोलतांना श्रीमती इंदिरा गांधी म्हणाल्या की, “ गांधीजी व नेहरू यांचें स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला पाहिजे ! ” गांधीजींचें स्वप्न पैशाने निवडणुका लढवून खासे साकार होणार ! पैशाने सत्ता काबीज करण्याचें व सत्तेंतून पुन्हा मत्ता निर्माण करण्याचें हें चक्र म्हणजे काँग्रेसच्या तिरंगी झेंड्यावरील चक्र तर नव्हे ना !

पण हें चक्र हातीं धरून काँग्रेसचा अग्निरथ या मध्यावधि निवडणुकींत सर्वत्र विजय संपादीत फिरेल असें चिन्ह मात्र दिसत नाही. सर्वत्र काँग्रेस अल्पसंख्य पक्ष म्हणूनच निवडला जाण्याची चिन्हें दिसतात. एकाने लोकसभेंत सांगितल्याप्रमाणे हे दिवस ‘ मिनी स्कर्ट ’चे आहेत म्हणून ‘ मिनी गव्हर्नमेंट ’स् निर्माण करावींत – अल्पसंख्य काँग्रेस पक्षाने फुटिरांशीं हातमिळवणी करून ! कोणीकडून सत्ता हातीं असली म्हणजे झालें !

अर्थात् हे असे सवाल-जबाब संसदेंत, पक्ष-बैठकींत, परिषदांतून नेहमी चालू असतात. राज्यसभेंत शिक्षणखात्यांतील चिटणीस शिक्षणतज्ज्ञ असावेत, का आय्. ए. एस्. असावेत, यावर चर्चा चालू होती. शिक्षणमंत्री त्रिगुण सेन यांनी आय्. इ. एस्. अशी एक स्वतंत्र अखिल भारतीय शैक्षणिक अधिकारीवर्ग असण्यास मान्यता दिली. राज्यांची मात्र अजून अनुकूलता तिला मिळत नाही असें ते सांगत होते.

तेवढ्यांत गृहमंत्री यशवंतराव चव्हाण उठून म्हणाले की, “ नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलच्या वेळी ही कल्पना राज्यांच्या मुख्य मंत्र्यांकडे मांडली गेली आहे. ”

गृहमंत्री उठलेले पाहतांच विरोधी पक्षाचे प्रमुख श्री. भूपेश गुप्त म्हणाले, “ अध्यक्षमहाराज, पोलिस शिक्षणक्षेत्रांत घुसत आहेत पाहा ! ” (अलाहाबाद, बनारस विद्यापीठ दंगलीच्या पार्श्वभूमीवर ही टीका होती.) त्यावर यशवंतरावांनीहि लगेच उलट टोला दिला की, “ विरोधी पक्षप्रमुखांनी अधिक शिक्षण घेण्याची आवश्यकता

आहे. गृहखात्याकडे अखिल भारतीय अधिकारीवर्गाचेंहि काम असतें. केवळ पोलिस-खातेंच असतें असें नव्हे !"

*

असाच एक मोठा मासलेवाईक सवाल-जबाब काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकींत झाला. चर्चा चालली होती बॅ. नाथ पै यांच्या घटनादुरुस्तीच्या विधेयकावर. काँग्रेसमधील तडफदार, तरुण नेते श्री. चंद्रशेखर बोलत होते व त्यांच्या भाषणांत मिश्र, शारदा मुकर्जी, तारकेश्वरी सिन्हा, सुचेता कृपलानी वगैरे विक्षेप आणीत होत्या.

त्यावर चिडून चंद्रशेखर म्हणाले की, "कांही स्वार्थी लोकांचा समाज-हिताच्या गोष्टींना अडथळा आणण्याचा धंदाच आहे."

चंद्रशेखरांनी हें वाक्य उच्चारतांच विक्षेप आणणाऱ्या वरील लोकांनी "हें बाजारी भाषण (Market Speech) बंद करा !" असा गिल्ला केला. त्यावर चंद्र-शेखरांनी अधिकच लाल होऊन सुनावलें की, 'बाजारी माल' (Purchasable Commodity) बनलेल्यांनी हें मला सांगू नये."

येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय भूवैज्ञानिकांच्या परिषदेंतहि अशीच बौद्धिक चकमक उडाली. एका विभाग बैठकींत जुने सुप्रसिद्ध इंग्रज लेखक रुड्यार्ड किपलिंग यांनाच ऐरणीवर घालण्यांत आलें. अमेरिकन प्राध्यापक डॉ. स्टीव्हन्स त्या विभाग-बैठकीत बोलतांना म्हणाले,"भारतादि जित राष्ट्रांत किपलिंग यांच्या 'दि व्हाईट मॅन्स बर्डन' या कवितेबद्दल अकारण नाराजी आहे. किपलिंग यांची ही कविता साम्राज्य-वादाची जशी दर्शक, तशीच साम्राज्यविरोधीहि आहे. किपलिंग यांच्या मानवतावादी दृष्टिकोनाचें तें दर्शक, आहे. आज किपलिंग यांनी व्यक्तविलेली जबाबदारीच आर्थिक-दृष्टया मागासलेल्या राष्ट्रांच्या विकासास मदत देऊन सांभाळली जात आहे.'

फोर्मोसाचे डॉ. चेन यांनी या मताचा प्रतिवाद केला. ते म्हणाले, "गोरे व गौरेतर यांच्यांत किपलिंग यांनी दुरावा निर्माण केला, आणि म्हणून किपलिंग लोकांच्यांत आता तितकेसे प्रिय नाहीत."

यावर ब्रिटिश भूवैज्ञानिक म्हणाले, "छे ! उलट आहे. आज ब्रिटनमध्ये पुन्हा किपलिंगला पुनरुज्जीवन मिळालें आहे."

ब्रिटिश भूवैज्ञानिकांच्या या उद्‌गारांवर एका भारतीय वैज्ञानिकानें लगेच शेरा मारला, "कारण वर्णविद्वेषालाहि ब्रिटनमध्ये पुनरुज्जीवन मिळालें आहे."

डॉ. स्टीव्हन्स यांचा हेतु होता, किपलिंग यांच्या 'ईस्ट अँड वेस्ट' या पोवाड्याचा भूवैज्ञानिक आशय समजून देण्याचा. तो या वादांत तसाच राहिला. त्या कवितेंतील सर्वांच्या लक्षांत राहिलेला भाग आहे. – "East is East & West is West, Never the two shall meet." पण त्या विचाराचा उच्चबिंदु गाठला गेला "There is neither East nor West" या वाक्यानें. असा हा सर्वभूतीं

समानता पाहणारा मानवतावाद या पृथ्वीवर केव्हा अवतीर्ण होईल तो होवो; सध्या तरी जग संकुचित राष्ट्रवाद, प्रलयकारी सत्तावाद व अमानुष वर्णवाद यांनी ग्रासलें गेलें आहे.

आणि भारत ग्रासला गेला आहे अज्ञानाने! डॉ. स्टीव्हन्स यांनी दिल्लींत हिंडतांना एका सुटाबुटांत वावरणाऱ्या गृहस्थाला सहज कुतूहलाने विचारलें, "आपणांस किपलिंग माहीत आहेत काय?"

त्यावर Kipling शब्दांतील Kip एवढाच शब्द समजल्याने तो म्हणाला, "छे! छे! मी कधीच कोणती हिरवी माडी चढलों नाही."

– केसरी दि. १५ डिसेंबर १९६८

# रांगेकडून रांगेकडे

**- ४ -**

सायंकाळीं कचेऱ्या सुटण्याच्या आगेमागे दिल्ली परिवहनाच्या 'थांब्या'कडे दृष्टि टाकली की, सर्वत्र लांबच लांब रांगा लागलेल्या दिसतात. पण केवळ दिल्लीचेंच हें कांही वैशिष्टच नव्हे.

दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वच मोठ्या शहरांना 'क्यू'ची देणगी मिळाली आहे. शिधा आणावयाचा असो, विजेचें बिल भरावयाचें असो, एवढेंच काय, पण सिनेमाचें तिकिट मिळवावयाचें झालें, तरी रांगेंत दाखल होण्याशिवाय गत्यंतर नसतें.

दिल्लीचें जें वैशिष्टच आहे तें मात्र वेगळेंच !

बस येईपर्यंत रेल-भवन, उद्योग-भवन, शास्त्री-भवन इत्यादि असंख्य 'भवनां'-तील सारे छोटे-मोठे साहेब मारे 'एक कतार' करून डाव्या-उजव्या पायावर आलटूनपालटून उबदार कपड्यांच्या ओझ्यासकट शरीराचा भार तोलत, अगदी शिस्तीने उभे असतात. पण बस 'थांब्या'पुढे येऊन थांबते न थांबते तोंच सारी शिस्त वाऱ्यावर सोडून बसच्या दरवाज्यावर भाऊगर्दी करून हल्ला चढवितात. ज्या कोणाला आंत घुसणें जमतें तो बसमधून व जो बाहेर राहतो तो लोंबकाळून प्रवास सुरू करतो. जनसंघाचें राज्य दल्लीवर प्रस्थापित झाल्यापासून पूर्वीच्या मानाने बस-वाहतुकीची व ती ज्या रस्त्यांवरून होते त्यांची तशी खूपच सुधारणा झाली आहे. पण म्हणून वाढत्या लोकसंख्येला गाड्या तरी किती नि कशा पुऱ्या पडणार !

जगाची लोकसंख्या आताच झाली आहे तीनशे कोटि आणि दोन हजार सालीं ही संख्या सातशे कोटींवर जाईल असा अंदाज आहे. सध्याच्या लोकसंख्येपैकी अडतीस टक्के लोकसंख्या आज शहरांत राहते व येत्या पंधरा वर्षांत ग्रामीण

भागांतील आणखी निम्मी लोकसंख्या शहरांत गोळा होईल असें भाकीत आहे. तसें झालें तर पन्नास वर्षांनी तर शहराबाहेरची लोकवस्ती शोधूनच काढावी लागेल. या वाढत्या लोकवस्तीच्या शहरांतून हिंडावयास लागलें की, 'नरेच केला हीन किती नर !' याची साक्ष ती गटारें, ती गर्दी, त्या गलिच्छ वस्त्या पाहिल्या की पटूं लागते. एका अमेरिकन अहवालांत तर चक्क म्हटलेंच आहे की, येत्या पंचवीस वर्षांत भारतांतील किमान पांच शहरांची तरी लोकसंख्या सहा कोटींच्या घरांत पोचेल. म्हणजे कुटुंब-नियोजन केलें, तरी आता मागची 'क्यू'ची कर्मकटकट कांही चुकत नाही.

नाही तरी कुटुंब-नियोजन म्हणजे तरी काय ? जन्म घेणाऱ्या मुलांना 'क्यू'त उभें करणें ! दोन – फार तर तीन जणांना या जगांत प्रवेश ! बाकीच्यांना दरवाजा बंद ! मला प्रश्न पडतो की, 'क्यू'मध्ये उभ्या राहिलेल्या या बाकीच्या जीवांचें काय होणार ? पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारें माझें हिंदु मन मोठ्या घोटाळ्यांत पडलें आहे. चौऱ्यांशी लक्ष योनींच्या फेऱ्यांतून जीवमुक्तीसाठी मनुष्ययोनींत प्रवेश करूं पाहतो, तर त्याला प्रवेश बंद ! मग तो आत्म्याचें व परमात्म्याचें ऐक्य साधून जन्म-मरणांतून मुक्त होणार तरी कसा? ना स्वर्ग, ना पृथ्वी अशी त्रिशंकूसारखी, केवळ त्या जिवाचा चौथा-पांचवा क्रम लागला म्हणून अवस्था होणार ! सुटकेसाठी पुन: पुन्हा 'क्यू'मध्ये उभें राहण्याचा प्रसंग त्या जिवावर येणार ! नव्वद वर्षांचा वृद्ध-युवा राजगोपालाचारी यांची पुनर्जन्मावरील 'फॉर्म ॲण्ड रिॲलिटी' ही गोष्ट वाचण्यांत आली. त्या गोष्टींत म्हटल्याप्रमाणे अशा अनेक गोष्टी आहेत की, ज्या आपल्या ज्ञानाच्या कक्षे बाहेरच्या आहेत असेंच शेवटीं म्हणावें लागणार तर !

*

नुसत्या ज्ञानाच्या कक्षेबाहेरच्याच काय, पण ज्ञान झालें तरी न उलगडणारीं काय थोडीं प्रकरणें या काँग्रेसच्या रामराज्यांत चालू आहेत ? एखाद्याला परदेशांत जावयाचें झालें, तर रिझर्व्ह बँकेचा परवाना मिळविण्यास कोण यातायात पडते ! तरी देखील १९६७ व ६८ सालांतील अठरा महिन्यांत म्हणे अठराशे अधिकाऱ्यांनी परदेशची वारी केली. मंत्री तर परदेशवारीसाठी जणू 'क्यू' लावूनच बसलेले होते. ऑगस्ट ते नोव्हेंबर या तीन महिन्यांच्या काळांत अठरा मंत्री परदेशांना भेटी देऊन आले. महामंत्री श्रीमती इंदिरा गांधींपासूनच सुरुवात करूं या ! मोरारजी देसाई, फक्रुद्दिन अहंमद, जयसुखलाल हाथी, जगजीवनराम, डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव, डॉ. चन्ना रेड्डी, त्रिगुण सेन, दिनेशसिंग, करणसिंग, स्वर्णसिंग, भगत, फलरेणू गुहा, मिश्र, शुक्ल, पंत, श्रीमती जहानारा, जयपालसिंग व महंमद शफी कुरेशी हे सारे कशासाठी बाहेर हिंडून आले, असें कोणी विचारील, तर तें मात्र खपवून घेतलें जाणार नाही हं! कशासाठी म्हणजे काय ? महामंत्री अनेक देशांच्या आमंत्रणांचा आदर करण्या-साठी परदेशीं गेल्या. अर्थमंत्री ब्रिटनशीं व अमेरिकेशीं आर्थिक बाबींवर चर्चा करण्या-

साठी परदेशीं गेले. स्वर्णसिंग संरक्षण-साधनांची पाहणी करण्यासाठी, तर करणसिंग प्रवाश्यांना भारतांत आकर्षित कसें करावें याच्या निरीक्षणासाठी. त्रिगुण सेन शांति-यात्रेच्या निमित्ताने, तर भगत अंत्ययात्रेच्या निमित्ताने परदेशीं जाऊन आले !

थोडक्यांत सांगावयाचें तर, एअर इंडियाच्या 'महाराजा'चें हल्लीचें खास नवें घोषवाक्य आहे – "मंत्र्यांच्या रांगेंत दाखल व्हा व परदेश पहा !"

या मंत्र्यांच्या रांगेंत दाखल होण्यासाठी खरी शर्यत चालू होईल ती मध्यावधि निवडणुकीनंतर. आज जरी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेच्या बातम्या अधून मधून प्रसिद्ध होत असल्या तरी इंदिराजी त्याबाबत थंडच आहेत. छगला, अशोक मेहता व डॉ. चन्ना रेड्डी हे तीन मंत्री मंत्रिमंडळांतून बाहेर गेले आहेत. या तिघांच्याहि मंत्रिमंडळांतून झालेल्या बहिर्गमनाबाबत बोलतांना एकजण म्हणाले, "बाह्यतः हे तिघेहि राजीनामे देऊनच गेले व तसा प्रतिष्ठितांच्याबाबत सारा साज सांभाळावाच लागतो. पण प्रत्यक्षतः मामला वेगळाच आहे !"

एक गृहस्थ खुशाल परक्याच्या घरांत शिरला. मालकाने त्याला मागील दाराने बाहेर काढलें. त्यावर रागावून तो म्हणाला की, "मी काय चोरबीर आहे काय ? चांगला घरंदाज माणूस आहे. माझं स्वतःचं घर सोडून तुमचं घर नीट लावून देण्यासाठी आलों, तर मला मागील दाराने बाहेर काढतां ?"

त्यावर मालकाने त्याला पुन्हा घरांत बोलाविलें. मग पुढे काय झालें ?

वेगळें कांही नाही. पुढील दाराने बाहेर काढलें इतकेंच ! तसा आहे हा प्रकार.

*

आता या रिकाम्या जागामध्ये आणखी कोणी शिरूं पाहत आहेत व इंदिरा-जींच्याकडे आपली वर्णी लागलीच आहे, असे मनचे मांडे खात स्वतःच्याच खुषींत आहेत. इंदिराजींना जेथे आपलेंच स्थान राज्याराज्यांतील मध्यावधि निवडणुकी-नंतर सुरक्षित कसें राहील याची चिंता आहे, तेथे त्यांना अलबत्यागलबत्यांचा विचार करण्यास सध्या कोठली फुरसत ? या मध्यावधि निवडणुकांत पैशांचा पूर वाहणार आहे हें मीं मागेच लिहिलें आहे. मधु लिमयांनी तर कंपन्यांकडून राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्यांवर निर्बंध घालणारें विधेयक या संसदेच्या अधिवेशनांत न आणण्यामागील राजकारण नुकतेंच स्पष्ट बोलून दाखविलें. काँग्रेसला मध्यावधि निवडणुकांसाठी लागणारा पैसा नाही तरी येणार कोठून ? इंदिराजींच्या गटासाठी केवळ दिनेशसिंगच पैसा जमवीत आहेत असें नाही, तर पाटील-गुप्ता सुद्धा जमवीत आहेत. अर्थात् सामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हाताला तो लागणारच नाही. मोजक्या काँग्रेसश्रेष्ठांची राजकीय ग्रहणांतून सुटका करण्यासाठी हें दान होत असतें. हे मोज केच काँग्रेसची तिजोरी सांभाळत असतात व सरकारी धोरणेंहि ठरवीत असतात.

आता हेच पाहा ना !

मधु लिमयांनी ज्या कंपनीचा काळा बाजार चव्हाटयावर आणला त्या अमीचंद प्यारेलाल कंपनीची चौकशी होऊन परकीय चलनाबाबतच्या तिच्या घोटाळया-संबंधी सरकार-समिति व सुकथनकर-समिति या दोघांनीहि कंपनीला दोषी धरलें असतां, तिला नवे आयात-परवाने राजरोस दिले गेलेच की नाही ? मंत्रिमंडळांत त्याबाबत चर्चा होऊनहि पोलाद-मंत्रालयाचे निर्णय व्यापार-मंत्रालयाला समजले नाहीत व ते सी. बी. आय्.च्या चौकशी-अहवालाची अजून वाट पाहत असल्याचीं निलाजरीं उत्तरें राज्यसभेंत दिलीं जातात, त्यामागील अंदरकी बात तुम्हीच ओळखा झालें. बिर्लांच्या कंपन्यांबाबत चौकशीची मागणी खासदार चंद्रशेखर वारंवार करीत आहेत पण तिला सतत वाटाण्याच्या अक्षता लावण्यांत येतात. खासदार मंगलादेवी तलवार यांचे प्रश्नहि असेच उडवून लावण्याचा प्रयत्न उद्योगमंत्र्यांनी केला.

पण शेवटीं मक्तेदारी चौकशी-मंडळाच्या अहवालांतील आकडेच जेव्हा राज्यसभेच्या सभागृहांत तोंडावर फेकले गेले तेव्हा सारेंच भांडें फुटलें. मग बिर्लांचें १९६३-६४ सालीं धंद्यांत गुंतविलेलें एकूण भांडवल २९२.७ कोटि होतें. तें १९६६-६७ सालीं ४३४.५ कोटि झाले. म्हणजे अवघ्या तीन वर्षांत तें सरासरी पन्नास टक्क्यांनी वाढलें. टाटांचें भांडवल त्या काळांत थोडें कमीच झालें. बिर्ला, मार्टिन बर्न, लामानी लार्सन टुब्रो, मफतलाल, साहू जैन, बर्ड हेलगस, सिंघानिया या साऱ्या बडया भांडवलदारांचें भांडवल गेल्या तीन वर्षांत बारा टक्क्यांनी वाढलें आहे. कॉंग्रेसच्या समाजवादी धोरणाचा हा विजयच म्हणावयाचा ! मूठभर मोजक्या भांडवलदारांच्या हातीं केंद्रित झालेल्या पैशाचा चौकशीचा फार्स एका बाजूला चालू आहे, तर दुसऱ्या बाजूला देशाच्या आर्थिक नाडया अशा रीतीने सत्ताधारीच त्यांच्या हातीं देत आहेत. कदाचित् गालब्रेथच्या कल्पनेंतील ' न्यू इंडस्ट्रियल स्टेट ' उभे करण्याचा कॉंग्रेसचा प्रयत्न असेल !

*

पैसा म्हणजे परमेश्वर व या राज्यांत तो असेल तर सत्ताहि संपादिता येते हें मात्र कॉंग्रेस-श्रेष्ठांना उत्तम समजलेलें आहे. ही सत्ताच माणसाला बिघडविते व ती जितकी सर्वंकष तितकाच उद्दामपणाहि बहरून येतो. जगांत मी काय तो सत्पुरुष, पुण्यवान्, सदाचारी, असा अहंकार तर काठोकाठ भरून वाहूं लागतो. कॉंग्रेस-श्रेष्ठांमध्ये मोरारजी या औद्धत्यांत कोणालाहि हार जाणार नाहीत. कांतिलाल-प्रकरणामुळे त्यांची कांति काळवंडली असली तरी दंभ निवलेला नाही. डांगे यांनी मोरारजींच्या या दंभाचाच 'कांति-प्रकरणा'वर भाष्य करतांना मोठया कौशल्याने स्फोट केला होता. अनेकांचीं मुलें बिघडतात. पित्याचें प्रेम त्यावर पांघरूण घालू पाहतें. मोरारजींनी कांतिलालचे अपराध पितृप्रेमाने पोटांत घातले याबाबत आम्हांला कीव वाटली, तरी घृणा वाटली नसती. हा सामान्याचा स्वभावदोष आहे.

पण मोरारजी स्वतःला समजतात असामान्य (Superhuman). मग त्यांच्या-साठी जी मोजपट्टी लावावी लागणार तीहि असामान्यांचीच. पण ती लावली म्हणजे मात्र ते त्या कसोटीला उतरत नाहीत. हवेने भरलेला फुगा आकाशांत उंच जातो व तेथील दाब सहन न होऊन फुटतो, चपटा होऊन धरणीवर कोसळतो. मोरारजींची अवस्था कांतिलाल-प्रकरणाबाबत तरी ही अशीच झाली आहे.

नुकतेंच धारियांनाहि मोरारजींच्या औद्धत्याला 'कांती'चा पुन्हा उल्लेख करून डिवचावें लागलें, वसंतदादा पाटलांना पक्षदृष्टीने तें कसें वाटलें हें जरी कळूं शकलें नाही, तरी ज्यांनी तो संवाद ऐकला त्यांना मोरारजींच्या औद्धत्याला विद्वेषाचें विष कसें चढलें आहे व दुसऱ्याच्या स्वाभिमानाला ते कसा दंश करतात हें प्रत्ययाला आलें आहे. मोरारजींचा हा दंभ त्यांनीच भूपेश गुप्त यांना उद्देशून एकदा सांगितलेल्या गोष्टींत योग्य रीतीने व्यक्त झाला होता.

मोरारजीभाईंनी साधूची व विंचवाची प्रसिद्ध गोष्ट सांगितली. पाण्यांत पडलेल्या विंचवाला बाहेर काढण्यासाठी साधूने त्याला ओंजळींत घेतलें व विंचवाने मात्र त्याच आधार देणाऱ्या हातांना नांगी मारण्याचा प्रयत्न चालविला व तो पुन्हा पाण्यांत पडला. ही गोष्ट सांगून मोरारजी म्हणाले होते, "तुम्ही विरोधक त्या विंचवासारखे आहांत. तरीहि मी तुम्हांला त्या साधूच्या सहृदयतेने व मानवता-वादाने प्रेरित होऊन वांचविण्याचा प्रयत्न करीत आहे."

मोरारजींच्या या दंभाच्या फुग्याला भूपेश गुप्त यांनी खाशी टाचणी लावली—

"मोरारजीभाई, त्या साधूच्या जागीं तुम्ही असतां व यदाकदाचित् त्या विंचवाने नांगी मारली असती, तर तुमचें विष त्या विंचवाला चढून तो असह्य वेदनांनी गतप्राण झाला असता !"

मोरारजींनी काँग्रेसमधील धारिया-चंद्रशेखरादि खासदारांना नुकतेंच घरीं जेवावयास बोलावलें असतांना, मोरारजीचे आभार मानतांना त्यांतील एक खासदार म्हणाले, "Morarjibhai, thanks for your hostility."

खरें-खोटें माहीत नाही, पण नकळत सत्य वदलें गेलें हें मात्र खरें !

— केसरी, दि. २२ डिसेंबर १९६८

# काळ बदलला आहे हेंच खरें !

-५-

जनपथावरील 'भारतीय कला-केंद्र' नव्या वर्षाच्या स्वागतासाठी नव्या फॅशन्स हारीने मांडून आता सज्ज झालें आहे. जणू 'सँटाक्लॉस'ची ती देणग्या लादून आलेली रेनडिअरची गाडीच. केंद्रांतील जुन्या-नव्याचा सुरेख कलात्मक संगम पाहून तर नेत्र सुखावतातच, पण नाताळनिमित्त पायमोज्यांत भरलेलीं खेळणीं, चमचमणाऱ्या चांदण्या व काचेचे लाल-हिरवे गोळे लटकावून उभारलेली सूचीपर्ण 'पाईन'चीं नेटकीं सरळ झाडें वातावरण उल्हसित करतात. बालकांना तर अक्षरशः नाचवतात. नाताळसाठी जशी जनपथावरील व कॅनॉट सर्कलमधील 'एम्पोरियम्स' सजलेलीं आहेत तशीच जामा मशिदीच्या परिसरांतील छोटीं छोटीं दुकानें गडद रंगाच्या रेशमी रुमालांनी व आरसे लावलेल्या कापडांनी खच्चून भरलीं आहेत. दिल्लींतील एक लाख मुसलमानांनी गेल्या शनिवारीं ईद्-उल्-फित्रच्या निमित्ताने व रविवारीं इदगाच्या निमित्ताने जामा मशिदीमध्ये प्रार्थना केली. शुक्रवारीं ईदचा चांद न दिसल्याने रमझानमध्ये एक दिवसाची वाढ करण्यांत आली होती. प्रार्थनेनंतर बहुतेक सर्व घरांतून अब्दुल, फतिमांनी खीर खाल्ली व आपल्या छोटचा मित्रांकडे मिठाई पाठविली.

नाही तरी दिल्लीतील थंडीचे दिवस सर्वच तऱ्हेच्या बाजारांना अनुकूल मानले गेले आहेत. थंडीने उशिरा का होईना, पण दिल्लीची पकड आता घेतली आहे. अंगांतील गारठा घालविण्यासाठी उनी कपडे पेहरून व काश्मिरी शाल पांघरून महिला, घरांतील पुरुष कचेरींत व मुलें शाळेंत गेलीं रे गेलीं की बाहेर पडतात. मध्यमवर्गाच्या महिलांचा मोर्चा रिक्षाने करोलबाग, चांदणी चौकाकडे, तर नव्या दिल्लींतील विशाल महिलांचा फेरा मोटार काढून जनपथाकडे निघतो. बाजारहाट ही स्त्रियांनी एक

कलाच बनविलेली आहे. एखादीने तर त्यांत खूपच प्रावीण्य मिळविलेलें असतें. मग कोणी ताराबाई सिंधूताईंना सल्ला देतात, " कांही आणावयाचें झालें तर आमच्या त्या कमलाबाईंना घेऊन जा बरं का ! त्यांना किनई सर्व म्हणजे अगदी सर्व बाजार पाठ आहेत." बनारसी, कोईमतुरी, शांतिनिकेतन, कोटा साडया कोठे चांगल्या व स्वस्त मिळतात, दिल्लींतील कढाईचें काम केलेल्या साडया चांदणी चौकांत कोणाकडे घ्याव्यात, चिकनचें काम कोठें छान पाहिलें, काच-सामान घ्यावयाचें तर चिनटपासून खुर्जापर्यंतचा सगळीकडील उत्तमोत्तम माल कोठे खात्रीचा व नव्या डिझाईनचा मिळेल, हें सारें सांगितलें जातें. शेवटीं कमलाबाईंबरोबर सारे दिल्लींतील बाजार हिंडून हाश-हुश करीत सिंधूताई जेव्हा सामानाचें ओझें रिक्षांत लादून घरीं येतात तेव्हा त्यांच्या यजमानांना (दिल्लींतील थंडीने नव्हे) थडथडून हीव भरून न आलें तरच आश्चर्य !

*

काळ बदलला आहे हेंच खरें. 'राजा कालस्य कारणम्' असें सुभाषितच आहे. सध्या इंदिराबाईंचें राज्य आहे ना, म्हणून आता तक्रार तरी कशाकशाबाबत करणार? आता हेंच पहा ना ! गेल्याच शुक्रवारीं रेल्वेतर्फे संसदेमध्ये चालविलेल्या भोजनगृहांत मधल्या सुट्टींत मी व माझे दोन स्नेही जेवावयास गेलों होतों. पहातों तों साऱ्या जागा भरलेल्या व सर्व हात धरून अडून बसलेले ! बिचारे चार वेटर्स धांवपळ करीत होते. पन्नास-साठ जणांना जेवण वाढण्यास ते कितीसे पुरे पडणार ! मधली सुट्टी झाल्याने आणखी खासदार येतच होते. एका कोपऱ्यांतून मोठा आवाज येत होता म्हणून मीं तिकडे दृष्टि वळवली. वेटर्सवर देखरेख करणारा रेल्वेचा अधिकारी कपाळावरील घाम पुशीत अजीजीने एका संतप्त झालेल्या खासदाराला समजावीत होता. मीं जवळ जाऊन विचारलें, " झालें काय ? एवढे तापलातसे ! " उलगडा झाला तो हा की, भोजनगृहांतील पंचाहत्तर टक्के वेटर्स मुसलमान आहेत व ते सारे नमाज पढण्यासाठी गेले आहेत. 'कामाच्या वेळीं नमाज पढण्यास गेले तर मग हाकलून द्या त्यांना' असें सांगावेसें वाटलें. उद्या समजा, अचानक पाकिस्तानचा हल्ला झाला तर मुसलमान सैनिक रायफली खाली ठेवून, गुडघे टेकून नमाज पढूं लागले तर करणार काय ? मला तेवढयांत पाकिस्तानचे पॅटन रणगाडे जिवाची बाजी लावून उडविणाऱ्या अब्दुल हमीदची आठवण झाली. पण अब्दुल हमीद अधिक की अब्दुल रशीद अधिक ?

वाराणशी नगरपालिकेंतील एकोणीस मुस्लिम सदस्यांनी हिंदींतून शपथ घेण्याची परंपरागत चाल अमान्य केली. उत्तर प्रदेशच्या कायद्यानुसार हिंदींतच ती घ्यावी लागते. मग कायदा बदलला. मुस्लिम बंधु बदलले नाहीत. उद्या जेवणाच्या वेळा नमाजाच्या आड येतां उपयोगी नाहीत असाहि कायदा होईल, कोणी सांगावें ! केरळांत मोपलास्तान केरळ सरकारच्या आशीर्वादाने होतें; दुर्गापूर पोलाद-कारखान्यासारख्या महत्त्वाच्या औद्योगिक केंद्रांत पंचमस्तंभीयांकडून नामधूस होऊं शकते.

नागा प्रदेशाला भारतीय सैनिकांनी वेढलें असतांनाहि त्यांचा भूमिगत सेनापति मोवू अंगामी चीनमधील गनिमी युद्धशास्त्राचा शिक्षणक्रम पुरा करुन व व्हिएटनामधील लढाई प्रत्यक्ष पाहून पुन्हा नागा प्रदेशांत प्रवेश करतो. लवकरच अंगामीबरोबर गेलेले पंधराशे नागा बंडखोरहि अशाच मार्गानें नागा प्रदेशांत प्रवेशतील. नेफा, मणिपूर, आसाम व मिझो टेकड्यांतहि पीकिंगचा हात घुसला आहे. जोरहट येथील एका कम्युनिस्टाच्या घरावर छापा घातला असतां प्लॅस्टिक बाँबहि मिळाला. नक्षलवाद्यांचें बंड केरळमध्ये उघडपणें उभें राहिलें असून त्यांच्या कांही शाखा बिहार, प. वंगालमध्येहि काम करीत आहेत. माओचीं छायाचित्रें व वचनांचीं भित्तीपत्रकें निरनिराळ्या राज्यांत बाजारांत चिकटविलीं जातात. तरीहि आमचें सरकार झोपलेलेंच आहे. "भारतांत सरकार तरी अस्तित्वांत आहे काय?" असा प्रश्न स्वतंत्र पक्षाचे श्री. सोमम यांनी विचारला तेव्हा गृहमंत्र्यांच्या नाकाला मिरच्या झोंबल्या. दोन शिका विरोधी भाषणांचा खकाणा नाकांत शिरुन आल्या तरी हरकत नाही, पण त्यामुळे मंदू झिणझिणून देशांतील देशद्रोही घातपाती. गटांबाबत कारवाई करण्याचा विचार तरी सरकार करुं लागलें हेंहि नसे थोडकें !

*

देश आज एका बाजूला देशद्रोही कारवायांनी पोखरला जात आहे व दुसऱ्या बाजूला काँग्रेस सरकारच्या उधळ्या कारभारानें दिवाळखोरीत सापडला आहे. ऐतिहासिक काळांतील भारतांतील कांही जुन्या दुर्मिळ कागदपत्रांचें प्रदर्शन येथे भरलें आहे. त्यांतील एक कागद मोठा बोलका आहे. एका काळीं येथे एक रुपयाला ३९ शेर गहूं, २२ शेर आटा, २ शेर तूप व ७ शेर गूळ मिळत होता. आता मिळतो गहूं रुपयाला एक किलो, आटचाला पडतात किलोला १ रु. १० पैसे, तूप १४ रुपये किलो व गूळ १॥ रु. किलो. आता कोणी म्हणेल की, विकासासाटी हें सर्व सोसलें पाहिजे. विकासयोजना आल्या की भाववाढ होणारच ! पण विकासाची गाडी चढणीला लागण्याऐवजीं उतरणीलाच लागत आहे. विद्यार्थी पदवीदानप्रसंगीं सांगतात की, 'पदव्या नकोत, नोकऱ्या द्या !' अनेक इंजिनियर बेकार आहेत व एम्. एस्सी., एलएल्. बी., बी. ए. झालेले तरुण पटवाऱ्यांच्या श्रेणीत प्रवेश मिळावा म्हणून अर्ज टाकीत आहेत यापेक्षा दैवदुर्विलास कोणता ? ग्रीक साम्राज्याच्या अखेरीच्या काळांत असेंच घडलें होतें याची आठवण येतें.

देशांतील विरोधी पक्ष काँग्रेसच्या डोळ्यांत अंजन घालून तिला ताळ्यावर आणील म्हणावें, तर त्यांतील धूर्त गुंतले आहेत अधिक गोंधळ निर्माण करण्यांत व गांधीवादी गुंतले आहेत बिर्ला भवन ताब्यात घेण्याच्या पोरकट उद्योगांत ! देशाच्या आर्थिक दिवाळखोरीला उत्पादनांतील घटाई कांही अंशीं कारणीभूत ठरतेच ! त्याला संप, टाळेबंदी, घेराओ वगैरेमुळे हातभारच लागतो. १९६७ सालीं १७ हजार

१९७ मनुष्यशक्तीचे दिवस ( Man-days ) वरील कारणाखातर फुकट गेले व १९६८ सालांतील पहिल्या सहा महिन्यांत ९ हजार ६४६ दिवस फुकट गेले; म्हणजे १९६८ सालीं हें नुकसान वाढतेंच राहिलेलें आहे. औद्योगिक क्षेत्रांतील उत्पादनाची हजारो दिवसांची घट म्हणजे कोटयवधि रुपयांचें नुकसान ! पण जोपर्यंत हें नुकसानीचें लोण खाजगी कारखानदारांच्या दारीं होतें तोंपर्यंत सरकार समाजवादाची आरोळी ठोकून सामाजिक न्यायप्रियतेबद्दल स्वतःची पाठ थोपटून घेऊं शकलें. पण जेव्हा आता तेंच लोण स्व-दारीं आलें तेव्हा मात्र आवश्यक सेवा-नियंत्रणाचा कायदा करून मोकळें झालें !

विरोधी पक्षांचे नेते या कायद्याच्या चिटोऱ्या सभागृहांतून उडवून जे बाहेर पडले ते गेले बिर्ला भवनांत ! गांधीजींच्या स्मारकासाठी सरकारी जमिनीवर उभारलेलें हें भवन बिर्ला शेठजींकडून हिसकावून घेण्यासाठी शशिभूषण, वाजपेयी बसले होते उपोषणाला ! गांधीजींच्या मार्गानें तें मिळवावयाचें तर मिळविलें पाहिजे बिर्ला शेठजींच्या हृदयपालटाने ! पण बहुतेकांचें म्हणणें, " नाही, ती जागा सरकारनें सक्तीने ताब्यांत घ्यावी !" बरें, गांधीजींची प्राणज्योत नेमकी मालवली कुठे ? जेथे गोळीबार झाला तेथे, की त्यांना उचलून भवनांत नेलें तेथे ? महामंत्र्यांचें म्हणणें असें की, ' भवनाची पुढील जागा ताब्यांत घेऊन तेथे स्मारक उभारण्यास प्रथम शशिभूषण तयार होते. पण आता ते शब्द बदलतात. तेव्हा आम्ही कांहीच करूं इच्छीत नाही. " गंमत आहे ती यांत की, या खेळांत कम्युनिस्टांबरोबर संयुक्त समाजवादी तर आहेतच, पण डावे काँग्रेसवालेहि आहेत. सध्या डाव्या काँग्रेसवाल्यांची व उजव्या कम्युनिस्टांची मोठी विचित्र युति जमली आहे व दोघेहि दोन भांडवलदारी गटाची भाऊबंदकी खेळवीत आहेत. जैनांच्या फूसलावणीने बिर्लांना नामोहरम करण्याचा देशी प्रश्न असो किंवा पूर्व जर्मनीला भारत सरकारची मान्यता मिळविण्याचा विदेशी प्रश्न असो, दोघे एका सुराने बोलतात ! राजकारणांत विचित्र शय्यासोबत होते हें खरें ! एका वृत्तपत्राने अशाच एका वार्तेला मथळा दिला. " निम्मे खासदार हे राजकीय भोंदू आहेत. " त्यावर एकाने " या बेअदबीबद्दल जाहीर माफी मागितली नाही, तर परिणाम बरा होणार नाही " असा संपादकाला दम दिला. दुसऱ्या दिवशीं संपादकांनी माफीच्या सदरांत छापलें, " काल आम्हीं छापलें तें चुकलें, निम्मे खासदार राजकीय भोंदू नाहीत. "

राज्यकर्ते व खासदार असे, तर शासकीय अधिकारी वेगळे कोठून असणार ? लोकसभेंत एकाने " भारताबाहेर किती भारतीय नागरिक वेगवेगळया देशांत आहेत " असा प्रश्न विचारला. त्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी साऱ्या वकिलातींना पत्रें गेलीं. अगदी पाकिस्तानांतील वकिलातीला सुद्धा ! पाकिस्तानांतील आपल्या वकिलांनी असें कळविल्याचें समजतें की, पाकिस्तानांतील सारे नागरिक भारतांतीलच आहेत. सरकारी प्रसिद्धिखात्याने तर यावरहि ताण केली. फराक्का बंधाऱ्यावरील

वाटाघाटीच्या निमित्ताने कांही खास वृत्तपत्र प्रतिनिधींना त्यासंबंधीची माहिती पत्रकरूपाने देण्यांत आली. एका विद्वान् अधिकाऱ्याला असें सुचलें की, दिल्लींतील परदेशी वकिलातींनाहि भारताचा दृष्टिकोन समजावा म्हणून हें पत्रक पाठवावें. पत्रकें वांटलीं गेलीं. पाकिस्तानी वकिलातीकडेहि तें यादीवरहुकूम गेलें. पाकिस्तानने वाटाघाटीच्या वेळीं या कृत्याबद्दल निर्बंध व्यक्त केला. भारताचा प्रतिनिधि हा प्रकार ऐकून अवाक् झाला. तो बोलणार तरी काय ? शेवटीं अडखळत म्हणाला, "घडलें तें अजाणता, दुर्लक्षाने घडलें."

*

देशांत असेंच चालणार असेल, तर शेवटीं या समाजाचे तारणहार कोण ? कालांतराने या देशांत कांहीच सुरक्षित राहणार नाही. कालांतराने कशाला, सध्याच काय चालू आहे ? सुप्रसिद्ध कवि गालिब यांच्या स्मारकाचा राष्ट्रपतींच्या करकमला-द्वारें बसविला गेलेला दगडच पळविला गेला म्हणे ! हें लक्षांत आणून दिलें गेलें गालिब जन्मशताब्दी समितीची बैठक लेफ्ट. गव्हर्नर झा यांच्या अध्यक्षतेखाली भरली असतांना ! गालिब यांचें स्मारक दगडा-विटांचें कशाला असें कदाचित् त्या चोरालाच वाटलें असेल ! गालिब म्हणतच असत – माझें घर असें असावें की, ज्याला भिंती नाहीत.

वेदर-ओ-दिवार सा, एक घर बनाना चाहिये ।
कोई हमसाना ना हो और पासबान कोई ना हो ।।

राज्यपालांच्या अध्यक्षतेखालील समितीहि गालिबच्या स्मारकाचें रक्षण करूं शकली नाही. राज्यपाल हा राज्याचा द्वारपाल; पण गालिबला जेथे दगडा-विटां-च्या भिंतींचें घरच नको होतें तेथे द्वारपाल तरी कशाला ? तो म्हणे, " माझ्याकडे कोणी येणारा नाही की जाणारा नाही, की ज्याला द्वारपालाने अडवावें ! उलट त्याला माझ्या दरवाज्यापुढे उगवलेले गवतच काढण्याचें काम पडणार !"

उगा है घर में हरसू सब्जावीराना तमाक्षाकून ।
मदार अब खोदनेपर घास का है मेरे दरबाँका ।।

दगड पळाले तर ते कोणाची तरी डोई फोडणारच ! पण शब्द पळायला लागले व एकमेकांचा पाठलाग करूं लागले तरीहि खूपच मोठें आवर्त उठतें व त्या भिगरींत जो सापडेल त्याचे हाल विचारण्याची सोय राहत नाही. राज्यसभेंत असेंच वादळ full and fool या एकाच उच्चाराच्या दोन भिन्न शब्दांनी एकमेकांचा पाठलाग करून उठविले. कायदामंत्री गोविंद मेनन यांच्या वॉशिंग्टन येथील केरळ सरकारवरील टीकात्मक वक्तव्याबाबतच्या चर्चेच्या वेळीं कम्युनिस्ट खासदार चतर्जी यांनी मेनन यांचें 'full statement' (संपूर्ण वक्तव्य) सभागृहापुढे ठेवावें अशी

मागणी केली. खासदार मोहन धारिया यांनी चतर्जींच्या शब्दप्रयोगाला रागारागाने हरकत घेतली. कारण त्यांना ऐकूं आलें तें fool's statement (मूर्खाचें वक्तव्य). खासदार चतर्जींनी लगेच टोमणा मारला, " मीं शब्द वापरला होता full, पण fool असाहि शब्द वापरण्यास हरकत नाही. यो योग्यच ठरेल ! " यापूर्वी ' राजकीय विदुषकी 'हा शब्द पार्लमेंटरी आहे काय, अशी पृच्छाहि चतर्जी यांनी केली होती. तो तसा असेल-नसेल, पण अनेक मंत्र्यांचें वागणें तसें असतें खरें !

शब्दांच्या पळापळींत याहून गंभीर प्रसंग नुकताच एका जर्मन केमिस्टवर आल्याचें सर्वांना माहीत आहेच. दुकानांत आलेल्या एका स्त्रीला त्याने eugyron या परिवार-नियोजन-गुटिका-देण्याऐवजीं enzynon या पचन-गुटिका दिल्या. परिणाम व्हायचा तोच झाला. आता तो बिचाऱ्या केमिस्टला भोगावा लागतो आहे ! न करतांसवरतां मुलाचें पालन करण्याचा प्रसंग त्याच्यावर आला !

**—केसरी, दि. २९ डिसेंबर १९६८**

# चंद्र दिसला पण काव्य हरवलें !

**- ६ -**

नाताळच्या निमित्ताने चंद्राला फेरी मारण्यास गेलेल्या तीन अवकाशयात्रींबद्दलचें कुतूहल दिल्लींतील सुशिक्षितांतच नव्हे, तर अशिक्षितांतहि आढळत होतें. जो तो आपआपल्या ज्ञानाप्रमाणे त्या विषयाला गवसणी घालूं पाहत होता व शेवटीं, "छे ! अघटित, असामान्य साहस ! मन की उमंग को चमत्कृत कर दिया !" म्हणून त्याची बोळवण करीत होता. अनेक जण रेडिओसेट लावून त्या तीन शिलेदारांच्या परतीचें वृत्त ऐकण्याच्या उत्सुकतेने सर्वांगाचे कान करून बसले होते. माझ्या खोलीत शेजारच्या बिऱ्हाडांतील मुलें ट्रान्झिस्टर लावून बसली होतीं. त्या साहसाशीं ती इतकी एकचित्त झालीं होतीं की, दिल्लींतील वाढलेल्या थंडीने हुडहुडी भरण्याऐवजीं अवकाशयानाच्या तप्ततेमुळे येथे त्यांना उकडूं लागणार की काय, असें मला वाटलें.

दिल्लींत दूरचित्रवाणीचे (टेलिव्हिजनचे) सेटस् अद्याप फारच थोड्या भाग्यवंतांकडे आहेत. श्री. अण्णासाहेब शिंदे यांच्याकडे आलेले महाराष्ट्रांतील प्रगत शेतकरी दिल्लींतील प्रेक्षणीय ठिकाणाबरोबर आणखी कांही विशेष पाहण्याचा आग्रह धरीत असतात, तर तो दूरचित्रवाणीवर दिसणारा 'शिनिमा' पाहण्याचा ! तसा दिल्लींतील दूरचित्रवाणीचा आवाका आहे बेताचाच. तास-दोन तासांचें चित्रण ते दाखवूं शकतात. हळहळू त्यांत प्रगति होईल व दिल्लीप्रमाणे भारतांतील इतर महत्त्वाच्या शहरांतहि दूरचित्रवाणीचे स्टुडिओज् उभारले जातील. त्यामुळे आपले 'नभोवाणीमंत्री' हे 'दूरचित्रवाणीमंत्री' होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून आहेत.

या वर्षींच मुंबईला दूरचित्रवाणीचा स्टुडिओ उभारण्याचा त्यांचा मानस आहे. खासदार मोहन धारिया यांनी तर त्यांना असेंहि सुचविलें आहे की, ट्रान्समिशन स्टेशन व स्टुडिओ मुंबईंत न ठेवतां ते लोणावळयांत ठेवा म्हणजे काकउड्डाणानुसार शंभर मैलांच्या परिघांतील मुंबई, नाशिक, पुणें, सातारा आदि बऱ्याच शहरांना दूरचित्रवाणीचा लाभ होईल. पण श्री. धारिया हे पडले राजकीय कार्यकर्ते. ते शास्त्रज्ञ थोडेच आहेत? पण ज्या राजकारण्यांना शास्त्रज्ञांचेंहि बळ लाभलें आहे असे अमेरिकन वकील जे. आर. विगिन्स यांनी साऱ्या भारतालाच दूरचित्रवाणीचा लाभ व्हावा यासाठी भारत व अमेरिका यांच्या जोडप्रयत्नांनी एक उपग्रह सोडण्याचें सुचविलें आहे. दूरचित्रवाणीचा लाभ केवळ शहरांनाच कां? जर दृश्याचें फळ श्राव्यापेक्षा अधिक असेल, तर या लोकशाहीप्रधान भारतांत खेडोपाडीच्या लोकशिक्षणासाठी दूरचित्रवाणी ही राष्ट्रीय गरज ठरते.

आज दूरचित्रवाणी घरोघर असती व त्यावरील चित्रण उपग्रहाच्या साहाय्याने योजिलेलें असतें, तर 'अपोलो–८' चें उड्डाण साऱ्यांना घरबसल्या पाहतां आलें नसतें का? प्रचंड शक्तीचें, अतिवेगवान रॉकेट उडतांना दिसलेलें रंगीबेरंगी दारूकाम, इलेक्ट्रॉनिक यंत्रसामग्रीची मन थक्क करून टाकणारी जादूगिरी, अघटित साहसाला प्रवृत्त झालेल्या त्या तीन अंतरिक्षयात्रींच्या चेहऱ्यांवरील उत्साह व प्रसन्नता, त्यांची ऐतिहासिक गरुडझेप आणि शेवटीं कवींनी चढवून ठेवलेल्या त्या चंद्राचा झालेला मुखभंग – सारें सारें पडद्यावर लगेच दिसलें असतें.

दूरचित्रवाणीवर चंद्राचें मनमोहक दर्शन घेण्यासाठी "झाले लोक अधीर, प्राण बसले डोळयांमध्ये येऊनी। तेजस्वी मुखचंद्रमा मग हळू ये पूर्ण पृष्ठावरी ॥" परंतु चंद्राचें तें खाचखळग्यांनी भरलेलें रेताड वाळवंटी रूप पाहून झाकली मूठ उघडली, संशयकाल संपला व कवींचें भांडारच फुटलें! एखाद्या बुरख्यांतील स्त्रीचा सुडौल बांधा पाहून रसिक कवीने तिच्या सौंदर्यावर काव्य रचावें व निळा झरझरीत बुरखा निघतांच तो सारा कल्पनाविलास कोसळावा व कुब्जा दृष्टीस पडावी तशी त्या अवकाशयात्रींची अवस्था झाली असणार!

*

असें हें चंद्राचें तोंड उतरलें असलें, तरी अवकाशयात्रींचें तोंड उजळलें आहे. प्रगत शास्त्र, अचाट साहस व अगणित पैसा खर्च करून कल्पनासृष्टींतील चंद्रप्रवास अमेरिकेने प्रत्यक्षांत उतरविला. पण आपणांजवळ ही कल्पनेचीहि श्रीमंती नाही. 'शेणामाजी बांधुनी वाडे नांदति शेणकिडे' अशी आहे आपली स्थिति! भल्याभल्यांजवळहि कल्पनांचें दारिद्र्य किती असतें याचा १९४९ सालचा एक किस्सा श्री. हरि विष्णु कामत भेटले असतांना त्यांनी या निमित्ताने सांगितला.

केंद्राच्या अखत्यारींतील यादींत (युनियन लिस्ट) अंतरिक्षप्रवास (इंटर-प्लॅनेटरी ट्रॅव्हल) दाखल करावा असें घटना परिषदेच्या बैठकींत त्यांनी सुचविलें. आश्चर्य म्हणजे पुढे केंद्रीय अर्थमंत्री झालेले श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांनीच श्री. कामतांना विरोध केला.

ते म्हणाले, "जर अंतरिक्षप्रवासाबद्दल आपण येथे बोलूं लागलों तर आपण स्वतःला मूर्खपणामुळे हास्यास्पद करून घेऊं !"

यावर श्री. कामत यांनी प्रतिउत्तर दिलें की, "कृष्णम्माचारी यांनी केवळ रुपये, आणे मोजीत न बसतां प्रगत शास्त्राची थोडीशी माहिती करून घेतली असती तर त्यांनी वरील विधान केलें नसतें."

परंतु कृष्णम्माचारीना तें पटलें नाही. शेवटीं अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी कामत यांना आपली सूचना मांडण्यास परवानगी दिली.

कामत यांनी आपल्या भाषणांत, जें पुराणान्तरी कथारूपाने होतें, तें आज प्रत्यक्षांत सत्यसृष्टींत अवतीर्ण झाल्याचें सांगितलें. संजयाची विद्या नभोवाणी-रूपानें आज आपल्याला प्राप्त झालीच की नाही, असें त्यांनी विचारलें.

अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यावर म्हणाले, "मला वाटलें, मेल्यावर लोक चंद्रलोकाला जातात."

त्यावर कामत म्हणाले, "गीता तसें सांगते; आणि खरे योगी प्राप्त सिद्धीच्या द्वारे आपल्या शरीरासह चंद्रावर जाऊं शकतहि असतील. परंतु योगबलाचें सोडा, प्रगत शास्त्राच्या साहाय्याने चंद्रप्रवास शक्य कोटींत येऊं पाहत आहे. म्हणून आपण आपले पूर्वग्रह सोडले पाहिजेत. शास्त्राच्या प्रगतीकडे डोळे उघडे ठेवून ती जाणली पाहिजे. मी भविष्यवेत्ता नाही. पण येत्या पंचवीस वर्षांच्या आंत हें साध्य होईल."

श्री. कामत यांची सूचना जरी त्या वेळी नाकारली गेली, तरी कामत यांनी व्यक्तविलेलें भविष्य आज खरें ठरलें आहे. नाताळच्या निमित्तानें अवकाशयात्रींनी चंद्राला एक-दोन नाही, चांगल्या दहा प्रदक्षिणा घातल्या व येत्या उन्हाळ्यांत ते त्यावर पदार्पणहि करतील. पातंजल योगसूत्रांतील एक सूत्र असें आहे की, "चंद्रे ताराव्यूहज्ञानम्" चंद्रावर संयम करून सर्व नक्षत्रमंडलाचें ज्ञान मिळतें. तें थोड्याशा कालांतरानें आता मानवाला प्राप्त होईल !

मात्र चंद्रावरील आपण पहिले मानव ठरणार आहों ही आढ्यता अंतरिक्ष-यात्रींनी बाळगूं नये. कारण या खुषींत ते तेथे पाय ठेवतील तर कदाचित् तेथे आधीच झोपडपट्ट्या निर्माण झालेल्या असतील; आणि चंद्रावरील सारे खळगे, घाणीचीं डबकीं बनलेलीं त्यांना आढळणारच नाहीत असें नाही. एखादा राजकीय पुढारी त्यांच्याकडून भाडेंहि वसूल करीत असणार ! क्वचित् एखादा उडपीहि त्यांना सामोरा येईल व "काय, इडली घेता का दोसा आणू" म्हणून विचारील.

*

सामान्य माणसाचें डोकें आकाशांत असलें, तरी पाय जमिनीवरच स्थिरावलेले असतात. आकाशांतील तारकांनी जमिनीवर उतरून पृथ्वीचें नंदनवन करावें अशीच आपली इच्छा असते. इंद्रपुरींतील या अप्सरा इंद्रप्रस्थामध्ये खरोखरच उतरल्या होत्या – गुलाबपुष्प-प्रदर्शनाच्या निमित्ताने खरें म्हणजे तो 'रोझ-शो' नव्हताच, तो होता 'फॅशन-शो!' साडयांचें, केशरचनांचें प्रदर्शन व माझ्या एका मित्राने म्हटल्याप्रमाणे फुलांपेक्षा फुलपाखरेंच तेथे अधिक होतीं.

नॅशनल रोझ सोसायटीतर्फे भरलेल्या या प्रदर्शनावर खर्च त्याच्या राष्ट्रीय बिरुदावलीला शोभेसाच केला गेला होता! दहा-बारा मांडव टाकले होते. मात्र या मांडवांत प्रदर्शनासाठी मांडलेलीं फुलें मात्र अगदी विरळ, मोजकीच आढळत होतीं. साऱ्या प्रदर्शनांत फार तर चारशे ते पांचशे गुलाबपुष्पें मांडलीं होतीं. गुलाबपुष्पेंहि मोजक्या जातीचींच होतीं. ओकलाहामा, आयफेल टॉवर, किस ऑफ फायर, ब्लूमन, जून ब्राईड, सुपर स्टार, पपा मिलँड व मायकेल मिलँड. सुप्रसिद्ध पीस फॅमिली प्रदर्शनांतून परागंदा होतीं व बिविच्ड, सिल्व्हर स्टार वगैरे नवे गुलाब केवळ नांवादाखल दिसत होते. नाही म्हणायला डॉ. पाल यांनी व पूसा इन्स्टिटयूटच्या हार्टिकल्चरल डिव्हिजनने तयार केलेले नवे संकरित गुलाब भारताची त्या क्षेत्रांतील प्रगति दर्शवीत होते. डॉ. होमी भाभा यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नांवाने डॉ. पॉल यांनी प्रदर्शिलेला नवा संकरित गुलाब भाभांच्या 'शांततेसाठी अणु' या ध्येयाचा पुनरुच्चार करतांना आढळत होता.

डॉ. पाल यांच्या बंगल्यावर जाण्याचा योग प्रदर्शनाच्या दुसऱ्याच दिवशीं आला. डॉ. पॉल यांची मितभाषी, शांत, वृद्ध मूर्ति ही कलाकार व शास्त्रज्ञ यांना एका मुशींत घालून विधात्याने निर्मिलेली आहे. ते वनस्पतिशास्त्रज्ञ तर आहेतच; पण उत्तम चित्रकार व संगीतज्ञहि आहेत. त्यांची उमललेली बाग पाहतांना सहज माझ्या मनांत आलें की, श्रीमंताच्या बंगल्यावर डझनभर माळी राबतात, खतें, पाणी सर्व कांही असतें. तरीहि बाग हसावी तशी हसत नाही. कां? कारण साधें आहे. रस्किनने म्हटल्याप्रमाणे "Flowers flourish in the garden of somone who loves them." डॉ. पॉल यांनी गुलाबांच्या बऱ्याच संकरित जाती तयार केल्या आहेत. तो त्यांचा छंदच आहे. बेले ऑफ पंजाब, कनकांगी, डॉ. होमी भाभा अशीं कांही नांवें सांगतां येतील.

पुसा इन्स्टिटयूटच्या हार्टिकल्चरल डिव्हिजनचे डॉ. विष्णुस्वरूपहि असेच फुलवेडे आहेत. पुसा इन्स्टिटयूटने दोन हजारांवर गुलाबांच्या जाति एकत्र करून वाढविल्या आहेत. विष्णुस्वरूपांनी मनमोहक रंगाच्या सोनिया, स्वाती, हिमांगिनी, सूर्योदय वगैरे नव्या संकरित देखण्या गुलाबांची देणगी गुलाबवेडयांना दिली आहे.

अहमदाबाद येथे भरलेल्या इंडियन ॲकॅडेमी ऑफ सायन्सेसच्या परिषदेंत बोलतांना प्रा. सी. व्ही. रामन् यांनी फुलांच्या रंगाची जादू नुकतीच उकलून सांगि-

तली. आजपर्यंत अँथोसायनीन्स फुलांच्या रंगाला जबाबदार मानीत. पण तें बरोबर नाही असा रामन् यांचा दावा आहे. त्यांच्या मतें – wide range of floral colours arise from presence of a set of discrete & well defined bands in the absorption spectra of flower petals. फुलांच्या पाकळ्यांतील किरण विच्छिन्न करणाऱ्या (Spectral Properties) विशिष्ट रंगद्रव्यांचें प्रा. रामन् यांनी Florachrom A व Florachrom B असें नामकरण केलें आहे. डॉ. रामन् यांच्या या शोधामुळे संकरित गुलाबपुष्पांच्या रंगांत कालांतराने खूपच क्रांति घडवितां येणारी आहे.

नवे संकरित गुलाब तयार करण्याच्या क्षेत्रांत डॉ. पाल व डॉ. विष्णुस्वरूप यांनी पुसा इन्स्टिटयूटच्या हॉर्टिकल्चरल डिव्हिजनला दाखल केलेंच आहे. पण डॉ. विष्णुस्वरूप यांची आकांक्षा आहे भारतांतील गुलाब युरोपांत नेऊन विकण्याची. त्यासाठी त्यांनी माहितीहि खूप गोळा केली आहे. आकडेवारी काढली आहे. हॉलंड ह्याच कांही फुलांच्या बाजारांत एकाधिकार धारण करीत नाही. आता इस्राएल-प्रमाणे इजिप्तनेहि त्यांत पदार्पण केलें आहे. इजिप्तच्या कापसाला खात्रीचे स्थिर भाव मिळत नाहीत म्हणून गुलाबांच्या लागवडीचा तोडगा त्यावर काढला गेला व हल्ली गुलाब व इतर पुष्पें इजिप्त युरोपच्या बाजारांत विकतें. मग आपल्यालाच हें कां जमूं नये ? हिवाळ्यांत ज्या वेळीं युरोपांत बर्फ असतें तेव्हा आपल्याकडे उत्तम गुलाबपुष्पें होतात. मग साठ सेंटिमीटर देठ देतील अशा हॅपिनेस, जॉली मॅडम, आयफेल टॉवर, पपा मिलँड वगैरे जातींची लागवड करून आपण युरोपची बाजारपेठ कां काबीज करूं नये ! विमानाने पुष्पें युरोपांतील फ्रँकफुर्ट व इतरत्र नेतां येतील. एक गुलाबपुष्प सहज दोन रुपयांना विकलें जातें. त्यामुळे एकरीं दहा हजार नफा घेतां येतो. अनेक वर्षे डॉ. विष्णुस्वरूप यांनी तोंड वाजविल्यावर आता कोठे शेतकी खात्याच्या डोक्यांत प्रकाश पडूं लागला आहे.

जगांतील सर्वांत महाग अत्तर कोणतें आणि तें कोण तयार करतें हें माहीत आहे ? गुलाबाचें अत्तर हा सर्वांत महाग सुवास आहे. हें अत्तर दहा हजार रुपयांना एक पौंड मिळतें व तें तयार करते बल्गेरिया. रोझा दमासिनाची एक दरीच्या दरी तेथे वाढविली आहे. प्रयत्नाअंतीं परमेश्वर लाभतो तो हा असा. परंतु आळशावरून गंगा गेली तरी तो कोरडाच राहणार आणि संकरित गुलाबगेंद तयार करणाऱ्या शास्त्रज्ञांकडे व आकाशांतील चंद्राला गवसणी घालणाऱ्या अवकाशयात्रींकडे आळसटलेला एकच विकल दृष्टिक्षेप टाकून तो जांभई देत म्हणणार –

क्षयी शशीस्तव करावयाते किंवा गुलकंद
वैद्य अश्विनीकुमार जमविती हे गुलाबगेंद

आपल्या या देशांत बाहेरचा ' नो हाऊ ' लागतो साधे Vibgyor आइस्क्रीम तयार करायला ! एका ब्रिटिश कंपनीच्या साहाय्याने बनविलेलें लाखो रुपयांचें

फर्निचर आमचें सरकार विकत घेतें व आपलें मंत्रालय सजवितें. रॉयल्टीच्या रूपाने, तांत्रिक ज्ञानासाठी व तंत्रज्ञांच्या वेतनापोटीं परदेशी किती पैसे जातात हें माहीत आहे ? गेल्या सहा वर्षांत केवळ रॉयल्टीसाठी दिला जाणारा पैसा १.५ कोटीवरून ८ कोटींवर गेला आहे. वरील तिन्हीसाठी १९६६–६७ सालीं तेहतीस कोटि ऐंशी लक्ष रुपये परदेशी गेले तर १९६७–६८ च्या अवघ्या सहा महिन्यांत सव्वीस कोटि सत्तर लाख रुपये यासाठी खर्ची पडले आहेत. परदेशांनी भांडवलापोटी मिळविलेला नफा, साचलेला नफा व डिव्हिडंडची रक्कम १९६७–६८ सालची ३८.४७ कोटि रुपये होती. मग सांगा, परदेशी साहाय्याने योजनाबद्ध विकासाचा आपला गाडा चढणीवर आहे का नाही ? तसा न दिसला तर खालीं डोकें, वर पाय करून पाहा ! म्हणजे उतरणीवर असला तरी तो आपल्याला चढणीवर असल्यासारखा दिसेल. मोरारजी रोज शीर्षासन करतात ते यासाठीच !

*

चालायचेंच ! ही घसरगुंडी तरी आपण कुठे कुठे थांबवणार ? आर्थिक क्षेत्रांत, राजकीय क्षेत्रांत, एवढेंच काय पण क्रीडाक्षेत्रांतहि ती चालूच नाही काय ? ऑलिम्पिकमध्ये हॉकीचें काय तें सुवर्णपदक आपल्या पदरीं पडे. पण तेंहि या वेळीं गेलें ! निदान ब्रॉंझचें हातीं आलें हें काय थोडें समाधान आहे ! तोहि योगायोगच म्हणावयाचा ! हॉकी संघाबरोबर गेलेले व्यवस्थापक कल्हा ही अजब व्यक्ति आहे असें आपल्या आकाशवाणीने या पराभवाची नुकतीच चौकशी केली तेव्हा आढळलें. या कल्हामहाशयांनी सर्वत्र शत्रु निर्माण करण्याचें कार्य केलें. व्यवस्थापक असे तर संघहि प्रांतीयवाद, असंघटित वागणूक, शारीरिक अक्षमता या दुर्गुणांनी पोखरलेला. गुरुबक्ष व बलबीर सोडले तर बाकी संघ हा केवळ पांजरपोळ होता. उलट पाकिस्तानने मेक्सिकोंतहि आपले अनेक मित्र बनविले. दोन-चारशे मेक्सिकोनियन त्यांच्या बाजूने प्रोत्साहन देतांना दिसले. एकूण केवळ क्रीडांगणावरच नव्हे, तर खिलाडूपणांत व राजकारणांतहि आपण हार खाल्ली आहे.

आता सुवर्णपदक हातून जायला हीं कारणें खरीं नव्हेत असें एकाचें म्हणणें आहे. त्याचें म्हणणें असें आहे की, "हॉकी पर अपना एकाधिकार खो कर हमने एकाधिकार समाप्त करने के शुभ कार्य में अपनी सद्‌भावना का परिचय दिया है !"

असेल, तसेंहि असेल !

कारण आम्ही समाजवादी समाजरचनेचे पाईक आहोंत ना !

ब्रह्मानंद शर्मा या कविब्रुवाचें म्हणणें आणखीच वेगळें आहे. ते म्हणतात — 'अहो, सुवर्णपदक आणणार कसें ? तो गुन्हा नाही का ?'

ऑलिम्पिक में हो गई जो भारत की हार ।
समझ न पाया आज तक उसका कोई सार ।
उसका कोई सार, हुई सोने की बन्दी ।
ब्राँझ पदक ले लिओ, नहीं जिस पर पाबन्दी ।
कहे शर्मा, सोने का मेडल कैसे लाते ।
पालम पर ही स्मगलिंग में पकडं जाते ।

**– केसरी, दि. ५ जानवारी १९६९**

# शिवसेनेच्या मर्कटलीला

- ७ -

राष्ट्रपतीचें, संसदेच्या अंदाजपत्रकी अधिवेशनाच्या उद्‌घाटनाचें भाषण ऐकण्यासाठी सेंट्रल हॉलमध्ये मीं पाऊल टाकलें नाही तोच "कां हो, मुंबईत काय चाललें आहे ?" या प्रश्नाने माझें स्वागत झालें.

मुंबईत सीमाप्रश्नाच्या नांवाने शिवसेनेने जी बेजबाबदार दंगल सुरू केली व महाराष्ट्र सरकारने चार दिवस मुंबईचें जीवन जें गुंडांच्या हाती सोपविलें त्याची चर्चा सेंट्रल हॉलच्या कानाकोपऱ्यांत, कुठे दबलेल्या आवाजांत तर कुठे रागारागाने आवाज चढवून चालली होती. दबलेला आवाज होता तो अर्थातच महाराष्ट्रीय खासदारांचा.

जो तो आपल्या माहितीप्रमाणे त्या गंभीर घटनेची शवचिकित्सा करीत होता.

राज्यसभेच्या उपाध्यक्षा श्रीमती व्हायोलेट अल्वा लोकमान्यांच्या तैलचित्राकडे बोट करून मला म्हणाल्या, "या महापुरुषाने हा देश एकसंघ व लोकतंत्रवादी बनविण्यासाठी जे कष्ट घेतले त्याची तरी निदान आठवण आपण ठेवली पाहिजे."

तेवढ्यांत माझ्याजवळ उभ्या असलेल्या एका खासदाराने रागाने माझ्यावर प्रश्नांची फैरच झाडली. ते म्हणाले, "टिळक, तुम्हांला सारा प्रकार माहिती असणार. मला हें सांगा की, कायद्याला आव्हान देणाऱ्यांशी समझोता करण्याचा नवा पायंडा महाराष्ट्र सरकारने केव्हापासून चालू केला आहे ? महाराष्ट्र सरकारचा एकहि वरिष्ठ मंत्री त्या वेळीं नेमका मुंबईत नव्हता हें कसें ? महाराष्ट्राचे मुख्य मंत्री आकाशवाणीवरील भाषणांत शिवसेनेचा उल्लेखहि करीत नाहीत याचा अर्थ काय ? आणि सर्वांवर ताण म्हणजे ठाकरे यांचें शांततेसंबंधीचें पत्रक येरवड्यांतून प्रसृत करून त्यांना महात्माजीच्या रांगेत की हो नेऊन बसविलें तुमच्या सरकारनं !"

या प्रश्नांच्या सरबत्तीला मी काय उत्तर देणार? पण तेवढ्यांत राष्ट्रपति सभागृहांत आल्याची तुतारी फुंकली गेल्याने माझी सुटका झाली.

राष्ट्रपतींनी आपलें भाषण वाचण्यास सुरुवात केली. पण माझें लक्ष त्याकडे नव्हतेंच. माझ्या मनांत एक आवर्त उठलें होतें. कायद्याला, लोकशाहीला, सभ्यतेला आव्हान देणाऱ्यांशीं हातमिळवणी करून राजकारण खेळण्यांत महाराष्ट्र काँग्रेस, प्रजा-समाजवादी व महाराष्ट्र एकीकरण समिति यांनी काय साधलें हा प्रश्न भोवऱ्यासारखा माझ्या मनांत फिरत होता. राष्ट्रपति संथ लयींत वाचीत होते – " The country also faces the danger of violence from certain extreme political groups. The doctrines propounded by these groups are clearly subversive to our constitution and deterimental to orderly government & progress ! " पण काँग्रेस सरकारचें हें धोरण राष्ट्रपति व्यक्त करीत असतां दुसऱ्या बाजूला मात्र, राज्याराज्यांतून काँग्रेस पक्ष जातीयवादाचा, हिंसावादाचा आणि पुंजीवादाचा आसरा घेत आहे, का राजनीतीचाच हा असा गुण आहे की, राजकारणांत दाखल होणाऱ्यांसंबंधी एका फ्रेंच सुभाषितांत म्हटल्या-प्रमाणे, " All men tend to become that which they oppose " हा प्रश्न माझ्या मनाला सतावत होता. महाराष्ट्रांतील काँग्रेसी शासक तरी याला अपवाद कोठून असतील ?

शिवसेनेच्या हातीं कोलीत देऊन या मंडळींनी सीमा-प्रश्नासाठी मुंबई पेट-विण्याचें कारस्थान रचलें. पण त्यांत सीमेवरील मराठी जनतेच्याच हिताची राख-रांगोळी झाली आहे व महाराष्ट्र भारतीय जनमानसांत बदनाम झाला आहे.

राज्यसभेंत श्री. सय्यद हुसेन, ए. डी. मणी, कौल वगैरेंनी शिवसेनेच्या मुंबई-तील मर्कटलीलांबाबत विचारलेल्या लक्षवेधी सूचनांना उत्तर देतांना गृहमंत्री श्री. यशवंतरावांचा चेहरा काळवंडलेलाच होता. प्रथम प्रथम आवाजहि कापत होता. पण ते कुशल वादपटु असल्याने विरोधकांच्या हल्ल्यांतील त्रुटि शोधून त्यांतून ते महाराष्ट्र सरकारची प्रतिष्ठा सांभाळून सहीसलामत निसटले. संसदेंत ही प्रतिष्ठा कशीबशी सांभाळली गेली तरी लोकमानसांत तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडालेल्या आहेत व त्याचा फायदा विरोधक कसा उठवितात हें काँग्रेस कार्यकारिणींत महाजन अहवालावर चर्चा झाली, तर वसंतराव-यशवंतरावांना अनुभवावयाला मिळेलच.

शिवसेनेचे तथाकथित सेनापति बाळ ठाकरे व महाराष्ट्र एकीकरण समितीचे पुढारी श्री. सुंठणकर, ठाकूर, सायनाक प्रभृतींची युति घडविण्यांत पौरोहित्य केलेल्या श्री. नाथ पै यांनी ठाकरे यांच्या पत्रकाची व सुटकेची केलेली भलावण हा तर संसदेच्या परिसरांत एक विनोदाचा विषय बनला आहे.

मुंबईंतील प्राणहानीने व वित्तहानीने तापलेली मन:स्थिति शांत झाल्यावर विचार करावयास हवा तो हा की, शिवसेनेला मुंबईच्या जनमानसांत जें स्थान थोडया अवधींत मिळालें, तें कां ? प्रादेशिक विकासाचें योग्य माप महाराष्ट्रांतील जनतेच्या पदरांत पडत नसेल व महाराष्ट्रीयेतर उद्योगपतींच्या संकुचितपणामुळे जर स्थानिक नोकरांना नाकारलें जात असेल तर काय केलें पाहिजे ?

कम्युनिस्टांना शह देण्यासाठी शिवसेनेचें भावनात्मक आवाहन उपयोगी पडतें म्हणून श्री. ठाकरे यांच्यासाठी पुंजीपतींनी आपल्या थैलीच्या दोऱ्या ढिल्या करणें, डाव्या पक्षांशीं मुंबईंत काँग्रेसला मुकाबला करतां येत नाही म्हणून शिवसेनेचा उपयोग करण्याची राजनीति खेळणें किंवा ठाकरे यांनीहि शिवसेनेचा विहित उद्देश सोडून सीमाप्रश्नासारख्या इतर प्रश्नांना हात घालणें, ही सारीच राजकीय खेळी मूळ उद्देशाला बगल देणारी व लोकांना फसवून राजकीय स्वार्थ साधणारी आहे. महाराष्ट्र बदनाम होतो व झाला तो अशाच सत्ताबाज राजकारणाने ! अशाने राजकारणी मंडळींचा खेळ होतो, पण मराठी जनतेचा मात्र जीव जातो.

*

संसदेच्या परिसरांत शिवसेनेच्या जोडीने मंत्रिमंडळांतील खातेंपालटाचीहि चर्चा चालू आहे. वृत्तपत्रांचे वार्ताहर तसे मोठे चाणाक्ष. पण या वेळीं त्यांच्या हिकमतीवरहि इंदिराबाईंनी मात केली. नव्या अर्थसंकल्पानंतर मंत्रिमंडळांतील वाढीचा वा खातेंपालटाचा विचार होईल असेंच सर्वांना वाटत होतें व बाईंच्या आदल्या दिवशींच्या पत्रकार-बैठकींतील उद्गारांनी तर त्याला दुजोराच मिळाला होता. पण इंदिराजींनी या वेळीं अगदी शिवनीतीचा मराठी कावा वापरून, बैलांच्या शिंगांना पोत बांधून पत्रकारांना कात्रज घाटांत पळविलें व आपण स्वत: सिंहगडला निघून गेल्या. मध्यरात्रीं जेव्हा महामंत्र्यांच्या घरून फोन आले तेव्हा जो तो डोळे चोळूं लागला. घाईघाईने कपडे चढवून पत्रकार मंडळी महामंत्र्यांच्या बंगल्यांत पोचली तों हातांत पडली मंत्रिमंडळाच्या खातेंपालटाची यादी ! पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर एकच मिळत होतें – 'यादी वाचून दाखविणें एवढेंच आमचें काम !' यादी वाचतांच नव्या मंत्र्यांची भरती करण्यांत आलेली नाही हें तर प्रथमदर्शनींच लक्षांत आलें. पण कामराजांचें काय हा प्रश्न अनुत्तरितच राहिला.

अजूनहि प्रश्नांकित मुद्रेने पत्रकार व खासदार कामराजांभोवतीं फिरत आहेत. राष्ट्रपतीच्या आगमनापूर्वी कांही मिनिटें सेंट्रल हॉलमध्ये कामराज आले. अनेकांनी त्यांचें अभिनंदन केलें, स्वागत केलें, पण प्रत्येकाच्या मुद्रेवर प्रश्न नोंदला होता, 'यांचें आता स्थान कोणतें ?' इंदिराजी व कामराज यांनी सांभाळलेल्या या गुपिताला मितभाषी कामराज आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे 'परकालम' (जरा थांबा, समजेलच) असें हसत हसत उत्तर देणार हें उघडच आहे.

नवे मंत्री तूर्त घेतले नसले तरी कांही उपमंत्र्यांची निवड होईल असें दिसतें. कारण खातेंपालटांत एकेका कॅबिनेट मंत्र्याकडे दोन-तीन खातीं एकत्र करून दिलेलीं दिसतात. या कामाचा उरक होण्यासाठी त्यांना मदतनीस घ्यावे लागणार. या भरतीकडे साहजिकच तरुण काँग्रेस खासदार नजर लावून बसले आहेत. महाराष्ट्रांतील कांही खासदारांचेहि आशावादी डोळे तिकडे लागले आहेत.

*

विद्यार्थ्यांचे दंगे, मध्यावधि निवडणुका व मुंबईतील शिवसेनेची गुंडगिरी यांमुळे पोलिसांची सर्वत्रच शांतता-प्रस्थापनेसाठी धांवपळ चालू असतांना दिल्लींतील पोलिसांच्या नशिबीं मात्र एक विनोदी काम आलें होतें. असफअल्ली रस्त्यावरून रामलीला मैदानाकडे कांही दिवसांपूर्वी मी सहज फिरावयास गेलों होतों. पहातों तों अनेक पोलिस गस्त घालीत होते. त्यांतील एकाला मी विचारलें, " निदर्शनें वगैरे कांही आहेत की काय ?"

त्यावर त्याने दिलेलें उत्तर ऐकून मी थक्कच झालों. रामलीला मैदानाभोवतींच्या कठड्यांवर धुतलेले कपडे कोणी वाळत घालूं नये म्हणून ही गस्त चालू होती !

आपल्या सुशोभित राजधानीला ठिकठिकाणीं वाळत घातलेल्या कपड्यांमुळे गालबोट लागतें. तेव्हा ही नागरिकांची सवय थांबवली पाहिजे असें एका अधिकाऱ्याच्या डोक्यांत येऊन त्याने गस्त घालण्यासाठी १०० पोलिस दर्यागंज, जामा मशीद, रामलीला मैदान, पहाडगंज भागांत धाडले आहेत.

शहादरा मोतीनगर भागांत रोज होणाऱ्या चोऱ्या थांबविण्यासाठी त्यांचा उपयोग केला गेला असता, तर तो योग्य झाला नसता का ? पण या राज्यांत कोणाच्या नशिबीं काय काम येईल कोणी सांगावें ?

या पोलिस गस्तीबाबतची कांही माहिती प्रेस इन्फर्मेशन ब्यूरोकडे मिळेल म्हणून मीं फोन केला तर तो लागेना ! टेलिफोन ऑपरेटरला विचारलें तर त्याने सांगितलें, " पी. आय्. बी.चा फोन बिल न भरल्याने तोडला आहे. " पुण्यांत ससून हॉस्पिटलचा, कलेक्टर कचेरीचा फोन तोडल्याचें पूर्वी ऐकलें होतें. दिल्लींतहि तेंच आहे. एकूण 'घरोघर मातीच्याच चुली !' कारभाराच्या गलथानपणांत साऱ्या देशाची एकात्मता साधली गेली आहे ती ही अशी.

*

सध्या दिल्लींत 'माल्टा' जातीचीं संत्रीं खूप आलीं आहेत. पाट्यांमध्ये हारीने रचलेलीं हीं गोलाकार चकचकीत केशरी फळें कोणाचेहि डोळे आकर्षून घेतात. या फळांचीं रोपें शंभर वर्षांपूर्वी (१८५३) कर्नल क्लार्क यांनी माल्टाहून आयात करून पंजाबांतील गुजरानवाला जिल्ह्यांत त्यांची लागवड केली व तेथील जमिनींत तीं

उत्तम वाढलीं. पंजाबच्या हरिसिंग नलवाच्या मुलाने – अर्जुनसिंगाने – ज्या 'बारादरी' इमारतींतून ब्रिटिशांशीं मुकाबला केला, त्या इमारतीच्या भोवतालची बाग जशी इतर खास फळझाडांसाठी प्रसिद्ध आहे, तशीच ती या माल्टा संत्र्यांसाठीहि प्रसिद्ध आहे. गुजरानवालांतून हिंदुस्थानच्या इतर भागांतहि त्यांची लागवड झाली व पानिपत येथे 'लाल रसाची' माल्टाची खास जातहि निर्माण करण्यांत आली. लवकरच माल्टा संत्रें किंवा मुसुबें यांच्या संकरापासून 'किनो' ही पाकिस्तानांत निर्मिलेली जातहि दिल्ली बाजारांत दिसल्याशिवाय रहाणार नाही.

नव्या लांब धाग्याच्या कापसाची निर्मिति लुधियानाच्या पंजाब कृषि विद्यापीठांत केली जात आहे. पंजाबांतील 'नार्मा' या जातीचा रशियन जातीशीं संकर साधून ही जात निर्माण केली आहे. गव्हाच्या उत्पादनांत 'कल्याण २२७', 'सोन रोजो' या जातींनी क्रांति घडविली तशी कपाशीच्याहि जातीने घडेल असें डॉ. रंधवा यांचें मत आहे.

देशातील 'हरित-क्रांती'ला हें पोषकच होय. पिकांच्या अधिक उत्पन्न देणाऱ्या नव्या संकरित जातींची लागवड, शेतीची आधुनिक पद्धति व शेतकऱ्यांच्या मालाला भरपूर भाव या गोष्टी ही 'हरित-क्रांति' सफल करील. पांच वर्षे तरी धान्यांच्या भावांची पातळी कायम राखली पाहिजे व देशाचा अन्नसंकल्प तयार करून त्यानुसार वागलें पाहजे. भावी पिढ्यांना सुखाचे दिवस याच क्रांतीने येतील.

भावी पिढीचा उल्लेख आला म्हणून सहज एक विनोद आठवला. एका तरुण तंत्रज्ञाला कंपनीच्या कामासाठी आपल्या गरोदर बायकोला सोडून तांतडीने परदेशांत जाण्याचा प्रसंग आला. बायको बाळंत झाल्यावर मुलगा झाला का मुलगी, हें कळण्याची त्याला साहजिकच उत्सुकता होती. पण तशी तार आली व मित्रांनी पाहिली, तर तें आपणास हसतील म्हणून त्याने बायकोला सांगितलें की, सांकेतिक शब्दांत प्रसूतीची बातमी कळव.

तो तरुण रेडिओ-इंजिनियर असल्याने बायकोने हुषारीने कळविलें – "रेडिओचा पार्ट सुखरूप पोचला."

पण तरुण तंत्रज्ञाला मुलगा झाला की मुलगी हें कळण्याची जी उत्सुकता होती ती तशीच कायम होती.

म्हणून त्याने पुन्हा त्याच सांकेतिक भाषेचा वापर करून तिला विचारलें, "ट्रान्समीटर का रिसिव्हर ?"

काळानुसार भाषा बदलत जाते असें आपण मानतों. मग यंत्रयुगामध्ये त्या काळाला साजेसाच विनोद नको का ?

– **केसरी, दि. २३ फेब्रुवारी १९६९**

# पुष्पवैभवाने सजलेली राजधानी

- १ -

पुष्पनगरी दिल्लीचा रंगविलास पाहवयाचा तर तो याच महिन्यांत. दिल्लींतील साऱ्या बागा आता रसिकांच्या स्वागतासाठी फुलल्या आहेत. रोज कुठे ना कुठे पुष्प-प्रदर्शनें भरत आहेत. आज काय दिल्ली विद्यापीठांत फोलिएज प्लँटसचें, तर उद्या झुलॉजिकल पार्कमध्ये गुलाबपुष्पांचें व पुष्परचनांचें, तर यंग विमेन्स क्लबमध्ये निवडुंगांच्या विविध जातींचें प्रदर्शन, असें चालू आहे. पाहणारे जसे तिकडे धांवतात तसे प्रदर्शन करणारेहि.

राष्ट्रपति-भवनाची ' मोगल बाग 'हि या दिवसांत दिल्लीकरांना खुली केलेली असते.

संसद भवनाकडे जातांना नॉर्थ अॅव्हेन्यूच्या दक्षिण टोकाशीं अनेक बसेस, रिक्षा, टॅक्सीज्, खाजगी मोटारी यांची गर्दी व आइस्क्रीमवाले, पाणीपुरीवाले, चणे-बटोरे-वाल्यांची झिम्मड पाहून मला वाटलें, जवळपास कुठे हनुमानजीचा उत्सव असावा. परंतु तो दिवस मंगळवारहि नव्हता. इकडे हनुमानजीचा उत्सव असतो मंगळवारीं. महाराष्ट्रासारखा न करत्याचा वार शनिवार उत्तर भारतीयांनी मारुतीसाठी मुक्रर केलेला नाही. पण मग एवढी गर्दी कशासाठी ? शेवटीं कळलें की, ' मोगल बागे '-मध्ये सहलीसाठी दिल्लीकर आले आहेत.

' मोगल बागें 'तील बोगनवेलीच्या तीनशे जाति व गुलाबांच्या असंख्य जाति विविध रंग उधळून दिल्लीकरांच्या स्वागताला सज्ज आहेतच. पण इतर फुलांच्या ताटव्यांनीहि तेथे रंगांची बहार उडविली आहे.

फुलपाखरांच्या आकाराच्या नाजूक पॅन्सीज, लाल गुलाबी फ्लॉक्सचे पुष्पगुच्छ, कॉर्नेशन्सचे व पिटूनियाचे पुष्पवेल, किती म्हणून किती जातींचीं फुलें सांगूं !

साऱ्यांच्या रंगांनी नयनांवर खरोखरीच जादूगिरी केली होती. इंद्रधनुष्यहि त्यांच्या रंगरूपापुढे फिकें पडावें.

गुलाबांतील गुच्छगुलाब आइसबर्ग, आयरिश वंडर, झांब्रा तर अंगोअंगीं बहरले आहेत. मात्र भारतीय जातींच्या गुलाबांना असावींत तेवढीं फुलें आलेलीं नाहीत. या बहुतेक जातींना भारतांतील राजकीय नेत्यांचीं नांवें दिलीं आहेत. कोणाला ठाऊक, आजच्या कोंदट राजकीय परिस्थितीचाहि त्या गुलाबांवर त्यांच्या नांवामुळे परिणाम झाला असेल. ते तरी उल्हासाने, तृप्तीने फुलणार कसें ?

'मोगल बागे'च्या सौंदर्यांत भर घालण्यासाठी यंदा मोर, करकोचे, कबुतरें इत्यादि पक्षी बागेंत सोडले आहेत. बागेंतील फुलझाडांना त्यांच्याकडून जरी थोडी नुकसानी पोचत असली, तरी शेपटीचा पंखा पसरून घुमणारीं कबुतरांचीं युगुलें, आपला सहस्रनेत्री नीलवर्णी पिसारा मोठ्या रुबाबाने पेलत हिंडणारा पक्षीराज मोर हे सारेच बागेच्या रंगविलासांत भर घालीत असून, बालकांना आनंदाने टाळ्या पिटीत नाचाबागडावयास लावतात.

पण यांतहि कांही आंबटषोकी जेव्हा ट्रांझिस्टरचें कर्णकर्कश खोकें गळ्यांत अडकवून आणि घट्ट निमूळत्या टोकाच्या पँटमध्ये अवघडलेल्या अवस्थेंत हिंडतांना आढळतात, तेव्हा तें खोकें हिसकावून घेऊन दगडावर आपटावें असें वाटतें. पण उपभोग्य किंवा त्याज्य वस्तु याबाबतचें प्रेम किंवा द्वेष शेवटीं स्वभावसिद्धच नाहीत का ?

*

रोम जळत असतांना निरो फिडल् वाजवीत होता ही आख्यायिका खरी-खोटी कोणास ठाऊक ! पण दिल्लीतील राजकीय वातावरण पाहिलें तर देशाच्या दुरवस्थेचें सोयरसुतक सत्ताधाऱ्यांनाहि नाही व विरोधकांनाहि नाही. राष्ट्रपतींचें भाषण हें सत्ताधाऱ्यांच्या आत्मसंतुष्टतेचें द्योतक ठरतें तर विरोधकांची दृष्टि विशिष्ट पक्षीय हेतूपलीकडे गेलेली दिसत नाही.

लोकसभेंतील अविश्वासाच्या ठरावाला तोंड देण्याचा प्रसंग गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाणांवर आला व त्यांतून हा 'दख्खनका चुवा' मोठ्या शिताफीने निसटला. यशवंतरावांच्या संसदीय वादपटुत्वाची ती परीक्षाच ठरली.

शिवसेनेवरील हल्ल्यांत महाराष्ट्रच अखेरीं बडविला जावयाचा होता. आपली ती पडती बाजू आहे हें लक्षांत घेऊन, एखाद्या नागराजाप्रमाणे अंग फुगवून चव्हाणांनी विरोधकांचे घाव अंगावर घेतले आणि निवडणुकांचा व संयुक्त सरकारांचा प्रश्न येतांच फणा काढून त्यांनी विरोधकांना कडकडून दंश केले.

गेल्या वीस वर्षांत कॉंग्रेसने काय केलें, असा प्रश्न विरोधकांनी विचारतांच ते उपहासाने म्हणाले, "निदान आम्ही बावीस वर्षे सत्तेवर तरी राहिलों, विरोधकांना बावीस महिनेहि सत्ता टिकवितां आली नाही."

जनसंघाचे अटलबिहारी वाजपेयी म्हणाले, "उत्तर प्रदेशांत काँग्रेसला शेवटीं अजीजीने जनतेचे 'चरण छुने पडे' (पाय धरावे लागले). त्या वाक्यावर लगेच उलटून यशवंतरावांनी चावा घेतला, "निदान काँग्रेसने जनतेचे तरी 'चरण' धरले, जनसंघाने 'चरणसिंगांचे' पाय धरले व शेवटीं चरणसिंगांनी त्याच पायांखाली जनसंघाला दाबून साफ केलें."

विरोधकांनी पश्चिम बंगालमध्ये डाव्या कम्युनिस्टांशीं केलेल्या हातमिळवणीबाबत बोलतांनाहि ते कडवटपणें म्हणाले, "मला एक भविष्य सांगूं द्या. आज ज्या विरोधकांनी डाव्या कम्युनिस्टांशीं हातमिळवणी केली आहे, त्यांना कालांतराने हें समजेल की, ते त्यांचे कैदी बनले आहेत. माझें भविष्य खोटें ठरणार नाही."

चव्हाणांनी जे पवित्रे हसत हसत घेतले, त्यांचें यश पाहून इंदिरा गांधींनाहि तीच चाल गिरवावी असा मोह झाला. पण त्यांचा तो प्रयत्न इतका केविलवाणा ठरला की, त्यामुळे काँग्रेस-श्रेष्ठांची दयनीय अवस्था आणखीच उघड झाली.

*

सध्या म. गांधी जन्मशताब्दीचें वर्ष चालू आहे. गांधीजींच्या विचारांचीं, तत्त्वज्ञानाचीं पारायणें केलीं जात आहेत. प्रत्येक मंत्रालयाने गांधी-विचारधारेची एकेक पुस्तिका प्रसवली आहे. या साऱ्यासाठी किती पैसा खर्च होत आहे याचा विचार करावयाचा नाही!

कस्तुरबा व महादेवभाई यांची समाधि असलेला 'पॅलेस' आगाखानांनी सरकारच्या स्वाधीन केला आहे व ती देणगी अर्थमंत्र्यांनी जातीने हजर राहून स्वीकारली. आगाखानांनी साठ-पासष्ट लाखांचा प्राप्तिकर बुडवून दहा लाखांचा राजवाडा सरकारच्या स्वाधीन करून मोठेपणा मिळविला आहे. पण त्याकडे लक्ष द्यावयाचें नाही!

बिर्लाहि आपल्या 'भवना'मधील जमिनीचा तुकडा गांधीजींच्या स्मारकासाठी देणार आहेत. लक्षावधि रुपयांच्या आयात-परवान्यांचा त्यांच्या कंपन्यांनी केलेला गैरवापर व त्याची चाललेली चौकशी याकडेहि लक्ष द्यावयाचें नाही!

गंगेंत स्नान केलें की सारें पाप धुऊन जातें, तशी ही गांधी जन्म-शताब्दीची गंगा वहात आहे. त्यांत स्नान करून पापनिष्कृति कोणी केली तर कां नांवें ठेवावींत?

आगाखान, बिर्ला यांना तरी नांवें कशासाठी ठेवायचीं? बिजू पटनाईक, कांतिलाल यांच्या जोडीला जगजीवनराम यांच्या मुलाचेंहि नांव आता वर्तमानपत्रांत झळकलें आहे. रॉटरडॅमच्या अल्गेमेन (Algemene) या कंपनीने नॅशनल अँड ग्रिंडले बँकेवर १००० मार्कचा चेक सुरेशकुमार यांच्या नांवें जगजीवनराम रेल्वेमंत्री असतांना दिला होता.

कशासाठी ? असतील कशाचे तरी 'टर्मिनल बेनिफिटस् !' त्याचा अर्थ ध्यानीं आला ना ! !

चौथ्या लोकसभेपुढे सार्वजनिक हिशेब-समितीचा ४१ वा अहवाल आला आहे. त्यांत अजमीर येथील जागांचा व इमारतींचा ताबा घेण्यासंबंधी चौकशी आहे. चार जणांच्या जागा १९६५ च्या भारत संरक्षण कायद्यानुसार नोटिसा बजावून रीतसर ताब्यांत घेतल्या. पण पांचवी जागा होती राजस्थानच्या एका मंत्र्याची. तेथे मात्र नेहमीची पद्धत न अवलंबितां वाटाघाटी सुरू झाल्या व त्यांत एवढा वेळ घालविला गेला की, जागेच्या भरपाईसाठी बरीच मोठी रक्कम खर्ची पडली. पैसे खर्च झाले सरकारचे, मिळाले मंत्र्यांना ! आणि त्यासाठी तर सारा घोळ घातला गेला होता.

अशाच एका प्रकरणीं नव्याने झालेल्या खातेपालटाने मोठाच गोंधळ उडवून दिल्याचें कानीं आलें. शिक्षणखात्यांतील उपमंत्र्याच्या जावयाला, त्याचा छापखाना मान्य यादींत नसतांनाहि सरकारी काम दिलें गेलें. अधिकारी छपाईचें बिल देण्याची जबाबदारी अंगावर घेईनात. तें शिक्षण मंत्रालयाकडून संमत करून घेणें घरचें काम होतें व म्हणून तें अवघड नव्हतें. पण जावयाचें नशीब फिरलें व उपमंत्र्यांचें शिक्षण-खातें जाऊन दुसरेंच खातें हातीं आलें आहे. आता आली का पंचाईत !

देशाच्या कारभाराचा गाडा चालविणारे असे; तर मग व्यापारी तर काय, नफा काढावयासच बसले आहेत. त्यांतून कांही जण तर मेल्या माणसाच्या टाळूवरील लोणी खाणारेहि निघतात.

पाहा ना, महाराष्ट्रांतूनच दहा हजार पोतीं कडधान्य पश्चिम बंगालमधील शालीमार येथे पाठविण्यांत आलें व तेथून त्याची चीनमध्ये चोरटी निर्यात झाली. आता त्याची गुप्त पोलिसखात्याकडून चौकशी चालू आहे. नाही तरी गांधीजींनी म्हटलेंच आहे – " If we have many sharks and we do not know how to combat them, we shall deserve to be eaten by them. In real democracy, people learn not from books, nor from the Govt. who are in name. Hard experience is the most efficient teacher in democracy. "

– केसरी, दि. २ मार्च १९६९

# 'इंदिरा-प्रस्थां'तील होलिकोत्सव

\- ८ -

निकसि कुंवर खेलन चले, मोहन
नन्दके लाल
रंगन-रंग हो-हो होरी ! कंचन माट भराइ
सौंधे भरी कमोरी
रतन जटित पिचकाकरन अबीर भरे
झोली रंगन-रंग हो-हो होरी !

दिल्लींतील घराघरांतून होलिकोत्सवाच्या दिवशीं, वसंत-पवनावर मस्तीने डुलत येणारे हे स्वर बहिऱ्यांच्याहि कानांत घुसतील. व्रजांगनांबरोबर श्यामसुंदर होळी खेळण्याची तयारी करीत आहे. ऋतुराज वसंताच्या आगमना-प्रीत्यर्थ हा उत्सव राजधानींत अतिउत्साहाने साजरा होतो. त्या दिवशीं दिल्लीचे रस्ते गुलाल, कुंकुम, अबिराने लालेलाल न झाले तरच नवल ! होळीचा रंग हळू-हळू फिका पडत चालला आहे असें म्हटले जात असलें तरी मला तें येथे कुठेच तसें भासलें नाही; मग कोणी तसें भलेहि म्हणोत.

अनंतकालच्या चिंता क्षणकालाच्या आनंदांत बुडवून टाकल्या जात आहेत. 'बर्थ-डे-केक' कापणाऱ्या कांही आधुनिकांत कदाचित् या सामुदायिक सांस्कृतिक सणाबाबत नाकें मुरडलीं जात असतील. पण या दिवशीं सखींच्या घोळक्यांत सापडलेल्या एखाद्या लिपस्टिक-पावडरवाल्या पुरंध्रीचेहि हाल चुकत नाहीत. गुलाल, कुंकुमाने तिची साडी लालेलाल होऊन जातेच. पण मुखावरील खोटा साजहि होलीच्या या हुडदुंगांत गळून पडतो.

होली के हुडदुंग में, हुआ हाल बेहाल
छुटी लिपस्टिक होंठ की, चमकी काली खाल

चमकी काली खाल, पाऊडर मुख का छुटा
बना चिबुक पर था, ब्युटी स्पॉट भी झूटा
कहे अकवि कविराय, लगे है दिलभी नकली
नाइलान के बाल और बत्तीसी नकली !

पण या वसंतोत्सवांत सारा अवखळपणा चालतो. कोणी छोटा नाही, मोठा नाही. महामंत्री इंदिरा गांधींपासून सामान्यांतील सामान्य इसमहि या रंग उडविण्यांत सामील होतो. खादी भांडारांतून खास होळीसाठी तयार केलेला कुडता व चोळणा विकत आणतो, घरोघर जाऊन रंग उडवीत तोंडभरून मिठाई खातो व श्रद्धेय व्यक्तींच्या चरणकमलावर अबीर वाहून शुभ कामना व्यक्त करतो. बंगल्या-बंगल्यांतील समवयस्क तरुण-तरुणी एकमेकांच्या मुखकमलांना रंग माखण्याचा आनंद उपभोगतात. मदनदेवता व वसंत यांची ही जोडी होलिकोत्सवांत मुक्त-पणें विहार करते. वसंतांत सारेंच प्रिय, सुंदर असतें. कालिदासाने ऋतुसंहारांत वसंतागमनाचें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे.

द्रुमाः सपुष्पाः सलिलं । सपद्मं स्त्रियः सकामाः पवनः सुगन्धिः ।
सुखाः प्रदोषाः दिवसश्च रम्याः । सर्वं प्रिये चारुतरं वसंते ।

दिल्लींतील हवाहि या ऋतुराजाच्या आगमनाप्रीत्यर्थ उबदार बनली आहे. पानगळ होऊन सुकोमल पल्लव वृक्षांच्या शाखांवर डुलूं लागले आहेत. लवकरच पळस, अशोक फुलतील. आम्रमंजरीचा उन्मादक सुवास आजच नाकांत घुसूं लागला आहे. निसर्गाच्या या बदलत्या सुंदर रूपाच्या पार्श्वभूमीवर पूर्वजांनी हा होलिकोत्सव केला उभा असें वाटतें. माणसांतील नैसर्गिक विकृति केव्हा केव्हा या सुंदरतेवर शेणसडा टाकते. पण तेवढ्याने व्यथित होऊन उगाच आनंदाला कां गालबोट लावा ?

गाथासप्तशतींत या धूळफेकीवर लिहितांना म्हटलें आहे, "हें कर्दम प्रसाधन, फाल्गुनी उत्सवाचें फूल आहे, त्याने इतके व्यथित होऊं नका !"

महाराष्ट्रांत हळूहळू हा होलिकोत्सव लोप पावत आहे. शहरांतून तर कांही थोड्या ठिकाणीं होळ्या पेटतात. कांही लहान पोरांच्या हाता-तोंडाची थोडा काळ गाठ पडते व लगेच दुसऱ्या दिवसापासून सारे आंबट तोंडाने नेहमीचे व्यवहार चालू करतात. होलिकोत्सवांतील विकृतीबरोबरच या वसंतोत्सवांतील आनंदहि ते हरवून बसले आहेत. येथे निदान मला तरी महाराष्ट्रांतल्यासारखें आंबट तोंड करून बसतां येणार नाही. दिल्लींत मध्यावधि निवडणुकांत विजयी होऊन, जे आमदार आले आहेत त्यांना तरी होळीनिमित्त दिलसे बधाई दिली पाहिजे.

होलीकी बधाई स्वीकार करें नेता । मध्यावधि चुनाव संग्राम के विजेता ।।
बँक बॅलन्स बढे, स्वर्ण दोल झुले । वादे आश्वासन जो किए दिए भुले ।।

भाषण के दौर हो, विदेशोंके दौरे। देश जाए भाड में आप फले फुले ।।
आया गया राम बन, रामराज्य लाए। काम है हराम नये मंत्र के प्रणेते ।।

*

या इंद्रप्रस्थांत — नव्हे, इंदिरा-प्रस्थांतील पुढारी वर व्यक्त केलेल्या शुभ-कामनांप्रमाणे वागत आहेत. होळींतील धुळवडीला कां नावें ठेवावयाची ? पैशाची धुळवड नित्य चालू आहे. सार्वजनिक हिशेब-समितीचा ३९ वा अहवाल हातीं नुकताच आला. त्यांत केंद्रीय शिक्षणखातें व घरबांधणीखातें यांची कांही 'चौकशी' निर्दशित केली आहे. हा केवळ आहे एक नमुना. पण शितावरून भाताची परीक्षा होण्याला पुरेसा आहे. त्रेचाळीस लाखांना दिल्लींतील शाळांसाठी १९६१ सालीं घेतलेली जमीन गेल्या वर्षीच्या फेब्रुवारीपर्यंत म्हणजे सात वर्षे रिकामीच पडलेली होती. कारण काय, तर म्हणे त्यावरील भाडेकरी व झोपडपट्या हलवितां आल्या नाहीत. या नुकसानींत भर म्हणजे या कालावधींत सव्वीस लाख रुपये भाडें भरलें गेलें !

या सर्वांवर निलाजरेपणाचा कळस हा की, जेव्हा समितीने त्यांना विचारलें — "दिल्लींतील तीनशे शाळांपैकी सत्तावन्न सरकारी शाळा तुम्ही तंबूंतून भरवितां याची लाज वाटत नाही का ?" तर त्यावर शिक्षणखात्याचे शहाणे अधिकारी उत्तर देते झाले की, "शाळांसाठी इमारती बांधण्यापेक्षा तंबू उभारणें कमी खर्चाचें आहे." पुण्या-मुंबईंतील वर्षानुवर्षे रिकाम्या पडलेल्या सरकारी गाळ्यांबद्दल आपण अनेक वेळा तक्रारी वाचल्या असतील. इंदिरा-प्रस्थांतहि कांही वेगळी परिस्थिति नाही. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी रामकृष्णपुरम् या वस्तींत बांधलेले चार हजार गाळे रिकामे पडलेले असून, त्यांतील एकतृतीयांशापेक्षा अधिक गाळे गेलें' वर्ष-दीड वर्ष रिकामे आहेत. कारण काय, तर घरबांधणीच्या योजना नगरपालिकेच्या पाणी व वीजपुरवठाच्या योजनेशीं जुळल्या नाहीत म्हणे ! या घरबांधणीसाठी बहात्तर लाखांपेक्षा अधिक रक्कम सरकारने खर्च केली आहे. मुळांतच ती कर्मचाऱ्यांकडून घेतलेल्या अनामत रकमेपेक्षा अधिक आहे व आता दिरंगाईने ती वाढली आहे. ती कशी वसूल होणार याची चिंता कोणाला आहे ? दिल्लीच्या आजूबाजूला अशीच छप्पन्न हजार एकर जागा सरकारने अडकवून ठेवली आहे व त्यांतील एकदशांशहि अजून वापरलेली नाही.

सरकारी कारखान्यासंबंधीचा तेहतिसावा अहवालहि असाच मनोरंजक आहे. केंद्रीय पोलाद व खाण खात्याच्या कारभाराची त्यांत छाननी आहे. नेवेली लिग्नाईट कॉर्पोरेशनच्या युरिआ ड्राइंग व बुलिंग प्लँटचें काम बिघडण्याचें मुख्य कारण म्हणजे चुकीचीं डिझाईन्स ! ही डिझाईन्स तपासण्यासाठी नेमलेल्या इंजि-नियरांना म्हणे आर्. सी. सी. च्या कामाचा कांहीच अनुभव नव्हता ! परिणामीं नुकसान किरकोळ झालें — इमारत कोसळली इतकेंच ! क्ले-वॉशिंग योजनेबाबतहि

असेंच आढळलें की, त्यासाठी किती क्ले लागेल याचा हिशेब केलाच गेला नाही. खाणीची नीट पाहणी केली गेली नाही व आता बहुतेक वेळ मालाच्या अभावी यंत्रसामग्री पडून राहत आहे.

परंतु यंत्रें निकामी राहून नुकसानी होण्याचा कांही हा एकच प्रकार नाही. खत-महामंडळाने पंधरा लाखांचीं दोन स्टँपिंग यंत्रें विकत घेतलीं. तीं गेलीं सात वर्षं धूळ खात पडून आहेत ! सरकारी पैसा, त्याला वाली कोण ? त्यांत पुन्हा राजकारण आहेच. सरकारी क्षेत्रांतील उद्योग कसे नुकसानींत आणतां येतील याचेंहि मोठें राजकारण जसें एका बाजूला खेळलें जातें तसा सरकारच्या हातचा पैसा विविध मार्गांनी मोठ्या भांडवलदारांच्याच हातीं कसा जाईल याचेंहि कारस्थान वरपर्यंत हात पोचलेल्यांकडून रचलें ज'तें.

राज्यसभेंत श्री. मोहन धारियांनी आयुर्विमा महामंडळाकडील पैशाच्या गुंतवणुकीबाबत चाललेलें कारस्थान परखडपणें चव्हाट्यावर मांडून दाखविलें. राज्यसभेंत महामंडळाने विकत घेतलेल्या व विकलेल्या भाग-भांडवलाची माहिती विचारली गेली. उत्तर मिळालें, " देशाच्या हिताच्या दृष्टीने कंपन्यांची नांवें सांगतां येत नाहीत ! " अंदरकी बात ही कीं, या गुंतवणुकींतील मोठ्या गुंतवणुका केल्या गेल्या आहेत बड्या भांडवलदारांच्या कंपन्यांतून ! त्यांचें हित तेंच मंत्र्यांचें हित आणि साहजिकच मंत्र्यांचें हित तेंच देशाचें हित. आता अशा देशहिताला विरोध कोण व कसा करणार ? तेव्हा मंत्रिमहाशय तीं नांवें चव्हाट्यावर आणण्यास कसा बरें हातभार लावतील ?

छोट्या मोटारगाड्यांचा प्रश्न राज्यसभेंत असेंच कांही गुपित सांगून गेला. बिर्लांची हिंदुस्थान मोटर्स लि. सरकारने ताब्यांत घेऊन त्यांत लहान गाड्या तयार केल्याशिवाय हा प्रश्न कदापि सुटणार नाही, असें समाजवादी सदस्य गौड मुन्हारींनी स्पष्ट सांगितलें. पण बिर्लांच्या कारभाराला हात लावला, तर काँग्रेसचा कारभार चालणार कसा ? गेल्या पांच वर्षांत बिर्ला उद्योग-समूहाने काँग्रेस पक्षाला एकेचाळीस लक्ष रुपये दिले. याशिवाय निरनिराळ्या व्यक्तीना एक लक्ष दोन हजार रुपये दिले गेले ते वेगळेच ! गेल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी काँग्रेसला बिर्लांच्या उद्योग-समूहाकडून एकवीस लक्ष सत्तावीस हजार पाचशेएकाहत्तर रुपये मिळाले व १९६७–६८ मध्ये तेरा लक्ष चौसष्ट हजार सहाशेएकावन्न रुपये मिळाले. याहून आणखी बोलके आकडे ते काय हवेत !

*

प्रत्येक गोष्टीला कांही तरी कार्यकारणभाव असतो. पण तसेंच कांही नेहमी असतें असेंहि नाही. आता हेंच पाहा ना ! दिल्लींतील हार्डिंग लायब्ररीचें लाला हरदयाळ पुस्तकालय असें नामकरण करण्याचें दिल्ली नगरपालिकेच्या प्रबंध समितीने

ठरविलें असल्याचें सचिव श्री. सेठ यांनी सांगितलें. लाला हरदयाळ हे भारताचे एक सुपुत्र होते. स्वातंत्र्य-संग्रामांत या क्रांतिवीराने आपला देह भारतमातेच्या चरणावर अर्पिला. त्यांच्या स्मृतीला साजेसें स्मारक दिल्लींत उभारणें अगत्याचें आहे. पण लॉर्ड हार्डिंगच्या नांवाशीं कोणतें नांव निगडित असेल, तर तें रासबिहारी बसू यांचें ! स्वातंत्र्य-इतिहासाच्या अभ्यासकांना हें माहीत आहे की, लॉर्ड हार्डिंगवर बाँब टाकला रासबिहारींनी व पोलिसांच्या हातावर तुरी देऊन ते जपानमध्ये निसटले. जपानांत आझाद हिंद फौजेची स्थापना करून सुभाषचंद्रांच्या हातीं ती देण्याचें महत्कार्य त्यांनीच केलें. लॉर्ड हार्डिंग या बाँबफेकींत बचावले. त्याप्रीत्यर्थ दिल्लींतील अंग्रेजभक्तांनी हें ग्रंथालय उभें केलें. त्यांच्या नामाभिधानांत बदल करावयाचा असेल, तर त्याचें रासबिहारी बसू पुस्तकालय असें नामांतर करणेंच उचित नव्हे काय ? व तशीच बहुसंख्य दिल्लीकरांची मागणीहि आहे.

*

सांस्कृतिक अराजक, राजकीय अराजक, आर्थिक अराजक यांच्या जोडीला दिल्लींत आढळणारें भाषिक अराजकाचेहि कांही नमुने होळीच्या निमित्ताने सांगण्याचा मोह मी टाळू शकत नाही. ऐका ही आकाशवाणीच ठणाणत आहे. "मध्यप्रदेश की लोक'भैसे' आप अभी . ." आं ! लोकभैसे हें काय उच्चारण आहे बुवा ! हं ! हं ! समजलें, त्यांना 'लोकभाषाएं' म्हणावयाचें आहे. येथील एका सरकारी वसाहतींत गांधी सप्ताहानिमित्त मंडळाच्या कार्यवाहाने परिपत्रक लावलें – "सब लोग फलाने फलाने दिन 'शरमदान' करेंगे" तें तर केव्हाच केलें गेलें आहे. जनाची नाही तर पण मनाचीहि 'शरम' राहिली नाही। शब्द तर हे असे 'फिसल' जाते है. पण उर्दू लिपीचा परिणामहि कांही थोडा भोवत नाही.

याबाबत न्यायालयांत खटले गेले आहेत. वीराचा बीर होऊन त्याचा शेवटीं पीर झाला. कारण ब व प च्या मोडींत उर्दूत फार थोडें अंतर आहे. कै. चंद्रबली पान्डे यांनी असे उर्दूचे अनेक 'कार्रनामे' नोंदवून एक पुस्तिकाच प्रसिद्ध केली आहे. हिंदीच्या या अवस्थेसारखीच इंग्रजीचीहि अवस्था झाली आहे. एका चर्च-मधील पाद्र्याने तेथील कारकुनाला भाषणाची ( सर्मन ) नोटिस लावण्यास सांगितलें. विषय होता "Are Ministers Cracking Up ?"

कारकूनमहाशयांना अर्थबोध झाला नाही. त्यांनी सुधारणा करून नोटिस लावली – "Our Ministers Cracking Up"

मराठीचीहि गत हळूहळू हीच होत आहे. मीं असें ऐकलें आहे की, महा-राष्ट्रांतील शिक्षणमंत्री एका सभेंत भाषणासाठी गेले असतां एक वृद्ध शिक्षक रागा-रागाने व्यासपीठावर चढले. शिक्षणमंत्री अचंब्याने पाहत असतां, हात जोडून ते शिक्षक म्हणाले, "महाशय, कै. बाळासाहेब खेरांनी पांचव्या इयत्तेंतील इंग्रजी

आठवींत नेऊन एका पिढीचें नुकसान केलें. आता आपण तिसऱ्या इयत्तेंतील मराठी व्याकरण पांचवींत नेऊन मातृभाषेचा बट्ट्याबोळ चालविला आहांत. पोरांना कांही येत नाही. समजत नाही. "

व्यासपीठाच्या समोर नेहमीप्रमाणे गर्दी करून पांच-पंचवीस मुलें बसलेलीं होतीं. त्यांतील एकाला उभे करून गुरुजींनी प्रश्न केला, "बाळ ! सांग पाहूं, तो वाघ हें लिंग कोणतें ?"

मुलगा म्हणाला, "पुल्लिंग !"

"छान ! ती गाडी, लिंग कोणतें ?"

"स्त्रीलिंग !"

"छान ! हुषार आहेस ! बाळ, आता सांग. ते बाबा, लिंग कोणते ?"

मुलगा म्हणाला, "नपुंसकलिंग !"

लोकांना हसावयासहि वेळ न देतां गुरुजी मंत्रिमहाशयांकडे वळून म्हणाले, "तरी बरें, मी त्याला ते मंत्री...असा प्रश्न विचारला नाही !"

मंत्रिमहाशयांचें तोंड कसें झालें असेल हें कल्पनेनेच जाणावें !

— केसरी, दि. ९ मार्च १९६९

# बिर्लांच्या साम्राज्याला कॉंग्रेसचा आधार

- १० -

श्रीकृष्णाने कुरुक्षेत्रीं सांगितलेल्या गीतेची दिल्लीश्वरांना सतत विस्मृतिच होत आली आहे. अनेक राजे आणि राजवंश इथे नांदले व मातींत मिळाले. अनेक कला व वैभवें येथे पोसलीं; पण कोणाचाहि कायमचा ठसा दिल्लीवर उमटलेला नाही.

सध्याच्या लोकशाही प्रयोगांत दिल्ली लोकाभिमुख बनली. जुन्या वास्तूंच्या जोडीला नव्या वास्तु आल्या. पण जुन्या सम्राटांना "ही सारी परमेश्वराची लीला आहे. त्यानेच अनंतरूपाने हें विश्व विस्तारिलें व व्यापिलें आहे" हें कळलें नाही. तसेंच लोकशाहींतील नव्या सत्ताधाऱ्यांनाहि कळलेलें नाही की नव्या उद्योग-सम्राटांनाहि समजलेलें नाही. माझा शिक्का सर्वत्र कायम चालावा ही प्रत्येकाची अभिलाषा ! 'आढ्योऽभिजनवान कोऽन्योस्ति सदृशो मया' ही वृत्ति ! या वृत्ती-पोटीं दंभार्थ, ऐश्वर्यप्रदर्शनार्थ केलेलीं दानेंच आजहि आढळतात.

दिल्लींतील नव्या वास्तु अनेकजण पाहण्यास धांवतात. उदाहरण म्हणून बिर्ला-मंदिरच घ्या ! मंदिर आहे लक्ष्मीनारायणाचें, पण ओळखलें जातें बिर्ला-मंदिर म्हणून ! देवाचे मंदिर मानवाच्या नांवाने ओळखलें जावें हें आश्चर्य नव्हे काय ? बिर्लांच्या दानशूरत्वाचें ऋण अज्ञानाने सामान्यजन ओठीं धारण करतात. मग बिर्लांचे हें दानशूरत्व ज्या बिर्ला साम्राज्याच्या तिजोरींतून व्यक्त झालें ती तिजोरी कशाने व कशी भरली जाते हें कोण पाहतो व समजणार तरी कसें ? पण चंद्रशेखर नांवाच्या एका किरकोळ शरीरयष्टीच्या, पण भेदक नेत्राच्या तरुण दाढीधारी खासदाराने बिर्लांच्या या साम्राज्याला सुरुंग लावला व त्यांची प्रतिष्ठा, त्यांचें दानशूरत्व जगासमोर सत्य स्वरूपांत उघडें केलें.

बिर्लांच्या साम्राज्याची न्यायालयीन चौकशी करावी याची मागणी करतांना खासदार चंद्रशेखर यांनी ८८ आरोप पुढे मांडले. सरकारने त्यांची छाननी केली व न्यायालयीन चौकशीला नकार दिला. कां ? तर आरोप सिद्ध होण्याइतका पुरावा उपलब्ध केला गेला नाही म्हणे ! एक इसम बिर्ला साम्राज्याविरुद्ध एकाकी उभा राहिला तर कितीसा पुरा पडणार व किती पुरावे उपलब्ध करूं शकणार, याचा विचार सरकारने केला नाही. सरकारला तो करावयाचा नव्हताच. कारण बिर्लांच्या साम्राज्याला आधार देण्यासाठीच काँग्रेसचें साम्राज्य उभें आहे.

चंद्रशेखर यांनी खरोखरीच कौतुकास्पद धाडस केलें. त्यांनी राज्यसभेंत बिर्ला साम्राज्यांतील एका सुरक्षा-अधिकाऱ्याने बिर्लांना पाठविलेल्या पत्रांतील मजकूरच वाचून दाखविला. बिर्ला साम्राज्याला हादरा देणाऱ्यांपैकी कांहींना नामशेष करणेंहि प्राप्त ठरेल अशी सरळ धमकीची वृत्ति त्या पत्रांत प्रदर्शित झाली आहे. स्वतःच्या जिवाला, राजकीय स्थानाला धोका असतांनाहि चंद्रशेखर बिर्लांना नैसर्गिक अवस्थेंत उघड करण्याचें धाडस दाखवीत आहेत; तर सरकार आपल्या अंगावरचा फाटका कपडा त्यांच्या अंगावर घालून त्यांची अब्रू झाकूं पाहत आहे. हें पाहून एका गोष्टीची आठवण होते –

एकदा एक वेडा नागडा-उघडा रस्त्याने पळत होता. त्याला लंगोटी घातलेला त्याचा दुसरा मित्र भेटला. वाटेंत तो त्याला म्हणतो, " अरे, वेडा की काय तूं ! अंगावर कांही न घालतांच रस्त्याने हिंडतोस ! निदान आता ही तरी घाल. " असें म्हणून त्याने स्वतःची लंगोटी काढून त्याच्यासमोर धरली.

काँग्रेस सरकार आणि बिर्ला यांच्यांतील व्यवहार हा असाच नाही काय ?

*

डालमियांच्या व्यवहाराची चौकशी विवियन बोस यांची समिति नेमून केली गेली. मुंदडांची चौकशी छागला समिति नेमून केली गेली. मग बिर्लांच्याच पुढे घोडें कां पेंड खात आहे ? बिर्लांच्या विविध कंपन्यांवर जे आरोप केले गेले आहेत, त्यांत कंपनी कायद्याचा भंग केला, अबकारी कर चुकविला, सरकारी अधिकाऱ्यांना लाच दिली, परदेशी चलनाच्या नियमांचा भंग केला, आयात-परवान्यांचा गैरवापर केला, कंपनींतील मोठ्या हुद्द्यांवरील अधिकाऱ्यांच्या बायकांना व नातेवाइकांना ते कांहीहि काम करीत नसतांना मोठे पगार दिले, खोटीं शेअर-सर्टिफिकेटस् तयार केलीं गेलीं इत्यादि आरोप आहेत.

गुप्तचर माहिती विभागाने यांतील ज्या आरोपांची चौकशी करण्याचें काम सुरू केलें त्याला मदत करण्याचें सहा अॅडव्होकेट जनरल्स यांनी नाकारलें. बिर्लांनी चुकविलेल्या करांच्या चौकशीसाठी ज्या अधिकाऱ्यांना नेमलें त्यांनी बारा कोटि साठ लाख रुपयांच्या चुकविलेल्या कराची भरपाई छत्तीस लाख रुपयांवर समजुतीने

तोडली. चंद्रशेखरांच्या या आरोपाची सरकारने दुरुस्ती केली ती इतकीच की, छत्तीस लाखांना नव्हे, तर छप्पन्न लाखांना प्रकरण मिटविलें. या अधिकाऱ्याला सेवानिवृत्ती-नंतर आता बिर्लांच्या एका फर्ममध्ये मोठा पगार मिळत आहे. बिर्लांनी मुळी सरकारच्या आयात-निर्यात खात्यांतील, उद्योग खात्यांतील, अर्थखात्यांतील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर आपल्या नोकरींतच ठेवून घेतलें आहे. मग त्यांचे हात शासनाच्या मूलकंदांत न पोचले तरच नवल !

काँग्रेस सरकारच्या समाजवादी धोरणांतील हा भांडवलदारी किस्सा जसा सामान्य जनतेला घोटाळ्यांत पाडतो, तसेंच सरकारच्या परराष्ट्रीय धोरणांतील विरोधाभासहि एक कोडें ठरूं पाहत आहे. आपलें परराष्ट्रीय धोरण आहे अलिप्ततेचें, सर्वांशीं समान हितसंबंध राखण्याचें. रशिया व अमेरिका, ब्रिटन व आफ्रिकी राष्ट्रें, द. कोरिआ व उ. कोरिआ, द. व्हिएटनाम व उ. व्हिएटनाम, पूर्व जर्मनी व प. जर्मनी, अरब राष्ट्रें व इस्रायल या सर्वांशीं आपली वागणूक समान असावयास हवी. पण पश्चिम जर्मनीला राजनैतिक मान्यता दिली गेली, तर पूर्व जर्मनीला टाळली जाते. नासरचा पापड मोडेल म्हणून इस्रायलला दूर ठेवलें जातें. इस्रायल आपल्याशीं व्यापार करण्यास उत्सुक आहे. तेल अव्हिव्हची आशिया ट्रेडिंग कं. १८.७५ कोटींचा धंदा भारताशीं करूं इच्छिते. ती संशोधनकार्यासाठी माकडें (Research Monkeys) आपल्याकडून घ्यावयास तयार आहे व त्या बदल्यांत आपणास रॉक फॉस्फेट इतरांपेक्षा दहा टक्क्यांनी स्वस्त देऊ इच्छित आहे. पण आमच्या एस्. टी. सी. चा हात सारखा आखडता आहे. इतका की, गेल्या जूनमध्ये तेल अव्हिव्हला भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनांतून शेवटच्या घटकेला आपल्या सरकारने अंग काढून घेतलें.

सरकारच्या या धोरणाचे परिणाम भारतांत इस्रायली नागरिकांना मिळणाऱ्या वागणुकींतहि दिसतात. इस्रायलचे कांही काळ कार्यकारी महामंत्री असलेल्या यिगल ॲलन यांना पूर्वी तुसडेपणाचा अनुभव आला होताच. पण नुकताच अब्दुल कारेम हा इस्रायलमधील एक शिक्षणाधिकारी अलिगढ येथील पश्चिम आशियाई शिक्षण-केंद्राला भेट देण्यासाठी गेला असतां, तेथील मुस्लिम विद्यार्थ्यांनी त्याला मुळी मारझोडच केली ! कां ? तर मुसलमान असूनहि इस्रायलचा तो पाठपुरावा करतो ! अब्दुल कारेम दिल्लींत आला असतांना पत्रकारांजवळ बोलतांना म्हणाला, " हें खरें की, मी अरब आहें. पण प्रथम मी माझ्या देशाचा – इस्रायलचा नागरिक आहे. "

अब्दुल कारेमला जामा मशिदींतहि कांही बरी वागणूक मिळाली नाही, असें कळतें. या निमित्ताने परराष्ट्रीय नीतिव्यतिरिक्त एक वेगळाच प्रश्न डोळ्यापुढे उभा राहतो. भारत निधर्मी राष्ट्र आहे. सर्व जाति येथे कायद्याने नागरिकत्वाचे समान अधिकार व हक्क उपभोगतात. ते अब्दुल कारेमप्रमाणे असें मानतात का, की मी प्रथम भारताचा नागरिक आहें, त्याच्याशी एकनिष्ठ राहणे हें माझें कर्तव्य आहे

पण तसें असतें तर इस्रायलमधील अरब इस्रायलच्या बाजूने व अरब राष्ट्रांविरुद्ध उभा राहतो यांत त्यांना वावगें दिसलें नसतें.

*

भारतांतील लोकशाहीला व देशाच्या एकतेला या अशा अनेक जळवा लागल्या आहेत. ख्रिश्चन मिशनरी ही त्यांतीलच एक जळू ! लोकसभेंत श्री. बाबूराव पटेल व राज्यसभेंत श्री. आबासाहेब कुलकर्णी यांनी एक साधा प्रश्न विचारला होता – "३१ मार्च १९६८ पर्यंत वेगवेगळ्या राज्यांत किती धर्मांतरें ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केलीं हें गृहमंत्री सांगूं शकतील काय ?"

तें कोठून सांगणार ?

गृहखात्याचे उपमंत्री श्री. विद्याचरण शुक्ल यांनी साहजिकच उत्तर दिलें की धर्मांतर-नोंदणीचा कायदा गेल्या २० ऑक्टोबरपासून मध्यप्रदेशांत काय तो अमलांत आला आहे. त्यामुळे नक्की माहिती देणें शक्य नाही.

तसाच कायदा ओरिसांतहि संमत झाल्याचें गृहखात्याच्या उपमंत्र्यांच्या गावींहि नव्हतें.

आणखी त्या अज्ञानांत भर म्हणजे हे दोन्ही कायदे धर्मांतर-नोंदणीचे नसून धर्मांतर दडपणाने, भूलथापांनी वा लालूच दाखवून केलें गेल्यास तो गुन्हा ठरविण्या-संबंधीचें आहे.

शुक्ल यांनी घटनेंतील २५ (१) कलमाची ग्वाही देऊन भारतांतील कोणाहि नागरिकाचा धार्मिक प्रचार करणें हा हक्क असल्याचें सांगितलें.

परंतु त्या हक्काचा गैरफायदा ६४२० परदेशी ख्रिश्चन मिशनऱ्यांना घेतां येईल काय ?

पंधराशे वर्षांपूर्वी या देशांत एकहि ख्रिश्चन नव्हता. १२९१ मध्ये शंभर हिंदु बाटविले गेले. त्यांचे आता एक कोटि पंचवीस लक्ष ख्रिश्चन झाले असून झारखंडाची व नागा प्रदेशाची सार्वभौम सत्ता मागण्यापर्यंत त्यांची पाळी गेली आहे.

या ६४२० परकीय ख्रिश्चन मिशनऱ्यांशिवाय भारतांतील ख्रिस्ती आणि बाटगा मुसलमान या मागणीची जोराची बांग देतो हेंहि अनुभवाला येत आहे.

राज्यसभेंतील प्रश्नोत्तरें संपलीं नाहीत तोंच एक ख्रिश्चन खासदार महिला तावातावाने लॉबींत आल्या व शुक्लांशीं भांडू लागल्या, "तुम्ही काय समजलांत, आम्ही सारा भारत ख्रिश्चन करूं? आम्हांला कोण अडवणार? घटनेप्रमाणे आमचा तो हक्क आहे."

अहो, हक्क धर्मप्रचाराचा आहे; जबरीने, लालुचीने धर्मांतरें घडविण्याचा नाही. भारतांतील दुष्काळाने, उपासमारीने पीडलेल्या गरिबांना, वन्यजमातींना

लालूच दाखविण्यांत येते. पैसे वांटले जातात. त्यांच्या आर्थिक दारिद्र्याचा फायदा धर्मांतरासाठी उठविला जातो.

एकट्या १९६७ सालांत बाहेरून सहासष्ट कोटि तीस लाखांची मदत ख्रिश्चन मिशन्सना आली व त्यांतील चौपन्न कोटि पंचेचाळीस लक्ष अमेरिकेंतून आले.

यावरून कल्पना येईल की, धर्मांतरामध्ये परदेशांचा किती खोलवर हात घुसला आहे. त्याचे परिणाम नागाप्रदेशांत पहावयास मिळतच आहेत.

मिशनऱ्यांचें नांव निघालें म्हणून पाचलेगावकरमहाराज एक गोष्ट सांगत, ती सहज आठवली. ते शुद्धिकार्यासाठी हिंडत तेव्हा अनेक लुंग्यासुंग्या मिशनऱ्यांच्या गाठी पडत. भोळ्याभावट्या गिरीजन, हरिजनांना गोळा करून ते आपल्या मिशनरी मराठींत सांगत, " ईश्वराचा खरा पुत्र व प्रेषित येशूच होय. उद्धरून तेच जावेत जे ख्रिस्ताला भजतात. कारण की तेच पावतात व क्षमा त्यांच्याच पापांची होते की जे येशूला मानतात. हेंच पहा ! हिंदूंचे अनेक देव ! सारे दगडाचे ! उचलून नदींत टाका, पहा बुडतात ! आमचा क्रॉस टाका, तरतो. मग माझ्या लेकरांनो, सांगा, जो स्वत: बुडतो तो इतरांना कसा तारणार ? "

मिशनरीसाहेबांनी गळ्यांतील क्रूसाचें चुंबन घेऊन विजयी मुद्रने आ वासून उभ्या राहिलेल्या पोराबाळांकडे पाहिलें. आपण जिंकली या आनंदांत ते होते. पण पाचलेगावकर सभेंत असल्याने त्यांच्या आनंदावर विरजण पडलें. मिशनरीसाहेबांची नक्कल करून पाचलेगावकर म्हणाले, " लेकरांनो, हिंदूचे देव दगडाचे ! साहेबाचा देव लाकडाचा ! एक बाटलीभर रॉकेल दोघांवर ओता पाहूं व द्या काडी लावून ! कोण जळतो ? मग जो स्वत: जळतो तो दुसऱ्याम कसा वाचवणार ? "

पाचलेगावकरांचें बोलणें संपण्याच्या आंतच साहेबाने आपल्या शुभवर्तमानाचा इतरत्र प्रसार करण्यासाठी पलायन केलें होतें.

– केसरी, १६ मार्च १९६९

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ...५८६७... वि: ...
...५२८... नों. दि. 31-3-02
9(3५4

# शिमगा दोनदा आला

- ११ -

दिल्लींत या वर्षी ईद आणि होळी या दोन्ही सुटयांचा गोंधळ झाला. प्रथम एक दिनांक जाहीर केला; मग दुसरा केला. सौर, विक्रम, शालिवाहन, ख्रिस्ताब्द व फसली या साऱ्यांचा मेळ कांही बसत नाही व सणांची चुकामूक होते.

हें कांही आपल्याकडेच होतें असें नाही. पाश्चात्त्य देशांतहि हेंच चालू आहे. अमेरिकेत जॉर्ज वॉशिंग्टनचा २६७ वा जन्मदिन यंदा चार वेळा साजरा झाला. एकदा अमेरिकेंतील कायदेशीर जाहीर सुट्टीप्रमाणे साजरा झाला, तर मॅसॅच्युसेटस्‌च्या नागरिकांनी तो चार दिवसांनी नंतर साजरा केला. त्यानंतर लिंकनच्या १६० व्या जन्मदिनानंतर नऊ दिवसांनी तो साजरा झाला व चौथ्यांदा जुन्या ज्युलिअन कॅलेंडरप्रमाणे १७३२ त वॉशिंग्टनचा जन्म झाला त्यानंतर अकरा दिवसांनी.

ज्युलियस सीझरचें कालादर्श हें दरवर्षी साडेअकरा मिनिटांनी मागे पडे. अठराव्या शतकाच्या मध्यांत तें अकरा दिवसांनी मागे पडलें. ते अकरा दिवस धरून ब्रिटनने व त्याच्या वसाहतींनी ग्रेगेरियन कालादर्श मान्य केलें व तें आजहि प्रचारांत आहे.

रशियन रसायनशास्त्रज्ञ मेंडचेल्येव यांच्या मूलतत्त्वाच्या आवर्तन – सरणीच्या शोधाची यंदा शताब्दी चालू आहे. त्याची अशीच एक गमतीची आठवण सांगितली जाते. तो एकदा सेंट पीटर्सबर्गहून पॅरिसला जाण्यास निघाला व बर्लिनला गाडी बदलतांना चुकून उलटया दिशेला जाणाऱ्या गाडींत बसला ! हें चुकलें कसें याचें उत्तर मेंडल्येवला तो पुन्हा सेंट पीटर्सबर्गला गेला तेव्हा मिळालें. रशियांत त्या काळांत चालत होतें ज्युलियन कालादर्श व त्यानुसार मेंडचेल्येव सेंट पीटर्सबर्गहून

निघाला ती तारीख होती तेरा ! अशुभ ! आधी हें लक्षांत येतें तर मेंडचेल्येव त्या दिवशीं निघालाच नसता ! पश्चिम युरोपांत त्या काळांत चाले ग्रेगेरियन कालादर्श ! त्यानुसार त्या दिवशीं वेगळाच दिनांक असल्याने मेंडचेल्येव प्रवासाला निघाला व गाडी चुकली !

एकूण काय, सावळागोंधळ झाला !

त्यासंबंधीचें नूतन सन्मित्र मेळचांतलें एक पद मला आठवलें.त्यांत म्हटलें होतें—

**अहा सावळागोंधळ झाला । पंचांगवाद निघाला ।। ध्रु० ।।**
**गणेशोत्सव दोन । दुसरे दोन जाण । सारे तसे सण ।**
**शिमगा दोनदा कपाळी आला ।। १ ।।**
**जुनं तेवढं सोनं । म्हणुनि वृद्धजन । त्याचा अभिमान ।**
**अहो तरुण पिढीला सुटला ।। २ ।।**
**नवं तेवढं हवं । जुनं टाकुन द्यावं । असा खोटा भाव ।**
**कुठं कांही नेत्यांचा झाला ।। ३ ।।**

जोपर्यंत स्वार्थाने व रूढिप्रियतेने कोणताहि समाज पीडलेला आहे तोपर्यंत सूक्ष्म गणिताने दिसणारें शास्त्रीय सत्य व दृक्प्रत्यय कोण पाहणार ?

*

अर्थकारण व राजकारण यांतील सावळागोंधळ अद्याप दिल्लींत चालू आहे. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा दोन्ही सभागृहांत पुरी झाली आहे. मोरारजी-भाईंनी आपल्या अर्थसंकल्पांत शेती-संपत्तीवर कर बसविण्याची व खतें आणि पंप यांवर कर-आकारणी करण्याची जी घोषणा केली, ती काँग्रेस-वर्तुळांत अस्वस्थता निर्माण करण्यास कारणीभूत झाली. मोरारजीभाईंचें हें धाष्टर्य मंत्रिमंडळांतील अनेक श्रेष्ठांनाहि पसंत पडलेले नाही. जेव्हा मोरारजीभाईंनी अर्थसंकल्प मांडण्यासाठी लोकसभेंत प्रवेश केला तेव्हा बव्हंशीं वरिष्ठ मंत्री जागेवर उपस्थित नव्हते. जग-जीवनबावू सभागृहाकडे लगबगीने येत असतां एकाने उशिराचें कारण सहज विचारलें, तेव्हा ते म्हणाले, " आमचें वेळेकडे दुर्लक्ष झालें. " हेंच जरा रांगडचा भाषेंत महा-मंत्र्यांना भेटावयास काँग्रेसी खासदारांचें जें शिष्टमंडळ गेलें होतें त्याने इंदिराबाईंना ऐकविलें, " काँग्रेसचा पाठिंबा औद्योगिक व इतर क्षेत्रांतून नाहीसा झाला आहेच, राहिला होता तो शेतकरीवर्गांत ! आता १९७२ मध्ये तेथेहि कोणी पाऊल टाकूं देणार नाही. अशी परिस्थिती निर्माण करूं नका म्हणजे झालें. "

मोरारजींनी शेती-संपत्तीवर कर लादण्याचें धाडस करून गाईवरच सुरी चालविली असल्याने देशांतील बैलजोडीचें राज्य धोक्यांत येण्याची भीति अनेक काँग्रेस-नेत्यांना वाटणें स्वाभाविक आहे. महाराष्ट्रांतील कालव्यांच्या काठच्या बागाईतदारांना काय वाटतें कोणास ठाऊक ?

पण कोणाहि अर्थमंत्र्यापुढे विकासासाठी व वाढत्या संरक्षणखर्चासाठी नवें साधनसंपत्तीचे मार्ग शोधण्याचें संकट सतत वाढून ठेवलेलें आहे. देशाचें राष्ट्रीय उत्पन्न आहे एकोणतीस हजार कोटि रुपयांचें. त्यांतील शेती-उत्पन्न आहे सरासरी चौदा हजार पांचशे कोटि रुपयांचें ! यावर शेती-उत्पन्नावरील प्राप्तिकर व जमीनमहसूल मिळून १२० कोटि रुपयांचा कर वसूल होतो. याउलट शेतीव्यतिरिक्तच्या उत्पन्नावर ६८८ कोटि रुपये कर वसूल होतो. ही तफावत किती काळ चालू ठेवतां येईल ?

एका कारखानदाराने तर सरळच विचारलें की, देशाच्या विकासाची जबाबदारी वीस टक्के असलेल्यांनी सोसावयाची व त्याचे फायदे ऐंशी टक्के लोकांनी मात्र कांहीहि साहाय्य न करतां किती काळ घ्यावयाचें ? अर्थात् शेतीवरील नफ्याप्रमाणे इतर नफ्यांवरहि मर्यादा घालण्यास त्यांचा विरोध नसावा असें वाटतें.

त्या दिवशीं एका अर्थशास्त्रज्ञाने एक गंभीर समस्या पुढे मांडली. त्याचें म्हणणें असें की, विकास-योजनेचा गाडा पुढे चालला नाही, तर देशांत थोड्याच काळांत सुशिक्षितांची शहरी-बेकारी निर्माण होईल व शेवटीं ती क्रांतीकडे वाटचाल करील. विकास-योजना यशस्वी व्हावयाची, तर शेतीच्या क्षेत्राकडे नव्या साधनसंपत्तीसाठी वळणें भाग आहे.

गेलीं दोन वर्षें देशांत उत्तम पीक झालें आहे व पैशाचा ओघ शेतकऱ्यांकडे वळला आहे. त्यांतील मोठे शेतकरी ६५ टक्के जमिनीचे मालक आहेत व त्यांची एकूण संपत्ति सहा हजार कोटि रुपयांच्या आसपास अंदाजितां येईल. मग देशाच्या आर्थिक प्रगतीकडे लक्ष देऊन हें गोदोहन करावयास नको काय ? ही गोहत्या नव्हे—गोदोहन आहे. हें खरें की, केवळ खोंडांनाच दूध मिळणार नाही व तेच केवळ पोसले जाणार नाहीत.

सर्व राज्य-सरकारांनी शेतीवर प्राप्तिकर बसवून आपल्या राज्याची साधन-संपत्ति वाढविण्याचा मार्ग अनुसरला असता, तर केंद्रीय अर्थमंत्र्यांना पुढे सरकण्याची गरज पडली नसती. पण वाईटपणा घेण्याचें धाडस जेथे महामंत्र्यांना नाही तेथे बिचारीं राज्य-सरकारें कोठून दाखविणार ? इंदिराजींना भेटावयास गेलेल्या काँग्रेस खासदारांच्या शिष्टमंडळाला गुळमुळीत उत्तरें देऊन त्यांनी हळूच मोरारजीं-कडे अंगुलिनिर्देश केला व त्या म्हणाल्या, "आपल्या अडचणी उपमहामंत्री सहानु-भूतीने सोडवतील !"

इंदिराबाईचा हा चाणाक्षपणा अनेक बाबतींत हल्ली उठून दिसूं लागला आहे. श्री. सुब्रह्मण्यम् यांनी काँग्रेस कार्यकारिणीच्या सभासदत्वाचा राजीनामा ज्या रामगढ नरेशांच्या बिहार मंत्रिमंडळांतील नियुक्तीबद्दल दिला व परत घेतला तेंच प्रकरण पाहा ना ! इंदिराबाईंनी तेथेहि कशी अलगद कोलांटी घेतली होती — "काँग्रेसला जनता आघाडीशीं सहकार्य करण्यास मीं परवानगी दिली होती, पण

हरिहरसिंगांना रामगढ नरेशांचा समावेश मंत्रिमंडळांत करणें भाग पडेल हें मला काय माहीत ? ”

असेंच अधोवदन करून पश्चिम बंगालचे मुख्य मंत्री श्री. अजय मुखर्जी व गृहमंत्री श्री. ज्योति बसू दिल्लींत भेटावयास आले असतां पाताळ धुंडण्याचा प्रयोग इंदिराबाईंनी केला. गृहमंत्री श्री. यशवंतरावांना न भेटण्याचें औधत्य ज्यांनी जाहीरपणें दाखविलें त्यांच्याशीं आजारी असतांनाहि इंदिराबाईंनी तासभर गप्पागोष्टी केल्या. यावर कोणीं विचारलें तेव्हा त्या म्हणाल्या, “ मी काय करणार, त्यांनी मलाच भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. लोकराज्यांत मी नाही कशी म्हणणार ?”

बाई मी भोळी गऽ बाई मी भोळी !

*

इंदिराबाईंचा हा भोळेपणा चंद्रशेखर-मोरारजी झगडयांत आता साऱ्यांनाच चांगला समजला आहे. बिर्ला-प्रकरणाने वेगळीच पलटी खाऊन काँग्रेसांतर्गत सत्ता-स्पर्धेत आता त्याचें रूपांतर झालें आहे. बिर्ला-प्रकरणाची चौकशी, समिती नेमून करणें उचित ठरेल, असा विचार काँग्रेस संसदीय पक्षाच्या कार्यकारिणींत मांडला असता तो न पटून जणू केंद्रीय मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त केला जात आहे अशी नेहमीप्रमाणे ताठर भूमिका मोरारजींनी घेतली. परिणामीं बिर्लांवरील आरोप व सरकारचे बिर्लांना संरक्षण देण्याचें धोरण चंद्रशेखर यांनी परखडपणें सभागृहांत उघड केलें; यावर चिडून नेहमीप्रमाणे कुत्सितपणें ‘ व्हेरी डिस्‌ऑनरेबल ’ (अत्यंत असभ्य) असा अहेर मोरारजींनी चंद्रशेखरांना केला.

स्वाभाविकच अहेराला प्रतिअहेर आलाच. तो टोला मात्र मोरारजींच्या वर्मी लागला व ते पक्षशिस्तीची भाषा करूं लागले. चंद्रशेखरांनी सभागृहांत औचित्याचा प्रश्न उपस्थित करून मोरारजींनी आपले बिर्लांच्या कंपन्यांशीं असलेले संबंध प्रथम स्पष्ट करावयास हवे होते, ते लपवून ठेवले असें सांगितलें. मोरारजींनी गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पांत ज्या सवलती दिल्या त्यामुळे बिर्ला ॲल्युमिनियम कंपनीला सव्वा कोटीचा फायदा झाला. हा कांही केवळ अपघात नव्हता. तसेंच श्री. भूपेश गुप्त यांनी केलेल्या आरोपांचीहि त्यांनी बुद्धिपुरस्सर दखल घेतली नाही, खुलासा केला नाही. ज्या बाँबे जनरल ट्रेडिंग कंपनीचें नियंत्रण करण्याइतकें बिर्लांचें भागभांडवल आहे त्या कंपनींत मोरारजींच्या सुनेचें व नातवांचेंहि भाग-भांडवल आहे. आणखी ज्या बाँबे इंडस्ट्रियल आणि केमिकल कंपनीकडे बिर्लांच्या बहुतेक उद्योगधंद्यांची एजन्सी आहे त्या कंपनींत मोरारजींनी स्वतःचे छप्पन्न हजार व त्यांच्या एका शैक्षणिक विश्वस्त निधीचे अडुसष्ट हजार रुपये गुंतविलेले आहेत.

चंद्रशेखरांच्या या आरोपावर मोरारजींनी मोठाच गहजब करून, व्यक्तीला बदनाम करण्याची मोहीम पक्षांत चालणार असेल, तर मला राजीनामा देणें भाग

पडेल अशी कॉंग्रेस संसदीय पक्षाला धमकी दिली. मोरारजींच्या मदतीला तारकेश्वरी सिन्हा, शारदा मुखर्जी, यशोदा रेड्डी या महिला लगेच धांवून गेल्या. इंदिराजींच्या फुसलावणीने मोरारजी व चव्हाण यांचें व्यक्तिमत्त्व डागळण्याचे उद्योग चालू आहेत असेंहि बोललें गेलें. " पक्षांतील ऐक्य अशा बेशिस्तीने मोडून पडेल; महामंत्रिपदाची आपली खुर्ची सतत निर्वेध राखण्यासाठी मूर्तिभंजनाचे खेळले जाणारे डाव देशाला घातक ठरतील, " असें सुचेता कृपलानींनी गंभीरपणें बजावलें. या वेळचेंहि इंदिराजींचें नाटय सर्वांनाच अवाक् करणारें होतें. पक्षशिस्तीचा धर्म, चेकोस्लोव्हाकिया-प्रकरणीं विरुद्ध मतदान करतांना सुचेताजींना आठवला नाही, की 'करंट'मध्ये पक्षा-विरुद्ध लिहितांना तारकेश्वरीला आठवत नाही, असे नांगीचे डंख करून इंदिराजी साळसूदपणें म्हणाल्या, " संसदीय पक्षाच्या घटनेप्रमाणे पक्षशिस्तीबाबत कारवाई जरूर करा; पण चंद्रशेखर यांच्याहि कांही प्रामाणिक धारणा आहेत. तसेंच देशांतहि बिर्लांना आपण संरक्षण देत आहोंत अशी भावना आहे. "

इंदिराजींच्या या उद्गारांबरोबरच सारा मामला तर थंड पडलाच; पण जो तो हळूहळू काढता पाय घेऊं लागला. बिर्ला-प्रकरण अनायासें मागे पडून त्याचें रूपांतर कॉंग्रेसांतर्गत भांडणांत झाल्याने बिर्ला-गटाचें सहजच साधलें होतें तोहि मागे सरकला. कॉंग्रेस कार्यकारिणींतहि अनेक तात्विक मुद्दे विविध श्रेष्ठांनी पुढे करून पक्षशिस्तीच्या पालनासाठी नियमावलि देण्याचें ठरविलें, आणि कॉंग्रेस संसदीय पक्षावर चंद्रशेखरांना ' शो कॉज नोटिस ' देण्याची जबाबदारी टोलवली गेली.

चंद्रशेखरांनी महामंत्र्यांकडे बिर्लांच्या विमा-कंपनीबाबतचीं कांही नवीं कागदपत्रें आता पाठविलीं असून, त्यांत अर्थखात्यांतील कांही अधिकाऱ्यांचेहि हात गुंतले असल्याचें कळतें. चंद्रशेखरांना द्यावयाच्या नोटिशीचा मसुदाहि तयार करण्यास बरेंच डोकें खाजविलें जात आहे. नोटिस गेली की, उत्तर येणार व नंतर चौकशीची आपत्ति ओढवणार ! संसदीय पक्षाच्या सर्वसाधारण सभेंतील निम्म्या सभासदांच्या दोनतृतीयांश बहुमताने ठराव होणार ! म्हणजे सारेंच अवघड ! तेव्हा चंद्रशेखरांना व त्यांच्या गटाला दोष देऊन, शाब्दिक खरड काढूनच प्रकरण मिटविण्याच्या विचारांत सारे दिसतात व मोरारजीहि कांही त्यापेक्षा वेगळ्या विचारांत दिसत नाहीत. " चंद्रशेखरांचें घर उन्हांत बांधूं हं !" असें सांगून समजूत पटवलेली दिसते.

मग मोरारजींनी एकेरीवर येऊन राजीनाम्याची कडोविकडीची भाषा कां केली ? व आता माघार कां घेतली ? " चांगले झालें तें मी केलें व वाईट तें माझ्या सहकाऱ्यांनी !" हें धोरण इंदिराजी चलाखीने कशासाठी चालवीत आहेत ?

याचें उत्तर आज तरी हेंच दिसतें की, आजची हातची सत्ता सोडूं नये व कॉंग्रेसची घसरगुंडी लक्षांत घेऊन १९७२ सालीं केंद्रात येऊं पाहणाऱ्या आघाडीच्या सरकारांतहि आपणास स्थान असावें. सुब्रह्मण्यम्, निजलिंगप्पा, मोरारजी, मीर

कासीम या साऱ्यांच्या राजीनाम्याच्या भाषेने काँग्रेस-श्रेष्ठांचीं तोंडें चार बाजूस वळलेलीं आहेत हें स्पष्टच दिसतें. मग सारेच एकत्र कां राहतात ?

निवडणूक-दौऱ्यावर इंदिराजी उत्तर प्रदेशांत हिंडत असतां एका खेड्यांत बोलतांना मोठ्या मानभावीपणें बोलत्या झाल्या, " मला माहीत आहे की, दारिद्र्याने, लाचलुचपतीने, काळ्या बाजाराने आपण सतावले गेलां आहांत, पण समाजांत कांही चांगलीं माणसें असतात, कांही वाईट माणसें असतात. आपण चांगल्या उमेदवाराला निवडलें पाहिजे. "

आपल्या हाताचा नाजूक पंजा प्रेक्षकांसमोर धरून त्या म्हणाल्या, " आपला हातच पाहा – सारीं बोटें सारख्या लांबीचीं थोडीच आहेत ? कांही लहान आहेत, कांही मोठीं आहेत. "

त्यावर एक वृद्ध किसान उभा राहून म्हणाला, " बाईसाहेब, आपल्या हाताचीं बोटें लहान-मोठीं आहेत हें खरें; पण जेव्हा घास घेण्यासाठी – खाण्यासाठी तो हात पुढे येतो तेव्हा तीं सारीं बोटें एकत्र येतात. "

काँग्रेसमधील लहान मोठे आज सारे एकत्र दिसत आहेत ते यासाठीच बरें !

**– केसरी, २३ मार्च १९६९**

# वसंतवैभव खुलूं लागलें

- १२ -

संसद सभागृहाकडे पदपथावरून जातांना पादत्राणाखाली वाळलेलीं पानें चुरचूर करूं लागलीं की, मोठी मजा वाटते. पानगळीने साऱ्या पदपथावर पानेंच पानें झालीं आहेत. झाडांचे खराटे बनले असून आकाशांत रेघोट्या कोरीत उभे असलेले त्यांचे अस्थिपंजर देह आता पाहवत नाहीत. सकाळीं अंगण झाडून स्वच्छ करावें तों सायंकाळपर्यंत पुन्हा पानांचा सडा पडतो. गळलेल्या पानांचे ढीग करून ते पेटवून देण्याच्या कामांत सारे माळी गुंतले आहेत. ठिकठिकाणीं पेटविलेल्या ढिगांतून निघणाऱ्या धुरामुळे वातावरण धुरकट बनलें असून, आता दुपारचीं उन्हेंहि सुसह्य राहिलेलीं नाहीत. सायंकाळीं जरा गार वारा अंगावर घ्यावा म्हणून बाहेर पडावें तों वातावरणांत कोंडलेला तिखट, कडवट धूर नाकातोंडांत शिरून नकोसें करतो. गुदमरलेलें हें वातावरण एखाद्या दिवशीं आकस्मिकपणें बदलतें आणि –

प्रलयघन दाटत चहुदिशीं अंबरीं, जलनिधी पालथे होती जणू भूवरीं ।
नाचती, गर्जती वात विद्युल्लता, मांडिती तांडव नाचतां नाचतां ।

माळ्यांनी कंबर मोडून गोळा केलेले पानांचे ढीग भिरभिरत येणारें वारें एखाद्या अवखळ मुलासारखें चहुदिशीं उधळून लावतं. विद्युल्लतेची टिपरी आकाशाच्या दुंदुभीवर पडतांच सडसडून वळीव कोसळतो. क्षणभराच्या या तांडवाने तप्त धुरकट बनलेलें वातावरण थंड व मोकळें होतें आणि ती थंड, स्वच्छ व सुखद हवा फुफ्फुसांत भरभरून घ्यावीशीं वाटते. पानगळीबरोबरच उगवलेले नवे कोंब भराभर पालवतात. बालकांच्या लालचुटूक नाजूक तळव्यासारखी ती सुकोमल

पालवी वृक्षाला जणू वसंताचा शृंगारसाज चढवते व त्याचें सारें रंगरूप कात टाकल्यासारखें वदलून टाकतें. नव्याला जन्म देऊन, जुनें जातें मरणालागी.

वृक्षांनीच आपला वेष बदलला आहे असें नाही, तर सचिवालयांतील व संसद-सभागृहांतील शिपाई व सुरक्षाधिकारी यांच्या वेषांतहि बदल झाला आहे. थंडीसाठी चढविलेले काळे उनी डगले उतरले गेले असून, त्यांची जागा पांढऱ्या शुभ्र पोषाखाने घेतली आहे. घरोघरचे उनी कपडे व सूट आता डांबराच्या गोळ्या टाकून पेटीबंद केले जातील. हलके-फुलके, फिक्या रंगांचे कपडे बहुतेकांच्या अंगावर दिसू लागतील. स्त्रियांचे 'कार्डिगन्स' कपाटांत गेले असून 'स्लीव्हलेस' वापरांत येऊं लागले आहेत. ऋतुमानाप्रमाणे बदलली नाही तर ती फॅशन कसली !

आजच्या केशभूषेंतील व वेशभूषेंतील नवाचाराचा मागोवा घेतला, तर अजंठा-वेरूळमधील चित्रसुंदरींशीं त्यांची सांगड घालतां येईल. ऋषीचें कूळ आणि नदीचें मूळ शोधूं नये हें खरें ! पण माणसाचें मन मोठें विचित्र आहे. त्याला भूतभविष्यांत डोकावण्याची मोठी खोड आहे. औरंगाबाद येथील एम्. बी. एन्. कृष्णराव यांचें येथील नॅशनल म्युझियममध्ये नुकतेंच भाषण झालें. सिंधु लिपीचें कोडें गेलीं पन्नास वर्षं अनेकांनी प्रयत्न करूनहि उलगडलें नव्हतें तें या गृहस्थांनी बव्हंशीं सोडवून दाखविलें. सिंधू लिपी ही चित्रलिपी असून, ध्वनीच्या अनुसाराने प्रतीकात्मक चित्रांत ती बसविलेली आहे. कांही प्रतीकें मिळून एक शब्द होतो. श्री. कृष्णराव यांनी या लिपींतील साडेचारशेच्या वर मृत्तिका-लेख, शिला-लेख वगैरे वाचले आहेत. या लिपीतील दोन हजारांपेक्षा अधिक लेख उपलब्ध झालेले आहेत. या लिपीचा अभ्यास करतां असें आढळलें की, या लिपींत पांचशे संकेत-चित्रें असून, त्यांत गेल्या कांही हजार वर्षांत तरी फरक झालेला नाही. तसेंच वरुण, सूर्य आदि वैदिक देवतांचा व वेदकालीन राजे, नगरें, धातु वगैरेंचा उल्लेख लेखांत सापडत असल्याने ही चित्रभाषा वैदिक भाषेची निकटवर्ती आहे व ती भाषा वापरणारी सिंधु संस्कृति आर्य संस्कृतिच होती.

*

भारतावर सूड उगविण्याचें पाकिस्तानी राजकारण गेल्या युद्धांत भरपूर चोप वसूनहि अजून थांबलेलें नाही. १९६५ मध्ये झालेली आपली शस्त्रास्त्रांची नुकसानी भरून काढून पुन्हा सुसज्ज होण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न चालूच आहे. १९५४ मध्ये पाकिस्तानला जवळ जवळ दोन अब्ज डॉलर्सची शस्त्रसामग्री अमेरिकेने पुरविली व त्या बदल्यांत कम्युनिस्ट रशियाभोवतींची साखळी पाकिस्तानांत कांही ठाणीं मिळवून पुरी केली. त्यानंतर प्रत्यक्ष अमेरिकेकडून शस्त्रास्त्रांची मदत पाकिस्तानला अजून मिळाली नसली, तरी नाटो राष्ट्रांतील कांही शस्त्रसामग्री पाकिस्तानने मागितल्यास त्याचा विचार केला जाणारच नाही असें नाही. १९६५ नंतर पाकिस्तानने आपली युद्धांतील हानि भरून काढण्यासाठी चारशेऐंशी कोटींची

शस्त्रसामग्री अमेरिका, रशिया, चीन, नाटो राष्ट्रें व ब्रिटन यांच्याकडून मिळविली आहे. त्यांत सर्वांत अधिक मदत चीनने केली. पाकिस्तानच्या दोन इन्फंट्री डिव्हिजन शस्त्रसज्ज केल्या. दोनशेपन्नास रणगाडे, एकशेवीस मिग विमानें व दोन स्क्वॉड्रन्स फायटर बॉंबर्सच्या दिल्या. तसेंच इराणकडून एफ–८६ जातीचीं २६ विमानें व तुर्कस्तानकडून रणगाडे पाकिस्तानला मिळाले आहेत. रशियानेहि नुकतेच पन्नास रणगाडे व मिग विमानांचे सुटे भाग पाकिस्तानला दिले आहेत. पाकिस्तानने मिळविलेल्या या शस्त्रसामग्रीची माहिती केरळचे माजी अर्थमंत्री अच्युत मेनन यांनी राज्यसभेंत प्रश्न विचारला असतां संरक्षणमंत्र्यांनी दिली.

प्रश्नाचा रोख होता अमेरिकेविरुद्ध. पाकिस्तानला दोनशे कोटींची शस्त्रसामग्री देऊन वादावर ठाणें अमेरिकेने टिकविलें आहे का नाही हा प्रश्न रशिया-चीनने पाकिस्तनला दिलेल्या मदतीची जंत्री पुढे आल्याने, अच्युत मेनन यांच्या अंगाशीं आला.

रशियाच्या धोरणांतील आणखीहि कांही कोडीं नुकतींच ऐकावयास मिळालीं. मालडब्यांच्या खरेदीचा जो मोठा गाजावाजा गेले कांही दिवस ऐकूं येत आहे तो फुगा अगदीच फुसका ठरला आहे. रशियाने अकरा वर्षांत चौपन्न हजार मालडबे घेण्याचें ठरविलें. त्याबाबतचीं तांत्रिक बोलणीं पुरीं झालीं. पहिल्या वर्षीं अडीच हजार मालडबे दिले जाणार होते. शेवटीं किमती ठरविण्यावर जेव्हा आलें तेव्हा रशियाकडून अगदीच कमी किंमत बोलली गेली की, तिचा विचार करणेंहि शक्य नव्हतें. रशियाचें म्हणणे असें की, " आम्ही तुमच्या विकासकार्याला मोठी मदत करीत आहोंत, तेव्हा 'सार्वजनिक क्षेत्रा'मधील कारखान्यांतून मालडबे तयार करून घेण्यास जो खर्च येईल तो लक्षांत घेऊन आम्हांस किंमत सांगा. " हे सर्व मालडबे जायचे होते खाजगी कारखान्यांतून. हेतु हा की, इंजिनियरिंगच्या धंद्याला जी मंदी आली आहे तिचें कांहीसें निराकरण व्हावें. मालडब्यांना लागणारी चाकें सार्वजनिक क्षेत्रामधील कारखान्यांतून येणार होतीं अशा वेळीं आपल्या सरकारनेहि 'खाजगी' विरुद्ध 'सार्वजनिक' असा वाद रशियाला निर्माण करण्यास अवधि देणें इष्ट नव्हतें. परंतु भोंगळपणें वागणारे आपण व चतुराई आणि दम खाऊन व्यवहार करणारा रशिया. स्वाभाविकच त्याने आपल्या व्यवहारांतील फट शोधून मेख मारली. केवळ सार्वजनिक क्षेत्रामधील कारखान्यांतून मालडबे पुरविणें भारताला केव्हाहि शक्य नाही. कोरियाला रेल्वेचे मालडबे पुरवितांना लागणारी चाकेंहि 'सार्वजनिक क्षेत्रा'मधील कारखान्यांतून वेळींच न मिळाल्यामुळे पश्चिम जर्मनी व जपान येथून मागवावी लागलीं आणि तींहि स्वस्तच पडली. मग रशियाच्या बेहिशेबी मागणीवर अकारण चर्चा करण्यांत स्वारस्य काय व चर्चा चालू आहे अशीं मोघम उत्तरें देऊन लोकांना भुलवण्यांत तरी अर्थ काय ?

एका बाजूस व्यवहारांतील भोंगळपणा व दुसऱ्या बाजूस जागोजागी लागलेल्या घुशी यांमुळे भारतीय शासन साऱ्या बाजूने पोखरून निघालें आहे. सार्वजनिक

हिशेब समितीचा १९६८–६९ सालांतील ५६ वा अहवाल नुकताच हातीं आला. त्यांत परदेशांतून मागविलेल्या कच्च्या कातड्यांचीं बिलें अधिक रकमेचीं बनवून कशी बनवाबनवी केली गेली याची सुरस कथा दिली आहे. बकऱ्याच्या कच्च्या कातड्याचीं १०८७ पुडकीं इराणहून भावनगर बंदरांत १९६५ च्या मार्चमध्ये आलीं. त्यांपैकी ८०६ पुडक्यांचें बिल सव्वीस लक्ष सहा हजार एकशेसतरा रुपये करण्यांत येऊन तें १९ मे १९६५ आणि १४ ऑगस्ट १९६७ च्या दरम्यान देण्यांत आलें. १९६५ च्या सप्टेंबरमध्ये खात्याच्या लक्षांत आलें की, हीं बिलें चुकीचीं व थोडींथोडकीं नाहीत, तर दोन हजार पटींनी अधिक केली गेलीं आहेत. म्हणून पुढील माल ६ सप्टेंबर १९६५ रोजीं जप्त केला. तीं २८१ पुडकीं नऊ लाख तेवीस हजार सातशेअठ्ठावीस रुपयांचीं बिलें केलेली होतीं. हा जप्त माल जेव्हा विकला तेव्हा हातीं अवघे सदतीस हजार सातशेपन्नास रुपये आले. या सर्व मालाची किंमत एक लक्ष त्रेसष्ट हजार पन्नास रुपयांवर नसतांना आयात करणारांनी त्याचें बिल मात्र पस्तीस लक्ष एकोणतीस हजार आठशेपंचेचाळीस रुपये करून तेवढ्या परदेशी चलनाला सरकारला टांग मारण्याचा धंदा जमविला होता. हें प्रकरण ' सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन 'च्या हातीं अधिक चौकशीसाठी सुपूर्त केले गेले. भावनगर बंदरांत उतरणाऱ्या कातड्यांप्रमाणेच मद्रास, तुतिकोरिन, मुंबई आणि कलकत्ता येथील बंदरांत उतरणाऱ्या अंदाजे एक कोटि रुपये मालाच्या बिलांतहि अशीच चलाखी केली गेल्याची माहिती कळते. या उपद्व्यापांत कातड्याच्या धंद्यांतील किमान सहा टोळ्या व काळ्या बाजारातील बराच पैसा गुंतलेला आहे.

*

पण या सर्वांकडे लक्ष देण्यास सवड कोणाला आहे ! राज्याराज्यांतील काँग्रेसची सत्ता तर खिळखिळी झालीच आहे; पण केंद्रांतील काँग्रेसश्रेष्ठहि १९७२ सालीं काँग्रेसचें अस्तित्व कितपत राहील याबद्दल साशंक बनलें असून, एकमेकां-विरुद्ध कोंबडीं झुंझवत आहेत. चंद्रशेखर-मोरारजी प्रकरण ही यांतीलच एक खेळी आहे. मग कोण कोणाविरुद्ध शिस्तभंग करणार ? चव्हाण-जगजीवनराम यांच्यावर हें प्रकरण सोपवून इंदिराबाई ' परस्पर साडेतेरा ' करूं पहात होत्या. परंतु तेहि राजकारणीच. पुन्हा त्यांनी इंदिराबाईंच्या पाटींत चेंडू टोलवला व आता इंदिराबाई ' तेरी भी चूप, मेरी भी चूप ' करून प्रकरण मिटवतील ! काँग्रेस सत्ते-वरून गेली तरी आपण खुर्चीवर असलों पाहिजे ही श्रेष्ठांची धारणा, तेथे राज्यांतून तरी वेगळें काय आढळणार ?

फिरावयास जातांना रस्त्यांत दोन शुभ्र डगलेवाल्यांतील पुढील संवाद सहज कानीं आला. तो मोठा बोलका होता.

"का हो! काँग्रेस सत्तेवर फार काळ राहण्याचें चिन्ह दिसत नाही," पहिल्याने पृच्छा केली.

"चालायचेंच! केव्हा तरी काँग्रेस जाणारच!" दुसरा हसत म्हणाला.

"तुम्हांला कांही वाटत नाही?"

"अहो! वाटायचें काय? आज तरी त्यामुळे कांही फारसा बदल होत नाही. काँग्रेस जाईल, पण काँग्रेसवाले खुर्चीवर राहतीलच!"

दुसरा अचंब्यांत पडला व प्रश्नार्थक मुद्रेने म्हणाला, "तें कसें काय बुवा?"

"त्यांत काय मोठेंसें! काँग्रेसवाले पक्ष बदलून जो पक्ष सत्तेवर येईल त्यांत जातील. मिळून काय, काँग्रेस गेली तर काँग्रेसवाले सत्तेवर राहणारच की! द्या टाळी राव!"

मध्यप्रदेशामध्ये यापेक्षा कांही वेगळें होतें आहे की काय? उघड उघड सत्ता-पिपासू राजकारण चाललें आहे; तर उत्तर प्रदेशांतील चंद्रभानु गुप्त गटाच्या हातांतील सत्तेचा आधार आहे जातीयवाद. गुप्त यांच्या पक्षाचें नांव आहे 'अजगर-पक्ष.' या अजगराच्या पोटांत आहे नवा सत्ताधारी काँग्रेसपक्ष! अजगर! अ अहीर, ज – जाट ग – गुजर, र – रजपूत असे हें आद्याक्षरांनी बनलेलें नांव!

बिहारमध्ये दंगा हिंदु आणि मुसलमान यांच्यांत चालू आहे तर मुंबईला झाला मराठी विरुद्ध दाक्षिणात्य यांच्यांत. आंध्रांत तर दोन तेलगु भाषिकांतच तेलंगणी विरुद्ध आंध्र अशी लढत! देशाच्या एकात्मतेचीं व काँग्रेसवाल्यांच्या सत्तापिपासेचीं लक्तरें हीं अशीं साऱ्या देशभर विखुरलेलीं असल्याने सामान्य मात्र भांबावलेला आहे.

अशाच एका जनसामान्यांतील निष्ठावान् गांधीभक्ताने गांधी-जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने स्वतः लिहिलेलें गांधीचरित्र प्रकाशित करण्याचें योजिलें.

त्या बिचाऱ्याजवळ पुस्तकाच्या कागदासाठी द्यावयाला पैसे कोठले असणार? शेवटी पै-पैसा करून दोन-चार हजारांची रक्कम त्याने जमविली, तेव्हा कळलें की, रांचीला हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला. तो गांधीभक्त जमलेल्या पैशांची पुरचुंडी बांधून रांचीस गेला व दंग्यांत सांपडलेल्या गोरगरिबांना जमेल तें साहाय्य त्या पैशांतून करून परत आला.

पुन्हा पैसे जमविले तों मुंबईत दंगा पेटला. मागीलप्रमाणेच त्याने तेथेहि जाऊन सेवा केली व तो परतला!

पुनः पुन्हा पैसे जमणें अवघड होऊं लागलें; तरीहि घरोघर फिरून चरित्र-प्रकाशनाच्या दुर्दम्य इच्छेने त्याने कांही निधि गोळा केला तोंच त्याच्या दुर्दैवाने हैदराबादेंत दंगा पेटला.

गांधीजींच्या विचाराशीं व कृतीशीं एकनिष्ठ राहवयाचें, तर त्याला जाणें भाग होतें. तो तेथे गेला व मदत करून परतला.

त्याची निष्ठा पाहून एक प्रकाशक त्याचें पुस्तक छापून देण्यास अखेरीस मिळाला. पुस्तक तयार झालें. पुस्तकाचें मुखपृष्ठ त्याच्याकडे तपासण्यासाठी आलें. तें तपासून त्याने त्याच्यावर लिहिलें, 'आवृत्ति चौथी.'

तें वाचून प्रकाशक रागावला, "आपलें हें पहिलें पुस्तक व पहिली आवृत्ति! आपण सत्यप्रिय गांधीवादी असून 'चौथी आवृत्ति' असें खोटें लिहितां ?"

त्यावर तो गांधीवादी शांतपणें म्हणाला, "मीं खरें तेंच लिहिलें आहे. गांधी-चरित्राची पहिली, दुसरी व तिसरी आवृत्ति रांची, मुंबई व हैदराबादला निघाली व खपली. म्हणून ही चौथी."

एवढें बोलून तो गांधीवादी तरातरा उठला! वाटेंत एक पुष्पहार विकत घेऊन त्याने त्याला एक चिठ्ठी जोडली व राजघाटावर जाऊन गांधीजींच्या समाधीला तो पुष्पहार अर्पण केला.

त्या चिठ्ठीवर लिहिलें होतें, "गांधीवादाचा बळी देण्यास निघालेल्या काँग्रेसवाल्यांनी देशांतून काळें करावें."

कार्ल मार्क्सच्या ८६ व्या पुण्यतिथीनिमित्त ब्रिटनमधील त्याच्या समाधीवर पुष्पचक्र वाहतांना एका निष्ठावान् साम्यवाद्याने त्याला चिठ्ठी जोडली होती – 'Insidious & barbarous Bolsheviks should get out of civilised socialist Czechoslovakia.'

अगदी तसेंच आहे हें!

– केसरी, ३० मार्च १९६९

# शह-काटशहाचें राजकारण

## - १३ -

दिल्लींत मीं पाऊल टाकलें तेव्हा राष्ट्रपति डॉ. झाकीर हुसेन यांच्या आकस्मिक दु:खद निधनाच्या आघाताने विमनस्क झालेली राजधानी पुन्हा व्यवहाराला लागलेली दिसली. नाही तरी –

" धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे, भार्या गृहद्वारि, जन:स्मशाने ।
देहश्चितायां परलोकमार्गे धर्मानुगो गच्छति जीव एक: ।। "

अशी जगाची रहाटीच आहे. या जगरीतीपासून कोणी मुक्त नाही. मग तो राजा असो वा राष्ट्रपति असो.

झाकीरसाहेबांच्या स्निग्ध, शांत, मधुर व्यक्तिमत्त्वामुळे ते साऱ्यांनाच प्रिय होते. त्यांचा व्यासंग, त्यांची विद्वत्ता साऱ्यांच्या आदराचा विषय बनली होती. त्यांचें जीवन म्हणजे एक लहानशी प्रकाशज्योत. पण ती विझली आणि सर्वत्र अंधार भासूं लागला. निधर्मी राष्ट्रवाद तर त्यांच्यांत साकारच झाला होता. झाकीरसाहेब अगदी कमी बोलत. पण भारताची दुरवस्था पाहून त्यांचें मन तिळतिळ तुटे. "आजच्या अवस्थेंत निश्चित मार्ग आखून धारिष्टचाने तो चोखाळण्याची गरज आहे, पण कोणी पुढें येत नाही. कारण प्रत्येकाला आपली खुर्ची गमावण्याची भीति वाटते," असे उद्‌गारहि हल्ली त्यांच्या तोंडून निघूं लागले होते.

म्हणूनच, देशावर प्रेम करणाऱ्या या महामनस्क राष्ट्रपतीबद्दल लक्षावधि भारतीयांच्या मनांत मृदुभावना रुजलेल्या होत्या. ओखला येथील त्यांच्या कबरीसाठी मुक्रर केलेली चार एकर जागा देणगी देतांना भास्कर अँण्ड भास्कर इंडस्ट्रीजच्या हिंदु मालकांना आपला बहुमान झाला असें वाटलें तें यामुळेच.

राष्ट्रपतिपदाच्या निवडीच्या व्यवहाराने आता साऱ्यांचीं मनें व्यापलीं आहेत. रिकाम्या झालेल्या राष्ट्रपतींच्या स्थानावर कोणाची नियुक्ति करावी ? घटनेच्या ६५ (१), (२) कलमानुसार उपराष्ट्रपति राष्ट्रपतींचें कार्य करतील. पण ते राष्ट्रपति बनतात कां ? का ती गादी नवीन निवड होईपर्यंत रिकामीच राहते ? हरिभाऊ कामतांनी हा घटनात्मक प्रश्न अचुकपणें उपस्थित केला. राष्ट्रपतींची निवड झाली नाही व जर त्याच वेळीं उपराष्ट्रपतींचीहि जागा अनपेक्षितपणें रिकामी झाली, तर राष्ट्रपतिपद रिकामें राहूं नये म्हणून क्रमवार व्यवस्था कोणती असावी याचा आतापर्यंत विचार झाला नव्हता. म्हणून गेल्या बुधवारीं त्यासंबंधी विधेयक मांडण्यांत आलें. राष्ट्रपति व उपराष्ट्रपति हीं दोन्ही पदें रिकामीं पडलीं, तर सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाने व त्यांच्या गैरहजेरींत त्या न्यायालयांतील सर्वांत ज्येष्ठ न्यायाधीशाने राष्ट्रपतींचें काम करावें अशी तरतूद या विधेयकांत करण्यांत आली आहे. या संदर्भांत सध्याचे हंगामी राष्ट्रपति श्री. गिरी राष्ट्रपति आहेत की ते उपराष्ट्रपति असून राष्ट्रपतींचें कामकाज पाहत आहेत हाहि प्रश्न पुढे आला व ते राष्ट्रपति नव्हेत, राष्ट्रपतीचें कामकाज पाहणारे उपराष्ट्रपति आहेत असा खुलासा करण्यांत आला.

एका बाजूला घटनातज्ज्ञ घटनेचा कीस काढीत असतां दुसऱ्या बाजूला राजकारणी मंडळी राष्ट्रपतिपदाच्या निवडीसाठी बुद्धिबळाचा डाव मांडून बसले आहेत. झाकीर हुसेन यांची जागा 'पंत पडले व राव चढले' या न्यायाने आज गिरींनी स्वीकारली आहे. पण ही परंपरा अशीच कायम करणें इष्ट होईल काय ?

ती तशी टिकली पाहिजे असा गिरी यांचा आग्रह आहे. काँग्रेसमधील अंतर्गत राजकारणाने धारण केलेलें तीव्र स्वरूप पाहतां राष्ट्रपतिपदावर अतिमहत्त्वाकांक्षी नेता असूं नये असें इंदिराजींना वाटणें अशक्य नाही. क्वचित् या विचाराने प्रभावित होऊन गिरी, स्वर्णसिंग किंवा ढेबर यांचीं नांवें पुढे सरकतील. आज देशांत शिक्षितांच्या बेकारीचा प्रश्न साऱ्यांना अस्वस्थ करीत आहे. पण त्याहिपेक्षा अधिक तापदायक आहे तो राजकीय बेकारांचा प्रश्न. त्यांतीलहि अनेकजण पुढे सरसावले आहेत. कामराज, राजगोपालाचारी, डॉ. खरे, जयप्रकाश नारायण, डॉ. गजेंद्रगडकर, पाटसकर, विजयालक्ष्मी व आणखी किती तरी. काँग्रेसच्या दृष्टीने महत्त्वाचें म्हणजे सिंडिकेटच्या मनांत काय आहे व ती काय पावलें टाकणार आहे ? बनासकाठाची निवडणूक जिंकून स. का. पाटील दिल्लींत आले आहेत. त्यामुळे 'सिंडिकेट'ला मजबुती आलेली आहे. श्री. पाटील यांच्या निवडणुकीचा निकाल एक दिवस राखून ठेवला याबद्दलहि संसदेंत शाब्दिक चकमकी घडल्या. असो.

*

काँग्रेसच्या सुदैवाने आज विरोधी पक्ष एकत्र नाहीत व त्यांचा सर्वमान्य उमेदवार पुढे येण्याचाहि फारसा संभव नाही. स्वाभाविकच राष्ट्रपति निवडण्याची

जवाबदारी काँग्रेसवरच पडणार आहे. १९७२ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पालटणारें देशाचें चित्र डोळ्यांसमोर ठेवून काँग्रेसला ती जबाबदारी पार पाडली पाहिजे. काँग्रेस तिच्या विश्वासास पात्र अशाची निवड करूं पाहणार. पण काँग्रेसच्या विश्वासास पात्र म्हणजे कोणाच्या ? इंदिराजींच्या का सिंडिकेटच्या, हा प्रश्न महत्त्वाचा झाला आहे.

संसदीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीच्या गेल्या गुरुवारीं झालेल्या निवडणुकीचे निकाल पाहतां श्रीमती इंदिरा गांधी यांची पक्षावरील पकड कशी प्रभावी होत आहे याचा प्रत्यय येतो. गेल्या वर्षी झालेल्या पराभवाचें त्यांनी या वेळीं चांगलेंच उट्टं काढलें आहे, अशी त्यांच्या प्रतिस्पर्धीयांनीहि कबुली दिलेली आहे.

फरिदाबाद अधिवेशनांत अंतर्गत दुहीने पोखरलेलें काँग्रेसचें जळतें घर जरी लोकांना प्रत्यक्षच पाहवयास मिळालें, तरी या लढतींतील अतिरथी-महारथी बनासकाठा व मिदनापूर येथील निवडणुकीनंतर कुरुक्षेत्रांत उतरले असून, खरी घनचक्कर आता सुरू झाली आहे. आजवर इंदिराजींनी 'तरुण तुर्कां'च्या साहाय्याने अनेकांवर शरसंधान केलें. पण आता तेंच हत्यार पाटील-निजलिंगप्पांवर वापरलें जातांच त्याला जशास तसें उत्तर मिळूं लागलें आहे व यापुढे ही झुंज एकतर्फी होईलसें वाटत नाही. संसदेचें उन्हाळी अधिवेशन संपतांच मोरारजीहि चंद्रशेखर-धारिया यांना उत्तर देतील असें ऐकतों. स्वाभाविकच मोरारजी व सिंडिकेट यांचीं पावलें कशी पडतात यावर इंदिराबाईचें लक्ष असणार व क्वचित् या लढतींत तिरप्या चालीच्या उंटाचा बळी दरवाजा फोडण्यास दिला जावयाचा या जाणिवेने म्हणा वा एकाकी बाजूस पडत असल्याने म्हणा, सध्या 'तरुण तुर्क' जरा मलूल चेहऱ्यानेच वावरत आहेत. इंदिरा गांधी यांची ही दुतर्फी खेळी भल्याभल्यांनाहि चकित करणारी आहे. त्यांच्या साऱ्या चाणाक्षपणाचें एकच सूत्र आहे – महामंत्रिपदाच्या खुर्चीचें रक्षण. त्यामुळे त्याच्या पायीं 'तरुण तुर्क'हि केव्हा पेचांत येतील हें सांगणें कठीण आहे.

*

सत्तेच्या या राजकारणांत काँग्रेस अशी खोल खोल रुतत चालली आहे. तिचें बळ दररोज कमी कमी होत आहे. पण दुर्दैवाने तिच्या हातीं अजूनहि देशाचें भवितव्य आहे. एका मुलाने सहज प्रश्न विचारला, "काँग्रेस पक्षाची उंची किती ?" त्यावर दुसऱ्याने झटकन् उत्तर दिलें – "पांच फूट दोन इंच !" त्याचें उत्तर न समजून त्याच्याकडे आ वासून पाहणाऱ्या मुलाला उत्तर देणारा म्हणाला, "माझे बाबा सहा फूट उंच आहेत व ते नेहमी म्हणत असतात की, काँग्रेसच्या चिखलांत मी गळ्यापर्यंत रुतलों आहे." काँग्रेसच्या आजच्या स्थितीचें यापेक्षा बोलकें वर्णन दुसरें कोणतें सांगतां येईल ?

सत्तेचें आकर्षण असें जेथे मोठ्यामोठ्यांना लोभावतें, तेथे लहानांना सत्तेची धुंदी चढली तर अचंबा कां वाटावा ? असेंच एक प्रकरण नुकतेंच राज्यसभेंत गाजलें.

हैदराबादचे माजी रझाकार व आजचे उपकायदामंत्री युनूस सलीम यांचा अपमान कायदा खात्याच्या चिटणीसांनी केला, अशी तक्रार मोठा गाजावाजा करून मांडण्यांत आली. खरोखरी चिटणीसांनी देशहित पाहूनच सल्ला दिला होता व त्यांत कोणाचे हात बरबटले असले तर ते उपकायदामंत्र्यांचेच ! लखनौ कॅन्टोन्मेन्टमधील भार्गव ब्रदर्सचें हें प्रकरण. कॅन्टोन्मेन्टमधील भार्गवांच्या ताब्यांत असलेली जागा संरक्षण-खात्याच्या मताने त्यांची असल्याने 'कॅन्टोन्मेन्ट टेन्युअर' नियमानुसार ती ते परत घेऊं इच्छीत होते. भार्गवांना त्या जागेवरून काढण्याच्या दृष्टीने कायदा मंत्रालयाकडे संरक्षण मंत्रालयाने सल्ला मागितला. संरक्षण मंत्रालयाच्या चिटणीसांशीं चर्चा करून कायदा मंत्रालयाच्या चिटणीसांनी त्या जागेवर भार्गवांनी बांधलेल्या इमारतीची नुकसानभरपाई साडेबारा हजार रुपये देऊन त्यांना जागेवरून काढावें अशी सूचना केली व यांत दिरंगाई करूं नये असेंहि सुचविलें. परंतु सलीम यांना तें नको होतें. त्यांनी या प्रकरणांत हात घालून भार्गवांना नऊ कोटि पंचावन्न लक्ष रुपये भरपाई द्यावी असा शेरा मारला. यावर कायदा-मंत्र्यांच्या खोलींत चर्चा झाली व तेथे श्री. बाबूभाई चिनॉय यांनी राज्य-सभेंत सांगितल्याप्रमाणे चिटणीसांनी उपमंत्रिमहाशयांना "यू आर् ए डिस्ग्रेस टु द मिनिस्ट्री" असा अहेर केला. भार्गवांच्या प्रकरणांत सलीम यांचे गुंतलेले हितसंबंध दर्शविणारें आणखी एक उदाहरण नजरेस आणलें गेलें. या फर्मचें प्राप्तिकराचें प्रकरण अर्थखात्याकडून मागवून अनाहूतपणें त्यावर सलीम यांनी आपलें मत दिलें होतें. सलीम यांची वर्तणूक खुद्द कायदामंत्र्यांनाहि आवडली नाही. कारण ती शासकीय रीतीला धरून नव्हती. चिटणीसांवरील राग काढण्यासाठी राज्यसभेंत निर्माण केलें गेलेलें प्रकरण शेवटीं सलीम यांच्या अंगावरच हें असें शेकलें. त्याचे परिणाम आणखी काय होतात तें दिसेलच.

सत्ता डोक्यांत जाते ती अशी; व डोक्यांत गेली की ती हातून गैरव्यवहार घडविते, ते असे !

*

राजकीय स्तरावर व शासकीय स्तरावर जसा उष्मा वाढत आहे तशीच ग्रीष्माची तप्त मुद्रा आता राजधानीवरहि उमटूं लागली आहे. जुन्या दिल्लींत आपण हिंडूं लागलों तर खाटांच्या चक्रव्यूहांतूनच वाट काढावी लागते. आता अंगाची लाही करणाऱ्या उष्म्यामुळे साऱ्या मंडळींनी आपल्या पथाऱ्या मोकळ्यावर आणल्या आहेत. गरिबांना मोकळी जागा म्हणजे रस्ते ! दिवसा सुद्धा या खाटा रस्त्यांवर आडव्यातिडव्या पडलेल्या असतात.

राजधानींतील दिव्याखालील अंधेर पाहवयाचा असेल तर जुन्या दिल्लींतील वसंतनगर, अंधामुगल, बस्तीजुलहान या भागांत हिंडण्याचा या दिवसांत धीर

करावा. पहाडगंजहून सदरबझारला जातांना लागणाऱ्या बस्तीजुलहानमध्ये कधी नव्हे तीं मध्या उपनिवडणुकीच्या निमित्ताने अनेकांचीं पावलें वळलीं होतीं. धनपतराय भारती हे कॉंग्रेस-सदस्य गेल्या वेळीं त्या भागांतून निवडून आले होते. परंतु त्यांची निवडणूक कांही तांत्रिक हरकतीमुळे रद्दबातल ठरली. बस्तीजुलहानमध्ये १६,००० च्या आसपास मतदार आहेत. त्यांत ३,००० मुसलमान व ९,००० हरिजन. या मतदारयादींत हजारभर नवे मतदार दाखल करण्याची कारवाई जनसंघाने केल्याची तक्रार राज्यसभेच्या सदस्या श्रीमती वशिष्ठ यांनी लक्षवेधी सूचना आणून केली. दिल्ली महानगरपालिकेची स्वतःची मतदारयादी नाही. संसदेच्या निवडणुकीसाठी तयार होणारी यादीच वापरली जाते. त्या निवडणूक कायद्यानुसार या पोटनिवडणुकीच्या अखेरच्या दिवसापर्यंत यादींत नवी भरती करण्यास सवड होती व त्याचा फायदा जनसंघाने उठविला. निवडणूक म्हणजे लोकशाहींतील एक लढतच. बस्तीजुलहानची जागा कॉंग्रेसला टिकवायची होती व जनसंघाला मिळवावयाची होती. निवडणूक झाली आणि त्या निमित्ताने दिलीं गेलेलीं आश्वासनें व अस्पृश्यतानिवारण सप्ताह वाऱ्यावर विरून गेले. तेथील परिस्थितींत कांहीच फरक पडलेला नाही. म्हशींच्या गोठ्यांमुळे डासमाश्यांची तेथे भरपूर वाढ आहे. पाण्याच्या सार्वजनिक तोटचा अपुऱ्या असल्याने त्यावरील भांडणांनाहि खळ नाही. सदरबझार पोलिस ठाणें जवळ असूनहि चोर-उचले, रांड-सांड, जुलमी-जुगारी – साऱ्यांना तेथे आसरा आहे. घरोघर आठ-दहा उघडींबोडकीं मुलें तरी आढळतील. ना त्यांना कधी आंघोळ, ना अंगभर कपडा, ना शिक्षण ! गांधीजी म्हणत, "माझ्या देशांतील दरिद्रीनारायणाची मी सेवा करीन. या देशाच्या घडणींत त्यांचाहि हात आहे असें त्यांना वाटलें पाहिजे." गांधीजीचे ठिकठिकाणीं पुतळे उभे करणाऱ्या कॉंग्रेस सत्तेला, देशांत पसरलेल्या अशा झोपडपट्ट्यांच्या सुधारणेकडे लक्ष देण्यास गांधी जन्मशताब्दीच्या वर्षांतहि सवड नाही. मग या दारिद्र्यापोटीं साम्यवादी प्रवृत्तींनी जन्म घेतला तर चूक काय ?

*

समाजधारणेला जो धर्म योग्य तो समाज पत्करतो ही भाषा राज्यसभेमध्ये नक्षलवाद्यांनी स्थापित केलेल्या तिसऱ्या कम्युनिस्ट (मार्क्सिस्ट – लेनिनिस्ट) पक्षावरील चर्चेच्या वेळीं खासदार चित्त बसूंनी चव्हाणांना ऐकविली. प. बंगालचे साम्यवादी गृहमंत्री ज्योति वसू यांच्या दारांत एक नवें बाळ आता येऊन पडलें आहे. नक्षलवाद्यांना गजाआडून सोडतांना याची त्यांना कल्पना नसेलच असें म्हणतां येणार नाही. क्वचित् अशीं त्यांच्या तेंच मनांत असेल ! पण आज तरी माओच्या शिकवणीचा प्रचार करणाऱ्या व 'बंदुकीच्या नळींतूनच सत्तेचा उगम होतो' असें मानणाऱ्या तिसऱ्या कम्युनिस्ट पक्षाचा जन्म कानू संन्याल यांच्या नेतृत्वाखाली

झाला आहे. हें लोण तामिळनाडू, आंध्र व पंजाबमध्येहि पोचलें आहे व भारतांतील लोकशाहीचा गळा धरण्या-घोटण्यासाठी घूसखोरी व फुटीर वृत्ति वाढविण्याच्या सूचना त्यांना चिनी वकिलातींतून मिळत असल्याचें ऐकतों. भारतीय घटनेविरुद्ध बंडाची भाषा बोलणारा हा पक्ष उघड उघड राष्ट्रद्रोही आहे असें यशवंतराव सांगतात. परंतु त्याच्या दमनाचा मार्ग मात्र विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांशीं चर्चा करून ठरवणार आहेत. सापाला मोकळें सोडण्याचा यशवंतरावांचा हा संथपणा देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेला धोका निर्माण केल्याशिवाय राहणार नाही. श्री. डांगे व श्री. भूपेश गुप्त यांनी चव्हाण यांच्या आवाहनाला जें उत्तर दिलें आहे तें पाहतां कम्युनिस्ट – मग ते डावे असोत वा उजवे असोत – त्यांनी या तिसऱ्या कम्युनिस्ट पक्षाबद्दलची आपली प्रीति झाकून ठेवलेली नाही हें उघड होतें. रा. स्व. संघ, शिवसेना व नक्षलवादी यांना एका माळेंत गोवण्याची डांगे यांची शिताफी ‘ श्वा, युवा, मघवा ’सारखीच आहे.

काँग्रेस आपल्या अंतर्गत दुहीमुळे, दुर्बल नेतृत्वामुळे देशावर लाल क्रांति ओढवून घेणार काय ? खासदार डाह्याभाई पटेल अर्थविधेयकावर बोलतांना म्हणाले की, “ हरित क्रांतीचा डिम डिम राज्यकर्ते मोठ्या उत्साहाने वाजवीत आहेत. पण ते जवळ आणीत आहेत ती लाल क्रांति ! ”

माझा एक मित्र चेष्टेने म्हणाला, “ तिसऱ्या कम्युनिस्ट पक्षाच्या निर्मितीने कम्युनिस्ट पक्षाचा लाल त्रिकोण आता सिद्ध झाला आहे. ”

लाल क्रांतीचे त्यामुळे तरी नियमन होवो !

– केसरी, दि. १८ मे १९६९

# ‘पेशन्स’चा डाव

- १४ -

बनासकाठाचे विजयी वीर सदाशिव कान्होबा पाटील संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये शिरले ते त्यांच्या चाहत्यांकडून मुजरे घेतघेतच. श्री. स. का. पाटील नको नको म्हणत असतां त्यांच्या दोस्तांनी त्यांना ‘तरुण तुर्कां’कडे ओढून नेलें व त्यांनीहि लाजेकाजेस्तव पाटलांचें अभिनंदन केले.

पालम विमानतळावर बाबूभाई चिनॉय, रामसुभगसिंग, तारकेश्वरी सिन्हा, शारदा मुखर्जी वगैरे खासे व पन्नास-साठ वरकड खासदार आणि उद्योगपति पाटलांच्या स्वागतासाठी हारतुरे घेऊन उपस्थित होते. बाबूभाईंनी तर त्या दिवशीं रात्रीं अनेकांना फोनवरून स्वागतसमारंभाचीं तोंडीं निमंत्रणें दिलीं. ती वार्ता कर्णोपकर्णी सगळीकडे गेल्याशिवाय कशी राहील ?

स्वाभाविकच तिचा प्रतिध्वनि राज्यसभेंत उठला. बाबुभाईंचाहि चिडल्यामुळे तोल गेला. “ हा नाक खाजविण्याचा प्रकार ‘राजप्रासादां’तून मंथरा आल्याने घडला असल्याचा ” आरोप त्यांनी भूपेश-राजनारायण यांच्यावर केला.

हा ‘राजप्रासाद’ कोणता ? राष्ट्रपतिभवन तर नव्हेच नव्हे ! मग ? बाबूभाई अनवधानाने बोलून तर गेले व मग मात्र चांगलेच गोंधळले. “ राजप्रासादात कांही केवळ राणीच राहत नाही, ” असें बोलून या बोटावरची थुंकी त्या बोटावर करण्याची चलाखीहि त्यांनी करून पाहिली. पण एकदा घसरले ते घसरलेच !

लोकसभेंत शपथविधि झाल्यावर प्रश्नोत्तराच्या वेळीं श्री. पाटील बसले ते पहिल्या रांगेंत. तेथील ते जणू कायमचे मानकरीच ! पाटील काय किंवा कृष्णमेनन काय, सत्तेपासून फार काळ दूर राहूंच शकत नाहीत. त्यांची वागणकहि सत्ताधाऱ्यांना

शोभेशीच असते. एक उजव्या विचारसरणीचे तर दुसरे डाव्या विचारसरणीचे. पण संसदेचे सदस्य वा मंत्री नसतांनाहि गेलीं दोन वर्षे आपले दिल्लींतील बंगले अकडवून ठेवण्यांतील दोघांच्या वागणुकींत फरक नाही. जणू दिल्लीपासून ते दूर राहूंच शकत नाहीत. मुंबईने दोघांनाहि नाकारलें तरी एक बनासकाठाहून तर दुसरे मिदनापूरहून पुन्हा संसदेंत व त्यामागें दिल्लीच्या राजकारणांत प्रवेश करते झाले.

दिल्लींत येतांच पाटलांनी किल्ल्या फिरविण्यास सुरुवात केली. बाजू उलटविण्याची भाषा त्यांनी जरा सौम्य केली. काँग्रेसांतर्गत विभिन्न विचारसरणीचे दोन गट आहेत व त्यामुळे स्वाभाविकच ध्रुवीकरण होईल, पण त्यासाठी काँग्रेस मोडण्याची गरज नाही; मात्र आजचा मतामतांचा गलबला काँग्रेसमध्ये फार काळ चालणें इष्ट नाही. ज्या विचारसरणीला बहुमताचें पाठबळ काँग्रेसमध्ये लाभेल त्या गटाने कारभार पाहवा. "मी माझी शक्ति पक्ष फोडण्यास कधीच वापरलेली नाही. कम्युनिस्ट विचारसरणीच्या वृत्तपत्रांनी माझ्याविरुद्ध हा विकृत प्रचार चालविला आहे" इत्यादि तक्रारी पाटील करूं लागले आहेत.

जे पाटील इंदिराजींवर निवडणूक-काळांत साध्या बोलण्यांतहि आग पाखडीत तेच "छे! छे! इंदिराजी माझ्याविरुद्ध कधीच नव्हत्या: उलट माझी निवड करण्यास त्यांनी पाठिंबाच दिला व तसें मला फोनवर सांगितलें. माझा त्यांच्या शब्दावर विश्वास आहे" अशी मुत्सद्दीपणाची मिठ्ठास भाषा वापरूं लागले आहेत. पाटील मंत्रिमंडळापासून फार काळ दूर राहूं शकणार नाहीत. ते आंत घुसण्याचा प्रयत्न करतील व बरोबर कामराजांनाहि नेतील. इंदिराजी आपल्याला शासनांत किती स्थान देतात हें पाटील अजमावीत आहेत व पाटील काय खेळी खेळणार व त्यांच्याशीं कोण कोण हातमिळवणी करणार हें इंदिराजी पाहत आहेत. दोघेहि 'पेशन्स'च डाव मांडून बसले आहेत.

पाटील दिल्लींत त्या मानाने उशिरा पोचले. नाही तर काँग्रेस संसदीय पक्षाच्या कार्यकारिणीच्या निवडणुकींतहि त्यांनी बरींच प्यादीं पुढेमागे सरकावलीं असतीं. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश व बिहार अशी प्रादेशिक तडजोड होऊनच उमेदवारांचें पाठबळ निर्माण झालें. पण ऐन वेळीं महाराष्ट्रांतील व तामीळनाडूमधील खासदारांची कांही मतें जीं फिरवलीं गेलीं तीं पाटलांचा हात या निवडणुकींत शिरल्याचींच द्योतक होतीं. श्रीमती ललिता राजगोपालन पराभूत होऊन काँग्रेस संसदीय पक्षाच्या अधिकारपदीं एस्. एन्. मिश्र निवडून आले. पांडे, एस्. डी. मिश्र, भंडारे वगैरेहि असेच निवडले गेले आहेत. दिल्लीच्या वृत्तपत्रांनी जरी महामंत्र्यांच्या विजयाच्या जाहिराती फडकाविल्या तरी घडलें मात्र उलट. शह बसला तो इंदिराजींना व तरुण तुर्कांनाच. येऊन-जाऊन रत्नागिरीवर सतत दोन वेळा दिल्लीहून लादल्या गेलेल्या शारदाबाईंचा 'चार्म' मात्र या कामीं उपयुक्त ठरला नाही. त्या महाराष्ट्रीय गटाविरुद्धच बंड करून उभ्या राहिल्याने पाटील-मोरारजींचें साहाय्य मिळूनहि त्या पराभूत झाल्या.

पाटील यांच्या दिल्लींतील पुनरागमनाने राष्ट्रपतींच्या निवडीचा प्रश्नहि राजकारणाच्या आवर्तांत सापडला आहे. इंदिराजींचा निर्णय हा या निवडीबाबत अखेरचा ठरणार हें जरी खरें तरी हा निर्णय करतांना सर्वस्वीं सिंडिकेटला व विरोधी पक्षाला डावलून भागणार नाही. राष्ट्रपतींचें कामकाज सांभाळणारा गिरींसारखा पंखाखाली वागणारा सज्जन इंदिराजींना विशेष पसंत आहे. त्यामानाने जगजीवनराम यांच्यासारखे कोणीहि स्वतंत्र बाण्याचे अनुभवी मुत्सद्दी १९७२ साल डोळ्यांपुढे ठेवतां नाइलाजानेच पत्करावयाचे. पण आज तरी इंदिराजी तोंड बंद करून बसल्या आहेत व आपोआप किती उमेदवार गळतात तें पाहत आहेत.

राष्ट्रपतिपद व मंत्रिपद यांसारख्या श्रेष्ठ पदांसाठी संसद सभागृहांत राजकारण खेळलें जात असतां, सभागृहाबाहेर मात्र नोकऱ्या मागण्यासाठी आलेल्या तरुणांवर लाठीमार होत होता. गेल्या गुरुवारीं संसद-सभागृहाबाहेर हजारो तरुणांनी वाढत्या बेकारीच्या निषेधार्थ उपोषण व निदर्शनें केली. कांहींनी सभागृहांतहि घुसण्याचा प्रयत्न केला. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील कांही तज्ज्ञांच्या मदतीने इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिटयूटने या बेकारीच्या प्रश्नाचा अभ्यास केला आहे. त्याचा निष्कर्ष हा आहे की, आर्थिक वाढ अधिकांश मानली तर १९७५–७६ सालापर्यंत शिक्षित बेकारांची संख्या दहा लाखांवरून सोळा लाखांवर जाईल.

याउलट मनुष्यबळाबाबत संशोधन करणाऱ्या संस्थेने किमान आर्थिक वाढ धरून जो आकडा काढला आहे त्यांत शिक्षित बेकारांची संख्या १९७५-७६ सालांत साठ लाख होईल असें अजमावलें आहे. राष्ट्रीय मजूर मंडळाची आकडेवारी तर निश्चितच विचार करण्यास लावणारी आहे. शिक्षित बेकारांची संख्या १९६४ सालीं जी आठ लाख सहा हजार होती ती १९६७ अखेर दहा लाख सत्याऐंशी हजार झाली. म्हणजे पस्तीस टक्क्यांनी वाढली. या बेकारांपैकी निम्मे आहेत पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश व बिहारमधील ! उद्योगविनिमय केंद्रांकडे ज्यांनी नोकरीसाठी नोंद केली आहे त्यांत सहा हजार इंजिनियरिंगचे पदवीधर आहेत व अठ्ठावीस हजार डिप्लोमाधारक आहेत.

ग्रामीण विभागांतील बेकारीचा अभ्यास तितकासा झालेला नाही. तरीहि तेथील अर्धबेकारांची संख्या एक कोटि साठ लाखांच्या आसपास आहे. १९६७–६८ सालांतील उत्तरार्धांत आर्थिक परिस्थितींतील सुधारणा होऊनहि खासगी व सरकारी उद्योगधंद्यांतील नोकऱ्यांत कांहीच वाढ झाली नाही. १९६७-६८ सालांतील उद्योगविनिमय केंद्रांकडील बेकारांच्या नोंदींत पांच पूर्णांक सहा दशांश टक्क्यांनी वाढ झाली. एकूण सव्वीस लक्ष नव्वद हजार नोंदी झाल्या तर नोकऱ्यांचें प्रमाण सोळा पूर्णांक सहा दशांश टक्क्यांवरून सहा पूर्णांक आठदशांश टक्क्यांवर उतरलें. बेकार

तरुणांपुढें पडलेलें हें रिकामें ताट वाढण्याचें ज्यांच्या हातीं ते स्वतःचींच पोटें भरण्यांत मग्न आहेत व तींहि फुगत चाललीं आहेत.

*

केंद्रीम मंत्री फकरुद्दीन अली अहंमद यांची संपत्ति १९६२–६३ सालीं तीन लक्ष 'अॅसेस' झाली होती. आता ती गेल्या पांच वर्षांत दामदुपटीवर गेलेली असावी. पण दिल्ली महानगरपालिकेचें सात हजार रुपयांचें विजेचें बिल कांही या महाशयांनी भरलें नाही. असेच कितीएक मंत्र्यांनी प्राप्तिकराचे तक्तेहि दहा वर्षांत सादर केलेले नाहीत. आजची तरुण पिढी हा गैरव्यवहार पाहून किडलेली शासनसंस्था मोडावयास निघाली तर आश्चर्य काय ? कलकत्त्यांतील नक्षलवाद्यांत, मुंबईतील शिवसेनेंत किंवा स्वतंत्र तेलंगणाच्या आंदोलनांत बहुसंख्येने तरुण कां, याचें उत्तर वेकारांच्या वरील आकडेवारीने कांहीसें मिळावें !

ही शासनसंस्था इतकी बिघडली आहे की, जो तेथे जाईल तोच शासनसंस्थेंत पचविला जातो.

नुकतीच नोकरी मिळालेल्या एका तरुण अधिकाऱ्याकडून एक मोठा गमतीचा प्रसंग ऐकावयास मिळाला. एका सरकारी नोकरीसाठी त्याने रीतसर अर्ज केला होता• तो उत्तराची वाट पाहत असतां त्या खात्याच्या प्रमुखापर्यंत त्याच्या एका मित्राकरवीं त्याची वर्णी लागली आणि त्याने त्याला लगेच नोकरीसाठी घेतलें. आपल्या या नवीन जागीं तो रुजू होऊन सात-आठ महिने झाल्यावर त्याला एक पत्र मिळालें. त्या लिफाफ्यांत त्याचा मूळ अर्ज व त्याला जोडलेलें सरकारी पिवळ्या कागदावरील एक पत्र होतें. त्यांत लिहिलें होतें की, या जागेसाठी आपली शैक्षणिक पात्रता पुरेशी नसल्याने आपला अर्ज परत पाठवीत आहे.

या नकाराच्या पत्राकडे जरा बारकाईने पाहतांच त्याला दिसली ती त्या पत्राखाली त्याची स्वतःचीच स्वाक्षरी !

भ्रष्ट सरकारी यंत्रणेंत तोहि अगदी चपखल बसला की नाही !

*

देशांतील लोकशाही अनेक मार्गांनी पोखरली जाते. भांडवलदार कंपन्या राजकीय पक्षांना देणग्या देऊन हेंच भ्रष्टाचाराचें कार्य करीत असतात. सर्वसत्ताधारी कॉंग्रेसने मात्र भांडवलदारांच्या पैशावर निवडणुका लढविल्या व भांडवलदारांनीहि कॉंग्रेसच्या बळावर आपली मक्तेदारी वाढवली. कॉंग्रेस शासनाची वाटचाल जसजशी सरकारी कारखानदारी वाढविण्याच्या व खासगी भांडवलदारी नियंत्रित करण्याच्या मार्गाने होऊं लागली तसतशा कॉंग्रेससाठी मोकळ्या असलेल्या या पैशाच्या पिशव्यांच्या नाड्या आखडल्या. स्वतंत्र, जनसंघावर भांडवलदार अधिक विसंबू

लागले. तिकडे पैशाचा ओघ जाऊं लागला. स्वाभाविकच 'मला नाही, मग तुलाहि नाही' या वृत्तींतून कंपन्यांच्या देणग्यांवर नियंत्रणें आणण्याची भाषा सुरू झाली व तसें विधेयक संसदेने आता संमत केलें आहे.

पण तेवढयाने लोकशाही भ्रष्ट करण्याची सारी साधनें बंद होत नाहीत. काळ्या पैशाचा मोठा वापर उमेदवारांसाठी व्यक्तिगत केला जातो व अशा संसद-सदस्यांचा विशिष्ट गट त्या शेठजींच्या मागे जुटीने उभाहि राहतो. "इस हाथसे दे, उस हाथसे ले।" याला आळा कसा बसणार? बिर्लांचें साम्राज्य हें या भ्रष्टाचारी षड्यंत्राचें बोलकें उदाहरण आहे. या साम्राज्याला सुरुंग लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या चंद्रशेखरांवरच शिस्तभंग होऊं पाहत आहे. भ्रष्टाचाराचीं मुळें अशी खोलवर गेलीं आहेत. बिर्ला-कारखानदारींतील हजारो कामगारच जेव्हा याविरुद्ध आपली शक्ति पणाला लावतील तेव्हाच हें षड्यंत्र मोडेल. चंद्रशेखर बिचारे एकाकी लढत आहेत. येतां-जातां वर्गलढयाची भाषा ऐकवणाऱ्या व भांडवलदारांवर आग पाखडणाऱ्या कामगार-संस्था काय करीत आहेत?

लोकशाही जशी मक्तेदार भांडवलदारांकडून भ्रष्ट होते तशीच परराष्ट्रांकडूनहि पैसा पेरून ती खिळखिळी केली जाते. राज्यसभेंत गांधीवादी नेते श्री. रामचंद्रन् यांनी म्हटल्याप्रमाणे डाव्या गटाच्या राष्ट्रांकडूनहि जशी ही पेरणी होते तशीच उजव्या गटाच्या राष्ट्रांकडूनहि होते. साम्यवादी विचारसरणीच्या वृत्तपत्रांना जाहिरातींच्या रूपाने पैसा दिला जातो, छापखान्यांना कामें दिलीं जातात व भरमसाट बिलांच्या रूपाने पैशांची मदत होते. शिक्षणसंस्थांना देणग्या दिल्या जातात. एक ना अनेक प्रकार.

खासदार भूपेश गुप्त यांनी तर गृहमंत्र्यांना स्वच्छच विचारलें की, परकीय पैशाचा वापर निवडणुकींत झाला हें आपण गुप्तचर माहितीखात्याच्या अहवालानुसार मान्य करतां ना! पण हा पैसा कोणाकडून व कोणत्या पक्षांना वा व्यक्तींना मिळाला हें मात्र उघड सांगत नाही. गुप्त यांनी तर उघड आरोप केला की, डाव्या विचारसरणीच्या पत्रांवर फिर्यादी करण्यासाठी सी. आय्. ए. चा पैसा मिळाला. सेन यांनी दाखल केलेला खटला लढविण्यासाठी छगला यांना दरदिवशीं तीन हजार रुपये देण्यांत आले. बी. एम्. कौल यांच्या प्रकाशनांत व जॉन स्मिथ यांच्या पत्रात तर हें बिंग फोडण्यांतच आलें. सरकार हा पैसा कसा थांबवणार? एशिया फौंडेशनला बंद केल्याचें एकाकी उदाहरण सांगून, कोणाचेंहि समाधान होणार नाही. तेव्हा कोणत्याहि राष्ट्राची भीडमुर्वत भारत सरकारने बाळगण्याचें कारण नाही. पी. एल्. ४८० चा पैसा असो किंवा पेट्रियट-लिंकच्या छापखान्याकडे जाणारा पैसा असो, तो थांबविणें आवश्यक आहे.

परराष्ट्रें स्वतःच्या हितसंबंधांबाबत किती जागृत असतात पाहा! चीन-रशिया सीमावादाच्या वार्ता आपण ऐकतों व मनीं समाधान पावतों. पण लडाख व

नेफावर रशियन वैमानिकांनी हेलिकॉप्टर्स उडवावयास स्पष्ट नकार दिला. कारण ते तो वादग्रस्त प्रदेश मानतात ! आपलें संरक्षणखातें एम्. ४ चीं सुधारलेली हेलिकॉप्टर्स जी. एम्. ८ तीं रशियाकडून घेऊं इच्छितें. त्यांतून पंचवीस हत्यारबंद सैनिक किंवा एकोणीस हत्यारबंद सैनिक व एक ७५ मि. मी. तोफ वा जीप नेतां येतें. या हेलिकॉप्टर्सची चांचणी चंदिगडहून व नंतर तेजपूरहून घेण्यांत आली असतां रशियन वैमानिकांनी लडाख व नेफा भागावर तीं उडविण्यास स्पष्ट नकार दिला. भारताने यापासून तरी कांही शहाणपणा शिकावा.

*

दिल्लींतील राजकारणाप्रमाणे तेथील हवाहि अस्थिरच आहे. वैशाखाचें ऊन तापूं लागलें नाही तोंच मध्यंतरीं वादळी पाऊस येऊन हवा पुन्हा थोडी थंड झाली. वारा पडत असल्याने श्वास रोखून निःस्तब्ध उभीं राहिलेलीं झाडेंहि मंद वाऱ्यावर डोलूं लागलीं. सध्या गुलमोहोर, शिरीष, अमलतास (बहावा) हे सर्वांगीं फुललेले आहेत. जेथे गुलमोहोराची व अमलतासाचीं झाडें शेजारीं शेजारीं लावलीं आहेत तेथे तर तरुतळीं हळदीकुंकवाचा सडाच घातल्याचा भास होतो. अमलतासाचे वैभव पाहवयाचें तर 'विंडसर प्लेस 'च्या गोलांत सायंकाळीं सहज फेरी मारावी ! अमलतासच्या पानागणिक लोंबत असलेले हातभर लांबीचे पिवळेधमक फुलांचे घोस जणू सहस्रधारांनी सुवर्णरस ओघळत असल्यासारखे भासतात. या दृश्याने माझ्यांतील चित्रकार जागा झाला. हें निसर्गसौंदर्य रेखाटण्याचा विचार माझ्या मनांत आला नाही तोंच माझ्या तोंडीं हास्य फुटलें. विन्स्टन चर्चिलच्या एका उद्गाराची मला आठवण झाली. सर विन्स्टन चर्चिल यांना एकाने विचारलें, "सरसाहेब, तुम्ही निसर्गचित्रेंच कां रंगवितां ?"

त्यावर लगेच ते उद्गारले, "कारण झाडें कधी आपली प्रतिकृति हुबेहूब रेखाटली नाही म्हणून तक्रार करीत नाहीत."

मात्र या दृश्याकडे अनिमिष नेत्राने पाहत अनेक तरुण-तरुणी सायंकाळीं या गोलाकारांत विहारास येतात. आजवर त्या 'गोल्ड स्पॉट' मागवून पीत, पण आता त्याची जागा घेतली आहे, उसाच्या ताज्या रसाने. पूर्वी चुकूनमाकून एखादा फेरीवाला लाकडी चरख घेऊन हिंडतांना दिसे. पण आता महाराष्ट्रांत व विशेषतः पुण्यांत ठायीठायीं दिसणाऱ्या 'रसवंत्या' येथेहि दिसू लागल्या आहेत. आलें, लिंबू घातलेलीं गारेगार रसाचीं काचपात्रें नाजूक बोटात धरून, ओष्टशलाका पुसली जाण्याची पर्वा न करतां रिकामीं केलीं जात आहेत. एखादा कदाचित् जीन व लिंबू घालूनहि या रसाची चव घेत असेल ! एकूण, उन्हाळी पेय म्हणून उसाच्या रसाने राजधानींत आता मान्यता मिळविली आहे.

संसदेचें उन्हाळी अधिवेशन संपलें. जातां जातां खासदारांचा दैनंदिन भत्ता व सोयी वाढविणार असल्याची 'सुवार्ता' कर्णी आल्याने अनेकांचे चेहरे खुलले होते· लोकसभेंत तर शेवटच्या दिवशीं अनुवादाची सोय न केल्याने कांहींनीं बंगालींत तर कोणी मराठींत तर कोणी कानडींत बोलून उपसभापतींना या आनंदांत अवखळपणें छळलें. मात्र बाहेर एक दिल्लीवासी म्हणाले, "एम्. पी.चा अर्थ आता 'मोअर पे' असा लावावयास हरकत नाही."

"ज्या दरिद्री देशांत दरडोई तीन आण्यांचेंहि उत्पन्न पडत नाही तेथे शासक व भांडवलदार यांच्या पिशव्या मात्र फुगत आहेत" असे परखड बजावणारे डॉ. लोहिया आता कुठे जिवंत आहेत !

**– केसरी, दि. २५ मे १९६९**

# इंदिरा गांधी यांचा अग्निबाण

## - १५ -

'रविवार दि. २० जुलै. अमेरिकेचें चांद्र-उपयान चंद्रभूमीवर रात्रीं १ वाजून ५३ मिनिटांनी उतरलें व बरोबर त्याच वेळीं दिल्लीच्या पालम विमानतळावर इंडियन एअरलाईन्सचें 'कॅरेव्हेल' संसदेच्या पावसाळी अधिवेशनासाठी मला घेऊन उतरलें. फरक इतकाच की, चांद्रयान हें १९२ तासांचा गतिमान व धोकादायक प्रवास पुरा करून अगदी ठरल्या वेळीं चंद्रभूमीवर उतरलें, तर आमचें विमान अवघ्या पावणेदोन तासांच्या प्रवासांत पांच तासांचा उशीर करून दिल्लीला कसें तरी पोचलें. अमेरिकेच्या वैज्ञानिक गतीचें व कार्यक्षमतेचें अपोलो—११ चा प्रवास हें लक्षण मानलें तर भारतीय अप्रगतीचें व अकार्यक्षमतेचें मोजमाप इंडियन एअर-लाईन्सच्या वेळापत्रकाची फूटपट्टी वापरून पाहवयास काय हरकत आहे ?

संसदेच्या पावसाळी अधिवेशनासाठी मी दिल्लींत आलों आहे. संसदेचें सभागृह हें साऱ्या देशाचें प्रतिनिधिगृह. तेथे दुसऱ्या दिवशीं पाऊल टाकलें तों सेंट्रल हॉलमध्ये गटागटाने जमून सारे कॉंग्रेसी खासदार गोंधळलेल्या मन:स्थितींत कुजबुजतांना आढळले. संसदेचें सभागृह बांधलेंहि आहे वर्तुळाकार. वर्तुळ हें मानसिक गोंधळाचें, अनिश्चितता यांचें द्योतक मानावयास हरकत नाही. त्याला ना आदि ना अंत ! सेंट्रल हॉलमधील चर्चेचा विषय स्वाभाविकच सिंडिकेटवर इंदिराबाईंनी केलेली मात व बँकांचें राष्ट्रीयीकरण हा होता. राजकीय अवकाशांत इंदिराबाईंनी आकस्मिक सोडलेल्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या अग्निबाणाने सारे चकित झाले. लोकसभेचे भूतपूर्व सभापति श्री. संजीव रेड्डी यांना राष्ट्रपतिपदाचे उमेदवार निवडून सिंडिकेटने बंगलोरला इंदिराबाईंना चकित केलें होतें. तेथील पत्रप्रति-

निधीशीं बोलतांना त्या नाराजीने म्हणाल्या होत्या की, " मैं खासी चकित हूँ। कारण यह है कि मतदान जिस ढंगसे हुआ उसके बारेमें क्या कहूँ, समझ में नहीं आता। यह कह सकती हूँ की शायद वह ढंग सदमा पहुचानेवाला था। " सिंडिकेटच्या या कारस्थानाला दिल्लीला आल्यावर इंदिराबाईंनी जें कृतीने उत्तर दिलें त्याने आता चकित व्हायची पाळी आली आहे सिंडिकेटवर. बंगलोरहून दिल्लीला पोचतांच संतप्त इंदिराजीनी प्रज्वलित केलेला अग्निबाण अवकाशांत झेपावतांच मंत्रिमंडळांतील अर्थमंत्री मोरारजीभाई प्रथम गळून पडले आणि बँकांच्या राष्ट्रीयीकरणाने या अग्निबाणाचा दुसरा टप्पा प्रज्वलित होऊन त्याने वेगाने आपल्या ध्येयमार्गाकडे कूच केलें. त्याच्या गतीकडे व जोषाकडे 'आ' वासूनच मंडळी पाहत राहिली. सिंडिकेटचे एक पुरस्कर्ते खासदार रागाने म्हणाले, " धिस् इज् बिगिनिंग ऑफ् दि एंड." अबला यत्र प्रबला तेथे दुसरें काय होणार ? यावर इंदिराजींच्या ध्येयाकडे कौतुकाने पाहणारे उत्तर प्रदेशांतील एक वृद्ध खासदार उद्गारले, " उगीच बोटें कां मोडतां ? शी इज् द ओन्ली 'मॅन' इन् द कॉंग्रेस. " संप्रती हा नवा पुरुषावतार !

पं. नेहरूंना कै. वल्लभभाई पटेलांकडून 'ही इज् द ओन्ली नॅशनॅलिस्ट मुस्लिम इन् द कॉंग्रेस " या बहाल झालेल्या पदवीपेक्षा पंडितजीच्या प्रियदर्शनी लेकीला प्राप्त झालेला वरील गौरव अधिक भूषणावह नाही का ?

राजकारण ही एक बौद्धिक लढाईच आहे. या लढाईचेहि सुपरिणाम किंवा दुष्परिणाम देशावर घडत असतात. त्यांत कॉंग्रेससारख्या केंद्रस्थानीं सत्तेवर असलेल्या पक्षांत दुफळी झाली व द्वंद्व सुरू झालें की साऱ्या देशाचें लक्ष स्वाभाविकच त्याकडे लागणार.

*

कॉंग्रेसमधील या द्वंद्वाचें स्वरूप बाह्यत: सत्तास्पर्धा असलें, तरी आंतरिक झगडा आहे तो नव्या कालखंडांतील अर्थस्वरूपाचा. मुक्त अर्थव्यवस्थेच्या व नियंत्रित अर्थव्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांतील ही लढाई आहे व तिला समर्थ भांडवलशाहीने नि साम्यवादी राष्ट्रांनी दुतर्फी बळ पुरविलें आहे. पं. नेहरूंपेक्षा त्यांची लेक ही विचाराने अधिक डावी तर खरीच, पण अधिक जिद्दी व तडफदार आहे. पंडितजी आपल्या लेकीला सत्तास्थानापासून दूर कां ठेवूं इच्छित होतें, हें आता कॉंग्रेस मुखंडांच्या ध्यानीं आलें असेल असें वाटतें. नेहरू-घराण्याची जनमानसावरील पकड सत्तेच्या खुर्चीवर कॉंग्रेस-पक्ष स्थिर करण्यास उपयुक्त वाटल्याने कॉंग्रेस मुखंडांनी इंदिराबाईंना महामंत्री बनविलें. इंदिराबाईंची स्वतंत्र वृत्ति ताटाखालील मांजर बनून राहण्याची नसल्याने, कॉंग्रेस-पुढाऱ्यांना त्यांचा स्वभाव व त्यांचीं धोरणें दिवसेंदिवस बोचूं लागलीं. मंत्रिमंडळांत गुजराल, व्ही. के. आर. व्ही. राव, सेठी इत्यादि तरुण सहकाऱ्यांचा एक गटच त्यांनी तयार केला व मोरारजी, यशवंतरावांपेक्षा

राजा दिनेशसिंग, फकरुद्दीन अली अहंमद, स्वर्णसिंग यांच्याशीं त्यांची अधिक सल्ला-मसलत होऊं लागली. 'सिंडिकेट'शीं सामना देण्यासाठी 'इंडिकेट' तयार झाली होती. आर्य चाणक्य होते द्वारकाप्रसाद मिश्र !

काँग्रेस मुखंडांच्या या अस्वस्थतेला प्रथम वाचा फोडली ती स. का. पाटील यांनी. स्वाभाविकच इंदिराजींच्या स्वतंत्र वृत्तीने दुखावलेल्यांचीहि साथ मिळून सिंडिकेटचें कारस्थान उभें राहिलें. पाटील यांना मोरारजींच्या शिफारशीने बनास काठा मतदार-संघांत तिकिट मिळालें. पाटील-कामराज दिल्लींत येऊन पोचले. पाटील यांची साखर-पेटी मुत्सद्देगिरी फसल्याने इंदिराबाईंवर बाजू उलटविण्याची भाषा बोलण्यापर्यंत त्यांचा राग पोचला होता. विशेष म्हणजे 'सिंडिकेट'च्या या कारस्थानांत महामंत्रि-पदाच्या आशेने मोरारजी व यशवंतराव या दोघांनाहि सामील करून घेण्यांत पाटलांना यश आलें होतें असें म्हणतात! हें खरे की खोटें, हें त्यांचें त्यांनाच माहीत ? पण इंदिराबाईंनी त्यासंबंधीचा आपला राग चंद्रभान गुप्त यांच्याजवळ व्यक्त केला होता. मोरारजींनी आपल्या राजीनाम्याचा खुलासा करतांच संसदेपुढे जो पत्रव्यवहार ठेवला त्यांतील याचा उल्लेख हा कांही अंशी बोलका मानावा लागेल. मोरारजी देसाई लिहितात –

" Guptaji met me this afternoon and told me about his talks with you with regard to me. I was amazed & shocked to hear from him that you told him that I was organizing a party obviously with a view to oust you from leadership. "

यशवंतरावांच्याहि दुटप्पी वागणुकीने इंदिराबाईंच्या मनांत त्यांच्याबद्दल अढी निर्माण झाली. यशवंतरावांनी राष्ट्रपतिपदासाठी गिरीच्या नांवाला जरी विरोध केला होता, तरी जगजीवनराम यांचें नांव इंदिराबाईंनी पुढे केलें असतां त्याला त्यांनी अनुकूलता दर्शविल्याचे कळतें. जगजीवनराम यांना आता राष्ट्रपति करण्यांत अडचण होती ती खरी इंदिराबाईंचीच. त्यामुळे मंत्रिमंडळांतील, तसेंच संसदीय कार्यकारिणींतील त्यांच्या गटाचे वजन घटणार होतें. यशवंतरावांनी इंदिराबाईंना जगजीवनराम यांच्या नांवाबाबत दर्शविलेली अनुकूलता पुढे कानाआड करून संजीव रेड्डी यांना ते परदेशच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वीच पाठिंबा देण्याचें आश्वासन दिलें होतें. एवढेंच नव्हे, तर तसें मतदानहि त्यांनी कार्यकारिणीत केलें. बंगलोरहून घाईगडबडीने मुंबईला जाऊन महाराष्ट्रीय खासदारांच्या बैठकींत त्यांनी रेड्डींच्या नांवाचा पुरस्कार व इंदिराबाईबद्दलची नाराजी व्यक्त केल्याचें बाहेर आलें आहे. यशवंतराव अंगाला तेल लावलेले सातारी पहिलवान आहेत ! सहसा पकडींत सांपडावयाचे नाहीत. फरिदाबाद व बंगलोर या दोन्ही ठिकाणीं त्यांनी आपल्या मुत्सद्देगिरीची छाप पाडलेली, संसदीय वक्तृत्वांत वाखाणणी मिळविलेली, कार-भारावर पोलादी पकड ठेवलेली. असें असतां केवळ दुटप्पी वागण्याच्या सवयीने या

वेळीं त्यांच्या पायाखालील वाळू सरकली व इंदिराबाईंना त्यांची जनमानसांतील मूर्ति डागाळण्यास या कृतीचा भरपूर उपयोग करून घेतां आला. यशवंतरावांबद्दल बोलतांना इंदिराबाई असें म्हणाल्याचें कळतें की, " अंतिम घडीमे रूख बदल लिया। किसका क्या रूख था, यह मुझे पहले से बताया ही नही गया। " यशवंतरावांनी या दुहेरी (की दुटप्पी ?) मध्यस्थीपेक्षा निश्चयाची, स्वाभिमानाची व पुरोगामित्वाची कास धरली असती, तर तें सर्वांनाच आवडलें असतें. तशीच सर्वांची अपेक्षाहि होती. पण आपल्या या दुहेरी वागणुकीमुळे मंत्रिमंडळांत राहिलेल्या यशवंतरावांबद्दल सर्वांना अविश्वास वाटतो. याउलट मोरारजी मंत्रिमंडळांतून बाहेर पडल्यानंतरहि त्यांच्यावरचा विश्वास कायम राहिला.

बंगलोरमधील या 'बनावा'चा सुगावा इंदिराबाईंना आधीच लागला असावा. इंदिराबाईंनी एक योजनापूर्वक डाव टाकला. सामाजिक आणि आर्थिक न्यायाचा उद्‌घोष करणारी व अर्थव्यवस्थेवर सरकारचें सर्वंकष नियंत्रण सुचविणारी एक 'टिप्पणी' त्यांनी कार्यकारिणीकडे पाठविली. यावर पाटलांनी खूपच तोंडसुख घेतलें व तरूण तुर्कांचीच ही पाठराखणी असल्याचें आपलें मत व्यक्त केलें. या धोरणाबाबत आपलेहि मतभेद असल्याचें मोरारजीभाईंनी सांगितलें. या वेळीं यशवंतरावांना धड इंदिराबाईंची बाजू सोडवतहि नव्हती व धरवतहि नव्हती. ते पुन्हा आपली मध्यस्थाची भूमिका खेळले व तरुण तुर्कांनी दिलेल्या 'टिप्पणी'मध्ये व इंदिराबाईंच्या 'टिप्पणी'मध्ये असलेला फरक त्यांनी स्पष्ट करून सांगितला. कामराज यांनीहि संतापामुळे साराच मामला बिघडेल असा सल्ला दिल्याने यशवंतरावांनी लिहिलेल्या ठरावाला मोरारजींनी संमति दिली; पण तीही आपल्या हट्टी स्वभावानुसार आपले मतभेद व्यक्त करून! मोरारजींचे हे मतभेद चंद्रशेखर यांच्या मदतीने इंदिराबाईंनी मोठ्या कौशल्याने उघडे पाडले व अशा रीतीने 'सिंडिकेट'ला शह देण्याच्या प्राथमिक खेळी पुऱ्या करून इंदिराबाई दिल्लीला परतल्या.

*

'सिंडिकेट'चे लोक बंगलोरला मोठ्या उत्साहांत होते. बाबूभाई चिनॉय, तारकेश्वरी सिन्हा वगैरे उपग्रहांचाहि राष्ट्रपतिपदाच्या उमेदवाराच्या निवडींत इंदिराबाईंचें नाक कापल्याचा आनंद उतू चालला होता. इंदिराबाई रागाच्या भरांत महामंत्रिपद सोडतील असे मनाचे मांडे सिंडिकेटचे पाठीराखे खात असतां आकाशांतून वीज कोसळावी तशी इंदिराबाईंनी मोरारजींना अर्थमंत्रिपदांतून मुक्त केल्याची वार्ता येऊन थडकली. यशवंतरावांसकट सारे हबकून गेले. मोरारजींना परत अर्थमंत्रिपदावर न घेतल्यास आपल्यालाहि राजीनामा देण्याशिवाय इलाज नाही, असें यशवंतरावांचें मनोगत दिल्लींत प्रसृत झालें. इंदिराबाई सर्व

शक्तिनिशी ' सामना देण्यास उभ्या ठाकल्याच होत्या. त्यांची ही चाल पाहून व वसंतराव नाईक आदींच्या दूरदर्शी सल्ल्यामुळे यशवंतरावांचा राजीनामा पुन्हा खिशांत गेला व त्यांची पारंपरिक मध्यस्थाची भूमिका सुरू झाली, पण तिला यश येणें सुतराम् शक्य नव्हतें.

दरम्यान इंदिराबाईंनी चौदा बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा वटहुकूम काढून 'सिंडिकेट'वर पुरी मात केली. मोरारजींचा राजीनामा लोकमानसांतून सपशेल पुसला गेला. इंदिराबाईंच्या धैर्याबद्दल देशांतून हजारो अभिनंदनपत्रांचा खच त्यांच्या घरीं पडला. 'सिंडिकेट'चे मुखंड तोंड खाली घालून बसले. ' कोयलेकी दलाली, मूह काला ' असें झालें.

मोरारजीच्या लोकसभेंतील वक्तव्याला स्वतंत्र पक्षाकडून काय तें प्रोत्साहन मिळालें. भारत-चीन युद्धानंतर झालेल्या कृष्णमेनन यांच्या हकालपट्टीबाबत जसे कोणीहि अश्रु गाळले नाहीत, तसेच बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या पार्श्वभूमीवर मोरारजींबद्दलहि कोणीं दु:ख व्यक्त केलें नाही. विजयकाल हा पापकाल असतो हें ओळखून इंदिराबाई अजूनहि सावध आहेत. रेड्डींची निवड होईपर्यंत इंदिराबाईंना अधिक दुखविण्यास 'सिंडिकेट'हि आता तयार नाही. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला चव्हाण, कामराज, अतुल्य घोष यांनी तर पाठिंबाच दिला आहे.

अर्थमंत्रिपदावरून मोरारजींना दूर करण्याचा इंदिरा गांधी यांनी असा बेमालूम पेच घातला होता की, त्यांत तांत्रिक दोष काढून त्याबाबत इंदिरा गांधींवर अविश्वासाचा ठराव आणणें कोणालाच शक्य नव्हतें. पक्षनेता पक्षाच्या धोरणाच्या अंमलबजावणीला जबाबदार असतो व मंत्रिमंडळ महामंत्र्याला म्हणजेच संसदीय पक्षाच्या नेत्याला जबाबदार असतें, अशी इंदिरा गांधी यांची भूमिका असल्यामुळे, यशवंतरावांनी आपल्या मध्यस्थाच्या भूमिकेला अनुसरून काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकींत खासदार गुलाबराव पाटलांकडून 'मोरारजींना परत घ्यावे ' असा विनंतीवजा ठराव मांडविला. त्यांतील 'विनंती' हा शब्द कसा गळला कोण जाणे, पण इंदिराबाईंनी, यापेक्षा सरळ अविश्वासाचा ठराव कां मांडीत नाही असें सुनावून तो ठराव लगेच झटकून टाकला. " पक्षाच्या पुढाऱ्याला संपूर्ण निर्णयस्वातंत्र्य असलें पाहिजे " ही इंदिराबाईंची आहे आजची घोषणा. दुसरें कांहीहि ऐकण्यास त्यांची तयारीच नाही. " मग काँग्रेसमधील ऐक्याची भाषा काढूं नका " असें कोणी म्हणत असलें, तरी इंदिराबाईशीं सामना देण्याऐवजीं प्रत्येक जण एकेक पाऊल मागेंच घेत आहे. इंदिराबाईंनी आक्रमण हें संरक्षणाचें उत्तम साधन मानून तडफदार हल्ला चढविला, तर 'सिंडिकेट' नव्या आक्रमणासाठी तूर्त पिछेहाट हें सूत्र आता घोकीत बसली आहे. इंदिराबाईंची ही मुत्सद्देगिरी पाहिली की, आपण 'नेहरू'हि आहोंत आणि 'गांधी'हि आहोत हें त्यांनी सिद्ध केलें आहे, असेंच म्हटलें पाहिजे.

बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे 'तरुण तुर्क' खुषींत आहेत. प्रे. निक्सन यांनी म्हटलें आहे की, " Radicals of the Right & Radicals of the Left are a small minority in the nation. But their influence is far greater than their number because they are so active and so noisy." 'तरुण तुर्कां'ची अवस्था तशीच आहे.

तरुण तुर्कांनी पुरस्कार केला म्हणून बँकांचें राष्ट्रीयीकरण इतक्या घाई-गडबडींत झालें असें मानणें निखालस चुकीचें ठरेल. त्याचें खरें कारण राजकीय गरज हेंच होतें, हें आता उघड झालें आहे. पण या राष्ट्रीयीकरणाचीं फळें सामान्य जनतेच्या मुखीं पडणार का, हा खरा प्रश्न आहे. विम्याचें राष्ट्रीयीकरण झालें, पण आयुर्विमा महामंडळाची गुंतवणूक मोनोपली कमिशनच्या अहवालांतील पहिल्या दहा खासगी कंपन्यांतच झाली. इंडस्ट्रियल लायसेन्सिग पॉलिसी कमिशनचा अहवालहि, २५ कोटि भांडवल धारक कंपन्यांनाच या गुंतवणुकीचा फायदा मिळाल्याचें व बिर्लांच्या कंपन्यांनी तर त्याचा सर्वांत अधिक फायदा उठविल्याचें सांगतो. स्टेट बँकेची गुंतवणूक मोठ्या भांडवलदारांच्या कारणीं लागते. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाबद्दल अभिनंदन करणाऱ्यांनाहि हा संशय व्यक्त केल्याशिवाय राहवलें नाही. नोकरशाहीच्या कात्रींत भांडवल सापडून त्याचा जाच लहान धंदेवाल्यांना व सामान्य जनतेला न होवो म्हणजे झाले !

*

दिल्लीत चंद्रविजयाबद्दल सर्वत्रच अतोनात कुतूहल होतें. चंद्रविजयामुळे बँकांचें राष्ट्रीयीकरणहि लोकांच्या मनांतून पुसलें गेलें. नव्या दिल्लींतील शिकंदरा रस्त्यावरील अमेरिकन माहिती खात्याच्या कचेरींत ठेवलेली चांद्रउपयानाची प्रति-कृति पाहण्यास लोकांच्या रांगा लागल्या होत्या. रात्रीं चांद्रउपयान चंद्रभूमीवर उतरल्यापासून कित्येकांनी सारी रात्र रेडिओ कानाशीं लावून जागून काढली. " आर्मस्ट्राँगचें चंद्रावरील पहिलें पाऊल त्याच्या दृष्टीने केवळ एक पाऊल होतें. पण मानवसमाजाच्या दृष्टीने ती एक मोठी झेप आहे " असे उद्‌गार एका सामान्य दिल्लीकराने मला ऐकवलें. त्यांत केवढा तरी अर्थ आहे ! पण या वैज्ञानिक प्रगतीची जाणीव भारतीयांना व्हावयाची असेल, तर त्यांनी पूर्वपारंपरिक कोती दृष्टि व दंभ प्रथम टाकून दिला पाहिजे व आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोण स्वीकारला पाहिजे. मला या संदर्भांत सहज एक गोष्ट आठवते –

एक विद्वान् गृहस्थ नदीकिनारीं आले व पैलतीरावर जाण्यासाठी होडीची वाट पाहूं लागले. तेथे धुनी पेटवून बसलेल्या एका ऋषीने त्यांची विचारपूस केली व " वाट कशाची पहातां, " असें विचारलें.

गृहस्थ उद्‌गारले, " होडीची ! "

त्यावर तो ऋषि तुच्छतेने म्हणाला, “एवढी नदी आपल्याला पार करतां येत नाही, तर मग समाजाला भवसागरांतून पार नेण्यास आपली विद्वत्ता कशी काय उपयोगी पडणार ?”

एवढें बोलून तो ऋषि आपल्या योगसाधनेच्या शक्तीवर पैलतीरीं जाऊन क्षणांत परतला.

गृहस्थाने त्याला शांतपणें विचारलें, “या योगसिद्धीसाठी आपणांस किती वर्षें तपश्चर्या करावी लागली ?”

“तीस वर्षें मी हिमालयांत तप-साधना केली,” ऋषिमहाराज अभिमानाने म्हणाले.

“पैलतीरीं जाण्यासाठी या होडीचें काय भाडें पडतें ?” गृहस्थाने विचारलें.

ऋषिमहाराज म्हणाले, “दहा पैसे.”

यावर ते गृहस्थ गालांतल्या गालांत हसत म्हणाले, “दहा पैशांसाठी आपण आयुष्याचीं ३० वर्षें फुकट घालविलींत. कारण आपली योगसाधना आपल्याबरोबर नाहीशीं होणार आहे. मानवसमाजाला तिचा कांही उपयोग नाही.”

आपण कोणासारखे वागणार आहोंत ? ऋषिसारखे की त्या गृहस्थासारखे ?

**– केसरी, दि. २७ जुलै १९६९**

# 'सिंडिकेट'ला तडाखा

- १६ -

लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथि दोन दिवसांपूर्वीच ( १ ऑगस्टला ) साऱ्या देशभर साजरी झाली. दिल्लींतहि टिळक-मार्गावरील लोकमान्यांच्या पुतळ्याला हंगामी राष्ट्रपति हिदायतुल्ला यांनी पुष्पहार घालून लोकमान्यांना श्रद्धांजलि अर्पण केली. या पुण्यतिथीच्या निमित्ताने लोकमान्यांच्या जीवनचरित्राचीं पानें माझ्या डोळ्यांपुढे फडफडूं लागलीं. काँग्रेसची प्रस्थापना, मवाळांचा काँग्रेसमधील प्रभाव, सुरतेच्या वादळापूर्वी जमा झालेले मेघ, लोकमान्यांचें धीरोदात्त वर्तन, त्यांचा स्वराज्याचा, स्वदेशीचा मंत्र, एक ना अनेक !

मन तरी कसें विचित्र आहे पाहा ! इतिहासांतील या घटनांची पुनरावृत्ति तें वर्तमानांत शोधू लागतें. त्या काळांतील मवाळांच्या बैठ्या राजकारणाला ह्यूम-साहेबहि कंटाळले होते. ते म्हणत –

"You meet in Congress, you glow with a momentary enthusiasm, you speak much and eloquently; but the Congress closes and every one of you goes off straight away on his private business ! Years ago I called on you to be up and doing, years ago I warned that, nations by themselves are made, and have you heeded these counsels. You have indeed, ever eagerly clamoured for and vainly clutched at the crown but how many of you will touch the cross with your fingertips ?"

आजच्या कांग्रेसची अवस्था यापेक्षा कांही वेगळी आहे का ? अधिवेशनाच्या मंडपांत काँग्रेस-पुढारी ध्येयवादाच्या गर्जना करतात व तेथून परतल्यावर सत्तेच्या गुबगुबीत खुर्चीवर झोपी जातात.

अशा चैतन्यहीन काँग्रेसला धक्का देण्याचें लोकमान्यांनी ठरविलें होतें. त्यांनी 'नेव्हिनसन'ला सांगितलें की –

" Under these disappointments, we extremists have determined on other methods. It is a matter of temperament and the younger men are with us. Our motto is self reliance, not mendicancy."

आजच्या काँग्रेसबाबत इंदिरा गांधी व तरुण पुढारी हेंच म्हणत आहेत. भुवनेश्वरला समाजवादी समाजरचनेची भाषा केली त्याचें काय ? लोकमान्यांच्या काळांत झगडा होता मवाळ व जहाल यांच्यांत ! आज झगडा आहे जीर्णमतवादी व समाजवादी यांच्यांत !

आजच्या काळांतील मोरारजी देसाई यांच्याप्रमाणेच सर भालचंद्र भाटवडेकरांसारखे मवाळाग्रणी त्या काळांतहि नीतितत्त्वाचीं प्रवचनें झोडीत.

" Public workers must be honest; they must avoid ostentatiousness and devote themselve to truth. Our efforts must be persistent but must not spoil our case by impatience and extremism, " अशीं मवाळांचीं प्रवचनें चालू असतां, तिकडे ब्रिटिश साम्राज्यवादाचा भस्मासुर मात्र सर्वत्र आग पाखडीत होता आणि आज मोरारजींचीं प्रवचनें चालू असतां भांडवलदार देशांतील संपत्तीचें केंद्रीकरण करण्यांत यशस्वी ठरूं पाहत आहेत. वीस बड्या भांडवलदारांच्या हातीं नव्वद टक्के संपत्ति केंद्रित झाली. तीन पंचवार्षिक योजनांची फलश्रुति ठरली ती ही की, महत्त्वाचे ७३ मोठे कारखाने वीस उद्योगपतींच्या हातीं गेले. संख्यात्मक गुंतवणूक करणाऱ्या एल्. आय्. सी., युनिट ट्रस्ट. स्टेटबँक इत्यादि सार्वजनिक संस्थांच्या ८०८ कोटींच्या गुंतवणुकींतील १८३ कोटि रुपये या वीस भांडवलदारांच्या पदरीं पडले.

मवाळांच्या अर्ज-विनंत्यांच्या राजकारणाविरुद्ध उठाव करणाऱ्या व कलकत्ता काँग्रेसमधील ठरावाच्या अंमलबजावणीचा हट्ट धरणाऱ्या टिळकांवर ते काँग्रेस फोडू इच्छित असल्याचा आरोप करण्यांत आला. आजहि पुराणमतवादी वृत्तीच्या 'सिंडिकेट'विरुद्ध तरुणांना संघटित करणाऱ्या व भुवनेश्वर काँग्रेसमधील समाजवादी ठरावाचा आग्रह धरणाऱ्या इंदिराजींवर तसाच आरोप होत नाही काय ?

टिळकांनी सुरतेला त्या आरोपांना सडेतोड उत्तर दिलें –

" I have come with no desire to split the Congress, nor do I wish to quarrel with the Moderates. In point of fact, what can we achieve by breaking up the Congress ? What purpose can we serve by forming a separate organization ? We only insist on sticking to the resolutions passed in the Calcutta Congress. We are determined not to allow the Congress to go back on its accepted programme. We have raised the banner of the New Party, whose

aim is not to harm the National Congress, but to make it stronger. Those who hold the reins of power in the Congress have known, by their attitude on more than one occasion, that they intend to sabotage the programme of the Calcutta session. This must not be allowed to happen and I appeal to the people to help me in averting this calamity."

टिळकांच्या या सुरतेंतील उद्‌गारांत 'कलकत्ता' या शब्दाच्या जागीं 'भुवनेश्वर' व 'मॉडरेटस्'च्या जागीं 'कॉञ्झर्वेटिव्ह' किंवा 'सिंडिकेट' एवढा बदल केला, तर हेच उद्‌गार इंदिराजींच्या तोंडींहि आज चपखल बसणार नाहींत काय? गुजरातचे एक माजी मंत्री श्री. रसिकलाल पारीख एका मुलाखतींत नुकतेच म्हणाले की, "बऱ्याच काळानंतर पहिल्यांदा कॉंग्रेसला भवितव्याची जाण असलेला पुढारी मिळाला. इंदिराजी पक्षाला नवी विचारप्रणालि देऊं पाहत आहेत व त्यामुळेच जुने पुढारी हादरले आहेत." मोरारजींच्या तक्रारीबाबत ते म्हणाले, "मोरारजीभाईंनी अकारण अकांडतांडव चालविलें आहे. १९६३ च्या सप्टेंबरमध्ये जीवराज मेहतांच्या विरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याचा उद्योग मोरारजीभाईंनी केला होता हें त्यांना आठवत नाही काय? जीवराजभाईंचा दोष काय होता, तर ते मोरारजीभाईंच्या आज्ञा प्रमाण मानावयास तयार नव्हते!"

श्री. रसिकलाल पारीख यांचा हा घरचा अहेर मोरारजीभाईंना घशाखालीं उतरविणें जरा जडच जाईल! कसेंहि असो, एक गोष्ट खरी की, इंदिराजींच्या समाजवादी गटाने जनतेचें मन ओळखून टाकलेलीं पावलें धाडसाचीं व धोक्याचीं वाटलीं, तरी कॉंग्रेस पक्षाला नवा आशय देणारीं ठरतील असें अनेकांना वाटतें. उलट सिंडिकेट आपल्या जुन्याच मार्गाला चिकटून राहणार. थोडक्यांत, 'सिंडिकेट' फार तर सुधारणावादी ठरणार तर इंदिराजींचा समाजवादी गट क्रांतिवादी मानला जाणार.

बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचें विधेयक लोकसभेंत आलें तेव्हाचें सभागृहांतील चित्र मोठें बोलकें होतें. पहिल्या बाकावर महामंत्री इंदिराजी व विधेयक मांडणारे कायदामंत्री श्री. गोविंद मेनन वसले होते, तर त्यांच्यामागे दुसऱ्या बाकावर गुजराल, व्ही. के. आर्. व्ही. राव, श्री. दिनेशसिंग, भगत, सेठी, भानुप्रकाशसिंग, रघुनाथ रेड्डी वगैरे नवे तरुण उपमंत्री – 'किचन कॅबिनेट' – फळी धरून वसले होते. श्री. मोरारजी, यशवंतराव, कामराज, स. का. पाटील या साऱ्या वृद्ध कॉंग्रेसनेत्यांची सभागृहांतील अनुपस्थिति प्रकर्षाने जाणवत होती. इंदिराजी मोठ्या खुषींत व उत्साहांत होत्या. त्यांच्या तरुण रक्ताने संभाव्य धोक्याबाबत त्यांना बेफिकीर बनविलें होतें व समाजवादाची नौका पैलतीराला लावण्यासाठी कंबर कसल्याने त्यांना नवी शक्ति प्राप्त झाली होती.

टिळकांचा मवाळांबरोबरचा झगडा व आजचा इंदिराजींचा सिंडिकेटबरोबरचा झगडा यांची तुलना जशीच्या तशी सर्वांगीं परिपूर्ण जमते का नाही हें तपासणें केव्हाहि योग्य ठरणार नाही. टिळकांचा त्याग, धैर्य, विद्वत्ता व युगप्रवर्तक नेतृत्व यांच्याशीं इंदिराजींची तुलना होऊं शकणार नाही. पण ही तुलना मर्यादित आहे हें ध्यानीं घेतलें म्हणजे झालें. क्वचित् असेंहि असेल की, माझ्या मन:पटलावर उमटलेलें चालू घटनांचें चित्र मला उगाचच इतिहासकालाचें प्रतिबिंब वाटत असेल.

ह्यावरून एक गोष्ट आठवली –

एक राजा मोठा कलाप्रिय होता. गावोगावचे अनेक कलावंत आपली कला त्याच्यापुढे सादर करून त्याची वाहवा मिळवून जात. एकदा असेच दोघे कलंदर राजापुढे उभे राहिले.

राजाने विचारलें, "आपण कोण ?"

त्यावर एक म्हणाला, "मी चित्रकार आहें."

दुसऱ्याकडे राजाने दृष्टि वळवतांच तो म्हणाला, "मी विचित्रकार आहें."

राजा हसला. त्याने दोघांना एका मोठ्या दालनांत नेलें व आपल्या कलेचा आविष्कार करण्याची विनंती केली. परीक्षा घेण्यासाठी राजा आठवड्याने येणार होता.

चित्रकाराने दालनाची एक भिंत निवडून त्यावर मानवजन्माची कहाणी आपल्या कुशल कुंचलीने रेखांकित केली. विचित्रकाराने समोरची दुसरी भिंत निवडून ती घासण्यास सुरुवात केली. चित्रकार जग विसरून रंग भरीत होता व विचित्रकार भिंत घाशीत होता.

आठवड्यानंतर राजेसाहेब दालनांत आले. चित्रकाराच्या कलाकृतीवरील पडदा सरकविण्यांत आला. साऱ्यांचे डोळे त्या चित्रावर खिळले. महाराजांनी मुक्तकंठाने त्याच्या कला-कुशलतेची स्तुति केली.

मग विचित्रकाराकडे वळून ते म्हणाले, "आता आपली कलाकृति पाहूं."

विचित्रकाराने भिंतीवरील पडदा दूर सारला आणि आश्चर्य असें की, समोरचें चित्र हुबेहूब याहि भिंतीवर दिसूं लागलें.

विशेष म्हणजे प्रत्यक्ष राजेसाहेबांची प्रतिकृतीहि तेथे उमटली होती. त्या चित्राला ते साक्षीभूत झाले होते.

विचित्रकाराने भिंत घासून घासून आरशासारखी लखलखीत केली होती.

राजेसाहेब विचित्रकाराकडे पाहून अर्थपूर्ण हसले.

*

बँकांचें राष्ट्रीयीकरण व मोरारजींची अर्थमंत्रिपदावरून हकालपट्टी या दोन घटनांची कथा व पार्श्वभूमि हळूहळू दिल्लींतील कुजबुजींतून आता संपूर्ण बाहेर आली आहे. मागील वार्तापत्रांत मी या राजकारणी डावाचे आर्यचाणक्य श्री. द्वारका-प्रसाद मिश्र असल्याचें लिहिलें होतेंच. त्यांच्या जोडीला इंदिराजींनी ज्यांची सल्ला-मसलत घेतली ते फकरुद्दीन अली अहंमद व श्री. हकसर यांचाहि या निर्णयांत मोठा वांटा आहे. या निर्णयांना बाहेरचें बळ मिळविलें उमाशंकर दीक्षित व के. के. शहा यांनी. बंगलोरलाच श्री. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या खोलींत श्री. जगजीवनराम व श्री. स्वर्णसिंग यांच्याबरोबर चर्चा होऊन मोरारजींच्या हकालपट्टीचा निर्णय निश्चित झाला होता. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाबाबत रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एल्. के. झा यांना जरी बोलाविलें गेलें तरी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय प्रत्यक्ष केला गेला आहे याचा थांगपत्ता त्यांना लागूं दिला गेला नाही. इंदिराबाईंच्या सचिवांनी कोणत्या बँका त्यांत दाखल कराव्या याची यादी तयार केली व मंत्रिमंडळापुढे मांडून ती तडकाफडकी संमत करून घेतली गेली. मोरारजींबरोबर राजीनामा देण्यास तयार झालेल्यांचे ताबूत, बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या निर्णयाने थंडे पडले.

'सिंडिकेट' इंदिराबाईंचा हा हल्ला मुकाटयाने पड खाऊन सहन करील असें मानणें व्यर्थ आहे असें बोललें जात आहे. राष्ट्रपतींच्या निवडणुकीपर्यंत दुतर्फा शांतता पाळली जात असली तरी त्यानंतर पुन्हा कांही चकमकी व्हाव्यात अशी अपेक्षा केली जात आहे. पण त्यांत फारसें तथ्य आहे असें मला वाटत नाही. 'सिंडिकेट'मधील सर्वांचींच मनें एकमेकांविषयी आता संशयग्रस्त बनली आहेत. त्यांत इंदिराबाईंनी "मला खतम् करूं पाहणाऱ्यांना, त्यांचीं सारीं कुलंगडीं विरोधी पक्षाच्या हातीं देऊन राजकीय जीवनांतून उठविल्याशिवाय मी राहणार नाही" अशी सरळ धमकी दिल्याने अनेकांनी आता शिस्तशीर माघार घेतली आहे. राष्ट्रीयीकरण केलेल्या बँकांच्या कॉर्पोरेशनवरील नवी नियुक्ति व मंत्रिमंडळाची पुनर्रचना याबाबतच्या वावड्या हवेंत तरंगत ठेवल्या गेल्या आहेतच. राष्ट्रपतींच्या निवडणुकीपूर्वी उपराष्ट्रपतींच्या उमेदवारीचे अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर करून इंदिराबाईंनी आणखी एक डाव टाकला आहे.

राष्ट्रपतींच्या निवडणुकींत विचार करण्याजोगीं नांवें तीन आहेत. श्री. संजीव रेड्डी, श्री. गिरी व स्वतंत्रांनी पुरस्कारिलेले श्री. चिंतामणराव देशमुख. एकूण या मतदार संघाची (इलेक्टोरल कॉलेज) मते आठ लक्ष त्रेपन्न हजार. त्यांतील स्वतंत्र, कांही जनसंघ व कांही भाक्रांद यांची मतें एकत्र झालीं तरी देशमुखांना पहिल्या पसंतीचीं फार तर एक लाख मतें मिळतील. गिरींना कम्युनिस्ट (डावे-उजवे), संयुक्त समाजवादी, द्र. मु. क., अकाली व मुस्लिम लीग या विरोधकांची व कॉंग्रेस-मधील कांही मतें पडणार, स्वाभाविकच ती देशमुखांपेक्षा अधिक असणार. खासदार श्री. जॉर्ज फर्नांडिस यांनी यासाठीच देशमुखांनी उभे राहूं नये व गिरींच्या पायांत

पाय घालू नये असें सुचविलें होते. काँग्रेसची पहिल्या पसंतीचीं सर्व मतें व सर्व विरोधकांचीं एकूण मतें यांत तीस हजार मतांचे काय ते अंतर आहे. साधारणतः सव्वीस काँग्रेस सदस्यांनी विरोधकांच्या उमेदवाराला मतें दिलीं की, काँग्रेस उमेदवार पराभूत होऊं शकतो. म्हणून या वेळीं सर्व विरोधीपक्षीय एकत्रपणें गिरींच्या मागे उभे राहिले, तर विरोधकांचा राष्ट्रपति निवडून येणें सहज शक्य आहे.

या साऱ्या राजकारणांत संयुक्त समाजवादी साम्यवादी गटाबरोबरच वागत आहेत, पण प्रजा-समाजवादीयांची चाल मात्र सर्वांनाच कोडें टाकीत आहे. प्रजा-समाजवादी पक्षाचे एक पुढारी बॅ. नाथ पै यांना माझे एक कर्नाटकी खासदार मित्र भेटले. त्यांनी त्यांना आपल्या मळचावर येण्यासाठी आमंत्रण दिलें. त्यावर नाथ प म्हणाले, "वा ! वा ! मला तें फारच आवडेल, पण तोपर्यंत कम्युनिस्टांनी सारा देश खाल्ला नाही तर !" प्रजा-समाजवाद्यांचा हा कम्युनिस्टविरोध इतका आत्यंतिक अवस्थेला पोचला आहे की, त्यामुळे त्यांचें तारतम्यहि आता सुटू लागलें आहे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणांत ते इंदिराबाईंबरोबर आहेत. एवढेंच नव्हे तर त्यांचे अध्यक्ष श्री. ना. ग. गोरे यांनी आयात-निर्यातीचेंहि राष्ट्रीयीकरण त्वरित करावें असें सुचविलें आहे. मात्र राजकीय बाबतींत ते चालत आहेत स्वतंत्रांचें व जनसंघाचें उपरणे धरून. आर्थिक विषयांत पुरोगामी, क्रांतिवादी व राजकीय विषयांत मात्र प्रतिगामी, प्रतिक्रांतिवादी ही सांधेजोड कशी जमतें हे एक परमेश्वरच जाणे ! हो, पण असेहि कांही प्राणी असतातच की !

ब्रह्मदेवाने सृष्टि निर्माण केली. मानवांत पुरुष-स्त्री, प्राण्यांत पशु-पक्षी, घोडा, गाढव अशी सारी सृष्टि रचली. श्रमलेले ब्रह्मदेव विष्णूच्या नाभीकमलांत विसावले. तेवढ्यांत कांही जीव त्यांच्याकडे तक्रार घेऊन आले. ब्रह्मदेवांनी विचारलें, "बाबांनो, तुम्हांला मर्त्य लोकांत वास करण्यासाठी विविध रूपें दिलीं तरी अजून तुमची तक्रार आहेच का ?" त्यावर ते जीव म्हणाले, "तुमची ही केवळ हुकूमशाही आहे. तुम्ही आम्हांला पुरुष तरी बना, नाही तर स्त्री तरी व्हा, पशु नाही तर पक्षी व्हा, घोडा नाही तर गाढव व्हा असें सांगणार ! आम्हांला हें मान्य नाही. आम्हांला पुरुष व्हावयाचें नाही, स्त्री व्हावयाचें नाही, पशु व्हावयाचें नाही, पक्षी व्हावयाचें नाही, घोडा व्हावयाचें नाही, गाढव व्हावयाचें नाही, तुमचा जुलूम आम्हांला मान्य नाही !"

यावर ब्रह्मदेव हसून म्हणाले, "तथास्तु" आणि तृतीय पंथ निर्माण झाला, वटवाघूळ, खेचर निर्माण झाले. तसा भारतीय राजकारणांत प्रजासमाजवादी पक्ष निर्माण झाला ! त्यामुळे सारी प्रजा त्यांच्यापासून दुरावली व समाजवादहि शिल्लक राहिला नाही. राष्ट्रपतिपदासाठी ते कोणाला मतें देणार हें कोडेंच आहे ! गोरे यांनी सुचविलेल्या तिसऱ्या पर्यायाप्रमाणे कदाचित् ते कोणालाच मतें देणार नाहीत.

दिल्लीचें वातावरण हे असे काळे मेघ दाटल्याने कोंदटलें आहे. अंगांतून घामाच्या धारा वाहत असतात. मग एकदम एखादी सर कोसळते. जरा हायसें वाटतें

न वाटतें तों पुन्हा घामाच्या धारा वाहूं लागतात. इंदिराबाई आणखी काय चमत्कार दाखवितात कोणास ठाऊक, या कल्पनेनेहि कांहींना घाम फुटत आहे, तर कांहींना नव्या मंत्रिमंडळांत तरी आपलें नांव येणार का नाही या विचाराने गदगदतें आहे. त्यांत अमेरिकेचे अध्यक्ष श्री. निक्सन यांची भेट ! त्यांच्याशीं झालेलीं बोलणीं ! पांच आशियाई देशांतील त्यांची ही भेट, ब्रेझनेव्ह यांनी आशियाच्या एकत्र संरक्षणाची जी योजना मांडली तिला प्रतिशह म्हणून तर नव्हे ना, या विचाराने रशियावादी मंडळींच्या अंगाची लाही होत आहे तर माओवाद्यांना रशियाचा व अमेरिकेचा हा आशियांतील क्रांतिवादी चळवळीवर 'शांतता व सहकार' या नांवाखाली दबाव आणण्याचा उद्योग असल्याचें भासत आहे.

अशा या कोंदटलेल्या वातावरणांत पावसाची सर आली की, खुषीने त्या सरी अंगावर घेत कोणी नाचत असेल तर तीं लहान मुलें ! दिल्लीमधल्या तंबूंतील शाळा त्यांना फार पसंत !

गरमियों की छुट्टी के बाद बरसात की छुट्टी ।

— केसरी, दि. ३ ऑगस्ट १९६९

# त्रिकोणाचा प्रभाव

- १७ -

संसदेचें पावसाळी अधिवेशन सुरू होऊन आता दोन आठवडे उलटून गेले आहेत. या वेळीं सुरुवातीपासूनच दोन्ही गृहांत एक प्रकारची अस्वस्थता नांदत आहे आणि प्रत्येक उगवत्या दिवसाबरोबर ती अधिकाधिक वाढत आहे.

इंदिराजींनी वटहुकमाच्या आधारे तातडीने केलेलें बँकांचें राष्ट्रीयीकरण समाजवादाच्या मार्गावरील ऐतिहासिक पाऊल म्हणून जरी गौरविलें गेलें असलें, तरी महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नावरील ही घिसाडघाई आता अनेकांना विचार करण्यास लावीत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या मनाई हुकमामुळे बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचें विधेयकहि घाईगडबडीने लोकसभेंत सादर करून संमत करून घ्यावें लागलें. त्यामुळे त्या विधेयकाच्या मसुद्यांतहि अनेक त्रुटि राहिल्या आहेत. माजी अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी प्रेस क्लबमधील आपल्या मुलाखतींत "बँकांचें राष्ट्रीयीकरण मी पूर्वतयारीशिवाय केलें नसतें," असें जें सांगितलें त्यांत पुष्कळच तथ्य असल्याचें आता आढळत आहे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे पाठीराखेंहि त्यामुळेच त्याच्या अंमलबजावणीबाबत साशंक आहेत.

इंदिराजींच्या ह्या कांहीशा घिसाडघाईच्या वागणुकीबद्दल नाराज असलेले अर्थतज्ज्ञ कारभाराच्या गाड्यास धक्का बसण्याची भीति व्यक्त करीत असले, तरी आज इंदिराजींनी सत्तास्पर्धेच्या पोटीं का असेना, पण बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा वटहुकूम काढून समाजवादी अर्थव्यवस्थेला पुन्हा एक नवी गति दिली हें नाकारतां येणार नाही. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचें धाडस करणाऱ्या इंदिराजी व त्यांचे सहकारी हे काय ते पुरोगामी व मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण आदि प्रति-

गामी असे ठोकळेबाज विधान मी करूं इच्छित नाही. पण कित्येक वेळेस विचारी अनिर्णयापेक्षा अविचारी निर्णय कोंडी फोडतो यांत शंका नाही.

राजकीय गरजेपोटीं का होईना, पण इंदिराजींनी कास धरली ती राष्ट्रीयीकरणाची. उलट मोरारजी-यशवंतरावांनी आधार घेतला तो स. का. पाटील यांनी सुकाणूं धरलेल्या सिंडिकेटच्या जहाजाचा. स्वाभाविकच इंदिराजींनी म्हटल्याप्रमाणें लढा उभा राहिला तो जनता विरुद्ध मूठभर काँग्रेसश्रेष्ठ असा. मोरारजींनाहि आता सिंडिकेटशीं आपले जुळलेले हे संबंध बरे वाटनासे झाले आहेत. त्यांनी आपल्या मुलाखतीत "१९६२ सालाप्रमाणें या वेळीं माझा 'सिंडिकेट'शीं संबंध नव्हता. उलट सिंडिकेटचा मी बळीच ठरलों" असें स्वतःचें समर्थन केलें आहे. श्री. यशवंतरावांनीहि समाजवादी समाजरचनेची आपण सदैव कास धरल्याची आता ग्वाही दिली आहे व त्यांनी खासगी बैठकींत अनेकांना उद्वेगाने विचारल्याचें ऐकतों की, "मी प्रतिगामी व फक्रुद्दीन, जगजीवनराम हे पुरोगामी मानावेत काय ?"

सत्तेवर स्वार झालेल्या 'इंडिकेट'च्या या वरिष्ठांचीं 'सिंडिकेट'च्या वरिष्ठांप्रमाणेंच खातीं तपासलीं, तर कांही वेगळें चित्र दिसणार नाही. थायलंडच्या तांदूळ-खरेदीबाबतचें स्विस् बँकेंत भरणा झालेलें कमिशन किंवा औद्योगिक परवान्यापोटीं बँकांतील फुगलेलीं मंत्र्यांचीं खासगी खातीं, सत्ता व स्वार्थ यांतील समीकरण मांडून दाखवितील व त्यांच्या समाजवादाचा अर्थहि स्पष्ट करतील. पण आज तरी कोणाचें व्यक्तिगत चारित्र्य कसें आहे हा प्रश्न नसून, कोण कोणतें 'लेबल' धारण करून वावरतो व त्या लेबलाचा समाजांत काय अर्थ मानला जातो हा आहे. यशवंतरावांच्या मनाची दोलायमान अवस्था हें लेबल धारण करतांनाच झाली. राजकारणांत काय किंवा इतर क्षेत्रांत काय, निर्णायक कृतीला फार महत्त्व आहे. उदाहरणार्थ, संस्थानिकांच्या तनख्याचाच प्रश्न घ्या. श्री. मोहन धारियांमार्फत यशवंतरावांनी हा प्रश्न उभा केला. सारा चार कोटींचा हा व्यवहार निस्तरण्यास मारे समाजवादी तत्त्वाचें अंगडें-टोपडें चढविलें गेलें. पण यशवंतरावांच्या दोलायमान वृत्तीमुळेच तो मोरारजींच्या हातीं गेला व त्यांच्या हातून आता तें बाळ इंदिराजींच्या पदरीं पडलें आहे. राष्ट्रपतीच्या निवडणुकीनंतर त्या तोहि प्रश्न निकालीं काढण्याचा प्रयत्न करतील यांत कांही शंका नाही.

*

या वेळीं राष्ट्रपतीच्या निवडणुकीला सार्वत्रिक निवडणुकीचें स्वरूप आलें आहे. गिरींच्या वतीनें त्यांचे चिरंजीव खासदारांना समक्ष भेटत आहेत, तर संजीव रेड्डींतर्फे श्री. निजलिंगप्पांच्या स्वाक्षरीची पत्रे सर्व खासदारांना गेलीं आहेत. नव्या दिल्लीतील अनेक विजेच्या पेट्यांवर व फलकांवर "गिरी हे नेहरूवादी असल्याने

तेच काँग्रेसचे खरे उमेदवार आहेत," असा मजकूर खडूने लिहिलेला आढळतो. सर्वोच्च न्यायालयांतील कांही वकिलांनी श्रीमती गांधी यांना पत्र पाठवून त्यांनी संजीव रेड्डींचा पुरस्कार करूं नये अशी विनंती केली आहे. ज्या गृहस्थाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयाने शेरे मारले आहेत असा गृहस्थ भारताचा पहिला नागरिक बनणें केव्हाहि इष्ट नाही, असें या पत्रांत म्हटलें आहे. श्री. संजीव रेड्डी हे निवडून येण्याची शक्यता दिसत असली, तरी गिरींबाबतच्या सहानुभूतीमुळे संजीव रेड्डी व निजलिंगप्पा यांच्या मनीं खचित अस्वस्थता निर्माण झाली आहे.

उपराष्ट्रपतिपदासाठी श्री. सत्यनारायण सिन्हा, श्री. गोपालस्वरूप पाठक, श्री. हरिभाऊ पाटसकर, श्री. संजीवय्या व श्रीमती व्हायोलेट अल्वा या नांवांतून काँग्रेस-पक्षाने म्हैसूरचे सध्याचे राज्यपाल श्री. गोपालस्वरूप पाठक यांची निवड केली आहे व श्री. धीलन यांची निवड लोकसभेच्या सभापतिपदासाठी महामंत्र्यांनी केली.

लोकसभेच्या सभापतिपदासाठी श्री. रघुनाथराव खाडिलकर का श्री. धीलन, असा सवाल होता. त्यांत श्री. धीलन यांची निवड करण्यांत आली. आता श्री. खाडिलकर हे उपसभापतिपद सोडतील व ते राज्यमंत्री म्हणून केंद्र-सरकारांत दाखल होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे या वेळीं उपराष्ट्रपतिपद व सभापतिपद यांसाठी काँग्रेस उमेदवारांचीं नांवें एकमताने ठरविण्यांत आलीं. त्यासंबंधांत श्री. मोरारजीभाईंबरोबरहि इंदिराजींनी पंचवीस मिनिटें चर्चा केली.

श्री. रघुनाथराव खाडिलकर यांची संजीव रेड्डींच्या राजीनाम्यामुळे रिकाम्या झालेल्या लोकसभेच्या सभापतीच्या जागेसाठी काँग्रेस-पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून निवड होऊं शकली नाही याचें कारण म्हणजे त्यांना लोकसभा सांभाळणें गेले कांही दिवस – विशेषतः संजीव रेड्डींच्या राजीनाम्यानंतर – जड होऊं लागलें होते. याउलट श्रीमती व्हायोलेट अल्वा यांनी राज्यसभा उत्तम रीतीने सांभाळून सुद्धा त्यांचें नांव वगळून श्री. गोपालस्वरूप पाठक यांची वर्णी लागली. यामागील हेतु उत्तर प्रदेशाला खूष ठेवणें हाच होता यांत शंका नाही. उपराष्ट्रपतिपदाच्या जागेसाठी उमेदवार म्हणून निवड न झाल्यामुळे राज्यसभेच्या उपाध्यक्षाच्या जागेचा आपण राजीनामा देणार असें त्यांनी जाहीर केलें आहे.

श्री. खाडिलकरांच्या कारकीर्दीच्या शेवटच्या दिवशी लोकसभेंत श्री. निजलिंगप्पांच्या वक्तव्यावर मोठीच खणाखणी होऊन काँग्रेस खासदारांनी सभात्याग करण्यापर्यंत मजल गेली व त्याचा फायदा निजलिंगप्पांना ताळ्यावर आणण्याची संधि बाईंनी साधून घेतली.

*

श्री. चव्हाण यांच्या दुटप्पी भूमिकेचा व द्विधा मनोवृत्तीचा अर्थ त्यांच्यांत उपजत असलेल्या ‘ सहाव्या संज्ञें ’तच करावा लागेल. राष्ट्रपतिपदीं संजीव रेड्डींची निवड झाल्यावर इंदिराजींना उडविण्याचें राजकारण जर खेळलें गेलेंच व त्यांत कॉंग्रेस संसदीय पक्षांतील ‘सिंडिकेट’च्या प्रभावाने पाटील गटाला यश आलें, तर त्यांतहि आपला हात असावा ही मुत्सद्देगिरी त्यांत नसेलच असें कसें मानावें ? श्री. चव्हाण यांना स्वतंत्र पक्षाचे खासदार मोहता यांनी बड्या भांडवलदारांच्या सान्निध्यांत नुकतीच दिलेली दावत या संदर्भांत निश्चितपणें कांही कानमंत्र सांगू शकेल. चव्हाणांकडून अपेक्षित असलेल्या पुरोगामी नेतृत्वाविरुद्ध त्यांची ही द्विधा मनोवृत्तीची चाल आहे असें नाइलाजाने म्हणावें लागतें. कसेंहि असो, आज दिल्लींत श्री. यशवंतराव चव्हाण यांचें तेज मंदावलें एवढें मात्र खरें.

यशवंतरावांच्या दरबारांतील एक गट त्यांना इंदिराजींकडे ओढीत आहे, तर दुसरा गट कॉंग्रेस कार्यकारिणी व मोरारजी यांच्या कुशींत त्यांना रेटूं पाहत आहे. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. वसंतरावदादा पाटील यांनी दिल्लींत दिलेली मुलाखत या दृष्टीने बोलकी आहे.

*

श्री. मोरारजी देसाई यांच्या हकालपट्टीचें वादळ आता शमलें आहे असें वाटलें, तरी सिंडिकेटचा ज्वालामुखी आंत धुमसतच आहे. गुजरातने व महाराष्ट्राने त्याबाबत एका बाजूस दुःख प्रदर्शित करून आपली सद्भावना व्यक्त केली असली किंवा दुसऱ्या बाजूतर्फे ब्रिटनच्या खारावलेल्या संसदीय लोकशाहींतहि हॅरॉल्ड मॅक्मिलनने आपल्या महामंत्रिपदाच्या कारकीर्दींत सेल्विन लॉईडसह पांच मंत्र्यांना घरचा रस्ता दाखविल्याचीं उदाहरणें देऊन इंदिराजीच्या कृतीचें समर्थन केलें जात असलें, तरी हा वाद शांतपणें तात्त्विक चर्चा करण्याइतका अजून थंड झालेला नाही. राष्ट्रपतीच्या निवडणुकीनंतर त्याचा स्फोट होण्याची जी भीति व्यक्त केली जात आहे, त्यांत इंदिराजी, पाटील, तारकेश्वरी सिन्हा यांचीं वक्तव्यें वाचलीं म्हणजे पुष्कळच तथ्य वाटतें. “ बॅंकांचें राष्ट्रीयीकरण हा जनतेवर बलात्कार ” असल्याचें पाटलांनी उघडपणें सांगितलें. श्रीमती तारकेश्वरी सिन्हा यांनी ‘करंट’मध्ये “ आज ना उद्या तलवारीला तलवार भिडणेंच अवश्य आहे ” अशी भाषा काढली असली, तरी त्याहिपेक्षा गंभीर परिणाम घडविणारी कृति म्हणजे इंदिराजी कम्युनिस्टांच्या हातांत गेल्या असल्याची कुजबूज सर्वत्र पसरवून त्यांची जनमानसांतील मूर्ति डागाळण्याचा प्रयत्न होय.

या संदर्भांत कॉंग्रेस संसदीय पक्षाची सभा चांगलीच गाजली. या वादळी सभेंत तलवारीला तलवार भिडविण्याची भाषा बोलली गेली. तारकेश्वरी सिन्हा यांनी त्या सभेंत जें अकांडतांडव केलें त्यामुळे आधीच त्यांच्या लेखाने तापलेल्या

वातावरणांत भर पडून बैठकीत मोठा तमाशाच उभा राहिला. त्यायोगें उडालेल्या गोंधळांत संजीव रेड्डींना इंदिराबाईंच्या मुखांतून पाठिंबा वदवून घेण्याचा मनसुबा जागच्या जागींच राहिला. कारण बाईंनी संजीव रेड्डींचें नांव राष्ट्रपतिपदासाठी म्हणून एकदाहि उच्चारलेलें नाही. मग इंदिराबाईंचें भाषण 'टेप रेकॉर्ड' करणार कसें व तो 'टेप' राज्याराज्यांत वाजवणार तरी कसा ? म्हणजे अखेर हे सर्व मनसुबेच ठरले म्हणायचे.

लपून हल्ला करणाऱ्या या भीरूंना उद्देशून इंदिराजी स्पष्टपणेंच म्हणाल्या, " काँग्रेसच्या समाजवादी ध्येयाला ज्यांचा विरोध आहे त्यांनी तशी भूमिका घेऊन सामोरें यावें. काँग्रेसच्या उद्दिष्टांचा पुरस्कार करणें म्हणजे कम्युनिस्ट बनणें नव्हे !" तलवारीला तलवार ही अशी भिडत आहे व तीमधून ठिणग्या उडत आहेत. दोन्ही गटांतील देशांत विखुरलेले पुढारी आपापल्या नेत्यांना भेटून पुढील हलचालींचा कानोसा घेत आहेत. ओरिसाचे हरेकृष्ण मेहताब इंदिराजींना असेच नुकते भेटून गेले. इंदिराजी त्यांची ठणठणीत प्रकृति पाहून म्हणाल्या, " तीन वर्षांपूर्वी तुम्ही जसे दिसत होतात तसेच दिसत आहांत, तुमचें वय एका दिवसाने देखील वाढल्याचें भासत नाही. "

यावर मेहताब हसत म्हणाले, " याला कारण एक तर, मी दिल्लीच्या बाहेर आहे आणि दुसरें, मी काँग्रेसमध्ये नाही. "

*

सध्या भारतांत सर्वत्र त्रिकोणाचा मोठा प्रभाव आहे. इंदिराजी, यशवंतराव, मोरारजी या त्रिकोणाभोवतीं दिल्लीचें राजकीय वारें घोंघावत आहे. राष्ट्रपति-पदाची निवडणूकहि रेड्डी-गिरी-देशमुख या त्रिकोणाभोवतींच फिरत आहे. एवढेंच काय, पण इंदिराजींना विरोध करण्यासाठी पदर बांधून ज्या महिला खासदार उभ्या ठाकल्या त्याहि तीनच आहेत. तारकेश्वरी सिन्हा, शारदा मुकर्जी व सुचेता कृपलानी-या तिघी जणी आपला त्रिकोण बनवून 'सिंडिकेट' बंद न करोत म्हणजे झालें !

बनासकाठाला जाऊन पाटलांचा हिरीरीने प्रचार करणाऱ्या, सिंडिकेटची बाजू अट्टाहासाने पुरस्कारणाऱ्या तारकेश्वरींचें त्यांनी मांडलेल्या एका ठरावावरचें भाषण तर डावपेचांचें खास नमुना होतें. इंदिराजींनी नुसतें बँकांचें राष्ट्रीयी-करण घडविलें तर तारकेश्वरींनी हा ठराव मांडून भारतांतील सारी परदेशी गुतवणूक, आयात-निर्यात व्यापार, सर्वसाधारण विमा, पोलाद, उद्योगधंदे या साऱ्यांचें राष्ट्रीयीकरण तर सुचविलेंच; पण शहरीं उत्पन्नावरहि मर्यादा घालण्याची मागणी केली.

समाजवादी समाजरचनेची तारकेश्वरी यांनी लावलेली ही तड व त्यांचा आविर्भाव पाहून संसदेतील सारेच 'आ' वासून त्यांच्याकडे पाहूं लागले. या प्रसंगाने पूर्वी वाचलेला एक चुटका मला आठवतो –

एका स्त्रीने विनयभंगाची फिर्याद कोर्टांत दाखल केली. खटला ज्युरीपुढे चालला.

कोर्टाने बाईंना वस्तुस्थिति विचारली. बाई म्हणाल्या, "मला आरोपीने जें कांही विचारलें तें तोंडाने सांगणें शक्य नाही. मी कागदावर लिहून देतें."

कोर्टाने बाईंनी दिलेला कागद स्वत: वाचून ज्युरींच्या हातांत दिला. पांच ज्युरींत चौथ्या क्रमांकाला स्त्री-ज्यूरर बसली होती. तिच्या पलीकडे बसलेले पांचवे ज्यूररमहाशय पेंगत होते.

न्यायाधीशांनी दिलेली चिठ्ठी प्रत्येक ज्युररने वाचून क्रमाने आपल्या पलीकडील सहकाऱ्याला दिली. स्त्री-ज्यूररने आपल्या पलीकडील पेंगणाऱ्या ज्यूररच्या हातीं चिठ्ठी देतांच ते 'आ' वासूनच पाहूं लागले.

ती चिठ्ठी त्या स्त्री-ज्युररकडूनच आपल्याला आलेली आहे असें मानून, "बरें ! बरें !" म्हणून त्याने खुषीने मान डोलावली. कोर्टहि तो प्रकार पाहून स्तंभित झालें.

तारकेश्वरींचें भाषण ऐकून संसदहि तशीच स्तंभित झाली. इंदिराजींवर आग पाखडणाऱ्या तारकेश्वरी नकळत तेंच वाण पदरीं घेऊन बसल्या.

*

लोकसभा व राज्यसभा यांना सध्या खरोखरीच मासळीबाजाराचें स्वरूप तर येऊं पाहत नाही ना, अशी उद्विग्नता कांही वृद्ध सभासदांकडे बोलून दाखविली जाऊं लागली आहे.

पश्चिम बंगालच्या विधानसभेंत शिरून पोलिसांनी केलेल्या ठोकाठोकीबाबत राज्यसभेंत मांडलेल्या लक्षवेधी सूचनेच्या वेळीं तर सभ्यतेचे सर्व मुखवटे गळून पडले व पांडे आणि भूपेश गुप्त, तसेच आबासाहेब कुलकर्णी आणि चतर्जी यांच्यांत अक्षरश: शब्दाशब्दी झाली. संयुक्त आघाडीच्या कारभाराखाली असलेल्या बंगालमध्ये आज कायद्याचें राज्य चालू नाही व त्याची दखल या पोलिस-प्रकरणाच्या संदर्भांत प्रथम घेतली पाहिजे या कॉंग्रेस व जनसंघ खासदारांच्या आरोपामुळेच कम्युनिस्ट खासदार बिथरले. खासदार चंद्रशेखर यांनी, पोलिसांनी विधानसभेंत घुसून केलेली मारहाण व पश्चिम बंगालमधील कायदा व शांततेचा वळी हे दोन भिन्न मानून खासदारांनी विचार करावा अशी मध्यस्थी सुचविली.

पण हे दोन प्रश्न स्वतंत्रपणें विचारांत घेणें म्हणजे पार्श्वभूमीशिवाय चित्र पाहणें होणार होतें. या चित्राला जो उठाव येत आहे तो गंभीर पार्श्वभूमीमुळेचें होय. गेल्या चार महिन्यांत प. बंगालमध्ये झालेले ऐंशी राजकीय खून, इथोरा, कांकी वगैरे ठिकाणीं झालेली अत्याचारांची मालिका, 'जनता न्यायालयां'चे एकतर्फी निकाल, जमिनीचें अपहरण, कलकत्त्याच्या अमेरिकन ग्रंथालयांतील टाईम बॉंब,

अंदल व राणीगंजच्या दरम्यान लुटली गेलेली सैनिकी गाडी, कलकत्त्याजवळील कानुरकाचीहून लुटून नेला गेलेला दारूगोळा, 'आनंदवझारपत्रिके'च्या कचेरीवरील हल्ला, खाटीहरानी, दुर्गापूर, भरतगाव येथील दुर्घटना पाहतां ज्योति बसू यांचा कारभार समाधानकारक तर चाललेला नाहीच, उलट अराजकाकडेच तो मार्गक्रमणा करीत आहे किंवा मार्गक्रमणा करविली जाते आहे असें म्हणावयास हरकत नाही. ज्योति बसूंनी बंगाल विधानसभेंत सिद्धार्थशंकर रे यांना "पोलिस हे कॉंग्रेस सरकारचे गुलाम होते" असें जें सांगितलें त्याला लागलीच "त्यांना आता कम्युनिस्ट सरकारचे गुलाम बनविलें जात आहे" असें प्रत्युत्तर दिलें गेलें, तर ज्योति बसू काय उत्तर देतील? विधानसभेंत घुसलेल्या पोलिसांना धडा शिकविण्यासाठी दुसरा जनता-मोर्चा ज्योति बसूंच्या अनुयायांनी आणलाच होता. एवढेंच नव्हे तर हजारो युवक पोलिसांना व संयुक्त दलांतील घटक पक्षांत शिरलेल्या गुंडांना धडा शिकविण्यासाठी पुढे येतील अशी धमकीहि ज्योति बसूंनी दिली होती. माओच्या 'लाल सैनिकां'ची भारतीय आवृत्ति काढण्याची तर ही प्रस्तावना नव्हे ना!

पश्चिम बंगाल विधानसभेंत शिरलेल्या पोलिसांना शिक्षा होणें संसदीय लोकशाहीच्या जतनाच्या दृष्टीने कोणालाहि बाह्यात्कारी इष्टच वाटेल. पोलिसांचें हें बेशिस्त व बेदिल वर्तन निषेधार्ह व शिक्षापात्र आहे हें खरें; पण शिक्षेचा आसूड ज्यांच्या हातांत आहे ते त्याचा उपयोग मात्र राजकीय हेतूच्या सिध्यर्थ करणार आणि शिस्तभंगाच्या आरोपाखाली हाकललेल्या पोलिसांच्या जागीं कम्युनिस्ट विचारप्रणालीच्या युवकांची भरती करून लोकशाहीच्या बुरख्याखाली हुकूमशाही अवतरणार याची संगति कशी लावायची? संसदीय लोकशाहीच्या पोटांत घुसून भारतीय घटनेचा भंग करण्याची जी विचारसरणी गोपालन्, रणदिवे, नंबुद्रिपाद यांच्याकडून बोलली गेली तिची तर ही नांदी नाही ना!

*

संसदेंतील दुसरें एक गोंधळाचें प्रकरण म्हणजे इंडियन एअरलाईन्ससाठी करावयाची विमानखरेदी. अमेरिका व रशिया यांच्या दडपणामुळे हें खरेदीचें 'शटलकॉक' गेलीं तीन वर्षें नुसतेच इकडून तिकडे टोलविलें जात आहे. खासदार मधू लिमये यांनी म्हटल्याप्रमाणे छोटया मोटारगाडयांच्या निर्मितीच्या प्रश्नासारखाच हा विमानखरेदीचा प्रश्नहि हास्यास्पद विषय बनला आहे. बोईंग ७०७, डी. सी. ९ व टी. यू. १५४ या त्रिकोणाशीं डग्लस कंपनी, इंडियन एअरलाईन्सचे अध्यक्ष भरतराम व रशियन विमान कंपनी यांचा एक प्रेमाचा त्रिकोण जमल्याने संसदेंत या प्रकरणाचा स्फोट झाला व त्यांत उडाले इंडियन एअरलाईन्स कॉर्पोरेशनचे अध्यक्ष भरतराम. मेसर्स इंडामार कंपनी लिमिटेडचे कार्यकारी संचालक श्री. केझारेकर यांनी

इंडियन एअरलाईन्समधील कॅप्टन हुईलगोल यांना पाठविलेल्या पत्राची एक छायाप्रत संसदेंत सादर झाली. त्या पत्रांत " दर विमानामागे तें खरेदी झाल्यास पंच्याहत्तर हजार डॉलर्स संबंधितांना दिले जातील, असा मजकूर होता. हें पत्र खरें की खोटें याची अजून शहानिशा व्हावयाची आहे. परंतु डॉ. करणसिंग यांनी हें प्रकरण सी. आय्. बी.कडे सोपविण्यास प्रथम इतके आढेवेढे कां घेतले हेंहि कळत नाही. राज्यसभेंतील चर्चेत भरतरामांचें नांव आलें नव्हतें, तें लोकसभेंत श्री. मधू लिमये यांनी आणलें व कॅप्टन हुईलगोल व भरतराम यांचे स्नेहाचे संबंध असल्याचा व त्यामुळे चौकशीला त्यांच्यापासून सुरुवात करणें अगत्य असल्याचें आग्रहपूर्वक प्रतिपादिलें. परिणाम तूर्त तरी भरतराम यांचा राजीनामा सादर झाला असून, प्रकरण सी. आय्. बी.कडे सुपूर्द केलें गेलें आहे.

हें पत्र खासदारांच्या हातीं आलें त्यांतहि दोन व्यापारी कंपन्यांतील चढाओढ हेंच कारण आहे. पिलमन एअरक्रॅफ्ट कंपनीचे माणेकजी यांनी पत्राची छायाप्रत मंत्रिमहोदयांकडे पाठविली. या माणेकजींची मुंबईंत व महाराष्ट्रांत साऱ्यांना माहिती आहेच. खरेदींतील या गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे राजकीय दबावाचा जोर आणखीच वाढेल आणि भरतराम यांच्या जागीं मोहन कुमारमंगलम् आल्याने रशियन विमान खरेदीकडे इंडियन एअरलाईन्सचें पारडें झुकण्याचाहि संभव आहे. हीं विमानें १९७१ पासून उडावयाचीं असतील, तर यापूर्वीच याबाबतचा निर्णय व्हावयास हवा होता. या अनिश्चयाने आता विमानांच्या किमतींतहि वाढ होणार व गळ्यांत बेताचीं रशियन विमानें पडणार. हो, पण कदाचित् त्यामुळे अडलेलें रेल्वे-वाघिणींचें प्रकरण मोकळें होण्याचाहि संभव आहे. हिंदुस्थानांत धंदा कसा वाढवावा हें आता साऱ्या परदेशी व्यापाऱ्यांना चांगलें माहीत झालेले आहे.

पंडित नेहरू पूर्वी म्हणत की, काळा बाजार व लाचलुचपत करणाऱ्यांना फाशी दिलें पाहिजे. आता गांधी-जन्मशताब्दीच्या निमित्ताने ही शिक्षाच रद्द करण्याची भाषा बोलली जात आहे. तें झाले तरी घाबरण्याचें कारण नाही. या ' कॅपिटल पनिशमेंट 'ची उलटी व्याख्या केली म्हणजे मुळांतच हात घातल्यासारखें होईल. अहो, देशांतील काळा पैसा वापरूनच लाचलुचपत होते ना ! तो आटावा म्हणून तर बँकांचें राष्ट्रीयीकरण करून ' पनिशमेंट टु कॅपिटॅलिस्ट ' दिलेली आहे, समजलें !

**– केसरी, दि. १० ऑगस्ट, १९६९**

# निर्णायक लढत

## - १८ -

गेले दहा-पंधरा दिवस सारा देश गाजवून सोडणारी राष्ट्रपतिपदाची निवडणूक काल आटोपली असून, आता तिच्या निकाला-कडे सगळ्यांचेंच लक्ष लागलेलें आहे. ही निवडणूक गाजावी याला कारणहि तसेंच घडलेलें आहे! काँग्रेस-पक्षाचे उमेदवार श्री. संजीव रेड्डी यांना मतें द्यायचीं की नाही याबाबत पक्षामध्ये दोन गट पडले आणि त्याबाबत समझोता करण्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाले. त्यामुळे काँग्रेस-पक्षाच्या मतदारांपैकी किती जणांनी श्री. संजीव रेड्डी यांना मतें दिलीं आणि कोण श्री. गिरी यांच्या बाजूने उभे ठाकले हें समजणें कठीण आहे.

एक गोष्ट खरी की, या निवडणुकीच्या निमित्ताने इंदिरा गांधी आणि त्यांचा गट यांनी अखेरपर्यंत 'सिंडिकेट'ला जबरदस्त शह दिला. बंगलोरहून परतल्यापासून इंदिरा गांधी त्या दृष्टीने तयारीला लागल्या होत्या. जणू तीन पावलांत बळीला पाताळांत ढकलणाऱ्या वामनाचाच अवतार त्यांच्या अंगांत संचारला होता. 'सिंडिकेट'ला नेस्तनाबूत करण्यासाठी इंदिराजींनी प्रथम मोरारजींची हकालपट्टी केली, बँकांचें राष्ट्रीयीकरण करून दुसरें पाऊल टाकलें आणि संजीव रेड्डींच्या बाजूने पक्षादेश जारी करायला साफ नकार देऊन त्यांनी तिसरें पाऊल टाकलें आहे.

एक गोष्ट खरी की, इंदिरा गांधी व 'सिंडिकेट' यांच्यांतील शीतयुद्ध संपून आता उघड लढाईला तोंड लागलें आहे. काँग्रेसचे अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी जग-जीवनराम व फक्रुद्दीन अली अहंमद यांच्या पत्रांना जें उत्तर धाडलें तें इंदिरा गांधी यांना सर्वस्वीं असमाधानकारक वाटलें व त्याचीच प्रतिक्रिया म्हणून त्यांनी काँग्रेस पक्षाचे खासदार व विविध राज्यांतील आमदार यांना पक्षाचे अधिकृत उमेदवार

श्री. संजीव रेड्डी यांनाच आपलीं मतें द्यावींत असा आदेश देण्यास स्पष्ट नकार दिला. एकामागून एक घडणाऱ्या या घटनांचा सरळ सरळ अर्थ असा की, सिंडिकेट-विरुद्ध इंदिराबाईंना पाहिजे असलेल्या ‘ अंतिम सामन्या ’ला आता त्या तयार झाल्या आहेत. या सर्व धकाधकीच्या मामल्यांत महाराष्ट्र संजीव रेड्डींच्याच मागे उभा होता. कारण काय, तर म्हणे की, रेड्डींना शब्द दिला असल्याने व कॉंग्रेस-पक्षाच्या ऐक्या-साठी सतत प्रयत्नशील असल्यामुळे यशवंतराव आपल्या साऱ्या फौजफाटयासह रेड्डींच्या मागे उभे राहिले. परंतु प्रत्यक्षांत मात्र सिंडिकेटला पाठिंबा देण्यांत महा-राष्ट्रांतील श्रीमंत शेतकऱ्यांची सरंजामदारी वृत्ति दिसून येते व याचा परिणाम म्हणजे महाराष्ट्र बऱ्याच प्रमाणांत एकाकी पडण्यांत होईल असें वाटतें. अर्थात् र. के. खाडिलकर, तुळशीदास जाधव प्रभृति कांही महाराष्ट्रीय कॉंग्रेस खासदारांनी मतस्वातंत्र्याच्या मागणी-पत्रकावर सह्या करून यशवंतरावांच्या भूमिकेला आपला पाठिंबा नसल्याचें दाखवून दिलें.

*

गेल्या आठवडयांत दिल्लीच्या परिसरांत पावसाने झोड उठविली. यमुनेला पूर आल्याची वार्ता कानीं आल्याने मुद्दाम यमुनेचें तें दुथडी भरून गर्जत, लाटा उधळीत, फेस फेकींत चाललेलें पाणी पाहण्यासाठी मी गेलों होतों. तो अजस्र प्रवाह पाहून खरोखरच यमुना यमभगिनी वाटू लागली. यमुना नेहमी काळी असते, पण या वेळीं तांडव मांडलेल्या यमुनेचें पाणी लाल झालें होतें.

राजकीय आकाशांतहि असेच प्रलयघन मेघ दाटले असून इंदिराजींच्या रूपाने काठावरील वृद्ध वृक्षांना कडकडा मोडीत जणू संतप्त यमुनाच धांवत आहे. कोठे ना कोठे, या नाही त्या मेळाव्यापुढे इंदिराजींचीं भाषणें झडत होतीं व त्या आपल्या हातांतील आसूड ‘सिंडिकेट’च्या पाठीवर वाजवीत होत्या. काल काय, बँकेचे नोकर मिरवणुकीने इंदिराजींना जाऊन भेटले, आज काय, शिक्षक भेटले असें दृश्य पहायला मिळालें. इंदिराजींच्या मागे जनतेचें पाठबळ किती संघटितपणें उभें आहे हें दाखविण्यासाठी मोर्चे, मिरवणुका, सभा घडविल्या जात आहेत. परंतु इंदिराजीनींहि त्यांच्या महामंत्रिपदाला शोभेशा संयमाने व गांभीर्याने वागावयास हवें. येतां-जातां त्या जिभेचा पट्टा सोडतील व आलेल्या एखाद्या-दुसऱ्या डोकेंफिरूच्या निनावीं पत्रावरून ‘ मला केवळ महामंत्रिपदावरून काढून टाकण्याच्या धमक्या दिल्या जात नसून, माझ्या जीवितालाहि धोका निर्माण करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत, ” असें जाहीरपणें सांगू लागतील, तर हें नाटच त्यांतील ‘ जादा नाटकीपणा ’मुळे बिघडून जाईल.

यंदाचें वर्ष गांधी-वर्ष म्हणून साजरें केलें जात आहे. पण आज तरी महात्मा गांधी का इंदिरा गांधी यांपैकी कोणत्या गांधींच्या नांवाने हें वर्ष साजरें होत आहे

७८८०१
५३८



असा रास्त संभ्रम साऱ्याना पडला आहे तो केवळ ऑल इंडिया रेडिओचे श्री. गुजराल यांनी 'ऑल इंदिरा रेडिओं'त रूपांतर केलें म्हणून नव्हे, तर इंदिराजींच्या नेतृत्वाखाली देशांतील अर्थकारणाला व राजकारणाला मिळत असलेल्या नव्या कलाटणीमुळे राष्ट्रपतींच्या निवडणुकीने या साखळीच्या क्रियांना सुरुवात झाली आहे. मंत्रिमंडळांतहि असाच बदल होण्याची संभाव्यता बोलली जात आहे. नदीच्या पात्रांत पाणी दुथडी भरलें म्हणजे तें पात्र गंभीर बनतें, परंतु वरुन शांतपणें वाहणाऱ्या या पाण्याच्या पोटांत असंख्य भोवरे फिरत असतात. राष्ट्रपतींच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत वरवर जी शांतता भासत आहे ती त्यानंतर तशीच राहील का, दुखावलेले काँग्रेसश्रेष्ठ स्वस्थ बसतील का, हा खरा प्रश्न आहे.

काँग्रेस संसदीय पक्षापुढे असलेला मोरारजींना अर्थमंत्रिपदावर पुनश्च आरूढ करण्याचा प्रश्न तसाच लोंबकळला आहे. मुंबई, महाराष्ट्र व गुजरात या प्रदेश काँग्रेस समित्यांनी मत व्यक्त केल्याप्रमाणे तसा ठराव संसदीय पक्षांत जरी तो साध्या बहुमताने संमत होऊं शकला, तरी तो महामंत्र्यांनी मान्य केलाच पाहिजे असें त्यांच्यावर बंधन नाही. त्या बाबतीत इंदिराजींवर अविश्वासाचा ठराव आणावयाचा असेल, तर काँग्रेस संसदीय पक्षाच्या घटनेंतील सोळाव्या नियमाप्रमाणे दोनतृतीयांश बहुमत लागतें व त्याची दहा दिवस आधी सूचना द्यावी लागते. इंदिराजींना 'जागें करून' हें बहुमत मिळविणें शक्य नाही. मग उपाय राहिला की, एकोणिसाव्या नियमानुसार सोळावा नियम सर्वसाधारण सभेंत बहुमताने रद्द करावयाचा व मग इंदिराजींवर हत्यार उचलावयाचें. त्यासाठी 'इंडिकेट' आणि 'सिंडिकेट' काय पावलें उचलतात हें लवकरच स्पष्ट होईल.

✻

राजधानीतील वादळाचा जोर निदान राष्ट्रपतीची निवडणूक होईपर्यंत तरी कमी राहील असें वाटत होतें. पण आकस्मिक अशा घटना घडत गेल्या की, ज्यामुळे उठलेलें आवर्त शांत होण्याऐवजीं त्याला अधिकच गति मिळत आहे. यशवंतरावांनी जरी आपला पवित्रा बदलून बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला पाठिंबा देण्याच्या निमित्ताने इंदिराजीच्या बाजूस आपला कांहीसा कल व्यक्त केला असला, तरी सिंडिकेटचे श्री. पाटील, निजलिंगप्पा, सुचेता कृपलानी, तारकेश्वरी सिन्हा आदींचे इंदिराजींची जनमानसांतील मूर्ति डागळण्याचे उद्योग चालूच आहेत. त्यांतून श्री. संजीव रेड्डी यांच्या बाजूने पहिलें मत मिळविण्यासाठी स्वतंत्र पक्ष व जनसंघ यांच्याशीं बोलणीं करण्यापर्यंत निजलिंगप्पांची मजल गेल्यामुळे, त्याबाबत त्यांना जाब विचारणारें पत्र श्री. जगजीवनराम व फकरुद्दीन अली अहंमद यांनी पाठविलें. यामुळे तर वातावरण अधिकच प्रक्षुब्ध झालें. काँग्रेस खासदारांपैकी अर्जुन अरोरा व शशीभूषण यांनी

आपला उघड पाठिंबा गिरींना व्यक्त केला. त्यापायी श्री. निजलिंगप्पा यांनी श्री. अर्जुन आरोरा याना पक्षांतून वडतर्फ केलें.

पक्षांत ऐक्य टिकविण्याच्या दृष्टीने गुरुवारीं सायंकाळीं संसदीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक भरली होती. परंतु त्या बैठकींतहि इंदिरा गांधी यांनी पक्षादेश जारी करायला नकार दिला. या बाबतींत त्यांनी निदान आवाहन तरी करावें अशी सूचना पुढे आली. परंतु तीहि इंदिरा गांधी यांना मान्य झाली नाही. शेवटीं इंदिराजींच्या विरोधाला न जुमानतां संजीव रेड्डी यांना मत देण्याचें आवाहन करणारा प्रस्ताव बहुमताने मंजूर झाल्याचें पक्षचिटणीस श्री. शिवाजीराव देशमुख यांनी जाहीर केलें. त्यामुळे 'सिंडिकेट' आणि 'इंडिकेट' यांच्यात समझोता होण्याची शक्यता पार नाहीशी झाली.

इंदिराजीना महामंत्रिपदावरून हलविण्याच्या मूळ कारस्थानाचें सूत्र हातीं धरूनच निजलिंगप्पा अजून वागत आहेत, असेंच यावरून दिसतें. इंदिराजींनी यावर संतापून एकदा पक्षांत सोक्षमोक्ष लावून घेण्याचा निर्णय केला तर काँग्रेस दुभंगल्याशिवाय राहत नाही. स्वाभाविकच निजलिंगप्पांच्या हालचालींविरुद्ध बहुसंख्य काँग्रेसवाल्या खासदारांची प्रतिक्रिया सुरू होईल व याच मानसिक स्थितीचा फायदा घेऊन 'सिंडिकेट'ला कोपऱ्यांत गाठण्याचा इंदिराजी प्रयत्न करतील अशी शक्यता आहे.

या साऱ्या महत्त्वाच्या घटना ऑगस्टमध्ये घडाव्यात हा योग मोठा गमतीचा आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला व त्याच्या आर्थिक स्वातंत्र्याचें महत्त्वाचें पाऊल ऑगस्टमध्येच इंदिराजींनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या रूपाने टाकलें आहे असें सांगण्यांत येतें. 'सिंडिकेट'ने त्यांना आणखी पेचांत आणावयाचें ठरविलें, तर आयात-निर्यातीच्या व पोलाद-धंद्याच्या राष्ट्रीयीकरणाचीं पावलें वेगाने पडतील असें वाटतें. पण त्याबावत जयप्रकाशजींचा इशारा इंदिराजींनी लक्षांत घ्यावा. जयप्रकाश लिहितात –

"By itself the nationalization of banks may mean anything or nothing. Linked up with fundamental & radical changes in socio-economic structure it may be an instrument of socialism, but if it only meant concentration of more power in the hands of those who controlled the state or administrative apparatus, it will turn out to be an anti-socialist, and anti-people measure."

चांगल्याबरोबर नेहमी वाईटहि येत असतें. प्रकृति-विकृति हातांत हात घालून चालतात, म्हणूनच काळजी घ्यावयाची. ऑगस्टसारखा महत्त्वाचा महिनाच घ्या ना! तोहि मिश्र फलदायी आहे. योगी अरविंद व राजर्षि टंडन यांचा जन्म या महिन्यांत झाला तसाच लो. टिळक, रवींद्रनाथ ठाकूर, रामकृष्ण परमहंस यांचे

दु:खद मृत्यु याच महिन्यांत झाले. भारत, रुमानिया, मलाया हे देश जसे ऑगस्टमध्ये स्वतंत्र झाले तसेच हिरोशिमावर अणुबाँब पडून लक्षावधि निरपराध मानव बळी पडले तेहि ऑगस्टमध्येच ! असो. हिरोशिमावरील या हल्ल्याच्या दु:खद स्मृति-दिनाची सभा नुकतीच दिल्लींत पार पडली. त्यांत काकासाहेब कालेलकर बोलले. भाषण संपवतांना ते म्हणाले, " यानंतर मला जाण्याची परवानगी असावी. कारण मला ऐकूं येत नसल्याने मी प्रथम बोललों."

नाही तरी सध्या कोणी ऐकण्याच्या मन:स्थितींत नाहीच. जो-तो बोलत आहे, ढीगभर बोलत आहे !

*

भारतांतील जनतेचा पैसा मूठभर लोकांच्या ताब्यांत राहूं नये, साडेचार हजार कोटि रुपयांचा सामान्य जनतेच्या प्रगतीसाठी, विकासासाठी उपयोग व्हावा म्हणून बँकांचें राष्ट्रीयीकरण केलें गेलें असा इंदिराजींचा दावा आहे. याला विरोध करणाऱ्यांशीं इंदिराजी आज लढत आहेत. त्या 'कम्युनिस्ट' झाल्या असल्याचा आरोप त्यांच्यावर सुचेता कृपलानींनी केला आहे, तर सुचेताजी भांडवलदारांच्या हस्तक असल्याचा आरोप करून चंद्रशेखर यांनी टोल्याला प्रतिटोला देऊन फिटंफाट केली.

देशांतील मूठभर भांडवलदारांच्या हाती पैसा कसा एकत्रित होत गेला याचीं अनेक उदाहरणें आता पुढे येत आहेत. औद्योगिक परवाने धोरण चौकशी समितीचा नुकताच बाहेर आलेला अहवालहि तेंच सांगतो.

चंद्रशेखर व बिर्ला यांच्यांतील झगडा हा मोठ्या युद्धांतील एक छोटी लढाई आहे. (१) हैदराबाद अॅस्बेस्टॉस् प्रा. लि., (२) ओरिअंट पेपर मिल्स लि., (अ) अमलाई कारखाना, (ब) बिलासपूर कारखाना, (क) ब्रजराजनगर कारखाना, (३) रेयॉन ग्रेड पल्प, (४) सेंच्युरी केमिकल्स, (५) मिर्झापूरची हिंदुस्थान अॅल्युमिनियम फॅक्टरी, या कारखान्यांना आणि बिर्लांना सरकारी आर्थिक संस्थांतून मिळालेलें मोठें कर्ज याबाबत चंद्रशेखर यांनी केलेल्या आरोपांची चौकशी होऊन तिचा अहवाल संसदेंत सरकारने नुकताच सादर केला. तो पाहिला तरी हैदराबाद अॅस्बेस्टॉसचें सनतनगर व वल्लभगड कारखान्यांतील उत्पादन नवी यंत्रसामग्री परवान्याशिवाय मागवून कसें वाढविलें गेलें व सरकारी परवाने नंतर कसे पदरांत पाडले; अॅस्बेस्टॉस् फायबरसाठी वाढतें परदेशी चलन कसें मिळविलें यावर उत्तम प्रकाश टाकतो. सरकारची देखरेख तर सर्वच बाबतींत ढिली ठरली आहे. रेयॉन ग्रेड पल्पच्या उद्योगाच्या प्रकरणीं तर तो उद्योग सर्वस्वी स्वत:च्या हातीं ठेवण्याच्या कारवाया बिर्लांनी केल्याचें चौकशी समितीलाहि पटलें. देशांतील रेयॉन यार्नपैकी पंचवीस टक्के यार्न आज बिर्लांच्या हातीं आहे. ओरिअंट पेपर मिलसच्या बाबतहि

परदेशी चलनाचा वापर, कारखान्याची उभारणी व उत्पादनक्षमता परवानगी न घेतां वाढवून त्यांनी केला व बिलासपूर येथल्या कारखान्याच्या सुरुवातीसच मध्यप्रदेशचा वांवू अडकवून मेक्लॉड कंपनीला दुसरा कारखाना उभारणें अशक्य करून सोडलें. बिर्लांचें साम्राज्य कागद, रेयॉन, अॅस्बेस्टॉस्, अॅल्युमिनियम या सर्व बाबतींत निरंकुशपणें उभारण्यास त्यांना सरकारी आर्थिक संस्थांतून दोनशे कोटि रुपये दिले गेले व याशिवाय खाजगी बँकांचा पैसा त्यांनी वापरला तो वेगळाच.

मूठभर भांडवलदारांच्या हातीं आर्थिक सत्ता कशी जाते, ते सरकारी व खासगी बँकांच्या यंत्रणा कशा वापरतात, सरकारी अधिकारीहि त्यांना कसे मिंधे होतात व परिणामीं राजकारणावरहि त्यांचा दबाव कसा पडतो, याचें उत्तम उदाहरण म्हणजे बिर्लांचें आर्थिक साम्राज्य. टाटा काय किंवा बिर्ला काय, जरा डावे उजवे इतकेच! १९२१ सालच्या मार्चच्या 'यंग इंडियां'त गांधींजींनी लिहिले आहे –

"I dread the Rockfeller spirit that seems to be overtaking the great house of the Tata's. I dread to think of the consequences of their appropriating poor people's properties for the doubtful benefit of making India industrial. What India needs is not concentration of capital in a few hands, but its distribution so as to be within easy reach of the seven and half lakhs of villages that make this continent."

महात्मा गांधी जन्मशताब्दीच्या वर्षांत हें संपत्तीचें केंद्रीकरण इंदिरा गांधींनी मोडलें तरी देखील हें वर्ष 'गांधी वर्ष' म्हणून भारताच्या इतिहासांत लिहिलें जाईल.

*

भारतांतील सत्तास्पर्धेच्या कडव्या द्वंद्वामुळे वड्या राष्ट्रांच्या हिंदी महासागरांत आपलें वर्चस्व टिकविण्याच्या दृष्टीने चाललेल्या उद्योगांकडे मात्र आमचें दुर्लक्ष होत आहे. ब्रिटिशांनी हिंदी महासागरांतून आपल्या नौसेना मागे घेतल्याने जी पोकळी निर्माण झाली आहे ती अमेरिकेने भरून काढून आशियाई राष्ट्रांभोवतीं हिंदी महासागरांत नौसेनेचे तळ निर्माण करून एक साखळी बांधावी असा विचार 'पेंटॅगॉन'च्या तज्ज्ञांनी सांगितल्याचें 'ख्रिश्चन सायन्स मॉनिटर'ने नुकतेच प्रसिद्ध केलें आहें. त्या दृष्टीनें साखलीन बेटे, चागोस बेटांचा समुद्र व डायगोग्राशिया बेटें यांचा उपयोग करून युद्धनौका, अणु-पाणबुड्या व पॅराट्रपर्स यांचे तळ उभारण्याचा विचार अमेरिकेचा आहे. हीं बेटें ब्रिटिशांच्या नियंत्रणाखालीं आहेत व अमेरिकेच्या आशियाई युद्धपटाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारीं आहेत. हे नवे तळ उत्तर ऑस्ट्रेलियांतील मुख्य केंद्रांतून (rear super base) नियंत्रित केले जातील

पेंटॅगॉनच्या या योजनेवर सध्या निक्सन विचार करीत असतांना रशियाहि स्वस्थ बसलेला नाही. अंदमान, निकोबार बेटांकडे त्याचें जास्त लक्ष आहे, तसाच भारतीय नौदलांत पूर्व व पश्चिम असा भेद निर्माण करण्याचा प्रयत्नहि युद्धनौका व पाणबुड्या देण्याची लालूच दाखवून केला जात आहे, अशी संरक्षण-वर्तुळांत बोलवा आहे. पूर्व नौदल हें संपूर्ण रशियन नौकांनी रचलें जावें तर पश्चिम नौदल हें आज आहे त्याप्रमाणे ब्रिटिश नौकांच्या साह्यानेच वाढावें असा विचार मांडला जात आहे. गेला कांही काळ रशियन नौका हिंदी महासागरांत फिरत असून दारेसलाम, बसरा, कराची व विशाखापट्टम् येथे दुरुस्तीसाठी व थांबण्यासाठी त्यांनी परवाने मिळविल्याचें बोललें जात आहे. सिंगापूरमध्ये तर त्यांनी एक ' शिपिंग फर्म 'च उघडली असून, ब्रिटिश गेल्यावर तेथील नौतळ घेण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून चालू आहे.

लोकसभेंतील व राज्यसभेंतील यासंबंधीच्या प्रश्नांना परराष्ट्रमंत्री श्री. दिनेशसिंग यांनी उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं व भारत सरकारने अजून सिंगापूरच्या तळाबद्दल चौकशी केली नसल्याचें सांगितलें. वस्तुस्थिति अशी आहे की, ही गंभीर माहिती आजहि सिंगापूर येथील भारताच्या हायकमिशनरजवळ आहे. रशियाची हिंदी महासागरांतील नौतळ मिळविण्याची धडपड फार जुनी आहे. ब्रिटिशांच्या परतण्याने मोकळ्या हिंदी महासागरांतील सिंगापूरसारखा तळ किंवा हिंदुस्थानच्या भूमीवर एखादा तळ मिळविण्याचा प्रयत्न रशियाने न केला तरच आश्चर्य. रशियाने या तळासाठी भारताला चोवीस युद्धनौका व 'एफ्' वर्गाच्या पाणबुड्या देऊं केल्या आहेत असें ऐकतों. तें इजिप्त आणि इंडोनेशिया या दोन्ही ठिकाणीं जें दिसतें हें की, ' शस्त्रास्त्रांचें साहाय्य हें शेवटीं राजकीय हत्यार ठरलें ' तें भारतांत व पाकिस्तानांत घडवून आणण्याचा रशियाचा प्रयत्न आहे. आम्ही याबाबत जागरूक राहणार, का घरांतील भांडणांमुळे पाहुण्यांना आंत घेणार आहोंत, हा आमच्या अकलेचा सवाल ठरणार आहे.

*

ऑगस्ट महिन्यांतील दिल्लींतील हवा अशी चमत्कारिक असते की उकाड्या-मुळे जीव अगदी नकोसा होतो. अंगांतून वाहणाऱ्या घामाच्या धारांनी स्नान घडण्या-पेक्षा जोराची वृष्टि होऊन भिजावयास झालें, तरी तें अधिक सुखाचें वाटतें. रस्ते नद्या बनून वाहूं लागले तरी त्यांतून चालतांना दिक्कत वाटत नाही.

सडक नहीं अब कहीं दिखती नदी बह रही उसपर ।
पेड नहाये झूम रहे है हवा बह रही सुखकर ।।

या आकस्मिक पावसाने जशी हवा मोकळी होते तसेंच येथील तंग राजकीय वातावरणहि अनपेक्षितपणें निर्माण होणाऱ्या विनोदाने मोकळें होतें.

आता हेंच पाहा ना! सध्या दिल्लींत आहे जनसंघाचें राज्य. या राजधानींत 'हिंदुस्थान' या नांवाने एक हिंदी वृत्तपत्र निघतें. या वर्तमानपत्राने आपल्या २ मार्च १९६९ च्या अंकांत 'रामायण की विलायती आलोचना' हा ऋषि बंकिमचंद्रांचा 'लोकरहस्यां'त छापलेला मूळ लेख पुनर्मुद्रित केला. झालें! जनसंघीयांच्या वर्तुळांत एकच गदारोळ उठला – "कोण हा बंकिमचंद्र? याला आमच्या परमपूज्य रामायणाची टिंगल करण्याचा काय अधिकार?" तत्काळ कांही जनसंघीय उठले, ते सरळ 'हिंदुस्थान'च्या कचेरींत गेले आणि म्हणाले, "कुठे आहेत बंकिमचंद्र? आम्ही त्यांचे तुकडे करतों."

संपादक विनोदबुद्धि जागृत असलेले गृहस्थ होते. ते म्हणाले, "बंकिमचंद्र पाहिजेत ना! पण ते आता येथे भेटणार नाहीत. त्यासाठी स्वर्गात जावयास हवें."

एवढ्यानेच भागले नाही. लगोलग दिल्ली सरकारला हलविलें गेलें व दिल्लीचे लेफ्टनंट गव्हर्नर झा यांनी आज्ञा काढली – "भारतीय दंडविधानाच्या १९५ – अ कलमाप्रमाणे आपण प्रसिद्ध केलेलें लिखाण हें 'deliberately and maliciously intended outrage to the religious feeling of Hindus by insulting their religious beliefs." त्याप्रमाणे दंडविधानाच्या ९९ – अ कलमानुसार २ मार्चचे 'हिंदुस्थान'चे अंक जप्त करण्यांत येणार होते.

आता काय हसावें की रडावें? 'वंदेमातरम्'चे रचनाकार ऋषि बंकिमचंद्र हिंदुत्वनिष्ठांना माहिती नसावेत! बरें, ते अक्कलशून्य ठरले, तरी मिथिलेंत शिकलेल्या, संस्कृतचे पंडित असलेल्या लेफ्टनंट गव्हर्नर झा यांनाहि हें माहिती असूं नये की, खोटचा भारतीय विद्येच्या (Indology) नांवाने गीता बायबलामध्ये आहे आणि रामायण युरोपीय पुराणांतून चोरलें आहे असें सांगणाऱ्या विलायती शहाण्यांवर बंकिमचंद्रांनी हें उपरोधात्मक लिखाण केलें होतें. शेवटीं हा गाढवांचा गोंधळ लक्षांत येऊन १९ जुलैला जप्तीची आज्ञा मागे घेण्यांत आली.

प्रा. समर गुहांनी हें प्रकरण लोकसभेंत सांगून हास्याचा कल्लोळ उडवून दिला व जनसंघाची बाजू सावरतांना मधोक यांची केविलवाणी स्थिति झाली. खासदार ज्योतिर्मय बसू म्हणाले, "तरी बरें, प्रत्यक्ष रामायणावरच जप्तीची आज्ञा बजावली नाही. रामायण शब्दाची फोड राम – यवन अशी करून रामायणांत मुसलमानांनी प्रक्षिप्त प्रवेश केला असल्याची तक्रार जनसंघीयांकडून यावयाची!"

*

जनसंघीयांच्याच सरकारला नांवें ठेवावयास नकोत. कांग्रेस सरकारच्या वेगवेगळ्या मंत्रालयापेक्षा हें कांही निराळे चाललेलें नाही.

आकाशवाणीच्या वार्तापत्रांतून चीनची एक बातमी प्रसृत करण्यांत आली. "छातीला गोळी लागून विद्ध झालेला एक चिनी युवक मरणोन्मुख पडला असतां माओ-त्से-तुंगचें छायाचित्र त्याच्यापुढे धरतांच तो बरा होऊन उठून बसला." ही वार्ता कोणीहि हास्यास्पद म्हणून झिडकारील. पण आमच्या आकाशवाणीने ती वार्तापत्रांत ऐकविली. खासदार सी. सी. देसाई यांनी जेव्हा या प्रकरणीं सरकारला धारेवर धरलें तेव्हा मग खुलासा केला गेला की, "ती चीनवरील टीका म्हणून ऐकवावयाची होती. चुकून ती वार्तापत्रांत ऐकविली गेली !"

आकाशवाणीच्या कारभारांत जसें कांही घुसडलें जातें तसें चोरलेंहि जातें. १३ ऑगस्ट १९६९ पर्यंतच्या सतरा महिन्यांच्या काळांत टाईपरायटर, ट्रान्झिस्टर, स्टॉपवॉच वगैरे गोष्टी तर चोरल्या गेल्याच, पण १७७ टेप साखसुरतपणें परदेशीं विकले गेले. हे टेप कोरे नव्हते, तर महात्मा गांधी, पं. नेहरू, सरदार पटेल, राजेंद्र-प्रसाद, राजाजी, डॉ. राधाकृष्णन् व झकीर हुसेन अशांची बहुमोल वाणी या टेपवर ध्वनिमुद्रित केली गेली होती. "यांतील कांही टेप आकाशवाणीतील सांस्कृतिक खात्याच्या एका अधिकाऱ्याने अमेरिकेच्या माहिती खात्याच्या अधिकाऱ्यांना मुंबईत पंधरा हजार रुपयांना विकले हें खरें का," असा प्रश्न खासदार बाबूराव पटेल यांनी लोकसभेंत विचारला असतां, गुजराल यांनी "याची माहिती मला नाही. पण चौकशी केली जात आहे" असें उत्तर दिलें. एकूण असा आहे सरकारी कारभार !

रेल्वेंत तर नेहमीच गमतीगमती होत असतात. थर्ड क्लासचा एक डबा ५ अप् एक्स्प्रेसबरोबर खजुरियाघाट ते नवे बोंगाई गाव असा प्रवास करणार होता. तो कुमेदपूरला वेगळा काढून पाठविला गेला कतिहारला ६१ अप् पॅसेंजरने. म्हणजे मुंबईला जाणाऱ्याला दौंडला पाठवावें, अशांतला हा प्रकार !

कारभारांतील या गमती सांगतांना व राजकीय वातावरणाची चिकित्सा करतांना मला कोणाकडे बोटें दाखवावयाची इच्छा नसून, देशाच्या कारभाराचें राजधानींत दृष्टीस पडणारें एक सम्यक् चित्र नागरिकांपुढे उभें करावें अशी मनीषा आहे. रवींद्रनाथ ठाकूर हे उत्तम चित्रकार होते. पण श्री. नंदलाल बोसांसारख्या कलामहर्षीने आपल्या चित्रावर दिलेला अभिप्राय ऐकण्याची त्यांना फार इच्छा होती. पण नंदलाल कांही बोलेनात. शेवटीं एक दिवस रवींद्रनाथांनी नंदलाल यांना आपल्या घरी येण्याचें आमंत्रण दिलें.

नंदलाल बोस यांनी उंबरठा ओलांडून घरांत प्रवेश करतांच रवींद्रांनी दार लावून घेतलें व म्हणाले, "आता न बोलतां कसे जातां तें पहातों !"

श्री. नंदलाल बोस यांनी चौफेर नजर टाकली, तों दिवाणखान्यांत रवींद्र-नाथांनी चितारलेल्या उत्तम कलाकृति टांगून ठेवल्या होत्या.

न बोलतां नंदलाल एक एक चित्र पाहत पुढे सरकूं लागले.

मधेच रवींद्रनाथांकडे दृष्टि वळवून त्यांनी विचारलें, " रवींद्रबाबू, आपल्या या सर्व चित्रांतील मानवाकृतींच्या मुठी बंद कां ? "

रवींद्रनाथ खाली मान घालून म्हणाले, " मला चित्रांत बोटें दाखवितां येत नाहीत ! "

त्यावर नंदलाल मोकळेपणीं हसून म्हणाले, " तेंच, तें म्हणत होतों मी ! आपली कला सर्व कांही दाखविते, पण बोटें दाखवीत नाही ! "

माझीहि भूमिका तीच आहे.

**– केसरी, दि. १७ ऑगस्ट १९६९**

# गाजलेली निवडणूक

- १९ -

इंदिरा गांधी यांची जीत झाली आहे. गेल्या कांही दिवसांपासून राष्ट्रपति-पदाची निवडणूक हा महामंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न झाला होता आणि त्यामुळेच या निवडणुकीच्या निकालाबाबत कमालीचें औत्सुक्य निर्माण झालें होतें. गिरी का रेड्डी हाच एक प्रश्न चर्चिला जात होता. शेवटीं गेल्या बुधवारीं रात्रीं साडेदहाच्या सुमारास श्री. शकधर यांनी श्री. व्ही. व्ही. गिरी निवडून आल्याची घोषणा केली आणि राजधानींत ' इंदिरा गांधी झिंदाबाद ' हा एकच नारा सुरू झाला.

'सिंडिकेट'ने श्री. संजीव रेड्डी यांची उमेदवारी पक्षावर लादल्यापासून श्रीमती इंदिरा गांधी कमालीच्या प्रक्षुब्ध झाल्या होत्या आणि त्यांनी " एक मी तरी राहीन किंवा 'सिंडिकेट' तरी राहील " अशी प्रतिज्ञा केली होती. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने 'इंडिकेट' आपले सर्व सामर्थ्य पणाला लावून 'सिंडिकेट'चा धुव्वा उडवायला किती उत्सुक झाली आहे याचें विवेचन मी गेल्या आठवड्यांत केलें होतें आणि बुधवारीं जाहीर झालेल्या निकालाने तें विवेचन किती अचूक होतें हें दाखवून दिलें.

श्री. गिरी आणि श्री. संजीव रेड्डी किंवा कॉंग्रेस आणि कॉंग्रेसेतर पक्ष असें या लढतीचें स्वरूप नव्हतेंच, तर इंदिरा गांधी आणि 'सिंडिकेट' यांच्यांतील हा सामना होता. म्हणजेच कॉंग्रेस-पक्षावर यापुढे कोणाचें प्रभुत्व राहील याचाच इंदिरा गांधी यांना सोक्षमोक्ष लावून घ्यावयाचा होता. सतरा राज्यांपैकी अकरा राज्यांत गिरी यांना भरघोस पाठिंबा मिळाला, यावरून इंदिरा गांधी यांच्या

सामर्थ्याची 'सिंडिकेट'ला चांगलीच कल्पना आली आहे आणि त्यामुळेच तिला आतापर्यंतचें आक्रमक धोरण सोडून द्यावें लागणार आहे. इंदिरा गांधी यांची ही मोठीच कमाई म्हटली पाहिजे.

*

आसाम, गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश आणि म्हैसूर या सहा राज्यांमध्ये संजीव रेड्डी यांना गिरी यांच्यापेक्षा अधिक मतें पडलीं. यांपैकी आसाम अखिल भारतीय राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा नाही. उरलेल्या पांच राज्यांचा विचार करतां असें म्हणतां येईल की, गुजरात, मध्यप्रदेश आणि राजस्थान या तीन राज्यांतील काँग्रेस-पक्षांत प्रतिक्रांतिवादी गटाचा जोर असून, महाराष्ट्र आणि म्हैसूर येथील काँग्रेस-पक्षावर सरंजामशाही वृत्तीचा पगडा आहे. महाराष्ट्रा पुरतें बोलायचें झालें, तर तेथील काँग्रेसमध्ये श्रीमंत शेतकरीवर्गाचें वर्चस्व असून, या वर्गाला इंदिरा गांधी यांचा पुरोगामी कार्यक्रम मानवणारा नाही. संजीव रेड्डी यांना महाराष्ट्र काँग्रेसने एकमुखी पाठिंबा द्यावा यामागचें हेंच इंगित आहे.

श्री. गिरी यांचा विजय झाल्यामुळे इंदिरा गांधी यांची प्रतिमा आता उजळून निघाली असून, त्यांच्याशीं मुकाबला करण्याची 'सिंडिकेट'मध्ये मुळीच ताकद उरलेली नाहीं. उलट इंदिरा गांधी यांच्या आक्रमक पावलांना तोंड कसें द्यायचें याचीच चिंता सिंडिकेटला वहावी लागणार आहे. कदाचित् इंदिरा गांधी लवकरच मंत्रिमंडळाची पुनर्रचना करतील व 'सिंडिकेट'संबंधी सहानुभूति बाळगणाऱ्या मंत्र्यांना अर्धचंद्र मिळून, त्यांच्या जागीं नवे तरुण सहकारी त्या निवडतील असा संभव आहे.

मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेचा विषय निघाला की, श्री. यशवंतराव चव्हाण यांचें यापुढे स्थान काय राहील हा प्रश्न ओघानेच पुढे येतो. कारण दोन्ही डगरींवर हात ठेवून कुंपणावरून उभय गटांना खूष राखण्याचें त्यांचें तंत्र यापुढे त्यांना उपयोगी पडणार नाही. आतापर्यंत अशी पद्धत होती की, काँग्रेस-संघटनेंत पेचप्रसंग निर्माण झाला की, श्री. चव्हाण 'शांतिदूता'ची भूमिका वठवीत असत. या वेळींहि इंदिरा गांधी आणि निजलिंगप्पा यांच्यांत मध्यस्थी घडवून आणण्यासाठीच त्यांनी शांतिदूताची भूमिका स्वीकारली आहे. परंतु श्री. यशवंतराव चव्हाण संजीव रेड्डींच्या उमेदवारीपासून 'सिंडिकेट'च्या बाजूने झुकलेले असल्यामुळे इंदिरा गांधी आता त्यांची मध्यस्थी मानीत नाहीत. शिवाय इंदिरा गांधी यांना आता कोणाच्याच मध्यस्थीची गरज उरलेली नाही.

*

त्यामुळे श्री. चव्हाण यांची प्रतिमा कांही प्रमाणांत तरी काळवंडली आहे. ते पहिल्यापासून इंदिरा गांधी यांच्याबरोबर उभे राहिले असते तर ते पुरोगामी ठरले असते व तसें घडणें महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने इष्ट ठरलें असतें. परंतु 'सिंडिकेट' आणि 'इंडिकेट' यांच्यांतील दरी अधिक रुंद झाली आणि पक्षैक्य टिकविण्यासाठी या दोन्ही गटांनी आपापला आग्रह मागे घेऊन उभय गटांना मान्य होणाऱ्या तिसऱ्याच एखाद्या व्यक्तीकडे सत्तासूत्रें सोपवावींत असा बूट निघाला, तर दोन्ही गट ' तडजोडीचा उमेदवार ' म्हणून आपली निवड करतील, असें धोरण मनाशीं बांधून श्री. चव्हाण शांतिदूताची भूमिका वठवीत होते. पण इंदिरा गांधी यांच्या निर्विवाद विजयामुळे त्यांनी ही संधि गमावली आहे. इतकेंच नव्हे, तर ते इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळांत यापुढे राहिले तरी त्यांना पहिले महत्त्व उरणार नाही, हें उघड आहे. 'सिंडिकेट' आणि 'इंडिकेट' यांच्या लढ्यांत श्री. चव्हाण प्रतिगामी 'सिंडिकेट'च्या बाजूने उभे राहिल्याने राजस्थान, महाराष्ट्र, गुजरात आणि म्हैसूर हा पश्चिम भारत विरुद्ध इतर सारीं राज्यें, असें या निवडणुकीला स्वरूप प्राप्त झालें. तरी देखील महाराष्ट्राने श्री. चव्हाण यांच्या अपेक्षेपेक्षा संजीव रेड्डी यांना कमीच मतें दिलीं हें लक्षांत घेण्याजोगें आहे. संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या मतां-शिवाय श्री. गिरी यांना आणखी कांही मतें मिळालीं यावरून हीच गोष्ट सिद्ध होते.

*

पश्चिम भारत विरुद्ध शेष भारत असें या निवडणुकीला जसें वैचारिक स्वरूप आलें होतें तसेंच या निवडणुकीला अभावितपणें आणखी एक स्वरूप प्राप्त झालें होतें. अर्थात् हा उल्लेख केवळ गंमत म्हणूनच करीत आहें. लोकसभेचे सभापति आणि राज्यसभेचे अध्यक्ष यांच्यांतील ही लढाई होती आणि तींत राज्यसभेच्या अध्यक्षांनी लोकसभेच्या सभापतीचा पराभव केला. तसाच आणखी एक उल्लेख केला पाहिजे. आंध्र-पुत्र असलेल्या संजीव रेड्डी यांना आंध्रने देखील नाकारलें तर महाराष्ट्र-पुत्र असलेल्या चिंतामणराव देशमुखांना महाराष्ट्रानेहि नाकारलें.

राष्ट्रपतिपदाच्या या निवडणुकींत काँग्रेस-पक्ष तळापासून ढवळून निघाल्याने जो गाळ वर आला तो पाहतां, हा पक्ष न मोडला तर देशाचें सारें राजकारण तो अधिकाधिक गढूळ करील. या निवडणुकींत सत्ता, पैसा, पक्षीय दडपण, जातीयवाद, लाचलुचपत, प्रतिस्पर्धी पक्षांशीं हातमिळवणी इत्यादि साऱ्यांचा वापर मुक्तमनाने केला गेला. या संसर्गजन्य रोगाची लागण इतर पक्षांतहि झाली. म्हणूनच काँग्रेसच्या या भ्रष्टतेमुळे अखेरी संसदीय लोकशाहीचाहि घात झाल्याशिवाय राहणार नाही असें म्हणावें लागतें.

इंदिराजी आज सत्तेवर आरूढ आहेत, तर पक्षसंघटना आपल्या हातीं आहे असें 'सिंडिकेट' मानतें. या निवडणुकींत इंदिराजींनी आपल्या हातीं असलेल्या सत्तेचा वापर केला, तर सिंडिकेटने त्यांच्या हातीं असलेल्या पक्षीय दडपणाचा

उपयोग केला. इंदिराजींचें व्यक्तिमत्त्व उठावदार करण्यासाठी आपल्या आकाशवाणीने खऱ्याखोटयाची चाड बाळगली नाही; तर सिंडिकेटच्या हातीं असलेलीं भांडवलदारी वृत्तपत्रें इंदिराजींची जनमानसांतील मूर्ति डागळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतीं. इंदिराजींच्या मंत्रिमंडळांतील त्यांचे सहकारी मंत्री 'गाजराच्या टोपल्या' फिरवीत होते, तर – "पुन्हा तिकीट मागाल तें जनतेकडेच मागा, तेव्हा मात्र पक्षाकडे येऊं नका" – अशी उघड दमबाजी सिंडिकेटमार्फत होत होती. इंदिराजींनी जगजीवनराम, फक्रुद्दीन यांच्याकडून कॉंग्रेस-अध्यक्षांना मतस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारें पत्र लिहून, रेड्डींच्या विरुद्ध हरिजन व मुसलमान यांना आणि स्वर्णसिंगांच्या मदतीने शिखांना उभें केलें. उलट यशवंतराव चव्हाणांनी त्याची प्रतिक्रिया म्हणून महाराष्ट्रांतील साऱ्या खासदारांना बंगल्यावर बोलवून त्यांच्यांतील संशयितांना व अल्पसंख्याकांना रेड्डी यांना मत देण्यासंबंधी वेचून वेचून ठणकावलें. इंदिराजी असोत किंवा सिंडिकेटचे नेते असोत, दोघांनीहि या जातीय-वादाचे कॉंग्रेसच्या ध्येयधोरणावर यामुळे कोणते दूरगामी परिणाम होतील हें विचारांतहि घेतलें नाही.

कॉंग्रेसी खासदारांच्या वागणुकींतील मूळचा खोटेपणा, बेशिस्त व लाचारी महामंत्र्यांच्या व सिंडिकेटधार्जिण्या कॉंग्रेस-श्रेष्ठांच्या वरील बेमुर्वत वागणुकीने जास्तच ओंगळवाणीं व घृणास्पद वाटूं लागलीं. 'स्थिरतेसाठी कॉंग्रेस टिकवा' असें म्हणणाऱ्या सत्प्रवृत्तांनी 'सेंट्रल हॉल'मधील हें केविलवाणें दृश्य पाहिलें असतें तर त्यांना स्वत:चीच कीव वाटली असती. एका बाजूने मतस्वातंत्र्याच्या खलित्यावर हैदराबादचे एक राज्यमंत्री सह्या घेत हिंडत होते, तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रांतील दुसरे राज्यमंत्री कॉंग्रेसच्या अस्तित्वासाठी रेड्डी यांना मत देण्याच्या प्रतिज्ञेवर शिक्कामोर्तब करून घेत होते. आता जेथे सामान्य मतदारहि बेरकी-बनला आहे तेथे संसदेंतील कॉंग्रेस-सभासद तर काय अगदी खारावलेले राज कारणी! ते थोडेच असे सहज कोणाच्या हातीं सापडणार! अनेकांनी त्यामुळे दोन्ही कागदांवर स्वाक्षऱ्या ठोकल्या. परिणामीं दोन्ही खलित्यांवरील सह्यांची बेरीज कॉंग्रेस खासदारांच्या संख्येपेक्षाहि अधिक झाली!

शेवटीं एक खासदार हसत विनोदाने म्हणाले –

"कॉंग्रेसच्या संसदीय पक्षांत 'पॉप्युलेशन एक्सप्लोजन' झालें आहे. डॉ. चंद्रशेखरांना ताबडतोब त्यांच्या लाल त्रिकोणासह बोलवा."

दुसरे एक खासदार व माजी केंद्रीय मंत्री सेंट्रल हॉलमधील तणातणीकडे बोट दाखवून मला म्हणाले, "जयंतराव, यादवांच्या अखेरच्या काळांतील हे दृश्य पाहा."

तो मतदानाच्या आधीचा दिवस होता. त्यामुळे मी त्यांना म्हणालों, "मुसळें तर सर्वांच्या हातीं दिसत आहेत; पण 'मुसल चलाना और बगल ढाँकना एक साथ नहीं हो सकता, इसलिए बेचारे लाचार है।'"

'इंडिकेट' व 'सिंडिकेट'मधील हा झगडा जर सरळ सरळ सत्तास्पर्धेचा असेल तर ती सत्ता हातची न जाईल याची दुतर्फी काळजी घेतली जाईल व ही सत्ता जर काँग्रेस पक्षाच्या ऐक्यावर आधारित असेल, तर ते ऐक्य बाह्यतः का होईना, पण टिकविण्याचा दुतर्फी प्रयत्न होईल.

इंदिराजींनी गंभीर परिणामांचा जो इशारा काँग्रेस अध्यक्षांना दिला आहे त्यानुसार त्यांना आक्रमणाचे पवित्रे टाकण्याशिवाय इलाज राहिला नाही, तर ते पवित्रे त्यांना अखिल भारतीय काँग्रेस-समितींत काँग्रेस-अध्यक्षांविरुद्ध अविश्वासाचा ठराव संमत करून, मंत्रिमंडळाची पुनर्रचना करून किंवा लोकसभा बरखास्त करून मध्यावधि निवडणुका घेण्याच्या अंतिम टोकापर्यंत टाकावे लागतील. आपलें सामर्थ्य विशाल जनक्षेत्रांत अधिक असलें, तर संसदीय पक्षासारख्या लहान क्षेत्रांत तें कमी आहे, हें इंदिराजींनी जाणलें आहे. परंतु या आक्रमक पवित्र्यांचा परिणाम शेवटीं काँग्रेस दुभंगण्यांत होईल, इंदिराजींना संयुक्त समाजवादी, प्रजासमाजवादी व साम्यवाद्यांच्या साहाय्याची याचना करावी लागेल व अखेरी तें आजच्या काँग्रेसच्या नाशाला कारणीभूत होईल, असा संभव दिसत आहे. साम्यवादी पक्षाच्या आधारे उभी राहिलेली 'इंदिरा-काँग्रेस' इंडियन नॅशनल काँग्रेस नव्हे ! पण जर या झगड्यांत केवळ सत्ताभिलाषा नसेल, तर काँग्रेसला 'फिनिक्स' पक्ष्याप्रमाणे नवें सतेज स्वरूप देण्याचें धाडसहि केलें जाऊं शकेल. हें धाडस इंदिराजींनी केवळ सत्ताभिलाषेने पवित्रे घेतले असले, तर त्यांना होणार नाही.

या विवेचनाचा इत्यर्थ हा आहे की, दुतर्फी कितीहि शस्त्रें परजलीं किंवा संशयग्रस्तता राहिली, तरी शेवटपर्यंत समझोत्याने काँग्रेसचा हा जीर्णशीर्ण वृक्ष टिकवून, त्याच्या ढोलींत तोंड लपवून सत्ता भोगीत राहण्यासाठी सोयिस्कर असें राजकारण खेळलें जाण्याचा दाट संभव आज तरी दिसतो.

दिल्लींतील राजकारण हें असें गढूळलेलें आहे. शेवटीं सामान्य माणसालाच याविरुद्ध संघटितपणें उभें राहवें लागणार आहे. एका हिंदी कवीने असें म्हटलें आहे –

> एक दिन इन्सानको संघर्ष करना पडेगा ।
> अपनेको बचानेको ।
> आदम की आदमी कहलाती अवलादोसे –
> तर्कलुप्त, लक्षभ्रष्ट भीडोंसे –
> संज्ञा-व्यक्तित्वहीन कीडोंसे –
> मंत्रालय, न्यायालय, सचिवालय, संसद की मांदोसे !

*

राष्ट्रपतींच्या निवडीनंतर येत्या दि. ३० ऑगस्टला उपराष्ट्रपतींची निवड होणार आहे. त्यासाठी काँग्रेस-उमेदवार म्हणून श्री. गोपालस्वरूप पाठक यांची निवड वाद न होतां झाली आहे. श्री. हरिभाऊ कामत हे त्यांना विरोधकांतर्फे प्रतिस्पर्धी आहेत. श्री. गोपालस्वरूप पाठक यांच्याशीं बोलण्याचा योग नुकताच एके ठिकाणीं चहाच्या वेळीं आला. श्री. पाठक यांना तेजबहादूर सप्रू तसेच पंडित मोतीलाल नेहरू, हृदयनाथ कुंझरू, झाकीर हुसेन आदि जुन्या पिढींतील श्रेष्ठ व बुद्धिवान् नेत्यांबरोबर काम करण्याची संधि मिळाल्यामुळे त्यांच्याजवळ आठवणींचा साठा मोठा आहे.

सर तेजबहादूर सप्रू यांच्या हाताखाली उमेदवार म्हणून अलाहाबादच्या वरिष्ठ न्यायालयांत ते कांही काळ कामहि करीत होते. तेथील कांही गमती सांगतांना त्यांना एका कटाच्या खटल्याची आठवण झाली. ते म्हणाले, " सरकारने तो खटला चालविण्यासाठी मुद्दाम कलकत्त्याचे सुप्रसिद्ध वकील लॅम्सफोर्ड जेम्स यांना आणले होते. पुराव्याची तपासणी झाल्यावर जेम्स बोलण्यास उभे राहिले व नाटकी भाषेंत म्हणाले, 'मला जर या गुन्ह्याबद्दल गंभीरता वाटली (felt) नसती . . ."

जेम्स यांचे वाक्य पुरें होण्याच्या आंत पंडित मोतीलाल नेहरू उठून उभे राहिले व म्हणाले की, " मिलॉर्ड, जेम्स यांच्या या वाक्याला माझा विरोध आहे. कोर्टांत कोणाच्या काय भावना आहेत याचा सवाल नसून, जी वस्तुस्थिति (submission) असेल ती मांडावयाची असते." न्यायाधीशांनी मोतीलालजीचें म्हणणें ताबडतोब उचलून धरलें व परिणामीं लॅम्सफोर्ड जेम्स यांचें भाषण इतकें पडलें की, इतकी वाईट बाजू यापूर्वी त्यांच्या तोंडून कधीच मांडली गेली नव्हती.

पंडित मोतीलाल नेहरूंची आणखी एक गंमत त्यांनी सांगितली. इंदूरच्या एका श्रीमंत कोटयाधीश व्यापाऱ्यावरील खटल्यांत मोतीलाल व भुलाभाई एकमेकांविरुद्ध होते. मोतीलाल यांची बाजू अगदीच लंगडी होती व स्वाभाविकच ते तो खटला हरले. भुलाभाईंनी व्यापाऱ्यातर्फे खटला जिंकला म्हणून त्यांना मिरवत नेण्यासाठी हत्ती आणला गेला. हत्ती येतांच हौद्यांत उडी मारून मोतीलालच बसले व माहुताला हत्ती चालवण्याची त्यांनी आज्ञा केली. माहुताला काय माहीत, कोणाला न्यावयाचें ? जो हरला तो हत्तीवर स्वार होऊन निघाला व जो जिंकला तो मात्र 'आ' करून हा प्रकार बघतच राहिला.

सध्या श्री. गोपालस्वरूप पाठक हे म्हैसूरचे राज्यपाल आहेत. म्हैसूरच्या महाराजांबाबत बोलणें निघालें. शरीराप्रमाणे महाराजांची विद्वत्ताहि मोठी आहे. त्या संदर्भांत अलाहाबादच्या 'पायोनियर' या जुन्या वृत्तपत्राच्या कचेरींतील एक गमतीचा प्रकार श्री. पाठक यांनी सांगितला. अलाहाबादचे एक वकील 'ब्रीफलेस लॉयर' होते. अलाहाबादच्या लॉ-कॉलेजमध्ये त्याना मोठ्या प्रयत्नाने रीडरची

नोकरी मिळाली. ते एकदा 'पायोनियर'च्या संपादकांना भेटावयास गेले. खोलींत शिरतांच संपादकांनी एका खुर्चीकडे बोट दाखवून त्यांना बसण्यास सांगितलें. परंतु हे महाशय न बसतां उभ्यानेच आपण कसे मोठे बॅरिस्टर आहोंत व आपण रीडर म्हणून शिकवण्याचेंहि कसें काम करतों वगैरे सांगूं लागले. शेवटीं संपादकमहाशय मिष्किलपणें हसून म्हणाले, " मग आपण एकदम दोन खुर्च्यांवर बसा ! कारण दुप्पट आकाराच्या माणसाला जशा दोन खुर्च्या लागतात, तशाच दोन कामें करणाऱ्यांनाहि लागत असाव्यात. "

*

अनुभवाचा व आठवणींचा साठा असलेले हे दिलखुलास व सौजन्यशील गृहस्थ निवडणुकींत विजयी झाले, तर डॉ. राधाकृष्णन्, झाकीर हुसेन, गिरी यांनी भूषविलेलें राज्यसभेचें अध्यक्षपद यापुढे भूषविणार आहेत. पण राधाकृष्णन्, झाकीर हुसेन यांचा सुवर्णकाळ आता राहिलेला नाही. तो काळ गेला. तीं माणसें बदललीं. जुन्या निष्ठा उरल्या नाहीत. जुना व्यासंग दिसत नाही. आज राज्य-सभेंत काय किंवा लोकसभेंत काय, एखाद्या विषयावरील विद्वत्तापूर्ण विवेचनापेक्षा प्रेस गॅलरीकडे पाहून झालेलीं भाषणेंच ऐकावयास मिळतात. एक वृद्ध खासदार विषण्णतेने संसदगृहांतील विविध वचनांकडे बोट दाखवून मला म्हणाले, " येथे 'सत्यं वद, धर्मं चर', 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः', 'अहिंसा परमोधर्मः' इत्यादि जीं वचनें लावलीं आहेत तीं सर्व काढून टाकून आता एकच वचन लावावें. "

मीं विचारलें, " कोणतें ? "

ते उद्गारले,

" घटं भिद्यात् पटं छिद्यात् कुर्यात् रासभरोहणम् ।
येन केन प्रकारेण, प्रसिद्धः पुरुषो भवेत् । "

खरें आहे त्यांचें म्हणणें.

— केसरी, दि. २४ ऑगस्ट १९६९

# शेवटच्या प्रवेशांत कोसळलेलें नाटक

- २० -

"हुश्, सुटलों बुवा एकदाचे ! हातींपायीं सहीसलामत सुटलों हें काय थोडें झालें ! पुढचें पुढे पाहूं !" लोकसभेंतील कॉंग्रेस खासदारांची ही प्रतिक्रिया कार्यकारिणीच्या ठरावानंतर व्यक्त होत होती.

हो, काय सांगावें, निजलिंगप्पांनी म्हटल्याप्रमाणे पक्षांतील बेशिस्तीला आळा घालण्यासाठीं इंदिराजी, जगजीवनराम व फक्रुद्दीन यांच्यावर शिस्तभंगाची उपाय-योजना करण्याचा कार्यकारिणीने हट्टाने निर्णय केलाच असता, तर कोण काय करणार होतें ? मग आकाशच कोसळलें असतें. कारण कॉंग्रेसचीं दोन शकलें तर झालीं असतींच, पण राज्याराज्यांतील उर्वरीत कॉंग्रेस-मंत्रिमंडळेंहि धोक्यांत आलीं असतीं. खासदारांना स्वत:पुरतें बोलावयाचें झालें, तर त्यांचें खासदारपद संपुष्टांत येऊन सहज लाखभराच्या मिळकतीला ठोकर बसली असती. शिवाय नव्या निवडणुकीची टांगती तलवार व त्या मनस्तापावर 'गंडस्योपरि पीटिका' या न्यायाने निवडणुकीचा खर्च ! इंदिराजींवर शिस्तभंगाचा उपाय योजला असता, तर जनतेचा कौल मागितल्याशिवाय त्या थोड्याच थांबल्या असत्या ? त्यांनी लगेचच लोकसभा बरखास्त करून मध्यावधि निवडणुका घेतल्या असत्या. त्यामुळे "या साऱ्या जंजाळांतून आता सुटलों, अगदी सहीसलामत सुटलों !" असेंच प्रत्येकजण म्हणत होता.

कॉंग्रेस कार्यकारिणीची बैठक मोठ्या बंदोबस्तांत जंतरमंतर रस्त्यावरील अ. भा. कॉंग्रेस समितीच्या कचेरींत भरली होती. आधीचा तलवारीचा खणखणाट पाहून कार्यकारिणीच्या निर्णयाबद्दल साऱ्यांची उत्सुकता अगदी शिगेला पोचली होती आणि तें स्वाभाविकहि होतें. नाही तरी असेंच नसतें का ? लग्नानंतरचीं

पहिली कांही वर्षे पति बोलतो व पत्नी खाली मान घालून ऐकते, नंतर पत्नी बोलते व पति मुकाट ऐकतो आणि मग दोघेंहि एकमेकांना बोलतात व शेजारी ऐकतात. इंदिराजींनी महामंत्री झाल्यानंतर प्रारंभीचा कांही काळ त्यांना काँग्रेस-श्रेष्ठांच्या सल्ल्यानुसारच कारभार सांभाळला, अगदी 'गूंगी गुडिया' म्हणवून घेण्याइतका मुकेपणा पाळला ! परंतु बंगलोरला जें गाडें बिनसलें तेथपासून इंदिराजी सपासप आसूड उडवीत होत्या व काँग्रेसश्रेष्ठ मुकाट ऐकत होते. मग सिंडिकेट आणि इंडिकेट या दोघांच्याहि तलवारी तळपूं लागल्या व सारी जनता उत्सुकतेने पाहूं लागली.

"तत्त्वांचा घात करून साधलेलें ऐक्य कुचकामाचें आहे" हें इंदिराजींचें आदल्या दिवशीचे संतप्त बोल आणि "पक्षांतील बेशिस्तीला कडक उपाययोजना करून आळा घातला जाईल," हे निजलिंगप्पांचे कुर्रेबाज उद्गार यामुळे हें नाटय खूप रंगलें होतें. पण रंगलेलें, प्रवेशागणिक चढत गेलेलें नाटक जसें शेवटच्या प्रवेशांत साफ पडावें, आकाशांत उंच चढलेला पतंग दोरा तुटून गोते खात खाली यावा, खूप फुगलेला फुगा फुटून पोचट व्हावा तसें काँग्रेस कार्यकारिणीच्या पोचट ठरावाने त्यांतील सारें नाटयच कोसळलें. जनतेची आकाशाला भिडलेली उत्सुकता अगदी पाताळांत पोचविली गेली. तत्त्वांच्या संघर्षांत दुतर्फी चुका झाल्या आहेत हें खेदपूर्वक नमूद करून, शिस्तभंगाच्या प्रश्नाला यशवंतराव चव्हाणांच्या ठरावाने मोठ्या चलाखीने बगल दिली गेली व तो दुतर्फी सोयिस्कर असल्याने मान्य करण्यांत आला. मग राहिलें काय ? इंदिराजींनी पत्रकारांना सांगितल्याप्रमाणे, सारेच संपलें ! मोरारजी, कामराज हे दु:खित झाले. कारण तेच काय ते या यज्ञाचे बळी ठरले. चंद्रभानु गुप्त, सुखाडिया प्रभृतींनी आपल्या मंत्रिमंडळांना तात्पुरतें वांचविलें. यशवंतरावांनी शांतिदूताची भूमिका सुब्रह्मण्यम् यांच्या मदतीने वठवून आपलें डळमळलेलें आसन स्थिर केलें व रामसुभगसिंग यांनाहि थोडा व्यवहार सांगितला.

*

पण या साऱ्या कारस्थानांत मुरब्बी श्री. स. का. पाटील कोठे आहेत ? इंदिराजींवर बाजू उलटवावयास निघालेले श्री. पाटील राष्ट्रपतींच्या निवडणुकीत स्वत:वरच बाजू उलटल्यामुळे नामोहरम झाले असें मानावें काय ? पण माझ्या कानीं पाटील व इंदिराजी यांच्यांत कांही समझोता ऐन वेळीं शिजत असल्याची कुजबूज आली आहे. तसें असेल तर इंदिराजींचीं पुढलीं धोरणें अधिक काळजीपूर्वक तपासावीं लागतील. ज्या शक्ति सिंडिकेटला नामोहरम करण्यासाठी त्यांनी मोकळ्या सोडल्या आहेत, त्या त्यांना पुन्हा काबूत आणाव्या लागतील व त्याचा त्यांच्यावरच विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला नव्या सामाजिक क्रांतीचें प्रतीक मानण्याची भाषा बोलली गेल्याने सामान्य

जनतेच्या अपेक्षा खूप उंचावल्या आहेत. अशा स्थितींत उपरण्याखाली भांडवलदारी विचारांशीं केला जाणारा समझोता घातक ठरल्याशिवाय राहणार नाही. सिंडिकेट आणि इंडिकेट या शब्दांनी कांही व्यक्त होत असेल, तर परस्परविरुद्ध दोन विचार-सरणी. काँग्रेसच्या ऐक्याच्या नांवें दोघांनी एकत्र राहणें याचा अर्थ साचलेल्या पाण्याचें डबकें पुन्हा कायम ठेवणें होय. तें पाणी पाट फोडून प्रवाही करण्याची इंदिराजींची मनीषा व्यक्त झाली म्हणून जनता त्यांच्यामागे उभी राहत आहे, हें त्यांनी ध्यानांत घ्यावें.

इंदिराजींचें व्यक्तित्व आज उजळून निघालें असून, काँग्रेसमधील त्यांची शक्ति कर्तुमकर्तुम् ठरूं पाहत आहे. स्वाभाविकच सारे सत्तालोभी त्यांच्या रथाला आता लोंबकळूं लागले आहेत. राष्ट्रपतींच्या निवडणुकींतील पराभवाने काँग्रेसश्रेष्ठ नुसते खचलेच नसून, ते फुटलेहि असल्याचें काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकींत सिद्ध झालें आहे. सत्ता व पैसा हाच जेथे परमेश्वर, तेथे शब्दांना, निष्ठांना किंमत असेलच कशी ? तेव्हा काँग्रेस कार्यकारिणीच्या विफलतेचें आश्चर्य मानावयाचें कारण नाही. काँग्रेस-ऐक्याच्या नांवाखाली झालेल्या पोकळ ठरावापेक्षा वेगळें कांहीहि होण्याची शक्यता नव्हती.

या साऱ्या राजकारणांत यशवंतरावांच्या हालचाली मोठ्या अर्थपूर्ण होत्या. राष्ट्रपतींच्या निवडणुकींत रेड्डींचा पराभव झाल्यानंतर, रेड्डींना मतें देण्यासाठी महाराष्ट्रीय खासदारांना वजावणारे यशवंतराव शांतिदूताच्या भूमिकेंत अवतरून इंदिराजींनी पत्करलेली पुरोगामी विचारसरणी हीच देशाचें स्वातंत्र्य पूर्णत्वास नेणारी शक्ति आहे, असें जेव्हा बोलू लागले, तेव्हा महाराष्ट्रांतील भाबडे काँग्रेस-खासदार पार भांबावून गेले. त्यांना कांही कळेनाच ! आता त्यामागील तात्त्विक बैठक समजावून घेण्यासाठी महाराष्ट्र काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या आमंत्रकाकडे एक खास बैठक घेऊन, खासदार धारिया व चंद्रशेखर यांना बौद्धिकासाठी पाचारण करण्यांत येणार आहे म्हणे. आतापर्यंत अण्णासाहेब शिंदे यांचीं बौद्धिकें त्यांनी ऐकलीं. आता धारियांचीं ऐकावींत. पडला कांही प्रकाश तर पडला !

चव्हाणांपुरतें बोलावयाचें, तर त्यांची चाल त्यांना जाणणाऱ्यांना नवी नव्हती. इंदिराजींच्या वागणुकीने रागावलेले यशवंतराव मनाने सिंडिकेटकडे गेले होते. पण त्यांच्यांतील मूळच्या 'मानवेंद्रवादी' पिंडाने त्यांना तात्त्विकदृष्ट्या इंडिकेटला जवळ राखलें होतें. त्यांच्या नेहमीच्या सावधवृत्तीनुसार एका बाजूस तत्त्ववादी धारिया व दुसऱ्या बाजूस पक्षवादी अण्णासाहेब शिंदे, अशीं दोन्ही प्यादीं ते हलवीत होते. राष्ट्रपतीच्या निवडणूकीपूर्वी सिंडिकेटचें बळ जसें वाढतें दिसू लागलें तसें धारियांचें प्यादें अडवून ठेवून त्यांनी अण्णासाहेब शिंदे वगैरेंच्या द्वारे भराभर हालचाली केल्या. अशोक मेहता आदि इंदिराजींनी टाकलेले मंत्रीहि मार्गदर्शक व तत्त्वचिंतक म्हणून यशवंतरावांभोवतीं जमा झाले. तडजोडीचा

उमेदवार ( काँप्रोमाइज् कँडिडेट ) म्हणून महत्त्वाकांक्षा पालवल्या गेल्या. पण साऱ्यांचेच अंदाज इंदिराजींच्या सफाईदार हालचालीने इतके खोटे पाडले की, अशोक मेहतांना पैजेंत लावलेला नुसता शर्टच काय, पण आपली पँटहि गमवावी लागली.

सावध यशवंतरावांनी लगेच पलटी खाऊन सिंडिकेटकडे कललेलीं पक्षवादी प्यादीं अडवून धारियांना पुढे काढलें व आपल्या अंगावर शांतिदूताच्या भूमिकेचा अंगरखा चढविला. इंदिराजींशीं बोलणीं सुरू झालीं. अशोक मेहतांना बाजूस सारून सुब्रह्मण्यम्‌ना हाताशीं धरलें गेलें व अशा रीतीने सत्तेला जळूप्रमाणे चिकटलेल्या काँग्रेसवाल्यांच्या मनोवृत्तीचा फायदा घेऊन इंदिराजींच्या विजयाने विफलमनस्क झालेल्या सिंडिकेटला दातीं तृण धरावयास लावण्यांत शांतिदूत यशवंतराव यशस्वी झाले. काँग्रेस-अध्यक्षांचीं व महामंत्र्यांचीं क्षेत्रें आणि मर्यादा निश्चित केल्या गेल्या. काँग्रेसजनांवरील संकट तात्पुरतें तरी टळलें. दुतर्फा गैरविश्वासाला पात्र होऊं पाहणाऱ्या यशवंतरावांची बाजू सावरली. शांतिदूताच्या भूमिकेंतून इंदिराजींच्या मदतीला यशवंतराच उपयुक्त ठरल्याने मंत्रिमंडळांतील त्यांचें आसन स्थिर झालें.

*

राजकारणांत "अकल क्या खाती है और पीती है" याचें उत्तर "गम खाती है और घुस्सा पीती है" असें बादशहा सलामतला एका हुषार मुल्लाकरवी बिरबलने सांगितलें होतें. सिंडिकेट व इंडिकेट यांच्या झगड्यांत दोरीवरील कसरत यशवंतरावांनी मोठ्या चातुर्याने केली. काम दमाने घेतलें व इंदिराजींवरील राग गिळून आपला तोल जाऊं दिला नाही. त्याचें श्रेय आज त्यांच्या पदरीं पडलें आहे. काँग्रेस-खासदारांच्या प्रतिक्रियेप्रमाणे आज तरी सारेजण सहीसलामत सुटले आहेत. पुढचे पुढे !

दिल्लींतील राजकारण सत्तास्पर्धेमुळे घृणास्पद वाटत असलें, तरी दिल्लीचें स्वरूप मात्र दिवसेंदिवस लोभसवाणें बनत आहे. दिल्ली-विकास-प्राधिकरणातर्फे तसा प्रयत्नहि जारीने चालू आहे. अर्थात् हेंहि दिल्लीच्या परंपरेला साजेसेंच आहे. पांडवांच्या इंद्रप्रस्थापासून इंग्रजी राज्यापर्यंत सात-आठ राज्यांचे अवशेष कुतुब-मिनारीं चढले. जेथे शहाजहानच्या मुलांनी एकमेकांची लांडगेतोड केली, त्याच दिल्लीमध्ये यमुनातटाकीं लाल किल्ल्यांतील दिवाण-ई-आम्, दिवाण-ई-खास या कलासंपन्न वास्तु रसिक वृत्तीने उभ्या करून शहाजहानने –

"अगर फिरदौस बरू-ए-जमीं अस्त;<br>हमीं अस्त, हमीं अस्त, हमीं अस्त"

असें गर्वगर्भित लिखाण तेथील महालांच्या कमानीवर खोदलें.

नव्या दिल्लीची रचना मुळांतच एडविन् ल्युटेन्सने अतिशय रेखीव व भव्य केली आहे. त्या रुंद व ऐसपैस रस्त्यांत आणखी सुधारणा घडवून, नव्या रस्त्यांवर दुतर्फा झाडें लावून व ठिकठिकाणीं कारंजीं बांधून त्यांच्या शोभेंत भर घातली जात

आहे. कॅनॉट सर्कसवरून, चेम्सफर्ड रोड जंक्शन ते तीसहजारी हा रस्ता दिल्लींतील सर्वांगसुंदर रस्ता बनला आहे. राजभवन मार्ग, बहादूरशहा जफर मार्ग, रानी झांसी रस्ता, इंद्रप्रस्थ मार्ग या रस्त्यांवर दुतर्फा नवीं झाडें लावलीं गेलीं आहेत. अजमलखान रस्त्यावर मुलांसाठी एक उद्यान बनविलें गेलें आहे. तसेंच पश्चिम दिल्लींत दहा एकरांची जागा मुलांसाठी राखून ठेवण्यांत आली आहे. कॅनॉट सर्कसमध्ये अंतरा-अंतरावरील रुपेरी जलधारा आकाशांत फेकींत थुईथुई नाचणारीं कारंजीं तर 'विंडो-शॉपिंग' करीत हिंडणाऱ्या दिल्लीकरांचे नेत्र निश्चितच सुखावत असतील. दिल्ली सुंदर बनविण्यासाठी दिल्ली निगमच्या उद्यान-खात्याने यंदा वीस लक्ष, तर रस्ते-खात्याने पन्नास लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे.

त्याच्या सौंदर्यदृष्टींतून निगमबोध घाटहि सुटलेला नाही. रिंग रोडवरून जाऊं लागले की, निगमबोध घाटाच्या जवळ उभें केलेलें भित्तीचित्र आपलें लक्ष वेधून घेतें. तेथे आपल्या तेजाने वृक्षराजी उजळणारा रविगोल मोरपंखी रंगाच्या पार्श्वभूमीवर चितारलेला आहे. परंतु एवढयावरच विकास-खात्याची कलासक्ति थांबलेली नसून, तें या घाटाच्या प्रवेशद्वारीं एक महिरप उभी करण्याचा विचार करीत असून, लेफ्टनंट गव्हर्नर झा यांनी निवड केलेले संस्कृत श्लोक त्या महिरपीवर कोरले जाणार आहेत. स्मशानभूमि तरी सौंदर्यापासून कां पारखी असावी ? कवि गोविंदांच्या कल्पनेप्रमाणे जुन्या, जीर्ण देहाची कात जेथे टाकली जाते, जेथे "नव्या तनूचे, नव्या शक्तीचे पंख मला फुटणार ! सुंदर मी होणार ! " असें मानलें जातें, त्या भूमीला सौंदर्याचें लेणें कां चढविलें जाऊं नये ? ती उदासवाणी कां राहवी ? "वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोपराणि । तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ।" हें गीतासूत्र ओळखून ती देहत्यागाची भूमि सुंदर बनविणाऱ्या दिल्ली निगमला खरोखर वेदान्तीच म्हटलें पाहिजे.

*

कोणतीहि विकास-योजना म्हटली की, ती मोठ्या खर्चाची बाब ठरते. तो खर्च आवश्यक तेथे डोळे मिटून करावाहि लागतो. कारण त्याशिवाय आवश्यक गरजा भागवितां येत नाहीत. पण कित्येक वेळेस गरजांचे अग्रक्रम ठरले नाहीत व मागणीचा अंदाज लागला नाही म्हणजे अकारण नुकसानी पदरांत घ्यावी लागते. सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांवर टीकेची झोड खाजगी क्षेत्राकडून सतत उठविली जाते. पण खाजगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांची पाहणी सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांप्रमाणेच डोळ्यांत तेल घालून केली, तर फार कांही वेगळें दृश्य दिसणार नाही.

सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांवर असलेली देखरेखच अखेर त्या कारखानदारीला सुधारणार आहे. सध्या सरकारी क्षेत्रांतील एकूण ८३ उद्योगधंद्यांत अंदाजे ३३३२ कोटि ५४ लक्ष रुपये गुंतले असून, त्यांतील ६५ उद्योगधंदे आज सुरू आहेत.

व १८ अजून सुरू व्हावयाचे आहेत. या ६५ उद्योगधंद्यांपैकी २७ धंदे तोटयांत आहेत व हा तोटा ६७–६८ सालांत ७८ कोटि ४ लक्षांच्या घरांत झाला. या तोटयाचें प्रमुख कारण हें की, त्या कारखान्याची उत्पादनक्षमता पुरी वापरली जात नसून, कित्येक विभागांतील उत्पादनक्षमतेचा वापर तर अगदी ७ टक्के ते ३ टक्के इतका कमी आहे. अवजड उद्योगधंद्यांच्या प्रकल्पांपैकी हेवी मशीन बिल्डिंग प्रॉजेक्टच्या उत्पादनक्षमतेचा वापर १३ टक्के तर ढलाई-गलाई ह्या योजनांचा ७ टक्के व हेवी मशीन टूल्स प्रॉजेक्टमधील प्रमाण अवघे ३ टक्के आहे. याचीं अनेक कारणें दिलीं जात आहेत – आवश्यक कच्चा माल मिळण्यास अडचण पडली, परदेशांहून आयात होणारे भाग वेळच्या वेळीं हातीं आले नाहीत, कुशल कर्मचारी अजून तयार झाले नाहीत वगैरे परंतु मुख्य कारण हें आहे की, या कारखान्यांमध्ये तयार होणाऱ्या भारी यंत्रांना मागणी नाही.

जी स्थिति हेवी इंजिनियरिंग कॉर्पोरेशनची तीच मायनिंग अँड अलाइड मशीनरी कॉर्पोरेशनची, तीच भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लि.मधील मिनिमम आयल सर्किट ब्रेकरच्या उत्पादनाची, तीच नेवेली लिगनाइट कॉर्पोरेशनच्या बिजली उत्पादनाची, हिंदुस्थान मशीन टूल्सच्या हैदराबाद शाखेची, इंडियन ड्रग अँड फार्मास्युटिकल्सच्या अँटिबायोटिक प्लँटस्ची. सगळीकडे उत्पादनक्षमतेचा वापर कमी. कारण मालाला उठाव नाही व त्यामुळे धंदा तोटयांत, अशी ही मालिका आहे. परिणामीं एका वर्षांत ७८ कोटींची नुकसानी सार्वजनिक क्षेत्राला सोसावी लागली आहे.

अशीच एक मोठी नुकसानी विजेच्या वापरांत होत असते व त्याची कल्पना सामान्यांना काय, पण खासदारांनाहि नसते. खासदार वैशंपायन यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या वेळीं ही नुकसानी जेव्हा वर्षाला १६६ कोटींच्या घरांत असल्याचें कळलें, तेव्हा राज्यसभेंतील सभासदांनी अक्षरशः तोंडांत बोटेंच घातलीं. सर्वसाधारणपणें देशांत विजेच्या वाटपांत, परिवर्तनांत आणि वहनांत १६.६० टक्के एवढा शक्ति-ऱ्हास होतो. ही नुकसानी मुख्यतः योग्य वहन-यंत्रणेच्या अभावीं होते. विकसित देशांत ही नुकसानी सर्वसाधारणपणें ७ ते ९ टक्के असते. आशियाई देशांपैकी जपानने आपल्या या नुकसानींत खूप बचत करून ती ९.९ टक्क्यांवर आणली आहे. पैशांत हिशेब केला, तर दर एका टक्क्यामागे वर्षात १० कोटि रुपये नुकसानी होते. आता चौथ्या योजनेत वहन-यंत्रणेंत वाढ करून व त्या विषयांतील तज्ज्ञांना पाहणी करण्यास सांगून, ही नुकसानी कमी करण्याचा प्रयत्न होणार आहे. पण सध्या तरी वर्षाला १६६ कोटींचा खड्डा पडत आहे.

*

देशांतील कारभाराचें हें गलथान चित्र पाहून आकाशांत मळभ भरावें तसें मन झाकाळून जातें. या साऱ्या रडतराऊ कारभारांत कधी तरी निर्माण होणारा

आकस्मिक विनोद मुखावर कांहीशी हास्यछटा निर्माण करतो. परवाचेंच पाहा ना. परराष्ट्रीय संबंध खात्याच्या मंत्रालयाला निष्कारण एक डोकेंदुखी निर्माण झाली. अगदी लहान पोरासारखीं दोन राष्ट्रें आपआपसांत भांडू लागलीं व त्यांचें पर्यवसान एका गंभीर समस्येंत झालें. म्हैसूरमध्ये पकडलेलीं दोन हत्तींचीं बछडीं भारताने ब्राझीलला भेट म्हणून पाठविलीं. रिओडी जिनोरिओला तीं पोचतांच क्वारंटाईनमध्ये सहा महिने ठेवल्याशिवाय त्यांना ब्राझीलमध्ये प्रवेश द्यायला तेथील कायद्यानुसार नकार देण्यांत आला. भारताकडून तीं बछडीं भेट म्हणून पाठवलीं गेल्याने सहा महिने त्यांना क्वारंटाईनमध्ये पोसण्याइतकें परदेशी चलन माहुताजवळ दिलें गेलेलें नव्हतें. बिचाऱ्याने ते गजराज पुन्हा बोटीवर चढविले व पुढे काय करावयाचें अशी दिल्लीला तारेने पृच्छा केली. "ब्राझीलच्या शेजाऱ्याकडे म्हणजे उराग्वेच्या राजधानींतील मॉंटीव्हिडीओच्या मुलांना भेट म्हणून तीं बछडीं पोचवा," असें उत्तर मिळालें म्हणून बोटीच्या उत्साही कप्तानाने मॉंटीव्हिडीओच्या महापौरांना तशी तार केली व महापौरांनी दुप्पट उत्साहाने त्या गजराजांच्या स्वागतार्थ हजारो बालकांची मोठी मिरवणूक काढून गजराजांना उतरवून घेतलें.

झालें, या प्रकाराने ब्राझीलचें पित्त खवळलें. ब्राझीलच्या परराष्ट्रमंत्र्यांनी निषेधाचा खलिता उराग्वेच्या परराष्ट्रमंत्र्यांकडे पाठवून, त्या गजराजांची मागणी केली. उराग्वेने ती मागणी फेटाळून लावली. ब्राझीलने आपला मूर्खपणा तेवढ्यावर थांबवावयाचा का नाही ? पण छे ! त्याने उराग्वेच्या रोखाने युद्धनौका पाठविण्याची धमकी दिली.

हें प्रकरण भलत्याच थराला गेलेलें कळतांच भारत सरकारने मोठ्या उदार मनाने "दुसरो दोन हत्तींचीं बछडीं आम्ही पुन्हा आपल्याला भेट म्हणून पाठवतों," असें ब्राझीलला कळविलें. पण कुठलें काय नि कुठलें काय ? ब्राझीलला उराग्वेला दिलेलेच गजराज हवे आहेत ! ब्राझील व भारत यांच्यांतील पत्रव्यवहार अजून चालू आहे व ब्राझीलचा हा नसता हट्ट कसा पुरवावा या काळजीमुळे परराष्ट्रीय खात्यांतील अधिकारी डोकीं धरून बसले आहेत.

सार्वभौम राष्ट्रेंहि अशीं लहान पोरांसारखीं भांडू शकतात. मुलांच्या भांडणांत निदान निरागसता तरी असते, पण राष्ट्रांच्या भांडणांत असतो तो शुद्ध आकस !

— केसरी, दि. ३१ ऑगस्ट १९६९

# खात-प्रकरणीं बसलेली चपराक

- २१ -

संसदेच्या गेल्या अधिवेशनाच्या अखेरीस झालेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या समझोत्याच्या ठरावामुळे सुटकेचा निःश्वास सोडून परतलेले खासदार, तो समझोता औटघटकेचा ठरल्याने पुन्हा सचिंत मनःस्थितींत संसदेच्या शारदीय अधिवेशनासाठी राजधानींत गोळा झालेले आहेत.

महाराष्ट्रीय काँग्रेस-खासदारांपुरतें बोलावयाचें, तर त्यांची परिस्थिति एक डोकें व पन्नास हात अशीच आहे. तें एक डोकें म्हणजे यशवंतरावांचें! त्यांच्यापुरता राजकारणी मामला सरळ होता व आहे. ज्यासाठी सिंडिकेटच्या साहाय्याने अट्टाहास केला तें लक्ष्य दृष्टिपथांतून जातांच सत्तेच्या स्थानाचें व जनमानसाचें महत्त्व जाणून त्यांनी मोहरा बदलला व त्यांनी मोहरा बदलतांच "घरमें आग लग गयी, घरके ही चिरागसे" असा इंदिराजींना दोष देणाऱ्या महाराष्ट्रीय काँग्रेस-खासदारांनाच इंदिराबाईंना समाजवादी मार्गावरील दीपस्तंभ मानावें लागलें.

अर्थात् अजूनहि सर्वांची पटावी तशी समजूत पटलेली नाही. रत्नागिरीच्या शारदाबाई मुकर्जी पहिल्यापासूनच यशवंतरावांचें नेतृत्व धुडकावून वागत असत. पण श्रीमती ताराबाई सप्रे, राणे आदि कांही तर सरळ सिंडिकेटच्या गटांत जाऊन बसले आहेत. ते उघडपणें तरी सिंडिकेटला मिळाले, पण कांही इंडिकेटमध्ये बसून सिंडिकेटचे भले चाहत आहेत, तर कांही अकारण विवंचनेंत पडले आहेत. इंदिराजी त्यांना कशा वागवतील याची विवंचना करण्याचें त्यांना खरोखरी कारण नाही. महाराष्ट्राच्या एकमुठी शक्तीचें साहाय्य इंदिराजींना

आज तरी नाकारतां येणार नाही. यशवंतरावहि हा बंदा रुपया खिशांत ठेवूनच राजकारण खेळत आले आहेत. कधी कधी राजकीय जुगारांत चुकीचें दान पडतें. तें पचविण्याची तयारी हवी. कसेंहि असो, "कुत्र्याच्या शेपटीचा धर्म वाकडें असण्याचा" असा फटकारा ज्या इंडिकेटवादी महाराष्ट्रियांना मिळाला, ते आता म्हणत असणार की, सध्या तरी शेपटाप्रमाणेच कुत्रें हलत आहे. वाईट नाही, उशिरा का होईना, गाडी रुळावर आली आहे.

*

काँग्रेसमधील भाऊबंदकीचा फायदा घेऊन इंदिरा गांधींचें सरकार शारदीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशीं कोसळून पाडण्याचा जनसंघ, स्वतंत्रांचा बेत सर्वस्वीं फसला. सिंडिकेट-गटाच्या साहाय्याने लोकसभेंत इंदिरा-सरकारवर अविश्वासाचा ठराव संमत करण्याचे 'मनचे मांडे मनींच राहिले.' रबात-प्रकरणीं झालेल्या चुकीचें भांडवल करून इंदिरा-सरकारला कोंडींत पकडण्याचा डाव जनसंघ, स्वतंत्रांनी रचला होता. त्याला जनतेचा पाठिंबा मिळविण्यासाठी वीस-पंचवीस हजारांचा मोर्चाहि काढण्यांत आला. "बोमदिलाची वाताहात कृष्ण मेनन यांना भोवली, चीनच्या आक्रमणाने नेहरूंना धडा शिकविला, मग आता रबातच्या राष्ट्रीय अपमानाबद्दल कोणाला जाब मागणार ?" असा खडा सवाल जनतेला केला जात होता.

जनमानसावर स्वार होऊन आकाशीं वरवर चढणारा इंदिरा गांधींचा पतंग, रबातच्या इस्लामी परिषदेचें आमंत्रण स्वीकारून, अवमानित होण्याच्या चुकीच्या निर्णयाने कांहीसा गोत्यांत सापडला यांत शंकाच नाही. समाजवादी वाटचाल करूं इच्छिणाऱ्या इंदिरा-सरकारबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या विरोधकांनाहि या बाबतींतील चूक त्यांच्या पदरीं घातली गेली पाहिजे, असें वाटत होतें व त्याचाच फायदा जनसंघ-स्वतंत्रांनी उचलण्याचें ठरविलें. पण इंदिरा-सरकारचा पराभव म्हणजे प्रतिगाम्यांना संधि याची जाणीव वेळींच झाल्याने, अनेक विरोधकांनी इंदिरा-सरकारवर अविश्वासाचा ठराव आणण्यास सपशेल नकार दिला. द्रविड मुन्नेत्र कळघम्, विकानेरचे महाराज करणीसिंग व इतर अपक्षीय सदस्य दोन्ही कम्युनिस्ट पक्ष यांनी तर प्रथमपासूनच इंदिरा-सरकारला आपला पाठिंबा दर्शविला होता. प्रश्न होता तो केवळ समाजवादी पक्षांच्या धोरणाचा.

संसदेंतील प्रजासमाजवादी व सं. समाजवादी यांच्यांत एक विशिष्ट व्यक्तिवाद निर्माण झाला आहे. व्यक्तिगत राजी-नाराजी पक्षाच्या धोरणावर लादण्याची सवय खासदार राजनारायण, मधू लिमये, नाथ पै यांना जडली आहे. पक्षाचीं धोरणें पक्षाच्या प्रगतीला पूरक ठरोत न ठरोत, स्वतःची व्यक्तिगत कामगिरी प्रसिद्धीच्या प्रकाशांत कशी उजळून दिसेल याचीच तेवढी काळजी ते वाहत असतात. पण या वेळीं संयुक्त समाजवादी पक्षांतील या हटवादाला श्री. एस्. एम्. जोशी यांनी भीक घातली

नाही. रबात-प्रकरण पुढे करून इंदिरा गांधींचें सरकार खाली ओढण्यास साहाय्य करण्याचें त्यांनी स्पष्ट नाकारलें. " इंदिरा गांधी या वाघावर स्वार होऊं पाहत आहेत. पण मला माझ्या शक्तीनुसार त्या वाघाची शेपटी जरी पिरगळण्याची संधि मिळाली, तरी मी ती साधली पाहिजे, " अशी स्पष्ट भूमिका श्री. एस्. एम्. जोशी यांनी घेतली व या वेळीं त्यांना पक्षांतील निम्म्यापेक्षा अधिकांचा पाठिंबा मिळाला.

संयुक्त समाजवादी आणि प्रजासमाजवादी या दोघांचाहि अविश्वासाच्या ठरावाला पाठिंबा मिळत नाही हें पाहून, खासदार मसानी, अटलबिहारी वाजपेयी यांना अविश्वासाच्या ठरावाची कल्पना सोडून द्यावी लागली व त्याऐवजीं रबात-प्रकरणीं सभा-तहकुबीची सूचना खासदार पिलू मोदी यांच्याकरवी मांडली गेली. निदान इंदिराजींच्या अल्पसंख्य सरकारास कम्युनिस्टांच्या साहाय्याने जगावें लागतें एवढें जरी दाखवितां आलें, तरी कांही थोडकें नव्हे, असा सुविचार त्यांनी केला. पण तेंहि साधलें नाही. ठरावाच्या विरुद्ध ३०६ मतें, तर ठरावास अनुकूल अवघीं १४० मतें पडलीं. इंदिराजींच्या बाजूला पडलेल्या मतांतून दोन्ही कम्युनिस्ट पक्षांचीं ४३ मतें वगळलीं, तरीहि २६३ मतें इंदिराजींच्या बाजूस पडलींच. अविश्वासाचा ठराव मुळांत बारगळून, सभा-तहकुबीची सूचना पुढे आली. या इंडिकेटच्या प्राथमिक विजयावर कम्युनिस्टांचीं मतें विचारांत न घेतांहि तहकुबी-सूचना फेटाळून लावण्यांत त्यांना यश मिळालें हा मुकुटच चढला असें म्हणावें लागेल.

*

सिंडिकेटच्या हातीं कॉंग्रेस संघटनेचीं कायदेशीर व नैतिक सूत्रें आहेत, हा दंभ इंदिरा गांधींचें कॉंग्रेस-सभासदत्व रद्द केल्यापासून, अवघ्या २४ तासांत कोसळला होता. कॉंग्रेस संसदीय पक्षाने सिंडिकेटवादी कार्यकारिणीचा आदेश धुडकावून ३३० सदस्यांच्या पाठिंब्याने त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. पण सिंडिकेटला तेवढ्याने शहाणपण न सुचून, तिने भाऊबंदकी पुढे चालविली. नवे नेते निवडले. स्वतंत्र गटाने ते लोकसभेंत व राज्यसभेंत वसूं लागले. त्यांची कल्पना होती की, सिंडिकेट-गट वेगळा होतांच इंदिरा-सरकारला प्रत्येक घडी अडचणीची जाईल. पण तीहि कल्पना अशीच अवघ्या २४ तासांत खोटी ठरली आहे. उलट इंदिरा-सरकार अल्पमतांत आल्याचें घाईगर्दीने राष्ट्रपतींना कळविणारे डॉ. रामसुभग सिंग यांना आपली 'मिनी-कॉंग्रेस' कालांतराने आणखी किती 'मिनी' होते, याचीच काळजी वाहण्याचा प्रसंग येणार आहे.

मिनी स्कर्ट घातलेल्या एका तरुणीकडे एक धोबी बारकाईने पाहूं लागला. त्याचा राग येऊन ती त्याला खडसावत असतां तो म्हणाला, " बाई, मी केवळ धंदेवाईक दृष्टीने पाहत आहे. माझ्या धुण्याने आपला झगा आणखी तर आटला नाही ना ? "

जनतेच्या घाटावर सिंडिकेटचे झब्बे जसजसे धुतले जातील तसतसे आणखी तर आक्रसणार नाहीत ना, अशी भीति माझ्या पत्रकार मनाला त्या धोब्याप्रमाणे वाटत असल्यास नवल नाही.

आतापर्यंत ५२३ सभासदांच्या लोकसभेंत काँग्रेसचे २८४ सभासद होते. त्यांतील ५०–६० सभासद फुटल्याने इंदिरा-सरकार अल्पमताचें बनलें हें खरें; पण काँग्रेस-मधील फाटाफुटीमुळे आता असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. इंदिरा गांधींचें सरकार हें ह्यापुढे काँग्रेस-सरकार मानावें का ? कारण त्यांचें काँग्रेस-सभासदत्व कार्य-कारिणीने रद्द केलें आहे. संसदेंतील सिंडिकेटचा गट व इंदिराजींचा गट यांतील काँग्रेस-पक्ष कोणता ? तूर्त 'सरकारी काँग्रेस' व 'गैरसरकारी काँग्रेस' असें म्हणतां येईल. पण काँग्रेसचा खरा वारस कोण? इंदिराजींचें काँग्रेसचें प्राथमिक सभासदत्व रद्द केलें. पण त्यांना पाठिंबा देणारे बहुसंख्य खासदार काँग्रेसचे सभासद आहेत; संसदीय काँग्रेस-पक्षाचे लोकसभेंतील व राज्यसभेंतील नियुक्त नेते-उपनेते आहेत. मग दुसरे नेते-उपनेते निवडण्यास सिंडिकेट गटाला कायदेशीर अधिकार काय? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होणार आहेत. तूर्त तरी एवढेंच म्हणतां येईल की, काँग्रेसने संसदीय लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी विरोधकांना सबळ केलें पाहिजे असा जो पं. नेहरूंजवळ आचार्य कृपलानी यांचा हट्ट होता, तो पंडितजींच्या लेकीने काँग्रेस मधूनच विरोधक पुरवून पुरा केला म्हणावयाचा !

*

भाऊबंदकी पेटली म्हणजे जात्याचीं पाळीं सुद्धा वांटून घेतलीं जातात; तसाच कांहीसा प्रकार काँग्रेसच्या घरांत चालू झाला आहे. राज्यसभेंतील गैरसरकारी काँग्रेसचे नवे नेते श्री. एस्. एम् मिश्रा व त्यांचा गट कांही नाही तर पहिल्याच दिवशीं गृहांत जमिनीवर बसकण मारून बसला. त्यांचें म्हणणें होतें की, त्यांना ताबडतोब वेगळ्या व एकत्र जागा दिल्या पाहिजेत. नाही तरी त्यांच्या गटास मान्यता दिल्यावर त्यांना वेगळ्या जागा मिळणारच होत्या. पण मग प्रसिद्धि कशी मिळाली असती ! शेवटीं अध्यक्षांनी भोजनानंतरची बैठक एक तास लांबवून त्यांचा हा हट्ट पुरा केला. आता लोकसभेंत आणि राज्यसभेंत दोन्हीकडे सिंडिकेट, स्वतंत्र व संघ हे तीन सकारात्मक एकत्र बसत आहेत. अशा रीतीने का होईना, पण हळूहळू ध्रुवीकरण झालें तर वाईट नाही.

रबात-प्रकरणावरील सभातहकुबीच्या सूचनेवर लोकसभेंत झालेलें अशोक मेहतांचें भाषणहि असेंच भाऊबंदकीचा कडवटपणा ठायींठायीं दर्शविणारें होतें इंदिराजींच्या समाजवादी विचारसरणीची थट्टा करण्यासाठी ते परराष्ट्रमंत्र्यांचा उल्लेख आवर्जून 'कलाकंकरचे राजेसाहेब' असा करीत. राजा-महाराजांचा व तरुण तुर्कांचा इंडिकेट हा असा विचित्र संकर आहे असें त्यांना ठायी ठायीं सुचवावयाचें होतें. सिंडिकेटमधील अनेकांची आज तरी भावना अशीच आहे –

पहले राजा थे, बादशहा थे, अन्नदाता थे, हुजूर थे,
फिर आये अंग्रेज, हुजूर थे, सरकार थे, मा-बाप थे,
और अब
अपनी इंदिरा सरकार है, राजा भी है, अंग्रेज भी है,
फर्क बस इतनाही है, राजा अधिक है, अंग्रेज कम है,

अशोक मेहता आता सिंडिकेट गटाचे अधिकृत प्रवक्ते झाले आहेत. त्यामुळे नियोजनमंत्री असतांना पदरीं पडलेलें अपयश व परिणामीं मंत्रिपद सोडण्याची आलेली पाळी, यांमुळे निर्माण झालेला कडवटपणा, असा वेळोवेळीं बाहेर पडणार, इंदिराजीच्या समाजवादाची कुत्सित थट्टा होणार, आणि समाजवादीच समाजवादाचे मारेकरी बनणार!

*

रबात-प्रकरणीं इंदिरा-सरकार घसरलें यांत शंकाच नाही आणि तें त्यांनाहि पटलें आहे, हें त्यांनी आपले संबंधित राष्ट्रांतील वकील परत बोलावले यावरून स्पष्ट होतें. इस्लामी राष्ट्रांची पहिली परिषद् असें तिचें स्पष्ट धार्मिक स्वरूप असतां, ती राजकीय परिषद् आहे असें मानून, आमंत्रण मिळविण्याची झालेली कारवाई भारताच्या निधर्मी लोकशाहीला शोभणारी नव्हती. 'पॅन इस्लामिझम्'च्या कारस्थानाला रबात-परिषदेंत शिरून सुरुंग लावण्याची कल्पना तर सर्वस्वीं हास्यास्पद होती. इस्रायलने आक्रमण केलेल्या अरब मुलखाचा विचार संयुक्त राष्ट्रसंघांतहि करतां येणार होता. रबातमध्ये जाऊन अधिक काय साधणार होतें? उलट हें आमंत्रण स्वीकारण्याची चूक करून भारताने अकारण आपला राष्ट्रीय अपमान करून घेतला. "आम्ही गांधीजींच्या खिलाफत धोरणानुसार वागलों व त्याचा आम्हांला फायदाच झाला" हा दिनेशसिंगांचा प्रतिवाद तर अगदीच बालिश होता. आचार्य कृपलानींनी आपल्या भाषणांत त्या युक्तिवादाच्या चिंध्या चिंध्या केल्या.

लोकांनी एखाद्याला जोडे मारले तरीहि हसत हसत तो जर म्हणूं लागला की, मला जोडे मिळाले, पण त्याचा जोडा फाटला हा फायदाच झाला, तर त्यास निलाजरेपणापलीकडे दुसरें काय नांव द्यावें? परराष्ट्रमंत्र्यांची मखलाशी अशीच निलाजरी होती. इंदिरा-सरकारच्या स्थैर्यासाठी मुस्लिमांचा अनुनय राष्ट्रीय प्रतिष्ठेला धोका पोचविण्यापर्यंत केला जाणें इष्ट नाही. पिलू मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे 'Rabat is a rubout for Dinesh; for the Government of India and for India.' 'ब्लिटझ्मधील पितापुत्र-संवादाप्रमाणे, पुढे विचारावयाचें तर –
"Daddy Isn't it a rubout for Syndicate also in Loksabha ?"

Daddy —"I don't know, son."

इंदिराजींना यापुढे आपल्या अर्ध्याकच्च्या सहकाऱ्यांवर विसंबून रबात-प्रकरणासारख्या चुका करणें मानवणार नाही. इंदिराजींनी जनमानसांत कांही आकांक्षा निर्माण केल्या आहेत. त्या आकांक्षा त्यांच्या धोरणांत व शासनांत प्रतिबिंबित झालेल्या दिसल्या पाहिजेत. संसदेंत इंदिराजींच्या मागे आता कॉंग्रेसचें बहुमत नाही. त्यांना पुरोगामी विरोधी पक्षांच्या व अपक्ष सभासदांच्या सहानुभूतीवर व पाठिंब्यावर अवलंबून राहवें लागणार. हा पाठिंबा सुरुवातीस कांही काळ मिळेल, पण पुढे हळूहळू तो अटीविरहित, निर्भेळ असणार नाही. या मधल्या काळांत देशांतील समाजवादी शक्ति आपल्या निश्चयी समाजवादी धोरणाने व शासकीय कणखरपणाने त्यांनी आपल्याशा केल्या व कॉंग्रेसची शक्ति वाढविली तरच त्यांच्या आजच्या विजयाला अर्थ राहील. रबात-प्रकरण संपलें तरी प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याच्या मुदत-वाढीचें विधेयक पुन्हा तशीच परीक्षेची वेळ आणणार आहे. अशा प्रत्येक वेळीं कुबड्या लावून चालण्याचा प्रसंग केव्हांहि उचित नव्हे !

**— केसरी, दि. २३ नोव्हेंबर १९६९**

# समाजवादी खलिफा

## - २२ -

विठ्ठलभाई पटेल सदनांतील इंदिरा काँग्रे-सचा जुलूस व गावांतील गुरु नानक पंचशतसांवत्सरिक जन्मोत्सवाचा जुलूस यांमुळे दोन दिवस राजधानी अगदी गजबजून गेली होती. दोन्हीकडे लोकांचा उत्साह ओसंडून जात होता. निमंत्रितांचें स्वागत करणाऱ्या पताका ठिकठिकाणीं लावण्यांत आल्या होत्या.

गुरु नानक जन्मोत्सवानिमित्त फडकणारे पिवळे 'निशाण साहेब' व काँग्रेसचे तिरंगी झेंडे खांबाखांबावरून सरमिसळपणें लहरत होते. इंदिराजींनी बोलाविलेल्या या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या तातडीच्या बैठकीसाठी विविध राज्यांतून आलेले शुभ्रवेषधारी इंदिराजींच्या डोळ्यांत भरण्यासाठी पटेल सदनांत अहमहमिकेने पुढे सरसावत होते, तर गुरु नानक जन्मोत्सवाच्या पुण्य दिवशीं 'ग्रंथसाहेबां'चें दर्शन व्हावें म्हणून सर्व जाति-धर्म-पंथांचे बहुवेषधारी भक्तिभावाने तिकडे मिरवणुकींत गर्दी करीत होते. 'घालीन लोटांगण, वंदीन चरण', अशी स्थिति दोन्हीकडे होती. राजकीय असो नाही तर सांसारिक असो, भवतापहरणासाठी, सद्गुरूचें, नेत्याचें मार्गदर्शन लागतेंच. तें दोन्हीकडेहि मागितलें जात होतें.

इधर उजाला है दिनका उधर है काली रात ।
अपने देशका प्यार है जिसको, चलो हमारे साथ ।।

असें ध्वजारोहणानंतर साऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांना आमंत्रिलें गेले व त्याला बहुसंख्य कार्यकर्त्यांकडून –

"चुन लिया अपना रास्ता हमने, सोचली अपनी मंझील हमने" असा प्रतिसादहि मिळाला.

इंदिराजींना काँग्रेसमधून हाकलणाऱ्या काँग्रेस-अध्यक्षांचीच हकालपट्टी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बहुसंख्य सदस्यांनी दिल्लींत एकत्र येऊन केली. नियम सिद्ध करण्यासाठी की काय, कोंडा लक्ष्मण बापूंचा एकमेव अपवाद काय तो त्याला होता. अखिल भारतीय काँग्रेस समितीचे तीनशें सुद्धा सदस्य या बैठकीस उपस्थित राहणार नाहीत, निजलिंगप्पांची आज्ञा बहुसंख्य सदस्य प्रमाण मानतील हा सिंडिकेटवाद्यांचा आशावाद अशा प्रकारे सपशेल खोटा ठरला. ७९९ सदस्यांपैकी ४९९ सदस्यांनी इंदिराजींवर विश्वास प्रकट केला. काँग्रेसश्रेष्ठांच्या मुठींत असलेलीं गुजरात, म्हैसूर व तामिळनाडू हीं राज्यें सोडलीं तर साऱ्या लहानमोठ्या राज्यांतील काँग्रेस संघटनांनी इंदिराजींच्या धोरणाला आपला पाठिंबा व्यक्त केला. काँग्रेस 'सिंडिकेट'ची का 'इंडिकेट'ची याचें उत्तर काँग्रेस कार्यकर्त्यांनी असें स्पष्टपणें दिलें. यावरहि आणखी जनतेचें शिक्कामोर्तब हवें असेल तर डिसेंबरअखेर भरणाऱ्या मुंबईमधील काँग्रेसच्या आगामी अधिवेशनांत पाटलांच्या चावडीवर तें ठसठशीतपणें उठविलें जाईल यांत मला तरी शंका नाही.

राजधानींत त्रिपुरी पौर्णिमा 'इंडिकेट'वाद्यांनी अशी मोठ्या उत्साहाने साजरी केली. हा दिवस राजस्थानांत 'गर्दभ दिन' म्हणून पाळण्याची प्रथा आहे. पण ही प्रथा यंदा गुजरात व म्हैसूर यांनी उचलल्याचें कळतें. खरें-खोटें कोणास ठाऊक !

*

इंदिरा गटापुढे दोन विभिन्न क्षेत्रांत 'सिंडिकेट'शीं लढा देण्याचा प्रसंग उभा राहिला होता. त्यांतील संसदीय क्षेत्रांत 'सिंडिकेट'च्या विरोधावर तहकुबी सूचनेच्या वेळी मात करून त्यांनी यश संपादिलें. मात्र त्यासाठी त्यांना द्रविड मुन्नेत्र कळघम्‌च्या व अपक्ष सभासदांच्या साह्यावर अवलंबून राहवें लागलें होतें व पुढेहि लागणार आहे. पण राजकीय क्षेत्रांत आपल्या पुरोगामी धोरणाने काँग्रेस कार्यकर्त्यांचीं व जनतेचीं मनें आकृष्ट करून त्यांनी स्वहिंमतीवर सिंडिकेटला नामोहरम केलें आहे. इंदिराजींच्या महामंत्रिपदाची प्रतिष्ठा निजलिंगप्पा, कामराज आदि काँग्रेसश्रेष्ठांनी पणास लावली होती. ती त्यांनी स्वतेजाने टिकविली आहे.

पंजाबचे गुरुमुखसिंग मुसाफिर तसेच कृष्णम्माचारी यांनी काँग्रेस-श्रेष्ठांच्या या वागणुकीबद्दल नाराजी व्यक्त केली. गुरुमुखसिंगांनी त्या वेळीं एक जुनी आठवण सांगितली. ते म्हणाले, "पंडितजी व सरदार यांच्यात पुष्कळ मतभेद होते, पण ते स्थानाचें माहात्म्य व प्रतिष्ठा जाणत होते व जपत होते. एकदा संसदेच्या पोर्चमध्ये वल्लभभाई व नेहरू यांच्या गाड्या एकामागून एक आल्या. तें पाहतांच वल्लभभाईंनी आपली गाडी लगेच बाजला काढावयास सांगून पंडितजींच्या गाडीला अग्रक्रम दिला व पंडितजींची गाडी गेल्यानंतरच ते आपल्या गाडीतून गेले. आज

साराच मामला बिघडला आहे. ज्या घराण्याच्या तीन पिढ्या व चाळीसच्यावर कुटुंबीय काँग्रेस चळवळींत दाखल होते त्या घराण्यांतील इंदिराजींची काँग्रेसमधून हकालपट्टी करण्याआधी 'सिंडिकेट'ने जरा दूरवरचा विचार करावयास हवा होता ! "

इंदिराजींच्या पाठीशीं बहुसंख्य कार्यकर्ते उभे राहिल्याने आता 'सिंडिकेट'-च्या शिडांतील हवाच निघून गेली आहे. किंबहुना हवाच निघून गेली आहे असें नव्हे तर, ज्या सुब्रह्मण्यम् यांना काँग्रेस कार्यकारिणींतून हाकलले त्यांनाच काँग्रेसचे तात्पुरते अध्यक्ष निवडून त्या शिडाच्या चिंध्या चिंध्या केल्या गेल्या आहेत.

✻

अ. भा. काँग्रेस समितीच्या बैठकीच्या निमित्ताने राजधानींत गरजले पुष्कळ पण पडले किती हा खरा प्रश्न आहे ! इंदिराजींनी आपल्या या विजयामुळे जनतेच्या मनांत फार मोठ्या आकांक्षा निर्माण केल्या आहेत. नव्या आर्थिक वाटचालीचीं जीं कांही पदचिन्हें अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनाच्या वेळेस उमटलीं त्यानुसार कांही घडलें तर इंदिराजींचें यश उजळून उठेल, नाहून जनमानसांत काँग्रेसला सावरण्यासाठी केलेल्या झगड्यामुळे काँग्रेस पक्ष तर सावरला गेला नाहीच, पण तो फोडण्यास मात्र हे प्रयत्न कारणीभूत झाले असाच शेरा इतिहास मारेल. देशांतील सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट व्हावी, व्यक्तिगत उत्पन्न व जायदाद तसेंच खर्च यावरहि त्यासाठी नियंत्रण असावें, औद्योगिक व शेतीविषयक उत्पन्नावर व त्याच्या वांटपावर नियंत्रण ठेवलें जावें, प्रत्येकास स्वतःच्या विकासासाठी समान संधि प्राप्त व्हावी या व अशा आर्थिक तत्त्वांच्या प्रत्यक्ष कार्यवाहीसाठी नुसत्या चार समित्या नेमून भागणार नाही, तर त्या समित्यांनी राष्ट्रीयीकरण व समानता यांच्यांतील साखळीबद्ध प्रगति लक्षांत घेऊन मार्ग आखले पाहिजेत व शासनातर्फे ते कार्यवाहींत आणले गेले पाहिजेत.

पोकळ आशावाद निर्माण करणें अंतीं घातक ठरतें. १९६७ सालींच बालकांना दिलेलें 'समाजवादी अभिवचन' पुन्हा एकदा इंदिराजींनी उद्घोषिलें आहे. पण तें तरी पुरें करण्याइतकी सरकारची आर्थिक परिस्थिति आहे काय ? ७ कोटि मुलांना दर दिवशीं पावशेर दूध द्यावयाचें म्हटलें तरी ३०० कोटि रुपये वर्षास लागतील. सरकार एवढा पैसा केवळ यासाठी खर्च करूं शकेल का ? मग जें शक्य आहे तेवढेंच बोलावें व करावें ! निजलिंगप्पांनी म्हटल्याप्रमाणे मंत्र्यांनी औद्योगिक क्षेत्रांतील व्यवस्थापकांइतका पगार घ्यावा, पण आपली शिल्लक एक लाखापेक्षा अधिक ठेवूं नये.

खासदारांपुढे भाषण करतांना सरहद्द गांधी म्हणाले, तें खरें आहे. दिल्लींत उंच उंच इमारती उभारल्या जात असतां खेडोपाडीं झोपडींत दिवाहि लागत नाही.

समाजवाद हें सामाजिक स्थिति सुधारण्याचें हत्यार असलें पाहिजे व तें हत्यार वापरतांना त्याचीं पथ्येंहि पाळलीं पाहिजेत. कॉंग्रेसच्या आजवरच्या बहुमतामुळे शासनांतील भ्रष्टाचार लपविता आला, पण आता यापुढे घरचेच चोर विरोधकांत बसल्यामुळे तें साधणार नाही. तेच जोराची बांग देणार ! विठ्ठलभाई पटेल सदनांत जमलेल्या सर्व मंडळींत अहमहमिका दिसत होती, ती आपण किती सभासद आणले याची जाण इंदिराजींना देण्याची ! स्वाभाविकच या शिताभोवतीं जमलेल्यांवर इंदिराजींना विसंबतां येणार नाही. मंत्रिपदें व इतर अधिकारपदें कांहींना खूष करणार तर इतरांना दुखावणार. इंडिकेटमधील संजीवय्या व चंद्रशेखर गट कांहीसा दुखावला गेला आहेच. म्हणूनच अशा रीतीने बहुमत मिळवून तें फार काळ टिकवितां येणार नाही. तें टिकवावें लागेल जनतेंत आपल्या धोरणाने व चोख कारभाराने आणि सामाजिक प्रगतीचा व समाजांतील स्थैर्याविषयीचा विश्वास संपादन करून.

यासाठी खान गफारखान यांनी संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये सांगितलेली गोष्ट अगदीच 'नळी फुंकली' होऊं नये. "एकदा खलिफास त्याच्या बेगमने मुलासाठी मिठाई आणण्यास सांगितलें. खलिफाने मिठाई आणण्यासाठी जवळ पैसे नसल्याचें सांगितलें. बेगमने स्वत:जवळील पैसे खलिफास दिले व आता तरी मिठाई आणाल ना, असें विचारलें. त्यावर "हे पैसे कोठून आले" अशी पृच्छा खलिफाकडून झाली. बेगम म्हणाली, "आपण मला जे खर्चासाठी पैसे देतां, त्यांतून थोडे थोडे साठवलेले हे पैसे आहेत." खलिफाने ते पैसे मोजून तेवढी रक्कम बेगमेस खर्चासाठी द्यावयाच्या पैशांतून कमी केली ! खलिफा म्हणाले, "ज्या अर्थीं तू शिल्लक टाकूं शकलीस त्या अर्थीं तेवढी रक्कम तुला लागत नाही. जनतेचा पैसा नाहक खर्च करणें योग्य नव्हे." असे हे जुने 'खलिफा' समाजवादी होते, तर आजचे 'समाजवादी खलिफा' बनले आहेत. चार एकरांच्या बंगल्यांतून गिरद्या-गालिच्यावर मिरवत आहेत.

*

इंदिराजींच्या यशापयशाचें मोजमाप देशांतल्यापेक्षा देशाबाहेरील पत्रकारांकडन झालें, तर तें अधिक वस्तुस्थितिनिदर्शक ठरेल. सुप्रसिद्ध पत्रकार मॉरिस झिंकिन व त्यांच्या पत्नी ताया झिंकिन यांची या विषयावरील मुलाखत त्या दृष्टीने अधिक मोलाची होय. ब्रिटिश पत्रकार सर्वसाधारणपणें भारतविरोधी विचारसरणीत गुरफटलेले, पण झिंकिन-दांपत्याने बराच मोठा काळ भारतांत घालविल्याने भारताबद्दल त्यांच्या मनीं मोठी सहानुभूति आहे. मॉरिस झिंकिन हे जुने आय. सी. एस्. मुंबई राज्याच्या अर्थखात्यांत व केंद्रीय व्यापारखात्यांत अधिकारी म्हणून काम केलेले. हिंदुस्थानबद्दल आजवर तीन-चार पुस्तकेंहि त्यांनी लिहिली आहेत. अशा या अनुभवी व चाणाक्ष पत्रकार-दांपत्यास भारताला भेट देण्यास आजच्यापेक्षा क्रांतिकारी व सुयोग्य काळ दुसरा कोणता सापडला असता ?

देशांतील आजच्या राजकारणाचें विवरण करतांना श्री. झिकिन म्हणाले, "विविध राजकीय पक्ष आपापसांत भांडत आहेत. पण राजकारणाची दिशा ठरवत आहे जनता. इंदिरा गांधींचें यश हें सर्वस्वी जनतेस हव्या असलेल्या बदलाचें निदर्शक आहे. जनतेला आर्थिक प्रगति हवी आहे व ती झपाटचाने." इतर कोणाहिपेक्षा इंदिरा गांधींना जनतेच्या या आकांक्षा पुऱ्या करणें कां शक्य आहे हें सांगतांना ते म्हणाले, "काँग्रेसमध्ये 'साहेब'वाद माजला आहे, हें प्रतिगामी विचारसरणीचें कारण नव्हे; तर काँग्रेस-श्रेष्ठ हें स्वातंत्र्यलढ्याच्या काळांतील विचारसरणींतच अजून वावरत असल्याने रूढिवादी आहेत. कोणत्याहि विकसनशील देशांत जनतेंतील बुद्धिवाद्यांना आकर्षित करणारें व आपल्या धोरणाची व नियोजनाची बैठक सामान्य जनतेच्या पाठिंब्यावर आधारित करणारें सरकार आवश्यक असतें. इंदिराजीची विचारसरणी याला पोषक आहे व म्हणूनच त्या अधिक समर्थपणें या देशाचें नेतृत्व करूं शकतील."

श्री. झिकिन त्याचबरोबर हेंहि म्हणाले की, जनता आता आपल्या पुढाऱ्याला देव मानत नसून प्रगतीचें एक साधन मानूं लागली आहे. म्हणूनच इंदिराजींच्या पुढारीपणास वर्ष-दीड वर्षाचा काळ जनता देईल व त्या काळांत प्रगतीचीं पावलें पडलीं नाहीत तर त्यांनाहि खाली ओढील.

झिकिन यांनी बऱ्याच काळानंतर भारताला पुन्हा भेट दिली. त्यांना या वेळी येथे कांही विशेष वेगळें आढळलें असेल तर साऱ्या लहान-थोरांना पटलेलीं मतें व जाणवलेलें मताचें स्वातंत्र्य.

काँग्रेसमधील 'व्होट ऑफ कॉन्शस' तर राजकारणांत आता सर्वत्र बोकाळणारच ! पण घरोघरीं मुलेंहि बापास उलट उत्तरें देऊं लागलीं आहेत व सनातनी घरांतून जेथे घरांतील गृहिणी तोंड वर करून पाहत नव्हती ती कारभाऱ्यास हटकून आपलें मतस्वातंत्र्य वजावूं लागलेली दिसते, हें ताया झिकिन यांनी व्यक्त केलेलें मत इंदिराजींच्या क्रांतीचा साऱ्या समाजव्यवस्थेवर झालेला परिणामच दर्शवित नाही कां ?

*

अ. भा. काँग्रेसची बैठक व गुरुनानक यांचा जन्मोत्सव ही राजधानींतील माया-ब्रह्माची सांगडच म्हणावी लागेल. शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक यांचा जन्मोत्सव गुरुद्वारावर रोषणाई करून व चांदणी चौकांतील सिसगंज गुरुद्वारापासून तीन लाख लोकांची भव्य मिरवणूक काढून साजरा झाला. सर्वांची धार्मिक भावना व भक्ति त्या दिवशीं उचंबळून आलेली दिसत होती. लहान लहान जथे 'धान गुरु नानक जय जय काल', 'गुरु नानक साहिब आया ते ये चानाब होया' असें भजन गात मिरवणुकीत दाखल होत होते. मध्येच 'बोले सो निहाल, सत श्री अकाल.'

अशी घोषणा वातावरणांत दुमदुमून जाई. मिरवणुकींत सजविलेले हत्ती, उंट, घोडे व हत्यारी सेवाधारी तर होतेच, पण ग्रंथसाहेबांच्या गाडीपुढे 'पंज प्यारे' निशाण साहेब घेऊन चालत होते. कॅनॉट सर्कलमध्ये मिरवणूक येतांच विमानांतून गुलाबाच्या फुलांचा पाऊस मिरवणुकीवर पाडण्यांत आला. सारा आसमंत गुलाबाच्या व भक्तिभावाच्या सुगंधाने वहरून गेला.

दिल्लींत गुरु नानकांच्या पदस्पर्शानें पुनीत झालेलीं दोन स्थानें आहेत. १५१० सालीं सिकंदर लोदीच्या कारकीर्दींत गुरु नानक दिल्लींत आले तेव्हा सवजीमंडी-जवळील बागेंत त्यांचें वास्तव्य होतें. ज्या ठिकाणीं भावामृताचें पान गुरूंनी सर्वांना दिलें तेथे गुरुद्वारा नानक पियाओ बांधून स्मारक करण्यांत आलें आहे. दुसरें ठिकाण गुरुद्वारा मंजू-का-तिला. जेथे मंजू नांवाच्या सुफी पंथी साधूस गुरूंनी आपला शिष्य बनविलें ती ही जागा. चांदणी चौकांतील गुरुद्वारा सिसगंज गुरु तेजबहादुरांच्या आत्मार्पणामुळे प्रसिद्ध आहे. तेथील वडाच्या झाडाखाली औरंगजेबाने गुरु तेजबहादुरांचें मस्तक वेगळें केलें व गुरुद्वारा रकाबगंज येथे त्यांच्यावर अग्निसंस्कार झाले.

हीं सारी स्थानें आज सर्वधर्मीयांचीं पूजास्थानें बनलीं आहेत.

गुरु नानक यांनी शीख धर्माद्वारें भक्तिभाव व मानवतावाद शिकविला. अंध-विश्वासांतून जनतेस मुक्त करण्याचा प्रयत्न केला. देश पतित होतो आपली सत्प्रवृत्ति गमावून बसला की. म्हणून समाजव्यवस्था अशी विकसित झाली पाहिजे की, दलित-पीडित चुकूनहि दिसू नये. गुरु नानक म्हणत, "नीचांतील नीच जातीबरोबर मी सदैव उभा राहीन. जो आपणास उच्च समजतो त्याच्याशीं मला कांही कर्तव्य नाही."

"नीचां अंदरि नीच जाती नीच हूं अति नीचु ।
नानक तिन कै संगि साथं वडिआ सिके किआ रशि ।।"

सुप्त आम्त्याला जागृत करणारी ही गुरूंची भूमिका होती.

गुरु नानक एकदा हरिद्वारला गेले होते. तेथे गंगेंत स्नान करणारे सूर्याकडे पाणी उडवीत होते. गुरूंनी विचारलें, "आपण गंगाजळ आकाशीं कशासाठी फेकत आहां ?" लोक म्हणाले, "सूर्यास आम्ही अर्घ्य देत आहोंत." त्यावर गुरु पाण्यांत उतरून पश्चिमेकडे तोंड करून दोन्ही हातांनी पाणी उडवूं लागले. लोक या वेड-गळपणास हसून त्यांना विचारूं लागले, "हें काय करतां ?" तेव्हा गुरु म्हणाले, "मी माझ्या पंजाबांतील शेतीला पाणी देत आहे."

"येथे पाणी फेकून पंजाबांतील शेतीस कसें जाणार ?". . .गुरु म्हणाले, "जर कोटयवधि मैलांवरील सूर्याला अर्घ्य पोचतात तर जवळच्या पंजाबांतील शेतीला पाणी कां पोचूं नये ?"

गुरूंच्या अंधविश्वासासंबंधीच्या व सामाजिक विषमतेविषयीच्या या भूमिकेशीं सहमत व्हावयाचें, तर गुरु सांगत, "प्रथम शिर सतरंजीवर काढून ठेवण्याची तयारी

ठेवली पाहिजे." मुस्लिमांच्या धर्मांधतेशीं झगडतांना गुरूंच्या शिष्यांना खरोखरींच आपलीं मस्तकें भूमीवर काढून ठेवावीं लागलीं.

जे तउ प्रेम खेलण का चाउ। सिस धरि तली गली मेरी आउ।
इतु मारार्ग पैर धरीजै। सिस दीजै काणि न कीजै।

अजूनहि देशांतील 'राहू-बदला'ची वाट पाहणाऱ्या अंधविश्वासाविरुद्ध व अस्पृश्यांना जाळणाऱ्या सामाजिक विषमतेविरुद्ध झगडण्यासाठी याच कठोर निश्चयाची गरज नाही का !

**– केसरी, दि. ३० नोव्हेंबर १९६९**

# खरा धोका आहे तो अनुयायांकडूनच !

## - २३ -

प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. इंदिराजींनी रबात प्रकरणीं संसदेंत मिळविलेलें यश व अ. भा. काँग्रेसच्या तातडीच्या बैठकींत मिळविलेला बहुमताचा पाठिंबा यांची यशोगाथा मीं यापूर्वी वर्णिली आहे. पण या त्यांच्या यशाने त्यांच्या लोकमताच्या पाठिंब्यांत वाढ मात्र झालेली नाही. जी वाढ दिसते ती संख्येची ! सत्तेच्या आश्रयार्थ येणाऱ्या "चालत्या घोड्यावरील गोमाशांमुळे झालेली !"

'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ओपिनियन' या संस्थेने आपल्या पाहणीचे जे निष्कर्ष नुकतेच प्रसिद्ध केले त्यांतहि "इंदिरा गांधींना जो लोकमताचा पाठिंबा गेल्या ऑगस्टमध्ये होता त्यांत विशेष कांहीच वाढ झालेली दिसत नाही. अजूनहि बरेच जण या संघर्षाचें स्वरूप 'वैचारिक' मानण्यापेक्षा 'सत्ताबाजी'चें मानतात." असाच लोकमताचा कौल व्यक्त केला आहे.

अर्थात्, याचा दोष इंदिराजींकडे जाण्यापेक्षा लोकांत सर्वत्र काँग्रेसी सत्ताधाऱ्यांबद्दल जी घृणा निर्माण झाली आहे, तिच्याकडे अधिक जाईल. पण इंदिराजींना याच 'उडदामाजी'च्या जगजीवनराम, फकरुद्दीन यांना घेऊन इंडिकेट बांधावी लागली. आहे व अशा या बांधलेल्या मोटेसह त्यांना सिंडिकेटशीं सामना द्यावयाचा आहे. स्वाभाविकच लहानपणीं मला जें पालीचें गणित सोडविण्यास सांगितलें जाई त्याची आठवण इंदिराजींच्या प्रगतीचा विचार करतांना, होते. एक पाल भिंतीवर चार फूट वर चढते व दोन फूट खाली घसरते, तर ती आढ्याला केव्हा पोचेल या प्रश्नाचें जें उत्तर तेंच 'इंडिकेट'च्या प्रगतीचें उत्तर होय.

इंदिराजींनी संसदीय काँग्रेस पक्षांतील बहुसंख्यांना आपल्याकडे खेचून जें यश मिळविलें तें रबातच्या इस्लामिक परिषदेसाठी निलाजरें आमंत्रण मिळवून फकरुद्दीन यांनी व दिनेशसिंगांच्या परराष्ट्रीय खात्याने धुळीस मिळविलें. अ. भा. काँग्रेसच्या इंदिराजींनी बोलावलेल्या बैठकीला मोठ्या संख्येने राज्याराज्यांतून काँग्रेस कार्यकर्ते दाखल झाल्याने सिंडिकेटवर इंदिराजींनी जी मात केली ती हंगामी काँग्रेस कार्यकारिणीच्या निवडींतील चुकांमुळे व त्याहिपेक्षा सरकारी काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष श्री. सुब्रह्मण्यम् यांच्या कबुलीजबाबामुळे फोल ठरली.

या साऱ्या घटनांचें सार एका वाक्यांत सांगावयाचें झालें तर इंदिराजींना कोणापासून अधिक धोका असेल तर सिंडिकेटपेक्षाहि त्यांच्या स्वत:च्या अनुयायांपासून. हंगामी कार्यकारिणींतील श्रीमती नंदिनी सत्पती, श्री. चंद्रजित यादव व गणेश यांच्याबद्दल जें आकांडतांडव तरुण तुर्कांनी केलें त्याची प्रेरणा खरोखरी कोठन आली होती हा प्रश्नच आहे. श्रीमती नंदिनी सत्पती साम्यवादी पक्षाच्या जुन्या 'कार्डहोल्डर' असतांनाहि मंत्रिमंडळामध्ये चालतात, पण काँग्रेस-कार्यकारिणींत मात्र चालत नाहीत. तरुण तुर्कांशीं जवळीक असलेले श्री. अण्णासाहेब शिंदे हे जुने साम्यवादी 'कार्डहोल्डर' नाहीत का ? मग आताच इंडिकेटच्या गटांत तरुण तुर्कांच्या जोडीने प्रभावी बनूं पाहणाऱ्या इतरांबद्दल मत्सर कां जागृत झाला व त्यांच्याकडे बोट दाखवून इंदिराजी साम्यवाद्यांच्या मगरमिठींत सापडल्याचें आकांडतांडव रोज 'पेट्रियट'मधून प्रसिद्धि मिळविणारे कां करूं लागले, याचा अर्थ नीट समजून घेतला, तर फारसें चक्करल्यासारखें होणार नाही.

इंदिराजीहि भोळ्या नाहीत. उलट राजकारणांत 'सव्वाशेर' ठरल्या आहेत. त्यांनाहि 'तरुण तुर्क' अशोक मेहतांच्या पंखाखाली होते व अजूनहि त्याच सावलींत वावरत आहेत याची माहिती नसेल असें कसें मानावें ? अशोक मेहता हे सध्या तरी सिंडिकेटचे 'ब्रेनट्रस्ट' बनले आहेत. स्वाभाविकच तरुण तुर्कांबद्दल कांही सावधानता इंदिराजींनी बाळगली तर त्यांना विशेष दोष देतां येणार नाही. त्यांतहि तरुण तुर्क "गाडीखालून चालतांना आपल्यामुळेच गाडी चालत आहे" असें मानीत असले, तरी त्यांची शक्ति किती आहे हेंहि दिल्लीला अगदीच कांही अज्ञात आहे असें नाही.

तरुण तुर्कांशीं, त्यांतहि महाराष्ट्रीय नेत्यांशी, विशेष संबंध असलेल्या सुब्रह्मण्यम् यांनी तर हंगामी काँग्रेसाध्यक्ष होतांच जीं वक्तव्यें केलीं तीं पाहतां असा हा अध्यक्ष हंगामी आहे तेंच बरें असें म्हणण्याची इंडिकेटवर पाळी आली आहे. बहुमताचा पाठिंबा 'इंडिकेट'ला असल्याने जेथे 'इंडिकेट'च्या ताब्यांतील काँग्रेस हीच खरी काँग्रेस असें रास्तपणें बजावलें जावयास हवें, तेथे त्यांचेच अध्यक्ष काँग्रेसच्या मालमत्तेची व भवनांची वांटणी मागूं लागले, तर कोणालाहि आश्चर्यच वाटणार ! काँग्रेस भवनाचा नोकरवर्गहि जेथे काँग्रेसच्या सर्व इमारती, झाडझाडोरा, पानेंफुलें ताब्यांत घेऊं पाहत

होता तेथे अध्यक्षच आपण 'अर्ध' असल्याचे आपल्या मागणीने सिद्ध करूं लागले तर काय म्हणावें ?

काँग्रेस कार्यकारिणीच्या संचावद्दल " मला सर्वांची माहिती नव्हती ", " चुकीने निवड झाली असेलहि," अशी चाचपडत भाषा करण्याचेंहि सुब्रह्मण्यम् यांना कारण नव्हतें. त्यांना सहज असें म्हणतां आलें असतें की, " तुमची टीका समजली; ही कार्यकारिणी महिना-दीड महिन्यापुरती तात्पुरती आहे. मुंबईच्या काँग्रेस अधिवेशनाच्या वेळीं आपल्या टीकेचा जरूर विचार देला जाईल. " पण असें नेमकें उत्तर देण्याऐवजीं हे महाशय एकदम खरीखोटी चूक पदरांत घेऊन मोकळे झाले. त्यामुळे इंडिकेटला पुन्हा आंतून सुरुंग लावण्याचे उद्योग तर मूळ धरूं लागले नाहीत ना, अशा संशयाची पाल माझ्या मनीं चुकचुकून गेली. हिमाचल प्रदेश येथील काँग्रेस समित्या रद्द करतांना निजलिंगप्पाच्या ' गैरसरकारी काँग्रेस 'ने महाराष्ट्राला मात्र मोकळे ठेवलें आहे यांतील अर्थहि चाणाक्षांच्या ध्यानीं येईल असें वाटतें.

*

' देवी देवळांत आणि नायटे गावांत ' ही म्हण येत्या कांही दिवसांत म्हणजे या सत्तासंघर्षाच्या राजकारणांत प्रचीतीला येईल. 'इंडिकेट'च्या कपामधील ' चहाचें वादळ ' फुंकर मारून शमविल्यानंतर इंदिरावाईंची दृष्टि स्वाभाविकच सिंडिकेटच्या चार वालेकिल्ल्यांवर क्रमाने पडणार हें सांगावयास नकोच. त्यानुसार उत्तरप्रदेशचे चन्द्रभान गुप्त यांच्या किल्ल्याला सुरुंग लावण्यासाठी उमाशंकर दीक्षित लखनौला फेऱ्या मारीत आहेत व चरणसिंग दिल्लीला येऊन जात आहेत. उत्तरप्रदेशच्या सत्तेचाळीस खासदारांपैकी अडतीसजण महामंत्र्यांच्या वाजूस वळले आहेतच. चरणसिंग आपल्या भारतीय क्रांतिदलाचे वहुसंख्य सभासद महामंत्र्यांच्या वाजूस वळवूं शकले व कमलापति त्रिपाठींशीं मुख्यमंत्रिपदावावतची तडजोड झाली की, गुप्त यांच्या मंत्रिमंडळाचें भवितव्य निश्चित झालें असें मानावयास हरकत नाही.

बिहारमध्ये हरिहरसिंगांनी मंत्रिमंडळ बनविण्याची आशा सोडलेली आहे. कदाचित् इंदिरा गांधीच संयुक्त समाजवादी नेते रामानन्द तिवारी यांना पुढे करून तेथे स्वतःच्या पंखाखालील मंत्रिमंडळ वनविण्यांत यशस्वी होतील. तशा चौकशा चालूहि झाल्या आहेत. मल्लपांना कार्यकारिणीत व कृष्णप्पांना मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेंत स्थान देऊन कदाचित् वीरेन्द्र पाटलांच्या म्हैसूरच्या मंत्रिमंडळासहि कांही धक्का दिला गेला असणें शक्य आहे.

अशोक मेहतांच्या सतशिष्यांनी हें लक्षांत घ्यावें की, राजकारणांत तत्त्वचिंतनाबरोबरच व्यवहाराचीहि जोड लागते. एकदा इंद्रप्रस्थाच्या राजाकडे तीन पंडित आले. त्यांतील एक तर्कशास्त्री होता, दुसरा वैयाकरणी होता व तिसरा वैद्यराज होता. आजवर ते विविध ठिकाणीं फिरून आले होते, पण त्यांचा यथोचित सन्मान

न झाल्याने ते इंद्रप्रस्थाच्या राजाकडे आले होते. राजाने आपल्या मंत्र्यांचा सल्ला विचारला. मंत्र्यांनी सांगितलें की, " उद्या या सार्‍यांना एकत्र स्वयंपाक करण्यास सांगा व भोजनानंतर येथे बोलवा. "

दुसर्‍या दिवशीं सकाळीं तर्कशास्त्री बाजारांत तूप खरेदी करण्यासाठी गेले. वाटेंत त्यांच्या डोळ्यांपुढे प्रश्न चमकला की तुपासाठी भांडें का भांड्यासाठी तूप ? आणि त्यामुळे ते डोकें खाजवीतच तूप घेऊन परतले. प्रश्नाचें उत्तर शोधण्यासाठी त्यांनी घरी येताच भांडें उलटें करून पाहिलें. सारें तूप जमिनीवर सांडलें.

वैयाकरणी दही खरेदी करण्यास गेले होते. दहीवाली 'दहीऽओ' असें ओरडत होती. वैयाकरणी म्हणाले, 'दही' असें ओरडणें ठीक, पण हें 'दही-ओ' काय आहे ? त्यामुळे ते दहीवालीची चूक दुरुस्त करूं लागले. दहीवाली रागावली. तिने आपलें मडकें वैयाकरण्याच्या डोक्यावर फोडलें.

वैद्यराज भाजी आणावयास गेले. त्यांना सारी मंडई हिंडूनहि रुचकर आणि पथ्यकारी अशी गुणसंपन्न भाजी कांही सापडेना. विचार करकरून शेवटीं तेहि रिकाम्या हातानेच परतले.

स्वयंपाक जागींच राहिला. तीनहि पंडित उपाशीच दरबारांत आले. मंत्रि-महाशयांना गुप्तचरांकडून ही बातमी आधी कळलीच होती.

राजाने पंडितांना " भोजन झाले ना ? " असें विचारलें. तिन्ही पंडित खाली माना घालूनच उभे होते.

त्यावर राजा म्हणाला, " आपल्या विद्वत्तेबद्दल मला खूप आदर आहे; पण जीवनांतील व्यवहार तुम्हांला समजला नाही. तो प्रथम शिका. मगच तुमचा योग्य सन्मान होईल. "

तरुण तुर्कांनी हा व्यवहार लक्षांत घेतला पाहिजे. श्री. मधू लिमये यांनीहि, इंदिरा गांधी यांनी किमान आर्थिक कार्यक्रम आखल्यास त्यांना साथ देण्याचें मान्य केलें म्हणे ! परंतु जीं आश्वासनें सरकारला पुरीं करतां येणार नाहीत तीं आश्वासनें इंदिराजी सत्ताधिष्ठित असल्याने कशीं देतील बरें ! मुंबईच्या काँग्रेस अधिवेशनाच्या वेळेपर्यंत धोरणाच्या दृष्टीने व त्यानंतरच्या अंदाजपत्रकी अधिवेशनापर्यंत त्या धोरणाला आकार देण्याच्या दृष्टीने विचार झाला तरच 'कथनी आणि करणी'मध्ये फरक पडणार नाही. चौथी योजना मोठी करावी अशी तरुण तुर्कांची व कांही राज्यांची मागणी आहे, पण हातीं आलेल्या शिध्यांतच स्वयंपाक साधला पाहिजे याची जाणीव संबंधितांना श्री. धनंजयराव गाडगीळ यांनी दिली आहे.

योजना वाढवावयाची तर उत्पन्नाचीं नवी साधनें धुंडाळली पाहिजेत. ग्रामीण भागांत शेतीवर व गरजेच्या कांही वस्तूंवर कर बसविता येतील; पण तसें करायला सार्‍यांचाच विरोध होईल. शहरी औद्योगिक क्षेत्रांतून करवाढीला फारशी जागा राहि-लेली नाही. शहरी मालमत्तेवर कांही हात मारता येईल. परंतु दात कोरून पोट किती

भरणार ? म्हणजे अंदाजपत्रकी जमाखर्च मागीलप्रमाणेच राहणार. तुटीचें अंदाजपत्रक करून फार तर थोडी कूस काढतां येईल, करआकारणीच्या वार्षिक वाढीचाहि कांही फायदा मिळेल इतकेंच. स्वाभाविकच विकासांतील अग्रक्रम ठरविणें, बँकांचें, आयात-निर्यातीचें, मूलोद्योगाचें सामाजिक गरज लक्षांत घेऊन राष्ट्रीयीकरण करणें, केंद्रीय नोकरांसाठी नवें वेतन मंडळ नेमणें, कूळ कायद्याची व शेतीविषयक कायद्यांची राज्या-राज्यांतून काटेकोर अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करणें, ग्रामीण भागांतील शेती-प्रमाणेच शहरी मालमत्तेवरहि नियंत्रण आणणें अशा बाह्यउपचारांकडेच इंदिराजींना आपला मोहरा वळवावा लागणार आहे. अर्थकारणाचें भांडवलदारी स्वरूप क्रांति-कारक रीतीने बदलण्यासाठी त्यांना प्रथम संसदेंत स्थैर्य प्राप्त करून घेऊन मगच लोकांकडे त्यांचें मानस जाणण्यासाठी गेलें पाहिजे.

संसदेंतील न्या. छगला, भार्गव, तेहरी गढवालचे महाराज आदि कांही सभासद काँग्रेस सोडून अपक्षीय बनले असले तरी मुल्ला, प्रा. नुरुल्ला हसन आदि कांही अपक्षीय इंडिकेटकडे झुकले आहेत. फ्रँक अँथनी, टी. विश्वनाथन्, स्वेल वगैरे अपक्ष सभासदांच्या २३ च्या गटापैकी १९ जणांचा इंदिरा गांधी यांना पाठिंबा मिळाला आहे. जे अपक्षीय कोणत्याच गटांत दाखल झालेले नाहीत अशा सत्तावीसपैकी चौदाजणांनी रबात-प्रकरणीं इंदिरा-सरकारला पाठिंबा दिला. ही परिस्थिति पाहतां अर्थसंकल्पी अधिवेशना-पर्यंत तीस अपक्ष सभासदांचा गट इंदिरा-सरकारचा पाठपुरावा करावयास उभा राहील, अशी आशा करण्याजोगी आहे. त्यांच्या पाठिंब्यास द्र. मु. क., अकालींसारखे राज्यपातळीवरील पक्ष व सं. स. व प्र. स. यांतील समजुतदार मंडळीचा आधार मिळून इंदिरा सरकारला संसदेंतील वेळ जनमानसावर स्वतःची विश्वसनीय पकड येईपर्यंत निभावतां येईल. मध्यावधि निवडणुका होऊन अस्थिर सरकार येण्यापेक्षा इंदिरा-सरकार कांहीसें स्थिरपद होऊं शकत असेल, तर तें 'दगडापेक्षा वीट मऊ' मानून पत्करण्याची मनाची तयारी स्वतंत्रांतील एन्. दांडेकरांसारख्यांची व अरविंद मफतलाल, बाबुभाई चिनॉय वगैरे उद्योगपतींचीहि झाल्याचें कळतें. भवानजी खिमजी व देवजी रतनसीं यांच्या मुंबईच्या काँग्रेस अधिवेशनाला लाभलेला आशी-र्वाद त्या दृष्टीने बोलका मानावा लागेल.

*

सत्ताधारी काँग्रेसच्या सध्याच्या दारुण अवस्थेमुळे लज्जान्वित होऊन राज-धानीने आपलें मुख सध्या धुक्याच्या पडद्याआड झाकलें आहे. थंडी हळूहळू गात्रांना जाणवूं लागली आहे. उन्ह हवेंहवेंसें वाटत आहे. दिल्लीतील सारी झाडे पानांवर सोनेरी छटा येऊं लागल्याने सुशोभित दिसत असली तरी सावरीचीं व बेलाचीं झाडें मात्र अपवादात्मक अशीं पर्णरहित पण फळांनी लडलेलीं आढळतात. तांबड्या, जाड मांसल पाकळ्यांच्या पुष्पांनी व पोपटासारख्या हिरव्यागार फळांनी सावरी, तर

पिवळ्याजर्द गोलाकार फळांनी बेल लहडलेला आहे. आपल्याकडे बेलफळ औषधि मानलें जातें, पण कोणी खातांना सहसा आढळत नाही. दिल्लीकडे मात्र बेलफळांचा फराळ करणारे अनेक शीख, उत्तर हिंदुस्थानी आढळतील. एका शिखाजवळ, तो बेलफळांतील जाड कवच फोडून गर खात असतांना मी सहज पृच्छा करण्याचें धाडस केलें. लगेच तो म्हणाला, "बाबूजी, आप भी लीजिये! बडा मीठा और पथ्यकारी फल है।"

बेलफळाचा गिळगिळीत चिकट बलक पाहून मी त्याला साभार नकार दिला. त्यावर तो म्हणाला, "या बेलफळांनी लढाईंतहि मोठी कामगिरी बजावली आहे. ब्रह्म-देशाच्या सरहद्दीवर जपान्यांशीं लढतांना एका छावणीमध्ये पाण्याची मोठी टंचाई पडली. पाणी पल्ल्यावर होतें. तेथून छावणीपर्यंत तें बादल्यांनी आणावयाचें, तर मोठी झंझट! छावणीला काय थोडें पाणी लागणार? त्यामुळे बादल्या बादल्यांनी तें कसें पुरवितां येईल? नळ टाकावेत तर ते आणावेत कोठून? शेवटी एकाला युक्ति सुचली. त्याने जंगलांतील लांब पोकळ बांबू तोडून आणले. मधल्या गाठीवरच्या पडद्यांना भोकें पाडली व त्याची नळी बनविली. दुसऱ्या अशाच बांबूच्या नळाचें छोटें तोंड पहिल्याच्या मोठ्या तोंडांत बसवून व बेलफळाचा गीर चुन्यांत मळून केलेल्या डिंकाने तो सांधा लिपला. त्याने असे तीन-चार हजार फुटांचे बांबूचे नळ जोडून छावणीमध्ये पाणी आणलें. एक थेंब देखील पाणी सांध्यांतून झिरपलें नाही की वाया गेलें नाही."

"अशा या गुणी फळाचा बाबूजी, आपणहि आदर करा" असें म्हणून त्याने पुन्हा माझ्यापुढे एक पिवळेंजर्द बेलफळ केलें. जंगलांतील हा पथ्यकारी मेवा राजधानींत त्याने माझ्या हाती ठेवला. तो खाण्याचा जरी मला धीर झाला नाही तरी तें नारंगी फळ मी घरीं घेऊन आलों.

टेबलावर ठेवलेल्या टेनिसच्या चेंडूसारख्या त्या बेलफळाकडे पाहत असतां माझ्या मनांत आलें की, इंदिराजी सामाजिक व आर्थिक समतेचें पाणी समाजवादाच्या रूपाने जनतेपर्यंत कॉंग्रेस संघटनेच्याद्वारे कोण्या बेलफळाचा उपयोग करून न सांडतां नेणार आहेत बरे!

एकदा रामनाथ कृष्णन् हे जयदीप मुकर्जीला घेऊन टेनिस सामना खेळत असतां खेळतांना ते जयदीपला आणखी डावीकडे सरकण्याची सूचना (फर्दर टु दि लेफ्ट) देऊं लागले.

"वा!" त्यावर जयदीप उत्तरला, "तुझे हे शब्द अगदी आपल्या महामंत्र्यां सारखे भासतात!"

**– केसरी, दि. ७ डिसेंबर १९६९**

# कम्युनिस्टांच्या मर्जीसाठी अराजकाकडे दुर्लक्ष

- २४ -

सर्वांचेंच संसदीय कामकाजामधील लक्ष आता उडालें आहे. तें लागले आहे अहमदाबाद, मुंबईकडे ! लोकसभेंत रेल्वे-वॅगन-प्रकरणीच्या रशियाच्या हेरगिरी-बद्दल जॉर्ज फर्नांडिस यांनी उभी केलेली सनसनाटी, चंदीगडच्या मध्यवर्ती शास्त्रीय उपकरण संघटनेमधून 'डिरेक्टर-७' या गुप्त नांवाखालील रणगाड्यांसाठी वापरांत येणारी कोन-मोजणीच्या उपकरणांच्या डिझाईन्सची चोरी व राज्यसभेंत श्री. राज-नारायण यांनी इंदिराजींवर लोहियांच्या मृत्यूबाबत ठेवलेला बिनबुडाचा ठपका अशीं कांही छोटीं वादळें सोडलीं तर सध्या कामकाज थंडपणेंच चाललें आहे. लोकसभेचे सभापति श्री. धिलाँ हे सभागृहांतील वाद प्रेमाने व प्रतिष्ठेने (love and respect) सोडविण्याचे प्रयत्न करीत असतात. परंतु इतरत्र त्यांना 'प्रेमा'ने जें साधलें तें लोकसभेंत मात्र साधत नाही अशी तक्रार स्वत: धिलाँ यांनीच केली आहे. एका सभासदाने त्यांना विचारलें, "आपले 'प्रेम' कोठे यशस्वी झालें ?"

त्यावर धिलाँ विनोदाने म्हणाले, "माझ्या चेंबरमध्ये या, म्हणजे मी त्याबाबत तुम्हांला सांगीन."

धिलाँ यांचे सहकारी म्हणून डॉ. स्वेल या अपक्षीय ख्रिश्चन सभासदाची निवड उपसभापतींच्या जागीं झाली आहे व राज्यसभेंतहि उपाध्यक्षांच्या जागीं बहुतांशीं रिपब्लिकन पक्षाचा सभासद निवडला जाईल. पण सिंडिकेट, इंडिकेटच्या लेखीं या निवडणुकांचें महत्त्व केवळ संसदेंतील बलाबल संघटित करण्यापुरतेंच आहे. त्यांचें लक्ष गुंतलें आहे अहमदाबाद-मुंबईच्या मोर्चेबंदींत !

मुबईच्या सरकारी काँग्रेस-अधिवेशनांत सुब्रह्मण्यम् यांची जागा पक्षाध्यक्ष म्हणून जगजीवनबाबू घेतील. बाबूजी तसे खारावलेले, मुरव्वी काँग्रेस नेते आहेत. त्यांतून गांधी-जन्मशताब्दीच्या वर्षात जगजीवनराम यांच्यासारख्या वृद्ध हरिजन काँग्रेस नेत्याची निवड पक्षाध्यक्ष म्हणून होत आहे हें वरवर पाहतां तरी मोठें समाधानकारक वाटणारें आहे. मुळांत जगजीवनबाबूंची निवड होणार होती राष्ट्रपतिपदासाठी, पण बंगलोरला रेड्डीच्या बाजूने यशवंतरावजींनी ऐन वेळी हात वर केल्याने जगजीवनबाबूंची संधि हुकली आणि त्यांतून मोठें महाभारत निर्माण झालें. जगजीवनबाबूंची तेव्हाहि मंत्रिपद सोडून राष्ट्रपतिपद घेण्याची तयारी नव्हती. पण नाईलाज म्हणून त्या शोभेच्या घोड्यावर ते स्वार होण्यास तयार झाले होते. जगजीवनबाबूंना पूर्वी मंत्रिपद सोडावें लागलें ते कामराज-योजनेचा वापर करून पंडितजींनी त्यांना बाजूला काढलें तेव्हा. त्या अधिकारच्युतीच्या काळांत जगजीवनबाबूंच्या दिल्लींतील किती तरी संस्थांच्या अलिशान इमारतींचीं कामें पैशाच्या पुरवठ्यामुळे अडकून पडलीं व उभे केलेले पहाड तेवढे तसेच शिल्लक राहिले. "वन बांबूंचे पिवळ्या गाते, आकाशांतील अधोरेखिते" असें तें चित्र दिसत असे. जगजीवनरामांच्या मुठींत असलेल्या संसदेंतील एकगठ्ठा हरिजन मतांची गरज जेव्हा पुन्हा कामराजादि मठाधिपतींना लागली तेव्हा जगजीवनराम परत खुर्चीवर आले. शिशिरांत खराटा झालेल्या झाडांना वसंत ऋतूंत जशी पालवी फुटावी तशा पुन्हा सर्व अर्धवट इमारतींचीं कामें पुरीं होण्याच्या मार्गाला लागलीं.

जगजीवनबाबूंचें प्राप्तिकर-प्रकरण तसें किरकोळ आहे! त्यांच्या चाळीस-बेचाळीस संस्थांपैकी कोणत्या संस्थेने प्राप्तिकर भरला आहे म्हणून जगजीवनराम यांनी भरावा! संस्था विसरल्या, जगजीवनबाबू विसरले, प्राप्तिकर-अधिकारी विसरले! प्राप्तिकर-अधिकाऱ्यांना आपल्या अधिकाराची जाणीव झाली ती प्राप्तिकर चुकविल्याबद्दल दंड माफ करतांना. चालायचेंच! एक सर्वोदयी नेते माझ्याजवळ एक दिवस प्रामाणिकपणें कळवळून म्हणाले की, 'खाणें' हा चालू युगाचा धर्मच दिसतो! आता खाणारच तर 'खा', पण निदान खाऊन तरी आपलीं कामें व्यवस्थित करा! इंदिराजींनी हेंच लक्षांत घेऊन जगजीवनरामबाबूंचें बुद्धिचातुर्य व संघटनाचातुर्य काँग्रेससाठी योजिलें असावें. पंडितजींनी कामराज-योजनेचा आधार घेऊन बाबूजींना मंत्रिपदावरून संघटनेंत ढकललें, त्यांच्या लेकीने तेंच करण्यासाठी प्राप्तिकर-प्रकरणाचा आधार घेतला इतकेंच!

जगजीवनबाबूंच्या खांद्यावर, त्यांची इच्छा असो वा नसो, सरकारी काँग्रेसची धुरा आता पडणार आहे. काँग्रेसला नवें रूप द्यावयाचें तर सरकारी काँग्रेसचीं डावीं धोरणें पेलण्याची शक्ति असलेलें नवें नेतृत्व जगजीवनबाबूंना उभें करावें लागेल. राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, आंध्र येथील सरकारी काँग्रेसच्या संघटना, श्री. सुखाडिया, मिश्र, चव्हाण, ब्रह्मानंद रेड्डी यांच्या हातांत तर उत्तर प्रदेशांतील

संघटना कमलापति त्रिपाठी व बिहारची रामलखन यादव यांच्या हातांत आहे. सुब्रह्मण्यम यांनी " सरकारी कॉंग्रेसचें धोरण डावें रहाणार, याचा अर्थ ते कम्युनिस्ट किंवा मार्क्सवादी होणार असा नव्हे " असें स्पष्ट केलें आहे. तसेंच अलाहाबादच्या आपल्या भाषणांत इंदिराजींनीहि " मी कम्युनिस्ट बनू इच्छित नाही " असें त्रिवार घोषित केलें आहे. सिंडिकेटचा व जनसंघ-स्वतंत्रांचा प्रयत्न इंदिराजींच्या धोरणाला कम्युनिस्ट छाप लाल रंग देण्याचा सतत राहील. हेतु हा की या लाल रंगाला बुजून कॉंग्रेसमधील बैल इतरत्र उधळावेत.

जगजीवनबाबू हा धोका हेरण्याइतके चाणाक्ष आहेत, पण तेहि जुन्या पठडींतील नेते असल्याने नव्या समाजवादी नेतृत्वाच्या हाती कॉंग्रेस सोपविताना त्यांचाहि हात कांही आखडेल की काय, याची शंका येते ! आजचें इंडिकेटचें नेतृत्व " today darkness is lit by feeble and uncertain lamps, " असें आहे. समाजांतून उदय पावलेलें नवें समाजवादी नेतृत्व सरकारी कॉंग्रेसने मुंबईच्या अधिवेशनात निवडलें तरच कॉंग्रेसला नवें रूप देण्याचा प्रयत्न यशस्वी होईल.

*

कॉंग्रेसच्या अधिवेशनाची तयारी अशा रीतीने एका बाजूस चालू आहे, पण दुसऱ्या बाजूस मात्र केंद्रांतील संसदीय फळी व शासकीय फळी दिवसेंदिवस खिळखिळी होत चालली आहे. संसदेंतील सरकारी बाजू सावरण्यास चव्हाण हे एकटेच मुख्वी 'पार्लमेंटेरियन' शिल्लक राहिले आहेत कांही प्रमाणांत स्वतः इंदिरा गांधी, स्वर्णसिंग, व्ही. के. आर. व्ही. राव, गुजराल, अण्णासाहेब शिंदे वेळ निभावतात, पण बाकी मंत्री-उपमंत्र्यांना ना वक्तृत्व, ना संसदीय वादपटुत्व. अशा आपल्या कमजोर अन् अल्पसंख्य मंत्रिमंडळास संसदेंत जिवंत ठेवण्यासाठी इंदिराजींना द्र. मु. क. व कम्युनिस्ट गटांची जी मर्जी राखावी लागत आहे त्यामुळे केंद्रीय शासनांत खूपच ढिलेपणा आला आहे. पश्चिम वंगाल हे त्याचें बोलकें उदाहरण आहे. बांगला कॉंग्रेसचे अजय मुकर्जी यांना आपल्या बाजूस वळविण्याची इंदिराजींची खटपट चालू आहे व त्यामुळे त्यांना येथील अराजकाकडे दुर्लक्ष करावें लागत आहे. सोन्यासाठी लाल चिंधी जपावी लागत आहे. गृहखात्याने मंत्रिमंडळाच्या अंतर्गत व्यवहार समितीकडे 'पश्चिम बंगालमधील अत्याचार कसे वाढत आहेत' यासंबंधीचें एक टिपण दिलें आहे, तर गृहखात्याचे सचिव श्री. लाल यांनी केंद्रीय अधिकाऱ्यांवर पश्चिम बंगालमध्ये कसें दडपण येतें याचीं अनेक उदाहरणें मंत्रिमंडळाच्या निदर्शनास आणलीं आहेत. १९६७ सालापर्यंत जेथे पोलिस अधिकाऱ्यांना व पोलिसचौक्यांना घेराओ करणारी एकुलती एक घटना घडली होती तेथे मार्च १९६९ ते मे १९६९ या तीन महिन्यांच्या काळांत तशा साठ घटना घडल्या. परदेशीय दळणवळण खात्याच्या अधिकाऱ्यांना घेराओ झाला असतांना पश्चिम बंगालच्या

गृहमंत्र्यांनी स्वच्छ सांगितलें की, " नोकरवर्गाजवळ कोर्टांत जाण्यासाठी पैसे व वेळ नसल्याने त्याने ही तातडीची उपाययोजना केली आहे. तेव्हा अधिकाऱ्यांनी नोकर-संघटनांशीं समझोता करावा हें इष्ट ! "

दुर्गापूर पोलाद कारखाना, तसेंच यादवपूर आणि दुर्गापूर येथील चष्म्याच्या काचांचे कारखाने येथील दंगे हीं सर्व अशाच अराजकाचीं व केंद्र-सरकारचा हताशपणा व्यक्त करणारीं उदाहरणें आहेत. १९५९ सालीं केरळमध्ये यापेक्षा किती तरी कमी अत्याचार झाले असतां पं. नेहरूंना तेथील साम्यवादी मंत्रिमंडळ बरखास्त करण्यास इंदिराजींनी भाग पाडलें. त्या इंदिराजी आज सत्तास्पर्धेच्या कोंडीत सापडून सुस्कारे टाकीत, पश्चिम बंगालमधील अराजक पाहत आहेत. अशा परिस्थितींत स्थानबद्धतेच्या कायद्याला पुनर्जीवन मिळणें स्वाभाविकच आहे. या वर्षअखेर त्याची मुदत संपतांच स्थानबद्धतेंतून बाहेर पडणारे नक्षलवादी पश्चिम बंगालमध्ये जो गोंधळ घालतील त्याची कल्पना केलेलीच बरी.

उत्तर प्रदेशमधील गुप्त-मंत्रिमंडळ पराभूत करण्यासाठी भारतीय क्रांति-दलाला हाताशीं धरावें लागत आहे. अजय मुखर्जीप्रमाणेच चरणसिंगांनाहि सरकारी कॉंग्रेसमध्ये खेचून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. पश्चिम बंगालमध्ये डाव्या कम्युनिस्टांनी आपल्या संघटनाकौशल्याने जसे पक्के पाय रोवले आहेत तसेच गुप्त यांनीहि आपल्या चातुर्याने व चिकाटीने आजवर कमलापति-चरणसिंगांना नामोहरम केलें आहे. चरणसिंगांनी व कमलापतींनी आपल्या पाठीमागे ४२५ सदस्यांपैकी २३० सदस्य असल्याचें जरी नुकतेंच घोषित केलें असलें, तरी गुप्त यांनी उजव्या विचाराच्या जनसंघाशीं हातमिळवणी करून आपली बैठक पक्की करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय क्रांतिदलाच्या महंमद हनीफ आदि मुस्लिम पुढाऱ्यांना खुष करण्यासाठी उत्तरप्रदेशांतील जातीय दंग्यांकडे व पाकिस्तानी प्रवृत्तीकडे कसें दुर्लक्ष होत आहे याचें बोलकें उदाहरण म्हणजे वाराणशीचा दंगा ! लाटभैरवाच्या देवळावर संघटित-पणें अष्टमीला हजार भालेधारी मुसलमानांनी हल्ला करूनहि त्याबाबत केंद्र-सर-कारने केवळ बघ्याची भूमिका घेतली आहे. तिघांचा बळी घेतलेल्या वाराणशीतील या दंगलीपूर्वी किती तरी आधी तेथील वातावरण तंग झालेलें होतें. भैरव मंदिरा-शेजारच्या इदगाहबाबतचा हिंदु-मुसलमानांतील वाद १८८० पासून चालू आहे. नुकताच त्याबाबतचा कोर्टाचा एक निर्णय हिंदूंच्या बाजूने मिळालाहि आहे. त्या इदगाहांत असलेला स्तूप अशोककालीन असल्याचें मानलें जातें. दक्षिणेकडील कूप भरतकूप म्हणून व समोरचें कुंड कपालमोचनकुंड म्हणून ओळखलें जातें. अशा तंग अवस्थेंतहि योग्य ती जाणीव राज्य-सरकारला देण्याची वा मदत करण्याची आवश्यकता केंद्र-सरकारला भासली नाही, यांतील उघड राजकारण या दंगलीचें पाप चंद्रभानु गुप्त यांच्या दारात ठेवण्याचें होतें. विनोबाजींनी अहमदाबाद दंगलीच्या वेळीं स्वच्छच मत प्रदर्शित केलें होतें की, " या देशांत पाकिस्तानचे अनेक समर्थक

असून, त्यांच्या निष्ठा इतरत्र आहेत. दंगे त्यांतून घडतात." परंतु मुसलमानांचें साहाय्य आपल्या अल्पसंख्य मंत्रिमंडळासाठी गोळा करण्याच्या नादांत, तसेंच गुप्त यांचें आणि हितेंद्रांचें मंत्रिमंडळ कोसळविण्याची मनीषा बाळगतांना केंद्रीय कारभाराची पकड ढिली होत आहे व किती नागरिक त्याचे बळी ठरत आहेत, हें इंदिराजी विसरल्या आहेत काय ?

गुजरातच्या हितेंद्र देसाई यांच्या मंत्रिमंडळाला शह देण्याचीं कारस्थानें दिल्लींत शिजत होतीं हें आता फत्तेसिंग गायकवाड यांनी बाजू बदलतांच गुलझारीलाल नंदांनी जें वक्तव्य केलें, त्यावरून स्पष्ट होत आहे. गायकवाडांना चंद्रशेखर यांच्याबरोबर कार्यकारिणीचे आमंत्रित बनविलें तेंहि त्यासाठीच. क्वचित् त्यामुळे संस्थानिकांचा फायदाच झाला असता. परंतु इंदिराजींनी गिळलेलें हें माणिक त्यांच्या घशांतून काढण्याची किमया गुजरात काँग्रेसने केली यांत शंकाच नाही. सामान्यांना फत्तेसिंग इंडिकेटकडे आपणहून जातात काय व रातोरात सिंडिकेटकडे परततात काय, सारेंच कोडें वाटतें. हें पाहून —

कैसे रातोरात बदलते है,
नेताओं और अखबार
और शब्दों के अर्थ
देख रहे है न आप ?

बाप रे बाप ! असेच उद्गार कोणाच्याहि मुखांतून निघतील.

*

राजकारणांतील अधिवेशनांसारखे सण वा उपास-तापास यांचें पुण्य लाभावयाचें झाल्यास तें नेतृत्वगणाला लाभतें. सामान्यांच्या माथीं मात्र त्यांतील पापेंच लादलीं जावयाचीं. ते बिचारे असेल त्यांत सुख मानून दीपावलि, रमझान साजरे करीत असतात. गेल्या आठवड्यांत जामा मशिदीच्या भोवतालचा परिसर रोषणाईने उजळून निघाला होता. रमझानचा महिना जसजसा संपत आला तसतशी या रोषणाईंत व मिठाईच्या दुकानांतील गर्दींत वाढ होत गेली. रमझानचे उपास मोडूं नयेत म्हणून सूर्योदयाच्या आंत 'सेहरी' घेण्यासाठी आपल्या इष्टमित्रांना पाचारण करून रमझानचीं गाणीं गात कबाब-तंदुरीची चव घेतली जात होती. 'ईद-उल्-फित्र'ला शेवयांची खीर खाऊन हे उपास सुटले व पुन्हा एकदा जामा मशिदीचा व महालचा परिसर नेहमीप्रमाणे सात वाजतांच चिडीचिप्प होऊं लागला आहे.

तत्पूर्वी आठवडाभर तिबेटी बौद्धांनीहि आपला दीपोत्सवाचा सण साजरा केला. बुद्धजयतीइतकाच हा सण महत्त्वाचा मानला जातो. दहा वर्षांनंतर पहिल्यांदा तो दिल्लीत साजरा झाला. 'लडाख बुद्धविहार' तुपाच्या पणत्यांनी उजळून निघाले. बौद्ध भिक्षूंनी पेटींतून आपले रंगीत पेहराव काढून धारण केले होते. हजारो तिबेटी नागरिक मंत्र म्हणत असतां खास तिबेटी वाद्यें वाजविलीं जात होतीं.

या उत्सवाच्या निमित्ताने माझ्या मनांत एक प्रश्न सहज उमटून गेला. बौद्ध धर्माची संस्थापना झाली भारतांत, पण येथे त्याचें अस्तित्व केवळ नामत्रमाच शिल्लक राहिलें. त्याचा प्रसार झाला तो तिबेट, चीन, सिलोन, सयाम आदि देशांत, भारताबाहेर !

गांधीवादाचेंहि असेंच नाही का ? त्याचा उगम आहे भारताच्या स्वातंत्र्य-चळवळीत. पण गांधीजींच्या हयातीत व त्यानंतर फार थोड्याच काळांत त्याचा ऱ्हास भारतांत सुरू झाला. उलट अमेरिकेंतील निग्रो-चळवळीने, आफ्रिकेंतील स्वातंत्र्य-चळवळींनी व पाश्चात्त्य देशांतील युद्धविरोधी चळवळींनी गांधीवादाचा आश्रय केला. नुसती गांधीवादाचीच ससेहोलपट या देशांत झाली असें नव्हे, तर राजधानीत अगदी गांधी-शताब्दी वर्षांत गांधीजींच्या स्मारकाची फरफट चालू आहे. गांधीजींचें – राष्ट्रपित्याचें – स्मारक राजधानींत व्हावयाचें तर सम्राट् पंचम जॉर्ज यांचा पुतळा राजपथावरील ज्या मेघडंबरींतून हलविला त्या शुभ्र संगमरवरी मेघडंबरींतच भारताच्या या अनभिषिक्त सम्राटाची मूर्ति उभी करावी असा निर्णय यापूर्वी करण्यांत आला होता. पण इंदिराजींच्या मंत्रिमंडळाला ती जागा पसंत पडली नाही. तेथे गांधीजींचा पुतळा उभा करावयाचा म्हणजे तो फारच भव्य हवा. त्यांतून गांधीजींना पुष्पमाला अर्पून श्रद्धांजलि व्हावयाची तर तें या अवाढव्य स्मारकाच्या बाबतींत अशक्य ठरणार ! एक ना दोन, किती तरी अडचणी ! स्वाभाविकच दुसरी संचालन समिति नेमन नॅशनल स्टेडियमजवळ पुतळा उभा करावा, का टिळक-मार्ग व कस्तुरबा-मार्ग यांमधील हिरवळीवर तो उभा करावा, याचा विचार करणें प्राप्त झालें.

पण संसदेचे सभासद कसले नतद्रष्ट ! त्यांना या साऱ्या चालढकलीमागे कांही हेतु असल्याचा संशय आला. नाही तरी गांधीवादाची जागा आता समाजवादाने घेतलीच आहे; मग राष्ट्रपित्याचा मानहि या बदलास अनुरूप असा पंडित नेहरूंकडे आला तर चुकलें कोठे ? नाही तरी आज 'राष्ट्र' म्हणजे इंदिराजी व त्यामुळे त्यांचे पिताजी पंडितजी हे राष्ट्रपितेच होत ! मग राजपथावरील ब्रिटिश सम्राटांच्या पुतळ्याची जागा पंडितजींच्या पुतळ्यासाठीच योग्य नाही का ? गांधीजींचा पुतळा काय, कोठेंहि उभा करतां येईल ! टिळकांचा पुतळा नाही का मुकाट टिळक-मार्गावर बसला आहे. महात्माजींपूर्वी लोकमान्य भारताचे अनभिषिक्त सम्राट् होते. लोकमान्यांनंतर तें पद गांधीजींनी भूषविलें व त्यानंतर तें पंडितजींकडे आलें. स्वाभाविकच गांधीयुगांतील राज्यकर्त्यांच्या लेखीं टिळकांचें जें महत्त्व ठरलें तेंच समाजवादी राज्यकर्त्यांच्या लेखीं गांधीजींचें ठरणार !

जुनीं नाणीं मोडींत नाही का निघत ? व्यवहारांत तीं चालत नाहीत. राज-कारणाचा व्यवहार हा तर बदमाशांचा धंदा असें म्हणतात! आजवर त्यांनी देश-

भक्तीचा धंदा केला; आता त्यांचा समाजवादाचा धंदा चालू आहे. Socialism, now a days has supplanted patriotism as the last resort or scoundrals.

इंदिराजींनी केंद्र-सरकार समाजवादी बनविण्याचा विडा उचललाच आहे. पण टपाल-तारखातें त्यापूर्वीच आपण डावे बनल्याचें घोषित करून मोकळें झालें आहे. प्रत्येकाकडे सध्या येणाऱ्या पत्रांवरचे छाप नीट पाहिलेत, तर P. & T. for Socialist Society अशी अक्षरें दिसतील. समाजवादी समाज असो, नाही तर भांडवलदारी समाज असो, सर्वांनाच परस्पर-व्यवहारासाठी टपालाची गरज असते. मग समाजवादी समाजाचे आम्ही पाईक आहोंत असें खास सांगण्यामागे टपाल-तारखात्याचा काय हेतु आहे बरें! का त्याला हें सांगावयाचें आहे की, वर्षावर्षांने पत्रें पोचविण्याबाबत, तीं गहाळ करण्याबाबत, चुकीचे टेलिफोन नंबर सांगण्याबाबत सर्वांना समान वागणूक दिली जाईल. नाही तरी समतेवरच समाजवाद आधारलेला आहे!

टपाल-तारखातें नुसत्या समाजवादी समाजरचनेचाच पुरस्कार करून थांबलेलें नाही, तर राज्यपुनर्रचनेलाहि त्याने हात घातलेला दिसतो. सर्व टपाल-कचेऱ्यांमध्ये "देशांत ठिकठिकाणीं चोवीस रामपूर आहेत; तेव्हा आपला पत्ता तालुका, जिल्हा, राज्यासह अचूक लिहावा" असें सांगणारीं भित्तीपत्रकें लावलेलीं आढळतात. पण याच टपाल-तारखात्याने आपल्या सेवा-सप्ताहानिमित्त जी निबंधांची स्पर्धा ठेवली, तींत सुप्रसिद्ध तिरुपतीचें देवस्थान आंध्रऐवजीं तामिळनाडूमध्ये असल्याचें म्हटलें आहे. मग कोणास ठाऊक, टपाल-तारखात्याने समाजवादी समाजरचनेबरोबर आपली स्वतंत्र राज्यपुनर्रचना घडविण्याचेंहि योजिलें असेल तर!

– केसरी, दि. १४ डिसेंबर १९६९

# परराष्ट्रमंत्र्यांचा अव्यापारेषु व्यापार

- २५ -

संसदेच्या अर्थसंकल्पी अधिवेशनाच्या उद्घाटनाला, त्यानंतरचे दोन दिवस सुट्टीचे असतांनाहि या वेळीं सारी खासदार मंडळी आवर्जून उपस्थित होती, याचें साऱ्यांनाच आश्चर्य वाटत होतें. मध्यवर्ती सभागृहांत राष्ट्रपतींच्या भाषणाच्या वेळीं खासदारांना जागा कमी पडली म्हणून भिंतीलगत अधिक खुर्च्या मांडाव्या लागल्या होत्या. राष्ट्रपति श्री. गिरी भाषण करीत असतांना सारें सभागृह स्तब्ध, शांत होतें.

मध्यवर्ती सभागृहाचें हें रूप कांहीसें आगळें वाटणें स्वाभाविकच होतें. कारण गटागटाने चहा-कॉफीचे कप रिचवीत, वाद घालीत खासदार मंडळी साऱ्या सभागृहांत जेथे अस्ताव्यस्त बसलेली दिसावयाची तेथे ही अनोखी शिस्त दिसली. राष्ट्रपतीचें भाषण संपतांच मात्र सर्वांनी सुटकेचे नि:श्वास सोडले व पुन्हा नेहमीचें मोकळें वातावरण निर्माण झालें, गडबड सुरू झाली. विरोधी पक्षांचे खासदार एकत्र जमून इंदिरा सरकारला अधिवेशनांत कसें सतवावें याचे मनसुबे रचूं लागले.

राष्ट्रपतींचें भाषण ऐकतांना त्यांचा आशावादी सूर माझ्या कानाला जरी बरा लागला होता, तरी इंदिरा-सरकरच्या धोरणाचें सूत्र कोणी तरी दुसराच हाताळत नाही ना, असा संशय निर्माण व्हावा, अशा कांही जागा सापडत होत्या. भारतांत गतवर्षी येऊन गेलेल्या प्रमुख पाहुण्यांच्या सर्वसाधारण उल्लेखांत अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन यांच्या भेटीचा विशेष उल्लेख अपेक्षित होता. परंतु सिलोन, अफगाणिस्तान, इंडोनेशिया, ब्रह्मदेश या आजूबाजूंच्या चिल्लर देशांच्या महामंत्र्यांच्या भेटीचा उल्लेख होतो आणि अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची भेट दृष्टीआड केली जाते हें अगदीच अनवधानाने झालें असेल असें मानावें काय ?

तसेंच देशांतील दंगलींचा उल्लेख करतांना राष्ट्रपतींनी अहमदावादच्या दंगलीचा अत्यंत तीव्र शब्दांत निषेध केला. देशाच्या प्रतिष्ठेला त्यामुळे बाधा आली, राष्ट्रीयत्वाचा अपमान झाला; हें सारें खरें! पण पश्चिम बंगालमधील दंगली, हिंसक प्रकार, खुनाखुनी व अराजक यांमुळेहि देशाची तितकीच, किंबहुना अधिक अप्रतिष्ठा झालेली नाही काय? तेथील सरकारच्या वागणुकीने तर देशांतील लोकशाही धोक्यांत येऊं पाहते आहे. पण राष्ट्रपतींच्या भाषणांत त्याबद्दल दूरान्वयानेहि उल्लेख नाही असें कां? इतकी 'परप्रत्ययनेयता' इंदिरा सरकारला येण्याचें कारण काय? आता हेंच पाहा ना! परराष्ट्रमंत्री दिनेशसिंग यांना चीन-रशिया सीमावादांत रशियाच्या बाजूचें अकारण समर्थन करण्याची काय गरज होती? चीन-भारत सीमातंटयांत रशियाने कधी तुमची बाजू स्पष्टपणें घेतली होती का? मग हा अव्यापारेषु व्यापार म्हणजे अप्रगल्भतेचा द्योतक मानावयाचा, का लाचारीचा पुरावा!

गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना इंदिरा-सरकारचा हा रशिया-धार्जिणेपणा समजत नाही असें नाही. पण आज त्यांना त्याबद्दल विचारल्यास 'राजकीय सोय व गरज' म्हणून ते वेळ मारून नेतील. कारण सध्या खरा प्रश्न आहे तो ज्याच्या त्याच्या अस्तित्वाचा!

यावरून एक गोष्ट आठवली. एका योद्धयाची पत्नी सुरेख होती, हुषार होती, पण चारित्र्यहीन होती.

एकदा रात्रीं ती खिडकींत प्रियकराची वाट पाहात बसली असतांना कोंबडया-ची बांग तिच्या कानीं आली. तिच्या दासीला पक्ष्यांची भाषा येत असे.

"कोंबडा काय म्हणतो," या मालकिणीने केलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना दासी म्हणाली की, "तो म्हणतो की, तुम्ही आपल्या पतीला फसवीत आहांत!"

त्यावर मालकीण म्हणाली, "त्याला मारून टाक ताबडतोब!"

तो कोंबडा मारला गेला.

पण लगेच दुसऱ्या कोंबडयाने बांग दिली. मालकिणीने पुन्हा तोच प्रश्न केला. त्यावर दासी उत्तरली, "तो म्हणतो आहे की, माझा मित्र खरें बोलल्यामुळे मारला गेला. मीहि सत्यभाषणासाठी बळी जावयास तयार आहें."

"मग त्यालाहि मारून टाक," मालकीण म्हणाली.

दुसरा कोंबडाहि मारला गेला.

त्यानंतर तिसऱ्या कोंबडयाने बांग दिली. "आता हा काय म्हणतो?" मालकिणीने विचारलें?

तो म्हणतो, "जगावयाचें असेल तर डोळयांनी सर्व पाहा, कानानी सर्व ऐका, पण तोंडाने बोलू मात्र नका!"

" वा, वा ! त्याला मारूं नका. उलट त्याच्या आज्ञांचें पालन करीत जा. "

असा आहे हा दिल्लींतला प्रकार !

*

संसदेचें अर्थसंकल्पी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने चौदा बँकांच्या राष्ट्रीयीकरणाविरुद्ध निकाल दिला. उत्तर प्रदेश व विहारमध्येहि इंदिरा-काँग्रेसच्या विरुद्ध फासे पडत होते. त्यामुळे सिंडिकेट-काँग्रेसचे नेते मोठ्या खुषीत होते. पण अर्थसंकल्पी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सारे डाव उलटले गेले.

बिहार आणि उत्तर प्रदेश ह्या दोन्ही ठिकाणीं इंदिरा-काँग्रेसच्या आशीर्वादाने मंत्रिमंडळें अस्तित्वांत आलीं. त्यामुळे सिंडिकेटच्या शिडांतील हवा अधिवेशनापूर्वीच निघून गेली. उत्तर प्रदेश व विहार येथील राज्यपाल इंदिरा गांधींच्या भृकुटी-भंगावर नजर ठेवून वागतात. इंदिरा गांधी विरोधकांचीं मंत्रिमंडळें मोडीत हिंडतात, या आरोपाचा आधार संसदेंत मोर्चे बांधण्यास पुरेसा होणारा नव्हता. चरणसिंग सिंडिकेटबरोबर हातमिळवणी करीत होते तेव्हा पुण्यवान् होते व आता पापी झाले या म्हणण्यांतहि फारसें तथ्य राहिलेलें नाही.

चरणसिंग यांचा 'खुर्चीवाद' प्रबळ तर खराच ! उत्तर प्रदेशांतील त्यांच्या कार्यक्रमांचा ' एककलमी योजना ' म्हणून उल्लेख होई व तें एकुलतें एक कलम, स्वतःला मुख्य मंत्र्यांच्या खुर्चीवर चढवणें हें असे. पण चन्द्रभानु गुप्त यांचा 'सत्तावाद' चरणसिंगांच्या 'खुर्चीवादा'वरहि मात करणारा होता व म्हणूनच चन्द्रभानु गुप्त यांना ' सुपर मिनिस्टर ' मानून त्यांच्या छायेखाली ' चीफ मिनिस्टर ' म्हणन वागण्यास चरणसिंग तयार झाले नाहीत. अय्यर समितीने भ्रष्टाचाराचा शिक्का-मोर्तब केलेले बिहारचे भूतपूर्व काँग्रेसमंत्री अधिक संख्येने आज सिंडिकेटकडेच झुकलेले आहेत, हें कसें विसरून चालेल ?

उत्तर प्रदेश-बिहार-प्रकरणीं फुगवलेले फुगे असे फुटले असले तरी रेल्वे-अर्थ-संकल्पाच्या निमित्ताने विरोधी पक्षाला पुन्हा एकत्र बांधून इंदिरा-सरकारला शह देणें सिंडिकेटला शक्य होणार आहे. नव्या रेल्वे-मंत्र्यांनी सोडलेल्या शिदोरींत भाकरीऐवजीं दगडच निघाले व ते दगड जेव्हा संसदेंत त्यांच्यावर भिरकावले जातील तेव्हा ते सोसण्याची तयारी नंदांना करावयाची आहे. वातानुकूल व पहिल्या वर्गाचे रेल्वे-दरच केवळ वाढलेले नाही, तर उपनगरी गाड्यांतील तिसऱ्या वर्गाचें गाड्यांचे व मालवाहतुकीचे दरहि वाढले आहेत. रेल्वे-बोर्डाच्या गैरकारभारामुळे इंदिरा गांधींच्या समाजवादी सरकारकडून लोकांना प्राप्त झालेली ही देणगी आहे ! देशांतील दरवाढीच्या घातचक्राला हा रेल्वे-अर्थसंकल्प पुन्हा गति देईल. संसदेंत ही रेल्वे-दरवाढ निभावून नेणें रेल्वेमंत्र्यांना अशक्य आहे. म्हणून तिसऱ्या वर्गाच्या व उपनगरी गाड्यांच्या दरवाढीबावत त्यांना माघार घ्यावी लागेल असें वाटतें.

*

[illegible]

येथील महाराष्ट्रीय खासदारांचीं मनें ग्रासलीं आहेत तीं सीमातंट्याच्या बाबतीमध्ये इंदिराजींनी सुचविलेल्या तोडग्यामुळे. इंदिरा गांधी यांच्या योजनेनुसार लोहमार्गाच्या दक्षिणेकडील बेळगाव आणि खानापूर तालुक्यांतील २३३ गावें, हल्ल्याळ तालुका आणि बिदर जिल्ह्यांतील संतपूर, भालकी आणि हुमणाबाद हे तालुके महाराष्ट्राला देण्यांत येणार आहेत. म्हणजे महाजन-मंडळाने महाराष्ट्राला २६४ गावें देऊं केलीं होतीं, त्याऐवजीं ४९७ गावें मिळणार आहेत. त्याचबरोबर म्हैसूरला २५५ गावें द्यावयाचीं आहेत. बेळगाव शहराबाबत इंदिरा गांधी यांनी फाळणी सुचविली असून, त्यानुसार या शहराचा एकतृतीयांश भाग महाराष्ट्रांत येणार आहे. त्याचप्रमाणे निपाणी शहर आणि निपाणी व चिकोडी तालुक्यांतील चाळीस गावें महाराष्ट्रांत घालण्याची महाजन-मंडळाची शिफारस इंदिरा गांधी यांनी मान्य केली आहे.

बेळगाव शहराच्या फाळणीची ही योजना 'अत्यंत गुप्त' म्हणून आज पुढे आली असली, तरी ती बरीच जुनी आहे. एका ठिकाणीं भोजनाच्या प्रसंगीं त्याबाबतचा पुरावाहि पंजाबचे मुख्य मंत्री श्री. गुरुनामसिंग यांच्या तोंडून ऐकावयास मिळाला. ते म्हणाले, "बेळगावच्या फाळणीला नकळत पाठिंबा मिळावा म्हणून चंडीगढवरहि फाळणी लादण्याचा डाव खेळला जात होता. पण तो आम्ही उधळला." श्री. यशवंत-राव चव्हाणांच्या गृहमंत्रालयाने सीमातंटा सोडविण्यासाठी ज्या चार योजना तयार केल्या, त्यांतील विशेष निवड झालेली ही फाळणीची योजना.

मागे एकदा बॅ. नाथ पै यांच्याशी बोलतांना अगदी गंभीरपणें गृहमंत्रालयाच्या एका चिटणीसाने "पटवर्धनांचा जुना संस्थानी मुलूख, मराठी ऐतिहासिक मुलूख मानून महाराष्ट्राला दिला म्हणजे प्रश्न सुटेल का?" असें अगदी भाबडेपणाचा आव आणून विचारलें होतें. जेव्हा रेल्वेमार्गालगत बेळगावची फाळणी सुचविल्याची वार्ता मध्यवर्ती सभागृहांत पोचली तेव्हा बॅ. नाथ पै यांच्या पोटांत शंकेचा जो गोळा उठला तो यामुळेच. ती दुष्ट शंका खासदार एस्. एम्. जोशी, बॅ. नाथ पै व जयंतराव टिळक हे वसंतराव नाईक व वसंतरावदादा पाटील यांना भेटावयास गेले तेव्हा खरी ठरली. यशवंतराव, वसंतरावदादा किंवा वसंतराव नाईक या कोणालाच ही गंभीर घटना घडत असतां इतर पक्षांच्या पुढाऱ्यांना बोलावून विचारविनिमय करावा असें वाटलें नाही. कावेरी नदीच्या पाण्याच्या प्रकरणी तामिळनाडूचे मुख्य मंत्री करुणानिधी सर्व पक्षांचें शिष्टमंडळ घेऊन महामंत्र्यांना भेटतात, पण बेळगाव व सीमाप्रश्न ज्या लोकांनी आजवर सातत्याने लढविला त्या एस्. एम्. जोशी, नाथ पै, टिळक, डांगे, मधु लिमये यांना ते दिल्लीत असतांनाहि महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांना विचारविनिमया-साठी बोलवावेसें वाटलें नाही. बेळगावची पोटतिडीक म्हणून तेच अनाहूतपणें जाऊन त्यांना भेटले. महाराष्ट्रीय कॉंग्रेस-नेते विरोधीपक्षीयांना बोलावतील तरी कसें?

महाजन-मंडळाचा निर्णयहि जेथे ते मानावयास तयार होते तेथे त्याहून अधिक थोडें पदरीं पडलें, तर ही मंडळी तें पवित्रच मानणार !

महाजन-मंडळाचा अन्यायी निर्णय उडविला तो याच समितीवाल्यांच्या कोल्हापूर परिषदेने व सांगलीच्या काँग्रेस-अधिवेशनाला त्यांनी केलेल्या विरोधाने. आता कांही पुन्हा जमवावें आणि तेथे हे समितीवाले तत्त्वाचा झेंडा घेऊन दाखल झाले म्हणजे पुन्हा बिघडणार ! महाराष्ट्र काँग्रेसचें नेतृत्व असें मोठें व्यवहारचतुर आहे. सीमाप्रश्न जिवंत ठेवणें म्हणजे विरोधकांच्या हातांत जळतें कोलित कायम राखणें हे त्यांच्या मनीं पक्कें रुजलें आहे.

सीमातंट्याबाबतचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचा दृष्टिकोन हा असा आहे !

सीमाप्रश्न पाटसकर-तत्त्वानुसार सोडविला जावा हें खरें. महाजन-मंडळाचा निर्णय त्या दृष्टिकोनांतून एकतर्फी व अन्याय्य आहे, हेंहि आता म्हटलेंच आहे; पण तत्त्वाचा हट्ट धरला तर प्रश्न थिजतो (फ्रिज्) व तो अधिक काळ थिजला की मराठी सीमाभागाचें कानडीकरण अधिक होऊन तो बिकट होतो.

म्हणून तत्त्वाधाराची भाषा बोलत, पण 'अग अग म्हशी . . ' करीत देवाण-घेवाणीने अधिकांत अधिक मराठी मुलूख पदरीं पाडून घ्यावा अशी चलाख विचार-सरणी काँग्रेस-नेत्यांच्या मनीं प्रबल आहे. तत्त्वाधारे सीमाप्रश्न सोडवावा व बेळगावची फाळणी कदापि होऊं देऊं नये, असें जोशी-टिळक-पै ही त्रयी कितीहि सांगत असली तरी महाराष्ट्राचें नेतृत्व देवाणघेवाणीवर प्रश्न सोडविण्यास नकाराचा खोटा आव आणून अखेरीस तयार होणार, हें अगदी स्पष्ट आहे.

ही देवाणघेवाण म्हणजे शेवटीं बेळगावची फाळणी. आज महाराष्ट्राच्या वांट्याला तीस टक्के भाग आला असेल, तर तो आणखी ओढाताण करून दहा-पंधरा टक्क्यांनी वाढेल व त्यावर शिक्कामोर्तब करण्याचा प्रयत्न होईल, यांत मला तरी शंका नाही.

सध्या महाजन-मंडळाच्या निकालाने बेळगावांतील व सीमा भागांतील जनता नाउमेद झालेलीच आहे. त्यांतील सुंठणकरांसारखे कांही नेते, रेल्वेवर नव्हे, पण कोल्हापूर-बंगलोर या राजपथाच्या आधारे बेळगाव शहर महाराष्ट्रांत दाखल झाल्यास फाळणीला तयार आहेत. संपूर्ण महाराष्ट्र समिति अकार्यक्षम बनली आहे. शिवसेनेच्या पट्ट्याची साखळी वसंतदादा व वसंतराव यांच्या हाती आहे. तेव्हा हीच वेळ आहे की, हा प्रश्न कमी जास्त करून कायमचा निकालीं काढावा, असें महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यांना वाटत असलें, तर चुकलें कोठे ? याला राजकीय परिस्थितीहि अनुकूल आहे. कारण निजलिंगप्पा किंवा वीरेन्द्र पाटील यांचें कांहीच सोयरसुतक आज इंदिराबाईंना नाही. अर्थात् याचा फायदा उठविण्याचीहि अक्कल हवी !

अशा स्थितीत बहुतांशी बेळगाव शहर या देवाण-घेवाणीत जाईल. क्वचित् पांच-दहा कोटि रुपये भरपाई देऊन व राजपथावर फाळणी करून तें मिळवावयाचें,

तर बेळगाव महाराष्ट्रांत घालण्याबद्दल विरोधीपक्षीयांचें सांगणें एकमुखी हवें. चंडीगढसारखें बेळगाव महाराष्ट्रांत घालण्याबाबत विरोधीपक्षीयांचें एकमुखी सांगणें न झालें तर विरोधी पक्षांतील महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या डोक्यावर त्या अपयशाचें गाडगें फोडण्याचीहि यशवंतराव-वसंतराव यांना संधि मिळणार आहे.

बेळगाव शहर म्हैसूरमध्ये ठेवलें तर तेथील मराठी-भाषकांना मिळणाऱ्या दुय्यम नागरिकत्वाच्या वागणुकीचा प्रश्न तसाच शिल्लक राहणार आहे. महाराष्ट्रांत सामील होण्याची त्यांची धडपड थांबणार नाही. झगडे होणार ! मग अखेरीस साधणार काय ? बेळगावची फाळणी पत्करणें म्हणजे भुकेपोटीं उष्टेंखाण्यास तयार होणें. ते उष्टें खाऊनहि पोट भरणार नाही. मात्र उष्टें खाण्याचें पाप तेवढें लागणार आहे. पाटसकरांबरोबरच पाटसकर-योजनेला महाराष्ट्राच्या काँग्रेस-नेतृत्वाकडून अग्नि दिला गेला असेंच इतिहासपुरुष लिहील.

*

आता राजधानींतील थंडी आवरत आली आहे. यामुळे फरिदाबादजवळच्या बडखल तळ्याकडे मासे पकडण्याचा षोक असलेल्या लोकांच्या मोटारी गळ-दांडया घेऊन धांवूं लागल्या आहेत. वल्लभगडच्या पलीकडील धौज तळेंहि मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे. तेथेहि गळ-दांडीचा खेळ चांगला होतो. यमुना नदीचें पाणी गढूळ आहे नुकतेच दोन पाऊस होऊन गेल्यामुळे तें निवळण्यास अजून थोडा वेळ आहे. नदींत घाण पाणी सोडल्यानेंहि मासे कमी झाले आहेत. पण कसेंहि असो, दिल्लीच्या आसपास बदकांच्या शिकारीला जाणारे षोकीन आता बंदुका ठेवून गळ-दांडी हातीं घेतील व त्यांच्या मोटारी आजुबाजूचीं तळीं जवळ करतील.

असाच एक षोकीन तरुण दिल्ली कमिशनरच्या कचेरींत परवाना मागावयास गेला. कमिशनरने विचारलें, "आपणास 'फिशिंग' करण्याचा परवाना हवा काय ?"

तो म्हणाला, छे, छे ! मी पुष्कळ वर्षें गळ टाकून माशांची वाट पाहत वेळ काढला. आता गळाला एक छानदार मासळी लागली आहे. मला हवा आहे तो विवाहाचा परवाना ! "

कमिशनरने अभिनंदनासाठी आपला हात पुढे केला.

— केसरी, दि. १ मार्च १९७०

# उघडून पाहिला हंडा तो अर्धाच मांडा

## - २६ -

नव्या औद्योगिक धोरणाच्या मागोमाग अर्थमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाचें स्वागत समाजवादी तसेंच भांडवलदार अशा दोन्ही टोकाच्या गोटांकडून झालें, हें त्यांचें विशेष यश मानलें पाहिजे.

श्री. मोरारजी देसाई यांना अर्थमंत्रिपदावरून दूर केल्यानंतर या वर्षीच्या अर्थसंकल्पाबद्दल सिंडिकेटवाद्यांकडून ज्या अनेक विचित्र वावड्या उडविल्या जात होत्या त्या साऱ्यांच्या दोऱ्या इंदिराबाईंच्या 'सेन्सिबल' अर्थसंकल्पाने कापून टाकल्या. जे लोक इंदिराबाईंचें समाजवादी धोरण तरुण तुर्कांच्या आरडाओरडीवर अकारण अजमावीत होते ते स्वाभाविकच मनी धास्तावले होते; तर इंदिराबाईंच्या आर्थिक ज्ञानाबाबत शंकातुर असलेले लोक त्यांच्या अर्थसंकल्पाकडे कुचेष्टेने पाहत होते. परंतु मी मागे एकदा लिहिल्याप्रमाणे, या देशांतील आर्थिक परिस्थितीची कोंडीच अशी झाली आहे की, आर्थिक क्षेत्रांत कोणतीहि क्रांतिकारी योजना पत्करण्यास वा जादूगिरी दाखविण्यास तेथे संधीच राहिलेली नाही. त्यामुळेच इंदिराबाईंना अर्थसंकल्पामध्ये समधातपणा स्वीकारावा लागला. समाजवादी अर्थसंकल्पाची भोळसटपणें वाट पाहणाऱ्यांची मात्र " दणाणले खवत, आला आला हंडा, उघडून पाहिला, तो अर्धाच मांडा " अशी स्थिति झाली असल्यास नवल नाही.

या अर्थसंकल्पामुळे मजुरांना यापुढे थोड्याशा निवृत्तिवेतनाची अपेक्षा करण्यास हरकत नाही. शेतकऱ्यांना आपल्या गरजा लवकर भागतील अशी आशा निर्माण झाली आहे. करांत कांही थोडी सूट मिळाल्याने मध्यमवर्गीयांना हायसें वाटलें आहे. पण त्याचबरोबर साखर, केरोसीन, चहा, पेट्रोल आदींवरील करांमुळे

भाववाढीच्या घातचक्राला तोंड देण्याचा प्रसंगहि निर्माण झाला आहे. इंदिराबाईंनी संसदीय कॉँग्रेस-पक्षाच्या बैठकींत, निर्यात केल्या जाणाऱ्या उत्तम प्रतीच्या चहावर व खुल्या बाजारांत विकल्या जाणाऱ्या साखरेवरच करवाढ केली आहे, असें जरी त्याचें कितीहि समर्थन केलें असलें, तरी पेट्रोलवरील करवाढीमुळे वाढणारे बसचे दर शहरांतील नोकरवर्गाच्या खिशांना चांगलीच चाट लावणार आहेत.

इंदिराबाईंच्या करवाढीतून गरीब वगळले आहेत हें खरें असलें, तरी त्याबरोबरच बड्या भांडवलदारांच्या खाजगी कंपन्या कां वगळल्या बरें? गरिबांबरोबर मोठ्या भांडवलदारांनाहि त्यांनी खूष ठेवलें असाच याचा अर्थ आहे. जर कोणी या अर्थसंकल्पाचे बळी झाले असतील, तर ज्यांचें उत्पन्न वार्षिक चाळीस हजारांच्या पुढे आहे व ज्यांची शहरांत बरींच घरें व चाळी आहेत असे लोक होत. इंदिराबाईंनी शहरी मालमत्तेवर मर्यादाहि संपत्ति-करांत मोठी वाढ करून अप्रत्यक्ष रीतीने घातली आहे. या संपत्ति-करांतील वाढीच्या संदर्भात हिशोब केला, तर दहा लाखांचीं घरें किंवा चाळी ठेवणें शक्य नाही. कारण त्यावर वर्षाला एकोणचाळीस हजार रुपये संपत्ति-कर द्यावा लागेल. आज या घरांचें जें उत्पन्न मिळतें तें बव्हंशीं संपत्ति-करांतच जिरेल. याचा परिणाम नवीन घरबांधणीवर होणार आहे. त्यामुळे यापुढे ती जबाबदारी राज्य-सरकारांच्या गृहनिर्माण-मंडळांना पत्करावी लागेल. त्यासाठी आयुर्विमा महामंडळाच्या गुंतवणुकींतील कांही रक्कम घरबांधणीकडे वळविल्याशिवाय, तसेंच बँकांच्या आणि क्रेडिट सोसायट्यांच्या साहाय्याने घरबांधणीचा महकारी कार्यक्रम आखल्याशिवाय गत्यंतर नाही.

गतवर्षीप्रमाणे हाहि अर्थसंकल्प तुटीचाच आहे व त्याचें कारणहि उघड आहे. शहरी उत्पन्नावरच हे सर्व अर्थसंकल्प आजवर अवलंबून राहिले व या वेळींहि हरित क्रांतीवर पुष्ट झालेल्या ग्रामीण कृषि-क्षेत्रांतील दुधाळ गाईचें दोहन करण्याचा राजकीय कारणाखातर इंदिराबाईंना धीर झालेला नाही व राज्य-सरकारांनाहि होणार नाही.

आपल्या अर्थसंकल्पांत श्रीमंतांच्या चैनींना व वाढत्या उत्पन्नांना लगाम घालणाऱ्या इंदिराजींना स्वत:च्या मंत्र्यांच्या चैनींना मात्र तातडीने लगाम घालावा असें वाटत नाही, हें विचित्र आहे. राज्यसभेंतील प्रश्नांना "मंत्र्यांनाहि मोठ्या आकाराचे बंगले अखेरीस सोडावे लागतील" असें जरी त्यांनी तोंडभरून उत्तर दिलें असलें, तरी असल्या पोकळ आश्वासनाने कोणाचेंहि समाधान होणारें नाही. मंत्र्यांचे दोन-चार एकर आवार खाणारे बाग-बंगले, त्यांच्या देखभालीसाठी ठेवला जाणारा नोकरांचा ताफा व बंगल्यांतील मूळच्या फर्निचरमध्ये भर घालण्यासाठी अडतीस हजारांपर्यंत दिली जाणारी जादा रक्कम, भरमसाट प्रवास-भत्ते, हा सारा बादशाही थाट पाहिल्यावर 'जन हो, खादी वापरा!' या जुन्या परीट-घडी पुढाऱ्यांच्या उक्तीची आठवण होणें स्वाभाविक आहे.

इंदिराजींनी जीं पांच पुरोगामी पावलें टाकावयाचीं ठरवलीं होतीं त्यांतील तीन या अर्थसंकल्पाने पुरी झालीं. चौदा बँकांच्या पुनर्राष्ट्रीयीकरणानंतर राष्ट्रपतींच्या भाषणांत संस्थानिकांचे तनखे व सवलती रद्द करण्याची घोषणा झाली व आता अर्थसंकल्पामध्ये संपत्ति-करांत मोठी वाढ करून अप्रत्यक्ष रीतीने शहरी उत्पन्नावर त्यांनी मर्यादा आणली. आता राहिला सर्वसाधारण विम्याच्या राष्ट्रीयीकरणाचा कार्यक्रम व आयात आणि घाऊक व्यापार, सरकारने हातीं घ्यावयाचा कार्यक्रम. तरी देखील निर्णय करण्यांत व त्याची अंमलबजावणी करण्यांत पित्यापेक्षा लेक सरस ठरली आहे, असेंच म्हटलें पाहिजे.

बेळगावचा प्रश्नहि सोडविण्याचा इंदिराबाई प्रयत्न करतील असें दिसतें. लोकसभेंत हनुमंतय्यांनी राष्ट्रपतीच्या भाषणावर वक्तव्य करतांना महाराष्ट्रावर जो अकारण साम्राज्यवादी वृत्तीचा आरोप केला, त्याला खासदार अनंतराव पाटील यांनी तेथल्या तेथे चपखल उत्तर देऊन परतफेड केली. पुढे श्री. एस्. एम्. जोशी यांनी लक्षवेधी सूचना मांडून विद्याचरण शक्ल यांनाहि चांगलेंच पेचांत धरलें. म्हैसूरच्या शिष्टमंडळाला इंदिराजींनी जें सांगितलें तेंच आडवळणाने श्री. शुक्ल यांनी लोकसभेंत सांगितलें. चंडीगढ-प्रकरणीं शहा-समितीचा निर्णय बाजूला ठेवल्यावर महाजन-समितीच्या निर्णयाबाबत आता सोवळेपणा पाळण्याचें कांहीच कारण नाही. दुतर्फी न्याय मिळेल अशाच रीतीने तो प्रश्न सोडविला पाहिजे. म्हैसूरच्या नेत्यांना इंदिराजींच्या या मताचा धोका चांगला समजला असल्यानेच महाजन-समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा ठेका त्यांनी धरला असून, त्यासाठी हुबळी, धारवाड, गदग आदि शहरांमध्ये दंगल माजवून जोर लावण्याचा प्रयत्न चालविला आहे. महाराष्ट्रांतील काँग्रेस-नेत्यांना आपली न्याय्य बाजू स्वतःच जिद्दीने मांडण्याचा दम नाही, म्हणून शिवसेनेच्या आधारे मुंबई बंद पडल्याचें दाखवून ते आपल्या मागणीला बळ मिळवूं पाहत आहेत. शिवसेनेचें हे कळसूत्री 'बंद' प्रकरण आता सर्वांनाच हळूहळू समजून येऊं लागलें आहे.

संयुक्त समाजवादी पक्षाचे नेते श्री. मधु लिमये यांना तर खुद्द म. प्र. काँग्रेसचे अध्यक्ष वसंतदादा पाटील यांनी या 'मुंबई बंद'च्या मागची प्रेरणा उघड रीतीने सांगितली. पण हुबळी-धारवाडची दंगल काय, वा 'मुंबई बंद' काय, धूर्त इंदिराबाईंवर त्याचा कांही परिणाम होईल, असें मानणें हें शुद्ध राजकीय अपरिपक्वतेचें लक्षण होय. दोन्हीकडील शक्ति जोखूनच त्या राजकीय निर्णय करणार असून, त्याचेच पहिलें पाऊल म्हणून त्यांनी आपली योजना गृहखात्याकडून तयार करून घेऊन म्हैसूरच्या आणि महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांपुढे सादर केली.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना आज ते इंडिकेटमध्ये आहेत म्हणून विशेष वजन आहे, असें कोणी मानू नये. त्यांच्या खुशालपणाच्या वृत्तीमुळे गंभीर राजकीय मामल्यांत सहकारी म्हणून त्यांच्यावर फारसें विश्वासतां येणार नाही, हें

इंदिराजींनी आता जोखलें आहे. त्यामुळे इंदिराजींच्या वागणुकींतहि त्यांच्याबाबत फरक पडल्याचें व त्यामुळे श्री. वसंतराव नाईक विमनस्क झाल्याचें माझ्या कानीं आलें आहे.

इंदिराजींचे इंग्लंडमधील एक वर्गमित्र त्यांना भेटावयास गेले असतांना, महाराष्ट्राच्या बाजूने वकिली करून, ते वर्गमित्र इंदिराबाईंना म्हाणाले, "म्हैसूरच्या सिंडिकेट-नेत्यांना तुम्ही सीमाप्रश्नाची संधि साधून धडा शिकवू शकाल !"

त्यावर इंदिराजी गंभीरपणें म्हणाल्या, "हो, तेंहि खरेंच! पण धडा दोघांनाहि शिकवावयास हवा आहे."

श्रीमंत शेतकऱ्यांच्या दडपणामुळे राष्ट्रपति-निवडणुकीच्या वेळीं यशवंतरावांनी घेतलेल्या भूमिकेने इंदिराजींच्या मनांत पडलेली अढी अजून उलगडलेली नाही, हेंच यावरून दिसून येतें.

मराठी सीमा-भागांपैकी कारवार व सुपा तर गेलेलाच आहे. बेळगावबाबत या शहराची फाळणी लोहमार्गाच्या आधारें करायची की, हमरस्त्यावर करायची, एवढेंच ठरावयाचें आहे. बेळगाव शहर महाराष्ट्राला देऊन म्हैसूरला तालुक्याचें नवें ठिकाण बांधण्यासाठी मोठी रक्कम द्यावी असाहि एक विचार पुढे आलेला आहे. बेळगाव हवें, तर मग महाराष्ट्र निपाणी सोडील काय, असा 'फाजिल्का निवाडा' पुढे करून हुलकावण्या दाखवीत व त्याच वेळीं दोन्हीकडील चाचपणी करीत इंदिराबाई अखेरीस बेळगावची फाळणी करून मोकळ्या होण्याचा प्रयत्न करतील व महाराष्ट्राचे कॉंग्रेस-नेते ती हताशपणें पाहत बसतील. स्वत:ची अब्रू बचावण्यासाठी मग ते "महाजन-समितीने दिलें त्यापेक्षा आम्हीं अधिक मिळविलें की नाही – सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडित:" असा युक्तिवाद सांगत, भंगलेला मातीचा डेरा 'यशोकुंभ' म्हणून मिरवीत आणणार !

बेळगावांतील मराठी जनता महाराष्ट्र कॉंग्रेसच्या या धोरणामुळे व्यथित होईल यांत शंकाच नाही.

श्रीमद्‌भागवतांत मयूरध्वज राजाची कथा आहे. रत्नपूरच्या मयूरध्वजाने अर्जुनाचा पराभव करून अश्वमेधाचा घोडा धरून नेला.

"युधिष्ठिराची अब्रू बचावण्यासाठी श्रीकृष्ण ब्राह्मण-वेषाने मयूरध्वजाकडे गेला व त्याला म्हणाला, "राजा, माझ्या एकुलत्या एक पुत्राला सिंहाने धरलें आहे." सिंह म्हणतो, "महाराज, मयूरध्वजनाने जर आपलें उजवें अंग मला दिलें, तर मी तुझ्या पुत्राला सोडतों. म्हणून राजा, दया कर व ब्राह्मणाला त्याच्या पुत्राची भीक घाल !"

मयूरध्वजाने ब्राह्मणाला अभय दिलें व तो ईश्वराचें नांव घेत दोन खांबांच्या मध्ये जाऊन बसला. करवत घेऊन त्याचा पुत्र ताम्रध्वज पित्याचें शरीर कापूं

लागला. जशी ताम्रध्वजाची करवत वडिलांचें मस्तक कापूं लागली तसें मयूरध्वजाच्या डाव्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले.

यावर ब्राह्मण उद्गारला, " दु:खी अंत:करणाने दिलेलें दान मी घेत नाही."

त्यावर मयूरध्वज म्हणाला. " माझ्या डाव्या डोळ्यांतील अश्रु कापल्या जाणाऱ्या शरीराच्या वेदनेमुळे नाहीत, तर माझ्या डाव्या अंगाला हें दु:ख आहे की, दोन्ही अंगें बरोबर जन्मलीं, वाढलीं; पण डाव्या अंगाचें दुर्भाग्य हें की, तें उजव्यासारखें दानपात्र ठरलें नाही. ब्राह्मणा, यासाठी माझ्या डाव्या डोळ्यांत अश्रु तरारले."

राजकीय कुटिल नीतीमुळे दुभंगलेल्या बेळगावांतील जें अर्धांग म्हैसुरांत राहील तेथील मराठी जनतेच्या डोळ्यांतील अश्रु काय सांगतील बरें !

*

दिल्लींत आधुनिक अश्विनीकुमारांचें एक अधिवेशन नुकतेंच विज्ञानभवनामध्ये पार पडलें. विज्ञानभवन या नांवाचा विज्ञानाशी जेवढा संबंध तेवढाच 'प्लॅस्टिक सर्जरी' या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या शल्यतंत्राचा सामान्यत: 'प्लॅस्टिक'शीं संबंध आहे. जन्मत: किंवा अपघाताने होणाऱ्या कांही शारीरिक विकृति वा कुरूपता शस्त्रक्रियेने दूर करण्याचें हें शास्त्र आहे. कोणाचे नाक, कान, ओठ वेडेवांकडे, फाटलेले असतात तेथे हे अश्विनीकुमार ती कुरूपता दूर करतात. नकटें नाक चाफेकळीसारखें करून देतात. भाजल्यामुळे विद्रूप झालेला चेहरा शरीराच्या दुसऱ्या भागावरील त्वचेचा उपयोग करून सुभग केला गेल्याने त्या व्यक्तीला समाजांत वावरण्यास संकोच वाटत नाही.

सौंदर्याचा चाहता नसलेला विरळाच. त्यांतहि स्त्रियांना तर आपल्या सौंदर्याची सीमा, रामजोशींनी म्हटल्याप्रमाणे सतत ' रतिहुनि उत्तमा ' राहवी असें वाटतें —

भली ग रूपाची उतरली भटी । उरि कंचुकि घट तटतटी । टिळक लल्लाटि सुधारस घटी । पाहुनी कृशा तव कटी । हरीना कृश कटि लटपटी । अशी अनंत गुणगुर्जरी । कोण्या ग सुभगाची मदन मंजिरी ।। असें आपलें वर्णन करावें असेंच कोणाहि स्त्रीला वाटत असतें.

वयोमान झालें तरी रूपसुंदरी असावें असें वाटणाऱ्या पुरंध्रींना वक्षस्थळांची शिथिलता रुचत नाही, लोंबणारे ओठ आवडत नाहीत. आधुनिक अश्विनीकुमार आपल्या शल्यकलेने या विकृति दूर करून पुरंध्रींना यौवनाचा आभास निर्माण करण्याची संधि देत असतात.

प्राचीन वाङ्मयांतहि या शल्यतंत्राचा उल्लेख आहे. असुरांनी मारून तुकडे तुकडे करून फेकून दिलेल्या स्वत:च्या मुलाचे अवयव सांधून गौरवीतीने त्याला जिवंत केल्याचा उल्लेख आहे. हा मुलगा पुढे 'संकृति' म्हणन ओळखला जाऊं

लागला व त्याच्या वंजशांना सांकृत्यायन हें नांव पडलें. प्रकांडपंडित राहूल सांकृत्यायन हे तर सर्वांनाच माहीत आहेत.

अशा या प्लॅस्टिक सर्जन्सच्या आशियाई पॅसिफिक कॉंग्रेसच्या अधिवेशनाला अमेरिका, जर्मनी, इंग्लंड, जपान, इटली, इंडोनेशिया आदि राष्ट्रांतून नामवंत शस्त्रक्रियाविशारद आले होते. भारताचे प्रतिनिधि म्हणून कलकत्त्याचे डॉ. मुखर्जी, पुण्याचे डॉ. सुलाखे, वाराणसीचे डॉ. देशपांडे, मुंबईचे डॉ. माणिकशा, चंडीगढचे डॉ. राव, पाटण्याचे डॉ. सिंह व दिल्लीचे डॉ. गुप्त आदि सर्जन्सनी या परिषदेंत भाग घेतला होता. जर्मनी, अमेरिका, जपान आदि राष्ट्रांतून या शल्यकर्माचीं नवीं नवीं तंत्रें कशीं विकसित होत आहेत, याची माहिती या अधिवेशनांत सांगण्यांत आली.

जर्मनींतील डॉ. कोबर्ग यांनी आधुनिक गणकयंत्राच्या (कॉम्प्युटरच्या) साह्याने अगदी काटेकोर मोजमापाचे छेद कसे घेतां येतात आणि त्याचा उपयोग फाटलेले ओठ, टाळ्यांतील फट जोडण्यासाठी कुशलतेने कसा करतां येतो हें आपल्या निबंधात दाखवून, समव्यावसायिकांची प्रशंसा मिळवली.

परिषदेंतील सर्व निबंधांचा परिचय करून देणें शक्य नसलें तरी, डॉ. सुलाखे यांच्या निबंधाचा उल्लेख केला पाहिजे. व्हासेक्टोमी म्हणजे संतति-नियमनासाठी पुरुषांवर करण्यांत येणारी शस्त्रक्रिया या शस्त्रक्रियेंत तोडलेली शुक्रवाहिनी पुन्हा जोडण्याचें नवे तंत्र डॉ. सुलाखे यांनी विकसित केलें आहे. मुंबईचे कै. डॉ. फडके यांचें कार्य त्या दिशेने सुरू झालें होतें. डॉ. सुलाखे यांनी तें अधिक सोपें व सुटसुटीत केलें. या तंत्राचा परिवार-नियोजनाच्या प्रचारांत फार मोठा उपयोग होणार आहे. शस्त्रक्रियेनंतर पुन्हा अपत्यसंभव हवासा वाटला, तरी तें शक्य होणार नाही, या भीतीमुळे पुष्कळ पुरुष या शस्त्रक्रियेपासून दूर राहतात. ती भीति डॉ. सुलाखे यांच्या या नव्या तंत्रामुळे दूर होणार आहे. 'प्लॅस्टिकसर्जरी' तहि डॉ. सुलाखे यांनी उत्तम नांव मिळविलें आहे. पुण्याच्या ससून रुग्णालयांत प्लॅस्टिक शल्यकर्म विभाग सुरू होणार असून, तो आधुनिक साधनांनी सुसज्ज करण्यांत येणार आहे, असें डॉ. सुलाखे यांनी सांगितलें.

या परिषदेला जोडून दिल्लीच्या ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेसमधील प्रा. डॉ. नंदकुमार हेमराज केसवानी आणि त्यांचे सहायक डॉ. दिनेशचंद्र शर्मा यांनी भरविलेल्या चित्रप्रदर्शनाचा उल्लेखहि आवर्जून केला पाहिजे. प्राचीन भारतामध्ये वैद्यकशास्त्रांतील प्रगति कोणत्या अवस्थेपर्यंत पोचली होती याचा चित्ररूप पुरावा तेथे पाहवयास मिळत होता. सिद्धार्थाच्या जन्माचें चित्र, कुक्षि-प्रसवासंबंधीचें चित्र, अश्विनीकुमारांचें चित्र, मोहेंजोदारो, उत्खननांतील नगररचनेचें चित्र, विशेषत: सिलोनमधील पुरातत्त्व विभागाच्या संग्रहांतील कपिल-मुनींचें दुर्मिळ चित्र आदि चित्रें कोणाचेंहि मन आकर्षून घेणारीं होतीं.

आंद्रे मोराँ याने म्हटलेंच आहे की, " Science is a marvellous instrument for discovering what we can know of the real world, art is a refuge that permits us to contemplate an imaginary world. " प्लॅस्टिक सर्जरींत वैद्यकशास्त्र आणि शिल्पकला यांचा संगम पाहवयास मिळतो. कारण तिच्यामुळे जें विकृत असतें तें सुभग घडतें.

एकदा अशाच एका शस्त्रकर्म्यांच्या परिषदेंत वाद निघाला की, कोणती शस्त्रक्रिया सर्वांत अवघड आहे ? इंग्रज सर्जन म्हणाला, 'कार्डियाक सर्जरी', अमेरिकन सर्जन म्हणाला, 'ब्रेन सर्जरी', जर्मन सर्जन म्हणाला, 'प्लॅस्टिक सर्जरी.' याउलट रशियन सर्जन म्हणाला, मला सर्वांत अवघड शस्त्रक्रिया वाटते ती 'टॉन्सिलेक्टमी !' म्हणजे टॉन्सिल्स काढण्याची ! त्यावर सर्वांनी आश्चर्यचकित होऊन एकदम प्रश्न केला की, "त्यांत काय ? ती तर फारच सोपी शस्त्रक्रिया आहे. तोंड उघडावयाचें व टॉन्सिल्स काढावयाच्या !"

रशियन सर्जन गंभीरपणें म्हणाला, "रशियांत तोंड उघडणेंच तर सर्वांत अवघड आहे."

विनोदाच्या मिषाने त्याने प्रखर सत्यच सांगितलें, नाही काय ?

— केसरी, दि. ८ मार्च १९७०

# इंदिराजींचें संसदपटुत्व

## - २७ -

महाशिवरात्रीपासून दिल्लींतील हवामानांत एकदम झालेला बदल जाणवूं न लागला तरच आश्चर्य ! आता इथली गुलाबी थंडी पळाली असून, दुपारीं किंचितसा उकाडा भासूं लागला आहे. उकाडा आला की, मागोमाग माशामच्छरांचें आगमन ठरलेलेंच असतें. जनसंघाने सफाई-आंदोलन करून दिल्ली स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला असला तरी माशा-मच्छर त्याला पुरून उरले आहेत.

देशांत सर्वत्र महाशिवरात्र साजरी होते; परंतु उत्तर हिंदुस्थानांत या सणाचें महत्त्व विशेष आहे. तसें पाहिलें तर, महाराष्ट्राचें देखील खरें दैवत शिवच. बारा ज्योतिर्लिंगांपैकी बहुसंख्य ज्योतिर्लिंगें महाराष्ट्राच्या कुशींत वसलीं आहेत. पण महाशिवरात्रीला उपास करण्यापलीकडे व पुण्यासारख्या ठिकाणीं पर्वतीला जाऊन शिवदर्शन घेऊन परततांना पिकलेलीं कवठें आणण्यापलीकडे आपल्या भाविकतेची मजल जात नाही. येथे मात्र महाशिवरात्र रात्रभर भजन करीत मोठ्या समारंभाने जागवली जाते. अर्थात् शिवप्रसाद ज्याच्या त्याच्या वृत्तीनुसार ग्रहण केला जातो. कोणी भजनांत दंग होऊन सुंठवडा तोंडांत टाकण्यांत पुण्य मानील, तर कोणी भांगेचें सेवन करून शिवचरणीं लोळण घेईल. मग ती लोळण कुठे का घडेना ! नाही तरी शिव सर्वत्र आहेच. नाही कुठे ? शिवपुराणांत म्हटल्याप्रमाणे –

अहं शिव शिवश्चायं त्वं चापि शिव एक हि ।<br>
सर्वं शिवमये ब्रह्म शिवात्परं न किंचन ।।

पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचमहाभूतांबरोबर चंद्र, सूर्य, जीवात्म्याच्या अष्टमूर्ति शिवमूर्ति होत. शर्व, भव, रुद्र, उग्र, भीम, पशुपति, महादेव आणि ईशान या अष्टमूर्ति शिवरूपाच्या साक्षात्कारी मानल्या जातात. स्वाभाविकच निर्माण, भरण आणि पोषणाबरोबरच संहाराचें कार्य करणाऱ्या या भैरवापुढे सर्वजण नतमस्तक होतात. हिमालयाच्या कुशींत वसलेल्या दिल्लीला आणि उत्तर प्रदेशाला तर त्याच्या जमाताला वंदन करण्याशिवाय गत्यंतर नाही. म्हणूनच अलाहाबादच्या संगमावर महाशिवरात्रीला झुंबड उठते व सर्वत्र "बम् भोलानाथ"ची गर्जना दुमदुमून उठते.

अशा वेळीं खासदारांना तरी संसदेंत अडकून पडणें कसें मानवणार ! पंडितजी भले म्हणाले असतील की, "विकसनशील देशाला सुट्ट्या घेणें परवडत नाही." म्हणून त्यांनी खूप सुट्ट्या कमी केल्या आणि फक्त पंधरा सुट्ट्याच ठेवल्या. पण म्हणून काय झालें ! ईदला संसदेचें कामकाज बंद राहतें; मग महाशिवरात्रीला कां नको, हा जनसंघीयांचा प्रश्न रास्तच मानला पाहिजे व तो तसा मानला जाऊन सुट्टी दिलीहि गेली. वेळ वाया जात असला तरी, सुट्टीला विरोध करणार कोण ? लोकशाहींत "यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाचरणीयं, नाकरणीयं" हेंच सूत्र असतें.

भगवान् शंकर हें मोठें जहाल, कोपिष्ठ दैवत ! परंतु उत्तर प्रदेशांतील लोकांची आता खात्री झाली आहे की, शंकरजीपेक्षाहि इंदिराजी अधिक बलवान् आहेत –

इंदिराजी बलवान आप पूछो गे कैसे ? ।
दे कर शास्त्र प्रमाण तुम्हें समझाऊ ऐसे ।।

एक चंद्र भाल पर रक्खा शंकरजीने ।
'चंद्र-भानु' दोनों निगले इंदिराजीने ।।

उत्तर प्रदेशांतील चंद्रभानु गुप्त यांना नामोहरम करून आलेल्या इंदिराजींनी आपल्या कर्तृत्वाने संसदहि जिंकली आहे.

*

इंदिराबाईच्या संसदपटुत्वाची पहिली चाहूल लागली केव्हा, तर राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील टीकेला लोकसभेंत त्यांनी उत्तर दिलें तेव्हा. पूर्वीप्रमाणे तयार केलेल्या भाषणाचे कागद त्यांच्यापुढे पडले होते. परंतु त्यांतून त्या क्वचितच कांही वाचीत होत्या, चष्मा डोळ्यांवर असण्यापेक्षा बहुतेक वेळ तो हातांतच होता व प्रतिपक्षावर प्रहार करतांना त्यांच्या मुद्रेवर आत्मविश्वास प्रतीत होत होता.

माझी राज्यसभेवर निवड झाल्यापासून कालपरवापर्यंत तरी इंदिराबाईचें संसदेंतील वक्तव्य मीं जें अनुभवलें तें अडखळत, धापा टाकीत, कसें तरी टोकाला पोचणाऱ्या शब्दप्रवाहासारखें होतें. बहुतेक वेळीं त्यांच्या चिटणीसांनी तयार करून दिलेलें भाषणच त्या वाचीत. माझ्या शेजारीं बसणारे एक खासदार तर चेष्टेनें म्हणत, " She has special glasses made which permitted her to see her notes five feet away. "

पण या वेळच्या अर्थसंकल्पी अधिवेशनांतील त्यांच्या वक्तव्याने संसदपटूंच्या रांगेंतील त्यांचें मानाचें स्थान निश्चित केलें. त्यांनी जेव्हा अर्थमंत्री म्हणून नव्या वर्षाचा अर्थसंकल्प मांडला तेव्हा आपण भारतीय अर्थव्यवस्थेला नवें वळण देणारीं नवीं धोरणें सांगत आहोंत असा आत्मविश्वास त्यांच्या भाषणांत प्रकट होत होता आणि म्हणूनच त्यांच्या भाषणांत अडथळे आणणाऱ्यांना जागच्या जागीं उत्तरें देण्यास तर त्या कचरल्या नाहीतच, उलट विरोधकांचीं हत्यारें तशाच तिखट शब्दप्रहारांनी वा विनोदानें त्यांनी बोथट करून टाकलीं.

राष्ट्रपतींच्या भाषणावरील टीकेला उत्तर देतांना तर त्यांच्या वक्तृत्वाला विशेष तेज चढलें. प्रतिपक्षांच्या नेमक्या चुका हेरून त्यांच्यावर त्यांनी शब्द-प्रहार केले. जनसंघाच्या अटलबिहारींवर हल्ला चढवतांना तर त्यांनी कसलीच दयामाया बाळगली नाही. " इंदिराजींचें भारतीयीकरण ( Indianization ) केलें पाहिजे " या प्रा. बलराज मधोक यांच्या कुचाळीनें दुखावलेल्या इंदिराबाईंनी ही संधि साधून आपला आसूड उडविला व अटलबिहारींकडे बोट करून त्या म्हणाल्या, " अमेरिकेंत कांहींनी इतरांना 'अमेरिकेतर' म्हणून संबोधण्यास सुरुवात केली तर जर्मनीमध्ये हुकूमशहा हिटलरच्या काळांत इतर जर्मनांना आर्येतर ठरवलें गेलें. हीच संकुचित वृत्ति जनसंघाच्या या पुढाऱ्यांत असून, अतिरेकी राष्ट्रवादाखाली ते आपला प्रतिगामी चेहरा दडवूं पाहत आहेत. "

अटलबिहारी बाजपेयी आपल्या जागेवरून उठून इंदिराजींशीं प्रतिवाद करण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत असतांना चेहऱ्यावर निरागसतेचा भाव आणून, इंदिराजींनी त्यांना प्रश्न केला, " माझ्या म्हणण्यांत तथ्य नसेल, तर अटलबिहारी एवढे रागावले कां ? ते प्रतिवादासाठी कां उभे राहिले आहेत ? The lady protest too much, हेंच खरें. "

जनसंघाचे खासदार श्री. सोंधी यांनी " Which lady ? " असा मोठा मार्मिक प्रतिप्रश्न टाकून, बाजू उलटवण्याचा प्रयत्न केला. पण एकदा जी बाजू घसरली ती घसरलीच. ते ती सावरूं शकले नाहीत.

*

डॉ. रामसुभगसिंग यांच्यावरील हल्लाहि खूपच बोचरा व त्यांना रक्तबंबाळ करणारा होता. इंदिराजी रामसुभगसिंग यांच्याकडे वळून सरळ सरळ म्हणाल्या की, " विरोधी पक्षाच्या सन्माननीय नेत्यांकडून यापेक्षा उच्च पातळीवरील वक्तव्याची अपेक्षा होती. निदान संसदीय रीतिरिवाजांचा भंग तरी त्यांच्याकडून अपेक्षित नव्हता. "

डॉ. रामसुभगसिंग यांच्यावर त्यांनी धरलेली जी धार काळजापर्यंत कापीत गेली ती इंदिराजींच्या पुढील शब्दांनी – " Dr. Ramsubhagsingh's speech was short of vision, short of perspective, short of facts and short of temper. " इंदिराजींच्या या माऱ्याने पुढच्या बाकावर बसलेले मोरारजी व रंगा हेहि हादरून गेले.

चर्चिल यांनी चेंबर्लेनला नामोहरम करतांना ज्या शब्दपंक्ति वापरल्या होत्या त्यांची मला या प्रसंगाने आठवण झाली. चर्चिल म्हणाले होते –" They are decided only to be undecided, resolved to be irresolute, adamant for drift, all powerful for impotence. "

आणि खरोखरीच सिंडिकेट काँग्रेसच्या पुढाऱ्यांचें अवसान हळूहळू सुटूं लागलें आहे. इंदिराजींच्या अर्थसंकल्पाचा विचार करण्यासाठी भरलेल्या सिंडिकेट काँग्रसच्या संसदीय पक्षाच्या बैठकींत अर्थसंकल्पावरील चर्चेऐवजीं एकमेकांची उणींदुणीं काढण्यावरच भर होता. लोकसभेमध्ये सिंडिकेटच्या सदुसष्ट सभासदांपैकी नेहमी उपस्थित असतात अवघे चोवीस-पंचवीसजण. स्वाभाविकच इंडिकेट काँग्रेसला इतर विरोधी पक्षांच्या साहाय्याने पेचांत धरणें 'सिंडिकेट'ला अशक्य झालें आहे. केंद्रसरकारच्या नोकरांना हंगामी पगारवाढ देण्याबाबतची अटलबिहारींची उपसूचना लोकसभेंत संमत करून घेणें अशक्य नव्हतें. परंतु ती उपसूचना अवघ्या पंचेचाळीस मतांनी पराभूत झाली परंतु सिंडिकेटचें सर्व सभासद उपस्थित राहिले असते, तर ती संमत होऊन सत्ताधारी काँग्रेसला चांगलाच धक्का देतां आला असता. सिंडिकेटच्या एका सभासदाने तर स्वच्छच सांगून टाकलें की सिंडिकेटचें पुढारीपण आपला ढिलेपणा सोडूं इच्छित नसेल, तर कालांतराने एक एक करीत बहुतेकजण पक्ष सोडून जातील.

श्रीमती सुचेता कृपलानी तर फारच रागावल्या होत्या. संसदेचें अधिवेशन चालू असतांना सिंडिकेटचे पुढारी देशभर भटकत राहतात हें योग्य नव्हे असें त्यांनी बजावलें आहे. श्रीमती कृपलानींच्या डोळ्यापुढे दोन महिने देशभर दौरा करीत हिंडणाऱ्या श्रीमती तारकेश्वरी सिन्हांची मूर्ति उभी राहिली असावी. श्रीमती यशोदा रेड्डी, मनुभाई पटेल, श्री. कौल या साऱ्यांनीच श्रीमती कृपलानीना साथ दिली. या एकेरीचा इत्यर्थ हाच की, सिंडिकेट काँग्रेसची नौका करकरूं लागली असून फटीतून आंत पाणी शिरत आहे. इंदिराजीची मार्गक्रमणा अशीच यशाकडून

यशाकडे होत राहिली, तर सिंडिकेटचें उरलेलें पुढारीपणहि जनमानसोतून दूर फेकलें जाऊन बरेचजण इंडिकेटमध्ये दाखल होतील. हें भविष्य आज जरी अकालीं वाटत असलें, तरी तें सांगण्यास मला मुळीच हरकत वाटत नाही.

*

सीमेच्या प्रश्नाची दिल्लींतील प्रगति जाणण्याची उत्सुकता महाराष्ट्रांत असणें स्वाभाविक आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीचे सारे पुढारी येथे गोळा झाले आहेत. आणि ते दररोज एका ना एका केंद्रीय मंत्र्याला वा खासदाराला भेटत आहेत, आपली बाजू मांडीत आहेत, आपल्यावरील अन्याय कळवळून सांगत आहेत. हे नेते राष्ट्रपतींना भेटले, काँग्रेसच्या अध्यक्षांना भेटले, महामंत्र्यांना भेटले. काँग्रेसश्रेष्ठ त्यांच्याशीं बोलतात सहानुभूतीने, पण स्पष्ट आश्वासन देत नाहीत. इंदिराजी तर या कलेंत मोठ्या तरबेज आहेत. सध्या येथे चर्चा चालू आहे ती सारी बेळगावच्या आंसाभोवतीं गिरक्या घेत. सुपा-कारवारची भाषाच ऐकूं येत नाही. बिचारे आमदार कदम त्यामुळे सुन्न झाले आहेत.

एस्. एम्. जोशी यांच्याजवळ बोलतांना जगजीवनबाबूहि हळूच म्हणाले, "सुपा-कारवार आमच्या विचारांतच आलें नाही. आम्ही सारे बेळगावचा प्रश्न कसा सोडवावा या पेचांत गुंतलों आहोंत."

श्री. के. सी. पंत तर असें म्हणाले की, "प्रश्न तत्त्वाने सोडवण्याच्या भाषेला आता अर्थ नाही. सुरुवातीला सोडवला असतां, तर तें अवघड नव्हतें. आता फक्त अधिकांत अधिक दान कसें पदरीं पाडून घेतां येईल या दृष्टीने मनाची तयारी केली पाहिजे."

श्री. के. सी. पंत बोलत असतांना माझ्या मनांत आलें की, या पंतजीच्या पिताजींनीच "थंडा करके खाओ!" या धोरणापोटीं सीमाप्रश्न कुजवला. पण सध्या तरी तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करणें भाग आहे. आज कोणालाच दुखवतां येत नाही.

यशवंतरावांनीहि एकीकरण समितीच्या नेत्यांजवळ खुलेपणाने कबुली दिल्याचें ऐकलें की, "हा प्रश्न तत्त्वाधारे सुटेल असें वाटत नाही. देवाणघेवाणीत अधिकाधिक पदरीं पाडून घेणेंच शहाणपणाचें ठरेल."

एकंदरींत, तत्त्वाची भाषा फोल ठरली असून, देवाणघेवाणीसाठी प्रचारी शक्ति वापरण्याचें कार्य नशिबीं आलें आहे. त्यासाठी विरोधी पुढा यांचा कौल मिळवण्याचा प्रयत्न नाथ पै, एस्. एम्. जोशी, मधु लिमये, जयंतराव टिळक आदि नेते करीत आहेत, तर अनंतराव पाटील आदि सदस्य काँग्रेसवाल्यांना समजावीत हिंडत आहेत. यामुळे संसदीय लॉबी महाराष्ट्राला अनुकूल होईल असें वाटतें.

इंदिराबाई मात्र दोन्हीं पारडी सारखी राखूं पाहत आहेत. महाराष्ट्राचें पारडें जड होऊं लागलें की, म्हैसूरच्या पारड्यांत त्या पासंग टाकतात. शिक्षणमंत्री व्ही. के. आर. व्ही. राव यांना महाजन मंडळाचा शिफारशींचा आकस्मिक आलेला उमाळा हें असेंच 'पासंग' होय. राव यांचा म्हैसूरशीं संबंध बादरायणच ! एक कर्नाटकी खासदार उद्वेगानें मला म्हणाले, "राव कुठले म्हैसुरी ! ते आंध्रचे, राहिले दिल्लींत आणि म्हैसूरच्या मांडीवर दत्तक बसून संसदेंत दाखल झाले."

व्ही. के. आर. व्ही. राव यांचा, महाजन मंडळाचा व कर्नाटकाच्या नुकसानी-बद्दलचा उमाळा पाहून, मला कै. भाऊसाहेब मोडक यांनी सांगितलेली गोष्ट आठवली.

येसू आणि केसू हे दोन शेतकरी बाजाराला निघाले. गावाच्या शिवेवर दोघांनी एक विहीर पाहून शिदोऱ्या सोडल्या. विहिरीच्या पाण्यावर पोसलेलें जोंधळ्याचें शेत वाऱ्यावर डुलत होतें. कणसें भरलीं होतीं.

येसूने केसूला विचारलें, "केसू, हा जोंधळा किती भरेल रे ! मला वाटतें दहा मण सहज होईल !"

केसू म्हणाला, "छे, कुठला दहा मण ? पांच मण भरला म्हणजे मोप झालं !"

येसू रागावला. तो केसूच्या अंगावर धांवून गेला. दोघांची चांगलीच जुंपली. केसूने येसूला आडवा घालून मातींत लोळवला.

मातींत पाठ घोळली जात असतां येसू म्हणतो, "केसू रे केसू, पाठ घासली तर घासूं ! पण पांच मणांचें नुकसान कुठवर सोसूं ?"

म्हणजे शेत तिसऱ्याचें आणि आपलेंच जणू नुकसान होत आहे, अशा थाटांत ते वेडे भांडत होते आणि येसू नुकसानीबद्दल ठणठणत होता.

व्ही. के. आर. व्ही. रावांचें असेंच नाही काय ! वाद म्हैसूर आणि महाराष्ट्र यांच्या दरम्यानचा आणि आंध्रचे श्री. राव महाजन मंडळाचा हवाला देऊन ओरडत उठले आहेत. रावांचा बोलविता धनी कोण आहे, हें सर्वांना माहिती आहे. दोन्ही पारडीं सारखीं ठेवून दोघांनाहि धडा शिकवावयाचा आहे ना !

*

राज्यसभेंतील वातावरण सध्या निरुत्साही आहे. बऱ्याच सभासदांची मुदत या अधिवेशनाअखेर संपत आहे. लोकसभेसारखी राज्यसभा संपूर्ण बरखास्त होत नाही. राज्यसभेंतील एकतृतीयांश सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात आणि त्यांच्या जागीं नवे सदस्य येतात. हा बदल या अंदाजपत्रकी अधिवेशनाच्या अखेरीस म्हणजे एप्रिलमध्ये होणार आहे व या बदलामुळे सत्ताधारी इंडिकेटच्या सभासद-संख्येंतहि मोठी घट होणार आहे. २४० सभासदांच्या राज्यसभेंत दुफळीपूर्वी

काँग्रेसची संख्या १४४ होती. त्यांतून सिंडिकेटवादी अडतीसजण फुटून विरोधी बांकावर बसूं लागल्याने आता ती एकशेसहा झाली आहे. म्हणजे आजच २८ मतांनी सत्ताधारी काँग्रेस अल्पसंख्य झाली आहे. तरीहि द्र. मु. क., स्वतंत्र, अकाली व प्रसंगीं उजवे कम्युनिस्ट यांच्या साहाय्याने अडचणीच्या वेळीं ती तरून जाते. परंतु या संख्येंतहि दहा ते पंधरा सभासदांची घट होण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

सिंडिकेटची सत्ता म्हैसूर व गुजरातवर आहे, तर बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब, व पश्चिम बंगालमधील परिस्थितींत मध्यावधि निवडणुकीनंतर बराच बदल झाला आहे. या बदललेल्या परिस्थितीचा परिणाम हाच होणार की, इंडिकेटची सदस्यसंख्या ९०-९५ च्या आसपास होईल. त्यामुळे भावी काळांत राज्यसभेंत तरी इंदिरा-सरकारची परिस्थिति नाजूक बनणार आहे. परिणामतः राज्यसभेंतील इंडिकेटच्या प्रतोदांची अवस्था यापुढे खरोखरीच दयनीय होईल.

निवृत्त होणाऱ्या राज्यसभेच्या सभासदांत नभोवाणीचे राज्यमंत्री श्री. गुजराल (दिल्ली), आरोग्यखात्याचे राज्यमंत्री डॉ. चंद्रशेखर (तामिळनाडू) फुलराणी गुहा (प. बंगाल), श्रीमती जहानआरा जयपालसिंग (बिहार) हे उपमंत्री, तर सिंडिकेटचे सादिकअल्ली (राजस्थान), इंडिकेटचे उमाशंकर दीक्षित, स्वतंत्रांचे डाह्याभाई पटेल आणि उजव्या कम्युनिस्टांचे श्री. भूपेश गुप्त हे निवृत्त होत आहेत. महाराष्ट्रांतून अबीदअल्ली व बाबूभाई चिनॉय हे सिंडिकेटकडे झुकलेले, तर श्री. मोहन धारिया, आबासाहेब कुलकर्णी, श्री. बोबडे व वैशंपायन हे सत्ताधारी काँग्रेस-गटांतील सभासद निवृत्त होत आहेत. महाराष्ट्र विधानसभेंतील काँग्रेसची शक्ति सिंडिकेटचे दहा-बारा सदस्य वेगळे झाल्याने कांहीशी खच्ची होणार आहे. त्यामुळे या वेळीं इंडिकेट-काँग्रेसला चार जागा व विरोधकांना दोन जागा मिळतील. श्री. मोहन धारिया आदि जुन्या चारहि सभासदांना पुन्हा निवडून देण्याचें महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने ठरविलें असले, तरी सिंडिकेटचे बाबूभाई चिनॉय उभे राहिल्याने त्यांपैकी एखाद्यास डच्चू न मिळो म्हणजे झालें ! उरलेल्या दोन जागां-पैकी एक जागा प्र. स. पक्षाचे श्री. नानासाहेब गोरे यांना देण्यांत येणार आहे. आणि सहाव्या जागेवर संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या वतीने कम्युनिस्ट कार्यकर्ते श्री. श्रीनिवास सरदेसाई यांची निवड होईल असें दिसतें.

राष्ट्रपतींनी नियुक्त केलेल्या श्रीमती शकुंतलाबाई परांजपे याहि या वेळीं निवृत्त होत आहेत. त्यांचें सांसर्गिक कुष्ठरोगांच्या आणि असाध्य मानसिक विकृतींच्या निर्बीजीकरणाचें विधेयक शेवटीं चिकित्सा समितीच्या मार्गावरच अडलें आहे. त्यांचे बिनसरकारी विधेयक विचाराला आलें तें त्यांच्या निवृत्तीच्या वर्षांत व तेंहि त्यांच्या निवृत्तीपर्यंत संमत होऊं न शकल्यास शेवटीं कोणावर तरी तें दत्तक घेण्याचा प्रसंग येणार आहे. श्रीमती शकुंतलाबाई परांजपे यांनी कुटुंब-

नियोजनाच्या साक्षेपी पुरस्कर्त्या आणि इंग्रजीवर प्रभुत्व असणाऱ्या महाराष्ट्रीय खासदार म्हणून राज्यसभेंत चांगलें नांव कमावलें आहे. त्यामुळे त्यांची राज्य-सभेमध्ये उणीव निश्चितच जाणवेल.

*

सध्या एक्काहत्तरच्या शिरगणतीचें काम सर्वत्र चालू आहे. त्याबाबत एक माहितीपत्रक कंपन्यांकडे गेलें असल्याचें कळतें. त्यांत पुढीलप्रमाणे एक प्रश्न आहे – How many people do you employ, broken down by sex ?

सांगा, ही माहिती पुरविणार कोण ?

– केसरी, दि. १५ मार्च १९७०

# कुंपणावरील राजकारण पुन्हा एकदा तेजींत

## - २८ -

दिल्लींतील हवामानाच्या बदलाबाबतचा माझा अनुभव अगदी वेधशाळेच्या अंदाजासारखा फसवा ठरला. वेधशाळेने ‘आकाश स्वच्छ असेल’ असा अंदाज प्रसिद्ध केला की, त्या दिवशीं हटकून काळे मेघ आकाशांत गर्दी करतात व धुवांधार पावसाने साऱ्यांची दाणादाण उडते.

माझे एक मित्र, वेधशाळेने पर्जन्यवृष्टीचा अंदाज केला की, छत्री न घेतां अगदी निश्चयाने चांगले कपडे करून ऑफिसला जातात, तर ‘आकाश स्वच्छ राहील’ असें वाचतांच धोतर वर खोचून व रेनकोट चढवून घरापासूनच छत्री उघडून बाहेर पडतात.

दिल्लींत हळूहळू उन्हाळ्याचें आगमन जाणवूं लागल्याचें मीं लिहिलें नाही तोंच दुसऱ्या दिवशीं पावसाने दिल्लीकरांना झोडपलें. या वादळी पावसाबरोबर गारांची पखरण दिल्लीवर व आसपास झाली. सेंट्रल हॉलच्या छतांतील मध्यवर्ती खिडक्यांतून गारा आंत आल्याचें पाहून, मी संसदगृहाच्या बाहेर डोकावलें तर हिरवळीवर पांढऱ्या शुभ्र गारा जणू हरित-मखमलीवर जवाहिऱ्याने आपल्या पडशींतील हिरे ओतल्यासारख्या चमचमत होत्या. दृष्टीला सुख देणाऱ्या या गारांनी दिल्लीच्या आसपासचें पीक मात्र पार बुडवलें. दुसऱ्या दिवशीं भाजी-बाजारांतील भाजी एकदम नाहीशी झालेली दिसली. गारपिटीने कोबीच्या फुलांचे कसे तुकडे तुकडे उडाले व दिल्लीच्या आसपासच्या पंचवीस हजार एकर जमिनींतील गव्हाचें रब्बी पीक कसें जमीनदोस्त झालें याचें भाजीविक्या सरदारजी कळवळून वर्णन करीत होता. त्याच्या

अंदाजाने निदान अडीच कोटींची तरी नुकसानी झाली असून, सरकारने तूर्त वीस लाखांची तकावी मंजूर केली आहे.

दिल्लींतील परिस्थितीच आज अशी आहे की, केव्हा कोणतें संकट कोसळेल हें सांगतां येत नाही. साऱ्यांच्याच बुद्धीला भ्रम पडला आहे.

बुद्धिपर पत्थर और फसल पर ओले कहाँ ?
दिल्ली और उसके आसपास
हिंदी की घोषणा और अंग्रेजीका व्यवहार
कहाँ ?
दिल्ली और उसके आसपास
राजाओं को धक्का और इंदिराजीको उपहार
कहाँ ?
दिल्ली और उसके आसपास

अशी ही मालिका किती तरी सांगतां येईल.

दिल्लीची मोगलाई आदत अजून गलेली नाही. येथील हवामान असेंच सारखें अस्थिर व बेभरवशाचें असतें.

आता हेंच पाहा ना !

*

इंदिराजींनी समधात अर्थसंकल्प सादर करून विरोधकांच्या शिडांतील हवाच काढून घेतल्याने संसदेंतील जोष सर्वस्वीं ओसरला आहे. पण वरवर दिसणाऱ्या या शांत आकाशांत हळूहळू काळे मेघ बाहेरून गर्दी करू पाहत आहेत. उत्तर प्रदेशांतील गुप्त यांचें मन्त्रिमंडळ गडगडवून इंदिराजी जरा दम खातात न खातात तोंच चरणसिंगांविरुद्ध अविश्वासाचा ठराव उभा राहिला आहे. काश्मीरमधील सादिक व मीर कासिम यांच्यांतील भांडण जगजीवनराम-इंदिराजी यांनी मध्यस्थी केल्यामुळे शमलें असें मध्यंतरीं वाटलें होतें; परंतु तें पुन्हा उफाळलें असून काश्मीर विधानसभेंतील कॉंग्रेसच्या साठ आमदारांपैकी पस्तीसजण सादिक-मन्त्रिमंडळांत विरुद्ध तक्रार करण्यासाठी दिल्लीला आले होते. बक्षी गुलाम महंमद यांच्याभोवतीं सेंट्रल हॉलमध्ये जमलेल्या त्या मंडळीकडे बोट दाखवून एक खासदार म्हणाले, "हा नवा अलायन्स बरं कां ?"

बिहारहि अजून स्थिर नाही. पश्चिम बंगाल तर पेटलेलाच आहे. तेथे कांहीच सुरक्षित नाही व केव्हा काय होईल तें कोणालाच सांगतां येत नाही. बॉंबचे कारखाने निघत आहेत. चीन-पाकिस्तानांतून हत्यारें येत आहेत. मार्च १९६९ ते जानेवारी १९७० पर्यंतच्या दहा-अकरा महिन्यांत तेथे ६३६ खून पडले आहेत. चक्रवर्ती राजगोपालाचारींनी म्हटल्याप्रमाणे बंगला कॉंग्रेसच्या अजय

मुखर्जींना त्यांच्या सहनशीलतेबद्दल व चिकाटीबद्दल खरोखरीच नोबेल पारितोषिक द्यावयास हवें ! पश्चिम बंगालमध्ये गुंडांचें थैमान शेवटीं इतकें असह्य झालें की, अजय मुखर्जींची ऐतिहासिक चिकाटी शेवटीं भंगली आणि त्यांनी आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा राज्यपालांना सादर केला. आता तेथे राष्ट्रपतींची राजवट जारी करण्यांत आलेली आहे.

ओरिसा आणि गुजरात येथील मंत्रिमंडळें किती काळ टिकतील याचें भविष्य वर्तविणेंहि अवघडच आहे. तेथील मंत्रिमंडळें गडगडविण्याचे मनसुबे खुद्द 'इंडिकेट'-कडूनच रचले जात आहेत. राज्यसभेंतील स्वतंत्र पक्षाचे पुढारी श्री. लोकनाथ मिश्र यांनी ओरिसांतील सिंगदेव मंत्रिमंडळाच्या स्थैर्याचा कितीहि हवाला दिला असला, तरी प्रगति-दलाचे आठ आमदार फुटल्याने त्यांचें संयुक्त बहुमत धोक्यांत आल्याचें लपून राहिलेलें नाही. गुजरातचे मुख्य मंत्री श्री. हितेंद्र देसाई यांनी तर, स्वतंत्रांच्या साहाय्याने समाजवादी इंडिकेट गुजरातचें मंत्रिमंडळ कोसळवूं पाहत असल्याचा उघड आरोप केला आहे.

एकूण राजकीय हिशोब शेवटीं हाच होतो की, काश्मीरपासून केरळपर्यंत मधले कांही टापू सोडले तर सर्वत्र अस्थिरता नांदत असून कोणाची, केव्हा, कोणाशीं शय्यासोबत होऊन कट शिजेल हें सांगणें कठीण झालें आहे. येथे निष्ठा रातोरात बदलत आहेत.

इंदिराजींच्या मर्जींतील एका गुजराती मंत्र्यांकडे एक खासदार गेले असतां दरवाजांत बांधलेली कुत्री त्यांच्यावर भोऽभोऽ करीत धांवून आली. कुत्रीला नीट वळण न लावल्याबद्दल खासदारांनी मंत्रिमहाशयांजवळ नाराजी व्यक्त केली. त्यावर मंत्रिमहाशय कसनुसें हास्य चेहऱ्यावर आणून म्हणाले, "आदमीकी सोहबतका असर है यह. ती नुकतीच व्यायली आहे व आपल्या पिलांना ती शिकवीत आहे. सकाळीं मी उठतांच ती शेपूट हलवत माझ्या पायांत घोटाळते. नोकराला तिला दूध-रोटी घालण्यास सांगितलें की, ती कुई कुई करून कृतज्ञता व्यक्त करते. दरवाज्यांत कोणी भिकारी आला की, ती त्याच्या अंगावर धावून जाते. आपल्यासारखा पुढारी आला की ती भुंकते. तिला वाटतें की, आपल्या स्वार्थांत वांटेकरी आला. तिची पिलें तिला विचारतात, "तूं असें कां वागतेस ?" तेव्हा ती म्हणते की, "इतकीं वर्ष मी दिल्लींतील पुढाऱ्यांच्या सहवासांत राहिलें आहें ना ! त्यामुळे त्यांच्या सवयी मला लागल्या !"

स्वार्थ हाच राजकीय जीवनाचा अशा रीतीने स्थायीभाव बनला असेल, तर इंदिराजींच्या पडशींतील भाकरी तरी वांटायला कितीशा पुरतील व त्या तुकड्यावर किती काळ कोंबड्या झुंजत ठेवतां येतील ? त्यामुळे देशांतील अस्थिर राजकीय परिस्थिति नष्ट करण्यासाठी मध्यावधि निवडणुकीचा पर्याय पुन्हा बोलला जाऊं लागला आहे. आज बहुतेक राज्यें मध्यावधि निवडणुकीला तयार होत आहेत. पण इंदिराजी

कोणता काळ स्वत:ला अनुकूल ठरेल हें अंदाजून त्याप्रमाणें निवडणुका घेतील. विरोधक फुटले असल्याने व सिंडिकेट काँग्रेसची नौकाहि करकरूं लागल्याने आज तरी इंदिराजींना संसदेंत कोणी पराजित करूं शकत नाही. त्यामुळे सिंडिकेटचे दिवाळखोर पुढारी नेस्तनाबूद करून बाकी साऱ्यांना आपल्या छत्राखाली आणण्याचा डाव इंदिराजी खेळतील असें दिसतें.

या अर्थसंकल्पी अधिवेशनानंतरचें त्यांचें राजकारण प्रामुख्याने त्या मार्गाने चालेल. दिनेशसिंगांची वा तरुण तुर्कांची गरज त्यांच्यालेखीं आता संपली आहे. कामराज-मिश्र याच्यांतील बोलणीं महत्त्व पावलीं आहेत. यशवंतरावांचे मोहरे आता पुन्हा पटावर येईल. कारण सिंडिकेट-इंडिकेट अशा दोन्हीकडचे संबंध ते अजून राखून आहेत. डलेसच्या 'ब्रिकमनशिप'प्रमाणे प्रसिद्ध पावलेलें यशवंतरावांचें 'कुंपणावरील राजकारण' भावी काळांत पुन्हा महत्त्व पावणार, अशी चिन्हें दिसत आहेत.

सेंट्रल हॉलमध्ये जा, किंवा यशवंतरावांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या श्री. अण्णासाहेब शिंदे यांच्याकडील अल्पोपाहाराला जा, अभ्राच्छादित वातावरणांत दोन-दोन, चार-चारजण कोपऱ्यांत कुजबुजतांना दिसतात. वातावरणांतील मोकळेपणा नष्ट झाला असून, तें गटबाजीने पछाडलें असल्यासारखें भासतें. सीमाप्रश्नाने त्यांत आणखी भर घातली आहे. मी व नाथ पै असेच त्या दिवशीं व्हरांड्यांत बेळगावच्या भवितव्याची चर्चा करीत बसलों होतों. तिकडून श्री. के. के. शहा आले व दुरूनच श्री. नाथ पैंनी त्यांना कानाला पीळ भरून खुणेचा शब्द सुनावला. ते जवळ येऊं लागतांच पलीकडे उभे असलेले गंगाशरण सिन्हा श्री. शहा यांना अडवून म्हणाले, "भोजाने कालिदासाला तो दरबारांत येतांच 'यावें यावें मूर्खराज!' म्हणून संबोधिलें. त्यावर कालिदास म्हणाला, "खादन् न गच्छामि, हसन् न जल्पे, गतं न शोचामि कृतं न मन्ये ।। द्वयोस्तृतियो न भवामि राजन् । किंकारणं भोज भवामि मूर्खः ।" जेथे दोन माणसें बोलत बसलीं असतील तेथे तिसऱ्याने जाऊं नये असा संकेत आहे. टिळक आणि पै बोलत आहेत. तेव्हा आपण त्यांना मोकळेपणा देणें हितकारक नव्हे काय? म्हणजे मूर्खपणा आपल्याला तरी चिकटणार नाही.

मी आणि नाथ पै बोलत होतों, इंदिराजींनी त्यांना दिलेल्या शब्दाबाबत – सीमाप्र-श्नाच्या सोडवणुकीसाठी तत्त्वें निश्चित करण्यासाठी बोलावलेल्या सर्वपक्षीय पुढाऱ्यांच्या पहिल्या बैठकीनंतर १० मे १९६८ ला इंदिराजींनी खासदार नाथ पै यांना लिहिलें होतें –

It has not so far been possible to convene the second meeting with the leaders of various parties to go into your proposal of exploring the possiblity of a national consensus on the criteria for resolving border disputes.

ही कबुली देऊन त्या पुढे लिहितात –

Incidentally, my impression was that your original proposal related to possible general criteria for resolving inter-state border disputes in general and not any particular border question.

त्यानंतर २७ नोव्हेंबर १९६९ च्या पत्रांत त्या पुन्हा आश्वासन देतात –

I hope it will not be long now before we can decide this question.

आणि आता सर्वपक्षीय तत्त्वनिश्चिति सोयीची नाही असें दिसतांच सर्वपक्षीय पुढाऱ्यांची बैठक तर त्यांनी टाळलीच, पण सर्वत्र एक समान तत्त्व लावणें सीमा-प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने इष्ट नसल्याची भाषा त्या बोलत आहेत व त्यांचीच री त्यांचे टाळकरी ओढीत आहेत.

इंदिराजींना व महाराष्ट्राच्या काँग्रेस-पुढाऱ्यांना पुन्हा तत्त्वाच्या पातळीवर आणावयाचें असेल, तर त्यांचाच पेच त्यांच्या गळयांत अडकविणें जरूर होतें.

श्री. वसंतराव नाईक आणि यशवंतराव यांनी मोठया संभावितपणें सांगितलें की, महाराष्ट्रांतील विरोधकांनी दिल्लींतील विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांना तत्त्व-निश्चितीसाठी तयार करावें. विरोधी पक्षांच्या गळयांत आपल्या पापाचें घोंगडें अडकवण्याचा त्यांचा हा बेमालूम डाव होता.

पण श्री. उद्धवराव पाटील, श्री. कृष्णराव धुळूप, श्री. बापूसाहेब काळदाते यांनी श्री. नाथ पै, श्री. एस्. एम. जोशी आणि श्री. टिळक यांच्या साहाय्याने खेडें हें घटक, भौगोलिक सलगता व सापेक्ष भाषिक बहुसंख्या या तत्त्वांवर सीमाप्रश्न सोडवावा व त्यासाठी संसदेला विश्वासांत घ्यावें या पत्रावर हिरेन मुखर्जी (कम्युनिस्ट), उमानाथ (कम्युनिस्ट मार्क्सिस्ट), हेम बारुआ (प्र. स.), प्रकाशवीर शास्त्री (भा. क्रां. द.), पितांबरदास (जनसंघ), किंकरसिंग (अकाली), चिरंजित यादव (इं. काँग्रेस) प्रभृतींच्या स्वाक्षऱ्या मिळवल्या आहेत. स्वतंत्र व द्र. मु. क.नेहि आपला पाठिंबा देण्याचें मान्य केलें आहे. खोब्रागडे (रि.) यांनीहि स्वतंत्र पत्र पाठवून आपली मान्यता कळवली आहे.

त्यामुळे हा पेच वसंतरावांवर उलटला असून, त्यांच्या परीक्षेची वेळ येऊन ठेपली आहे. इंदिराजींनी देशी भाषिक पत्रकारांबरोबर बोलतांना बेळगावची फाळणी हाच बेळगावचा प्रश्न सोडवण्याचा तोडगा असल्याचें सांगितलें. सिकंदराबाद आणि हैदराबाद, त्याचप्रमाणे बुडा आणि पेस्ट या जुळया शहरांचीं उदाहरणें त्यांनी आपल्या समर्थनार्थ दिलीं. इंदिराजींना त्यांच्या या मतापासून वसंतराव-यशवंतराव कसें ढळविणार आहेत ? महाजनांनी गोवें व खानापूर यांच्यांत जी मेख मारून ठेवली आहे ती कशी दुरुस्त करणार आहेत ? काळी नदीच्या टोकावरील हल्ल्याळमधील कांही गावें दिल्याने महाराष्ट्राची सीमा तिला भिडणार आहे, पण

बहुसंख्य मराठी भाषिकांचे व भौगोलिक सलगतेचें हें तत्त्व सुप्याला कां लावलें जाणार नाही? याचीं निश्चित उत्तरें यशवंतराव-वसंतरावांनी इंदिराबाईकडून मिळवलीं पाहिजेत.

विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांनी आपलें कार्य केलें. आता प्रश्न 'थंडा' होऊं न देतां व सर्वपक्षीय पुढाऱ्यांनी निश्चित केलेल्या तत्त्वाचा कस लावून तो इंदिराजींकडून सोडवून घेण्यांत महाराष्ट्र कॉंग्रेसच्या पुढारीपणाची परीक्षा लागणार आहे. मात्र इंदिराजी अजून तरी आपल्या भूमिकेवरून हललेल्या दिसत नाहीत.

श्री. उद्धवराव पाटलांनी तर इंदिराजींच्या भूमिकेला मोठी समर्पक व अर्थपूर्ण उपमा देऊन ती स्पष्ट केली. ते म्हणाले, "तुळजापूरच्या भवानीच्या दर्शनासाठी लाखो भाविक जातात. कोणी पुत्र मागतो, कोणी धन मागतो, कोणी कांता मागतो. देवी बोलत नाही, चालत नाही. ज्याचें ईप्सित साध्य होतें तो म्हणतो की, देवी पावली. ज्याचें साधत नाही तो दैवाला दोष देऊन स्वस्थ बसतो."

इंदिराजींना म्हैसूरचें शिष्टमंडळ भेटत आहे. महाराष्ट्रातर्फे आम्ही भेटलों. बाई मख्खपणें हसतात. एकहि शब्द बोलत नाहीत. देवी पावते का मारते या आंदोलित मनःस्थितींत सर्वजण तेथून परततात.

उद्धवरावांच्या उपमेचा शेवट तूर्त तरी मला एवढाच करावासा वाटतो की, हिंदु देवदेवता शक्तीला वश होत असतात. दामाजीपंतांचें कोठार सुलतानाचा राग ओढवूं नये म्हणून भरलें जातें, दुबळयांच्या मुखीं घास भरवण्यासाठी नाही. कारण जगाचा न्यायच असा आहे की –

अश्वं नैव गजं नैव व्याघ्रं नैव च नैव च ।
अजापुत्रं बलिं दद्यात् देवो दुर्बल घातकः ।।

✱

होळीचे डफ वाजूं लागले आहेत. गुबारे फेकले जाऊं लागले आहेत. फाल्गुन सुरू झाल्याचीं हीं चिन्हें आहेत. राजकारणांतहि डफबाजीला ऊत आला आहे. पण समाजाचा ताल मात्र चुकला आहे. सारे टाळकरी बनले आहेत. कंठांतून निघणारे स्वर त्यांचे स्वतःचे नाहीत. परस्परविरोधी रंगांत सारे जण स्वतःचा रंग चुकले असल्याने प्रतिवर्षीं येणारी होळी कळाहीन, रंगहीन भासूं लागली आहे.

मोंगल बादशाहीच्या काळापासून दिल्ली रंग खेळत आहे. जोधाबाईने राजस्थानी रंग अकबराच्या कारकीर्दींत भरला आणि अहमदशहा रंगीला तर आपल्या नांवाप्रमाणे या होळीच्या रंगांत आपादमस्तक डुंबला. कुरंगनयनी चपलांनी त्याला होळीच्या युद्धांत जिंकलें होतें. तेथे डफ ढाल बनली होती, तर कोमलता खड्ग्! मृदंग तोफ बनला, तर गुलाबाचे गेंद 'गोळे' बनले. या आयुधांनी झालेल्या माऱ्याने अभिमानाचा गड जिंकला गेला व अनुरागाचें साम्राज्य पसरलें.

एका कवीने याचें छान वर्णन केलें आहे –

"अब कै होरी मैं प्यारी लरिबे के सामान तै कीने ।
डफ ढाल नोलासी स्वर्ग लिए सौतिनी के गुमान सुभट राग मारि लीने ।।
मृदंग तोप, गेंद गोला गुलाल लिए ताकी आवाज सुनि गरूर गठ छीनी लीने ।
महमदसाहिके सुहरन चढो बाके हितुअनिके मुखधुन्दफेरि दीने ।। "

नाही तरी होळी हा मीलनाचा सण आहे. जोगिणीचें व्रत नव्हे. कृष्ण कन्हैयाने नयनाच्या पिचकारींत प्रेमाचा रंग भरून यमुनातटाकीं राधेचा लक्ष्यवेध केला आणि होळी साजरी केली.

रूपगर्विता राधा कृष्णाला म्हणे, "अरे, मी गोरी आणि तूं काळा. तुझ्याशीं रंग कसा जमावा, तुझ्याशीं होळी कशी खेळू रे!"

कान्हको खेले होरी जा बुज में तोरे संग ।
हम गोरी तुम जगतके सांवरे कैसे मिलेगो रंग ।।

पण तिला चपखल उत्तर मिळालें – "गौरी, सोन्याचा कस काळ्या परिसावरच लागतो बरें!"

सोने की परख कसौटी जाने तेरी परख मेरो अंग ।

असा रंगांत दंग होणारा होळीचा सण आज दिल्लींत गुलाल उधळीत हासपरिहासाची गति वाढवत साजरा होत आहे. समाजांतील अराजकामुळे हसणेंहि मुष्किल बनलें आहे. तरीहि माणसें त्या व्यंगाला हसत आहेत आणि हसण्यांत तें दुःख बुडवीत आहेत.

रंग अबीर गुलाल लिए पक्वानों के थाल लिए ।
निकल पडा नन्हे मुन्नोंकी रंग बिरंगी टोली है होली है भाई होली है ।:

असें आहे सध्या राजधानींतलें वातावरण.

– केसरी, दि. २२ मार्च १९७०

# केंद्रसत्तेला राज्यांकडून वाढतीं आव्हानें

- २९ -

राष्ट्रीय विकास मंडळाच्या नुकत्याच भरलेल्या बैठकीने पुन्हा एकदा हेंच सिद्ध केलें की, केंद्रीय सत्ता दुबळी बनली असून, राज्य-सरकारें आपलें वर्चस्व गाजवूं पाहत आहेत. तामिळनाडूचे मुख्य मंत्री श्री. करुणानिधि यांनी तर, सालेमचा पोलाद-कारखाना, तामिळनाडूला १७५ कोटींची खास मदत व दुष्काळी प्रदेशासाठी १८० कोटि रुपये, अशा आपल्या तीन मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर चौथी योजनाच उधळून लावण्याची भाषा राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकींत ऐकवली.

करुणानिधि एवढें बोलूनच थांबले नाहीत, तर ते म्हणाले की, " आता अशी वेळ आलेली आहे की, देशाच्या राज्यघटनेचा पुनर्विचार व्हावा व नव्या दृष्टिकोनांतून घटना पुनर्घटित करावी. राज्यांत व केंद्रांत आता एकच पक्ष सत्तेवर राहणार नाही. म्हणून 'समाईक' यादी सर्वस्वीं रद्द करणेंच युक्त ठरेल." श्री. करुणानिधींची ही 'घटनाभंगा'ची भाषा वेगळी असली, तरी परिणामीं ज्योति बसू किंवा नंबुद्रीपाद यांच्याच वळणावर जाणारी आहे.

करुणानिधींनी राष्ट्रीय विकास-मंडळाच्या बैठकीत खास मदतीचा पुरस्कार केला, तर महाराष्ट्रासकट नऊ राज्यांनी त्यांना विरोध केला व " राष्ट्रीय विकास-मंडळाने मान्य केलेल्या वांटप-व्यवस्थेतून निसटण्याची महामंत्र्यांची ही नृपनीति आहे, " असा स्पष्ट आरोप केला.

चौथी योजना अत्यंत अडचणीची परिस्थिति असतांहि डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी आपली अर्थतज्ञता साहाय्यास घेऊन संघटित केली. डॉ. गाडगीळ आजारपणाची अशक्तता असतांहि या बैठकीस हजर होते. प्रश्न आहे तो हा की,

राज्यांना बेहिशेबी खर्च करून केंद्रावर अधिक मदतीसाठी राजकीय दबाव आणण्याची लागलेली सवय डॉ. गाडगीळ किंवा इंदिराबाई या दोघांनाहि कशी मोडतां येणार. आजच्या अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे राष्ट्रीय विकास-मंडळाच्या बैठकीमध्ये गाडगीळ-इंदिराबाईंना काय, किंवा संसदेंत गृहमंत्री चव्हाणांना काय, तारेवरची कसरत करण्याचेच प्रसंग येत आहेत.

*

श्री. यशवंतराव चव्हाण हे तसे मुरब्बी वादपटु आहेत. संसदेंतहि न बिचकता मोजकेच, पण ठसठशीत बोलून त्यांनी आपली छाप आजवर राखली आहे. परंतु या वेळीं काश्मीर व हरयाना या दोन्ही राज्यांतील अर्थसंकल्प संमत होत असतांनाच विधानसभा बरखास्त करण्याची झालेली कारवाई व पश्चिम बंगाल-मधील राज्यपाल श्री. धवन यांची वागणूक चव्हाणांसारख्या खारावलेल्या मुत्स-द्यालाहि खासदारांना पटविणें अवघड झालें. चव्हाणांनी काश्मीर-प्रकरणीं पुन: पुन्हा राज्यपाल हा मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने वागण्यास बांधला गेला असल्याचें तुणतुणें लावलें. त्यांनी घटनेचें कलम ३५ (२) व ५३ (२) यांची चिकित्सा नाजूक हातांनी करून, काश्मीरची घटना ही केंद्रीय घटनेपेक्षा कांही कांही बाबतीत कशी वेगळी आहे, हेंहि समजून सांगण्याचा प्रयत्न केला. पण जें स्वत:लाच पटलें नव्हतें तें श्री. चव्हाण इतरांना तरी कसें पटविणार!

श्री. स. का. पाटील, श्री. मधु लिमये व श्री. नाथ पै यांनी तर असें बजावलें की, सादिक यांनी स्वत:च्या मंत्रिमंडळाच्या सुरक्षिततेसाठी तसा सल्ला राज्य-पालांना दिला; पण तसा तो स्वीकारणें म्हणजे घटनेच्या विहित तत्त्वाशीं द्रोह करणें होय. समजा, महामंत्र्यांनी, त्यांचा पक्ष संसदेंत अल्पसंख्य आहे हें जाणून, राष्ट्रपतीना संसद विसर्जित करण्याचा सल्ला दिला, तर तो राष्ट्रपति मानतील काय, या सवालाने तर यशवंतरावांनी उभा केलेला प्रतिवादाचा बुरुज त्यांच्या-वरच कोसळला.

पश्चिम बंगालच्या प्रकरणांत तर खा. मधु लिमये व नाथ पै यांनी १९६७ सालांतील प. बंगालच्या राज्यपालांच्या वागणुकीची आठवण यशवंतरावांना दिली. त्या वेळीं राज्यपाल मुख्य मंत्र्यांचा सल्ला बाजूला ठेवून वागले. तेव्हा जसा प्रसंग येईल तशी पगडी फिरवून प्रतिवाद करण्याची सवय गृहमंत्र्यांनी सोडावी हें बरें, असा ओरखडाहि विरोधकांनी काढला. हरयानाच्या वेळीं राज्यपाल मंत्रिमंडळाचा सल्ला धुडकावू शकतात, तर काश्मीर-प्रकरणी ते त्याच्या सल्ल्याला बांधून घेतात हा बोटावरील थुंकीचा खेळ राजनैतिक दृष्टीने आज 'इंडिकेट'च्या फायद्याचा असला, तरी देशाच्या हिताचा नाही. अनेक मुख्य मंत्री येतील व जातील, पण घटनेचें पावित्र्य राखले गेलें पाहिजे, हें कोणीच विसरतां कामा नये.

काश्मीरमधील सादिक मंत्रिमंडळाविरुद्धचें बंड, सैद मीर कासीम यांना प्रदेश काँग्रेसमध्ये सर्वाधिकार देऊन इंदिराजींनी तूर्त शमवलें असलें, तरी निक्सन सरकार अप्रत्यक्ष रीतीने तुर्कस्तानांतील नाटो-कराराचे शंभर रणगाडे पाकिस्तानला देणार असल्याची वार्ता काश्मीरमधील अस्वस्थ परिस्थितीचें गांभीर्य लक्षांत आणून देतें. पाकिस्तान जेथून मिळतील तेथून शस्त्रें गोळा करीत असून, या त्याच्या शस्त्र-सज्जतेचा परिणाम अखेरीस भारताला भोगावा लागणार आहे. पाकिस्तानला देऊं केलेल्या तुर्कस्तानांतील रणगाड्यांचें दान, पाणबुड्यांसाठी पाकिस्तानला देऊं केलेल्या कर्जाच्या पार्श्वभूमीवर अधिकच चिंताजनक होय.

निक्सन-सरकारहि जॉन्सन किंवा डलेस यांच्या काळाप्रमाणे पाकिस्तानला शस्त्रसाहाय्य देऊन अशियाच्या राजकारणांत निंद्य घातचक्र निर्माण करूं पाहत आहे, अशी टीका अमेरिकेचे भारतांतील भूतपूर्व वकील चेस्टर बोल्स यांनीहि केली आहे. काश्मीरमधील राजकारण हा धोका लक्षांत घेऊन कणखरपणें हाताळलें जाणें अवश्य आहे. शेख अब्दुल्लांनी आपलें 'भारतीयीकरण' झाल्याचा जो आभास मध्यंतरीं मुलाखती देऊन निर्माण केला त्याला न फसतां किंवा मीर कासीम यांच्या दडपणाला बळी न पडतां काश्मीरवरील सैनिकी पकड केंद्र-सरकारने घट्ट ठेवली पाहिजे. तरच वायव्येकडील ही सरहद्द सुरक्षीत ठेवतां येईल.

काश्मिरांतील अस्वस्थतेने जशी वायव्येकडील सरहद्द धोक्यांत येते, तशीच पश्चिम बंगालमधील अराजकाने पूर्वेकडील सरहद्दीला खिंडार पडतें. राज्यसभेंत पश्चिम बंगालच्या परिस्थितीवर जेव्हा चर्चा झाली, तेव्हाच राज्यपालांची राजवट तेथे येणार, हें सर्वांना समजून चुकलें. खासदार चतर्जी यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना यशवंतराव म्हणाले की, "सं. वि. द. च्या मंत्रिमंडळाने राजीनामा दिल्यानंतर मोठ्या गटाच्या नेत्याला बोलावून मंत्रिमंडळ बनविण्यास सांगणें घटनेच्या दृष्टीने योग्य ठरेल काय ? याबाबतचा सल्ला सिरवाई, सेटलवाड, गजेंद्रगडकर आदि नामवंत घटनातज्ज्ञांकडून आम्हीं घेतला. सर्वांनी हेंच सांगितले की, केवळ विशिष्ट पक्षाचा गट विधानसभेंत मोठा आहे एवढी गोष्ट त्याला मंत्रिमंडळ बनविण्यास सांगण्यास पुरेशी नव्हे. त्याला बहुमताचा पाठिंबा आहे की नाही, हेंहि अजमावलें पाहिजे."

यशवंतरावांनी जनसंघाचे खासदार सुंदरसिंग भंडारी यांना "शब्द हेच कांही वेळा कृति असतात" हा दिलेला टोला त्यांनी अशा रीतीने प्रात्यक्षिकाने दाखवितांच, चतर्जी, निरेन घोष आदि डावे कम्युनिस्ट सदस्य आपलें भवितव्य लगेच उमगले व त्यांनी राज्यसभा डोक्यावर घेण्याचा प्रयत्न केला. इंदिराजी व यशवंतराव यांच्या-पुढे एक सरळ प्रश्न होता की, १९६७ प्रमाणे राज्यपालांची राजवट आणण्याने कांही काळ जरी बंगालमधील अराजक थांबवतां आलें, तरी सहा महिन्यांनी होणाऱ्या निवडणुकींत जर मागीलप्रमाणे पुन्हा जनतेने डाव्या कम्युनिस्टांनाच निवडून दिलें, तर साराच खटाटोप व्यर्थ ठरतो. डावे कम्युनिस्ट आणि त्यांचे अतिरेकी बंधु नक्षल-

वादी यांना बळ मिळालें तें काँग्रेसमधील फुटीने व अतुल्यबाबूंच्या भ्रष्ट हुकूमशाहीने ! त्यांना साथ दिली गेली ती अन्य डाव्या पक्षांकडून. आता सं. वि. द. मधील बरेच पक्ष डाव्या कम्युनिस्टांच्या हेतूबद्दल साशंक झाले असून, बांगला काँग्रेस, सिंडिकेटचा गट व इंडिकेटचे श्री. सिद्धार्थशंकर रे यांचा गट पुन्हा एकत्र येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. हें गटबंधन घडविण्यासाठी व डाव्या कम्युनिस्टांच्या अत्याचारामुळे जनतेंत ते बदनाम होण्यासाठी अवश्य तो वेळ इंदिराजींना हवा होता. तसेंच घटनात्मक दृष्टीने डाव्या कम्युनिस्टांना व विरोधकांना राष्ट्रपतींची राजवट जारी करतांना वोट शिरकवण्यासहि जागा देणें इष्ट नव्हतें.

राज्यपाल श्री. धवन हे अलाहाबादचे. प्रारंभापासून साम्यवाद्यांचे सहचर म्हणून ओळखले जाणारे. स्वाभाविकच त्यांच्याबाबत बरेच समज-गैरसमज ऐकूं येतात. पण धवन यांनी ज्योति बसूंना मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारण करावें का नाही, यावर इतर पक्षांची जीं मतें मागवलीं, त्यामुळे निसटत्या पक्षांना त्यांनी जखडून घेतलें असेंच मला वाटतें. खासदार चित्त बसूंच्या प्रश्नांना यशवंतरावांनी तेव्हाच चाणाक्षपणें उत्तर दिलें होतें की, " धवन यांनी विचारणा केली असेल, पण उत्तर लिहिण्यास पक्षप्रमुख कांही बांधलेले नाहीत. " आता धवन यांना पश्चिम बंगालमध्ये कडक शासनाच्या द्वारे सुव्यवस्था लावण्याचे स्पष्टच आदेश दिले गेले आहेत.

माझी माहिती खरी असेल तर, नक्षलवादी आणि डावे कम्युनिस्ट यांना आपलें उद्दिष्ट अत्याचारी मार्गाने साध्य करणें यापुढे कठीण जाईल. म्हणूनच ज्योति बसूंना, मध्यावधि निवडणूका आपल्या संघटनेचें नीतिधैर्य नष्ट होण्याच्या आंत व्हायला हव्या आहेत. डाव्या कम्युनिस्टांच्या अत्याचारांनी कलकत्त्यांतील जनता सध्या दडपली गेली असली, तरी तें दडपण जातांच यापुढे डाव्या कम्युनिस्टांना कांही नवें चित्र दिसण्याची शक्यता आहे.

कलकत्त्यासाठी एक खास समिति ( स्पेशल सेल ) केंद्राने राज्यपालांना सल्ला देण्यासाठी निर्माण केली आहे. तसेंच श्री. के. सेन यांच्यासारख्या अनुभवी आय्. सी. एस्. अधिकाऱ्याकडे जमिनीचा जटिल प्रश्न सोपविण्यांतहि केंद्राने मोठीच मुत्सद्देगिरी दाखविली आहे. पश्चिम बंगालमधील डाव्या कम्युनिस्टांची पकड ढिली करण्यांत केंद्र-सरकार यशस्वी झालें, तर पूर्वेकडील सीमा खूपच सुरक्षित होईल.

*

राजकारणांतील मुत्सद्देगिरीबरोबरच कारभारांतील काटकसरीची अपेक्षा जनता इंदिराजींकडून करीत आहे. पण केंद्र-सरकारच्या कारभारांतील काटकसरी-बाबत श्री. कृष्ण कांत यांनी विचारलेल्या प्रश्नांना इंदिराबाईंनी उत्तरे दिलीं तीं जरा घुश्श्यांतच. तसें पाहिलें तर, मंत्र्यांचीं चार-चार एकर अवार असलेलीं

घरें काढून घेऊन त्यांना लहान घरांत कां पाठवलें जात नाही ? अलिशान परदेशी मोटारींऐवजी अँबेसेडर, फियाट या देशी बनावटीच्या मोटारी त्यांना कां दिल्या जात नाहीत ? आदि प्रश्नांत इंदिराबाईंना झोंवण्यासारखें कांही नव्हतें. पण त्यांना वाटलें, हें सर्व 'लेकी बोले सुने लागे' या पद्धतीने चालू आहे. प्रश्नांचा खरा रोख आपल्यावरच आहे. मग इंदिराबाईंच्या नाकाचा शेंडा लाल झाल्यास नवल काय ?

त्या फणकाऱ्याने म्हणाल्या, "हे प्रश्न अधिक धोरणीपणाने सोडविले पाहिजेत. केवळ प्रदर्शन करण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहूं नये. माझं घर तर लहानच आहे आणि मंत्र्यांना एकएकच परदेशी गाडी दिली आहे."

त्यावर एकाने प्रश्न विचारला की, "नुकतीच एका मंत्र्याने नवी कोरी परदेशी बनावटीची मर्सिडीज् गाडी मागवली व तिला परवानगी दिल्याचे ऐकतो, तें खरें आहे काय ?"

इंदिराबाई त्यावर उत्तरल्या की, "एका मंत्र्यांना अशी परवानगी दिली. कारण ते आजारी होते व ज्या गाडींत कमी हादरे बसतील अशा गाडींतून फिरण्यास डॉक्टरांनी त्यांना सांगितलें आहे."

या खाशा उत्तराला प्रतिप्रश्न आला तो, "अँबेसेडर, फियाट गाड्यांत 'हार्टफेल' होण्याइतके धक्के बसतात की काय, की ते आजारी मंत्र्यांना सहन करणें अशक्य व्हावें ?"

उपअर्थमंत्री श्री. प्रकाशचंद्र सेठी यांनी तर मंत्र्यांचे पगार किती कमी झाले, त्यांचा नोकरांवरील खर्च किती कमी केला गेला आहे, त्यांचा फर्निचरवरील खर्च कसा कमी केला जाणार आहे वगैरे माहिती पुरविली.

खरोखरी मंत्र्यांना मिळणारा पगार तसा अपुराच आहे ! माझ्या माहितीचे एक उपमंत्री तर सध्याच्या पगारांत भागत नाही म्हणून मंत्रिपद सोडून पुन्हा वकिलीचा व्यवसाय सुरू करावा की काय, या विचारांत होते. पण त्यांच्या चिटणिसांनी त्यांना सल्ला दिला की, जें पगारांत कमी पडतें तें दौऱ्यांत भरून काढावें, आणि आता त्यांचें व्यवस्थित चालू आहे. एवढेंच नव्हे, तर कांही एकर जमीनहि घेणें त्यांना जमलें आहे.

अशाच एका मंत्र्याला त्याच्या मुलाने प्रश्न केला, "बाबा ! तुम्हांला किती पगार मिळतो ?"

मंत्रिमहाशय म्हणाले, "कां रे लेका ! आज विशेष चौकशी करतो आहेस ? मला दर महिन्याला मिळतात अडीच हजार रुपये."

"पण बाबा, एवढें तर तुमच्या रात्रीच्या पार्टीचेंच बिल होतें. मग बाकीचा संसार कसा भागतो ?"

"तें तुला आताच कळायचं नाही. पण एका कूटकथेने समजावून सांगण्याचा प्रयत्न करतों. भावी आयुष्यांत तुला तें उपयोगी पडेल," असें म्हणून मंत्रिमहाशय गोष्ट सांगू लागले –

हें पाहा, एका राज्यांत पाण्याची टंचाई होती. त्यासाठी एक तलाव खोदण्याची योजना तेथील मंत्र्यांनी आखली. दूत परदेशीं गेले व पन्नास लाख कर्ज मिळवून परतले. तलावाचें काम सुरू झालें. पन्नास लाख खर्ची पडले. तलावाची बांधबंदिस्ती पैशाअभावी अडल्याचें कळलें. पुन्हा अधिक कर्ज मिळवलें गेलें. वीस लाख आणखी खर्ची पडले. पुढे असें कळलें की, तलावाच्या भिंतीला तडे गेले आहेत. दुरुस्तीसाठी दहा लाख रु. खर्च झाले. आजूबाजूस अधिकाऱ्यांसाठी बंगले, रस्ते, त्यांच्या बागा आदि सर्व मिळून एक कोटीचा हा प्रकल्प पुरा झाल्याचें सांगितलें गेलें.

कालांतराने ज्या देशाने तें कर्ज दिलें होतें तेथील एक तंत्रज्ञ त्या राज्याच्या दौऱ्यावर आले.

मंत्रिमहाशयांजवळ त्यांनी तलाव पाहण्याची इच्छा व्यक्त केली. मंत्रिमहाशयांनी तलाव दूर आहे, रस्ते खराब आहेत वगैरे अनेक सबबी सांगून पाहिल्या. पण ते परदेशी तंत्रज्ञ कांही ऐकेनात. शेवटीं आपल्या चिटणिसांना बोलावून त्याच्यावर तलावाकडे त्यांना नेण्याची व्यवस्था सोपवली गेली.

तंत्रज्ञ जागीं जाऊन पाहतात तो तलावच जागीं नाही. ते गोंधळले. प्रवासांतील धुळीने माखलेले ते तंत्रज्ञ मंत्रिमहाशयांना भेटून चाचरत विचारते झाले की, "तलाव आहे कोठे ? कारण ज्या जागीं गेलों तेथे तलावच नव्हता."

मंत्रिमहाशयांनी रागाने चिटणीसांना विचारलें, "असं कसं होईल ? टेंडरें दिली गेलीं, रकमा हिशेबामध्ये खर्ची पडल्या आहेत आणि तलाव नाही म्हणजे काय ?"

चिटणीस खाली मान घालून म्हणाले, "नाही खरा !"

"मग स्वस्थ काय बसलात ? जा, आत्ताच पोलिसांत जाऊन तलाव चोरीस गेल्याची तक्रार द्या !"

परदेशी तंत्रज्ञ कपाळाला हात लावून समोरच्या खुर्चीत मटकन् बसले.

मंत्रिमहाशयांनी आपल्या मुलाला ही कूट कथा सांगतांच त्याला खुदकन् हसू आलें व तो म्हणाला, "आता मला हें सारें कोडें चुटकीसरसें सुटलें."

मंत्रिमहाशयहि खूप झाले. म्हणाले, "आहेस ! माझा बेटा शोभतोस ! बापसे सवाई होणार तू !"

या कूटकथेंतील ज्या परदेशाने मदत दिली तेथील पंतप्रधानांचें नांव दिल्लीत होळीनिमित्त भरलेल्या मूर्खांच्या दरबारांतील मानकऱ्यांच्या यादीत नक्कीच घातलें गेलें असणार ! दिल्लींतील यंदाच्या या मूर्खांच्या दरबारचें अध्वर्युपद भूषविलें उपशिक्षणमंत्री भागवत झा आझादमहाशयांनी. स्वाभाविकच आहे तें. आजचे

मंत्री हे आधुनिक बादशहाच. जुन्या काळांत एकदा बादशहाने बिरबलला मूर्खांची यादी करावयाला सांगितलें. बादशहा घोड्यांचे मोठे षौकी. आदल्या दिवशींच एका सौदागराला एक लाख होन त्याची पूसतपास न करतां त्यांनी घोडे खरेदी करण्यासाठी दिल्याचें बिरबलला माहिती होतें.

बिरबलाने मूर्खांची यादी तयार केली व बादशहांच्या हातीं दिली.

यादीच्या प्रारंभीं आपलेंच नांव आहे हें पाहून बादशहा संतापले व बिरबलला त्यांनी त्याचा जाब विचारला.

बिरबल शांतपणें म्हणाला, "घोड्याचा सौदा ठरवितांना सौदागराची चौकशी आपण केलीत का ? चौकशी न करतां, तारण न घेतां, आपण एक लाख होन दिलेत. मग आपलें नांव कोठे घालावें बरें ?"

बादशहा बिरबलवर कुरघोडी करण्याच्या हेतूने म्हणाला, "पण सौदागराने घोडें आणलें तर !"

बिरबल क्षणभरहि न थांबतां उत्तरला, "मग तुमचें नांव खोडून त्याचें घालीन !"

केंद्र-सरकारच्या कारभारांतील जीप-प्रकरण, मुंदडा-प्रकरण, आयात-निर्यात परवान्यांचे गोंधळ, अनेक बांधकामांतील खोटीं टेंडरें वगैरेंची दरवर्षी सार्वजनिक हिशेब-समिति प्रसिद्ध करीत असलेली यादी पाहिली म्हणजे मूर्खांचा दरबार दररोज भरविला, तरी अपुराच पडेल असेंच कोणीहि म्हणेल.

*

चांदणी चौकांतील टाऊन हॉलपुढे दिल्लीचे पितामह स्वामी श्रद्धानंद यांचा पूर्णाकृति पुतळा उभा केला गेला असून, त्याचें उद्घाटन राष्ट्रपतीच्या शुभ हस्तें उद्या करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणे स्वामीजींचें छायाचित्र असलेलें टपालाचें तिकीटहि काढण्यांत येणार आहे.

स्वामी श्रद्धानंदांच्या पुतळ्यासाठी निवडलेली ही जागा केंद्र-सरकारांतील कांही मुस्लिम-धार्जिण्यांना खुपली व तेथे पुतळा उभारण्यास अजून केंद्र-सरकारने परवानगी दिलेली नाही आदि वार्ता प्रवक्त्यामार्फत दिल्लीच्या वृत्तपत्रांतून प्रसृत करण्यांत आल्या. पण दिल्ली महानगरपालिकेंतील जनसंघाची सत्ताधारी मंडळी केंद्र-सरकारला या बाबतींत पुरून उरली व त्यांनी "केंद्र-सरकारची परवानगी घेण्याचा प्रश्नच या प्रकरणीं उत्पन्न होत नाही" असें स्पष्ट सांगून टाकलें. स्वामी श्रद्धानंदांच्या पुतळ्याची जागा १९६७ सालींच निश्चित करण्यांत आली होती व त्या वेळीं केंद्र-सरकारची 'स्मारक-समिति' निर्माणहि झालेली नव्हती.

स्वामी श्रद्धानंदांनी नाना मतांच्या, पंथांच्या, स्वार्थमूलक मतभेदांनी विस्कळीत झालेल्या हिंदु समाजाला संघटित करण्याचा प्रयत्न आपल्या आयुष्यभर केला.

हजारो हिंदूंच्या गळतीस स्वामीजींनी आपल्या शुद्धिकार्याने बांध घातला. या शुद्धि-कार्यांतच आर्यपथिक लेखाराम यांचा १८६७ मध्ये खून झाला. नंतर २३ डिसेंबर १९२६ रोजीं स्वतः स्वामी श्रद्धानंद यांचा अब्दुल रशीद या जातीय माथेफिरूच्या गोळीस बळी पडला. स्वामीजींच्या निर्भय शुद्धिकार्याने हजारो मौलवींना आपलें कार्य सोडून चडफडत बसावें लागलें होतें. स्वामीजींनी आग्ऱ्यानजीकच्या मलकानी मुसल-मानांचीं गावेंच्या गावें एकामागून एक शुद्ध केलीं. त्यांनी स्थापन केलेल्या सभेने अडीच ते तीन लाख मलकाना रजपुतांना शुद्ध केलें. शुद्धिकार्याचा हा जोर माथे-फिरूंना सहन झाला नाही व खून करण्याची धमकी त्यांना दिली जाऊं लागली. ख्वाजा हसन निजामीच्या 'दरवेश'मध्येहि इशारे प्रसिद्ध झाले. परंतु स्वामीजी अशा धमक्यांना थोडेंच घाबरणार होते ? त्यांचें मुळी ध्येयवाक्यच होतें "अद्यैव वा मरणमस्तु युगन्तरे वा । न्यायात्पथ प्रविचलन्ति पदं न धीरा ।। "

अखेरीस नको तेंच घडलें ! अब्दुल रशीद स्वामीजींच्या मृत्यूचें 'साधन' बनला.

निर्भीडतेची मूर्ति, स्वाभिमानाची तळपती तेग, राष्ट्रीयत्वाची ज्योति व हिंदु संस्कृतीचे पूजक अशा स्वामीजींचें दिल्लींत उशिरा का होईना, पण उभारलें गेलेलें हें स्मारक दिल्लीकरांना सतत न्यायपथावर मार्गक्रमण करण्याची प्रेरणा देईल अशी आपण आशा करूं या !

**— केसरी, दि. २९ मार्च १९७०**

# राज्यसभेच्या निवडणुकीने 'इंडिकेट'ला धक्का

- ३० -

मध्यान्हकाळच्या रणरणत्या उन्हांत भिंगरीप्रमाणे अवचित उठणारी धुळींचीं वादळें, यंदाचा दिल्लींतील उन्हाळा असह्य ठरणार असें भाकीत सांगत आहेत. समोरच्या अंगणांत तरूंच्या फांद्यांवरून हळुवार घसरत येणाऱ्या पानांची पखरण झालेली दिसत आहे. आपल्या निष्पर्ण फांद्या नभीं खुपसून आकाशाला ते तरु ओरखडे काढीत असल्यासारखे मला भासतात. या धुमसत्या दुपारीं माझीं कर्णपुटें केवळ कोण सुखावीत असेल, तर मागील दारीं मोहरलेल्या आम्रवृक्षावरून —

कोकिळा जेव्हा स्वरांची माळते सुमनावली ।
तेधवा वणवा म्हणे मी चंदनाची सावली ।।

गेल्या महिन्यापर्यंत लोकरीच्या काळ्या कपड्यांत 'कावळे' बनून दिल्लीकर वावरत होते. आता ते पांढऱ्या शुभ्र बुश्शर्टांतील 'बगळे' बनले आहेत. सायंकाळीं अंगावर एखादी तरी शीतवायूची झुळूक पडेल या आशेने हिंडणाऱ्या दिल्लीकरांना आकाशाचा वेध घेणारीं कारंजीं, त्यांवर किरणांनी किमया करून इंद्रचाप बनवल्याने आता विशेष मोह घालतात. त्या सहस्रधारी कारंजांच्या कुशींत हिरवळीवर लोळत, सांजवाऱ्यावर स्वार होऊन येणारे जलतुषार अंगावर घेण्याइतकें सुख दुसरें कोणतेंच नाही.

दिल्लींतील उन्हाळ्याप्रमाणे राजकारणहि भावी काळांत तापतच जाणार आहे. राज्यसभेच्या द्विवार्षिक निवडणुकीने इंडिकेटला बराच धक्का दिला आहे. दोनशेचाळीस सभासदांच्या या सभागृहांत इंडिकेटची आता अवघे एकोणनव्वद सभासद पाठराखणी करणार आहेत. तामिळनाडूमध्ये सुब्रह्मण्यम्, महाराष्ट्रांत

वैशंपायन, ओरिसांत नारायण पात्रा व आंध्रमध्ये आदिनारायण रेड्डी यांचा पराभव इंडिकेटला आपल्या संघटनेचा पुनर्विचार करण्यास लावणारा आहे. डॉ. चंद्रशेखर, श्रीमती जहानआरा जयपाल व श्रीमती फुलरेणू गुहा या तीन मंत्र्यांनी निवडणूक लढविलेलीच नाही. विरोधी पक्षांपैकी जनसंघीयांची संख्या पांचांनी वाढली, तर डाव्या कम्युनिस्टांची तीननी वाढली. विरोधी पक्षांपैकी भूपेश गुप्त (कम्युनिस्ट), डाह्याभाई पटेल (स्वतंत्र) आणि मुल्क गोविंद रेड्डी (प्र. स.) हे पुन्हा निवडून आल्याने राज्यसभेंतील जिवंतपणा कायम राहणार आहे, तर भार्गव, वैशंपायन-प्रभृतीच्या पराभवाने राज्यकर्त्या पक्षाची बाजू अधिकच लंगडी झाली आहे.

श्री. वैशंपायन यांच्या पराभवाची हळहळ तर साऱ्यांनाच वाटली. श्री. ना. ग. गोरे यांना दिलेलीं वीस व फुटलेली बावीस अशीं बेचाळीस मतें इंडिकेट काँग्रेसच्या हाती असतांना वैशंपायन पडले याचें विशेष दुःख वाटलें. वैशंपायन यांचा सज्जनपणा त्याना भोवला. त्यांच्या वांट्याला दिलेले जिल्हे व देखरेखीसाठी शिवराम-राजे भोसले यांची झालेली नियुक्ति म्हणजे चोराच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या, असाच प्रकार होता. स्वाभाविकच जें घडावयाचें तें घडलें आणि एका सज्जन, त्यागी व निष्ठावान् कार्यकर्त्याचा बाबूभाईंच्या ‘ मनी पर्स ’ने बळी घेतला.

इंडिकेटला राज्यसभेच्या निडवणुकींत मिळालेल्या धक्क्यामुळे श्री. सुब्रह्मण्यम् यांच्या राजकीय भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालें आहे. त्याचप्रमाणे ओरिसांतील विनयकुमार महंतीची निवड व नारायण पात्रांचा पराभव पटनाईक यांची ओरिसांतील शक्ति व्यक्त करीत असले, तरी या सर्वांपेक्षा पंजाब व उत्तर-प्रदेश या दोन राज्यांत नवीन संकटें निर्माण केल्याशिवाय राहणार नाही. पंजाब-मध्ये तर त्यांचें प्रसादचिन्ह लगेचच दिसलें. भूपेंद्रसिह संतोखसिंहांना पराभूत करून निवडून येतांच गुरुनामसिंहांचे मंत्रिमंडळ गडगडले. मास्टर तारासिंग व संत फत्तेसिंह या दोघांचे दोन स्वतंत्र गट अकाली दलांत एकमेकांविरुद्ध कारवाया करण्यांत सतत रंगलेले असतात. ते दोन्ही गट एकत्र आणून व जनसंघाशीं हात-मिळवणी करून गुरुनामसिंहांनी पंजाबला एक स्थिर सरकार प्राप्त करून दिलें होतें.

मास्टर तारासिंगांच्या गटांतील कार्यकर्त्यांस राज्यसभेचें तिकीट मिळूं नये हा संत फत्तेसिंहांच्या गटाचा आग्रह होता. अकाली दलाच्या संसदीय मंडळाचे अध्यक्ष भूपेंद्रसिंह हे आंतून मास्टरजीच्या गटाचे, मुख्य मंत्री गुरुनामसिंहांचा त्यांना पाठिंबा मिळतांच ते यशस्वी झाले हें पाहून, संत फत्तेसिंहांनी अर्थमंत्री बलवंतसिंह यांना अर्थसंकल्प मांडण्यास मना केलें व मुख्य मंत्र्यांनी तो माडतांच त्यांचा पराभव केला गेला. जनसंघाच्या सल्ल्याने गुरुनामसिंहांचे मंत्रिमंडळ पाडलें गेलें. इंडिकेटने गुरुनामसिंहांचें मंत्रिमंडळ वांचविण्यासाठी खूपच धडपड केली. संरक्षणमंत्री स्वर्णसिंह लगोल्ग चंडीगढला धांवले. इंडिकेट काँग्रेस, गुरुनामसिंह ह्यांचा अकाली गट व उजवे कम्युनिस्ट या सर्वांना एकत्र आणण्याची खटपट झाली; पण गुरु-

नामसिंहांना वांचविणें कोणालाच शक्य झालें नाही. प्रकाशसिंह बादल यांच्या नेतृत्वाखाली पंजाबचे नवें मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें व टिकलें ही इंडिकेटला पंजाबमध्ये मिळालेली चपराकच होय.

उत्तर प्रदेशांतहि फाटाफुटीचा व पैशाचा वापर इतका झाला की, इंदिराजींचे विश्वासू सहकारी उमाशंकर दीक्षितहि आठव्या फेरींत निवडून आले. इंडिकेट व भा. क्रां. द. यांच्यांत पांचास एक असें उमेदवारांचें प्रमाण ठरलें होतें. परंतु त्या वचनास तर कोणीच चिकटून राहिलें नाही. उलट सर्व तऱ्हेची फाटाफूटच मतदानांत दिसली. याचा अर्थ हाच घ्यावयाचा की, चरणसिंगांचें उत्तर प्रदेशांतील मंत्रिमंडळ ज्या इंडिकेट व भा. क्रां. द. यांच्या युतीवर अवलंबून आहे ती अजून ठिसूळ आहे.

*

समुद्रमंथनांत रत्नावरोबर विषहि बाहेर आलं. कॉंग्रेसच्या दुफळीमुळे भारतीय राजकारणहि असेंच ढवळून-घुसळून निघतें आहे. त्यांतून भारतीय जनतेचीं उद्धारकर्तीं कोणतीं रत्नें बाहेर पडतील तीं पडोत; पण तूर्त तरी भ्रष्टाचाराचें विष मात्र बाहेर पडत आहे. थोर थोर नेत्यांचें चारित्र्य धुळीला मिळत आहे. जगजीवनरामांचा विसराळूपणा, निर्जलिंगप्पांच्या जावयाची परदेशांतील नेमणूक, मोरारजींचें कांति-प्रकरण, ओरिसांतील मंत्र्यांचा अपहार व नुकतेच जॉर्ज फर्नांडिस यांनी लोकसभेंत उभें केलेलें पाटील-प्रकरण हें सारें अशाच प्रकारचें विष होय. मुंबईंतील चोरट्या व्यापाराचे एक दादा व स. का. पाटील यांचा एकत्र फोटो व कांही कागदपत्रें उंचावून फर्नांडिस व मधू लिमये यांनी चौकशीची मागणी केली होती. परंतु या अशा बड्या मंडळींची प्रकरणें अशींच जिरतात. तें विष पचविलें जातें.

सत्पुरुषों का चरित अलौकिक लोग बुरा बतलाते हैं ।
क्योंकि उनका कार्य हेतु ही समझ नहीं वे पाते हैं ।।

खरेंच आहे तें. सामान्यांना चंद्रमौळी घरांतून येणारा चांदण्यांचा कवडसा भांड्यांत पडल्याने दुधासारखा भासून जेथे फसण्याचा प्रसंग येतो तेथे त्यांना पाटील-निर्जलिंगप्पा-मोरारजी यांच्या 'सद्‌हेतूचें' आकलन कोठून होणार बरें !

आढ्याचें पाणी सहजच वळचणीला येतें व भ्रष्टाचार सर्वत्र मुरू लागतो. सी. बी. आय्. च्या तपासाचा त्रैमासिक वृत्तान्त नुकताच हातीं आला आहे. एकोणतीस सरकारी नोकर व बावन्न इतर व्यापारी यांच्यावर भ्रष्टाचारापायीं खटले भरले गेले. चार लक्ष एकवीस हजार रुपये दंड वसूल झाला. तीन वर्षेपर्यंत शिक्षा ठोठावल्या गेल्या. कोणी रेल्वे-वाघिणींत चोऱ्या केल्या होत्या, कोणी रेल्वेला

कमी दर्जाचा माल देऊन फसविलें होतें, कोणी लाच घेतली होती. सर्वत्र हेंच मुरलें आहे.

राज्यसभेंत श्री. मोहन धारियांनी असाच एक सवाल टाकला. आयुर्विमा महामंडळाच्या भूतपूर्व अध्यक्षांची व्होल्टाज कंपनींत कार्यकारी उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक म्हणून सात हजार रुपये पगारावर २६ मार्च १९७० पासून नेमणूक केली गेली आहे म्हणे. अर्थात् ती केंद्र-सरकारच्या मान्यतेवर व अध्यक्षांनी ती पत्करण्यावर अवलंबून आहे. आयुर्विमा महामंडळाने व्होल्टाजचे सत्तावीस टक्के शेअर्स खरीदलेले आहेत. मोठचा भांडवलदारांच्या कारखान्यांतील ही सरकारी गुंतवणूक व सेवानिवृत्त सरकारी अधिकाऱ्यांना त्या भांडवलदारांकडून दिल्या जाणाऱ्या मोठचा पगाराच्या नोकऱ्या जें कांही सुचवितें तें स्पष्ट करण्याची गरज आहे काय ?

*

राज्याराज्यांतील या अस्थिर परिस्थितीचा व भ्रष्ट कारभाराचा फायदा भारताच्या शत्रूंनी घेतला तर आश्चर्य मानण्याचें कारण नाही. देशांतील कायदा व व्यवस्था एकदा खिळखिळी झाली की, कोपरानेहि तो देश खणतां येतो. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निघाला की, इंदिराजी तोंड बंद करून बसतात व यशवंतरावांची परीक्षा पाहतात. जनसंघाचे खासदार श्री. कन्वरलाल गुप्ता यांनी भारतांतील पाकिस्तान्यांची संख्या विचारली असतां गृहमंत्री म्हणाले, “पंजाब, राजस्थान, जम्मू-काश्मीर व बिहार येथील आकडेवारी आपल्याजवळ नाही, पण मोठचा संख्येने ते या सीमा-भागांमध्ये आहेत हें खरें.

ऑक्टोबर १९६९ ची आकडेवारी असें सांगतें की, सीमेलगतचीं वरील चार राज्यें सोडलीं तरी ३०७४९ पाकिस्तानी भारतांत इतरत्र नांदत आहेत. त्यांपैकी ११०४५ हे त्यांच्या परवान्याची मुदत संपल्यावरहि राहत आहेत व त्यांपैकी २५०० भूमिगत असून त्यांचा पत्ता लागत नाही.

पाकिस्तानी हेरगिरीचें मोठें बोधक उदाहरण नुकतेंच संसदेंत सांगण्यांत आलें. सुलताना नांवाच्या एका सुंदर मुस्लिम महिलेला हुसेनीवाला या सीमा-प्रदेशांत २० मार्चला अटक करण्यांत आली. दोन आठवडचांपूर्वी ती भारतांत आली. तिचा परवाना मुंबई-भेटीचा होता. परंतु तेथे ती गेलीच नाही. गेली ती जम्मू-काश्मीरमध्ये. फिरोझपूरला तिने फोनवरून सैन्यांतील एका लेफ्टनंटशीं संपर्क साधला आणि तो तिला स्कूटरवरून घेऊन गेल्याने पोलिसांना संशय आला. हेरगिरीचें हे आणखी एक प्रकरण म्हणजे सिंधूंत बिंदु आहे झालें.

भारत है निधर्मी धर्मशाला। आवो जावो घर तुम्हारा।।

दिल्लींत कॅनॉट प्लेसमधील पुस्तकाच्या दुकानांत तर दर पंधरवडचाने चीनच्या दूतावासांतील राजनैतिक अधिकारी न चुकतां जातात. त्यांच्या राखी

पोषाखावरील लाल तारे उठून दिसतात. त्यांच्या मंगोलियन चेहऱ्यावर हास्य असतें. पण तरीहि या माओवादी चिन्यांना पाहून असें वाटतें की, न जाणो एकदम हात वर करून ते किंचाळावयाचे, " माओ झिंदाबाद. "

त्यांची घारीची नजर शोधते ती भारतीय राजकारणाचे, युद्धशास्त्राचे, इतिहास-भूगोलाचे ग्रंथ. गेल्या आठवड्यांत त्यांनी निवडलेलीं पुस्तकें – " इंडियाज स्ट्रॅटेजिक स्पेक्ट्रम (रवी कौल), जिऑग्राफी ऑफ् वेस्ट बेंगाल (नॅशनल बुक ट्रस्ट), क्रायसिस इन् काँग्रेस (एम्. एस्. रहमान), स्लेंडर वॉज् दि थ्रेड (लेफ्ट. ज. सेन). ही यादी वाचल्यावर अधिक भाष्याची गरज आहे काय ?

*

हें असें, देशप्रेमी व्यक्तींचें काळीज थरकावणारें, मी सांगूं लागलों की कांही-जण म्हणतात, " तुम्ही आम्हांला 'एप्रिल फूल' बनवतां काय ? आपलें इतकें कसें शत्रूकडे दुर्लक्ष होईल ? पाकिस्तान्यांना आणि चिन्यांना आपण हेरगिरीसाठी साऱ्या दिशा मोकळ्या का सोडल्या आहेत ? "

पण एक एप्रिललाच नव्हे, तर साऱ्या वर्षभर भारतीय जनतेला नेत्यांकडून या ना त्या घोषणाद्वारे 'एप्रिल फूल' बनविलें जातें, नाही का ? प्रत्यक्षांत काय आहे तेंच मी सांगत आहें.

गेल्या बुधवारीं येथे मोठा गमतीचा प्रकार घडला. अनेक खासदारांच्या घरांतील फोन खणखणूं लागले. खासदारांनी फोन उचलून विचारलें, " कोण बोलतंय् ? "

दुसऱ्या बाजूने सांगण्यांत आलें, " इंदिराजींनी आपल्याला ताबडतोब बोलावलंय्. महत्त्वाचं काम आहे. "

प्रत्येकाला वाटलें की, बहुधा आपल्याला मंत्रिमंडळांत घेण्यांत येणार आहे; त्यासाठीच निरोप आला असावा. म्हणून जो तो लगबगीने इंदिराजींच्या निवास-स्थानी जाऊन पोचला. पण त्या वेळी इंदिराजी घरीच नव्हत्या.

तेव्हा कोठे या खासदारांना कळलें की, आपण 'एप्रिल फूल' झालेले आहोत.

खासदारांनंतर पत्रकारांवरहि हा प्रयोग करण्यांत आला. प्रत्येक वृत्तपत्राला कळविण्यांत आलें – " नागरी मालमत्तेवर कमाल नियंत्रण जारी करण्याबाबतची महत्त्वाची घोषणा इंदिरा गांधी आज करणार आहेत. "

लागलीच संपादकांनी आपल्या वार्ताहरांना इंदिरा गांधीच्या निवासस्थानी पिटाळलें. तेथून बाहेर पडणारे खासदार वार्ताहरांना हसत हसत म्हणाले, " भाईसाहब, आज एप्रिलकी पहली तवारीख है ? "

एका मूर्खाने दुसऱ्याला शहाणे करण्याचा प्रयत्न करावा यापरता दुसरा विनोद कोणता ! पण तोहि एप्रिल फूलचाच प्रताप म्हटला पाहिजे.

**– केसरी, दि. ५ एप्रिल १९७०**

# 'सिंडिकेट'च्या वर्तनाने भरपूर करमणूक

## - ३१ -

संसदेचे चालू अधिवेशन हें पावसाळी अधिवेशन म्हणून ओळखलें जातें. परंतु पहिला पंधरवडा तरी पावसाने ताण दिल्याने हें अधिवेशन केवळ नांवाचेंच पावसाळी ठरलें. आता कोठे पावसाच्या सरी अधूनमधून पडूं लागल्या आहेत. पाऊस नव्हता तेव्हा बाहेर जावें तर डोक्यावरील रखरखीत सूर्य अंग भाजून काढी व घरांत बसावें तर अंगांतून घामाच्या धारा वाहत. आता अभ्राच्छादित आकाश एक प्रकारचें सावट मनावर आणीत आहे. पावसाच्या थंडगार सरी अंगावर घेतलेली सुस्नात निसर्गकन्या रसरशीत व तजेलदार बनली आहे. हिरव्या रंगाच्या छटा तरी किती विविध ! पिवळट झाक असलेल्या पोपटी रंगापासून निळी झाक मारणाऱ्या मोरपिशी रंगापर्यंत ही रंगावलि कोणाचेंहि नेत्र आकर्षून घेईल. पण अभ्रखंडाने त्या रंगावलीत तेज ओतणाऱ्या सूर्यनारायणाला झाकल्याने साऱ्या वातावरणावर एक काळी सावट पडल्यासारखें भासत आहे.

राजकारणावरहि ही सावट पडली आहे. इंदिराजींच्या गतिमानतेशीं साथ करण्याची ताकद नसलेल्यांना त्यांच्या हातीं देश सुरक्षित नाही असें वाटत आहे. वेगाने निघालेला हा राष्ट्रगाडा वाटेंतील खाचखळगे ओलांडतांना आंस तुटून कोलमडेल अशी त्यांना भीति वाटते. त्यांना हा वेगच सहन होत नाही.

पहिल्या पंधरवड्यांत संसद-सभागृहांतील चर्चेचा विषय स्वाभाविकच होता 'ग्रँड अलायन्स !' पण हा 'ग्रँड अलायन्स'चा फुगा लोकसभा भरण्यापूर्वीच फुटला. इंदिरा गांधींनी म्हटल्याप्रमाणे 'हंपी-डंपी'ची ही हातमिळवणी तर हास्यास्पद ठरलीच, पण 'शॅडो कॅबिनेट'ची शॅडोहि – सावली – राहिली नाही. स्वाभाविकच

अविश्वासाच्या ठरावाला इंदिराजींनी तोंड दिलें तें आत्मविश्वासानें. शिवाय सिंडिकेटने स्वत:ला हास्यास्पद करून घेतल्याने करमणूकहि खूप झाली. लोकसभेंत अविश्वासाच्या ठरावावर झालेल्या राजनैतिक आतषबाजींत खाशी टर उडविणारें कोणाचें भाषण झालें असेल, तर तें खासदार श्री. अ. डांगे यांचें. अविश्वासाच्या ठरावांतील एक मुद्दा होता केरळमधील निवडणुका हा. सिंडिकेट-स्वतंत्र-जनसंघा-बरोबर इंदिराजींच्या विरोधांत या वेळीं डावे कम्युनिस्टहि उभे ठाकले होते व केरळच्या निवडणुका लांबवाव्यात अशी त्यांची मागणी होती. पश्चिम वंगालच्या निवडणुका तावडतोब घेतल्या जाव्यात म्हणून आंदोलन करणारे डावे कम्युनिस्ट केरळमध्ये मात्र निवडणुका लांबविण्याची मागणी करीत होते. डाव्या कम्युनिस्टांच्या या परस्परविरोधी वागणुकीची डांगे यांनी खूपच थट्टा केली.

इंदिराजींच्या हातीं सारी सत्ता एकवटली जात असल्याचा रामसुभग-अटलबिहारींचा दावा होता. " राजकीय सत्ता आज इंदिराजींच्या हातीं एकवटली आहे; त्या जागीं दुसरें कोणी आलें तर काय होईल ? " असा मिष्किल प्रश्न विचारून डांगे म्हणाले, " मोरारजी महामंत्री होतील, बलराज मधोक संरक्षणमंत्री होतील, मसानी अर्थमंत्री होतील व सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंदे टाटांच्या हातीं दिले जातील. त्यामुळे चांगलें काय होणार ? मग आहे तेंच बरें असें म्हणावें लागेल. प्रश्न आहे तो कोणाच्या हाती राजसत्ता एकवटलेली दिसते हा नसून, कोणाच्या हाती अर्थसत्ता एकवटली आहे हा आहे. आज ज्यांच्या हातीं अर्थसत्ता एकवटली आहे, ज्यांच्या हातीं देशांतील पन्नास टक्के संपत्ति आहे अशा वीस घराण्यांच्या तालावर नाचणारे सरकार सत्ताधारी असावें काय ? म्हणून साम्राज्यवादी वृत्तीच्या भांडवलदारी सरंजामदारांची ताकद नष्ट करणें हें प्रथम कर्तव्य आहे व जनता-आंदोलनांनी तें शक्य होणारें आहे. " डांगे यांनी अखेरीस आपला साम्य-वादी सिद्धान्त अशा रीतीने मांडून आपलें भाषण संपविलें.

इंदिराजी, त्यांना हिटलर-स्टॅलिनच्या जोडीला बसविल्याने आधीच फण-फणत होत्या. त्यांनी सिंडिकेट-स्वतंत्र-जनसंघाच्या हातमिळवणीची तर रेवडी उड-वलीच, पण संतापून त्या म्हणाल्या, " हिटलर कोणी असेल तो तर मी नव्हे. जे निमलष्करी संघटना बांधीत असतात व विशिष्ट जातीविरुद्ध द्वेषभावना पसरवीत असतात ते लोक या देशांत फॅसिस्ट प्रवृत्ति आणण्यास अधिक जबाबदार आहेत. विरोधकांनी सरकारवर चढविलेला हल्ला हा समाजवादावर व राष्ट्रवादावर चढविलेला हल्ला असून विरोधकांना येथे साम्राज्यवादी भांडवलशाही आणा-वयाची आहे. "

अविश्वासाचा ठराव घाईगर्दीने आणण्यांत विरोधकांनी मोठीच चूक केली होती. लोकशाहीवादी व राष्ट्रवादी म्हणविणाऱ्या पक्षांची हातमिळवणी आकार

घेईपर्यंत त्यांनी थांबावयास हवें होतें. राजकीय पक्षांना चाबूक लावून एका रांगेत आणतां येत नाही हें मोरारजींच्या ध्यानांतच आलें नाही.

अविश्वासाचा ठराव पराभूत झाल्याने इंदिराजींची बाजू नुसती बळकट झाली असें नव्हे, तर विरोधकांच्या शिडांतले वारेंहि पार निघून गेलें. सिंडिकेटचें तर भरून न येण्याइतकें नुकसान झालें आहे.

*

संसदेंतील दुसरा पंधरवडा गाजला तो 'भूमि छीनो' आंदोलनाने. साम्यवादी, व समाजवादी यांनी या आंदोलनाला ९ ऑगस्टच्या क्रांतिदिनीं प्रारंभ केला आहे. गांधीजींनी भारताच्या भूमीवर अन्याय्य कब्जा करणाऱ्या इंग्रजांना याच ऐतिहासिक दिनी 'छोडो हिंदुस्थान' सांगितलें. त्याच ऐतिहासिक दिवशीं लाखो भूमिहीनांना जमिनीची तहान लागली असल्याने हजारो एकरांवर स्वामित्व सांगणाऱ्या सरंजामदार-जमीनदारांना 'छोडो भूमि' म्हणून साम्यवादी आणि समाजवादी सत्याग्रही सांगत आहेत.

'भूमि–छीनो' आंदोलन ही एक कृषिक्रांतीच आहे. कायद्यांतील पळवाटांमुळे जी क्रांति अडली, जें पाणी वाटेंतच जिरून भूमिहीनांपर्यंत पोचलेंच नाही तें 'छोडो भूमी'च्या क्रांतिकारक आंदोलनाने भूमिहीनांपर्यंत पोचवून त्यांची भूमीची तहान भागविण्याचा निश्चय हजारो सत्याग्रह्यांनी केला आहे. इंडिकेटमधीलहि तरुण तुर्कच नव्हेत, तर खुद्द काँग्रेसाध्यक्षांनीहि आपल्या विदेशाच्या दौऱ्यांत 'सरकारी भूमीवर कब्जा करा' असा उघड सल्ला दिला होता. या 'भूमि छीनो' आंदोलनाला थोपविण्यासाठी बिहारमधील जनसंघाने विरोधाचें व ठिकठिकाणच्या राज्य-सरकारांनी स्थानबद्धतेसारखीं हत्यारें म्यानाबाहेर काढलीं असली, तरी हें आंदोलन त्यांना आता थांबवतां येणार नाही.

हरित-क्रांति सफल व्हावयाची तर ही कृषि-क्रांतीहि सफल झाली पाहिजे व 'कसेल त्याची जमीन' हें खऱ्या अर्थाने सिद्ध झालें पाहिजे. आश्चर्य हें की, या कृषि क्रांतीची भाषा बोलणारे काँग्रेस-नेतेच आपल्या मांडीखाली शेकडो एकर जमीन घालून बसलेले आहेत. आपली जमीन कमाल मर्यादेंतून सुटण्यासाठी पत्नी, बंधु, पुत्र आदि नातेवाइकांच्या गांवें जमीन-वांटप करून कायद्याला त्यांनी फसविलें आहे. म्हणूनच 'भूमि छीनो' आंदोलनाचा रोख आहे तो जगजीवनराम, सौ. वत्सलाबाई नाईक, मजीथिया, जनरल शाहनवाझ, भोपाळच्या नबाब बेगम वगैरेंच्या जमिनीवर नाथ पै, एस्. एम्. जोशी, श्री. अ. डांगे, मधू लिमये आदि नेते व हजारो सत्याग्रही यांना ठिकठिकाणी अटक झाली आहे. नक्षलवादाचीं बीजें अंकुरतात तीं अशाच अन्याय्य परिस्थितींत! ही विषम परिस्थिति नष्ट करून समानतेचें युग उभें करूं इच्छिणाऱ्या इंदिराजींनी

या आंदोलनाला विरोध करण्यास कंबर कां कसावी बरें ? कायद्याने जें शक्य होत नाही तें सत्याग्रहाने साधण्याचा प्रयत्न आहे; पण तेंहि पराभूत झालें, तर मात्र अतिरेकी चळवळ प्रभावी ठरूं पाहील म्हणून वेळींच उपाय व्हावयास हवा !

*

इंदिरा-सरकारचें अस्तित्व स्वशक्तीपेक्षा विरोधकांच्या फुटीवरच अधिक अवलंबून आहे. विरोधकांतील परस्परविरोधी विचारसरणी कांही वेळा मोठी गमतीची वाटते. इंदिरा-सरकार हें रशियाधार्जिणें असल्याचा स्वतंत्र-जनसंघ यांचा आरोप असतो, तर तें अमेरिकाधार्जिणे असल्याचा साम्यवाद्यांचा आरोप असतो. स्वतंत्र पक्षाचे श्री. मोहता यांनी तिसऱ्या ग्रेट सोव्हिएट एन्सायक्लोपीडियांत नेफा व अक्साई चीन हे चीनचे भाग दाखविल्याचें संरक्षणमंत्र्यांच्या नजरेस आणलें. सोव्हिएट जॉग्रफिकल ॲटलासमध्येहि भारताचा मोठा भाग चिनी प्रदेश म्हणून दाखविला आहे. गेल्या मे-मध्ये हा एन्सायक्लोपीडिया प्रसिद्ध झाला. संरक्षण-मंत्र्यांच्या जूनमध्ये हें लक्षांत आल्यावर, त्यांनी रशियाकडे तक्रार नोंदविली. श्री. मोहता यांच्या परखड प्रश्नाला संरक्षणमंत्री स्वर्णसिंग यांनी दिलेलें उत्तर तर मोठें मासलेवाईक होतें. ते म्हणाले, " पूर्वीहि अशी चूक झाली होती. सोव्हिएट सरकार-च्या मी ती नजरेस आणल्यावर ते म्हणाले की, चूक दुरुस्त करूं. पण नकाशांतील चूक आमचें राजकीय मत व्यक्त करीत नाही. " स्वर्णसिंग त्यानंतर हताशपणें म्हणाले की, " त्यांनी ती दुरुस्ती केली आहे की नाही हें आम्हीं पाहिलेलें नाही. आता आम्ही पुन्हा खलिता पाठविला आहे. " सोव्हिएट नेत्यांच्या बोलण्यांत व कृतींत मेळ नसतो हें अनेक वेळा अनुभवास येऊनहि जे भाबडेपणाने त्यावर विश्वास ठेवतात त्यांच्या परराष्ट्रीय नीतीची वाखाणणी करावी तेवढी थोडीच होईल. सोव्हिएट रशियाला दुखविण्याची आपली ताकद नाही हेंच खरें.

श्री. मोहता यांनी भारताच्या रशिया-धार्जिण्या वृत्तीवर नकाशा-प्रकरणाने प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला, तर श्री. भूपेश गुप्त यांनी भारतांतील अमे-रिकेचे भूतपूर्व वकील जॉन केनेथ गालब्रेथ यांच्या 'ॲंबॅसॅडर्स जर्नल' या नव्या पुस्तकांतील कांही उतारे वाचून दाखवून अमेरिका भारताच्या अंतर्गत व परराष्ट्रीय धोरणांत कसा हस्तक्षेप करते हें दाखविलें. गालब्रेथ यांची 'अफ्लुअंट सोसायटी', 'दि न्यू इंडस्ट्रियल स्टेट' वगैरे पुस्तकें सर्वांच्या परिचयाचीं आहेत. त्यांच्या 'ॲबॅसॅडर्स जर्नल' या नव्या पुस्तकाच्या पान २८२ वर गोव्याच्या मुक्तीबद्दल उल्लेख आहे व केंद्र सरकारचे एक वरिष्ठ सचिव एम्. जे. देसाई यांच्यावर दबाव आणण्याचा अमेरिकेकडून कसा प्रयत्न झाला, हेंहि त्यांत सांगितलें आहे.

I went over to see M. J. Desai but they ( Indian Govt. ) had already answered. The answer was long, argumentative but negative. I tried very hard to get Desai to reconsider, ponting out

that the Portuguese were inherently at a disadvantage. If they had to seek the support of the U. N. while excluding it on the matter of anticolonialism – I told Desai that I could not issue this statement if they were about to move. He gave me the impression that I could do so but it had best be soon.

गोव्याला पोर्तुगालचा प्रांत मानणाऱ्या अमेरिकनांची यापेक्षा वेगळी राजनीति कोणती असणार !

या पुस्तकाच्या पान ४५२ वर कृष्णमेनन यांच्या हकालपट्टीची अगाऊ माहिती गालब्रेथ यांना मिळाल्याचें त्यांनी लिहिलें आहे.

At 7-15 P. M. I saw M. J. Desai. He told me the interesting news that Krishna Menon has been sacked. The Prime Minister is taking over the Defence Ministry himself.

त्यांत टी. एन्. कौल या वरिष्ठ अधिकाऱ्याचेंहि मत पुढीलप्रमाणे नोंदविलें आहे.

'जर्नल'च्या पान ५८५ वर हवाई संरक्षणाची अमेरिकेची योजना भारतावर लादण्याचा जो प्रयत्न होता त्याची माहिती दिलेली आहे.

He thinks that on any showdown the Soviets will always support the Chinese.

I asked Desai what was his guess on the air defense arrangements. He told me the answer would be 'yes' and he thought we would have it in the next three or four days. I sent off a top secret to washington on this. They will be relieved as indeed am I."

परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग यांची या उताऱ्याबाबतची प्रतिक्रियाहि त्यांच्या नकाशा-प्रकरणांतील प्रतिक्रियेप्रमाणेच स्थितप्रज्ञाची होती. ते म्हणाले, "एखाद्या वकिलाने त्याचा दृष्टिकोन लिहिला म्हणजे तो खरा आहे, तशी वस्तुस्थिति आहे, असें मानणें चूक ठरेल. कोणीहि आपली बढाई मारतोच व मी आंतील बातमी अमक्या तमक्याला गाठून मिळविली असें म्हणतोच. वकिलाचें तें कामच असतें. पण चेहऱ्यावर सुरकुतीहि न पाडतां खूपसें बोलून कांहीहि न सांगण्यांत सरदार स्वर्णसिंगांचा हातखंडा आहे तो असा !

*

इंदिरा-सरकार रशियाधार्जिणें आहे का अमेरिकाधार्जिणें आहे, हा प्रश्न तूर्त सोडून दिला, तरी रशिया व अमेरिका हीं दोन्ही राष्ट्रें पूर्वीसारखी ठोकळेबाज राजनीति आज अवलंबीत नाहीत. एक काळ असा होता की, रशियाची ज्याला मदत त्याच्या विरुद्ध अमेरिका व अमेरिकेची ज्याला मदत त्याच्याविरुद्ध सोव्हिएट रशिया उभा. पण आज भारताच्या बाबतीत म्हटलें, तर दोघेहि त्याचे मित्र आहेत

आणि म्हटलें तर दोघेहि तटस्थ आहेत. रशिया-अमेरिकेचीं जागतिक उद्दिष्टें तरी काय आहेत यावर सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल यांची एक मजेदार विडंबन-कथा मला येथे आठवते. ती याबाबत खूपसें कांही सांगून जाईल.

" मॅकॉर्थी हा अमेरिकेचा अध्यक्ष म्हणून एकदाचा निवडून आला व रशियाचा मेलेन्कोव्ह महामंत्री झाला. रशिया व अमेरिका यांनी जगाची वांटणी करून घेतली व अटलांटिक चार्टरच्या पद्धतीवर करार झाला आणि त्यानुसार आफ्रिका, ऑस्ट्रेलिया व दक्षिण आणि उत्तर अमेरिका अमेरिकेच्या अखत्यारीत, तर युरोप व आशिया रशियाच्या अमलाखाली दिलीं गेलीं. या करारानुसार असें ठरलें की, या दोन विभागांतील व्यापार फक्त स्टेट ट्रेडिंगमार्फतच व्हावयाचा व दोघांतील प्रश्न वर्षातून एकदा मॅकॉर्थी व मेलेन्कॉव्ह यांची एकत्र बैठक होऊन निकालीं निघायचे. त्याचप्रमाणे दोघांनीहि अपाली सर्व संरक्षणसामग्री निकालीं काढावयाची. मात्र मॅकॉर्थी यांच्याविरुद्ध अमेरिकन विभागांत जर एखादा पुढारी उदयाला येऊं लागला, तर त्याला मेलेन्कॉव्हने रशियन जगतांतील पॅरिसची मजा चाखण्यास आमंत्रण द्यावयाचें व तो पुन्हा अमेरिकन जगतांत परतणार नाही अशी व्यवस्था करावयाची. त्याचप्रमाणे मेलेन्कॉव्ह यांच्या विरुद्ध रशियन जगतांत कोणी पुढारी उभा राहिला, तर मॅकॉर्थींनी त्याला अमेरिकन जगतांतील न्यूयॉर्कमध्ये मनोरंजनासाठी पाचारण करावयाचें व तो रशियन जगतांत पुन्हा परतणार नाही अशी व्यवस्था करावयाची.

रशिया-अमेरिका यांच्या या अशा महत्त्वाकांक्षेला बळी बिचारीं अविकसित राष्ट्रें बळी पडतील. त्यांतलीं जीं अशक्त असतील त्यांचे स्वर्णसिंगांसारखे परराष्ट्रमंत्री बिचारे खलिते पाठविण्यास शिल्लक राहतील का ?

*

गोस्वामी तुलसीदास यांची ४०० वी जयंती राजधानींत महामंत्र्यांच्या उपस्थितींत मोठ्या दिमाखाने साजरी झाली. तुलसीदासांचें 'रामचरितमानस' आज साऱ्या उत्तर भारतीयांना मुखोद्गत आहे. 'रामचरितमानसां'तील रामाचें चरित्र हें मानवी चरित्र आहे. नारायणाच्या रूपांत तुलसीदासांनी रामाला पाहिलें, पण वर्णिलें मानवाच्या रूपांत व म्हणूनच सामान्य माणसापर्यंत श्रीरामाचा आदर्श 'रामचरितमानसा'द्वारें जाऊन पोचला.

तुलसीदास हे आपल्या तारुण्यांत यौवनाच्या मादकतेने भारून पत्नीभक्त बनले होते. सापाची दोरी करून प्रियेचा महाल त्यांनी जवळ केला. तुलसीदासांचें भाग्य हें की, त्यांच्या पत्नीने एका साध्या वाक्याने त्यांचे ज्ञानचक्षू उघडले. " माझी भक्ति ज्या निष्ठेने आपण करतां त्या निष्ठेने परमेश्वराची भक्ति केलीत, तर हा भवसागर सहज उल्लंघून जाल," हे पत्नीचे शब्द ऐकतांच प्रियाराधनेंत गुंतलेले तुलसीदास श्रीरामाच्या चरणीं रत झाले. महामानव, महान् समन्वयी, सच्चरित साधु, महाकवि बनले.

त्यांच्या काव्यांत सगुणांचा पुरस्कार अधिक आढळतो. ज्ञान व भक्ति यांच्या संघर्षांत ज्ञानाचा दिवा वासनेने क्वचित फुंकला जाईल, पण भक्तीला आसक्तीची बाधा कधीच होणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली. वाल्मीकीचा राम, भवभूतीचा राम व तुलसीदासांचा राम विभिन्न रूपांत लोकमानसापुढे येतात. पतनोन्मुख समाजाला उभे करण्यासाठी तुलसीदासांनी रामायण रचलें व म्हणनच राम-भरताच्या भ्रातृप्रेमांतील निर्व्याजता आणि सीतेच्या रूपाने पत्नीत्वाचा आदर्श तुलसीदासांनी पुढे मांडला. श्रीरामाबरोबर वनवासांत जाण्यास निघालेली तुलसीदासांची सीता म्हणते —

म सुकुमार नाथ बन जोगू । तुमहि उचित तप मोकंद भोगू ।
कंद-मूल-फल अमिय अहारू । अवध सौध सम सरिसपहारू ।।

समाजांतील भ्रांति व वैषम्य दूर करण्याचाहि त्यांचा प्रयत्न ठायीं ठायीं दिसतो व त्यांच्या मुखांतून पुढील पंक्ती बाहेर पडतात —

सियाराममेमय सब जगजानी । करौ प्रनामजोरि जुग पानी ।।

अशा या महामानवाला वंदन करतांना सहजच कोणाच्याहि तोंडून उद्गार निघतील —

प्रणत तुम्हारे चरणों पर है, आज विश्व का अभिनन्दन ।
स्वर स्वर में, उच्छ्वासित हो रहा आज तुम्हाराही वन्दन ।।

*

नुकतीच नागपंचमी होऊन गेली. दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरांत, त्यांतहि नव्या दिल्लींतील अद्ययावत् वस्तींत राहणाऱ्या मला 'नागोबा' कोठून दृष्टीस पडणार ! त्यांत पावसाळा कुठे नुकताच सुरू झाला असल्याने दुधाची अजून चणचणच भासत आहे. म्हणून आपले दोन-चार राजधर्मी मित्र गोळा करून मी सायंकाळीं कॅनॉट सर्कलवरील कॉफी हाऊसमध्ये कॉफी पिण्यासाठी गेलों. कॉफी पाजली म्हणून ते त्यांचा स्वभाव थोडाच बदलणार होते. प्रसंग आला म्हणजे ते नागोबासारखे दात दाखवणारच ! राजकारणांत तर कोणी कोणाचा मित्र नसतो ! पाहिजे तर शेखअब्दुल्ला-मेननना पं. नेहरूंबद्दल विचारा किंवा नाईक निंबाळकर-रत्नाप्पांना यशवंतरावांबद्दल विचारा ! जो तो हे जाणूनच असतो —

महानगरमें रहता हूं न तो दिखते है नाग
न मिलता है दूध इस लिए
नागपंचमी पर कॉफी हाऊस के दोस्तोंकोही
पिलाता हूं कॉफी वे सब समझते हैं
मन हो मन हसते हैं मौकेपर
बिनाचूके डसते हैं।

राजकारणी मंडळींची तऱ्हा ही अशी आहे, समजलं !

— केसरी, दि. १६ ऑगस्ट १९७०

# सीमा-प्रश्नामागे दडलेलें म्हैसुरी राजकारण

- ३२ -

राजधानींतील स्वातंत्र्यदिन नेहमीच्या कंठाळी पद्धतीने साजरा झाला. लाल किल्ल्यावर महामंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांचें भाषण झालें. त्या वेळीं दिल्लींतील हौशी जनतेने व बाहेरच्या पाहुण्यांनी गर्दी केली होती. पण या सोहळ्याची प्रभा जनमुखावर प्रतिबिंबित झालेली मात्र मुळीच दिसली नाही.

बहुतेक महाराष्ट्रीय खासदार तर राजधानीच्या बाहेरच गेले होते. सध्या ते अत्यंत उद्विग्न मन:स्थितींत वावरत आहेत. मराठी काँग्रेसी खासदार तर बहुत अंशीं परप्रत्ययनेय व परप्रकाशित आहेत. यशवंतरावांचें तेज लोपलें की त्यांचें तेज लोपतें. ज्यांच्या यशाला अंत नाही व ज्यांच्या बलालाहि अंत नाही असे यशवंतराव-बलवंतराव दिल्लींत नुसते नांवाचे चव्हाण राहिले आहेत असें सध्या येथे बोललें जातें. इंदिरा गांधींनी त्यांची ससेहोलपट चालविली आहे. पण यशवंतराव ती मुकाटपणें सहन करीत आहेत याचें कोडें न उलगडल्याने काँग्रेस-खासदारांच्या उद्विग्नतेंत अधिकच भर पडली आहे. 'साहेब' गृहमंत्री होते तेव्हा सकाळीं प्रथम ते बंगल्याबाहेर आले की 'गार्ड ऑफ ऑनर' मिळावयाचा. 'साहेब' बंगल्याबाहेर पडले की, त्यांच्या मोटारी-पुढे तांबडया दिव्यांची पायलट-कार धांवायची. कोठेहि जायचें असलें की, हवाई दलाचें खास विमान उपलब्ध व्हावयाचें. 'आता हें कांहीच उरलेलें नाही' असें कोणी म्हणतांच काँग्रेस-खासदारांच्या मनाची आणखीच उलघाल होते व ती त्यांच्या चेहऱ्यावरहि स्पष्ट दिसते.

खरें म्हणजे त्या त्या पदाचा तो तो मान असतो. त्यांत कमीजास्त असें कांहीच नाही. पोलिस-आयुक्ताला मिळणारी सलामी आपल्याला मिळत नाही म्हणून बँकरने

नाराज होणें जसें अयोग्य, तसेंच बँकरच्या शब्दाला आर्थिक व्यवहारांत मान आहे तसा आपल्याला नाही म्हणून पोलिस-आयुक्तानेहि तक्रार करणें पोरकटच होय. पण हा पोच एकदा मनें गढुळलीं की राहत नाही. "महाराष्ट्राने इंदिराजींना दिलेल्या मोलाच्या पाठिंब्याचें हेंच फळ काय !" असें महाराष्ट्रीय काँग्रेस-खासदार एकमेकांना कळवळून विचारीत असतात. अर्थात् इंडिकेटला पाठिंबा दिला असें म्हणतांना त्यांतील अर्धसत्य ध्यानीं घेऊन बऱ्याच जणांची जीभ जरा चाचरते. रामसुभग-यशवंतराव भेटींत जरी एकमेकांची खुशाली विचारली जात असली, तरी त्या भेटी वारंवार घडत आहेत. स्वतंत्र, जनसंघ व सिंडिकेट यांचा 'ग्रँड अलायन्स' यशस्वी झाला असता, तर यशवंतराव-दिनेशसिंगांचा कांही वेगळा पवित्रा दिसला असता. पण तो पवित्रा माहीत असल्यामुळे त्याचा इंदिरा गांधींच्या गोटांत कांहीच परिणाम झालेला दिसत नाही.

हें पाहून एका महाराष्ट्रीय तरुण तुर्काने तर मुख्य मंत्र्यांना स्पष्टच सुनावलें की, "दबाव आणण्याचा खोटा आव कशाला आणतां ? ती ताकद तुमच्यांत नाही. इंदिराजींची जर तुम्ही अडवणूक करूं इच्छीत नाही, तर मग संयुक्त महाराष्ट्राच्या वेळीं यशवंतरावांनी जसे 'पंडितजींचे आम्ही पाईक' असें स्पष्टपणें सांगून टाकलें, तसें इंदिराजीवर विश्वास टाकून जें होईल तें पाहत स्वस्थ बसा. परंतु अकारण सीमेवरील जनतेला खोटचा आशा लावूं नका."

वसंतराव नाईक सीमा-प्रश्न हा एक मानवी प्रश्न आहे असें कितीहि म्हणत असले, तरी त्याची सोडवणूक राजनैतिक पटावरील प्याद्यांच्या हालचालींमध्ये गुंतली आहे. आज सर्वांचीच दृष्टि आगामी सार्वत्रिक निवडणुकीवर रोखली गेली आहे व सर्वांचेच पवित्रे त्या दृष्टीने पडत आहेत. इंडिकेटच्या दृष्टीने म्हैसूर व गुजरात हे त्यांच्या साखळींतील कच्चे दुवे आहेत. सिंडिकेट-नेत्यांच्या 'ग्रँड अलायन्स'च्या चालीमुळे गुजरातमध्ये बेबनाव निर्माण झाला आहे. सिंडिकेटने दहाकलमी पुरोगामी धोरण घोषित केल्यावर जनसंघ-स्वतंत्रांबरोबर केवळ इंदिरा-सरकार पाडण्यासाठी हातमिळवणी करणें म्हणजे तत्त्वाशीं व्यभिचार होय असें हितेंद्र देसाई यांना स्वाभाविकच वाटतें. त्यांच्या या विचाराला गुजरातमध्ये पाठिंबा मिळाल्याने मोरारजींच्या पुढारीपणाचा या 'ग्रँड अलायन्स'च्या चालींत सर्वस्वीं बोजवारा उडाला. इंदिराजींना गुजरातला आपलेसें करण्याची यामुळे मोठी संधि आली आहे. त्यांतून गुजरातमधल्या स्वतंत्र पक्षांतहि बरीच फाटाफूट झालेली आहे.

म्हैसूरची हंडीहि गुजरातप्रमाणेच इंडिकेटला हवी तशी लवकरच शिजेल असें इंदिराजींना वाटत आहे. मुख्य मंत्री वीरेंद्र पाटील हे एक व्यवहारचतुर नेते म्हणून ओळखले जातात. निजलिंगप्पामुळे त्यांना आजचें स्थान मिळालें हें खरें असले, तरी ज्या लिंगायत समाजावर त्यांचें नेतृत्व अवलंबून आहे त्या समाजालाच निजलिंगप्पांच्या धोरणामुळे आपलें मोठें नुकसान होत आहे असें वाटूं लागलें आहे. यामुळे

सिंडिकेटकडे असलेल्या लिंगायतांपैकीहि मोठा गट इंदिराजींकडे येण्याचा संभव दिसतो.

सांताक्रूझ विमानतळावर महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री रफिक झकेरिया यांनी जेव्हा 'सीमा-प्रश्नाची सोडवणूक लांबणीवर पडल्याबाबत' केंद्रीय शिक्षणमंत्री व्ही. के. आर. व्ही. राव यांच्या जवळ नाराजी व्यक्त केली तेव्हा राव म्हणाले, "समाजवादी भारत निर्माण करण्यासाठी म्हैसूरमधून मोठें साहाय्य होण्याचा जर संभव असेल, तर सीमा-प्रश्नाची सोडवणूक थोडी लांबली तरी ती आपण सहन केली पाहिजे." राव यांची बोलण्यांतील चतुराई लक्षांत घेतली की, सामाजिक प्रश्नाच्या सोडवणुकींतील दिरंगाई म्हैसुरी राजकारणामुळे होत आहे हें सहज ध्यानीं येईल.

*

म्हैसुरी राजकारणाच्या भोवऱ्यामध्ये सीमा-प्रश्न सापडल्याने त्याच्या सोडवणुकीला कांही काळ जरी लागला तरी खरी दिरंगाई महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अनिश्चयामुळे झालेली आहे. सार्वजनिकरीत्या "सीमा-प्रश्न तत्त्वावर सुटला पाहिजे व तीं तत्त्वें म्हणजे खेडें हें घटक, भौगोलिक सलगता आणि भाषिक बहुसंख्या होत," असें महाराष्ट्र काँग्रेसचे नेते पोपटपंचीसारखे एकसुरांत कितीहि बोलत असले, तरी महाजन-मंडळाच्या निर्णयानंतर या तत्त्वविचाराची वाफ केव्हाच निघून गेली आहे. इंदिराजींनी आतापर्यंत मांडलेल्या (१) रेल्वेवर बेळगावची फाळणी करून महाजन-मंडळाने दिलेल्या गावांव्यतिरिक्त आणखी कांही गावें देऊन प्रश्न सोडविणें, (२) बेळगावसकट मराठी सीमा-भाग गोव्यामध्ये दाखल करणें. (३) महाजन-मंडळाने दिलेल्या निर्णयाव्यतिरिक्त केवळ एक बेळगाव शहर महाराष्ट्राला देणें या तीनहि योजनांपैकी एकहि योजना महाराष्ट्र काँग्रेसचे नेते पत्करूं शकले नाहीत. अजूनहि यशवंतराव-वसंतराव हा प्रश्न पक्षीय पातळीवरूनच सोडवूं पाहत आहेत व काँग्रेसी खासदार-आमदार सीमा-प्रश्नाचा पुढाकार आपल्या हातीं आहे असें मानून तो कसा टिकवितां येईल या विवंचनेंतच आहेत.

इंदिराजींना काळजी आहे ती याची की, जी कोणती योजना मान्य होईल वा निश्चित ठरेल ती संसदेंतून पार कशी करावी? त्यासाठी त्यांना इतर पक्षांचाहि पाठिंबा हवा आहे. स्वाभाविकच या कोंडीमुळे दिल्लींतील राजनैतिक वर्तुळांत महाराष्ट्रांतील काँग्रेस-नेत्यांच्या वर्तणुकीबद्दल नाराजी आहे. इंदिराजींनी हा प्रश्न सोडविण्याचा वाईटपणा घेण्याचें ठरविलें आहे, अशीहि वावडी पावसाळी अधिवेशनापूर्वी हवेंत उडत होती. राजकारणांत हें असें चालायचेंच. पण आज तरी यशवंतराव इंदिराजींच्या मागे उभे आहेत व त्यांच्या समाजवादी धोरणाला प्रत्यक्ष आकार आणून देण्याची जबाबदारी त्यांनी अर्थमंत्री या नात्याने स्वत:वर घेतली आहे, हें खरें.

कांही महाराष्ट्रीय काँग्रेसी खासदार 'साहेबां'चा रोष पत्करूनहि अगदी राष्ट्रपतींच्या निवडणुकीपासूनच इंदिराजींच्या मागे उभे राहिले होते. त्यांना स्वाभाविकच

आपल्या तरी सेवेची दखल इंदिराजीकडून खासच घेतली जाईल अशी अपेक्षा होती. ती सेवा कारणीहि लागेल, पण इतक्या तातडीने तें कसें घ्यावें ? एका महाराष्ट्रीय तरुण तुर्काची तर आशा मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेपर्यंत सुटेना व त्याला मंत्रिपद कांही भेटेना ! इंदिरा गांधी 'त्याचा' बोलविता धनी कोण हें ओळखण्याइतक्या चाणाक्ष ठरल्या. थोडक्यांत काय, मनोमनीं कोणी सिंडिकेटकडे झुकलेले असोत किंवा इंडिकेटकडे झुकलेले असोत, सारेच महाराष्ट्रीय खासदार 'हेंचि फल काय मम तपाला,' असें म्हणत डोक्याला हात लावून बसलेले आहेत.

महाराष्ट्रीय काँग्रेसी खासदारांच्या उद्विग्नतेंत आणखी भर पडली ती सीमा-प्रश्नावर पडू पाहत असलेल्या अक्षतांमुळे ! महाराष्ट्र विधिमंडळामध्ये काँग्रेसच्या आमदारांनी अधिवेशन-स्थगितीची फुसकी का होईना, पण घोषणा करून एक प्रकारें आपल्या पक्षाच्या खासदारांवर अविश्वासच व्यक्त केला. "तुम्ही महा-मंत्र्यांकडन सीमा-प्रश्नाची सोडवणूक करून घेण्यास असमर्थ दिसतां. तेव्हा आता आम्ही महाराष्ट्रांतूनच मोर्चे लावतो," असा त्याचा सरळ अर्थ होता. महाराष्ट्रांतील विरोधी पक्षांना या 'अलडुर'मागील पोकळपणा चांगला ज्ञात आहे. त्यामुळे ते कोणीच या वीरश्रीयुक्त घोषणेमुळे फसले नाहीत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्या-पासून हा 'मनमाड-मार्ग' साऱ्यांच्या परिचयाचा आहे. महाराष्ट्रालाच काय, पण दिल्लींतील राजसत्तेलाहि तो परिचयाचा आहे आणि त्यामुळे निवाडा-मंडळाची सूचना वसंतराव नाईकांच्या दिल्ली-भेटींत त्यांच्यापुढे टाकली गेली.

निवाडा-मंडळाच्या नेमणुकीने केवळ इतिहासाची पुनरावृत्ति होण्यापलीकडे कांहीच होणार नाही. एका महाजनांच्या जागीं तीन महाजन येतील आणि त्यांतून महाराष्ट्राचा प्रतिनिधि म्हैसूरच्या प्रतिनिधीकडे पाठ करून बसला की, बिचाऱ्या केंद्रीय प्रतिनिधीला आकाशाकडे डोळे लावण्याशिवाय गत्यंतर उरणार नाही. 'जैसे थे' हेंच शेवटीं त्यांचें फल ठरणार आहे.

परिस्थितीची ही सर्व कोंडी लक्षांत घेतां एका अपक्ष पुढाऱ्याच्या भेटींतून निघा-लेला, सार्वत्रिक निवडणुकीबरोबरच वादग्रस्त सीमा भागांत केंद्रीय देखरेखीखाली सार्वमत घेऊन आणि भाषिक बहुसंख्येचा निकष मानून सीमा-प्रश्न सोडवावा हा तोडगा मान्य होण्यास वस्तुतः हरकत नसावी. प्रत्यक्ष सीमा-निश्चिति, सार्वमता-नंतर खेडें हें घटक आणि भौगोलिक सलगता लक्षांत घेऊनच करावयाची. यामुळे सीमा-प्रश्न तात्त्विक भूमिकेवरून सुटेल. लोकशाहींत लोकेच्छा सार्वभौम मानली जात असल्यामुळे लोकशाहीच्या चौकटींतच सीमा-प्रश्नाची सोडवणूक होईल; शिवाय इंदिराजींना म्हैसूरच्या राजकारणासाठी आवश्यक तो वेळ मिळेल. सार्वमत सार्वत्रिक निवडणुकांबरोबर घेतलें की, त्या वेळीं सर्व पुढारी आपआपल्या मतदार-संघांत गुंतलेले असल्यामुळे भावनेचा उद्रेक करणारे प्रसंगहि टळतील. केंद्रीय

देखरेखीखाली व निवडणूक आयुक्तांच्या अखत्यारींत सार्वमत झालें की, तें इतर हस्तक्षेपांपासून वांचेल तें वेगळें !

अमेरिकेंत उमेदवार निवडतांना प्रसंगीं विशिष्ट प्रश्नावरहि मतदान घेतलें जाण्याची व्यवस्था आहे. मतदार आपलें एक मत पसंतीच्या उमेदवाराला व दुसरें प्रश्नाच्या बाजूने किंवा विरुद्ध देतो. तसेंच, कांहीसें या वादग्रस्त सीमा-प्रश्नाबाबत घडवावें अशी ही सूचना असून, ती वसंतराव नाईकांपुढे व वीरेंद्र पाटलांपुढे विचारासाठी ठेवली गेली. परंतु वीरेंद्र पाटील यांनी कोणत्याहि नव्या योजनेचा विचार करायला नकार दिला असून, महाजन-मंडळाच्या शिफारशींबाबतचा आपला हेका सोडायला ते तयार नाहीत.

हा विरोध करण्यामागचा श्री. वीरेंद्र पाटील यांचा हेतु स्पष्ट आहे. सीमा-प्रश्नाची सोडवणूक होतां कामा नये या हटवादापायींच ते महाजन-अहवालाचा आग्रह धरीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस यांनी सीमा-प्रश्नाच्या सोडवणुकीबाबत कणखर धोरण स्वीकारलें नाही, तर या प्रश्नाची तड लागणें अशक्य आहे.

महाराष्ट्र विधिमंडळांत या घटनेचे पडसाद उमटणें स्वाभाविक होतें. दिल्लींत महामंत्र्यांशीं झालेल्या वाटाघाटीसंबंधी विधानसभेंत निवेदन करायला मुख्य मंत्र्यांनी नकार दिल्यामुळे समितीच्या सदस्यांना संताप आला आणि त्यापायींच सभापतींना विधानसभेंचें कामकाज दोन दिवस स्थगित ठेवावें लागलें. सीमा-प्रश्नाची सोडवणूक घडवून आणण्याबाबत महाराष्ट्र सरकार आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस यांच्याकडून होत असलेली दिरंगाई खरोखरच मराठी जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहणारी आहे.

श्री. एस्. एम्. जोशी या दिरंगाईवर संतापून मला एकदा म्हणाले की, "एखाद्याने एखादी स्त्री पळवून नेली, तर तिची इच्छा नसतांनाहि तुम्ही बळजबरीने तिला त्याच्याकडे ठेवणार काय ? तिला दुसऱ्या कोणाशीं लग्न करावयाचें असेल तर तिला सोडविणार नाही काय ?"

एस्. एम्. यांचा हा सवाल ऐकून माझ्या मनांत त्यांना चिनी नीतिकथा ऐकवण्याचें आलें होतें. फार काळ स्त्री पळवली गेली की काय होतें, यावर ती नीतिकथा आधारित आहे.

एका चिनी सेनापतीची पत्नी एका दरोडेखोराने पळवली. सेनापतीचें आपल्या पत्नीवर फार प्रेम होतें. त्यामुळे तिला सोडवून आणण्यासाठी तो चिकाटीने अनेक वर्षे जिवाचें रान करीत त्या दरोडेखोराचा पाठलाग करीत राहिला. शेवटीं दरोडेखोराच्या डोंगरी किल्ल्यापर्यंत तो जेव्हा पोचला तेव्हा दरोडेखोराने त्याला निरोप पाठविला की, "माझ्या या 'गरुडगुंफे'त तुझें कांही चालावयाचें नाही. पण तुझें पत्नीवरील प्रेम पाहून मी तुला नेमबाजीच्या स्पर्धेचें आव्हान देतो. तूं जिंकलें तर तुझी पत्नी घेऊन

जा. मी जिंकलें तर ती माझ्याकडे राहील." सेनापति उत्तम नेमबाज होता व किल्ला जिंकणें आपल्याला शक्य नाही हें पाहून त्याने तें आव्हान स्वीकारलें. तो किल्ल्यांत गेला व स्पर्धा सुरू झाली. दुर्दैवाने सेनापतीची नेमबाजी दरोडेखोराच्या नेमबाजीपुढे फिक्की पडली. दरोडेखोर मोठ्या खेळाडूपणें त्याच्या पाठीवर थाप मारून म्हणाला, "मित्रा ! तूं निराश होऊं नकोस. मी जरी जिंकलें असलें तरी तुझी पत्नी मी तुला परत देतों. मात्र अट ही की, तिने तुझ्याबरोबर स्वेच्छेने गेलें पाहिजे." सेनापतीला आनंद झाला तो पत्नीला भेटला. आश्चर्य हें की, पत्नीने त्याच्याबरोबर जाण्यास नकार दिला. सेनापतीने आजूबाजूला विषण्णपणें पाहिलें तेव्हा त्याला पाळण्यांत एक लहान मूल खेळतांना दिसलें. सेनापति मान खाली घालून परतला.

बेळगाव व सीमेवरील प्रदेशाची अवस्था, आणखी अधिक काळ हा प्रश्न असाच लोंबत पडला, तर या चिनी नीतिकथेमधील सेनापतीच्या पत्नीसारखी तर होणार नाही ना ?

*

सीमा-प्रश्नाच्या या धामधुमींत दिल्लींत श्री. बाळासाहेब देसाई येऊन गेले. अलिशान अशोक हॉटेलांत ते उतरले होते. इंदिराबाईंची व जगजीवनरामबाबूंची त्यांनी भेट घेतली. वृत्तपत्रांतून दोन-चार वावड्या उडविल्या गेल्या. महामंत्र्यांनी बाळासाहेबांची भेट घेऊन अकारण दुहीला प्रोत्साहन दिलें म्हणून वसंतराव नाईक संतापल्याचें ऐकलें. पण माझ्या माहितीप्रमाणे खुशाली विचारण्यापलीकडे या भेटीमध्ये विशेष असें कांहीहि घडलेलें नाही.

श्री. बाळासाहेब देसाई यांच्या राजीनाम्याचा प्रश्न सेंट्रल हॉलमधील गप्पाष्टकांत निघाला असतां, तारकेश्वरी सिन्हा यांनी बिरबलाची एक कथा सांगितली.

असें झालें की, अकबराने बिरबलला सर्वांत हुषार माणूस शोधण्याची आज्ञा केली. बिरबलाने एका इसमाला धरून आणलें व खोलीत बंद केलें. खोलींत बुंदीच्या लाडवांचा ढीग रचला होता. बिरबल म्हणाला, "हें पहा, तुला तीन महिने आम्ही येथे कोंडून ठेवणार आहों. रोज लाडू मोजून पाहिले जातील. ते कमी होतां उपयोगी नाहीत."

रोज लाडू मोजले जात. तीन महिन्यांनी अकबराच्या उपस्थितींत त्या इसमाला बंद खोलींतून बाहेर काढलें. पाहतात तर तो अन्नान्न होऊन मेला तर नाहीच, उलट गलेलठ्ठ झाला होता. लाडूहि कमी झाले नव्हते. बाहेरून कोणी कांही पुरवणेंहि पहाऱ्यामुळे शक्य नव्हतें. अकबराने मनोमनीं त्याची हुषारी मान्य केली. त्याने त्या इसमाला विचारलें, "तूं जिवंत कसा राहिलास ?"

तो म्हणाला, "खाविंद, रोज लाडू मोजले जात. मोजतांना ते इकडून तिकडे हलविले जात. त्या वेळीं बुंदीच्या कांही कळचा खाली गळत. त्या पडलेल्या कळचा मला पोटभर होत. त्यामुळे लाडू कायम राहिले आणि माझेंहि पोट भरलें."

अशा पडणाऱ्या 'कळयां'वरच दुसऱ्याचें लक्ष असतेंच! पण असे पडलेले दाणे खाऊन किती जणांचें पोट भरणार आणि तें भरणार तरी किती ?

असें असलें तरी, दुसऱ्या पक्षांतून, गटांतून गळालेले दाणे खाण्याचा कोणीहि प्रयत्न करणारच! यशवंतराव-वसंतरावांना सोडून बाळासाहेब बाहेर पडले असल्यामुळे विरोधक त्यांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करणारच. नाही तरी माहीतगार हें सांगतीलच की, महाराष्ट्रांत सिंडिकेट, इंडिकेट असें कांही नसून, यशवंतराव गट व यशवंतराव-विरोधी गट असेंच खरें स्वरूप आहे. इंडिकेटवादी म्हणविणाऱ्या यशवंतराव गटांतील अनेक जण सिंडिकेटवादी आहेत व सिंडिकेटवादी म्हणविणाऱ्या नाईक निंबाळकर यांच्या गटांतील बरेच अनुयायी इंडिकेटवादी आहेत.

*

जमीनविषयक कायद्यांची अंमलबजावणी योग्य होत नाही म्हणून कम्युनिस्ट पक्ष, संयुक्त समाजवादी पक्ष व प्रजासमाजवादी पक्ष यांनी 'भूमि छीनो' आंदोलन सुरू केलें आहे. ह्या आंदोलनाचें स्वरूप सत्याग्रहासारखें अहिंसक व आत्मक्लेशाचें आहे असें ते कितीहि सांगत असले, तरी बेकायदा जमिनी बळकावतांना कांही ठिकाणीं दंगा घडत आहे. त्यांतून बळकावलेल्या जमिनी योग्य इसमांनाच तसेंच भूमिहीनांनाच मिळतील अशी निश्चिति काय? त्यांतून खासदार मणि यांनी राज्यसभेंत प्रश्न विचारल्याप्रमाणे "ताब्यांत घेतलेल्या जमिनींची कायदेशीर अदलाबदल कशी केली जाईल व ती जमीन त्यांच्याकडेच राहील ह्याची तरी ग्वाही काय?" म्हणजे शेवटीं यांतून नक्षलवाद्यांचाच डाव नकळत साधला जाणार आहे. नक्षलवाद्यांचा हेतु सामाजिक सुधारणांचा कधीच नसतो, तर बसलेली सामाजिक घडी मोडावी, प्रस्थापित कायदे तोडावेत, घटनाभंग करावा व अराजक माजवावें हेंच त्यांचें अंतिम ध्येय आहे. 'भूमि छीनो' आंदोलनाचा हेतु जमिनीचे कायदे सर्व राज्यांत लागू करण्यास गति मिळावी हा आहे. म्हणून ती गति मिळतांच आंदोलन थांबवलें गेलें पाहिजे व सरकारनेहि मालकांवर निर्बंध लादून शिल्लक जमिनींचें वांटप केलें पाहिजे. तसेंच राज्य-सरकारांना ते कायदे लागू करण्यास भाग पाडलें पाहिजे. तसें न झालें तर मात्र नक्षलवादी चळवळीला शह देतां देतां 'भूमि छीनो' आंदोलनांतून तिला पाठिंबा मिळावयाचा. पश्चिम बंगालमधील नक्षलवाद्यांचा भूमि बळकावण्यामागील रक्तरंजित इतिहास डाव्या पक्षांनी विसरू नये.

पश्चिम बंगालमध्ये नक्षलवाद्यांकडून आजतागायत किती माणसें मारलीं गेलीं ह्याची जी आकडेवारी राज्यसभेंत सांगितली गेली, ती पाहतां अराजकाच्या किती जवळपास आपण आलों आहोंत, तें सहज ध्यानीं येईल. आतापर्यंत एकट्या पश्चिम बंगालमध्ये १०५ व्यक्तींना नक्षलवाद्यांच्या हिंसाचाराला बळी पडावें लागलें. जे २२९१ नक्षलवादी पकडले गेले. त्यांच्याजवळ २ रायफली, १२ बंदुका,

११ रिव्हॉल्व्हर, ९ पिस्तुलें, देशी बनावटीच्या १६ बंदुका, ९१५ काडतुसें, १४१७ बाँब, १०८ ग्रेनेड, १७०० डेटोनेटर्स, ३ मोलोटोव्ह कॉकटेल व किती तरी तलवारी-सुरे-भाले, सापडले. अनेक जमीनदारांना त्यांनी जिवे मारण्याची धमकी दिली असून, निर्घृणपणें त्यांची हत्याहि होते आहे. पालघाटजवळील कोनगाड खेड्यांतील ६३ वर्षांच्या जमीनदाराची अशीच हत्या केली गेली. श्री. नारायण कुट्टी नायर ह्या जमीनदाराला रात्रीं त्याच्या खोलींतून ओढून काढून त्याचें डोकें चौकांत तोडण्यांत आलें. ' नक्षलवादी झिंदाबाद ' अशा घोषणेंतच ही हत्या झाली.

कुट्टी हे जमीनदार खरे, परंतु काँग्रेसच्या चळवळींत सतत भाग घेत आलेले ते एक वृद्ध देशभक्त होते. परंतु आजची कोणतीच सामाजिक व्यवस्था नक्षलवाद्यांना शिल्लक ठेवावयाची नाही. ते साऱ्यांनाच श्रमिकांचे शत्रु मानतात. गांधीजी, रवींद्रनाथ, विवेकानंद हेहि त्यांच्या दृष्टीने श्रमिकांचे शत्रूच होत. त्यांचा बाप एक काय तो माओ, त्याचें तत्त्वज्ञान ही त्यांची गीता व हिंसाचार हा त्यांचा धर्म !

नक्षलवादी म्हणून आपण सर्वांनाच एका माळेंत गोवतों. पण मुख्यतः पुढील विचारांचे गट ह्या पंथांत मोडतात. (१) माओचें तत्त्वज्ञान आणि चिनी कम्युनिस्ट पक्षाचें उघडपणें अनुयायित्व पत्करणारे. (२) भारतीय घटनेचा व घटनात्मक पद्धतीचा निषेध करणारे. (३) शस्त्राचारांनी प्रस्थापित सरकार उलथून पाडण्यावर विश्वास ठेवणारे. (४) ते ज्यांना वर्गयुद्धांतील श्रमिक वर्गाचे शत्रु मानतात त्या व्यक्ति व संस्था ह्यांच्यावर हिंसाचारी हल्ला करणारे. अशा विचारांचे गट आंध्रांत, बिहारमध्ये, म्हैसुरांत, केरळांत व पश्चिम बंगालमध्ये संघटित झाले आहेत. आंध्रामध्ये क्रांतिकारी कम्युनिस्ट समिति व नागी रेड्डी गट आहे. म्हैसूरमध्ये तसाच गट आहे. बिहारमध्येहि त्याची शाखा आढळते. शिवाय बी. के. आझाद यांचा गटहि हिंसाचार करीत आहे. केरळमध्ये क्रांतिकारी कम्युनिस्ट पक्ष, कामगार क्रांतिकारी पक्ष, कुनीकल् नारायण गट आणि पश्चिम बंगालमध्ये ' कमिटी ऑफ कॉम्युनिस्ट रेव्होल्युशन ',' माओइस्ट कॉम्युनिस्ट सेंटर ',' रेव्होल्युशनरी कॉम्युनिस्ट कौन्सिल ऑफ इंडिया ', ' आझाद गट ', ' पूबर हवा गट ', ' कालपुरुष गट ' व ' परिमलदास गुप्त गट, ' अशा किती तरी संघटना आहेत. या साऱ्या नक्षलवादी पंथीयांची आज जरी शक्ति कमी असली, तरी तिच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

खासदार पीतांबरदास ह्यांच्या प्रश्नाला महामंत्र्यांनी " नक्षलवादी गट नामशेष होईपर्यंत आम्ही त्यांचा पिच्छा सोडणार नाही, " हें दिलेलें उत्तर समाधानकारक वाटलें तरी, शब्दाचा व कृतीचा मेळ बसेपर्यंत भारतीय जनतेची मनें अस्वस्थच राहणार. Their deeds are their words ही म्हण लागू पडते फक्त संतांनाच; आणि राजकारण हा कांही साधूंचा खेळ नव्हे, त्याला आपण काय करणार !

नक्षलवाद्यांचा बाप माओ. किंबहुना खरें म्हणजे ते आई-बापच न मानणारे. अशाच एका बिनबुडाच्या इसमाला रेव्हरंड टिळक ह्यांची एकदा चेष्टा करण्याची लहर आली. तो म्हणाला, "तुम्ही ख्रिस्ती धर्मवेडे 'बाप्तिस्मा' काय करतां ? कोणाला कधी तीस बाप व एक माँ (आई) असते काय ?" त्यावर न चिडतां रेव्हरंड टिळक हसत म्हणाले, "अरे ! साऱ्यांनाच तीस बाप व एक आई असते. तूंच कर हिशेब ! पंचमहाभूतें, पंचप्राण, पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, अंतःकरणाच्या चार वृत्ति व एक आत्मा म्हणजे जीवात्मा मिळून झाले पंचवीस व शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे "जनिता चोपनेता च यश्चविद्यां प्रयच्छिति। अन्नदाता भयत्राता पंचैते पितरः स्मृतः।" असे पांच पितर मिळून झाले तीस बाप व सर्वांची जननी ईश्वरीकृपा ही आई ! पण परमेश्वर न मानणाऱ्या तुम्हांला त्याचें काय ? तुम्हांला न आई न बाप !"

रेव्हरंड टिळकांची ही चपराक त्याचें श्रीमुख लाल करून गेली.

पण कशाचाच धरबंद नसलेल्या नक्षलवाद्यांशीं असा युक्तिवाद करून भागणार नाही. त्यांना समजणाऱ्या भाषेंतच त्यांच्याशीं बोललें पाहिजे.

पण तेवढें धैर्य आहे कुणापाशीं !

— केसरी, दि. २३ ऑगस्ट १९७०

अनुक्रम... 7863 ...
क्रमांक 435 ... दि. 31-3-...2

# फुटीर प्रवृत्तींमुळे अराजकाचा धोका

## - ३३ -

एकोणीसशेबहात्तर सालच्या सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत इंदिरा गांधींना संसदेंत पराभूत करण्याची ताकद विरोधी पक्षांत नसली, तरी त्यांच्या स्वतःच्या पक्षांत व देशांत मात्र एक प्रकारचें अस्वस्थतेचें वातावरण निर्माण झालेलें आहे. इंदिराजी राजनीतींत मोठ्या चतुर ठरल्या व भल्याभल्यांना त्यांनी खडे चारले. पण अर्थनीतीमध्ये मात्र त्यांची प्रगति पंडितजींपेक्षा तसूभरहि अधिक झालेली नाही. परिणामी भाववाढीचा व बेकारीचा राक्षस काबूंत ठेवणें त्यांना जड जात आहे.

समाजवादाच्या वाटचालीचा दहा कलमी कार्यक्रम अमलांत आणण्याबाबत त्या प्रतिज्ञाबद्ध असल्या व 'गरिबी हटविण्या'चा त्यांनी लाल किल्ल्यावरून टाळ्यांच्या गजरांत कितीहि पुनर्संकल्प सोडला असला, तरी त्या मार्गावर त्यांचें एकहि पाऊल पुढे पडलेलें दिसत नाही. समाजवादी रचनेची धुरा अर्थमंत्री यशवंतराव यांच्या खांद्यावर टाकून त्या आज मोकळ्या झाल्या आहेत. पण यशवंतरावांना महामंत्र्यांकडून धोरणाची निश्चित दिशा समजल्याशिवाय त्या दिशेने निश्चयाने पावलें उचलणें शक्य होणार नाही.

आज सर्वत्र वस्तूचे भाव वाढत आहेत त्याला प्रमुख कारण म्हणजे कृषिक्षेत्राला व छोटया उद्योगधंद्यांना राष्ट्रीकृत बँकांमार्फत पुरविला जात असलेला पैसा. अनुभवअसा आहे की, हातीं आलेला हा पैसा उत्पादनवाढीच्या कारणीं लागण्याऐवजीं त्यापैकी बराच चैनीच्या व गरजेच्या वस्तु खरीदण्याकडेच खर्च होत आहे. त्यामुळेच भाववाढीला तो कारणीभूत ठरला आहे. हें कर्जवांटप नियंत्रित

केल्याशिवाय या भाववाढीला आळा बसणार नाही. पण मग छोट्या शेतकऱ्यांना पैसा पुरविण्याच्या घोषणेचें काय ?

बेकारीच्या समस्येचेंहि असेंच आहे. भांडवल-संचय आणि श्रमशक्ति यांना आकर्षित करण्याच्या बाबतींत सुवर्णमध्य साधून नजीकच्या काळांत ज्यांतून उत्पादन निघेल अशा योजनांना अग्रक्रम देण्याचें धोरण आखावयास पाहिजे. परंतु त्याहि बाबतींत अशक्त केंद्र-सरकारला राज्यांच्या ओढाताणींत निश्चयाने कांही ठरविणें अशक्य झालें आहे.

विविध राज्यांतील स्थितीहि समाधानकारक नाही व हळूहळू अराजकाकडे देश घसरत चालल्यासारखा दिसतो. पश्चिम बंगालमध्ये कनु संन्याल यांना व त्यांच्या कांही अनुयायांना पकडलें असलें, तरी त्याचा सूड म्हणून नक्षलवाद्यांनी पश्चिम बंगालच्या उत्तर भागांत उभा केलेला हिंसक दहशतवाद काबूंत आणण्यास राज्यपाल धवन व त्यांचें सरकार यशस्वी झालेलें दिसत नाही. पश्चिम बंगालच्या व केरळच्या राजकारणाची आजची स्थिति पाहतां तेथे कधी काळीं स्थिर सरकार येईल याची आशाहि दुरावत चालली आहे. उत्तरप्रदेशांत चरणसिंगांचे 'भाक्रांद' इंडिकेट काँग्रेसशीं हातमिळवणी करून कारभार करीत असलें तरी दोघेहि एकमेकांशीं मत्सराने व 'खाऊ का गिळूं' अशा तीव्र भावनेनेच वागत आहेत. बिहार सरकारच्या काबू ठेवण्यास असमर्थ ठरल्या आहेत. कारखान्यासाठी केंद्र-सरकारने मागितलेली चिंध्या कारभारावर बिहारमधील जमीन गेलीं वर्ष-दोन वर्षें अनेक खेपा घालूनहि ताब्यांत देण्यास बिहार सरकार कसें असमर्थ ठरलें आहे याचा एक सुरस किस्सा मला नुकताच तेल-मंत्रालयांतील एका उच्चपदस्थाने सुनावला. बाकी, ज्या राज्यांत आज काँग्रेस-सरकारें अस्तित्वांत आहेत तीं तरी पक्षाच्या तात्त्विक संघटनेवर दृढ आहेत काय ? खेडोपाड्यापर्यंत पोचविलेल्या सत्तेच्या व पैशाच्या आधारावरच तीं जगत आहेत. दक्षिणेकडील द्र. मु. क.च्या अधिराज्याखालील तामिळनाडूने सार्वभौमत्वाची भावना प्रथमपासून जोपासली आहे व आता स्वतंत्र ध्वजाची मागणी करून या अलगतेचे (Lose Federation at the Centre) चिन्ह जाहीर रीतीने मिरविण्याचा उद्देशहि त्याने व्यक्त केला आहे. जम्मू-काश्मीरला तर घटनेचें स्वतंत्र अस्तित्व दिलें आहे व त्याची जपणूक, अगदी किरकोळ व उपयुक्त अशा चौकशी समितीच्या कायद्याची मर्यादाहि काश्मीरची सरहद्द ओलांडणार नाही इतक्या कसोशीने केली जात आहे. जो कायदा बिहार, बंगाल, उत्तरप्रदेशादि सर्व राज्यांना लागू होऊं शकतो तो काश्मीरला लागू होत नाही. अशीं ही फुटीचीं बीजें अराजकालाच प्रोत्साहन देणार हें उघड आहे.

*

इंदिराजींच्या पक्षांतील तरुण तुर्कांचा गट हल्ली हल्ली त्यांचें नेतृत्व उघडपणें झिडकारतांना दिसतो. राज्यसभेंत प्रश्नोत्तराच्या तासाला खासदार कृष्णकांत यांनी

विचारलेल्या 'सामन्यांच्या मूलभूत गरजा विशिष्ट मुदतींत पुरविण्याबाबतच्या' प्रश्नावर इंदिराजींना छेडतांना श्री. मोहन धारिया, अर्जुन अरोरा प्रभृतींनी कांहीहि भीडमुर्वत ठेवलेली दिसली नाही. श्री. कृष्णकांतांच्या प्रश्नाचा धागा धरून विरोधकांनी केलेल्या आरडाओरडींत स्वपक्षांतील ही मंडळी सामील झालेली पाहून इंदिरा गांधींचा पारा चढला व त्या म्हणाल्या की, "तुम्ही येथे कितीहि आरडा-ओरडा केलात, तरी जनतेला त्याच्याशीं कांहीहि कर्तव्य नाही."

यावर "सभागृहांत आम्ही जनतेचे प्रतिनिधि म्हणूनच बसतों. तेव्हा हे उद्गार सभागृहाचा अपमान करणारे असल्याने महामंत्र्यांनी माफी मागणें त्यांच्या प्रतिष्ठेला शोभून दिसेल," अशी सरळ मागणी सिंडिकेटचे श्री. श्यामाचरण मिश्र यांनी केली. श्री. मोहन धारिया व अर्जुन आरोरा यांनी "महामंत्र्यांचे उद्गार संसदीय लोक-शाहीचा अधिक्षेप करणारे होते," असे सांगून विरोधकांना जणू प्रोत्साहनच दिलें. इंदिराजी सहसा आपला तोल सभागृहांत जाऊं देत नाहीत. पण स्वकीयांनीहि विरोधकांशीं हातमिळवणी केलेली पाहून या वेळीं मात्र त्यांचा तोल गेला.

यावर माझ्या शेजारीं बसलेले खासदार राजू म्हणाले, "तेलगूंत एक गोष्ट आहे. एका नवऱ्याच्या दोन बायका होत्या. एकदा रागाने त्याने त्यांतील एकीला मारलें. त्यावर ती अतीव संतप्त होऊन शेजारणीकडे गाऱ्हाणें घेऊन गेली. ती म्हणाली, "नवऱ्याने मला मारलें याचें दुःख नाही. पण माझ्या सवतीच्या देखत मला मारलें व ती मला हसली याचें दुःख होतें!"

गोकुळअष्टमीच्या सुट्टीनंतर विरोधी पक्षांच्या नेत्यांनी पुन्हा राज्यसभेंत महा-मंत्र्यांकडून माफीची मागणी करून, शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्षाचे नेते म्हणाले, "सभागृहाची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी तरी इंदिरा गांधी यांनी आपल्या उद्गारांबद्दल दुःख व्यक्त करावें."

इंदिरा गांधी शांतपणें उभ्या राहून म्हणाल्या, "सभागृहाच्या प्रतिष्ठेची काळजी विरोधी पक्षांनाहि वाटते हें ऐकून मला आनंद वाटला. मी आजतागायत कधीहि अयोग्य शब्दांनी विरोधकांची संभावना सभागृहांतच काय, पण बाहेरहि केली नाहीं. पण माझ्याकडून माफीची मागणी करणाऱ्या विरोधकांना, ज्या वेळेला त्यांच्यापैकीं एका गृहस्थाने (श्री. राजनारायण) आरडाओरडा करीत अध्यक्षांचें न ऐकतां आपली जागा सोडली आणि तो समोरच्या सेक्रेटरीच्या खुर्चीवर जाऊन बसला तेव्हा सभागृहाच्या प्रतिष्ठेची आठवण झाली असती तर बरें झालें असतें!"

इंदिराजींच्या 'तेव्हा कोठे गेला होता राधासुता तुझा धर्म?' या प्रश्नाने विरोधकांना अगदी भुईसपाट करून टाकलें व ते एकमेकांकडे गोंधळलेल्या नजरेने पाहत तोंडांत मारल्यासारखे स्वस्थ बसले. संसदीय वादांत इंदिराजी गांधी सरस ठरल्या असल्या, तरी बाहेरील राजकारणावरील त्यांची पकड मात्र ढिली होत आहे.

*

नुकत्याच दिल्लींत प्रस्थापित झालेल्या दि इंडियन युनियन मुस्लिम लीगच्या शाखेमुळे राजधानींत साऱ्यांनाच धक्का बसला आहे. इंदिराजी मुस्लिम लीगच्या या चालीकडे सावधानतेने तर पाहतांना दिसत नाहीतच, उलट १९७२ च्या निवडणुकीच्या संदर्भांत लीगला त्या नकळत प्रोत्साहन देत आहेत. इंदिराजींच्या या धोरणाला इंडिकेटमधील जगजीवनबाबूंपासून तरुण तुर्कांपर्यंत साऱ्यांचाच विरोध आहे. मुस्लिम लीगची वाढ देशाला नुसती विघातकच ठरणार नसून, अनेकांच्या दृष्टीसमोर पुन्हा १९४७ पूर्वीची परिस्थिति तरळून गेली तर आश्चर्य नाही. कांही तर असेंहि विचारीत आहेत की, मुस्लिमांना आणखी एक पाकिस्तान हवें आहे काय ?

आज द्र. मु. क. व अकाली दल प्रादेशिक पक्ष म्हणून यशस्वीरीत्या आपापल्या प्रदेशांतील राजकारण चालवीत आहेत. बिजू पटनाईक पुढील निवडणुकींत 'ओरिसा राज्य-पक्षा 'लाच यश मिळण्याचीं स्वप्नें पाहत आहेत. महाराष्ट्रांतहि शेतकरी कामगार-पक्ष काँग्रेसच्या चुकांवर पोसेल. त्याचप्रमाणे आंध्रांत तेलंगणवाद्यांची बरीच वाढ होईल. अशा परिस्थितींत हरिजन नवबौद्धांप्रमाणे मुसलमानांना संघटित करून खास हक्क व जागा कां मिळवूं नयेत, असे लीगचे कांही नेते उघडपणें विचारीत आहेत. कांहींची तर सैन्यांतहि मुस्लिमांची स्वतंत्र पलटण असावी अशी मागणी करण्यापर्यंत मजल गेली आहे. मुस्लिम लीगचे अध्यक्ष श्री. एम्. मोहंमद इस्माईल हे मोठे व्यवहारचतुर नेते आहेत. ते जुन्या मुस्लिम लीगशीं आपलें नातें दर्शविण्यासाठी आजहि 'फेज' कॅप घालून लोकसभेंत मिरवतात. केरळमधील राजकारणाने ते मोठाच धडा शिकले आहेत व इतरत्र तो गिरवल्यास मुसलमानांचा मोठा फायदा होईल हें त्यांनी हेरलें आहे. सर्व राज्यांतून मुस्लिम लीगच्या शाखा स्थापित करून त्या त्या राज्यांतील प्रभावी पक्षांशीं बोलणीं करण्याचा त्यांचा विचार आहे. मुसलमानांच्या हक्कसंरक्षणाच्या मोबदल्यांत मुस्लिमांचीं मतें त्या त्या पक्षाला देण्याचा सौदा ते करूं पाहतात. इस्माईल हे यांत काहीच आडपडदा बाळगीत नाहीत व या राजनीतीने पुढील लोकसभेंत लीगला बऱ्याच जागा मिळविण्याची आशा त्यांना वाटत आहे.

तामिळनाडू, म्हैसूर, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये मुसलमानांची लोकसंख्या नऊ ते चौदा टक्के आहे. केरळांत तेवीस टक्के आहे. बिहारमध्ये वीस टक्के व आसाममध्ये पस्तीस टक्के आहे, तर पश्चिम बंगालमध्ये तीस टक्के आहे. इंडिकेट काँग्रेसला आज जरी त्यांचा सर्वसाधारण पाठिंबा असला, तरी त्यांच्या हक्कांचें संरक्षण करण्यास इंदिरा गांधी कमी पडल्या असल्याने मुस्लिम आता सर्व राज्यांत संघटित झालें पाहिजे असें मुसलमानांचें म्हणणें आहे. इंदिरा गांधी लीगनेच यांच्या मताने त्यांत जातीयवादी असें कांहीच नाही. अल्प-संख्याक जातीने संघटित होणें हें जातीयवादी नसतेच मुळी !

केरळांतील मुस्लिम लीगशीं इंडिकेट छोट्या आघाडीच्या आधारें हातमिळवणी करूं पाहत आहे. उजवा आणि डावा कम्युनिस्ट पक्षहि आपली सरकारें मुस्लिम लीगच्या

साहाय्यानेच बनविण्याचीं स्वप्नें पाहतात. थोडक्यांत, मुस्लिम लीगला केरळांत पासंगाचें स्थान आलें आहे. ज्याच्या बाजूला तें पडेल त्याचें पारडें जड होणार व या स्थानाचा लीग पुरेपूर फायदा उठविणार आहे. मलबारांत लीगने जवळ जवळ पाकिस्तानच बनविलें आहे व हिंदूंना जमिनीवरून घरादारांतून हुसकावलें जात आहे.

मुस्लिम लीगच्या या संघटित चालीने इंदिराजींना पेचांत टाकलें आहे. दिल्लींत भरलेल्या काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनांत हिंदु जातीयवादावर त्यांनी अतिरेकी आग पाखडण्याचा नकळत परिणाम मुस्लिम संघटित होण्यांत झाला आहे. आता त्या मुस्लिम लीगशीं हातमिळवणी करतील, तर बरीच हिंदु मतें त्या जनसंघाकडे ढकलतील. म्हणजे मुस्लिम मतें मिळवावयास जावें, तर हिंदु मतें जाणार व तीं कायम ठेवावीं, तर संघटित मुसलमान धोका देणार, अशा अडचणींत सत्तावादी इंडिकेट आज सापडली आहे.

*

मुस्लिमांच्या आक्रमक धोरणापासून देवहि जेथे बचावले नाहीत तेथे माणसांची काय गत ! काशीचें विश्वनाथ मंदिर काय किंवा मथुरेचें श्रीकृष्ण-जन्माचें स्थळ काय, दोन्ही मशिदींच्या सावलींत नांदत आहेत. राजा कंसाच्या कारागृहाची इमारत ताब्यांत घेऊन वीरसिंहदेवाने केशवाचें मंदिर बांधलें. सिकंदर लोदीच्या आक्रमणापुढे तें जमीनदोस्त झालें. औरंगजेबाचे तर नुसतें मंदिर पाडूनच समाधान झालें नाही, तर तेथे त्याने बडी मशीद उभी केली. औरंगजेबाचीं हाडें महाराष्ट्रांत गाडलीं गेल्यावर बनारसचा राजा पटनीबल याने ती जागा घेऊन बिर्ला बंधु व रामनाथ गोयंका यांच्या साहाय्याने नवें मंदिर मशिदीच्या पाठीस पाठ लावून उभें केलें व आज तें पुन्हा व्रजभूमींतील एक मोठें धार्मिक व सांस्कृतिक केंद्र बनलें आहे.

श्रीकृष्ण जन्माचा दिल्लींतील सोहळा मोठा अद्भुत असतो. लक्ष्मीनारायण मंदिरांतून (बिर्ला मंदिर) भगवान कृष्णाची मिरवणूक निघते. मंदिर लतापल्लवांनी सुशोभित होऊन दिव्याच्या आराशींत लखलखत असतें. सर्वजण म्हणत असतात —

अजन्मा जन्मासी आला कारागारीं, अंधकारीं कृष्णजन्म झाला ।
तम मावळलें तेज फाकलें ।
चारच डोळे दिपून झाकलें ।
अरूप रूपीं उभें ठाकलें ।
देव-दुंदुभी उधळूं लागल्या मंजुळ स्वरमाला ।।

व्रजभूमीचें सान्निध्य स्वाभाविकच इकडे कृष्णभक्तीला उधाण आणतें. श्रीमत्-भागवताने व्रजभूमीला श्रीकृष्णाच्या जीवनाबरोबर प्रतिष्ठित केली. यक्षपुरीतील मथुरा तर 'तीन लोक से न्यारी' ठरली. शेजारची श्रीकृष्णाची लीलाभूमि वृंदावन, तिथे तर वल्लभ-संप्रदायींनी भक्तिरसाची गंगा, यमुनेच्या जोडीने दुथडी वाहत ठेवली. वल्लभ-संप्रदायाचे प्रभु वल्लभदास भागवत अवतार मानले जातात.

तसेच सूरदास, नन्ददास, कृष्णदास, परमानन्ददास या रससिद्ध कवींचीं भक्तिगीतें भाविकांच्या डोळ्यांत प्रेमाश्रु उभे न करतील तरच नवल.

श्रीकृष्ण-जन्मोत्सवाचा हा सोहळा यमुनातटकीं गाजतो तो व्रज लोकमंचामुळे. नौटंकी कलाकार व रासधारी ढोलक, सारंगीच्या पार्श्वसंगीतावर जें नृत्यप्रधान गतिचित्र सादर करतात तें केवळ अद्‌भुतच म्हटलें पाहिजे. लोकप्रिय रासधारी स्वामी हरगोविंदजी तर या रासाला सजीव रूप देत असत व त्यामुळे शरच्चन्द्रिकेंत उभी राहिलेली रासलीला भक्तिभावाने ओथंबलेल्या श्रोत्यांवर जणू रसवर्षाव करी.

सूरदासाने रासाचें हें रूप असें वर्णिलें आहे –

अंगहि कोटि काम छबि लज्जित मार्धनायक गिरिधारी ।
नृप्य करत रस बस एभ दोऊ, मोहन राधा प्यारी ।।
व्रजबनिता मफली बनी यो, सोभा अधिक बिराजै ।
नुपूर कटि किंकिनी चलत गति, अरस परस पर बाजै ।।

या वर्षी ही रासलीला दिल्लींत हिपूसा रोडवरील सराफ बाजारांत केली गेली. तेथून उठलेले सूरदासरचित ‘ मैया मैं नहीं माखन खायो ’चे सूर अवकाशांत भरून राहिले होते.

व्रजभूमीने कृष्ण-राधेबरोबर भक्तालाहि किती आनंदमय केलेलें असतें हें कृष्णजन्माष्टमीला दिसतें. वृक्षलता, पशु-पक्षी, वन-पर्वत, सरीता-सरोवर, सारे आनंदांत डुंबत असतात व ‘ स्याम स्याम की जै ’चे स्वर सर्वत्र गुंजून उठतात.

*

संसदेलाहि श्रीकृष्णजन्माष्टमीची सुट्टी होती. नेहमीची शनिवार-रविवारची, सुट्टी व सोमवारी जन्माष्टमी, अशी तीन दिवसांची सुट्टी संपवून आळसलेल्या अवस्थेंत एकेक खासदार संसदगृहांत दाखल झाले. संसदेंतील बरेंच कामकाज चालतें इंग्रजींतून. पण तेथे वेळीं-अवेळीं हिंदीचा अट्टाहास धरणारे जर कोणी असतील तर ते श्री. राजनारायण. हिंदी ही राष्ट्रभाषा खरी, पण राजधानींतहि ती पदोपदीं अपमानित होत असते.

दिल्ली विद्यापीठाच्या एम्. ए.च्या परीक्षेला इतिहास विषय घेऊन बसलेल्या दोघा विद्यार्थ्यांनी आपल्या उत्तरपत्रिका हिंदींतून लिहिल्या. दिल्ली विद्यापीठाच्या नियमाविरुद्ध त्यांचें हें वर्तन होतें. त्यांनी उत्तरपत्रिका इंग्रजीतूनच लिहावयास पाहिजे होत्या. परिणामीं त्यांच्या पत्रिका न तपासतांच त्यांना नापास करण्यांत आलें. त्यामुळे यासंबंधी राज्यसभेंत राजनारायण यांनी खडाजंगी केली व नंतर सारें सामसूम झालें.

यावर एक मोठें सुंदर उपहासात्मक लिखाण माझ्या वाचण्यांत आलें. एका उत्साही तरुणाला हिंदीचा हा अपमान सहन न होऊन हिंदी धोक्यांत आल्याची जाणीव जनतेला करून देण्याचें त्याने ठरविलें. जनसंघ हा हिंदी राष्ट्रभाषेचा मोठा अभिमानी; म्हणून दिल्लींतील जनसंघ कार्यालयाकडे त्याने आपला मोर्चा

प्रथम वळविला. प्रवेशद्वारापाशीं दरवानाने त्याला हटकलें व दस्तखत 'इंग्रजीं'त करून आंत जाण्यास सांगितलें.

हिंदीचा हा जनसंघाकडून झालेला अधिक्षेप सहन न होऊन तो दरवाज्यांतूनच परत फिरला व निघाला कॅनॉटप्लेसधील इंडिकेटच्या प्रादेशिक कार्यालयाकडे. कार्यालयांत चिटणीस श्री. राधारमणजी आपल्या 'स्टेनो'ला इंग्रजींत ' वी कण्डेम् द अमेरिकन अॅग्रेशन इन् कम्बोडिया ' असा नव्या ठरावाचा मसुदा 'डिक्टेट' करीत होते.

तरीहि त्या तरुणाचा उत्साह भंग पावला नाही. श्री. राजनारायण तर हिंदीचे अभिमानी आहेत, म्हणून त्यांच्याकडे जावें या विचाराने त्या तरुणाने श्री. राज-नारायण यांना गाठून मोठ्या आशेने ' हिंदी संकट में है . . . ' असें सांगण्यास सुरुवात केली. त्याचें बोलणें पूर्ण होऊं न देतांच राजनारायण एकदम म्हणाले, "क्या कहा ? इंदिरा संकट में है। आपके मुहमें दुध-मिठाई।"

तो युवक कपाळाला हात लावून बाहेर पडला. राहतां राहिले सेठ गोविंददास. ते तर हिंदीचे कट्टर अभिमानी. थकल्या पायांनी, पण मनाचा उत्साह टिकवून तो युवक त्यांच्या घराच्या दरवाज्यांत पोचला व सेठ गोविंददासांबद्दल पृच्छा केली. त्याला सांगण्यांत आलें, "सेठजी बाथरूम चले गये हैं, कल आना ! "

बिचारा तो तरुण जो खाली कोसळला तो अजून शुद्धींत आला नाही असें ऐकलें.

हिंदीची ही अशी हेळसांड सर्वत्र चालू आहे. पण रशियाच्या प्रसिद्धि कार्यालयाने दिलेल्या एका मेजवानीच्या वेळी उत्तर कोरिया, रशिया व युनायटेड अरब रिपब्लि-कनांच्या वकिलातींतील अधिकारी हिंदींतून बोलण्याचा कसोशीने प्रयत्न करतांना दिसत होते.

पण यामुळे एक मोठी आफत आली आहे. भारतीयांना अशा या परराष्ट्रीय वकिलातींतील मेजवान्यांत एकमेकांशीं हिंदींत विनोद करून त्याची यजमानांना दाद न लागू देतां जी लज्जत चाखतां येत असे तें यापुढे जमणार नाही.

एकदा एका अमेरिकन वकिलाच्या घरच्या 'कॉकटेल' पार्टींत एका भारतीयाचे लक्ष एका सुंदर तरुणीने आकर्षित करून घेतलें. त्याने त्या तरुणीच्या सौंदर्याबद्दल आपली वाहवा आपल्या मित्राला हिंदींत ऐकवली. जरी समोरच ते अमेरिकन वकील उभे असले, तरी हिंदींत ऐकवलेली वाहवा केवळ आपल्या मित्रालाच कळणारी असल्याने तो खुल्या दिलाने बोलत होता.

"महाशय, आपण ज्या तरुणीबद्दल बोलत आहांत ती माझी पत्नी आहे." तो अमेरिकन वकील हास्यमुखाने आपल्या पाहुण्यांना म्हणाला.

भारतीय पाहुण्याचा चेहरा कसा झाला असेल हें काय मी सांगावयाला हवें !

**– केसरी, दि. ३० ऑगस्ट १९७०**

# लोकशाहींतील नवे महाराज !

## - ३४ -

गेले कित्येक दिवस ज्या प्रश्नासंबंधी उलटसुलट चर्चा होत होती तो भूतपूर्व संस्थानिकांच्या तनख्याचा आणि विशेषाधिकारांचा प्रश्न आता निकालांत निघण्याच्या मार्गावर आहे. त्यासंबंधीचें महामंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी गेल्या बुधवारी लोकसभेंत विधेयक मांडलें आणि घटनादुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या दोनतृतीयांशापेक्षा नऊ मतें अधिक पडून तें संमतहि झालें. अर्थात् राज्यसभेंत त्याचें भवितव्य अजून ठरावयाचें आहे.

महत्त्वाचीं विधेयकें अधिवेशन सरतां सरतां आणायचीं आणि लगबगीने मंजूर करायचीं ही आपली नेहमीची पद्धत इंदिरा गांधी यांनी याहि वेळेला अंगीकारली. जातीयवादी संघटनांवर बंदी घालण्यासाठी दंडसंहितेमध्ये (पीनल कोड) दुरुस्ती करणारें विधेयक, आणि अलिगढ मुस्लिम विद्यापीठविषयक कायद्यांत दुरुस्ती करणारें विधेयक ही आणखी दोन महत्त्वाची विधेयकेंहि अशीच शेवटीं शेवटीं आणण्याचा इंदिरा गांधी यांचा विचार दिसतो.

सिंडिकेटने आपला मोहरा बदलल्याने घटनादुरुस्तीसाठी दोनतृतीयांश बहुमत लोकसभेंत लाभतें की नाही, यासंबंधी अनेक गोटांतून शंका व्यक्त केली जात असतांना, इंदिरा गांधी यांनी हें विधेयक लोकसभेपुढे मांडलें यांत त्यांचा आत्मविश्वास दिसून येतो हें खरें असलें, तरी ज्या पद्धतीने भूतपूर्व संस्थानिकांच्या तनख्याचा प्रश्न निकालांत काढला ती पद्धत फारशी स्पृहणीय म्हणतां येणार नाही. विशेषतः स्वतःच केलेला तह व दिलेला शब्द मोडला जात आहे ही गोष्ट खटकते.

काळाची चाहूल लक्षांत घेतां, भूतपूर्व संस्थानिकांचे तनखे आणि विशेषाधिकार लोकशाहीच्या युगाशीं संवादी नाहींत याबद्दल कोणीहि वाद करणार नाहीं. परंतु संस्थानिकांशी भारत सरकारने या तनख्यांबाबत करार केला होता आणि तो करार घटनेंत अंतर्भूतहि केला होता. अशा परिस्थितींत या कराराचें पावित्र्य सांभाळण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, असा विवेक जर सत्ताधारी पक्षाने बाळगला असता; तर ज्या पद्धतीने हा प्रश्न निकालांत काढण्यांत आला त्यापेक्षा निराळी, उभय पक्षांना सन्माननीय वाटणारी पद्धत नक्कीच शोधून काढतां आली असती. मध्यंतरींच्या काळांत कांही संस्थानिक कदाचित् आडमुठेपणाने वागले असतील हें मान्य केलें तरीहि, स्वतःच केलेले करार पाळण्याची भारत सरकारला पर्वा वाटत नाही, असा जर एखाद्याने निष्कर्ष काढला, तर त्याला चूक म्हणतां येणार नाही व याचे आंतरराष्ट्रीय पडसादहि प्रतिकूल उमटतील.

अर्थात् या बाबतींत संस्थानिकांनीहि कालोचित गरज ओळखून, आपण होऊन आपल्या तनख्यांची आणि विशेषाधिकारांची तरतूद रद्द करावयाला संमति दिली असती, तर त्यांत त्यांचीहि शान राहिली असती. परंतु त्यांनीहि नुकसानभरपाई-बाबत वाटाघाटींचा घोळ घालून इंदिराजीना त्यांच्यावर मात करण्यास संधि दिली.

लोकसभेंत झालेल्या चर्चेच्या वेळीं सरकार-पक्षाच्या समर्थकांनी "संस्थानिक हे कांही देशभक्त नव्हेत, स्वातंत्र्याच्या चळवळीशीं त्यांचा कांही संबंध नव्हता" असें सांगितलें; परंतु वस्तुस्थिति तशी नाही ग्वाल्हेरचे महाराज श्री. माधवरावमहाराज शिंदे, बडोद्याचे श्री. सयाजीरावमहाराज गायकवाड किंवा औंधचे पंतप्रतिनिधि आदि जागरूक संस्थानिकांनी आपलें संस्थान सरकारी रोषाला बळी पडण्याचा धोका पत्करूनहि क्रांतिकारकांना आसरा दिला होता. कै. अण्णासाहेब पटवर्धनांचें चरित्र वाचलें की, क्रांतिकारकांच्या आंदोलनाला संस्थानिकांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत किती होत होती याचा पुरावा मिळतो. अर्थात् सर्वच संस्थानिक स्वातंत्र्यप्रिय होते असें मला म्हणावयाचें नाही. 'उडदामाजी काळे-गोरे' हे असावयाचेच !

*

या वेळी सिंडिकेट काँग्रेसची तत्त्वच्युति पुन्हा एकदा प्रतीत झाली. जनसंघ व स्वतंत्र पक्ष यांच्याशी 'ग्रँड अलायन्स' करून ज्याप्रमाणे सिंडिकेट काँग्रेसने आपल्या सर्वधर्मनिरपेक्ष आणि समाजवादी धोरणाला हरताळ फासला त्याप्रमाणेच या वेळीहि पूर्वी स्वतःच मंजूर केलेला कार्यक्रम, केवळ इंदिरा गांधी यांना विरोध करण्याच्या हट्टापायीं धुडकावून लावला. "संस्थानिकांचे तनखे रद्द करायला आम्हीहि वचनबद्ध आहोंत, परंतु ज्या पद्धतीने हें केलें जातें आहे ती पद्धत आम्हांला मान्य नाही" या मोरारजीभाईंच्या युक्तिवादांत जसें कांहीच तथ्य नाही तसेंच संस्थानिकांशी झालेले करार केवळ तडजोडी होत्या हें यशवंतरावांचें म्हणणेंहि एका बोटावरची थुंकी दुसऱ्या बोटावर दाखवण्यासारखेंच आहे.

या संदर्भांत मला शेक्सपियरच्या पुढील ओळी आठवतात –

Who steals my purse, steals trash; 'tis something nothing;
' Twas mine.' tis his, and has been slave to thousands.
But he that filches from me my good name.
Robs me of that which not enriches him.
And makes me poor indeed.

असें संस्थानिकांनी म्हटलें तर यशवंतरावांचे तोंड कसें होईल बरें !

या चर्चेच्या वेळीं वाग्बाणांच्या ज्या फैरी झाल्या त्यांचाहि उल्लेख करणें आवश्यक आहे.

"या विधेयकावरील मतदानाच्या वेळीं कोण लोकांच्या बाजूने आहे आणि कोण लोकविरोधी आहे हें कळून येईल," असें श्री. यशवंतराव म्हणतांच एक सदस्य उद्गारले, "तसें असेल तर आपण या विधेयकावर जुन्या संस्थानांतील लोकांचें मत घ्यावें म्हणजे आपल्याला लोक काय म्हणतात तें कळून येईल."

लागलीच इंदिरा गांधी म्हणाल्या, "संस्थानिकांनी आपल्या प्रजाजनांना मुद्दामच मागास अवस्थेंत ठेवलेलें असल्यामुळे ते ही भाषा बोलत आहेत."

घटनादुरुस्तीचें विधेयक मंजूर झाल्यानंतर नभोवाणी व माहिती खात्याचे राज्यमंत्री श्री. इंद्रकुमार गुजराल यांनी सिंडिकेट काँग्रेसचे श्री. एस्. एन्. मिश्र यांचें 'सांत्वन' केलें.

स्वातंत्र्यानंतर संस्थानिकांचे सवते सुभे वल्लभभाईंच्या मुत्सद्देगिरीने नष्ट झाले. भारत एकसंध झाला. संस्थानिकांनी त्या वेळीं केलेल्या त्यागाच्या हिशेबांत त्यांना दिलेले तनखे व खास सवलती अगदीच किरकोळ होत्या. पण परिवर्तनवादी समाजांत हाहि 'खास'पणा समतेला बाधक मानला गेला व जुने करार रद्द ठरविले गेले. आजवर 'राजा कालस्य कारणम्' असें निश्चयाने म्हटलें गेलें असलें व 'महाराणी' इंदिराजीपुरतें तें खरें असलें तरी, कालहि राजांचें भवितव्य ठरविण्यास कारणीभूत झाला. 'कालो वा कारणं राज्ञः' असें संस्थानिकांपुरतें म्हणावें लागेल. ते संस्थानिक गेले, त्यांचा डामडौल गेला, ते रथपदाती गेले, ते गाडीघोडे गेले, त्या मेजवान्या संपल्या व आता तनखे व सवलतीहि जाऊन सामान्य नागरिकांत ते जमा झाले.

कै. तात्यासाहेब केळकर एकदा एका संस्थानिकाकडे भोजनाला गेले असतांना जेवतांना संस्थानिकमहाशय प्रथमपुरुषी अनेकवचनांत म्हणजे 'आम्ही असें बोलतों,' 'आम्ही अमुक-तमुक करतों' वगैरे गोष्टी सांगत होते.

अशाच एका अतिरंजित गोष्टीच्या वेळीं तात्यासाहेबांनी त्यांना मधेच अडवून दुरुस्ती केली. राजेसाहेब रागावले व म्हणते झाले की, "आम्ही बोलतांना मधे कोणी बोललेलें आम्हाला खपत नाही."

कै. केळकर यावर उत्तरले की, "वृत्तपत्राचा संपादक म्हणून मी स्वतःलाहि 'आम्हीच' म्हणवितों आणि जर कोणी केवळ अधिकाराच्या जोरावर बेशक अनधिकृत व बेजबाबदार विधानें करावयास लागला, तर त्याला अडवून खरेपणाबद्दल आव्हान केल्याशिवाय पुढे जाऊं देण्याची आमची पद्धत नाही."

कै. तात्यासाहेब केळकरांनी जसें त्या 'आम्हीवाल्या' खाशांना गप्प केलें तसेंच इंदिरा गांधी यांनीहि घटनादुरुस्तीचें विधेयक मंजूर करून घेऊन सध्याच्या 'आम्हीवाल्या' खाशांची मिजास सर्वस्वीं उतरवली.

*

राजे-महाराजांचे तनखे व हक्क एका बाजूला रद्द केले जात असतांना, लोकशाहींतील नव्या राजे-महाराजांच्या मिळकतींत आणि खर्चांत मात्र भरमसाट वाढ होत आहे व त्याकडे सोयिस्कर डोळेझाकहि केली जात आहे. लोकशाहींतील हे नवे राजे-महाराजे म्हणजे मंत्री! केंद्रीय तसेंच राज्यांतील मंत्र्यांचे हे ताफे, पोलिसांचे सलाम घेत व अधिकाऱ्यांचा वेळ खात, मोटारीवरील तिरंगे फडकावीत, जेव्हा साऱ्या देशभर हिंडतांना दिसतात, तेव्हा राजेशाही नष्ट झाली यावर विश्वास तरी कसा ठेवावा? चाकाचे आरे वर-खाली झाले इतकेंच!

गेल्या दहा वर्षांत मंत्र्यांच्या ताफ्यावरील खर्च दुपटीपेक्षाहि अधिक झाला आहे. १९६१ मध्ये या देशांतील मंत्र्यांची एकूण संख्या होती २९४ ती १९७० मध्ये झाली आहे ४५५. संयुक्त दलांचीं सरकारें राज्यांतून जितकीं वाढतील तितकी ही संख्या वाढतच जाणार आहे. या सर्व मंत्र्यांचें वेतन, भत्ते, वैयक्तिक खर्च व बडेजाव यांची रक्कम गेल्या १० वर्षांत १॥ कोटीने वाढून ती आता २ कोटि ७० लक्षांच्या घरांत गेली आहे. या आकड्यांत जम्मू-काश्मीरच्या व केंद्रीय सत्तेखालील प्रदेशांतील मंत्र्यांचे खर्च अंतर्भूत नाहीत. ते केले तर ही रक्कम आणखीच फुगलेली दिसेल. द्र.मु.क. सरकारच्या मंत्र्यांनी आपल्या वेतनांत ५०० रु.ची कपात घोषित केली असली तरी, इतर खर्चांत व भत्त्यांत कांहीच कमतरता ठेवलेली नाही. नंबुद्रिपाद सरकारचे मंत्री सुरुवातीच्या काळांत हिंडत होते साध्या सायकलवरून. पण पुढे करुणानिधींचे तामीळनाडूमधील सहकारी मंत्री काय किंवा नंबुद्रिपादांचे केरळमधील सहकारी काय, दोन्ही ठिकाणी लाचलुचपतीची वाढ होऊन, अखेरी राजकारणाच्या आधारे मंत्र्यांचे राजीनामे घेण्याचाच प्रसंग आला. मंत्र्यांच्या खिशांत पैशाचा ओघ वाहण्यास प्रवास-भत्त्यासारखा सुकर मार्ग नाही. स्वाभाविकच मंत्र्यांच्या सर्व खर्चांत अधिकांश खर्च आहे प्रवासाचा!

मंत्र्यांच्या या दौऱ्यांत बिचाऱ्या पोलिसांना अन्नपाण्यावांचून ताटकळत मंत्रिमहाशयांच्या मोटारीची वाट पाहत बारा-बारा तास उभे राहण्याची जणू शिक्षाच दिलेली असते. ठिकठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांना तर येणाऱ्या-जाणाऱ्या

मंत्र्यांच्या अखंड रांगेला तोंड देतां देतां स्वतःच्या कारभाराकडे लक्ष पुरविणेंहि अशक्य होऊन जातें. पण करणार काय ? वाढत्या खर्चाची तोंडमिळवणी करण्या-साठी अपुऱ्या पगारांत जनतासंपर्काच्या दौऱ्यांची भर घालून मंत्र्यांना करावी लागते. स्वाभाविकच त्याचा ताण अधिकाऱ्यांना व पोलिसांना सहन करावा लागणारच !

१९६०–६१ मध्ये ५ संसदीय सचिवांसहित ४७ केंद्रीय मंत्री देशांत जनसंपर्क साधत जेव्हा फिरत होते तेव्हा त्यांचा खर्च १९ लाख रुपये होता. तोच आता ५६ केंद्रीय मंत्र्यांवरील खर्च ३० लाख रुपयांच्या घरांत गेला आहे. राज्याराज्यांतील अवस्थाहि केंद्रापेक्षा वेगळी नाही. गुजरातमधील मंत्र्यांचा खर्च ८ लाखांवरून १४ लाखांवर गेला आहे. मध्यप्रदेशांतील मंत्र्यांचें वेतन केवळ ५ लाख १९ हजारांवरून १० लाख २१ हजारांवर गेलें आहे. महाराष्ट्रांत मंत्र्यांचें वेतन २ लक्ष ८८ हजारां-वरून ५ लाख ३ हजारांवर गेले आहे, तर प्रवासभत्ता ४ लक्ष १६ हजारांवरून १२ लक्ष ५५ हजारांवर गेला आहे. म्हैसूरने या बाबतींत तर खूपच आघाडी मारली आहे. तेथील मंत्र्यांवरील खर्च ४ लक्ष ११ हजारांवरून २८ लक्ष ५० हजारांवर गेला आहे व या वाढींत मुख्यतः मंत्र्यांचे भरमसाट भत्ते अंतर्भूत आहेत.

ही आकडेवारी डोळ्यांखालून घालीत असतां मला मागील एक घटना आठवली. पं. नेहरूंच्या महाराष्ट्रांतील एका दौऱ्यावर झालेल्या खर्चाची आकडेवारी सरकारी दप्तरांतून आमच्या हातीं आली व ती आम्ही छापली. तो अफाट खर्च पाहून 'केसरी'च्या वाचकांचे तर डोळे फाटलेच, पण सरकारी अधिकाऱ्यांची व महाराष्ट्रांतील तत्कालीन मुख्य मंत्र्यांचीहि मोठी धांवपळ उडाली. गुप्त कागद प्रसिद्ध केल्याबद्दल 'केसरी'वर दावा लावण्याचा विचार सुरू झाला. परंतु शेवटीं 'तेरी बी चूप मेरी बी चूप' करणेंच हिताचें होय असा सल्ला मिळून हें प्रकरण थंडावलें.

लोकशाहींतील या राजेमहाराजांच्या बडदास्तीसाठी जनतेने हें सारें सहन केलें पाहिजे. मंत्रिमहाशय तरी काय करणार ! त्यांना राज्य तर केलेंच पाहिजे. देशांतच सर्वत्र जेथे लाचलुचपत, उधळपट्टी बोकाळली आहे तेथे गावांत राहून गावाशीं ते वैर तरी कसें करणार ! त्यामुळे तेहि त्यांत सामील होतात.

एका राजाला त्याच्या प्रधानाने जुन्या काळांत केलेला उपदेश आजचे राज्यकर्तेहि तंतोतंत पाळीत आहेत. एका राज्यांतील तळ्याचें पाणी बिघडलें. तें पाणी पिऊन राज्यांतील सारे लोक वेडे झाले. राजाने प्रधानाला विचारलें, "अमात्यमहाशय, या साऱ्या वेडपटांवर राज्य तरी कसें करावें बरें ?"

अमात्य कांही काळ विचारमग्न झाले व म्हणाले – "महाराज, आपण आणि मी दोघेहि जाऊन त्या तळ्याचें चुळका-चुळका पाणी पिऊं. तें पाणी प्यावयाचें आणि राज्य करावयाचें !"

आजचे मंत्रीहि तोच कित्ता गिरवीत आहेत.

*

देशांत जेथे सर्वत्रच स्वार्थाचा बुजबुजाट झालेला आहे, तेथे देशाच्या सुरक्षिततेचा विचार कोणाला सुचणार व त्यासाठी सवड तरी कोठे आहे? परंतु सर्वच कांही अजून साफ बिघडलेलें नाही आणि त्यामुळेच आशेला थोडीफार जागा आहे.

संरक्षणासाठी अणुबाँब तयार करण्याबाबत जनसंघीय खासदारांनी धरलेल्या आग्रहाला महामंत्र्यांनी दिलेलीं उत्तरें, शब्दांमध्ये लपवलेला अर्थ नीट जाणला, तर खूपच समाधानकारक मानतां येणारीं आहेत. "अणुशक्तीवरील संशोधन देशांतील प्रयोगशाळांतून अद्ययावत् साधनानिशी चालू आहे व संशोधनांतील ही प्रगति अजमावतांना देशसंरक्षणाची गरज आम्ही कधीच विचाराआड होऊं देत नाही," हे इंदिराजीनी राज्यसभेंत काढलेले उद्‌गार महत्वाचे होत. 'शांततेसाठी अणु' हें आमचें घोषवाक्य उच्चरवाने वारंवार सांगतांना संरक्षणाची जाणीव सतत मनी राखली असेल, तर बरेच कांही घडूं शकेल.

हीच संरक्षणाची जाणीव भारताच्या भू-सीमांबरोबर सागरी सीमांबाबतहि बाळगावयास हवी. पण दुर्दैवाने त्याकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. हिंदी महासागरांतून ब्रिटिश नौसेना-तळ उठविले गेल्यापासून रशियाने तेथे हातपाय पसरवण्यास सुरुवात केली आहे. हिंदी महासागरामध्ये व अरबी समुद्रामध्ये रशियन आरमारांच्या या हालचाली नुकत्याच पॅरिसच्या एका वृत्तसंस्थेने प्रकाशांत आणल्या आहेत. त्यानुसार रशियन नौ-सेनेचीं वीस जहाजें हिंदी महासागरांत व अरबी समुद्रांत वावरत आहेत. त्यांपैकी चार ते सहा जहाजें प्रक्षेपणास्त्रांनी सज्ज असून, तीं 'किण्डा व कुपनी' श्रेणींतील आहेत. याशिवाय तीन 'कार्टोलन' श्रेणींतील आहेत. आठ जहाजें सागरी विज्ञानाच्या संशोधनासाठी हिंडत असून, अमेरिकेच्या सुप्रसिद्ध 'प्युबलो' प्रमाणे ती सुसज्ज आहेत. चार पाणबुड्या समुद्रतळ धरून हिंडत असून, त्यांतील एक परिमाणु-शक्तिचलित आहे. सोव्हिएट नौ-सेनेच्या या जहाजांच्या साहाय्याने एक रूसी बटालियन आवश्यक त्या सर्व शस्त्रांनिशी कोठेहि उतरवतां येईल या दृष्टीने तटवर्ती देशांतून रशियाला नौ-सेनेचे कांही अड्डे उभे करण्याची गरज भासत आहे व तो त्याच्या शोधांत आहे. सिलोनमधील श्रीमती बंदरनायके-सरकारकडे रशियाने त्रिंकोमाली बंदराचा परवाना मागितला आहे तर मॉरिशसच्या रामगुलाम-सरकारकडे मच्छीमारीच्या सहकार्याने हवाई अड्ड्याची मागणी केली जात आहे. हिंदी महासागरांतील व अरबी समुद्रांतील रशियाच्या वाढत्या प्रभावामुळे ब्रिटन चिंतेंत असलें, तरी भारत सरकारची आत्मसंतुष्टता दूर झालेली नाही.

लोकसभेंतील संरक्षणमंत्र्यांचें उत्तर तर मासलेवाईकच होतें — "आंतरराष्ट्रीय जलप्रदेशांतून वाहतूक करण्यास कोणी कोणास मनाई करूं शकत नाही." रशियाचें

अंतरिक्षयान 'जोड–५' मॉरिशसच्या आसपास उतरवलें गेलें व रशियाच्या नौ-सेनेच्या जहाजाने तें मुंबईला आणून तेथून जेव्हा रशियांत रवाना केलें तेव्हाच सर्वांना हें कळलें होतें की, आंतरराष्ट्रीय जलप्रदेशांत कोणी कोणाला मनाई करूं शकत नाही. नौ-सेनेबाबत दुबळा असलेला भारत तर नाहीच नाही.

*

राजकारणांत बेछूट उत्तर देण्यासहि धैर्य लागतें. तें धैर्य मंत्र्यांनी कमावलें आहे. देशांत लक्षावधि नागरिक अर्धपोटीं असतांना प्रवासावर व बडेजावावर कोटयवधि रुपये उडविणारे मंत्री नुसते बेछूटच काय, पण नंगेहि आहेत. या नंगे-पणाला लागणारें मानसिक धैर्य राजकीय क्षेत्रांत सत्ताधाऱ्यांनी जसें कमावलें आहे, तसें सामाजिक क्षेत्रांत 'मुक्तोथवापशु'समान 'हिप्पी'च्या नग्न संस्कृतीने कमावलें आहे. स्वीडन-डेन्मार्कमधून अगदी गोव्याच्या किनारीं त्यांची आयात झाली आहे. आदिमानव 'आदाम-ईव्ह'च्या काळापर्यंत त्यांचें 'निसर्गप्रेम' जाऊन पोचलें आहे.

आदामला एकाने विचारलें, " काय रे बाबा, तुला पुनर्जन्म लाभला तर काय होईल ? नाही तरी अनेक जन्मांचा ग्रंथ म्हणजेच हे मानवी जीवन आहे ना ? "

आदाम म्हणाला, " काय होईल काय विचारतोस ? तें 'पान' पुन्हा उलटलें जाईल इतकेंच ! "

आधुनिक काळांतील ईव्ह या उत्तराने लाजून अधोमुख होईल अशी आपली अपेक्षा असल्यास तीं नक्कीच प्रतिगामी ठरणार आहे.

– केसरी, दि. ६ सप्टेंबर १९७०

# निमित्त संस्थानिकांचें, डाव सत्तास्पर्धेचा

- ३५ -

राज्यसभेचें सारें प्रेक्षाकक्ष कधी नव्हे तें गेल्या शनिवारीं पूर्णपणें भरलें होतें. पहिल्या रांगांवर राजे, राण्या, युवराज, युवराज्ञी ही राजघराण्यांतील मंडळी गंभीर चेहऱ्याने बसली होती. कांहींच्या नाजूक प्रकृतीला प्रेक्षाकक्षांतील हा गजबजाट व ऊष्मा सहन होत नसल्याने हातांतील परवाना-पत्राचा पंख्यासारखा उपयोग करून, ही मंडळी सारखा वारा घेत होती.

लोकसभेच्या सदस्यांसाठी राखून ठेवलेली कक्षाहि काठोकाठ भरली होती. राज्यसभा लोकसभेच्या पावलावर पाऊल टाकून वागते का, हें वरिष्ठ सभागृह 'आस्ते कदम'चा इशारा देतें, याकडे स्वाभाविकच त्यांचें लक्ष लागलें होतें. पत्रकारांच्या कक्षेंत गर्दी होती यांत तर कांहीच नवल नाही. कारण इतकी भावना प्रक्षुब्ध करणारी, खळबळजनक वार्ता क्वचितच प्रत्यक्ष अनुभवावयाला मिळणार होती आणि झालेंहि तसेंच! कांहीशा अनपेक्षितपणें व केवळ एका मताच्या तेहतीस अंशांनी लोकसभेने संमत केलेलें २७८ माजी नरेशांचे तनखे व विशेषाधिकार रद्द करणारें घटनादुरुस्ती विधेयक राज्यसभेने नामंजूर केलें.

घटनादुरुस्तीच्या या विधेयकावर राज्यसभेंत दोन दिवस चर्चा झाली. चर्चेत विशेष असे मुद्दे कोणतेच चर्चिले गेले नाहीत व तें संभाव्यहि नव्हतें. धांवपळ चालली होती ती सभागृहाच्या बाहेर. राज्यकर्त्या पक्षाचे राज्यसभेंत अवघे अठ्ठयाऐंशी सभासद आहेत. त्यामुळे घटनादुरुस्तीचें विधेयक संमत करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या दोनतृतीयांश बहुमतांसाठी त्याला इतर पक्षांवर व अपक्षीय सदस्यांवर अवलंबून राहवें लागलें. राज्यकर्त्या इंडिकेटची स्थिति लोकसभेपेक्षा राज्यसभेमध्ये

जरी अशी नाजक असली, तरी आपण आवश्यक तें दोनतृतीयांश वहुमत मिळवूं असा आत्मविश्वास इंदिराजींच्या ठिकाणीं प्रतीत होत होता व तो खोटाहि नव्हता. त्यांचें भाषणहि आपल्या धोरणावर व मार्गावर आत्मविश्वास दर्शविणारें झालें. गेल्या दोन वर्षांत इंदिराजीचें इतकें चांगलें व वैचारिकदृष्ट्या सुस्पष्ट भाषण मीं ऐकलें नाही.

राज्यसभेंतील चर्चेला उत्तर देणाऱ्या आपल्या भाषणाची सुरुवात त्यांनी विनोदाचा शिडकावा देऊन केल्याने सभागृहांतील ताण एकदम कमी झाला. विरोधी पक्षाचे नेते श्री. श्यामनंदन मिश्र हे कपाळावर केशरी तिलक लावून दाखल झाले होते. त्याचा उल्लेख करून इंदिराजी हसत हसत म्हणाल्या, "श्यामनंदन आज पूजा करून व कपाळीं तिलक रेखून, मोठ्या तयारीनिशी देवाला साकडें घालून सभागृहांत आले आहेत." श्यामनंदन मिश्र यांनीहि हा अहेर तशाच विनोदी शब्दांत साभार परत केला. ते मिष्किलपणें म्हणाले की, "इंदिराजी पुरुषांचा चेहरा जितका बारकाईने न्याहाळतात तितकीच त्यांच्या भावनांची त्यांनी कदर केली तर बरें होईल. आज त्याहि राजज्योतिषाला विचारून शुभदायक अशा रंगाची साडी व रुद्राक्षांची माळ घालून सभागृहांत आल्या आहेत." यावर उठलेला हास्यलोट विरतो न विरतो तोंच मधेच उठून जनसंघाचे वृद्ध नेते पीतांबरदास म्हणाले, "पण शामनंदन कधीच मागणी करीत नाहीत, ते नेहमीच विरोध करतात." आणि पुन्हा एक हास्याची लकेर सभागृहांत फिरली.

विनोदी व दिलखुलास वातावरणांत सुरू झालेलें हें इंदिराजीचें भाषण मात्र विरोधकांना सर्वस्वीं हतप्रभ करण्याइतकें प्रखर होतें. त्या म्हणाल्या, "समाजाचा दृष्टिकोन बदलत असतांना कालहत ठरलेली ही सरंजामदारी नष्ट होणें इष्ट व अगत्याचें आहे. नरेशांविरुद्ध माझा व्यक्तिगत रागलोभ कांहीच नाही. माझा विरोध आहे तो सरंजामदारी पद्धतीला ! माणसामाणसांतील विषमतेला माझी कधीच मान्यता मिळणार नाही. आम्ही लोकांचें नेतृत्व करतों हें चुकीचें आहे. उलट लोकांनीच आम्हाला आमचा मार्ग उजळून दाखविला आहे. समाजपरिवर्तनाचा हा मार्ग अनुसरतांना वाटेंतील धोके मला कळत नाहीत असें नाही; तरीहि हा मार्ग मी बुद्धया पत्करला आहे. सामाजिक परिवर्तनाचा हा पुढे पुढे धांवणारा ओघ आता कोणालाहि परतवणें शक्य नाही. संस्थानिकांनीहि काळांतील हा वदल ध्यानीं घ्यायला हवा. इंग्लंडमध्ये जेव्हा प्रथम मोटार आली तेव्हा घोडा-गाडीवाल्यांनी तिला विरोध केला, पण त्यामुळे वैज्ञानिक प्रगति कांही थांबली नाही, सामाजिक परिवर्तनें अडली नाहीत. जे गाडी-घोड्यांतच अडकून पडले ते नष्ट झाले. नरेशांची तनखावंदी रद्द करण्यासाठी येथे विधेयक आणण्याची गरज नव्हती, पण तरीहि जनतेचें मत अजमावणें लोकशाहींत इष्ट असतें."

जनसंघाच्या व सिंडिकेटच्या नेत्यांकडे वळून त्या म्हणाल्या, "कोणीच या विधेयकामागील तत्त्वाला विरोध केला नाही. सिंडिकेटचे नेते, ज्या पद्धतीने विधेयक

आणलें जात आहे, तिला विरोध करीत आहेत. त्यांना तत्त्व मान्य, पण तपशील अमान्य आहे. कारण त्यांना जनतेलाहि खूष करावयाचें आहे व नरेशांनाहि खूष राखावयाचें आहे.

जनसंघालाहि सरंजामदारी पद्धतीबद्दल प्रेम नाही. पीतांबरदास यांनी तें स्पष्ट केलें आहे. पण त्यांना करार-भंग राष्ट्राची अप्रतिष्ठा करणारा वाटतो. पीतांबरदास आपल्या भाषणांत म्हणाले होते —

दुनियाके मुसाफिरखानेमे मेहमान बदलते रहते ।
मगर दस्तुर नही बदलता फरमान बदलते रहते ।।

पण या दोघांनीहि लक्षांत ठेवावें की, शब्दचलाखीने कांहींना कांही काळ फसवतां येतें, पण सर्वांना सर्वकाळ फसवतां येत नाही. ''

मद्रासचे भूतपूर्व महापौर व सिंडिकेटचे राज्यसभेंतील एक नेते चिगलवरयन् हे पट्टीचे वक्ते आहेत. पण या वेळीं बोलतांना त्यांची गाडी कांहीशी घसरली होती. ते म्हणाले, " सार्वभौम नरेशांना महामंत्र्यांनी सामान्य नागरिकांच्या नीच पातळीला आणून पोचविलें. " त्यांच्या या उद्गारांचा उल्लेख करून इंदिराजी तिरस्कृत आवाजांत म्हणाल्या, " ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली मानहानिकारक जीवन जगणाऱ्या नरेशांनी स्वतःला सार्वभौम म्हणून घ्यावें हा त्या शब्दाचा अपमान आहे. आम्ही त्यांना सामान्यांच्या नीच पातळीवर उतरवलें नसून, लोकशाहींतील मानाच्या उच्चपदीं सामान्यांबरोबर चढवलेलें आहे. इंग्लंडमध्ये लॉर्ड वेजवुड बेंन यांच्यासारख्यांनी आपल्याला सामान्यांच्या सभागृहांत बसतां यावें म्हणून आपल्या उमरावपदाचा त्याग करण्यासाठी झगडा केला, तर येथे मात्र सरंजामदारीचे पुराणे अवशेष टिकवूं पाहण्यासाठी माणसें झगडत आहेत. "

इंदिराजी तसेच श्री. भूपेश गुप्त आदि त्यांच्या साह्यकर्त्यांना राज्यसभेंतील विजयाची इतकी खात्री होती की, इंदिराजींचा आवाज जनसंघ-सिंडिकेटवर टीका करतांना चढतांच श्री. भूपेश गुप्त उठून म्हणाले, " विजयकाल हा पापकाल असतो म्हणून या वेळीं आपण आपला संयम ढळूं देतां उपयोगी नाही. " पण भविष्यांत कांही वेगळेच वाढून ठेवलें होतें व दैवाचे असे कांही फासे पडत होते, परिस्थितीची अशी कांही कोंडी बनत होती की, आशेचें निराशेंत व विजयाचें पराजयांत लवकरच रूपान्तर होणार होते.

इंदिराजीच्या उत्तराच्या भाषणानंतर मतदानाचा मुहूर्त उभा ठाकला. लॉबीमध्ये बसलेले खासदार आंत आले. जनसंघाचे श्री. श्रीकांत मिश्र यांना स्ट्रेचरवर घालून सभागृहांत आणलें. के. के. शहा, रघुरामय्या, ओम् मेहता यांची विधेयकाच्या बाजूची खासदार मंडळी सभागृहांत आणण्याची धांवपळ अखेरपर्यंत चालूच होती. फोन होत होते, कलकत्त्याचे विमान दिल्लींत वेळीं न पोचण्याची

कारवाई यशस्वी झाली होती. पुन: पुन्हा डोकीं मोजलीं जात होतीं. अपक्षीय उमेदवारांची दुतर्फी खेचाखेच चालू होती.

अपक्षीय उमेदवारांच्या हातीं या वेळीं पारडें फिरविण्याची शक्ति दैवाने दिली होती. नियुक्त व निवडलेले गेले असे पंचवीस अपक्षीय सदस्य सभागृहांत आहेत. नियुक्तांपैकी श्री. छगला व श्री. सेटलवाड हे विधेयकाच्या विरुद्ध होते. सेटलवाड गैरहजर राहणार होते आणि छगला विरुद्ध मत देणार होते. निवडून आलेल्या अपक्षीय सदस्यांवर त्या त्या राज्यांचें खूपच दडपण होतें. त्यांपैकी म्हैसूर आणि गुजरात हीं दोन्ही राज्यें आहेत सिंडिकेटच्या हातीं. तेथील मुख्य मंत्र्यांपासून त्यांच्या राज्यसभेंतील सदस्यांपर्यंत साऱ्यांनी अपक्षीय सदस्याभोवतीं फेर धरला होता. त्यामुळे हे सदस्य भांबावून गेले व शेवटीं त्यांपैकी एखाद दुसरा अपवादा-दाखल सोडला, तर बाकीचे सिंडिकेटच्या दडपणाला बळी पडून विधेयकाच्या विरोधी मत देते झाले. माझ्या अलीकडे-पलीकडे बसणारे म्हैसूरचे श्री. नारायण, श्री. मल्लगौडा, श्री. पोतदार व गुजरातचे श्री. पटेल यांनी विरोधी मतें दिलीं, तर श्री. महिदा गैरहजर राहिले.

लोकसभेंत संस्थानिकांची आघाडी कांहीशीं ढिलेपणाने वागली. पण या वेळीं धांगध्राच्या महाराजांपासून भानुप्रकाशसिंगांपर्यंत साऱ्यांनी कसून मेहनत घेतली.

तडजोडीचीं बोलणीं त्यांनी अशा शहाणपणाने व एकजुटीने अगोदर केलीं असतीं, तर हा प्रश्न कदाचित् अधिक प्रतिष्ठेने सुटला असता. नाही तर वाघ-कोल्ह्यासारखेंच हें भांडण होतें. वाघ अखेरीस खाणार हें ओळखून मुत्सद्देगिरी उपयोजावयास हवी होती.

वाघें उपदेशिला कोल्हा सुखें खाऊं द्यावें मला।
अंतीं मरसी न चुके मजहि मारितोसी भुके।।

यावर संस्थानिकांनी सांगावयास हवें होतें —

येरू म्हणे भला भला निवाडा तुझ्या मुखें झाला।
देह तव जाणार घडेल हा पर-उपकारा।।

परंतु संस्थानिकांनी मुत्सद्देगिरी न दाखवतां वर्मावर बोट ठेवण्याचा आततायी मार्ग अनुसरला आणि त्यामुळे संतापून जाऊन इंदिराजींनी संसदेंत तनखेबंदीसंबंधीचें विधेयक आणलें.

पण खरें बलवान् ठरलें तें दैव ! श्यामनंदन मिश्र यांनी म्हटल्याप्रमाणे राज-ज्योतिष्याने सांगितल्याप्रमाणे साडीच्या रंगाने व रुद्राक्षांनी शुभ बदल घडविण्याचा प्रयत्न करूनहि इंदिराजींना दैव अनुकूल झालें नाही. इंडियन एअरलाईन्सच्या संपांत संस्थानिकांच्या कारवाईची भर पडल्याने श्री. चतर्जी आणि श्री. सेनगुप्त पश्चिम बंगालमध्येच अडकून पडले, तर द्र. मु. क.चे राजेन्द्रन् यांना मतदानासाठी लॉबीचे दरवाजे बंद होईपर्यंत सभागृहाची वाटच सापडली नाही.

मतदानाची घंटा वाजली आणि साऱ्यांची उत्सुकता शिगेला पोचली. मत-मोजणी करणाऱ्या विद्युत्-यंत्राचे हिरवे-तांबडे-पिवळे दिवे फलकावर लुकलुकूं लागले आणि आकडा आला – १४४ बाजूचे, ७२ विरोधी व १ तटस्थ. कोणालाच कांही समजेना ! जिकलें कोण ? हरलें कोण ? वादळाने जसें समुद्राचें पाणी खाली-वर होतें तशा आशा-निराशेने पछाडलेल्या वृत्ति खाली-वर होऊं लागल्या. इतक्यांत टेलर्सचा आकडा त्यांत मिळवला जाऊं लागला. १४८ बाजूचे आणि ७५ विरोधी झाले. श्री. गंगाबाबू सिन्हा यांनी आपलें तटस्थ म्हणून नोंदलें गेलेलें मत विधेयकाच्या बाजूचें असल्याचें सांगितलें. विधेयकाच्या बाजूने १४९ मतें झालीं तरी शेवटीं घडा भरला नाहीच. एकतृतीयांश मताने तो कमीच राहिला.

इंदिराजी या गोंधळाच्या काळांत सारा वेळ गंभीर चेहऱ्याने सभागृहांत बसून होत्या. विधेयक नामंजूर झालें तरी, दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक बोलवावी, खास अधिवेशन बोलवावें, दोनतृतीयांश बहुमत फक्त तिसऱ्या वाचनाला लागतें, अंशात्मक आकडा एकद्वितीयांशाखाली असेल, तर तो शून्य मानावा आदि चर्वित-चर्वण चालू होतें. भावनांची प्रक्षुब्धता वाढून आरोप-प्रत्यारोप होत होते. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी श्री. पाठकांभोवतीं कोंडाळें केलें होतें. सभागृहांत एकच संगर माजलें होतें. तांडव चाललें होतें.

अखेरीस पाठकांनी निर्णय जाहीर केला. विधेयकाला आवश्यक तें दोनतृतीयांश बहुमत मिळालें नाहीं हें सांगण्यास पाठकांसारख्या घटनातज्ज्ञाला व विधिज्ञाला तब्बल एक तास लागला. पूर्वी प्र. स. पक्षाचे श्री. बांके बिहारीदास यांचा तनखेबंदीचा खाजगी ठराव राज्यसभेने मंजूर करून दिशा दाखविली होती. पण या वेळीं त्याच तत्त्वाचें विधेयक त्याच राज्यसभेकडून नामंजूर केलें गेलें.

इंदिराजी गंभीर चेहऱ्याने पण निश्चयी मुद्रेने सभागृहांतून सावकाश पावलें टाकीत बाहेर पडल्या. त्यांच्या त्या पदाघातांतून ध्वनि निघत होता – 'कालौघ कधीच पलटणार नाही.'

लोकसभेंत विधेयक संमत झालें तेव्हा गुजराल यांनी श्यामनंदन मिश्रांचें सांत्वन केलें होतें. आता श्यामनंदन यांच्यावर गुजराल यांचें सांत्वन करण्याचा प्रसंग आला.

राज्यसभा, राजनारायण-सभा म्हणून ओळखली जाऊं लागली होती, आता ती 'राजा-सभा' म्हणून ओळखली जाऊं लागली. ती राजांना पावली आणि तीहि 'राजेन्द्रन्' या नांवाच्या खासदाराच्या नकळत मदतीने !

खरें म्हणजे हा झगडा राज्यकर्ते विरुद्ध संस्थानिक असा जरी बाह्यत: दिसत असला, तरी तो तसा नाही. आजच्या राजकारणाच्या आवर्तांत हाहि प्रश्न सापडला व त्याला वेगळें स्वरूप आलें. विरोधी पक्षाचे नेते श्यामनंदन मिश्र आपल्या भाषणांत म्हणाले होते, "समाजवादी समाजरचनेचा दहाकलमी कार्यक्रम

इंदिराजींपुरता वृथा आहे. त्यांचा आहे एककलमी कार्यक्रम आणि तो म्हणजे येनकेनप्रकारेण सत्तेवर राहणें." सिंडिकेटची अवस्था तरी यापेक्षा वेगळी आहे काय? नरेशांचे तनखे व विशेषाधिकार बरखास्त करायला, पूर्वी पाठिंबा दिलेले सिंडिकेटचे नेते, आता मार्गाविद्दल वाद घालून जेव्हा विरोध करण्यास उभे ठाकतात, तेव्हा त्यांचाहि दहाकलमी कार्यक्रम एककलमीच बनतो व तें कलम म्हणजे इंदिराजींचा पाडाव!

तात्पर्य काय. झगडा झाला तो राज्यकर्ते व संस्थानिकांत नव्हे, तर इंदिरावाद्यांत व इंदिरा-विरोधकांत सत्तास्पर्धेचा! बिचारे संस्थानिक त्यांत गोवले गेले इतकेच!

*

राज्यसभेंतील विजयाचा आनंद क्षणकालच त्यांना उपभोगतां आला. राज्यसभेंतील पराभवाने डिवचल्या गेलेल्या इंदिराजींनी निश्चयाने हालचाली केल्या. मंत्रिमंडळाची बैठक रातोरात झाली व जे घटनेंतील २९१ आणि ३६२ कलम रद्द करून साधलें जाणार होतें तें घटनेच्या ३६६ (२२) कलमाच्या आधारें राष्ट्रपतींच्या वटहुकमान्वये साधलें गेलें. माजी कायदामंत्री श्री गोविंद मेनन यांनी तें पूर्वीच सुचविलें होतें. पण लोकशाहींत संसदेपुढे प्रश्न आणून सोडवावा हा सात्त्विक विचार राज्यसभेंतील तांत्रिक पराभवाने सुटला व वटहुकमाचा तामसी विचार प्रभावी ठरला. डलहौसीच्या सार्वभौम तत्त्वाचा उपसिद्धान्त पत्करून राजाजींच्या मतें त्याच्यावर ताण केली गेली. राज्यसभेंत इंदिराजींनी जनतेपुढे प्रश्न ठेवला त्याचा निर्णय जनतेने द्यावा असें मोठ्या तोंडाने सांगितल्यावर, घटनेच्या ३६६ (२२) कलमाचा आधार घेऊन वटहुकूम काढणें त्यांना शोभादायक नव्हतें.

याचा कोणी अर्थ असा करतील की, जमेल तोंवर लोकशाहीची भाषा व अडलें म्हणजे हुकूमशाहीचा दंडुका, तर कोणी असाहि करतील कीं, लोकांच्या इच्छेचे परिवर्तन लोकप्रतिनिधींनी योग्य पद्धतीने न केल्याने लोकशाहीच्या संरक्षणार्थ राष्ट्रपतींनी वटहुकूम काढला. एक गोष्ट खरी की, विधेयकाचा रोख सरंजामदारी पद्धतीवर होता, ती नष्ट करण्यास स्वतंत्र पक्ष सोडून साऱ्यांचाच पाठिंबा होता. तांत्रिकदृष्ट्या राज्यसभेंत विधेयक पराभूत झालें असलें, तरी जनमानसाची दिशा त्याने स्पष्ट केली.

संस्थानिक आता सर्वोच्च न्यायालयाकडे जातील. घटनेचें ३६६ (२२) कलम हें संस्थानिकांची व्याख्या करणारें कलम, त्यांची मान्यता रद्दबातल करण्यासाठी सरधोपटपणें वापरतां येईल काय, का कांहीं विशिष्ट कारणानेच ती रद्दबातल ठरवतां येईल? कायद्याचा हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयांत निकालीं निघेल. तनखा ही खाजगी मालमत्ता नाही, तेव्हा नुकसानभरपाईचा विचार त्याबाबत करतां

येत नसून, वदलाच्या काळांतील भत्ता ( Transitional allowance ) म्हणून आजच्या साधारणत: पांच कोटि रुपयांच्या तनख्याच्या किती पट रक्कम द्यावी हें ठरेल. मोठ्या संस्थानिकांना कमी व लहानांना अधिक अशी उतरत्या भाजणीने नुकसानभरपाई देण्याचा विचार इंदिराजींनी राज्यसभेंतील आपल्या भाषणांत बोलून दाखविला होता.

कसेंहि असो, इतिहासाचे अवशेष असणारे संस्थानिक कालौघामध्ये नष्ट होत आहेत. त्याला काळ जवाबदार का कर्म जबाबदार? 'कृतं भवति सर्वत्र नाकृतं विद्यते क्वचित् ।' असें म्हणतात तें कांही खोटें नाही.

एका वृद्ध राजाच्या पुत्राला एक नागीण डसल्यामुळे तो मरण पावला. एका गारुड्याने त्या नागिणीला धरलें व तो राजाला म्हणाला, "या नागिणीला मी ठार करतों."

लागलीच ती नागीण राजाला म्हणाली, "मी तुझ्या पुत्राला मारलें यांत माझा दोष नाही, मी मृत्यूच्या प्रेरणेने काम केलें."

एवढ्यांत मृत्यु त्या ठिकाणीं अवतरला आणि म्हणाला, "दोष माझ्याकडे नसून काळाकडे आहे."

एवढ्यांत काळ तेथे अवतीर्ण झाला व म्हणाला, "राजा, तुझ्या पुत्राच्या निधनाला मी जबाबदार नाही. कर्माच्या प्रेरणेने मीं तें काम केलें. पूर्वकर्म हेंच तुझ्या पुत्राच्या मृत्यूचें एकमेव कारण होय."

पूर्वकर्माला जशीं चांगलीं फळें येतात तशींच वाईटहि फळें येतात. कालौघामध्ये त्या कर्माच्या आधारेच नव्यासाठी जुनें नष्ट होतें. तो 'नागिणी'चा दोष नाही. बदलत्या काळाचा व राजाच्या पूर्वकर्माचा तो दोष होता. भीष्म शरपंजरीं पडले ते व्याध-जन्मी सरड्याला मारलेल्या बाणाने! –श्री. जरमिनीदास यांच्या 'महाराज' पुस्तकांतील विकृतीची व राजविलासांचीं प्रकरणें या वेळीं डोळ्या समोर येतात, नाही!

*

राज्यसभेंतील पराभवाप्रमाणेच आणखी एक पराभव लोकसभेचें अधिवेशन सरतां सरतां राज्यकर्त्या इंडिकेटला पत्करावा लागला. भारतीय दंडसंहितेच्या १५३ (अ) कलमांत आणि बेकायदा कृत्यांना आळा घालण्याच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यासंबंधी हें विधेयक होतें, त्यानुसार केवळ व्यक्तीच नव्हे, तर संघटनांवरहि जातीय प्रचारासाठी व भावना प्रक्षुब्ध करण्याच्या दोषाप्रीत्यर्थ कारवाई करतां आली असती. ही दुरुस्ती करण्यामागील सरकारचा हेतु रा. स्व. संघाला लगाम लावण्याचा होता हें उघड होतें. दिल्लींत रा. स्व. संघाच्या कवायतीवर कांही काळासाठी बंदी घातली गेली होती व त्याविरुद्ध आंदोलनहि झालें होतें. जळगाव-भिवंडीसारख्या जातीय दंग्यांचें खापर संघाच्या डोक्यावर फोडून त्याला पाशबद्ध करावें असा हेतूहि

अनेकजण बोलूं लागले होते. संघबंदीला कायद्याचा आधार सरळ लाभत नसल्याने तो भारतीय दंडसंहितेंत दुरुस्ती करून मिळविण्याचा डाव रचला गेला. परंतु विधेयकाचा हा हेतु विशिष्ट संघटनेच्या कार्यावर मर्यादा घालण्याचा जरी असला, तरी त्याचें स्वरूप सर्वसाधारण असल्याने सर्वच संघटनांना – 'ट्रेड युनियन 'नाहि – तें जाचणार होतें. प्रतिवंधक स्थानबद्धतेचें सर्वसाधारण स्वरूप सर्वांनाच जाचतें व म्हणून सर्व विरोधी पक्ष त्याला विरोध करण्यासाठी उभे राहतात, तसेच कांहीसें याबाबतहि झालें व गृहखात्याचे राज्यमंत्री श्री. मिर्धा यांना दुरुस्ती-विधेयक मांडण्याच्या अवस्थेंतच तें परत घेणें भाग पडलें.

हें दुरुस्ती-विधेयक आणण्यामागे राजकीय विचारच प्रभावी आहेत हें उघड आहे. रा. स्व. संघाची राजकीय आघाडी जो जनसंघ तो इंडिकेटच्या डोळ्यांत त्याच्या वाढीमुळे आज खुपत आहे. इंदिराजींना राजकीय क्षेत्रांत एका बाजूला डाव्या कम्युनिस्टांशीं सामना करावा लागणार आहे, तसा दुसऱ्या बाजूला जनसंघाशीं सामना करावा लागणार आहे. सिंडिकेट ही १९७२ सालापर्यंत हतप्रभ झाली असती. पण तिलाहि जनसंघाच्या हातमिळवणीने कांहीसें जीवदान मिळालें. त्यामुळेहि इंदिराजींच्या नाकाला मिरच्या झोंबल्या आहेत. जो 'ग्रँड अलायन्स' संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरवातीला बुडबुडा ठरला तो इंदिरा-विरोधाच्या समान ध्येयापोटी पुन्हा सांधला जाण्याची चिन्हें दिसत आहेत. राज्यकर्त्यांचा जनसंघावर व म्हणूनच पर्यायाने संघावर रोष आहे तो यासाठी व त्यापोटींच हें दुरुस्ती-विधेयक पुढे आणलें गेलें.

या पावसाळी अधिवेशनांत इंदिराजींना लोकसभेंत व राज्यसभेंत दोन्हीकडे उजव्या पक्षाच्या युतीने कांहीसा पराभव पत्करावा लागला. १९७२ सालच्या निवडणुकींतून इंडिकेटला यशाच्या मार्गावर नेण्याचें खडतर काम इंदिराजींना पुढील काळांत करावयाचें आहे. देशाला समाजवादी मार्गावर नेण्यासाठी ते अगत्याचें आहे. उजव्या गटांच्या संघटित विरोधामुळे तें अवघड होऊं पाहत आहे. त्या दृष्टीने हे पराभव कुलक्षणीं मानावे लागतील.

इंदिराजीनीच म्हटल्याप्रमाणे देशाची प्रगति ही कांहीशीं बालकाच्या वाढीसारखीच असते. जेव्हा बालक वाढत असतें तेव्हा तें रडत असतें. चालतांना पडत असतें, त्या वेळीं आपण म्हणतों "मोठें झाले की सर्व ठीक होईल."

पण मग आणखीच नवीन प्रश्न उभे राहतात. तें चालू लागतें तेव्हा चुलीजवळ जातें, नको तेथे चढू पाहतें.

तेव्हा आपल्याला वाटतें की, तें आणखी मोठें झालें की, त्याला धोका कळूं लागेल. जबाबदाऱ्या समजूं लागतील.

मोठा झाल्यावर तो मुलगा जेव्हा आपल्या मागील आयुष्याचें सिंहावलोकन करतो तेव्हा 'बालपण दे गा देवा' हे शब्द त्याच्या तोंडून ऐकू येतात.

देशाचें असेंच आहे. विशिष्ट आर्थिक प्रगति साधतांच, समस्यांचीं स्वरूपें बदलतात. परंतु झेप घेण्याची अवस्था ( take-off stage ) येईपर्यंत अनेक नव्या आणि बिकट समस्यांना तोंड देण्याचा प्रसंग येतो. इंदिराजी आज देशाचें तोंड वेगळ्या समाजव्यवस्थेकडे, अर्थव्यवस्थेकडे साहसाने वळवूं पाहत आहेत व म्हणूनच त्यांना स्वपक्षांतील विरोधाला, बाहेरील हितसंबंधीयांच्या विरोधाला व रूढिप्रिय समाजाच्या विरोधाला तोंड द्यावें लागत आहे. लोकसभेंतील व राज्यसभेंतील त्यांचे पराभव जनमानसाच्या या छटा व्यक्त करणारे असले, तरीहि बहुसंख्य दरिद्री जनतेच्या आकांक्षा व्यक्त करणारे नव्हेत हें खरें नाही काय ?

या संदर्भांत स्वतःला पुरोगामी म्हणविणाऱ्या एका पत्रपंडितापुढे मीं हा प्रश्न टाकतांच तो तावातावाने म्हणाला, " छे ! 'खरें' असें कांही नसतेंच. "

त्यावर मी मुद्दामच ओरडून म्हणालों, " तुझें म्हणणें 'खरें' नाही. "

तो रागाने म्हणाला, " मी म्हणतों तेंच 'खरें' आहे. "

**– केसरी, दि. १३ सप्टेंबर १९७०**

# अस्वस्थ परिस्थितीची काळी छाया

- ३६ -

'इंडिया गेट'चा परिसर सध्या अक्षरशः माणसांनी फुलून गेलेला आहे. गेल्या रविवारी तर गणराज्यदिनापेक्षाहि अधिक गर्दी तेथील हिरवळीवर जमा झाली होती. सकाळपासून श्रीहंसजयंतीच्या निमित्ताने विहार, ओरिसादि दूरदूरच्या राज्यांतून संताजीमहाराजांच्या दर्शनासाठी दिल्लींत आलेल्या त्यांच्या चाळीस हजार भक्तांनी मिरवणुकीसाठी गर्दी केली होती. धर्मपताका घेऊन जमलेल्या या भोळ्या-भाबड्या झुंडीकडे पाहिलें की, भारत विसाव्या शतकांत आहे याचा विसर पडतो. असाच सारा रूढिप्रिय, गतिशून्य, मागासलेला समाज भारताच्या उत्तर भागांत पसरलेला आहे व तें एक भारताच्या सामाजिक प्रगतीला लोढणें ठरलें आहे.

दुपारी इंडिया गेटजवळ नेहरू 'बाल-मेळा' भरला, तर सायंकाळी श्वान-प्रदर्शन ! दिल्लींतील बालगोपाल बाल-मेळ्यासाठी तर 'इलाईत' श्वानप्रदर्शना-साठी जमा झाले होते. हिवाळ्यांतील गुलाबी थंडीत रविवारीं 'पिकनिक'साठी बाहेर पडण्याचा दिल्लीकरांचा एक खास षौक आहे. घरांतील गारव्यांत बसण्यापेक्षा मोकळ्यावर ऊन शेकत, चाट, टिकिया आणि कच्चे मुळे यांचा समाचार घेण्यांत कांही और मजा येते. स्वाभाविकच गेल्या रविवारीं इतर दिल्लीकरांनीहि 'इंडिया-गेट'ला 'पिकनिक स्पॉट' बनविला व सारे बाबू लोक हिरवळीवर विखुरले. या झुंडीच्या मार्गदर्शनासाठी जसे हजारो पोलिस तेथे जमा झाले तसे 'पिकनिक'ची लज्जत वाढविण्यासाठी आइस्क्रीमवाले, चाटवालेहि गोळा झाले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं राजपथावरून 'इंडिया गेट'कडे फिरावयास गेलेल्यांना सारी हिरवळ कागदांच्या कपटयांनी, केळ्यांच्या सालींनी, आइस्क्रीमच्या कागदी कपांनी झाकून

गेलेली दिसली असेल. स्वच्छतेचें व सामाजिक शिस्तीचें कधी कोणी शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे, म्हणून कागद कचऱ्यांच्या टोपलींत आवर्जून टाकले जातील ! हिरवळीची स्वच्छता करण्यासाठी हजारो झाडूवाले लागले असणार.

दिल्लींत पडूं लागलेली गुलाबी थंडी अशा ख्यालीखुशालीने उपभोगण्यास दिल्लीकरांनी सुरुवात केली असली तरी, दिवसाच्या रोशनीवर सायंकाळी जशी धुक्याची चादर ओढली जाते, तशी या आनंदावर वस्तूंच्या वाढत्या भावांची व अस्वस्थ राजकीय परिस्थितीची चिता सावट धरीत आहे.

यंदाच्या वर्षी अन्नधान्याचे भाव सहा टक्क्यांनी वाढले असले तरी, देशांत सर्वत्र पाऊस चांगला झाल्याने धान्याचे उत्पादन समाधानकारक आहे, परंतु औद्योगिक उत्पादनाचे पाय मात्र मागे आहेत. औद्योगिक उत्पादनासाठी नव्या कारखानदारींत वाढ झाल्याशिवाय देशांतील बेकारीची व चलनवाढीची समस्या सुटणारी नाही. "आर्थिक प्रगति ही सामाजिक न्यायाचें उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून केली पाहिजे," असें अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी येथील विज्ञान भवनांत कर-अधिकाऱ्यांच्या परिषदेंत बोलतांना सांगितलें. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीचे अध्यक्ष श्री. डी. सी. कोठारी यांनी "आर्थिक प्रगती-शिवाय सामाजिक न्याय साधणार नाही" असा चव्हाणांचाच मंत्र उलटवून त्यांना नाण्याची दुसरी बाजू दाखविली. एक गोष्ट खरी की, आज आर्थिक प्रगतीचा रुतलेला गाडा औद्योगिक परवाने देण्याचें धोरण उदार केल्याशिवाय चालू होणार नाही.

'मोनोपोलिज अँड रिस्ट्रिक्टिव्ह ट्रेड प्रॅक्टिसेस अॅक्ट' खाली दोनशे फर्मस नोंदविल्या गेल्या आहेत. पण दत्त-समितीच्या अहवालानुसार वड्या भांडवलदारां-कडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या एकूण १४०० औद्योगिक संस्था आहेत. या संस्थां-पैकी अनेकानी परवान्यासाठी अर्ज केले आहेत. पण मंत्रिमंडळाच्या आर्थिक समन्वय समितीकडून कंपनी अफेअर्सच्या खात्याकडे त्यांचा प्रवास होऊन त्या अर्जांचा निकाल होण्यास खूपच वेळ लागतो. यासाठी परवाना-पद्धतीत सुधारणा होणें अगत्याचें आहे. नियोजन-मंडळानेंहि तशी सूचना केली आहे. एवढेच नव्हे, तर श्री. डांगेहि 'सुधारणावादी' बनून "परवान्याबाबतचें धोरण उदार न केल्यास बेकारीचा प्रश्न सोडविणें अवघड होईल. सध्या फक्त पैशाचें केंद्रीकरण होऊं न देण्याबाबत काळजी घ्यावी," असें म्हणूं लागलें आहेत. वेतन गोठविण्यापेक्षा परवान्याच्या धोरणांत उदारपणा दाखविणें त्यांनाहि इष्ट वाटतें.

यंदाच्या वर्षांत औद्योगिक उत्पादनांत व कारखानदारींत वाढ करतां आली नाही, तर पुढील वर्षी हा प्रश्न अधिकच बिकट होईल. देशांतील आर्थिक विकासाच्या गरजा लक्षांत घेतां तीनशे कोटींपर्यंत नवे कर बसविण्याची गरज भासत आहे. हे लक्षांत घेऊन केवळ सामाजिक न्यायाच्या संदर्भांत संपत्ति-करांत वाढ व शहरी

मालमत्तेवरील कमाल मर्यादा अमलांत आणली गेली तरी, सार्वत्रिक निवडणुकीच्या वर्षांत कराचा मोठा बोजा जनतेवर लादल्याशिवाय आर्थिक गाडा सावरणें अवघड होणार आहे.

शहरी मालमत्तेवरील कमाल मर्यादेच्या संदर्भांत परिस्थितीची जाणीव करून देणारा एक चपखल विनोद नुकताच ऐकावयास मिळाला. एकाने आपल्या घराचें आढें मोकळेंच ठेवलें होतें. त्याच्या मित्राने विचारलें, "दोस्ता, सारें घर बांधलेंस आणि आढें मोकळें ठेवलेंस तें काय सूर्यस्नान दिवसभर घडावें म्हणून?" घरमालक गंभीरपणें म्हणाला, "अरे, शहरी मालमत्तेवर 'सीलिंग' येणार आहे ना! मग आपण कशाला आढें घाला! सरकारच 'सिलिंग' घालणार आहे."

*

मालमत्तेवरील व शेतीवरील कमाल मर्यादा, करवाढ, भाववाढ, बेकारी यांची छाया आर्थिक क्षेत्रांवर दाटत असतांना राजकीय क्षेत्रहि अराजकाने ग्रासल्यासारखें झालें आहे. पश्चिम बंगालमधील नक्षलवाद्यांच्या हिंसाचारांत गुंडांच्या लूटमारीची भर पडल्याने तेथील सरकारी यंत्रणेचा कणाच मोडून गेला आहे. पश्चिम बंगालमध्ये आज तरी कोणाचेंच जीवित व मालमत्ता सुरक्षित नाही.

राज्यसभेमध्ये खासदार चित्त बसू यांनी कलकत्त्यांतील बस-वाहतुकींत सुधारणा करण्यासाठी तातडीची उपाययोजना (Crash Programme) सुचविली. त्यावर श्री. निरंजन वर्मा उभे राहून म्हणाले की, "आज बस-वाहतुकीबाबत नक्षलवाद्यांनी व साम्यवाद्यांनी बसेस जाळण्याचा, मोडण्याचा जो विधोडा कार्यक्रम (Crush Programme) हातीं घेतला आहे तो संपल्यावर मगच सुधारणेचा कार्यक्रम हातीं घ्या!"

आणि हें खरेंच आहे. प. बंगालमध्ये कायदा व सुरक्षितता प्रस्थापित व्हावयाची, तर कडक मुलकी उपायांचा व प्रसंगीं सैन्यशक्तीचा वापर करण्याची तयारी हवी. त्यासाठीच स्थानबद्धतेचें विधेयक संसदेंत संमत करून घेण्याचा विचार इंदिराजींनी केला आहे. जनसंघ-स्वतंत्रांनी त्याला पाठिंबा देण्याचीहि तयारी दर्शविली. कम्युनिस्ट विरोधात जाणार हें उघड होतें. परंतु आश्चर्य म्हणजे सिंडिकेट काँग्रेसने विधेयकाला विरोध करण्यासाठी कंबर कसली. इंदिराजींबद्दलच्या द्वेषाने व मत्सराने सिंडिकेटचें नेतृत्व इतकें आंधळें झालें आहे की, त्यापायीं होणारा देशाचा घातहि त्याला दिसेनासा झाला आहे. काँग्रेसमधील या भाऊबंदकीने आज तरी मूर्खपणाची सीमा गाठली आहे.

भावाभावांत वांटणी झालेल्या दुमजली घराचा तळमजला, दुसऱ्या मजल्यावरील भावाच्या कुटुंबाला उघडें पाडण्यासाठी, पाडावयास निघालेल्या हेकेखोर बंधूराजांसारखीच, आज सिंडिकेट काँग्रेसचे रामसुभगसिंग यांची, मानसिक अवस्था झालेली आहे. तळमजल्यावरचे खांब तोडले की सारी इमारत कोसळेल व स्वतःलाहि

निवास राहणार नाही, याची जाणीव जशी भाऊबंदकींत विसरते, तसाच कांहीसा प्रकार प. बंगालच्याबाबत सिंडिकेटच्या संसदेंतील नेतृत्वाचा झाला आहे. केवळ इंदिराजींचा पाडाव एवढेंच ध्येय त्यांच्यापुढे आहे. ते जनसंघ-स्वतंत्रांबरोबर उजवें नेतृत्व उभें करण्यासाठी केववळ आघाडी करूं इच्छीत नाहीत, तर इंदिराजीच्या पाडावासाठी कम्युनिस्टांशींहि प्रसंगी शय्यासोबत करण्यासहि ते तयार आहेत. इंदिराजींनी स्वतःचें आसन टिकविण्यासाठी कम्युनिस्टांशी केलेली हातमिळवणी पापी आणि इंदिराजींचा पाडाव करण्यासाठी सिंडिकेटने कम्युनिस्टांशीं केलेली हातमिळवणी रामसुभगसिंग यांच्या दृष्टीने पवित्र ठरते.

*

मला एक सिंडिकेटवादी ज्येष्ठ पत्रकार नुकतेच भेटले. ते म्हणाले, " अहो, पं. नेहरूंनी सुभाषचंद्रांचा जसा काटा काढला, तसा इंदिराजींनी रशियाच्या मदतीने शास्त्रींचा कांटा काढला." त्या ज्येष्ठ पत्रकारांच्या उद्‌गारांना तरी हसावें कसें! पांच वर्षानंतर सत्तास्पर्धेच्या धुमाळीत शास्त्रीजीच्या मृत्यूची संशयकथा दाखल झाली नाही काय ? तेव्हा सध्या तरी कोण काय बोलेल व कोण कोणावरोबर केव्हा हातमिळवणी करील याला कांहीच धरबंध राहिलेला नाही. संसदेचें वातावरणहि याच संशयग्रस्ततेमध्ये सापडलें आहे व केंद्र-सरकार दुर्बळ बनल्याने देशांतील कायदा व सुव्यवस्थेची अवस्था बिकट होत चालली आहे.

यावर उपाय म्हणून मध्यावधि निवडणुकांचा विचार पुढे आला आहे व उत्तर प्रदेशच्या राजकारणाने पलटी खाल्ली नसती, तर कदाचित् तशी घोषणाहि एवढयांत झाली असती. आज इंदिराजीविरुद्ध देशांतील साऱ्या उजव्या शक्ति एकत्र झाल्या आहेत. खुद्द इंडिकेट अंतर्गत स्पर्धेने पोखरलेली आहे, तर डावे पक्ष नेतृत्वांतील आत्यंतिक व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेमुळे एकजुटीने उभे ठाकण्यास असमर्थ ठरले आहेत.

अशा स्थितींत मध्यावधि निवडणुकांतील यशापयश खरोखरीच कॉम्प्युटरला 'डेटा' पुरवून जोखणें प्राप्त झालें आहे. आज हें 'कॉम्प्युटर'चें काम इंडिकेटमध्ये करताहेत द्वारकाप्रसाद मिश्र. उत्तर प्रदेशमधील किती जागा इंडिकेटच्या पदरीं पडतील यावर हा निर्णय लागणार आहे.

कमलापतींना उत्तर प्रदेशांतून हलविलें, तर तेथील राजकारणाचें तारू इंडिकेटच्या बाजूस झुकण्यास उशीर लागणार नाही. सं. वि. द. चा स्फोट लवकरच होईल यांत शंका नाही. संयुक्त समाजवाद्यांचा राजनारायण-प्रणीत गट सं. वि. द.-चाच काय, पण स्वतःच्या पक्षाचाहि बोजवारा उडविण्याइतका विस्फोटक आहे. पण कमलापतींनी उत्तर प्रदेशांतून हलूं नये, असा इंडिकेटमधील जगजीवनबाबूंचाच आशीर्वाद आहे. इंदिराजींना त्यांच्या घरांतच शह देण्याचा हा सत्तास्पर्धेतील डाव घातकच म्हणावा लागेल.

इंदिराजींना आणखी एक अपयश पदरीं येण्याचा संभव आहे. तें म्हणजे संस्थानिकांच्या खटल्यांत सर्वोच्च न्यायालयाकडून तो दावा विरुद्ध गेल्यास बँकांच्या राष्ट्रीयीकरणासारखें पुन्हा तें विधेयक संसदेंत आणून संमत करून घ्यावें लागणार आहे. यावर कांहीचें म्हणणें असें की, तोच प्रश्न करून आपण जनतेचा कौल मागावा.

थोडक्यांत, मध्यावधि निवडणुकांबाबत 'कोठे आहेत त्या!' असा भोळा भाव आणून इंदिराजी हुलकावणी देऊं पाहत असल्या, तरी त्याबाबतचा निर्णय उत्तर प्रदेशच्या राजकारणावर व सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर ठरेल यांत मला तरी शंका नाही.

अशी आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांत इंदिराजीची कोंडी झाली असतां महाराष्ट्रांतील वसंतद्वय आपलें सीमा-प्रश्नाचें तुणतुणें घेऊन राजधानीत दाखल झालें होतें. वसंत ऋतु आला म्हणजे कोकिळेला जसा पंख फुटतो तसें संसदेचें व महाराष्ट्र विधिमंडळाचें अधिवेशन सुरू झालें की, सीमेच्या प्रश्नाला उधाण येतें. महाराष्ट्राचे मुख्य मंत्री व महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष महामंत्र्यांना येथे भेटले. हो, खरीच भेट झाली! अगदी तब्बल तीन मिनिटें झाली व महामंत्र्यांनी "संसदीय समितीकडे हा प्रश्न सोपविण्याच्या दृष्टीने धीलाँ यांच्याशीं के. सी. पंत वोलणी करीत आहेत," असें गंभीरपणें सांगितलें. लोकसभेचे सभापति धीलाँ अर्धेमुर्धे तयार आहेत, पण राज्यसभेचे अध्यक्ष पाठक नकारच देत असल्याची बातमी येते न येते तोंच सिंडिकेट काँग्रेसने महाजन-अहवालाचीच अंमलबजावणी झाली पाहिजे अशी डरकाळी फोडल्याने संसदीय समितीचें भवितव्य पुन्हा लोंबकळूं लागलें आहे.

"गलत समय केवल तब होता है, जब आप मित्रों में बैठे हो, और कहनें के लिए पास कुछ नही और आप कुछ कह जाये" अशी वेळ महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसवर आलेली असल्यामुळे महाराष्ट्रांतील कॉंग्रेस-नेतृत्व सध्या अडचणींत सापडलें आहे.

*

भारतांतील अनागोंदीचा फायदा अमेरिकेकडून मिळणाऱ्या शस्त्रबळाच्या साहाय्याने पाकिस्तान घेईल की काय, अशी चिंता सर्वच राजनीतिज्ञांच्या मनांत घर करून आहे व त्याच्या प्रतिध्वनि संसदेंतहि उठला.

'इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स'ने भरविलेल्या एका परिसवादांत सेवानिवृत्त विमानदलप्रमुख अर्जुनसिंग म्हणाले की, "अमेरिकेने या शस्त्रविक्रीबाबत ही केवळ 'One shot aid' आहे अशी कितीहि वकिली केली असली, तरी माझा त्यावर विश्वास नाही. पाकिस्तानला अमेरिकेने ही शस्त्रविक्री करण्याचें ठरविलें त्यामागे तिचे पुष्कळ हेतु असणार. एक गोष्ट मात्र खरी की, या शस्त्रविक्रीने भारतावर आक्रमण करण्याच्या पाकिस्तानच्या ताकदीत निश्चित वाढ होणार आहे."

१९६५ सालीं पाकिस्तानची हवाईशक्ति होती तींत पन्नास टक्क्यांनी तर आताच वाढ झालेली आहे. १९६५ सालीं त्याच्याजवळ केवळ आठ बॉम्बर स्क्वाड्रन्स

होते. त्यानंतर पाकिस्तानने पश्चिम जर्मनीकडून इराणच्या मार्फत नव्वद 'एफ्–८६' विमानें मिळविलीं; चीनकडून 'मिग–१९'चे पांच स्क्वाड्रन्स मिळविले व फ्रान्स-कडून 'मिराज–३' जातीचीं २५ विमानें मिळविलीं. पाकिस्तानजवळ याशिवाय 'बी–५७ चीं' दोन बाँबर स्क्वाड्रनन्स असून, त्यांत 'आय्. एल्.–२८'चें चीनकडून मिळालेलें एक स्क्वाड्रन व फ्रान्सकडून मिळालेले 'मिराज–५'चें पथक दाखल झालेलें आहेत.

आता अमेरिकेच्या शस्त्रविक्रींतून त्याला ५० विमानें 'एफ्–१०४' जातीचीं व 'बी–५७' जातीचीं बाँबर्स मिळणार आहेत.

पाकिस्तानची हवाईशक्ति ही सर्वसाधारणपणें आक्रमणाच्या दृष्टीने संघटित झाली असून, आपले हवाईदल मात्र बहुतांशीं संरक्षणावर भर देऊन उभें केलें गेलें आहे. अशा स्थितींत पाकिस्तानने आक्रमण केल्यास आपणांस त्याला तोंड देतां येईल काय हा खरा प्रश्न आहे.

अमेरिकेच्या या शस्त्रविक्रीचा संबंध सिंगापूरच्या पलीकडे हिंदी महासागरांत अमेरिकेच्या सातव्या आरमाराने पसरलेले पाय व पश्चिम आशियांतील अमेरिकेचें धोरण यांच्याशीं आहे, असें सांगितलें जातें. रशियाने एका बाजूस भूमध्य समुद्रांतून पश्चिम आशियांत व दुसऱ्या बाजूने पाकिस्तानांतून कुवेत, बहारीनमध्ये आपल्या नांग्या पसरून जी पकड घेतली आहे त्याला हा प्रतिशह आहे असेंहि दिसतें. भूमध्य समुद्रांतील रशियन नौदलाच्या वाढत्या ताकदीने अमेरिकेला चिंता पडल्याचें कॅप्टन पॉल आर. शार्टझ् याने यु. एस्. नेव्हल इन्स्टिटयूटच्या प्रोसिडिंग्जमध्ये एक लेख लिहून सांगितलें होतें. नॉटोला व मध्यपूर्वेतील समतोलाला हा मोठाच धोका होय. शॉर्टझ्चें म्हणणें असें की, रशियाचा डाव पश्चिम युरोपला उत्तरेकडून बाल्टिकमधून व दक्षिणेकडून भूमध्य समुद्रांत कोंडण्याचा आहे. या डावाने युरोपला अमेरिकेपासून तोडतां येईल.

पाकिस्तानला शस्त्रविक्रीकरण्यामागील जागतिक राजनैतिकपट आपण कसाहि आखून पाहिला, तरी पाकिस्तान स्वतःच्या राजकारणासाठी त्या शस्त्रांचा भारताविरुद्ध उपयोग केल्याशिवाय राहणार नाही, हें ध्यानीं घेतलें पाहिजे.

कागदावर घोडयाचें चित्र काढून एकाला भारतीय दार्शनिकाने प्रश्न विचारला, " हें काय आहे ? "

त्याने स्वाभाविकच " घोडा आहे " असें उत्तर दिलें.

असतो तो केवळ कागद आणि रंग !

या चित्र-तुरंग न्यायाने अमेरिकेने जागतिक युद्धपटांतील पाकिस्तानला केली जाणारी शस्त्रविक्री एक भाग आहे असें काढून दाखविलें, तरी आपण वस्तुस्थिति ध्यानीं घेऊन त्यांचे परिणाम दृष्टीआड होऊं देतां कामा नयेत.

**– केसरी, दि. १५ नोव्हेंबर १९७०**

# इंडिकेट-नेतृत्वाचा हा असा त्रिकोण

- ३७ -

शीख पंथाचे धर्मगुरु नानक यांची ५०१ वी जन्मतिथि राजधानींत मोठ्या दिमाखाने साजरी झाली. चार लाख नागरिक गुरु नानक यांना भावपूर्ण श्रद्धांजलि अर्पण करण्यासाठी विविध गुरुद्वारांतून सकाळ-पासून जमा झाले होते. साऱ्या गुरु-द्वारांवर रात्री विजेची रोषणाई झगमगत होती. गुरुग्रंथसाहेबाची भव्य मिरवणूक दुपारी सीसगंज गुरुद्वारांतून निघून चांदणी चौक, नई सडक, चावडी बाजार, खारी-बावडी, क्वीन्स रोड व फतेहपुरी या रस्त्यांनी फिरून पुन्हा चांदणी चौकांत परतली. मिरवणुकींत हत्ती, घोडे, उंट यांवर स्वार झालेले हत्यारधारी निहंग शीख तसेच रंगीबेरंगी पोशाख घातलेल्या विद्यार्थ्यांचे बॅण्ड सामील झाले होते. गांधी मैदानावर भक्तांना प्रसाद वांटला जात होता. तसेंच नानकांच्या शिकवणीवर प्रवचन दिलें जात होतें.

नानकांनी लहानपणीच उपनयनाच्या वेळीं पुरोहिताला जानवें घालतांना सांगितलें, "पुरोहितमहाराज, ज्या जानव्यांत दयेचा कापूस, संतोषाचें सूत, संयमाची गाठ आहे असें जानवें सत्याच्या मंत्राने मंत्रित करून मला घाला." अशा या महान् धर्मप्रवर्तकाचा – गुरु नानकांचा – जन्म लाहोरपासून चाळीस मैलांवर असलेल्या नानकानासाहेब येथे झाला. त्या गावाला व्हॅटिकनचा दर्जा द्यावा अशी मागणी शिखांच्या एका शिष्टमंडळाने राजधानीतील पाकिस्तानच्या राजदूताला भेटून केली असली, तरी ही मागणी अळवावरचें पाणी ठरणार हें उघडच आहे.

धर्माबरोबरच कला व साहित्य यांचा पुरस्कार करायची जाणीवहि राज-धानींत निर्माण झालेली आहे ही विशेष आनंदाची गोष्ट आहे. दिल्लींतील साहित्य-

कला परिषदेने राजधानीत प्रतिवर्षी कविकुलगुरु कालिदास-जयंती साजरी करण्याचें ठरविलें आहे. या जयंती-समारंभाच्या निमित्ताने इंद्रप्रस्थ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फिरोजशाह कोटला मैदानावर शाकुंतल या संस्कृत नाटकाचा प्रयोग केला व तोहि अशा दर्जाचा की, नाटकांतील अभिनय पाहून रसिक मंत्रमुग्ध होऊन गेले.

सर्व संस्कृत नाट्यसंभारांत 'अभिज्ञान शाकुंतलम्' हें सर्वश्रेष्ठ मानलें जातें. 'काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्या शकुंतला' ही लोकोक्ति तर सुप्रसिद्धच आहे. कालिदासाने प्रेमाला तपस्येने व त्यागाने शुचित्व व दिव्यत्व प्राप्त करून दिलें. शकुंतलेसारख्या कोमलांगी नायिकेला – जिचें वर्णन 'किसलयमिव पाण्डुपत्राणाम्' असें कालिदासाने केलें तिलाहि – तप करावयास लावलें. अशा या भारतीय संस्कृतीच्या प्रातिनिधिक रससिद्ध कवीश्वराची जयंती राजधानींत प्रतिवर्षी साजरी होणार आहे याचा सर्वांनाच आनंद होईल.

'कविताकामिनीचा विलास' म्हणून ज्या कवीश्वराच्वा प्रतिभेचा गौरव जयदेवाने केला, बाणभट्टाने ज्याच्या काव्याला 'मधुर सान्द्रमंजिरी'ची उपमा दिली, ज्याला अद्यापि तोड न सापडल्याने कनिष्टिकेवर अधिष्ठित केल्या गेलेल्या अनामिकेला ज्याने सार्थवती ठरविलें, 'कमले कमलोत्पात श्रूयते न तु दृश्यते' या प्रश्नाला 'बाले तव मुखाम्भोजात कथमिन्दिवरद्वयम् ।' असें उत्तर देऊन बुद्धिवैभव दाखविणाऱ्या आख्यायिकेचा जो नायक बनला, अशा महाकवीला भारताची राजधानी विसरली, तर ती करंटीच म्हणावी लागेल.

*

धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रांइतका उत्साह राजकीय क्षेत्रांत मात्र आढळत नाही. राज्यकर्त्या इंडिकेटमधील तसेंच सिंडिकेटमधील कार्यकर्ते नैराश्याने ग्रस्त होऊनच वावरत आहेत. उत्तर प्रदेश व बिहार येथील इंडिकेटचे राजकारण फसलें म्हणून ते, व तत्त्वनिष्ठा सोडून केवळ इंदिराजींना खेचण्यासाठी मोरारजी-निजलिंगप्पा यांनी चालविलेली जातीय व प्रतिगामी संघटनांशीं चुंबाचुंबी न आवडून सिंडिकेटचे रामसुभगसिंग आदि नेते नाराज आहेत. या नाराजीने त्यांच्या मनांत जी किल्मिषें निर्माण झाली आहेत तिचा फायदा घेऊन रामसुभगसिंग, मनुभाई शहा वगैरेंशी यशवंतराव चव्हाण संबंध वाढवीत आहेत, तर सिंडिकेटमधील हरिजनांना जगजीवनराम हाताळीत आहेत.

इंदिराजींचे मित्रादि सल्लागारहि कांही स्वस्थ बसलेले नाहीत. ते कामराजांशी बोलत आहेत. सिंडिकेटच्या कार्यकारिणीच्या निमित्ताने त्यांच्यांतील विचारविभिन्नतेला आता चांगलेंच तोंड फुटलें आहे. लोकसभेंतील सिंडिकेट गटाचे प्रतोद श्री. शिवनारायण व इतर आठ जण यांनी सिंडिकेट नेत्यानी जनसंघ-स्वतंत्र पक्ष याच्याशीं चालविलेल्या आघाडीवर टीका करून, दोन्ही कांग्रेस-पक्ष एकत्र

येण्याची गरज स्पष्ट केली, तर रामसुभगसिंग यांनी मसानींची तोंडफोड केली. जनसंघाचे श्री. बलराज मधोक यांनी केलेल्या तर्जुम्यावर आधारून अशोक मेहतांनी रचलेला आघाडीचा ठराव त्याला झालेल्या अंतर्गत विरोधामुळे मुळांतच खच्ची झाला होता व स. का. पाटील यांचा ऐनवेळचा मसुदा संमत करून वेळ मारून न्यावी लागली.

या वेळेला सिंडेकेच्या कार्यकारिणींत तोहि पुढे रेटणें मोरारजी-निजलिंगचा यांना अशक्य झालें. आपल्या तरुण अनुयायांना फसवून व इंदिराजीच्याबद्दलची त्यांच्या मनांतील अढी फुलवून जनसंघाच्या गाड्याला हे वृद्ध नेते सिंडिकेटला जुंपूं पाहतील, तर फटी पडूं लागलेलें सिंडिकेटचें घर कोसळण्यास वेळ लागणार नाही.

त्याकडेच इंडिकेटचे नेते लक्ष लावून बसले आहेत. इंडिकेटमध्ये आज नेतृत्वाचा त्रिकोण घर करून बसला आहे. इंदिरा, जगजीवनबाबू व यशवंतराव या त्या त्रिकोणाच्या तीन बाजू आहेत. कोणत्याहि दोन बाजू एकत्र झाल्या, तर तिसरीपेक्षा त्या अधिक ठरतात हा सिद्धान्त सर्वांनाच पाठ आहे. मध्यावधि निवडणुकींत लोकसभेंतील इंडिकेटची सख्या इंदिराजींना बहुमताइतकी वाढवितां आली, तर यशवंतराव चव्हाण आणि जगजीवनबाबू यांना हात चोळीत बसावे लागणार आहे. पण जर इंडिकेटच्या खासदारांची संख्या कमी झाली व सिंडिकेटची वाढली, तर ज्या दोघांचे जमेल ते एकत्र येऊन व सिंडिकेटशी हातमिळवणी करून तिसऱ्याला खतम करतील. यशवंतराव आणि जगजीवनबाबू यांचें कुंपणावरचें राजकारण हें असें आहे. त्याला येत्या कांही महिन्यांत आकार येईल.

इंदिराजीचे उच्चीचे ग्रह त्यांना या वेळीहि या राजकारणांत मात करण्याइतकें बळ देईल असा मला तरी विश्वास वाटतो.

*

संसदगृहांत शिजणाऱ्या राजकारणाने डोकें पिकलें की, सायंकाळी मी माझा मोर्चा कॅनॉट सर्कलकडे वळवितों व तेथील पुस्तकांच्या दुकानांत जाऊन नवीं पुस्तकें चाळतों.

गेल्या आठवड्यांत माझें लक्ष आकर्षून घेतलें सोनेरी आवरण घातलेल्या एका छोट्याशा पुस्तकाने. दुकानदाराने त्याची जाहिरात केली होती – 'The most sensational book of the year.' मेजर सी. एल्. दत्त यांनी लिहिलेल्या 'वुईथ टू प्रेसिडेन्टस्' या छोट्याशा पुस्तकाच्या बऱ्याच प्रती हारीने मांडून ठेवल्या होत्या.

पुस्तक चाळतांना या पुस्तकाच्या आधारे, कामराज-योजना मूलतः पं. नेहरूंना महामंत्रिपदावरून खेचण्यासाठी आखली गेली असल्याचें जें स्फोटक वृत्त नुकतेंच प्रसिद्ध झालें होतें त्याची आठवण मला झाली. मेजर दत्त यांनी या पुस्तकांत

पुष्कळच रोचक हकीगती सांगितल्या आहेत आणि त्या सांगतांना त्यांनी कितीहि अलिप्त भाव ठेवण्याचा प्रयत्न केला असला, तरी त्यांतील परिस्फोटक भाग दृष्टि-आड होत नाही. पहिल्या दर्जाच्या ग्रथात हे पुस्तक जरी दाखल करतां आलें नाही, तरी राजकारणाच्या अभ्यासकांनी तें एकदा दृष्टिखाली घालण्याजोगें रूचित् आहे.

आपल्या मंत्र्यांची व अधिकाऱ्यांची बेअक्कल, लष्करी गुपितांचा गळकेपणा व त्याबरोबरच मोठ्यांच्या छोट्या गोष्टी सांगतांना अनिश्चितीचें, निर्नायकीचें व गबाळपणाचें जें विद्रूप चित्र ते सहज रेखाटून जातात तें वाचणाऱ्याच्या मनांत पुस्तक मिटल्यावरहि घर करून राहतें. राष्ट्रपतींचे शरीररक्षक या नात्याने दत्त यांना हें सारें जवळून पाहतां आलें व तोंड दाबून सहन करावें लागलें. तें तोंड त्यांनी या पुस्तकाच्या रूपाने कालांतराने उघडलें आहे असेंच म्हणावे लागेल.

ब्रिटनच्या राणीच्या दिल्ली-भेटीच्या वेळचे कांही किस्से तर खूपच मनोरंजक आहेत. एलिझाबेथ राणीने पाकिस्तानला व नेपाळला भेट देण्यासाठी भारताच्या भेटींत खंड पाडल्याचें सर्वांना आठवत असेलच. पाकिस्तानांतील ‘बेसिक डेमोक्रसी’ची तिने तेथे जाऊन खूप स्तुति केली.

पंडितजींना राणीचे हे उद्‌गार पोरकट वाटले. भारतांतील लोकशाहीचा अपमान झाला असें त्यांच्या मनाने घेतलें.

पाकिस्तानहून राणी पालम विमानतळावर आली त्या वेळीं राष्ट्रपति राजेंद्र-प्रसाद आजारी असल्याने पंडितजींनाच तिचें स्वागत करावयाचें होतें. राणीच्या पाकिस्तानांतील उद्‌गारांबाबतचा राग व्यक्त करण्याची संधि या वेळीं पंडितजींनी साधली.

राणी शिडीच्या टोकाला येऊन उभी राहिली, तरी वृद्धचा तिकडे दुर्लक्ष करून पंडितजी ब्रिटिश हायकमिशनर सर पॉल गोरबुथ यांच्याशीं बोलत राहिले. राणी-चीहि, शिडीच्या टोकाशीं उभें राहिल्यानंतर आपल्या स्वागताला कोणीच कसें पुढे येत नाही म्हणून चुळबूळ सुरू झाली. शेवटीं मेजर दत्त पुढे सरकून पंडितजींन म्हणाले, “राणीसाहेब थांबल्या आहेत.”

त्यावर एकदा वळून त्यांच्याकडे पाहून पंडितजी म्हणाले, “मग मीं काय करावें!”

मेजर दत्त म्हणाले, “राणीसाहेबांचे कृपया स्वागत करा!”

त्यावर मग आपलें नेहमीचें हास्य धारण करून ते शिडीकडे सरकले. साऱ्यांच्या मनावरील ताण एकदम ओसरला.

राणीच्या व राजेंद्रप्रसादांच्या भेटींतहि असाच चमत्कारिक प्रसंग उद्‌भवला. राष्ट्रपतींनी राणीसाहेबांना कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर श्रीकृष्ण गीता सांगत अस-ल्याचें, चंदनाच्या तबकावर हस्तिदंतांत रेखाटलेलें चित्र भेट म्हणून दिलें. यावर

राणीसाहेबांनी प्रतिभेट दिली. तें केवळ एक चांदीचें छोटेसें कलमदान. राणीला ती छोटी भेट देतांना कमीपणा वाटत होता.

राष्ट्रपतींनी खरें म्हणजे या वेळीं मौन पाळावयाचें व विषय बदलावयाचा. पण "भेट केवढी आहे याला कांहीच महत्त्व नाही. त्यामागील स्नेहाची भावना श्रेष्ठ आहे" असें म्हणून त्यांनी नकळत राणीसाहेबांच्या भेटींतील उणेपणा स्पष्ट केला.

राष्ट्रपतींचे लष्करी सचिव श्री. बेग यांनी विषयाला कलाटणी देण्यासाठी 'राष्ट्रपति आत्मचरित्र लिहीत असल्याचें' राणीसाहेबांना सांगितलें.

राणीसाहेबांनी त्यावर कुतूहल दर्शवून विचारलें, "खरंच! आपण आत्मचरित्र लिहीत आहां. आपणांस हे एवढें लिहिण्यास वेळ तरी केव्हा मिळतो?"

आणि पुन्हा एकदा राष्ट्रपतींनी घोटाळा केला – "राणीसाहेब, मी हें आत्मचरित्र पुष्कळ दिवस लिहीत आहें. आपल्या वडिलांच्या तुरुंगांत मी १६ वर्षे होतों व तेथे खूप मोकळा वेळहि लिहिण्यास मिळे."

या संभाषणानंतर मात्र साऱ्यांचींच तोंडें बंद झालीं, विजयालक्ष्मी तर खिडकींतून बाहेरची बाग पाहूं लागल्या.

दुसरे राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् तत्पूर्वी रशियांतील स्वतंत्र भारताचे पहिले राजदूत होते. त्यांची त्या वेळीं मार्शल स्टॅलिनशीं झालेली भेट खूपच गाजली होती. परदेशी वकिलाला स्टॅलिनने दिलेली ती पहिली मुलाखत होती. राधाकृष्णन् यांना स्टॅलिन हा मोठ्या मिशांचा मोठा उमदा पुरुष भासला.

राधाकृष्णन् यांनी भेटीच्या प्रारंभीच पहिला प्रश्न विचारला तो – "अध्यक्षमहाराज, आपणांस भेटावयास इतकें कठीण कां जातें?"

राधाकृष्णन् यांचें म्हणणें अनुवाद करून स्टॅलिनला सांगतांच तो हसून म्हणाला, "मला भेटणें अवघड आहे असें म्हणतां आणि तुम्ही तर मला आता भेटतां आहांत!"

राधाकृष्णन् यांच्या अडचणीच्या प्रश्नाने गंभीर झालेलें वातावरण या उत्तराने एकदम मोकळें झालें.

राधाकृष्णन्-ब्रेझनेव्ह भेटींत उडालेला एक खटकाहि असाच मोठा गमतीचा आहे. कार्ल चेसमन् या खुनी इसमाला दिलेली देहान्ताची शिक्षा रद्द करून घेण्यासाठी तो बारा वर्षें अमेरिकेंत झगडत होता. त्यासाठी तो तुरुंगांत कायदा शिकला. त्याने तेथे चार कादंबऱ्या लिहून साहित्यिकांत मान्यताहि मिळवली. पण शेवटी त्याचा अर्ज फेटाळला जाऊन सिगसिगला गॅसचेंबरमध्ये त्याला आपलें जीवन संपवावें लागलें. त्याचा उल्लेख करून ब्रेझनेव्ह यांनी अमेरिकेंतील न्यायदानाबद्दल आश्चर्य व्यक्त केलें.

त्यावर राधाकृष्णन् म्हणाले, "अमेरिकेंतील न्यायपद्धतीबद्दल मला माहिती नाही. पण एक कथा मला आठवते. ती अशी –

एकदा एका कॉमिसारने रशियांतील एका शाळेला भेट दिली व मुलांना विचारलें, "अॅना कारोनिना या कादंबरीचा लेखक कोण ? "

विद्यार्थ्याने घाबरत घाबरत उत्तर दिलें, "छे ! छे ! मीं ती लिहिलेली नाही."

इतर विद्यार्थ्यांनाहि उत्तर देतां न आल्याने शाळेबद्दल वाईट मत होऊन तो कॉमिसॉर परतला.

कॉमिसारचें शाळेबद्दल वाईट झालेलें मत आपण बदललें पाहिजे असें वाटून दुसऱ्या दिवशीं शिक्षकाने त्याला पत्र लिहिलें की, "त्या विद्यार्थ्याने आपणहून नंतर आपण 'अॅना करोनिना' लिहिल्याचें कबूल केलें."

ही कथा सांगून राधाकृष्णन् म्हणाले, "कोणाकडे न्यायाची योग्य वूज राखली जाते कोणास ठाऊक ! "

मेजर दत्त यांनी महामंत्री, राष्ट्रपति यांच्याकडून शिष्टसंमत संभाषणांत न खपणारे, पण स्वाभिमान व्यक्त करणारे जे कांही किस्से सांगितले, ते करमणूकहि करतात आणि मन व्यथितहि करतात. पण गोव्यावरील पोलिस-कारवाई पोर्तुगीजांना आधीच कळली होती व तेजपूरची राष्ट्रपतींची भेटहि चीनपासून लपून राहिली नव्हती, हें जेव्हा मेजर दत्त सांगतात तेव्हा मन उद्विग्न होतें. अमेरिकन रायफलींना आघाडीवर गोळ्यांचा पुरवठा न झाल्याची तक्रार वाचतांना तर वाचकांच्या मनाचा संताप होतो.

चीनच्या धोक्याबद्दल जनरल लेटाग्ने याने सावधगिरीचा इशारा पूर्वीच दिला असतां त्याकडे आमचें दुर्लक्ष झालें. भारताची संरक्षक शस्त्रसामग्री अद्ययावत् बनविण्यासाठी लागणारी चाळीस कोटीची आवश्यक रक्कम मोरारजींनी नामंजूर केली. जनरल कौलसारख्या युद्ध न पाहिलेल्या अधिकाऱ्यावर चीनला हकालण्याची जबाबदारी टाकली गेली. भारत-चीन युद्धांत मलायाशिवाय साऱ्याच मित्रराष्ट्रांनी हात आखडते घेतले हें पाहूनहि आम्ही कांहीच शिकलों नाही.

नेतृत्वाच्या बुद्धिकौशल्याचा हा बोजवारा वाचून खरोखरी कपाळाला हात लावावासा वाटतो.

राष्ट्रपति राधाकृष्णन् म्हणाले तेंच खरें. नेतृत्व सुधारावयाचें असेल, तर "Damn it, use the stick"

त्यांनी या संदर्भांत एक गोष्ट सांगितली ती आजहि मोठी उपयुक्त आहे. एका ब्रिटिश वकिलाची बायको नऊ महिन्याची गरोदर होती व वेळींच प्रसूत न झाली, तर तिचें जीवित धोक्यांत येणार होतें. ती शस्त्रक्रियेला भीत होती. नवऱ्याने सर्व तऱ्हेचे औषधोपचार करून पाहिलें, पण उपयोग झाला नाही. शेवटीं मित्राने वैदूचा सल्ला घेण्याबद्दल सुचविलें. वकिलाने वैदूकडे निरोप पाठविला. पण तो होता यमराजसहोदर ! त्याने उलट कळविलें की, "गरज असेल तर पतिपत्नींनी माझ्याकडे यावें." काय करतां ! अगतिक पतिपत्नी वैदूच्या घरीं गेले.

वैदू म्हणाला, "हें पहा, मी जें सांगेन तें मुकाट्याने ऐकणार असाल, तर उपाय करतों."

अडलेले पति-पत्नी गाढवाचे पाय धरण्यासहि जेथे तयार होते, तेथे वैदूचें ऐकण्यास तयार न झाले तरच आश्चर्य !

वैदूने प्रथम वकिलाला घराबाहेर घालविलें. खोलीचें दार लावून घेतलें व गरोदर स्त्रीला कपडे काढून खाटेवर निजण्यास सांगितलें

नंतर तिच्याकडे रोखून पाहत कोपऱ्यांतील काठी घेऊन तो तिच्या दिशेने ओरडत धांवला व खाटेजवळ जाऊन त्याने एवढ्या जोराने काठी जमिनीवर आपटली की, अडलेली बाळंतीण क्षणांत सुटली.

आजहि सरकारने निश्चयाने व शहाणपणाने वागावें असें वाटत असेल, तर 'Damn it, use the stick' असेंच जनतेला सांगितलें पाहिजे, नाही का ?

– केसरी, दि. २२ नोव्हेंबर १९७०

# सिंडिकेटमध्ये वाढती चलबिचल

- ३८ -

गेल्या दोन-तीन आठवड्यांत येथील विज्ञान भवनांत किती सभा-संमेलनें, किती परिषदा झाल्या याची जंत्री ठेवणेंहि अवघड होऊन बसलें आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व्हायोलिनवादक यहुदी मेनुहिन यांना एक लाखाचें 'नेहरू-पारितोषिक' देण्याचा समारंभ झाला. दुसऱ्या दिवशीं त्यांनी जवाहरलाल नेहरू-स्मारक-निधी-साठी व्हायोलिन हातीं धरून दिल्लीकरांना सुरांनी न्हाऊं घातलें. त्या बैठकीचें पांच रुपयांचें तिकीट पन्नास रुपयांनी विकलें गेलें. नंतर झाला नेहरू-स्मारक परिसंवाद, आफ्रो-आशियाई परिषद्, सातवी एशियन ॲडव्हर्टायझिंग कॉंग्रेस ! दिल्लीच्या उच्चभ्रू (elite) 'सोसायटी'ने विज्ञान भवनांत गर्दी केली होती. जपान आदि पूर्व आशियाई देशांत साड्यांचा खप वाढल्याचें तरुणींच्या लुंगी-कुडत्याच्या अद्ययावत् पेहरावावरून लक्षांत येत होतें.

ओबेराय, अशोक आदि राजशाही हॉटेलांतून या परिषदांच्या निमित्ताने वाहिलेले मदिरेचे पाट तर बराच काळ निमंत्रितांच्या लक्षांत राहतील. चकाकत्या स्फटिक-काचपात्रांतून सोनेरी पेय घशाखाली सोडतांना सारी काळजी वाहून जात होती व राजधानींतील थंड, दिलखुलास वातावरणाने सारे जण भारावून गेले होते.

आणि आता नुकतेंच उरकलें फेडरेशन ऑफ एरोनॅटिक इंटरनॅशनलचें ६३ वें अधिवेशन. या अधिवेशनाच्या निमित्ताने अमेरिकेचे दोघे व रशियाचे चौघे अवकाशवीर एका मंचावर एकत्र आले व त्यांनी राष्ट्रपतींच्या हस्तें पदकांचा स्वीकार केला. त्यांत होते चंद्रावर पहिलें पाऊल टाकणारे – ज्यांचा उल्लेख

"मानवाचें हें एक पाऊल म्हणजे मानवतेच्या दृष्टीनें मोठी झेप आहे" असा अभिमानानें केला जातो ते – अमेरिकेचे अवकाशवीर नील आर्मस्ट्राँग व 'अपोलो–१२'चे कमांडर चार्लस् कोनराड. तसेच रशियाचे 'सोयूज–५'चे कमांडर व्ही. व्ही. वोलिनोव शातालोव, आलिसेयेव व ख्रुनोव.

पर्यटनमंत्री डॉ. करणसिंग यांनी अशोक हॉटेलमध्ये त्यांना चहापानासाठी आमंत्रिलें होतें. पर्यटन मंत्रालयाच्या सल्लागार समितीचा सभासद म्हणून मीहि आमंत्रित होतों. अनायासें आर्मस्ट्राँगचा निरागस चेहरा व कोनराडच्या डोळ्यांतील निळी चमक जवळून पाहतां येणार होती. एरोनॉटिक संघाचे अध्यक्ष एडवर्ड वेजेलिस् आले. एअर-इंडियाचे अध्यक्ष श्री. भरतराम आले, पण डॉ. करणसिंग व त्यांच्या पत्नी यशोराजदेवी तब्बल वीस मिनिटें प्रवेशद्वाराजवळ वाट पाहत उभ्या राहूनहि अवकाशवीर मात्र पोचले नाहीत. कोठें माशी शिंकली कोण जाणे. डॉ. करणसिंग निराशेच्या सुरांत म्हणाले, "आज ते येऊं शकत नाहीत असें दिसतें. उद्या त्यांची भेट होईल अशी आशा आहे."

आणि त्यांची व माझी भेट संसदेच्या प्रेक्षाकक्षांत झाली. राज्यसभेंत त्या वेळीं टायर-ट्यूबच्या टंचाईवर व काळ्या बाजारावर चर्चा चालू होती. रूझवेल्ट भवनामध्ये पत्रकारांशीं बोलतांना आर्मस्ट्राँग म्हणाले होते, "दोन हजार सालीं चांद्रप्रवास ही नित्याची बाब होऊन जाईल. क्वचित् मानवजातीच्या अस्तित्वा-साठीहि तो प्रवास करणें भाग पडेल." प्रेक्षाकक्षांत बसलेल्या आर्मस्ट्राँगना राज्य-सभेंतील टायर-ट्यूबच्या टंचाईवरील वाद ऐकून, तसेंच एअरो क्लबचे अध्यक्ष बोलिना यांनी विज्ञान भवनांतील समारंभांत रामसीतेच्या पुष्पकांतून अयोध्या-परतीचें व महाभारतांतील भीमाने अवकाशांत भिरकावलेल्या हत्तीचें केलेलें वर्णन ऐकून वाटले असेल की, आपल्या सांस्कृतिक व आध्यात्मिक वैभवाने चमकणारा हा भारत सध्याच्या भौतिक व वैज्ञानिक युगांत किती मागासलेला आहे!

उबड़-खाबड़ कंकरीले पथरीले ।
रसविहीन, चांदकी तरह चमक रहा है ।
भारत का इन्सान ।।

*

संसदेच्या मध्यवर्ती सभागृहांत अवकाश-वीरांचें आगमन हा कुतूहलाचा विषय होता. पण सिंडिकेटचे प्रतोद शिवनारायण व त्यांचे सहकारी यांनी काँग्रेसच्या एकत्रीकरणासाठी फडकावलेल्या आसुडाचे प्रतिध्वनी मध्यवर्ती सभागृहाच्या साऱ्या कानाकोपऱ्यांतून उठत होते व जो तो काँग्रेसी सदस्य एकमेकालाच "युनिटीवाला का?" म्हणून प्रश्नार्थक मुद्रेने विचारत होता. तारकेश्वरींना एका पत्रकाराने हाच प्रश्न विचारतां त्या नेहमीप्रमाणे भडकून म्हणाल्या, "उत्तर प्रदेशांतील आपलें

विसकटलेलें राजकारण झाकण्यासाठी इंडिकेटने उभा केलेला हा धुराचा पडदा आहे. उत्तर प्रदेशचा परिणाम विहारवर होऊन थोड्याच काळांत इंडिकेटची तिथेंहि पळतां भुई थोडी झालेली तुम्हांला पहायला मिळेल !"

तारकेश्वरी सिन्हा अशा रीतीने कितीहि लढाऊपणें बोलत असल्या, तरी सिंडिकेटच्या अनुयायांत मोठी चलविचल झाली आहे व जगजीवनबाबूंच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकत्र यावें या विचारप्रवाहाला सिंडिकेटमध्ये जोर चढला आहे. सिंडिकेट-नेत्यांच्या जनसंघ-स्वतंत्रांशी हातमिळवणी करण्याच्या धोरणावर उत्तर प्रदेश व गुजरातमधील सिंडिकेटचे आमदार नाराज आहेत. सुचेता कृपलानी यांनी सिंडिकेट सोडल्याची सर्वत्र प्रसृत झालेली वार्ता जरी खोटी ठरली असली, तरी त्याहि उद्विग्न आहेत. श्री. शिवनारायण मला भोजनगृहांत भेटले असतांना म्हणाले, "मी टाकलेलें पाऊल आता एकीच्या संदर्भांत पुढे पुढेच नेणार आहे."

शिवनारायणांचा हा जोष मला तरी आश्चर्यकारकच वाटला. इंडिकेटला यापूर्वी ते याच जोमाने शिव्या घालीत असत व आता सिंडिकेटच्या नेत्यांचीं ते तशींच मापें काढीत आहेत. बिहारमधील एका वृद्ध नेत्याला याबद्दल मीं विचारलें, "ही किमया आहे तरी काय ?"

त्यावर त्यांनी जिगर यांचा एक शेर मला म्हणून दाखविला —

पीता बगैर इज्न यह कब थी मेरी मजाल ।
दापर्दा चश्मेयार की शहपाके पी गया ।।

ते पुढे म्हणाले, "पड्याआड असलेल्या नजरेचा हा सारा खेळ आहे. टिळक, हा सारा अस्वलाचा नाच कोणाच्या तरी इशाऱ्याने चालला आहे. भक्कम पाठपुरावा असल्याशिवाय हा एवढा जोष थोडाच उभा राहतो. काँग्रेसमधील फुटीमुळे नैतिकदृष्टचा सर्वांचें इतकें अध:पतन झालें आहे की, या सत्तास्पर्धेत सकाळीं एकीकडे दिसलेला इसम संध्याकाळीं दुसरीकडे दिसला, तर आश्चर्य मानण्याचें कारण नाही."

त्यानंतर त्यांनी मला एक गोष्ट सांगितली ती अशी —

स्टॅफोर्ड क्रिप्स भारतांत आले होते तेव्हा त्यांना फिरोझखान नून यांनी आपल्या घरीं चहापानाला बोलावलें. फिरोझखानांनी मिसेस नून यांची ओळख करून दिली. पुढे या स्वागताची परतभेट म्हणून सर स्टॅफोर्ड यांनी फिरोझखानांना सहकुटुंब 'कॉकटेल पार्टी'साठी आमंत्रण दिलें. सर स्टॅफोर्ड यांचे चिटणीस माझे मित्र होते. ते दुसऱ्या दिवशीं माझ्याकडे आले आणि म्हणाले, "सर स्टॅफोर्ड मोठे पेचांत पडले आहेत. फिरोजखानांच्या घरीं भेटलेल्या मिसेस नून व कॉकटेल पार्टीला आलेल्या मिसेस नून सर स्टॅफोर्डना वेगळ्या वाटल्या. हें वयामुळं घडलं, की मिसेस नून यांच्या पार्टीच्या वेळच्या अद्ययावत् वस्त्रप्रावरणांनी सर स्टॅफोर्ड यांच्या डोळ्यांना फसवलें, कांही कळत नाही."

त्यावर मी हसून म्हणालों की, "आपल्याला पेच पडण्याचें कांहीच कारण नाही. सर स्टॅफोर्ड यांना फिरोझखानांच्या घरच्या भेटींत भेटल्या त्या 'मिसेस् नून' व 'कॉकटेल पार्टी'च्या वेळीं भेटल्या त्या 'मिसेस् आफ्टर नून!'"

तेव्हा सांगावयाचें काय की, शिवनारायणांसारखे दोन्हीकडे झुकणारे चलाख कार्यकर्ते सकाळीं सिंडिकेटला व सायंकाळीं इंडिकेटला घेऊन फिरत असले, तर या दिवसांत आश्चर्य मानण्याजोगें त्यांत कांही नाही.

*

इंदिराजींचें रणरंगण मात्र पहिल्याच आत्मविश्वासाने व तडफेने चालू आहे. रा. स्व. संघाचे गोळवलकर गुरुजी यांनी रामलीला मैदानावर संघाच्या व जनसंघाच्या कार्यकर्त्यांपुढे बोलतांना सांगितलें की, "हिंदुराष्ट्रवादाचें जतन करण्यासाठी जर त्यागी कार्यकर्ते पुढे आले नाहीत, तर पाकिस्तान, रशिया व चीन यांच्यापासून स्फूर्ति घेतलेले तथाकथित पुरोगामी, क्रांतिवादी, समाजवादी देशाचा घात करतील. केरळांतून हें आक्रमण देशभर पसरलें, तर मला आश्चर्य वाटणार नाही. समाजवादाची भाषा, त्याचा अर्थ न समजून घेतां बोलण्याची शहाण्यांत (वाईज मेन) फॅशनच पडली आहे. देशाच्या विकासाकडे लक्ष देण्याऐवजीं पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या ओघांत ते वाहत जात आहेत."

गुरूजींचें हें भाषण इंदिराजींच्या कानी जातांच दुसऱ्या दिवशीं त्यांनी आपल्या घरासमोरील हिरवळीवर पांच हजार काँग्रेस कार्यकर्ते एकत्र करून त्यांना एक संथा दिली. त्या म्हणाल्या, "देशांत कांही शहाणे 'वाईज' असतात, तर बाकीचे 'अदरवाईज' असतात. संघ, जनसंघ व इतर प्रतिगामी पक्ष देशाच्या सामाजिक, आर्थिक व औद्योगिक प्रगतीला आपल्या संकुचित विचारांनी अडथळा आणीत आहेत. वस्तुस्थितीकडे पाहण्याचें ते मुद्दाम टाळीत असून, जनतेच्या हिताची आर्थिक समता त्यांना मानवत नसल्याने देशांत दंगे करून प्रगतीची लाट हे जातीयवादी उलटवूं पाहत आहेत. काँग्रेसवाल्यांनी या प्रतिगामी व जातीय शक्तींना तोंड दिलें पाहिजे व समाजवादाचा मार्ग आपले प्राण गेले तरी बेहत्तरपणें चोखाळला पाहिजे."

निवडणुकीचीं प्रसादचिन्हें राजधानींत अशीं आता दिसू लागली आहेत. सिंडिकेटमधील चलबिचल त्याचीच द्योतक आहे. मोरारजी-निजलिंगप्पा यांचें नेतृत्व व उजव्या पक्षांशीं त्यांनी चालविलेली हातमिळवणी आपल्याला राजकारणाच्या पटावरून सपशेल उठवील असें सिंडिकेटच्या अनुयायांना वाटत आहे, तर इंडिकेटला व खुद्द इंदिराजीनाहि उजव्या पक्षांवर तोफा डागून काँग्रेसवाल्यांना एकजुटीने निवडणुकीच्या रिंगणांत बांधून उभे करण्याची गरज भासत आहे. इंदिराजींचा गुरुजींवरील हल्ला हा त्याच हेतूने होता.

*

गोमंतकाचे मुख्य मंत्री श्री. दयानंद बांदोडकर हे गेले कांही दिवस राजधानींत मुक्काम ठोकून वसले होते. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षांतून अँथनी डिसूझा वगैरे बंडखोर बाहेर पडल्यावर व त्यांतील दोघांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर नवे मंत्री घेऊन मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रश्न केंद्राची मंजुरी न मिळाल्याने लोंबकळत पडला आहे. त्या प्रश्नाचा सोक्षमोक्ष करण्यासाठीच श्री. बांदोडकरांनी येथे दोन-तीन दिवस तळ दिला होता. केंद्रीय मंत्र्यांची कान-भरणी करणाऱ्या काकोडकरांच्या राजकारणाला गोव्याचे पंजाबी नायब राज्यपाल श्री. नकुल सेन यांची साथ मिळाली आहे. भाऊसाहेब बांदोडकर यांनी आपल्या हातांतील सत्तेचा स्वार्थासाठी उपयोग केल्याचा आरोप करणारें एक पत्र गोव्यांतील कांही उपद्व्यापी नागरिकांच्या सह्यांनी केंद्र-सरकारकडे पाठविण्याचें कारस्थान काकोडकर प्रभृतींनी रचलें व त्यामुळे निर्माण झालेल्या संशयग्रस्त वातावरणांत केंद्र-सरकार सापडलें होतें. बांदोडकरांनी त्या आरोपाचा खोटेपणा एक-एक मोजून दाखविल्याने व तसें केंद्र-सरकारकडून पूर्वीच पाठविलेलें लेखी उत्तर महामंत्र्यांना त्यांच्या भेटींत समक्ष दिल्याने आता हें संशयाचें धुकें पुष्कळच विरलें आहे.

बांदोडकरांना खरे अडत आहेत ते हे विरोधकांचे खोटे आरोप नव्हेत, तर दिल्लींतील राजकारण. बांदोडकर हे काँग्रेसवासी नाहीत; ते महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे मुख्य मंत्री आहेत. बंडखोरांनी काँग्रेसमध्ये दाखल होण्याचा 'स्टंट' करून केंद्र-सरकारला असें मधाचें बोट लावलें की, एका बांदोडकरांना बाजूला केलें की, गोमंतकांत इंडिकेटचें मंत्रिमंडळ स्थानापन्न होईल. जें केंद्र-सरकार अडखळलें तें याच डावामुळे. जगजीवनबाबूंच्या गोमंतक-भेटींत खरोखरी त्यांच्या लक्षांत आलें आहे की, पुरुषोत्तम काकोडकरांच्या नेतृत्वामुळे गोमंतकांतील काँग्रेसचा भाव पार रसातळाला गेला आहे व जे बंडखोर आता आंत शिरले आहेत त्यांच्यामुळेहि तो वधारणारा नाही. युनायटेड गोवन्स व इंडिकेट काँग्रेस एकत्र येऊन मंत्रिमंडळ बनवायचे तर सिक्वेरांना मुख्य मंत्री केलें पाहिजे. सिक्वेरा मुख्य मंत्री झाले, तर तें मंत्रिमंडळहि काँग्रेसचें बनत नाही. सिक्वेरा काँग्रेसमध्ये येतील ही आशाहि जोंवर पोर्तुगीज चर्चचे वर्चस्व गोव्यांत आहे तोंवर मृगजळवत् आहे.

बांदोडकरांवर ते हट्टी आहेत, रागीट आहेत असे आरोप एक वेळ करतां येतील, पण ते स्वार्थी आहेत हा आरोप गोमंतकांतील जनता कधीच मानणार नाही. गोमंतकाचे यापूर्वीचे नायब राज्यपाल हांडू किंवा दामले यांचा शब्द सेन यांच्या शब्दाशी ताडला, तर सेन यांचें पितळ उघडें पडल्याशिवाय राहणार नाही. कृष्णचंद्र पंतांना इंडिकेटचें राजकारण गोव्यांत शिजेल असें भासवल्याने ते ही हंडी उकडविण्यास सवड देत आहेत, पण तें इंडिकेटच्या राजकारणालाच घातक ठरणार आहे. इंडिकेटच्या बाजूने बांदोडकर उभे राहणें हेंच

गोमंतकाच्या व इंडिकेटच्या दृष्टीने हिताचें आहे व याची जाणीव महामंत्र्यांना या वेळच्या भेटींत बांदोडकरांनी करून दिली.

*

लोकसभेमध्ये 'मंत्री व खासदार यांचें भाडें, पाणीपट्टी किती थकली आहे याची माहिती विचारली गेली असतां, या लोकप्रतिनिधींनी दोन लक्ष सत्तावन्न हजार दोनशेबारा रुपये मार्च १९७० अखेर थकवल्याचें ध्यानीं आलें. यांपैकी वीज, पाणी व फर्निचरच्या भाड्यापोटीं सध्याच्या मंत्र्यांनी दहा हजार सहाशे पंचेचाळीस रुपये व खासदारांनी एकोणतीस हजार सातशे सत्याऐंशी रुपये थकविले, तर भूतपूर्व मंत्र्यांनी सात हजार दोनशे आठ व भूतपूर्व खासदारांनी दोन लक्ष नऊ हजार सहाशे एक रुपये बुडविले. कुंपणच शेत खाऊं लागले व लोकांच्या हिताचें जें रक्षण करणार तेच जनतेचे उत्पन्न बुडवूं लागले, तर लोकांचा नेतृत्वावर विश्वास राहणार कसा? प्रवासांत मला भारतांत वास्तव्य केलेले एक जपानी गृहस्थ भेटले. ते म्हणाले, "मी स्वतःला भारतीय समजतों. म्हणून तुम्ही संसदेंत जनतेचें म्हणणें म्हणून अवश्य सांगा की, आम्हांला सज्जन नेते हवे आहेत, राजकारणी नेते नकोत!"

स्व. जमनादास मेहता म्हणत असत, "देशांत दोन वर्ग आहेत. एक जंटलमेन व दुसरे काँग्रेसमेन!"

जाऊं द्या झालें! काँग्रेसवाले कसे कमलदलासारखें आहेत. टीकेचें पाणी त्यावरून सहज घसरून जातें.

आप बेवजह परेशान से क्यूं है साहब!।
लोक बकते है तो फिर झूठ ही बकते होंगे।
इनके परदादों ने तहजीब न सीखी होगी।
इनके माहौल में मंत्रीजी न रहते होंगे।।

— केसरी, दि. २९ नोव्हेंबर १९७०

# सीमा-प्रश्नाबाबत धरसोडीचें धोरण

**- ३९ -**

चांद्रवीरांच्या सत्कारांत गुंतलेल्या दिल्लींतील नागरिकांचें एका नव्या धाडसी खेळाच्या उद्‌घाटनाकडे म्हणावें तसें लक्ष गेलें नाही. नाही म्हणावयास त्या उद्‌घाटनाच्या वेळीं अपघात झाल्याची जी अफवा दिल्लींत पसरली, त्यामुळे जनमानसांत कांही खळबळ उडाली तेवढीच ! दिल्ली ग्लायडिंग क्लबने हॉलंडच्या साह्याने बलून-उड्डाणाच्या शिक्षणासाठी ' ग्लायडिंग क्लब 'च्याच धर्तीवर ' बलूनिंग क्लब 'ची स्थापना केली आहे.

बलूनचें पहिलें उड्डाण नील आर्मस्ट्रॉंग यांच्या शुभ हस्तें सफदरजंग विमानतळावर पार पडलें. जमिनीला दोराने खिळवून ठेवलेल्या, काळे पट्टे असलेल्या, केशरी रंगाच्या त्या बलूनला नील आर्मस्ट्रॉंग यांनी मोकळें करतांच तो भला मोठा फुगा त्याला बांधलेल्या टोपलींतील तीन जिवांसह डुलत डुलत, वाऱ्यावर तरंगत पश्चिमेकडे वाहत जाऊन दृष्टीआड झाला. हें ' निंबस बलून ' जर्मन सामग्रीने बनविलेलें आहे. त्यावरील जाळें इजिप्शियन आहे. दोऱ्या इटालियन आहेत. तर त्याची टोपली इंडोनेशियन वेळूपासून बनविलेली आहे. असा हा सारा आंतरराष्ट्रीय मामला आहे.

'निंबस'च्या पहिल्या उड्डाणांत भाग घेतला होता श्री. विष्णुबंधु गुप्त व डॉ. आणि श्रीमती बोसमन् यांनी. दिल्लीहून सुटलेले हे तिघेजण भरतपूरनजीक बलूनमधील वायु सोडून देऊन उतरणार होते. पण या बलूनचा स्फोट होऊन टोपली खाली कोसळली व आंतील प्रवासी भयंकर जखमी झाल्याची वार्ता सायंकाळीं दिल्लींत कर्णोपकर्णी झाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं श्री. गुप्त व त्यांचे सहकारी जीपमधून

मिटलेल्या बलूनचें गाठोडें घेऊन दिल्लींत सुखरूप परतलेले पाहून मात्र सारेच आश्चर्यचकित झाले. श्री. गुप्त अपघाताची सारी अफवा ऐकून हसत म्हणाले – "छे छे! बलूनच्या या प्रथम उड्डाणाचा जो मानसिक ताण आमच्यावर पडला, त्यामुळे थोडेसें डोकें दुखलें तेवढेंच. बाकी आम्ही सारे धडधाकट खाली उतरलों."

आपल्या प्रवासाची चित्तथरारक हकीकत सांगतांना ते म्हणाले, "बलूनचा दोर सोडतांच तो फुगा आम्हांला घेऊन पहिल्या पंधरा मिनिटांत हजार फूट वर चढला. जमिनीचा आधार तुटलेली आमची इवलीशी टोपली अवकाशाच्या पोकळी-मध्ये तरंगत होती. जिवंतपणीच 'निर्वाणा'ची प्राप्ति झाल्यासारखें माझ्या हिंदु मनाला वाटलें."

नंतर जरा थांबून ते गंभीर मुद्रेने म्हणाले, "हो, 'निर्वाण' प्राप्त झालें, पण शरीराचा बंध न सुटल्याने पोटोबाची सोय व्हायला हवी होती; आणि गडबडीत आम्ही खाण्याचें घ्यावयास अजीबात विसरलों. आमच्याजवळ होत्या फक्त पेपर-मिंटच्या गोळ्या व सोडावॉटरच्या चार बाटल्या. मग निनीने त्यांतीलच एक सोडा-वॉटरची बाटली फोडून बलूनचें प्रथमोड्डाण साजरें केलें.

"बलूनचें तरंगणें व प्रवासाची दिशा जमिनीचा अंदाज घेऊन ठरवावयाची असते. खालच्या लोकांचें बोलणें आम्हांला ऐकूं येत होतें व आम्हीहि ओरडलों की त्यांना ऐकूं जाई. बलूनमधील वाळूच्या पिशव्यांतील वाळू कमीजास्त सोडून तें आकाशामध्ये वरखाली चढवतां-उतरवतां येतें. तें काम निनी करी. थोडीशी वाळू खाली टाकली की, लगेच बलून भरकन् वर चढे."

बहादूरगडाहून बलून पुढे सरकल्यावर मात्र त्यांतील प्रवाश्यांचा दिशेचा अंदाज चुकला. मोकळ्या शेतांतून जाणाऱ्या एका पाटलाला गुप्ता यांनी हाकारून विचारलें, "पाटील, हें जवळचें गाव कोणतें?"

पाटील प्रथम ही आकाशवाणी ऐकून चमकलेच. पण मग वर पाहून हसू लागले. शेजारच्या खेड्यांत फोन असल्याचें त्यांनी सांगतांच बलूनमधील वायु सोडून हे तिन्ही बलून-प्रवासी उसाच्या शेतांत उतरले व बलूनचा फुगा मिटवून किल्ला-जफरगड हें रेल्वे-स्टेशन गाठून दिल्लीत परतले. ग्लायडिंग, माऊंटनियरिंग, (गिर्यारोहण), हंटिंग (शिकार), स्किइंग (बर्फावरील घसरगंडी) या साहसी खेळांमध्ये आता बलूनिंगचीहि नवी भर पडली आहे. भारतांतील युवकांनी या साऱ्या साहसी खेळांत रस घेतला तरच तें कर्तृत्ववान् नागरिकांचें राष्ट्र बनेल. 'साहसे श्रीः प्रतिवसति' हेंच सर्वकाळ खरें आहे. भेंडीची भाजी खाऊन अहिंसेचा जप करीत बसण्याने केवळ कणाविरहित राष्ट्राची निपज केल्याचें पाप तेवढें लागेल. तो खेळ आता पुरे झाला.

*

काव्य-साहित्यांतील 'निर्वाण' प्राप्त करून घेतलेले उर्दू कविश्रेष्ठ फिराक गोरखपुरी यांना ज्ञानपीठ-पारितोषिक बहाल करण्याचा विज्ञान भवनांत झालेला समारंभहि अनेक दृष्टींनी असाच लक्षांत राहण्याजोगा होता. त्या समारंभाला महा-मंत्री हजर राहिल्या. गोरखपुरी यांना एक लाखाचा चेक, वाग्देवीचा पुतळा आणि 'गुल्-ए-नगमा' या काव्यसंग्रहाच्या प्रशस्तीचा ताम्रपट भेट मिळाला. हा समारंभ, गोरखपुरी यांचे जे अनमोल विचार या निमित्ताने ऐकावयास मिळाले त्यामुळे माझ्या मनांत अधिक ठसला. कै. तात्यासाहेब केळकरांनी मांडलेल्या साहित्यांतील सविकल्प समाधीशीं मला ते खूपच मिळते-जुळते वाटले.

गोरखपुरी म्हणाले, "साहित्य वनता तो शब्दोंसे है, लेकिन ये शब्द जब एक नीरवता में लय और लीन हो जायें, जब शेर विस्मत हो जायें और उससे उत्पन्न होनेवाली एक अकथनीय स्थिति पैदा हो जाये, वही स्थिति साहित्य और काव्य की सब में बडी देन है।"

बर्नार्ड शॉ यांनी एक प्रश्न विचारला होता की, "मनुष्याचा विकास होतां होतां तो जेव्हा विकासाचा व प्रगतीचा अंत गाठील तेव्हा माणसाची स्थिति काय असेल? तें जीवन, मुक्त असेल काय?" व्यक्तीला विहित कर्म सुटत नाही. पण हें कर्म त्याला प्रगतिपथावर नेत असतांना त्याला या कर्मबंधनापासून सुटण्यासाठी कोणी साहाय्यकारी ठरत असेल, तर ते आत्मचेतक साहित्य. या संदर्भात फिराक गोरखपुरी म्हणतात –

जाओ न तुम इस बेखरी पर की हमारे है।
हर ख्वाव से इक अहद की बुनियाद पडी।

यापूर्वी हे ज्ञानपीठ-पारितोषिक श्री. शंकर कुरूप, ताराशंकर बंदोपाध्याय, डॉ. पुट्टाप्पा व डॉ. उमाशंकर जोशी आणि सुमित्रानंदन पंत यांना दिलें गेलें आहे. या वेळीं तो मान मिळाला फिराक गोरखपुरी यांना. हा मान मिळविण्यासाठी जीवनभर केवढी तपस्या गोरखपुरी यांना करावी लागली, याची दखल फारच थोडयांनी घेतली असेल. बहुतेकांना चिंता पडली की, एवढया एक लाख रुपयांचें गोरखपुरी करणार आहेत तरी काय?

त्यावर मजेने ते म्हणाले, "एका तहशीलदाराने एकदा 'विधवा-निधि' काढला. निधि जमा झाला, तरी त्याच्या व्यवस्थेबावत तहशीलदार तोंड दाबून बसला. शेवटीं एकाने धीर करून विचारलें, "झालें तरी काय निधीचें!"

त्यावर तहशीलदारसाहेब म्हणाले, "मित्रा, आयुष्य हें क्षणभंगुर आहे. मी आज आहें, उद्या नाही. माझ्या मागे पत्नीने काय करावें. तिच्यासाठी नाही का उपयोगी येणार हा पैसा!"

ही गोष्ट सांगून गोरखपुरी म्हणाले, "लोक मला जेव्हा विचारतात की, साहित्यसंघांना आपण नाही का या पारितोषिकांतून कांही देणगी देणार? त्यांना

माझें तहशीलदाराप्रमाणे उत्तर हें आहे की, मी साहित्यिकच आहें. तेव्हा माझ्या कारणीं लागणारा हा पैसा पर्यायाने साहित्यालाच मदत करणारा ठरणार आहे."

समारंभप्रसंगी भारतीय ज्ञानपीठाच्या अध्यक्षा श्रीमती रमा जैन म्हणाल्या, "अरबी समुद्रांतून आणि इराणच्या आखातांतून जमा केलेल्या सांस्कृतिक शिंपल्यांत फिराक यांनी आपल्या प्रतिभेचे अमृतकण टाकले. त्याचे हिंदी महासागरांतील तेजस्वी मोती बनले आहेत." या तेजस्वी मोत्यांचें पाणी साऱ्यांनाच जोखतां आलें पाहिजे. म्हणूनच उर्दू न जाणणाऱ्या रसिकांच्या सोयीसाठी देवनागरी लिपींत अनुवादिलेले गोरखपुरी यांचे 'बझ्म-इ-जिंदगी' व 'रंग-इ-शायरी' या काव्यमुक्तामाला या पारितोषिक समारंभांत प्रकाशित झाल्याचें इंदिरा गांधींनी जाहीर केलें.

किती रसिक त्याची दाद घेतील व देतील !

गमतीने असें म्हणावेसें वाटतें की, कालांतराने रसिकांनी आपल्या काव्याला किती 'दाद' दिली याची चाहूल घेण्यासाठी गोरखपुरी प्रकाशकाला पत्र पाठवतील जगांतील तें अगदी छोटें पत्र असेल, केवळ एका चिन्हाचें व तें असेल प्रश्नचिन्ह (?).

प्रकाशकालाहि त्यांना उत्तर देतां यावें, अगदी छोटयाशा एका चिन्हांकित पत्राने व तें असावें उद्‌गारचिन्ह (!). माझी ही अपेक्षा अनाठायीं तर ठरणार नाही ना ?

*

या वेळच्या संसदीय अधिवेशनांत रंग असा केव्हा भरलाच नाही. मध्यावधि निवडणुकांचे ढग हवेंत तरंगत ठेवले गेल्याने अधिवेशनावरहि त्याचें सावट पडलें. चोवीस परगण्यांतील बारासात पोलिस-चौकीच्या हद्दींत झालेल्या आठ युवकांच्या हत्येवरील चर्चेच्या वेळीं साम्यवादी व अन्य डाव्या पक्षांनी लोकसभेंतून केलेला सभात्याग व आकाशवाणीच्या कार्यक्रमावरील चर्चेच्या वेळीं राज्यसभेंतून जनसंघ, सिंडिकेट आदि उजव्या विरोधी पक्षांनी केलेलें बहिर्गमन याच काय त्या दोन लाटा संसदेच्या शांत हिवाळी अधिवेशनांत आतापर्यंत उठल्या.

बारासात येथील हत्येची अनधिकृत चौकशी करण्यासाठी डाव्या विचाराच्या खासदारांचें एक शिष्टमंडळ नुकतेंच पश्चिम बंगालकडे रवाना झालें आहे. सी. बी. आय्.चे अधिकारीहि त्याची चौकशी करीत आहेत. या हत्येंत वीस-पंचवीस वर्षांचे कोवळे युवक बळी पडले हें खरें असलें व त्याबद्दल कितीहि दुःख होत असलें, तरी आज पश्चिम बंगालला तेथील नेतृत्वाने हिंसाचाराची खाई बनविलें आहे व त्याचे हे बळी आहेत असें स्पष्टपणें म्हणणें प्राप्त आहे. या खाईंत हे नेते नुसता बंगालचाच बळी देणार नसून, देशाचाहि बळी त्या यज्ञकुंडांत न पडो म्हणजे मिळविली. सकाळीं वर्तमानपत्र उघडलें की, पश्चिम बंगालमधील धुमाकुळीची ठळक अक्षरांमध्ये छापलेली बातमी डोळयांत घुसते व काळजाला जाऊन भिडते. व्यापारी, पोलिस व मुलकी

अधिकारी, राजकीय कार्यकर्ते, आणि सभ्य नागरिक गुंडांच्या व नक्षलवाद्यांच्या अत्याचारांना बळी पडत असून, वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावरून त्या वृत्तांचें रक्त ठिबकत असतें.

या परिस्थितीला आवर घालण्याऐवजीं श्री. ज्योति बसू सांगतात की, "हें सारें पोलिसांचेंच काम आहे. मार्क्सवाद्यांतील जे दहा टक्के लोक स्वप्नरंजनवादी व अतिरेकी होते ते नक्षलवादी म्हणून बाहेर पडले. या स्वप्नील युवकांचा साराच कारभार मुक्त व उघड असल्याने पोलिसांनी त्यांतील आठ टक्क्यांना ठेचून काढलें. आता फार तर दोन टक्के शिल्लक असतील. त्यांच्याशीं मार्क्सवाद्यांचा झगडा चालू आहे व तसे कांही झगडे पक्षोपक्षांत होत आहेत व कांही कार्यकर्ते बळी पडत आहेत, नाही असें नाही. पण पोलिसांनी तुरुंगांतून गुंड सोडून त्यांच्या सुटकेच्या बदल्यांत त्यांना नक्षलवाद्यांच्या गोटांत घुसून अत्याचार करण्यास चिथावलें आहे. कम्युनिस्ट पक्षाला ठेचून काढण्याचें हें पोलिसांचें व इंदिरा सरकारचें कारस्थान आहे."

ज्योति बसू यांचें हें तर्कट एका बाजूस तर दुसऱ्या बाजूस दिल्लींत इंदिरा गांधी नक्षलवाद्यांना वाट चुकलेले युवक मानून त्यांच्याशी सभ्यतेची वागणूक करण्याची अगतिक भाषा बोलत आहेत. ती ऐकून पश्चिम बंगालच्या भवितव्याची चिंता कोणाचेंहि मन व्यथित करील.

मला सर्वांत आश्चर्य याचें वाटतें की, बंगालमध्ये अशीं हत्याकांडें चालू असतां लोकसभेंत काय किंवा राज्यसभेंत काय, बंगालबाबत कोणताहि प्रश्न निघो, झाडून सर्व पक्षांचे सारे बंगाली खासदार जणू बंगालच्या प्रतिष्ठेवर इतर सभासद हल्ला करावयास निघाले आहेत असें मानून, त्या काल्पनिक हल्ल्यापासून बंगालचा बचाव करण्यासाठी कंबर कसून खडे होतात. बंगालने एक काळ साऱ्या राष्ट्राला फार मोठें सांस्कृतिक व राजकीय नेतृत्व दिलें. आज तें बंगाली पुढारीपण संकुचिततेच्या व अराजकाच्या सर्वस्वीं आहारी जाऊन आंधळें बनलें आहे हें दुर्दैव होय.

इंदिराजींच्या अल्पसंख्य सरकारासहि बंगालमध्ये कायद्याचें राज्य चालविणें आज तरी अशक्य झालेलें दिसतें. प्रतिबंधक स्थानबद्धता आदि साधनांनी सुसज्ज झाल्यावर तरी तेथील पोलिसांचें व अधिकाऱ्यांचें नैतिक धैर्य वाढून हत्याकांडाला आवर बसावा, पण तसें घडतांनाहि दिसत नाही. अशक्त केंद्र-सरकार राज्याराज्यांत विसकटणारी घडी ठाकठीक बसविण्यास असमर्थ ठरूं लागलें असेल, तर अपक्षीय खासदारांच्या व प्रादेशिक पक्षांच्या आधारें बहुमत मिळवून राज्य चालविण्यापेक्षा लोकांपुढे निवडणुकीसाठी लवकरांत लवकर जाणेंच इष्ट नाही काय ?

*

महाराष्ट्राच्या दृष्टीने सीमा-प्रश्नाच्या जोडीला महाराष्ट्र राज्याचे उपमंत्री श्री. व्यंकटराव हिरे यांच्या खोटया ड्राफ्टच्या प्रकरणाने येथे बरेंच कुतूहल निर्माण केलें आहे. परकीय चलनाच्या काळ्या बाजारावर चर्चा चालू असतांना खासदार

अटलविहारी वाजपेयी यांनी विचारलें की, " महाराष्ट्राचे उपमंत्री श्री. हिरे यांनी लंडन बँकेंत एक खोटा ड्राफ्ट वटविण्याचा प्रयत्न केला हें खरें काय ? कोण्या चंपकलाल या नांवाच्या गृहस्थाने हा ड्राफ्ट हिरे यांना दिला होता.

राज्यमंत्री श्री. मिर्धा यांनी हा प्रश्न मुद्द्याला सोडून आहे असें सांगून डावलला. पण श्री. फर्नांडीस यांनी तो उपस्थित केला असतां, अर्थमंत्री श्री. चव्हाण यांना " त्याबाबत चौकशी करावी लागेल व ते महाराष्ट्र राज्याचे उपमंत्री असले, तरी ती केली जाईल, " असें उत्तर देणें भाग पडलें. यशवंतरावांच्या चौकशींत काय निष्पन्न व्हावयाचें असेल तें होवो, पण कोणालाहि हा प्रश्न पडेल की, अभ्यास-दौऱ्यावर गेलेल्या उपमंत्र्यांकडे लॅफट इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीजच्या चंपकलाल शहांनी ५६८ डॉलर्सचा ड्राफ्ट कशासाठी पाठविला ? त्यांचे आणि हिरे यांचे संबंध काय ? बरें; व्यंकटराव हिरे यांच्याकडे कांही माल आणण्यासाठी तो पाठविला असला, तर त्याचा आयात-परवाना घेतला होता का ? खरेदी-विक्रीचे धंदे उपमंत्री करतात की काय ?

हा साराच व्यवहार चमत्कारिक वाटतो व तो मंत्रिपदावर असलेल्या लोकप्रतिनिधीने करावा हें खासच दूषणीय होय. सोन्याच्या चोरट्या व्यापारांत व परकीय चलनाच्या काळ्या बाजारांत मोठमोठ्यांचे हात गुंतले असल्याचें जें प्रकाशवीर शास्त्री व ज्योतिर्मयी बसू म्हणाले त्यांत खूपच तथ्य आहे. महाराष्ट्राचे मुख्य मंत्री याबाबत अजून गप्प कां आहेत ? व्यंकटराव हिरे यांच्या व्यवहाराबाबत व वागणुकीबाबत यापूर्वीहि बऱ्याच तक्रारी मुख्य मंत्र्यांपर्यंत पोचल्या असल्याचें ऐकतों. दिल्लींत असें ऐकलें की, श्री. हिरे हे मंत्रिपदाचा राजीनामा देत आहेत. तसें त्यांनी केलें व आपल्या वागणुकीची सच्चाई जनतेकडून तपासून घेतली, तर तें उत्तमच होय. पण तसें न घडलें, तर मुख्य मंत्र्यांनी तरी महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या प्रतिष्ठेसाठी – ती शिल्लक असल्यास – हिरे यांना शहाणपणाच्या चार गोष्टी सांगाव्यात असें येथे बोललें जात आहे.

हिवाळी अधिवेशन संपण्याचा काळ जवळ येत चालला आहे तसा सुरुवातीला बुडविला गेलेला सीमा-प्रश्नाचा ढोल पुन्हा वाजूं लागला आहे. सीमा-प्रश्नावर संसदीय समिति नेमण्याचा विचार इंदिराजींनी बोलून दाखविल्याने महाराष्ट्राचे काँग्रेसी पुढारी तेवढ्यावरच समाधान मानून स्वस्थ बसले आहेत. त्यांपैकी कोणालाच असा प्रश्न सुचत नाही की, संसदीय समिति नेमून साधणार तरी काय आहे ? ही संसदीय समिति सभापतींची असणार, की ठराव करून संसदेच्या दोन्ही गृहांची जोड-समिति नेमली जाणार ? सभापतीची समिति नेमण्यास धिलों आणि पाठक या दोघांनीहि नकारच दिला आहे. तेव्हा ठराव मांडून दोन्ही गृहांतील निवडक खासदारांची जोड-समिति नेमणें हाच पर्याय शिल्लक राहतो.

यावर पुढील शंका कोणाच्याहि मनांत उभ्या राहवयास हव्यात : या ठरावाचा मसुदा काय ? फक्त महाजन-अहवाल विचारासाठी ठरावरूपाने समितीपुढे

जाणार, का सारा सीमा-प्रश्न ? समितीची रचना आणि तिची कार्यव्याप्ति किती ? ती आपला अहवाल सादर केव्हा करणार ? तो सादर केल्यावर केंद्र-सरकार तो मानून त्याप्रमाणे अंमलबजावणी करणार काय ? बरें, आज सत्ताधारी इंडिकेटच्या नेत्या इंदिराजी आपल्या सरकारमार्फत हा ठराव संसदेंत आणणार तेव्हा निदान त्यांनी आपल्या पक्षाची तरी संमति घेतली आहे काय ? म्हैसूरचे मुख्य मंत्री वीरेंद्र पाटील यांनी महाजन-अहवालापलीकडे जाण्यास आपल्या ताज्या दिल्लीच्या भेटींत नकारच दिला आहे व वर इंडिकेटचें केंद्र-सरकार सिंडिकेटच्या राज्य-सरकारांना सापत्न भावाने वागवत असल्याचें सांगून बुद्धिभेदाचाहि प्रयत्न केला आहे.

संसदीय समितीचा हा विचार केरळचे मुख्य मंत्री अच्युत मेनन यांच्या संमती-मुळे म्हैसूरच्या मुख्य मंत्र्यांना डावलूनहि कदाचित् अमलांत आणतां येईल. पण तो निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच हाताळला जाईल. त्यामुळे आज कोणताच भारतीय पक्ष म्हैसूरला वा महाराष्ट्राला दुखविण्यास राजी होणार नाही. सत्ताधारी इंडिकेटने संसदीय समिति नेमण्याचा ठराव आणला म्हणून ही केवळ त्याला सिंडिकेट, जनसंघ व स्वतंत्र यांची युति विरोध करील व उत्तर प्रदेशच्या राजकारणामुळे भा. क्रांति-दलहि विरोधी जाईल. सर्वसाधारणपणें केरळ सोडून इतर दाक्षिणात्य राज्यें या प्रश्नावर महाराष्ट्राच्या विरोधांतच आहेत. त्यांत इंडिकेटमधील म्हैसुरी खासदारांनी सुचविल्याप्रमाणें सत्ताधारी पक्षाला मतदानाबाबत स्वातंत्र्य दिलें गेलें, तर तो लोक सभेंत काय किंवा राज्यसभेंत काय, संमत होणें खूपच कठीण आहे. तो एकदा फेटाळला गेला की, महाराष्ट्र गडगडत महाजन-मंडळाच्या शिफारशीच्या पकडींत पुन्हा येऊन पडणार आहे व संमत झाला तरी महाजन अहवालावर ठराव आधारला असल्यास महाजनांचे परस्परविरोधी निर्णयच फार तर तपासले जाणार ! महा-राष्ट्राच्या नेतृत्वाने या परिस्थितीचा बारकाईने विचार केला आहे का ? कारवार आदि मराठी भागाची अवस्था काय ? का अनेक पर्याय पुढे करत त्या धुक्यामागे मूळ प्रश्न दडविला जात आहे.

महाजन-मंडळाच्या नियुक्तीच्या वेळीं इंदिराजींच्या सहानुभूतीवर विसंबून असावध राहिलेल्या महाराष्ट्रीय नेतृत्वाला एकदा थप्पड मिळाल्यानंतर आता तरी कांही शहाणपणा यावा, पण तो आला आहे असें दिसत नाही. बॅ. नाथ पै, एस्. एम्. जोशी, जयंतराव टिळक, उद्धवराव पाटील आदि पुढाऱ्यांनी वारंवार सांगूनहि कांही उपयोग झालेला नाही. कसेंहि करून सीमा-प्रश्नाच्या कोंडींतून सुटण्याची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला घाई झाली आहे. पण ही अगतिकता तिची या कोंडींतून सुटका तर करणार नाहीच, उलट ती अधिकच बिकट सापळ्यांत अडकेल.

महाराष्ट्र काँग्रेसची 'सांगीवांगीं'तील ' गाठ पडली ठकाठका ' या गोष्टीसारखी स्थिति झाली आहे. वसंतरावदादांनी लक्ष्मीधराचा ( नवा सहकारी अवतार )

आव आणून म्यानांतील लाकडी तवलार खडखडवली व केंद्रावर दबाव आणण्याचें नाटक केलें. त्यांना इंदिराजी महाठक भेटल्या. त्यांनी सीमा-प्रश्नाचें गाडगें शेणाने भरून, तोंडावर 'संसदीय समिती'चें लोणी ठेवून लाकडी तलवारीच्या बदल्यांत हें लोण्याचें गाडगें पुढे केलें. वसंतरावदादा व त्यांची प्रभावळ मोठचा फुशारकीने आपण कसा फायद्याचा सौदा केला म्हणून लाकडी तलवारीच्या बदल्यांत लोण्याचें हें गाडगें घरीं आणणार आणि ते शेणाचें असल्यामुळे त्याचा शेणखळा तोंडावर बसणार! वसंतरावदादांनी पोलादाचा रंग दिलेली तलवार खडखडवतांच ती लाकडाची आहे हें इंदिराजींनी ओळखलें होतें. धूर्त इंदिराजींनी सहानुभूतीचें भरपूर नाटक करून शेवटीं महाराष्ट्राच्या नेतृत्वासच खोडयांत टाकलें. "महाराष्ट्राच्या आग्रहाखातर संसदीय समिति मी नेमते, पण ती संमत व्हावयास हवी असेल, तर महाराष्ट्राने सर्व पक्षांचीं मनें वळवावींत," असें सांगून पुन्हा इंदिराजी हात झाडून मोकळ्या होणार आहेत.

यांतून साधणार तरी काय? महाजन-अहवालावर आधारून येणारा संसदीय समितीचा ठराव मुळांत संमत होईल काय? आणि झाला तर महाराष्ट्राला न्याय मिळेल काय? एकसदस्य मंडळ काय, निवाडा-मंडळ काय किंवा संसदीय समितीची नियुक्ति काय. तात्त्विकदृष्टया त्यांत लोकशाहींतील आवाहनाचा हेतु पूर्ण होतच नाही. त्यापेक्षा महाराष्ट्राचे मुख्य मंत्री सीमाप्रश्न हा मानवी प्रश्न जर मानीत आहेत, तर ज्या वादग्रस्त विभागाचा तो प्रश्न आहे तेथील लोकांचें सार्वमत घेऊन त्यांच्या इच्छेनुसार बहुमत अजमावूनच तो सोडविणें इष्ट. लोकशाहींत लोक हे शेवटीं सार्वभौम होत. परंतु ससदीय समितीच्या जाळयांत फसलेल्या महाराष्ट्राच्या अगतिक काँग्रेसी नेतृत्वाला हा शहाणपणा सुचणार नाही व शेवटीं त्यात बेळगाव-कारवार आदि सीमा-भागांतील मराठी जनतेचा बळी जाणार आहे अशीं चिन्हें दिसत आहेत.

— केसरी, दि. ६ डिसेंबर १९७०

# मध्यावधि निवडणुकीची टांगती तलवार

- ४० -

जसजसा २१ डिसेंबरचा दिवस जवळ येत आहे तसतशी रात्र मोठी व दिवस लहान होत चालला आहे. हिवाळ्यांतील या लांबलेल्या रात्रीमुळे गोंधळून गेलेला मी, सकाळचे सहाच वाजले असल्याची खात्री करून घेण्यासाठी ऊबदार दुलईच्या बाहेर हात काढून दूरध्वनीचा १७४ क्रमांक फिरवितो. पलीकडून रात्रीच्या जागरणाने घोगऱ्या आवाजांत उत्तर येतें, 'छे बजकर चार मिनिट !' तरीहि माझी खात्री पटत नाही. मी काचेच्या तावदानांतून बाहेर डोकावतों. दिशा अंधारलेल्या असतात. धुक्याचें पांघरूण पांघरलेली सारी सृष्टि अजून गाढ साखरझोपेंतच असते. सकाळीं सहा वाजतां समोरच्या दूध-केंद्रावर नेहमी कोण गडबड असते. पण तेंहि अगदी शांत होतें. मुळांत मोगलाई दिल्लींत हालचाल सुरू होते दहाच्या सुमारास. त्यांतून थंडीचे दिवस आले की पहावयासच नको. सारी राजधानी चांगलीं उन्हें तापूं लागेपर्यंत ऊबदार रजयांत लपेटून चिडीचिप्प पडलेली असते.

माझ्यासारखा एखादा सहा वाजल्याने सकाळ झाली असें मानून, शाल लपेटून बाहेर पडेल, तर दवांत नहालेल्या रंगीबेरंगी झिपऱ्या शेवंतीने व क्रिसनथिममने त्याच्या डोळ्यांचें पारणें फिटल्याशिवाय राहणार नाही. दिल्लींतील गुलाब अजून फुललेले नाहीत, पण क्रिसनथिममला बहर आहे. एकेका झाडावर दोन हातांच्या ओंजळीमध्ये मावणार नाही एवढें आंत पाकळ्या वळलेलें एकेक गेंदेदार फूल झाडावर जेव्हा पंधरा-पंधरा दिवस फुलत राहतें तेव्हा त्याची शोभा अवर्णनीय असते. कुंडींतील तीन-चार झाडांवर अशीं हीं तीन-चार फुलेंच असतात. पण त्या कुंडीचें जणू पुष्पपात्रच बनतें. झाडांवर अधिक फुलें घेतलीं की, तीं फांद्या वळवून अशी रचलीं

जातात की तो एक पुष्पस्तबकच वाटावा. वाय्. डब्ल्यू. सी. ए. ने प्रतिवर्षाप्रमाणे क्रिसनथिममचें प्रदर्शन यंदाहि भरविलें होतें व त्यांत 'पुष्पराणी'चा मान अमेरिकेचे भारतांतील वकील श्री. केनेथ कीटिंग यांच्या फुलांनी पटकावला.

गुलाबांचें प्रदर्शनहि भारतीय गुलाब संघाने सफदरगंज रोडवरील त्यांच्या बागेंत भरविलें होतें. पण त्या प्रदर्शनाने माझी निराशा केली. तेथे ना नव्या जाति पाहवयास मिळाल्या ना उत्कृष्ट फुलें पाहवयास मिळालीं. चौहान यांच्या 'आयफेल टॉवर'ने पुष्पराणीचा किताब पटकावला होता, तर ओ. पी. बन्साल यांच्या 'फर्स्ट प्राईझ'ने 'पुष्पराजा'चा मान मिळवला. या वर्षीचें विशेषच सांगावयाचें, तर स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने गुलाबपुष्पें निर्यात करण्याच्या दृष्टीने आवश्यक माहिती देण्यासाठी प्रदर्शनांत उघडलेला स्टॉल. निर्यात करावयाच्या फुलांत सुपरस्टार, हॅपिनेस, क्वीन एलिझाबेथ व मॉंटेझुमा यांना अधिक मागणी असते. फुलाचा देठ ६० सें. मी. ते ९० सें. मी. असला पाहिजे. कळीची पहिली पाकळी उमलतांच फूल कापावें. अशीं पुष्पें स्टेट ट्रेडिंगची जनपथावरील कचेरी ९ रुपयांस डझन याप्रमाणे विकत घेईल व परदेशीं पाठवील इत्यादि माहितीबरोबर हीं गुलाबपुष्पें निर्यात करण्यासाठी तयार केलेल्या कागदी पेट्याहि पाहण्यासाठी प्रदर्शनांत ठेवल्या होत्या. बाकी गुलाब-प्रदर्शनांत पाहण्याजोगें कांहीहि नव्हतें. तरीहि स्वतःचें प्रदर्शन करणाऱ्यांची 'फॅशन परेड' जमली होतीच ! दर्शनेच्छूंच्या डोळ्यांचें कसें ना कसें पारणें फिटत होतें. पण नेत्रांचें सुख काळ्या चष्म्याच्या आडून, हें मादक सौंदर्य टिपण्यांत मानावें का ?

हस्तस्य भूषणं दानं, सत्यं कण्ठस्य भूषणम् ।
श्रोत्रस्य भूषणं शास्त्रं, भूषणैः किं प्रयोजनम् ।।

तसें नेत्रांचे खरें सुख सौंदर्यात शुचिता पाहण्याचें. पण हें कोणी कोणास सांगावें आणि तेंहि आजच्या चार्वाक युगांत !

असो. दिल्लींतील ही उत्साहदायक थंडी फल-पुष्पांचेंच आगमन राजधानींस घडवतें असें नाही, तर हिमालयाच्या पलीकडून अगदी थेट सैबेरियांतून असंख्य पक्षीगणहि दिल्लीच्या आसपासच्या तळ्यांतून कांही काळाच्या वास्तव्यासाठी येतात. यमुनेच्या प्रवाहास मार्गदर्शक करून ते दिल्ली जवळ करतात. दिल्लीच्या बागांतून छोटे, पांढरे व पिवळे वॅगटेल व मिनिवेट ऑक्टोबरमध्ये आपल्या शेपट्या हलवीत हिरवळीवर नाचतांना दिसू लागतात. यमुनेच्या पाण्यावर ब्राह्मनी बदके, राजहंस, टील्स, पोचार्ड, करकोचे येऊन उतरतात. शिकाऱ्याच्या दृष्टीने 'पिनटेल' हे खाण्यास जसे रुचकर तसेंच दिसण्यांतहि ! त्या बदकांचे चॉकलेटी डोकें पांढऱ्या खबरी अंगाशीं एकरूप झाल्याने मोठें रुबाबदार दिसतें. असे हे असंख्य सुंदर पाणपक्षी आता दिल्लीच्या आसपास दूरवरचा प्रवास संपवून उतरले आहेत.

असाच दूरवरचा प्रवास करून भारतांत दाखल झालेले गोरे, पिवळे प्रवाशीहि हिवाळ्यांत कॅनॉट सर्कलमधील व जनपथावरील हॅंडीक्राफटच्या दुकानांत गर्दी

करतात. पाश्चात्त्य देशांतील प्रवाश्यांना थंडीचे महिने भारतांतील प्रवासासाठी सुखकर वाटतात. अशोक, ओबेराय हीं 'फाइव्ह स्टार' हॉटेलें भरून जातात. टॅक्सी-वाल्यांचा धंदा जोरांत होतो. दिल्लीच्या टॅक्सीज बहुतांशीं चालवतात सरदारजी.

माझे एक अमेरिकन मित्र मला डोळे मिचकावीत म्हणाले की, मी इस्रायलमध्ये गेलों, तेथे टॅक्सी थांबतांच, ड्रायव्हर पुस्तक किंवा वर्तमानपत्र घेऊन वाचूं लागतो.

जपानमधील ड्रायव्हर कागद काढून चित्रलिपींत लिहूं लागतो व चाकावर बसला की जणू जुन्या सुईसाईड टॉर्पेडो स्क्वॉडमधील तो सामुराईच भासतो.

परंतु तुमचा सरदारजी गाडी थांबतांच लगेच डोळे मिटतो. मात्र एकाने सुचविल्याप्रमाणे 'बारा बजे'ची आरोळी त्याच्या कानीं ठोकली की, मोंगलांवर तुटून पडणाऱ्या वीराचा त्याच्या अंगी संचार होऊन, टॅक्सीचें विमान बनतें नि सारे वहातुकीचे नियम बाद ठरतात. ही 'बारा बजे'ची किमया तरी काय आहे? आता सरदारजींच्या कशाकशाचे बारा वाजले आहेत म्हणून मी तरी माझ्या अमेरिकन मित्राला सांगूं!

बाहेरून भारतांतील शिल्प, निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी आलेले हे प्रवाशी वेगळे व भारतांतील दुसरेच कांही टिपून आपल्या देशाला गुप्तपणें पाठविणारे प्रवाशी वेगळ. त्यांचीहि संख्या कांही थोडी नाही व भारताच्या सुरक्षिततेला ती मोठीच धोका उत्पन्न करणारी बाब आहे. पाकिस्तानांतून भारतांत नोव्हेंबर १९६३ ते ऑक्टोबर १९७० पर्यंत ११७१९ लोक विनापरवाना आले. त्यांतील ८७२० परत पाठविले व बाकीच्यांचा अजून पत्ता लागलेला नाही. याशिवाय राजस्थान, उत्तर प्रदेश, म यप्रदेश, जम्म् आणि काश्मीर येथे घुसलेल्या पाकिस्तान्यांचा आकडा वरील आकडयांत नाही. राजस्थानच्या मुख्य मंत्र्यांनी सरहद्दीवरील आपल्या ढिलाईबाबत आजवर अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत.

आसामच्या विधानसभेत विरोधी पक्षाच्या नेत्यांनी हेरगिरीचे असेंच एक प्रकरण नुकतेंच पुढे मांडलें. महत्त्वाचीं गुप्त कागदपत्रें व नकाशे घेऊन दोन महिला कॅप्टन कोहिली या अधिकाऱ्याच्या मदतीने सरहद्द ओलांडून पाकिस्तानांत गेल्याची ही वार्ता होती. मदनमंजिऱ्यांनी मदिरेसमवेत सैनिकी अधिकाऱ्यांना गुंगविल्याचीं उदाहरणें यापूर्वीहि घडलेलीं आहेतच. राज्यसभेंत राज्यमंत्री श्री. मिर्झा यांनी असे कोणतेच महत्त्वाचे कागदपत्र गहाळ झालेले नाहीत, पण कोहिली यांना मात्र तात्पुरतें वडतर्फ करून, चौकशी चालू असल्याचें सांगितलें. देशांतील कायदा व संरक्षण आज सर्वच बाबतींत ढिलें झाल्याने नेफा, आसाम, बंगाल आदि पूर्व भागांत चिनी व पाकिस्तानी गुप्तहेरांचें जाळें विणलें जाण्यास अनुकूलताच आहे. शिलाँगचें प्रकरण एकवेळ खोटेंहि ठरेल. पण आसाममध्ये असे अनेक संशयास्पद प्रकार जनतेस काळजी निर्माण करण्यास कारणीभूत होत आहेत. केंद्रांतील अल्पसंख्य सरकारास पश्चिम

बंगालमधील नक्षलवाद्यांना तोंड देऊन कायदा व सुव्यवस्था ठेवणें जसें अवघड झालें आहे, तसाच सुरक्षिततेंतहि ढिलेपणा येत आहे.

*

भारतांतील या अस्वस्थतेंत व असुरक्षितेंत वाढत्या भाववाढीच्या व बेकारीच्या चिंतेने आणखीच भर घातली आहे.

अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी जरी कांही वस्तूचे भाव कांही प्रमाणांत उतरत असल्याचा दिलासा देण्याचा प्रयत्न केला असला, तरी भाववाढीची चिंता नाहीशी करण्यास तो पुरेसा नाही. वस्तूंच्या घाऊक भावांत गेल्या वर्षांत ६ ते ८ टक्क्यांनी वाढ झाली आहे, तर उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालांत ११८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. सामान्य माणसाच्या गरजेच्या वस्तु, तसेंच उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल या भाववाढीच्या चक्रांत सापडला असल्याने देशांतील आर्थिक स्थिति डळमळीत होऊं पाहत आहे. यंदा खरोखरी धान्यस्थिति उत्तम आहे, तरीहि हे भाव वाढत आहेत. डाळीचे भाव १५ टक्क्यांनी, बटाट्याचे ६४ टक्क्यांनी, कांद्याचे १५ टक्क्यांनी, केळीं १६ टक्के, लोणी १९ टक्के, खोबरेल ४३ टक्के, मोहरीचें तेल १९ टक्के, तर सुती कपड्यांत २० ते ३५ टक्के वाढ झाली आहे. अनेक यंत्रोद्योगांचा कच्चा माल, जें पोलाद त्याचें उत्पादन घटलेंच आहे. जेथे जपानने आपल्या पोलादाच्या उत्पादनांत भारतांतील कच्चा माल घेऊन ९० लक्ष टनांनी वाढ केली तेथे ६० लक्ष टनांचें एकूण लक्ष्यहि आपणांस गाठतां आलें नाही. कारण कामगारांचे संप, वाढलेल्या भावामुळे उत्पादनाच्या खर्चात झालेली वाढ व उत्पादनक्षमतेचा अपुरा वापर ! सरकारी क्षेत्रांतील २६ मोठ्या उद्योगधंद्यांची – ज्यांत ८० टक्के सरकारी भांडवल गतलें आहे त्यांतील बहुतेकांची – अवस्था हीच आहे. हिंदुस्थान स्टील कंपनीला ३० सप्टेंबर १९७० अखेर पुऱ्या होणाऱ्या ६ महिन्यांत ८ कोटि ७६ लक्ष तोटा झाला. हेवी इंजिनियरिंग कॉर्पोरेशनला ९ कोटि ३५ लक्ष तोटा झाला. माइनिंग ॲण्ड अलाईड मशिनरी कॉर्पोरेशनला ३ कोटि १० लक्ष तोटा झाला. हेव्ही इलेक्ट्रिकल्स कंपनीला ३ कोटि ५४ लक्ष तोटा, इंडियन ड्रग ॲण्ड फार्मास्युटिकल्स ४ कोटि ७६ लक्ष तोटा, निवेली लिग्नाईट कार्पोरेशनला ५ कोटि १४ लक्ष तोटा, मद्रास रिफा नरीला ३ कोटि ६७ लक्ष रुपये तोटा, अशी ही आकडेवारी आहे. देशांतील पोलाद कारखान्यांना तर राजकारणाचें व कामगार-संपांचें जणू ग्रहणच लागलें आहे.

त्याबाबत स्वतंत्र पक्षाचे श्री. मोहता यांनी एक मोठा गमतीदार किस्सा ऐकवला. साम्यवादी सरकारांतील मंत्र्यांनी पोलाद-कारखान्यांच्या अधिकाऱ्यांकडे उत्पादनाची चौकशी केली. त्यांनी विचारलें –

" कॉम्रेड डिरेक्टर, पोलादाचें उत्पादन किती झालें ? "

मॅनेजिंग डिरेक्टरने उत्तर दिलें, " कॉम्रेड मिनिस्टर, जर पोलादाच्या शिगा एकावर एक रचल्या तर, स्वर्गातील देवांच्या चरणांना त्या टेकतील. "

मंत्रीमहाशय खूष होऊन म्हणाले, "पण कॉम्रेड डिरेक्टर, स्वर्गात देव नाही."

त्यावर डिरेक्टर उत्तरले, "तेंहि खरेंच ! स्वर्गांत जसा देव नाही तसें आपलें पोलादाचें उत्पादनहि नाही."

प्रश्न असा आहे, औद्योगिक कच्च्या मालाच्या भाववाढीमुळे उत्पादनाचाच खर्च वाढणार असेल, गरजेच्या वस्तूंच्या भाववाढीमुळे कामगारांचे संप होणार असतील व त्यामुळेहि उत्पादनावर परिणाम होणार असेल, तर या चक्री आपत्तींतून शेवटीं सुटका होणार तरी कशी ? खासदार नानासाहेब गोरे यांनी व इतर अनेकांनी सुचविलेल्या उपायांचा सरकारला गंभीरपणें विचार करणें शेवटीं प्राप्त आहे. कामगारांच्या पगाराचें नातें शेवटीं कोठे तरी उत्पादनाशीं जोडलें पाहिजे व साऱ्या देशांत एकच धोरण पगाराबाबत अमलांत आणलें पाहिजे. श्री. कृष्णकांत यांनी याबाबत स्वतंत्र पक्षाचे श्री. मोहता यांचा प्रतिवाद करण्यासाठी तरुण तुर्कांच्या नव्या मासिकांतील 'यंग इंडियन' मधील एका उताऱ्याचा आधार घेतला व ठरीव पद्धतीने ते मक्तेदारीवर व पैशाच्या केंद्रीकरणावरच घसरले. 'मिक्स्ड् इकॉनॉमी आणि सोशॉलिस्ट सोसायटी' या श्री. एच्. के. परांजपे यांनी लिहिलेल्या लेखांतील पुढील उतारा त्यांनी आपल्या पुष्टचर्थ वाचून दाखविला.

All these experiences clearly indicate that if economic growth is to be achieved, a phase of primitive capital accumulation is inescapable. Foreign aid might reduce the severity of the sufferings to some extent but the bulk of the accumulation has to be from the country's own income. The saving might either be done through maintaining large income inequalities and the top few saving substantial amounts or by a system of less unequal incomes, but accumulation mainly taking place through the public exchequer. It is my submission that the former method is impossible in India unless the democratic system breaks down and kind a of dictatorship of the top few is imposed. Large inequalities and a free democratic society cannot go together.

याउलट दक्षिण हिंदुस्थानांतील एम्प्लॉयर्स फेडरेशनच्या पन्नासाव्या वाढदिवशीं बोलतांना नवल टाटा म्हणाले, "The high levels of taxation imposed upon industry, indiscriminate wage increments extended to only a section of the working population, an excessive phobia about concentration of economic power, an irrational fear of 'bigness' in industry, oppo sition to automation & imposition of political solutions upon problems which were wholly economic. I fear that such policies accentuated social disparities, and fostered class hatred bet ween employees & workers and were a travesty of true socialism."

आज चिखलांत रुतलेल्या या औद्योगिक गाड्यामुळे बेकारीचाहि भस्मासूर समोर उभा ठाकला आहे. महाराष्ट्रांतील बेकारांचा हा आकडा ३ लक्ष २२ हजार, तर शेजारच्या मध्यप्रदेशांतील बेकारांचा आकडा २ लक्ष ३५ हजार आहे. नवल टाटांचें म्हणणें असें आहे का, श्रमिकप्रधान उद्योगांची वाढ व कार्यक्षमता नीट वाढवली तरी बेकारीचा प्रश्न सोडविण्यास मदतच होईल. कापडधंदाच घ्या. तेथे आज ९ लाख कामगार गुंतलेले आहेत. जर या गिरण्यांच्या तीन पाळ्या चालविल्या तर २ लक्ष ५० हजार अधिक कामगारांना तेथे नोकऱ्या मिळू शकतील. पण आज कापसाच्या ५० टक्के भाववाढीने टंचाई निर्माण झालेल्या परिस्थितीवर कपाशीच्या शास्त्रीय उत्पादनाने व आवश्यक त्या कपाशीच्या आयातीने मात केली गेली पाहिजे. नवल टाटा म्हणतात, "शेतीच्या क्षेत्रांतहि न पेरली जाणारी पडित जमीन जर लागवडीखाली आणली, तरी पुष्कळ बेकारांची सोय होऊं शकेल. सरकारी क्षेत्रांतीलहि अनेक कारखाने केवळ उत्पादनक्षमतेच्या अपुऱ्या वापराने तोटयांत आहेत. तेथेहि बेकारांची भरती, त्यांची कार्यक्षमता वाढल्यास होऊं शकेल. पण या दृष्टीने देशांतील अर्थ-व्यवस्थेचा नव्याने विचार करून आर्थिक धोरणास घट्ट पायावर नेतृत्व दिलें गेलें पाहिजे.

*

अशा या पार्श्वभूमीवर नव्या वर्षाचें अंदाजपत्रक अर्थमंत्री मांडणार आहेत. अर्थात् मध्यावधि निवडणुका झाल्या नाहीत तर! संस्थानिकांच्या तनख्याबाबतचा निकाल सरकारच्या विरुद्ध गेला असला तरी त्याचें भांडवल करून मध्यावधि निवडणुकीस जाण्याइतका तो जनमानसास आकर्षित करणारा ठरेल असें अनेकांना वाटत नाही. तनख्यांचा हा प्रश्न कसा सोडवावा याची चिंता इंडिकेटला आहे, पण संस्थानिकांतील एका गटालाहि 'फार ताणून तोडण्यांत अर्थ नाही' हें पटू लागलेलें दिसतें. दुतर्फी ही भावना प्रबळ झाली व गुजरात आणि उत्तर प्रदेशांमधील राजकारण इंदिराजींच्या बाजूने फिरलें, तर अजूनहि वाटाघाटींनी व इभ्रतीने हा प्रश्न सुटूं शकेल.

मध्यावधि निवडणुका नेमक्या केव्हा घेण्याचा इंदिराजीचा मानस आहे, याचा जरी अजून थांगपत्ता लागलेला नाही, तरी 'निवडणुका राष्ट्रीय प्रश्नावर लढविल्या जाव्यात असें मला वाटतें' असें त्या एकदा म्हणाल्या. त्या सुताने स्वर्ग गाठण्याचा बरेच प्रयत्न लोकसभेंतील अनेक खासदारांनी चालविला आहे व त्यांत तथ्यहि आहे. मध्यावधि निवडणुका होणार व लौकरच होणार! महाराष्ट्रांतील कांही खासदारांची मध्यावधि निवडणुकांच्या या वार्तेमुळे झालेली केविलवाणी स्थिति पाहून मला संत एकनाथांच्या एका गोष्टीची आठवण झाली.

संत एकनाथांनी एकाला उपदेश केला की, मृत्यूची आठवण असूं द्यावी. झालें! त्या गृहस्थाचें खाणें-पिणें सुटलें, मृत्यूच्या धास्तीने तो खंगला!

त्याची पत्नी एकदम महाराजांकडे आली व विचारूं लागली की, "आपण माझ्या पतीला गुरूपदेश तरी काय केलात ?"

संत एकनाथ म्हणाले, " मी मरणाचें स्मरण असावें " हें सांगितलें खरें, परंतु त्याचबरोबर " हरिभक्तीस सादर व्हावें " असेंहि सांगितलें. पुढलें सांगणें तुझे पतिराज विसरले त्याला काय करावें ? "

खासदारपद हेंच ज्याना शरीराप्रमाणे सर्वस्व वाटतें त्यास मध्यावधीची धास्ती मृत्यूच्या धास्तीसारखीच वाटणार व हरिभजनाप्रमाणे लोकसेवेचाहि विसरच पडणार.

*

सीमाप्रश्नाबाबत आज महाराष्ट्र खरोखरी एकाकी पडला आहे. इंदिराजींना महाजन-अहवालाने सीमेवरील मराठी भागावर कांही अन्याय होत असल्याचें पटलें आहे. इंदिराजींनी त्यांना पटलेला हा अन्याय दुरुस्त करण्यासाठी मार्ग काढण्याचा प्रयत्न गेले कांही दिवस चालविला आहे, परंतु महाराष्ट्राच्या ढिल्या कॉंग्रेसी नेतृत्वाने उतावीळपणें घाईगर्दी उठवून आपली बाजू लंगडी करून घेतली. महाजन-मंडळास मान्यता देऊन स्वत:भोवती पाश आवळून घेतलेलें महाराष्ट्रांतील कॉंग्रेसी नेतृत्व कसेंहि करून त्यांतून मुक्त होण्यासाठी धडपडत आहे. महाराष्ट्राच्या कॉंग्रेसी नेतृत्वाच्या आग्रहासाठी संसदेपुढे महाजन-अहवाल ठेवला आहे, तरी त्याला सतरा फाटे फुटून मूळ हेतु फजित होण्याची आज शक्यता आहे, कारण यापुढे सर्वच प्रश्न निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हाताळले जाईल व निवडणुकीसाठी आघाडी उभे करू पाहणारे पक्ष इंडिकेटवादी सरकारने ठराव आणला म्हणूनच केवळ त्याच्या विरुद्ध उभे ठाकतील !

संसदेमध्ये ठराव येण्याने महाजन-अहवाल म्हणजे काळचा दगडावरील रेषा नाही हें जसे ठरेल तसें धीमेपणाने सर्व अनुकूल पक्षांना एकत्र करून, तो अवश्य त्या उपसूचनांसह मंजूर करून घेतल्यास सीमेवरील मराठी विभागांना कांही न्याय देणें शक्य होईल. पण यासाठी हवा आत्मविश्वास व धीमेपणा ! म्हैसूरचें नेतृत्व सीमा-प्रश्न संसदेपुढे येऊं नये म्हणून सर्व बाजूंनी मोर्चे लावीत होतें. याउलट महाराष्ट्राचें कॉंग्रेसी नेतृत्व विरोधी पक्षांतील महाराष्ट्रीय नेतृत्वासहि आपलेंसें करूं शकलें नाही. वसंतरावदादा व वसंतराव नाईक कॉंग्रेस कार्यकारिणींत तोंड दाबून बसले त्यास म्हणावी मुत्सद्देगिरी, पण बाहेरहि ते त्यांच्याच मुक्या बिचाऱ्या खासदारांत फिरत आहेत. महाराष्ट्रीयेतर खासदारांपर्यंत त्यांचे विचार पोचलेच नाहीत त्यास काय म्हणावें ?

महाराष्ट्रीय कॉंग्रेसी नेतृत्वाची ही अगतिक अवस्था इंदिराजींनी चांगली जोखली असल्याने एका खासदाराने म्हटल्याप्रमाणे 'रामाला चंद्र हवा' या चालीवर चंद्राचें प्रतिबिंब आरशांत दाखवून इंदिराजी महाराष्ट्राची समजूत काढणार आहेत व स्वत: च सापळ्यांत शेपटी अडकवून घेतल्याने आलेला लांडेपणा 'मुत्सद्देगिरी' म्हणून महाराष्ट्रांतील कॉंग्रेसी नेतृत्व मिरवणार आहे. मध्यावधि निवडणुका तर निदान पार पडतील. पुढचें पुढे !

**— केसरी, दि. २० डिसेंबर १९७०**

परिशिष्ट १

# मध्यावधि निवडणुकीसंबंधी आमची सुस्पष्ट भूमिका

" नमस्कार संपादकमहाशय, थोडा मोकळा वेळ असेल तर तुमच्याशीं कांही चर्चा करावी असं म्हणतोंय् ! " साठ वर्षे वयाचे एक गृहस्थ माझ्या खोलींत शिरत हसत हसत म्हणाले.

" वा ! बसा की. वेळ काय, काढला की असतो. आपण मोकळेपणीं आपल्या मनांत जें असेल तें सांगा, " मी म्हणालों.

" हें पहा ! मी 'केसरी'चा एक जुना वाचक आहे. हल्ली कांही मंडळी बोलतात तें मला ऐकवत नाही. आमची लोकमान्यांवर भक्ति व 'केसरी' आमचे श्रद्धास्थान; तेव्हा म्हटलं. . . "

" . . . समक्षच जाऊन शहानिशा करावी असंच ना ! हें फार चांगलें केलेंत. माझें म्हणणें मी आपल्याला मोकळेपणीं सांगतों ! आपल्याला पटतें का पहा ! "

मी त्यांना सांगूं लागलों, " वर्तमानपत्र हें लोकशिक्षणाचें साधन आहे. लोकशिक्षणाचें हें कार्य त्यांनी निष्पक्षपातीपणें व निर्भीडपणें केलें पाहिजे. 'केसरी'ने तर आपल्या पहिल्याच अग्रलेखांत म्हटले आहे की, "आमचा उपयोग, रस्तोरस्तीं रात्रीं दिवे लागलेले असल्याने व पोलिसांची गस्त सारखी फिरत असल्याने, जो होत असतो तो होय. आम्ही रयतेचे कोतवाल व वकील आहोंत व त्यासाठी 'केसरी'ची गर्जना होत राहील. आपलें कर्तव्य करण्यांत बिलकूल कसूर होणार नाही. "

" तें मला माहीत आहे हो ! गेलीं चाळीस वर्षें तरी मी 'केसरी' घेतों आहें. त्यांतील स्थित्यंतरें पाहतों आहें, बदलती परिस्थिति, राजकारण अनुभवतों आहें. पण 'केसरी' लोकमान्यांच्या धोरणापासून दुरावला असें हल्ली कांही जण म्हणत आहेत म्हणून आपणाकडे आलों. " ते गृहस्थ कांहीसें उतावीळपणें म्हणाले.

त्यावर मी हसून म्हणालों, " अहो, एवढ्यावरच त्यांतील कांही जण थांबलेले नाहीत, तर त्यापुढे जाऊन 'केसरी' लाल झाला, साम्यवादी झाला असाहि त्यांचा प्रचार सुरू असतो. आता तर काय निवडणुका जवळ आल्याने कांहींना हा काळ राजकीय फाल्गुन मास वाटला तर आश्चर्य नाही.

"आता आपण सांगा, 'केसरी' लाल झाला असतां किंवा त्याचें धोरण साम्यवादाला अनुकूल असतें, तर 'केसरीं'त उपनिषदें, गीता किंवा ज्ञानेश्वरीवरील अध्यात्मवादी लिखाण आलें असतें का ? कम्युनिझमचा पुरस्कार करणारा 'केसरी'चा एक तरी अग्रलेख टीकाकारांनी काढून दाखवावा. हिंदु-मुस्लिम प्रश्नाबाबत तसेंच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरील बंदीच्या मागणीसंबंधी 'केसरी'ने

घेतलेली भूमिका व विरोधी मतें आणि पक्ष दडपून टाकण्याच्या मोरारजी-खाक्यावर 'केसरी'ने वेळोवेळीं केलेली टीका निर्भेळ राष्ट्रवादी आणि लोकशाहीवादी धोरण स्पष्ट करीत नाही काय ?

"मात्र कम्युनिझमचा असो अगर इतर कोणत्याहि राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास असो, आम्ही तो कधीच त्याज्य मानीत नाही. समाजकारणाप्रमाणे ज्ञान-प्राप्तींतहि अस्पृश्यता आम्ही मानीत नाही. जर मानली, तर लोकशिक्षणाचें कार्य आम्हाला कधींच करतां येणार नाही."

त्यावर जरा सावरून बसत ते गृहस्थ म्हणाले, "मग 'केसरी'चें धोरण आहे तरी काय तें थोडक्यांत सांगाल काय ?"

"आपला हा प्रश्न योग्य आहे. 'केसरी'चे धोरण मुख्यतः चार स्तंभां-वर आधारलेलें आहे. राष्ट्रवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्ष शासन व नियोजित अर्थव्यवस्था. यांतील नियंत्रित अर्थव्यवस्थेच्या आमच्या पुरस्कारामुळेच अनेकांना आम्ही डाव्या विचारसरणीचे वाटूं लागलों आहोंत.

"'केसरी'चें हें धोरण 'केसरी'चे संपादक प्रत्यक्ष अमलांत आणीत असले, तरी तें ठरवितात विश्वस्त. विश्वस्तांपैकी डां. धनंजयराव गाडगीळ हे भारताच्या नियोजन-मंडळाचे उपाध्यक्ष आहेत व मी राज्यसभेचा सभासद आहे. तेव्हा 'केसरी'ने देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत व राजकारणाबाबत पत्करलेले धोरण हें विचारपूर्वक व जाणतेपणीं स्वीकारलें आहे, एवढें तरी मान्य व्हावयास हवें. मग तें कोणाला पटो वा न पटो !"

"आपणास देशांतील आर्थिक व्यवस्था कशी असावी असें वाटतें ? आजच्या आर्थिक दुरवस्थेला काँग्रेसचें सरकारच जबाबदार नाही का ? पण आपण तर त्याला सध्या पाठिंबा देण्यास निघाला आहांत." त्या गृहस्थांनी विस्मयाने विचारलें.

"असें रागावूं नका. आर्थिक प्रश्न नेहमीच शांपतणें समजावून घेतले पाहिजेत," मी म्हणालों, "हें पहा, थोडक्यांत सांगावयाचें, तर देशांतील आजच्या अर्थव्यवस्थेपुढे तीन समस्या प्रामुख्याने उभ्या आहेत. आर्थिक मागासलेपण, आर्थिक विषमता व आर्थिक सत्तेचें केंद्रीकरण. आर्थिक सत्तेचें केंद्रीकरण हें आर्थिक अस्थिर-तेच्या व विषमतेच्या मुळाशीं बऱ्याच प्रमाणांत असल्याने त्याबाबत 'केसरी'चें धोरण केंद्रीकरणाच्या किंवा मक्तेदारीच्या विरुद्ध आहे. या मक्तेदारींतून आर्थिक व सामा-जिक विषमता निर्माण होत असल्याने व त्यांतहि आपला देश अविकसित असल्या-मुळे त्याचे खूपच घातक परिणाम होणार आहेत. अविकसित राष्ट्रांतील आर्थिक प्रगति नियोजनाद्वारेच साधली पाहिजे व त्या नियोजनांत देशांतील उत्पादन-क्षमतेचा, भांडवल-गुंतवणुकीचा व रोजगाराचा विचार करतांना मक्तेदारांवर नियंत्रण ठेवणें हेंहि अपरिहार्य असतें, पण प्रत्यक्ष घडलें मात्र याच्या उलट; आणि तिन्ही योजनांच्या काळांत आर्थिक केंद्रीकरणाला प्रत्यक्षाप्रत्यक्ष उत्तेजनच मिळालें.

तें लक्षांत आलें नव्हतें असें नाही. १९४८ व १९५६ सालच्या औद्योगिक धोरणांत आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचें उद्दिष्ट त्यासाठी मान्य केलें गेलें, पण तरी त्या वेळच्या काँग्रेसी सत्ताधाऱ्यांच्या स्वार्थी कारभारामुळे केंद्रीकरण वाढतच राहिलें.

"भारत सरकारने १९६४ साली नेमलेल्या मक्तेदारी चौकशी-मंडळाने यावर चांगला प्रकाश पाडला आहे," आलेले गृहस्थ जाणतेपणी म्हणाले.

"हो तर," मी म्हणालों, "सामान्य ग्राहकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या वस्तूंपैकी अन्न व वस्त्र सोडल्यास केरोसीन, विजेचे दिवे, काड्यांच्या पेट्या, साबण, पादत्राणे, टूथपेस्ट, सिगारेट, बरींच औषधें, सायकलीचे सुटे भाग व गॅल्व्हनाईज्ड पत्रे इत्यादींच्या उत्पादनांत आत्यंतिक केंद्रीकरण झालेलें या मंडळाला आढळलें. औद्योगिक क्षेत्रांतील ही मक्तेदारी इतकी शक्तिशाली ठरली आहे की, नवीन उत्पादकाला त्या उद्योगांत शिरणेंहि अशक्य केले जातें. 'अमूल उत्पादनें' निर्माण करणाऱ्या खेडा जिल्हा सहकारी संस्थेने लहान मुलांचें खाद्य तयार करण्याचा इरादा व्यक्त करतांच ग्लॅक्सोचा त्याला विरोध झाला, तर टी. व्ही. एस्. कंपनीला शिवण-यंत्राचे भाग बनविण्यासाठी दिला जावयाचा परवाना उषा शिवण-यंत्राचे उत्पादक, जय इंजिनियरिंग कंपनीच्या दडपणाने रद्द झाला.

"१९६३ सालीं एकट्या टाटा समूहाची मालमत्ता देशांतील एकूण औद्योगिक मालमत्तेच्या दहाव्या हिश्श्याइतकी म्हणजे ४१७ कोटींची भरली. बिर्ला समूहाची २९२ कोटींची होती. १९६०–६१ साली ६३१ कंपन्यांची १६८७ संचालकपदें फक्त ३२५ व्यक्तीमध्ये वांटलीं गेलीं होतीं. त्यांतील बिर्ला घराण्याकडे ४०, बांगूर कुटुंबाकडे ६३, जनसंघातर्फे मध्यप्रदेशांत उभ्या राहिलेल्या गोएंकांच्या कुटुंबाकडे ७४, तर कस्तुरभाई घराण्याकडे ३२ संचालकपदें होती.

"बँका व विमा-कंपन्यांवरहि त्यांपैकी मोठमोठ्या उद्योग-समूहांची मोठी सत्ता चाले. अशा या आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणामुळे फार मोठ्या भांडवल-गुंतवणुकीच्या निर्णयाबाबतचे हक्क थोड्या व मोजक्या लोकांच्या हातांत गेले. त्यामुळे किमती भरमसाट वाढल्या व माल निकृष्ट निघूं लागला. त्यांचा 'मोठेपणा' लहान उद्योधंद्यांना मारक ठरूं लागला.

"संपत्तीच्या बळावर हे मक्तेदार सरकारला शह देऊं लागले व आपल्याला धार्जिण्या असलेल्या पक्षांना आर्थिक मदत करून, ते त्यांना मिंधेपणाने सरकारच्या मक्तेदारीविरोधी धोरणावर तोंडसुख घेऊं लागले. ज्या काँग्रेसने हा मिंधेपणा पत्करला, त्या मूळ काँग्रेसला आम्हीं विरोधच केला. त्या काँग्रेसचीं आज दोन छकलें पडलीं आहेत व सध्याच्या इंदिराजीच्या सरकारने हें अर्थसत्तेचें केंद्रीकरण मोडण्याचा प्रयत्न योजलेला आहे म्हणून त्यांना त्या बाबतीत आमचा पाठिंबा आहे.

"हें केंद्रीकरण मोडतांना जिथे घिसाडघाई झाली व कर्ज-धोरणाबाबतची अनिश्चितता जेथे दिसली तेथे योग्य ती टीका करण्यासहि 'केसरी' कचरला नाही

हेंहि आपण लक्षांत घ्या. जागृत लोकमताची नाडी आम्ही आमच्या हातची सोडलेली नाही. आता 'केसरीं'त सहकारी अर्थव्यवस्थेला व नियोजनाला पाठिंबा येतो व आर्थिक मक्तेदारीला विरोध होतो म्हणून जर कोणी आम्हावर नाराज असतील, तर ते केवळ हितसंबंधियांच्या अपप्रचाराचे बळी होतात, असें म्हणणें प्राप्त आहे."

"का हो ! आजकालच्या सार्वदेशिक अर्थकारणाच्या अज्ञानामुळे तर ही मंडळी केसरीस 'लाल' म्हणत नसतील ? " ते गृहस्थ हसत म्हणाले.

"असेल, तसेंहि असेल. पण सध्या एखाद्याला 'कम्युनिस्ट' म्हणणें हा एक शिवीचा सभ्य प्रकार झाला आहे," मी म्हणालों, "इंदिराजी कम्युनिस्ट आहेत व त्यांना विशिष्ट गोष्टींत 'केसरी' पाठिंबा देतो तेव्हा तोहि कम्युनिस्ट झाला असें कांही विचित्र तर्कशास्त्र लढविलें जातें. इंदिराजींना, त्या सत्तावादी राजकारण खेळणाऱ्या चतुर नेत्या आहेत, असें म्हणतां येईल; पण त्या कम्युनिस्ट नाहीत. पार्लमेंटमध्ये त्यांनी कम्युनिस्टांचें साह्य घेतलें याखातर त्यांना कम्युनिस्ट म्हणावयाचें, तर पंजाबमध्ये कम्युनिस्टांच्या मांडीला मांडी लावून जनसंघहि बसला होता व प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा बंगालला लागू करण्याला विरोध करतांना, सिंडिकेटचे डॉ. रामसुभगसिंग यांनी इंदिरा-विरोधाच्या नादांत डाव्या कम्युनिस्टांशीं हातमिळवणी केली होती, त्याला काय म्हणायचें ? "

"लालबहादूर शास्त्रींचा खून रशियाने केला व इंदिराजी-यशवंतराव ती वस्तुस्थिति रशियाधार्जिणेपणाने लपवून ठेवीत आहेत" वगैरे अपप्रचाराचे मासले त्याच जातीचे आहेत. एका शहाण्या संपादकाने एका परदेशी वकिलाला ऐकवलें की, पं. नेहरूंनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांना नाहीसें केलें व त्यांच्या लेकीने रशियाच्या मदतीने आपल्या मार्गांतील शास्त्रींचा काटा काढला. त्यावर सदर वकिलाने "पुरावा आहे का" असें विचारलें, तेव्हा नाही म्हणावें लागलें. असा आहे हा अर्वाच्य प्रचार. निवडणुकीच्या प्रचारांत तर सत्याचा प्रथम बळी पडतो."

ते गृहस्थ माझ्या या बोलण्याने जरा खुललेले पाहून, मीं थोड्या विनोदाने त्यांना म्हटलें, "आपल्याला एक गोष्ट सांगतों. तात्पर्य मघाशींच एका वाक्यांत सांगितलें आहे.

'सत्' व 'असत्' या दोघी जुळ्या बहिणी ! रूपाने सारख्या, परंतु 'सत्'ला समाजांत मान मिळे, प्रतिष्ठा मिळे, तर 'असत्'ला सारे हिडीस-फिडीस करीत. त्यामुळे 'असत्'ला 'सत्'चा मत्सर वाटे.

तिने एकदा विचार केला की, 'सत्'चा पोषाख घालून आपण जर हिंडूं लागलों, तर लोक आपणास 'सत्' मानून मान देतील.

एकदा 'सत्' स्नानाला गेली असतांना तिचे कपडे 'असत्'ने पळविलें व ती ते कपडे घालून समाजांत मिरवूं लागली. त्यामळे लोक 'असत्'ला 'सत्' समजून मान देऊं लागले.

कसें 'सत्'चें नाक कापलें गेलें म्हणून 'असत्' मनोमनीं आनंदली.

'असत्'ने आपले कपडे चोरलेले पाहून 'सत्' 'असत्'वर रागावली. पण उपयोग काय ? 'असत्' 'सत्'च्या पोषाखामध्ये वावरत होती व त्यामुळे लोक तिलाच कांही काळ 'सत्' मानू लागले.

'सत्' म्हणून एका साधूकडे गेली व तिने आपलें गाऱ्हाणें त्याच्या कानीं घातलें. साधुमहाराज म्हणाले, "बाई, तू कांही बोलू नकोस. खोटयामागे खरें पळू लागलें, तर तें आणखीच पुढे पळतें. पण खोटेपणा कायम कधीच पचत नाही. शेवटीं त्याचें रूप उघड होतें व सत्याची प्रतिष्ठा वाढते."

"आज 'केसरी' साम्यवादी झाला असा प्रचार सुरू आहे. एके काळीं केसरी मवाळ बनला असा प्रचार होत होता. कोणीं त्याला महात्मा गांधींचें शत्रुपद दिलें होतें. कोणी जातीयवादी म्हणत होता. कोणीं त्याला ब्राह्मणपक्षाचा पुरस्कर्ता ठरविलें, होतें. तात्पर्य इतकेंच की, ज्याला जें कारण सुचलें तें त्याने त्या वेळीं पुढे करून 'केसरी'चा पाडाव करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला. पण जनतेच्या पाठ-बळावर 'केसरी'ने आपला प्रगतिमार्ग कधीच सोडला नाही. जें राष्ट्राला हितकारक तें न कचरतां सांगितलें."

त्या गृहस्थांच्या चेहऱ्यावर एका प्रश्नाचें उत्तर मिळाल्याचें समाधान मला दिसलें, तरी तें झाकून टाकीत ते म्हणाले, "केसरी कम्युनिस्ट झाला ही भाषा अर्वाच्य व अज्ञानाची खरी ! पण 'केसरी'ने आजवर काँग्रेसला विरोध करण्याचें धोरण कां बदललें ? याचा खुलासा देशाची आर्थिक व्यवस्था समजावून सांगतांना आपण कांहीसा केलात, तरी पण अजून माझें समाधान झालेलें नाही. आम्हांला ते 'केसरी'च्या परंपरेशीं विसंगत वाटतें."

त्यांना मधेच अडवून मी म्हणालों, "आपण काँग्रेस हा जुना, पण आता मोघम शब्द वापरूं नका. लोकशाहीच्या बुरख्याखाली पक्षशाही चालविणारा काँग्रेसचा रणगाडा मोडला. त्याचीं दोन शकलें झालीं. त्यांतील सत्ताधारी इंडिकेट लोकसभेमध्ये अल्पमतांत होती. जुन्या काँग्रेसने जातीय निवाडा स्वीकारून खऱ्या राष्ट्रवादाला मूठमाती दिली. एकपक्षीय हुकूमशाहीचा कारभार शासनामध्ये चालू केल्याने लोकशाही संकुचित केली. बडया भांडवलदारांसाठी नियोजन राबविल्याने मक्तेदारी दृढ होऊन सामान्य माणूस नागविला म्हणून तिला आमचा विरोध होता. काँग्रेसच्या या अधःपाताला जें कारणीभूत होते, जे पक्षशाही, जातीयवाद, मुस्लिम-धार्जिणेपणा, शांततावादाचें स्वप्नरंजन, भांडवलदारी धोरणाचा पुरस्कार करीत होते, ते मोरारजी, पाटील, घोष, निजलिंगप्पा आज सिंडिकेटमध्ये आहेत. तेव्हा तसें पाहिलें, तर जो पूर्वीपासून आमचा काँग्रेसला विरोध होता तो आजहि चालूच आहे. कारण सिंडिकेटला आमचा स्पष्ट विरोध आहे. सिंडिकेटशी केवळ 'इंदिरा हटाव'ही नाकर्ती भूमिका घेऊन स्वतंत्र, जनसंघ व संयुक्त समाजवादी हातमिळवणी

करीत आहेत. स्वाभाविकच ज्या वड्या आघाडींत स्वतंत्र पक्ष व सिंडिकेट पुढारी आहेत तिला 'केसरी'चा त्याच्या पारंपरिक धोरणानुसार पाठिंबा मिळणें शक्य नाही.

"इंडिकेटचेंहि मुस्लिम-अनुनयाचें धोरण आम्हाला मुळीच मान्य नाही. परंतु इंडिकेटचें आर्थिक धोरण हें सिंडिकेटच्या धोरणापेक्षा त्यांतल्या त्यांत बरें व प्रगतिशील आहे. पण म्हणून इंडिकेटच्याहि राजकीय जाहिरातबाजीवर टीका करण्यास आम्हीं मागे पाहिलेलें नाही. इंडिकेटचा जाहीरनामा प्रकट होतांच त्यांत आर्थिक किंवा सामाजिक विकासाचा मूलगामी कार्यक्रम दिसत नाही, तसेंच किंमत-नियंत्रण, रोजगारांत वाढ, उद्योगधंद्यांना प्रोत्साहन आदि भाषा आजवरच्या अनुभवावरून कोरडी वाटते, असें आम्ही नुकतेच जे अग्रलेख लिहिले, त्यांत स्पष्ट म्हटलें आहे."

त्यावर ते गृहस्थ मिष्किलपणें म्हणाले, "इंडिकेटला आपण पाठिंबा देतां व त्याच्या जाहीरनाम्यावर टीकाहि करतां. तो आपणांस कोरडा वाटतो. या विसंगतीचा जरा खुलासा कराल का? शिवाय देशांतील कायदा व सुव्यवस्था धोक्यांत आलेली पाहून तर नवकाँग्रेसला दिलेल्या पाठिंब्याबद्दल फार आश्चर्य वाटतें."

"आपण नेमक्या ठिकाणीं आता बोट ठेवलें आहे," मी म्हणालों, "इंडिकेटला एकसंध पक्ष म्हणून आम्ही लोकसभेच्या मध्यावधि निवडणुकीपुरताच जो पाठिंबा देत आहोंत त्याचें कारण केंद्रांत त्याचेंच स्थिर सरकार येऊं शकेल असें तूर्त तरी दिसतें. स्थिर सरकार स्थापन झालें तरच कारभारांतील दोष दूर होण्याची शक्यता असते. कांही भरीव मूलगामी कार्यक्रम आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने हातीं घेतां येतात. जुन्या काँग्रेसमधील मोरारजी-पाटील आदि हुकूमशहांना घोंगडीवर काढण्याचें जें धाडस नव-काँग्रेसने दाखविलें आहे तें देशाच्या प्रगतीला उपयोगी पडतें का पाहवें अशी आमची इच्छा आहे."

यावर ते गृहस्थ मधेच कडवटपणें म्हणाले, "मोरारजी-पाटील आदि हुकूमशहांना बाहेर काढून उद्या इंदिराजीच हुकूमशहा बनतील अशी शंका अनेकजण प्रकट करतात."

"पण महामंत्र्यांना हुकूमशहा बनावयाचें असतें, तर मध्यावधि निवडणुका जाहीर करण्याचें कारण काय? इंदिराजींनी मध्यावधि निवडणुका जाहीर केल्या यांत पक्षीय डावपेच जरूर आहे. परंतु प्रामुख्याने त्यांचें सरकार अल्पमतांत होतें, म्हणून त्यांनी आपल्या धोरणाला जनतेचा पाठिंबा मागितला आहे. संसदीय प्रथे-प्रमाणें हें शास्त्रशुद्धच होय व इंदिराजी संसदीय लोकशाही मानतात याचें तें गमक आहे. लष्करी हुकूमशाही कोणी मनांत वागवीत असेल, तर ते विरोधी पक्षांपैकी शिवसेनेसारखी संघटना व कांही व्यक्ति. असो. त्यांतून आम्हीं आमचे जनहित सांभाळण्याचें व्रत कांही सोडलेलें नाही. इंदिरा सरकार असो, नाही तर इतर

कोणाचें असो, न्याय, स्वातंत्र्य, समता व भ्रातृभाव या सरनाम्यांतील तत्त्वांविरुद्ध राज्यकर्त्यांकडून जेथे भ्रष्ट कारभार व लोकशाहीला घातक वागणूक होईल तेथे आम्ही त्यांच्यावर कडाडून आसूड ओढणारच ! "

" बरें ! कायदा व सुव्यवस्थेचें काय ? " ते गृहस्थ अडवून म्हणाले.

" आपण कायदा व सुव्यवस्था यांचा प्रश्न काढलात. कारण आपल्या डोळ्यांपुढे पश्चिम बंगालमधील अराजकाच्या, खुनाखुनीच्या रोज ठळकपणें वृत्तपत्रांतून येणाऱ्या बातम्या तरळत असणार. पश्चिम बंगालमधील परिस्थिति आहेच तशी गंभीर. जमिनीच्या प्रश्नापुरती तेथे क्रांति झालीच आहे, पण त्या चळवळीने अराजकाचें स्वरूप घेतलें आहे. नक्षलवाद्यांच्या हातीं ती गेली आहे. पण तेथील आजच्या या परिस्थितीला मुळांत कोणी जबाबदार असतील, तर सिंडिकेटचे अतुल्य घोष यांच्यासारखे नेते. स्वतःच्या हातीं अनिर्बंध सत्ता ठेवण्यासाठी त्यांनी तेथील निष्ठावान् काँग्रेसनेत्यांना, भावनाप्रधान तरुणांना, हिंदुत्वप्रेमी निर्वासितांना व गरीब शेतकऱ्यांना एखाद्या सुलतानाप्रमाणे वागवलें. पश्चिम बंगालचा कोणताच प्रश्न सुटला नाही. ना जमिनीचा, ना सुशिक्षित बेकारांचा, ना निर्वासितांचा ! सत्तेच्या राजकारणामध्ये काँग्रेस मात्र दुभंगली. अजय मुकर्जी आदि बाहेर पडले. आपआपसांत झगडे सुरू झाले व त्याचा फायदा डाव्या कम्युनिस्टांना आणि नक्षलवाद्यांना मिळाला. अजूनहि त्या शापापासून वंगभूमि मुक्त झालेली नाही.

" इंदिराजींच्याहि कारभारांत दोष नाहीत असें नाही. पश्चिम बंगालची परिस्थिति त्या सुधारूं शकल्या नाहीत. पण जर केंद्रांत स्थिर सरकार स्थापन झालें, तर पश्चिम बंगालबाबत कणखर व्यावहारिक उपाय वापरून नक्षलवादी अराजकाचा हा राजकीय व आर्थिक प्रश्न त्या सोडवूं शकतील अशी निदान आशा आहे. केंद्रांत स्थिर सरकार स्थापन झाल्याने देशभर पसरणारें अराजक तरी थांबेल. "

" इंदिराजीचेंच स्थिर सरकार कां म्हणतां ? बड्या आघाडीला बहुमत मिळालें व तिचें सरकार स्थापन झालें, तर तें काय स्थिर होणार नाही ? " त्या गृहस्थांनी विचारलें.

" बड्या आघाडीचें आणि स्थिर सरकार, आपण म्हणतां तरी काय ? " मीहि जरा चेष्टेच्या सुरांत म्हणालों, " हें पहा, बड्या आघाडीत आज चार पक्ष प्रामुख्याने आहेत. सिंडिकेट, स्वतंत्र, जनसंघ व संयुक्त समाजवादी. एखाद्या विशिष्ट कामासाठी उभ्या राहणाऱ्या आंदोलनांत विविध व विभिन्न पक्षांनी एकत्र येऊन तें आंदोलन करणें वेगळें व विभिन्न विचारांच्या व तत्त्वांच्या पक्षांनी सरकार चालविणें वेगळे. दुष्काळ-निवारण, गोवें-विमोचन किंवा संयुक्त महाराष्ट्राच्या प्रस्थापनेसाठी कम्युनिस्टांपासून ते तहत जनसंघापर्यंत सारे पक्ष महाराष्ट्रांत समितीच्या झेंड्याखाली एकत्र आले किंवा बेळगावच्या प्रश्नासाठी अनेक पक्ष एकत्र

लढले; पण तीच समिति महाराष्ट्रांत सरकार स्थापण्यास उद्युक्त झाली असती तर समितीचें सरकार कितपत स्थिर राहिलें असतें ?

"देशांतील नऊ राज्यांतून सं. वि. द.चीं सरकारें प्रस्थापित झालीं, पण सर्व अल्पायुषी ठरलीं. तेथील कारभार बिघडला, नोकरशाही मातली व भ्रष्टाचार बळावला असाच अनुभव जमेस आहे. बडचा आघाडींतील मालमत्तेवरील हक्क मूलभूत म्हणून पवित्र मानणारा स्वतंत्र पक्ष व मालमत्तेवरील हक्क नष्ट करा, असें सांगणारा संयुक्त समाजवादी पक्ष, यांच्यामध्ये एकत्र सरकार बनविण्यास लागणारी समविचाराची बैठक आहे, असें मानतां येईल काय ? सिंडिकेटचा मुस्लिमांबद्दलचा दृष्टिकोन व जनसंघाचा दृष्टिकोन यांत कोणतें साम्य आहे ? केवळ इंदिराजींना स्थानभ्रष्ट करण्यासाठी सारे एकत्र आले आहेत. कदाचित् अशक्य तें शक्य होऊन निवडणुकींत त्यांना बहुमत मिळालें, तरी बडचा आघाडीचें सरकार कधीहि स्थिर राहूं शकणार नाही.

"नियोजन, परराष्ट्रीय धोरण, संरक्षणविषयक सज्जता यांचे परस्परविरोधी विचारसरणीच्या घटक-पक्षांच्या संमिश्र मंत्रिमंडळांत 'तीन-तेरा' वाजतील. स्वतंत्र पक्षाचें अमेरिकाधार्जिणें धोरण संयुक्त समाजवाद्यांना मानवेल काय ? जनसंघाची संरक्षणसिद्धतेची कल्पना सिंडिकेटला सहन तरी होईल काय ? खुल्या व्यापाराचें स्वतंत्रांचें धोरण व चार वर्षे नियोजन बंद करून मक्तेदार भांडवलदारांच्या हातीं आर्थिक व्यवस्था देण्याची त्यांची कल्पना इतर सहकाऱ्यांना चालेल काय ? ही आवळ्याभोपळ्याची मोट टिकणार नाही. परिणामीं, राज्यकारभाराचें गाडें रुतून बसून अस्थिरता वाढीला लागेल."

"अहो ! केंद्रांत अस्थिर सरकार म्हणजे देशांत अस्थिरता !" ते गृहस्थ नकळत बोलून गेले.

मी म्हणालों, "आपण म्हणालांत तें अगदीं खरें आहे. आजच्या आर्थिक अस्थिरतेंत तर त्यामुळे भरच पडेल. आजची कायदा व सुव्यवस्थेची ढिली अवस्था अराजकाचा मार्ग अनुसरूं लागेल. देशांतील शिक्षितांची बेकारी, आर्थिक व सामाजिक विषमता, संकुचित प्रादेशिक वाद हे सर्व इंधन भडका उडविण्यास पुरेसें आहे. आज पश्चिम बंगाल पेटला आहे. केंद्रांत अस्थिरता आली, तर सारा देश जळूं लागेल."

ते गृहस्थ गंभीरपणें म्हणाले, "'केसरी'च्या वाचकांत मध्यमवर्गीय नोकर-पेशाचेहि लोक आहेत. ते वाढत्या किमती, अपुरा रोजगार, यांनी पोळले गेले आहेत. बिनकसणारे शेतमालक म्हणून त्यांच्या जमिनी गेल्या. आता नोकरींत पैसा साठवून बांधलेलें घरहि जाईल काय, म्हणून ते धास्तावले आहेत. या धास्तावलेल्या अस्वस्थतेमुळेच ते अपप्रचारास बळी पडूं शकतात."

मीं म्हणालों, "खरोखरी तेहि आर्थिक विषमतेचे बळी आहेत. त्यामुळेच किमती वाढत आहेत व संसार ओढगस्तीचा होत आहे. त्यांचीं मुलें त्यामुळेच बेकार

राहणार आहेत. परंतु जर मध्यमवर्ग आपल्या पायापुरतें पाहण्यास शिकूं लागला तर तें बरोबर नाही. बहुजनसमाज शिक्षित होत आहे. या देशांत केवढा मोठा समाज असा आहे की, ज्याला अजून कसलीच सामाजिक प्रतिष्ठा नाही. तेथे सामाजिक न्याय कोठून मिळणार? त्याला पोटाला मिळेल याची खात्री नाही व झोपडपट्टीशिवाय आसरा नाही. त्या समाजाचाहि विचार करायला हवा.

"मध्यमवर्गाचीं साठ टक्के मतें आम्हांस आहेत, असें पुण्यांत सांगणारा पक्ष आहे, पण तो बहुमान नव्हे, तर संकुचितता व्यक्त होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळेला कांही मध्यमवर्गीय असेच संकुचिततेने ग्रासले गेले होते. तेव्हाहि 'केसरी'त त्यांच्या विरुद्ध आवाज उठवावा लागला.

"थोडक्यांत, आपलें म्हणणें असें की, देशांतील आजच्या अस्वस्थ स्थितींत केंद्रांत घट्ट व स्थिर सरकार हवें. तें नसेल तर साऱ्या देशांत अराजक माजेल, हेंच ना!" ते गृहस्थ म्हणाले.

"अगदी बरोबर; आणि असें घट्ट आणि स्थिर सरकार इंदिराजीच्या नव-काँग्रेसला प्रस्थापित करतां येणें शक्य दिसतें. त्यामुळेच राष्ट्रसुरक्षिततेसाठी इंडि-केटला पाठिंबा देत आहोंत. मात्र इंडिकेटमधल्या अप्रामाणिक अगर प्रगतिविरोधी उमेदवारांना आम्ही स्पष्ट विरोधच करणार. महाराष्ट्रापुरते विरोधकांच्या पदरांत अगदीच मोजक्या जागा पडणार म्हणून पुरोगामी व लोकहितदक्ष उमेदवारांनाच आमचा पाठिंबा राहील. प्रामाणिक व्यापारी, लहान व मध्यम उद्योगधंद्यांचे मालक, नोकरपेशाचा मध्यमवर्ग, प्रगतिपथावर असलेला बहुजनसमाज व पिचलेला दलितवर्ग या सर्वांचे हितसंबंध केंद्रसरकार स्थिर व घट्ट झालें तरच सुरक्षित राहणार आहेत. हें स्थिर सरकार आज इंदिराजींची नवकाँग्रेसच निर्माण करू शकते. म्हणून तिला केंद्रांत घट्ट सरकार बनविण्यास 'केसरी' साहाय्य करूं इच्छितों. जनतेनेहि विचक्षणता राखून त्या पक्षाला पाठिंबा द्यावा. केंद्रांत स्थिर सरकार आलें नाही, तर देशांत अराजक निर्माण होईल व त्याचे सारेच बळी ठरतील."

**— केसरी, दि. ७ फेब्रुवारी, १९७१**

**परिशिष्ट २**

# 'केसरी'चें स्थूल धोरण

'केसरी'च्या विश्वस्तांनी मध्यावधि निवडणुकीसंबंधीचे 'केसरी'चें स्थूल धोरण संपादकवर्गाच्या माहितीसाठी एका टिपणाने स्पष्ट केलें. तें टिपण असे —

हल्लीच्या सरकारचा गेल्या दीड वर्षांतील कारभार पाहतां तो प्रगतिशील अगर फलदायी झाला आहे असें म्हणतां येत नाही. दोन महत्त्वाचे निर्णय घेतले —

(१) बँकाचें राष्ट्रीयीकरण (२) राजांची मान्यता काढणें. दोन्ही बाबतींत घिसाडघाई केली व मूळ हेतु प्रागतिक धोरण नसून, राजकीय जाहिरातबाजी होती असें स्पष्ट झालें. राष्ट्रीयीकरणाबाबत पूर्ण विचार कांहीच केलेला नव्हता. यामुळे बँक-भागीदारांस अवाच्यासवा मोबदला द्यावा लागला आणि अजूनहि राष्ट्रीय बँकांचा कारभार विस्कळीत आहे व धोरण सुसंगत नाही. हल्लीची किंमतवाढ अंशत: याच्यापोटींच झाली आहे.

समाजवादाची घोषणा पोकळ आहे. मोठ्या उद्योगपतीस तारणें याखेरीज कोणतेंच नवें धोरण दिसत नाही. पण याचबरोबर औद्योगीक परवाने वगैरे देण्या-संबंधी भ्रष्टाचाराची ओरड अलीकडे फार वाढली आहे. समाजवाद व संमिश्र अर्थ-व्यवस्था विकासाकरिता चालविण्याची जबाबदारी, यांच्या समन्वयाचे स्वरूप बिलकूल आकलन झालेलें दिसत नाही. सार्वजनिक उद्योगांतील कार्यक्षमता घटत आहे. त्यांचे प्रमुख व्यवस्थापक पूर्वीप्रमाणे बडे अधिकारी किंवा वशिल्याचे नेमले जातात. किंमतवाढ यंदा जास्त जोरांत झाली हें सरकारी अकार्यक्षमतेचें स्पष्ट लक्षण आहे.

राजकारणांत कोठे तत्त्वविचार किंवा खंबीरपणा नाही. केवळ तात्कालिक राजकीय फायद्याकडे लक्ष दिसतें. सरकारी नोकरांची पगारवाढ; मणिपूर, त्रिपुरा यांस राज्य-दर्जा देणें ही दीर्घकालीन परिणामांचा विचार न करण्याची लक्षणें आहेत. खंबीर धोरणास आवश्यक असें नैतिक अधिष्ठान मिळविण्याचा प्रयत्न नाही. निरनिराळ्या राज्यांतील सरकारें मोडणें अगर बनविणें याबद्दलचे डावपेच, केरळ निवडणुकीच्या आधीची रवर-किंमतीची घोषणा किंवा उत्तर प्रदेशांतील साखर-कारखान्यांच्या राष्ट्रीयीकरणाचा ठराव असे अनेक संधिसाधूपणाचे नमुने आहेत.

हें सर्व खरें असलें तरी, पर्यायी पक्ष अगर सरकार धडसें आढळून येत नाही. निरनिराळ्या आलटापालटीच्या वेळेस कोणत्याच विरोधी पक्षाने स्पष्ट व सुसंगत भूमिका घेतली नाही. शिवाय कोणत्याच इतर पक्षास मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळण्याचा संभव नाही. तेव्हा गेल्या दीड वर्षांतील धोरणांतील दोष अंशत: तरी अल्पमतांत असल्यामुळे, आलें असें समजून, घट्ट बहुमत मिळाल्यास, नवकाँग्रेस हाच एक पक्ष गाडें नीटपणें रेटण्याचा संभव आहे, असें मानणें प्राप्त ठरतें. याचा अर्थ, नवकाँग्रेसच्या प्रत्येक उमेदवारास पाठिंबा असा नाही. स्थूलमानाने पक्षास पाठिंबा व व्यक्तिगत उमेदवारांत तारतम्याने सच्या व प्रगतिशील उमेदवारास पाठिंबा.

ध. रा. गाडगीळ
वा. श्री. टिळक

दि. १३।१।१९७१